म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0000252



समाजशास्त्राचीं तत्त्वें

भाग १. मूलसिद्धान्त

REFBK-000252

हर्बर्ट स्पेन्सर

ह्यांच्या

The Data of Sociology ह्या ग्रंथाधारें

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.



बळवंत गणेश दाभाळकर

पुणें

शकवर्ष १८२७—इ० सन १९०५.

पुणें एथें

रावजी श्रीधर गोंधळेकर ह्यांनीं आपले

"जगद्धितेच्छु" छापखान्यांत छापिला.

(सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.)

पुढील ग्रंथ

समाजशास्त्राचीं तत्त्वें

भाग २. अनुभवजन्य सिद्धान्त

भाग ३. गृहसंस्था

ग्रंथकार स्पेन्सर व फडके

अनुभवजन्य सिद्धान्त—विषयः—१. समाज म्हणजे काय ? २. समाज हें एक इंद्रियजाल आहे. ३. समाजवृद्धि. ४. समाजघटना. ५. समाजव्यापार. ६. इंद्रियंप्रकार. ७. पोषणव्यवस्था. ८. विभजनव्यवस्था. ९. नियमनव्यवस्था. १०. समाजप्रकार. ११. समाजरूपान्तर. १२. विशेष विचार व गोळावेरीज.

गृहसंस्था—विषयः—१. उपजातिसंरक्षण. २. उपजातिजनक व संतति ह्यांचीं भिन्नभिन्न हिताहितें. ३. स्त्रीपुरुषांचे प्राथमिक संबंध. ४. ज्ञातिबाह्य विवाह व ज्ञातिगत विवाह. ५. संमिश्रस्त्रीपुरुषव्यवहार. ६. अनेकपतिविवाहपद्धति. ७. अनेकपत्नीविवाहपद्धति. ८. एकपत्नीपद्धति. ९. कुटुंब. १० स्त्रियांची स्थिति. ११. मुलांची स्थिति. १२. गृहसंस्थांची भूत व भावी स्थिति.

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; वर्गणीदारांस किंमत २ रुपये.

नारायण पेठ, घर नंबर ४६८, पुणें सिटी.

बळवंत गणेश दाभोळकर
प्रकाशक.

आतांपर्यंत प्रकाशित झालेले माझे उपयुक्त ग्रंथ

१. **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Data of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **चिंतामण गंगाधर भानु**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—प्रती शिल्लक नाहींत.

२. **न्यायतत्त्वें**—सदरप्रमाणें "Justice" ह्या ग्रंथाच्या आधारानें. किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

३. **ज्योतिर्विलास** अथवा **रात्रीची दोन घटका मौज.**—रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.—प्रती शिल्लक नाहींत.

४. **संसारसुख**—दी राइट ऑनरेबल सर **जॉन लबक्**, एम्. पी. ह्यांच्या "The Pleasures of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० सा० **कृष्णाजी परशुराम गाडगीळ** ह्यांकडून लिहविला. (आवृत्ति तिसरी) किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

५. **शास्त्ररहस्य**—रा० रा० **ना० ल० फडके**, बी. ए.; रा० रा० **शं० बा० दीक्षित**; प्रि० **म० शि० गोळे**, एम. ए; प्रो० **वि० बा० भाटे**, बी. ए.; प्रो० **धों० के० कर्वे**, बी. ए.; रा० सा० **कृ० प० गाडगीळ**; प्रो० **चिं० गं० भानु**, बी. ए.; रा० रा० **ह० ना० आपटे** व रा० रा० **रा० भि० जोशी** ह्या नऊ विद्वानांकडून निरनिराळ्या ९ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला.—प्रती शिल्लक नाहींत.

६. **आत्मनीतीचीं तत्त्वें** आणि **परोपकार.**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Ethics of Individual Life" व "Beneficence" ह्या ग्रंथांच्या आधारानें यथाक्रम रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांजकडून लिहवून एकत्र केला.—प्रती शिल्लक नाहींत.

७. **नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धान्त**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या " The Inductions of Ethics " ह्या ग्रंथाच्या आंधारानें प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

८. **धर्ममीमांसा–नैसर्गिक धर्म** आणि **भौतिक धर्म**—भट्ट **मोक्षमूलर** ह्यांच्या " Natural Religion " व " Physical Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

९. **राजनीतीचीं मूलतत्त्वें** (भाग १)—**हेनरी सिजविक्** ह्यांच्या " The Elements of Politics " ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० **वासुदेव वळवंत पटवर्धन**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१०. **अज्ञेयमीमांसा** (स्पेन्सरचरित्रासह)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " First Pirnciples " ह्या ग्रंथाच्या " The Unknowable " भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—प्रती शिल्लक नाहींत.

११. **धर्ममीमांसा–पितृमूलक धर्म** आणि **आध्यात्मिक धर्म**—भट्ट **मोक्षमूलर** ह्यांच्या "Anthropological Religion " व " Psychological Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा०रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१२. **जीवनशास्त्राचीं सामान्य तत्त्वें** (पुस्तक १)—रा० रा० **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए., फर्ग्युसन कॉलेजांतील " प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र " ह्या शास्त्रांचे प्रोफेसर ह्यांकडून स्वतंत्रग्रंथरूपानें लिहविला.—किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१३. **ज्ञेयमीमांसा** (पूर्वार्ध)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Knowable " भागाच्या पूर्वार्धाच्या आधारानें

रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१४. **भारतवर्षीय भूवर्णन** (प्राचीन)—रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांनीं लिहिला.—प्रती शिल्लक नाहींत.

१५. **ज्ञेयमीमांसा** (उत्तरार्ध)—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या "First Principles" ह्या ग्रंथाच्या "The Knowable" भागाच्या उत्तरार्धाच्या आधारानें रा०रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१६. **जीवितकर्तव्य** अथवा **संसारकर्तव्य**—दी राइट ऑनरेबल **लार्ड एव्हबरी** ह्यांच्या "The Use of Life" ह्या ग्रंथाच्या आधारें रा० रा० **दत्तात्रेय नारायण नावर**, बी. ए., एल्एल्. बी. ह्यांनीं लिहिला.—प्रती शिल्लक नाहींत.

१७. **राणीच्या राज्याचा इतिहास**—**जस्टिन् मॅकार्थीकृत** "A History of Our Own Times" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला. किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१८. **आत्मविद्या**—रा० सा० हरि **गणेश गोडबोले**, बी. ए. ह्यांनीं आर्यतत्त्वज्ञानाच्या प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांच्या आधारें स्वतंत्र रीतीनें लिहिला. (आवृत्ति दुसरी) किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१९. **समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त**—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या "The Data of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला—किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

कायम वर्गणीदार आणि त्यासंबंधानें माहिती.

प्रतिवर्षीं दोन नवीन ग्रंथ मी प्रसिद्ध करीत असतों: एक साधारणपणें मे-जून महिन्यांत व दुसरा नवंबर-डिसेंबरांत. हे ग्रंथ आधुनिक शास्त्रांवर विद्वानांस श्रमाचा मोबदला देऊन, भाषांतर-

रूपानें अगर स्वतंत्रग्रंथरूपानें मी सुद्धां लिहावितों. आतांपर्यंत निरनिराळ्या शास्त्रांवर विद्वानांकडून १९ मराठी ग्रंथ मीं लिहवून घेले व प्रसिद्ध केले. शास्त्रीय ग्रंथ बहुधा कोणासहि रुक्ष व नीरस वाटणारे असतां, इतके ग्रंथ मीं प्रसिद्ध केले कसे, हें खरोखर आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु सुशिक्षित व समंजस माणसांच्या मदतीचें, आणि माझ्या अल्प संतोषाचें, सतत उद्योगाचें व दीर्घ परिश्रमाचें हें फल आहे. मजकडून प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेत जाऊं अशाबद्दल आजरोजीं सुमारें ५०० सभ्य गृहस्थांचें मजजवळ लेखी वचन आहे. आणि जोंपर्यंत सांत कमतरता येणार नाहीं तोंपर्यंत आणखी कांहीं ग्रंथ लिहवीन व प्रसिद्ध करीन अशी माझी उमेद आहे. कायम वर्गणीदार असलेल्यांखेरीज ज्या कोणांस ह्या उद्योगास मदत करणें योग्य वाटेल व सोय असेल त्यांस पुढीलप्रमाणें नियमांनीं कायम वर्गणीदार होतां येईल.

(१) प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेण्याबद्दलचें लेखी वचन असावें.

(२) आवडीप्रमाणें अमुक विषयाचा ग्रंथ हवा अगर अमुक विषयाचा ग्रंथ नको असें म्हणतां यावयाचें नाहीं. प्रसिद्ध होत जाईल त्या प्रत्येक ग्रंथाच्या वचन दिल्याप्रमाणें तितक्या प्रती स्वीकारल्या पाहिजेत.

प्रत्येक ग्रंथाची किंमत १॥ किंवा २ रुपये असते. म्हणजे वर्षाचे कांठीं ३ किंवा ४ रुपये किंमतीचे ग्रंथ प्रसिद्ध होतात. आणि पुढें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाची तपशीलवार माहिती अगोदरच्या ग्रंथांत प्रसिद्ध होते. तसेंच परगांवच्यांस व्ह्याल्युपेएबलनें व पुण्यांतल्यांस प्रती घेऊन येणाराजवळ किंमत द्यावी लागते.

कायम वर्गणीदारांस फायदा एणेंप्रमाणें आहेः—

(१) पुण्यांतील कायम वर्गणीदारांस, अगाऊ वर्गणीदार होणारांकरितां ठेविलेल्या किंमतींत ४ आणे कमी पडतील.

(२) परगांवच्यांस टपालहंशील व व्हाल्युपेएबल मनीआर्डरचा खर्च पडावयाचा नाहीं.

(३) बाहेरगांवीं ५ प्रती एकत्र घेणारांस टपाल व व्ही. पी. चा खर्च न पडतां ५ प्रती ऐवजीं ६ प्रती मिळतील.

नारायण पेठ, घर नंबर ४६८, पुणें–सिटी.

बळवंत गणेश दाभोळकर.
प्रकाशक.

प्रस्तावना

स्पेन्सरसाहेबांनीं "आदितत्त्वें" या ग्रंथाच्या "ज्ञेयमीमांसा" या द्वितीय भागामध्यें जी उत्क्रान्तिविषयक कृति निरूपिली आहे ती सर्वत्र लागू पडते हें सविस्तर दाखविण्यासाठीं त्यांनीं आपले पुढील ग्रंथ लिहिले आहेत. आतां एकंदर विश्वाकडे पाहिल्यास मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचे चमत्कारसमूह दृष्टीस पडतात. एक, जीस आपण निर्जीव किंवा अचेतन सृष्टि म्हणतों तिजविषयींचे, म्हणजे पृथ्वी धरून आकाशस्थ जे एकंदर गोल त्यांच्या उत्पत्तिवृद्धिक्षयांबद्दलचे चमत्कार; आणि दुसरे जीस आपण सजीव किंवा सचेतन सृष्टि म्हणतों तिजाविषयींचे, म्हणजे वनस्पति व प्राणी यांच्या उत्पत्तिवृद्धिक्षयांविषयींचे चमत्कार. ह्या दोन चमत्कारवर्गांपैकीं पहिल्याचें निरूपण, इतर लोकांनीं तें केलेलें असल्यामुळें आणि तें व दुसऱ्या वर्गांतील चमत्कारांचें, दोन्ही प्रकारचीं निरूपणें करण्याचें सामर्थ्य (शरीरसामर्थ्य) आपल्या अंगीं आहे किंवा नाहीं याबद्दल स्पेन्सरसाहेबांस वानवा वाटून, त्यांनीं तें केलेलें नाहीं. म्हणून आदितत्त्वांच्या पुढच्या "जीवशास्त्राचीं तत्त्वें" या ग्रंथद्वयांत त्यांनीं वनस्पति व प्राणी यांच्या उत्पत्तिवृद्धिक्षयांचा विचार केला आहे, व ते त्यांचे व्यापार उत्क्रान्तिनियमास अनुसरून कसे होतात हें दाखविलें आहे. नंतरच्या "आत्मशास्त्राचीं तत्त्वें" या ग्रंथद्वयांत प्राण्यामध्यें शरीराव्यतिरिक्त मन म्हणून जें कांहीं व्यक्त

होतें त्याच्या उत्पत्तिवृद्धिक्षयांचा वरच्याच नमुन्यावर विचार केलेला आहे. तदनंतर "समाजशास्त्राचीं तत्त्वें" हें जें त्यांचें ग्रंथत्रय त्यांत समाजविषयक चमत्कारांचा विचार केलेला आहे. सारांश, प्रथम निरिंद्रिय उत्क्रान्तीचा विचार करावयाचा, त्याचा हवाला वर दाखविलेल्या कारणांवरून इतर ग्रंथांवर दिला आहे, आणि नंतर सेंद्रिय उत्क्रान्तीचा विचार "जीवशास्त्राचीं तत्त्वें" आणि "आत्मशास्त्राचीं तत्त्वें" या ग्रंथांतून केलेला आहे.

पण बरेच प्राणी समाजप्रिय असे दिसतात, म्हणजे त्यांस अनेक मिळून एकत्र रहावें असें वाटतें, आणि उच्चतर उच्चतर प्राण्यांकडे जसें पहावें तशी ही समाजप्रियता जास्त जास्त वृद्धिंगत झालेली दृष्टीस पडते. तेव्हां ही समाजप्रियता माणसामध्यें प्रथम कशी उत्पन्न होते, तिजवरून समाज कसे बनतात, आणि नंतर त्या समाजांना निरनिराळीं स्वरूपें येऊन त्यांमध्यें निरनिराळ्या संस्था, निरनिराळ्या विद्या, निरनिराळ्या कला, वगैरे कशा उत्पन्न होतात, हा एक सेंद्रिय उत्क्रान्तींनंतर, पण तिजपासूनच नवाच प्रकार उत्पन्न होतो. त्या प्रकारचें विवेचन उत्क्रान्तिदृष्ट्या करणें हा "समाजशास्त्राचीं तत्त्वें" ह्या ग्रंथत्रयाचा विषय आहे, व ह्या उत्क्रान्तीस त्यांनीं सेंद्रियजन्य किंवा सेंद्रियोत्तर असें नांव दिलेलें आहे.

आतां कोणत्याहि शास्त्राचें निरूपण करावयाचें, म्हणजे, तें शास्त्र किंवा तदन्तर्गत चमत्कारसमूह ज्या आधारांवर बनत असतील त्या आधारांचें निरूपण प्रथ-

म करावयाचें अशी स्पेन्सरसाहेबांची सामान्यच शिस्त आहे. तीस अनुसरून समाजविषयक चमत्कारांचीं मूल कारणें कोणतीं यांचा विचार प्रस्तुत ग्रंथांत केलेला आहे.

आतां या कारणांचा विचार करूं लागलें म्हणजे प्रथमच अंतःकारणें आणि बाह्य कारणें असे त्यांचे दोन मुख्य भाग पडताल; कोणताहि समाज व तदन्तर्गत चमत्कार विशिष्ट प्रकारचे बनणें हें जसें त्याच्यांतील लोकांच्या स्वभावांवर, कल्पनांवर, मनोवृत्तींवर आणि शक्तींवर अवलंबून असतें, तसेंच तो समाज जेथें वसला असेल तेथल्या जमिनीच्या कसावर, तेथील हवापाण्यावर, तेथील वनस्पतिसमूहावर, आणि तेथील प्राणिसमूहावरहि, अवलंबून असतें. म्हणून ह्या बाह्य कारणांचा किंवा बाह्योत्पादकांचा विचार प्रस्तुत ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणांत केला आहे. नंतर अंतरुत्पादकांचे शारीरिक, मनोवृत्तिविषयक, आणि बुद्धिविषयक, असे जे तीन भाग त्यांचें विवेचन क्रमशः पांचव्या, सहाव्या व सातव्या प्रकरणांत केलें आहे. हें, अर्थात्, समाजाची प्रथम रचना कशी झाली हें दाखवावयाचें असल्यामुळें मूळ माणसाच्या किंवा रानटी माणसाच्याच संबंधानें केलें आहे.

आतां समाजविषयक चमत्कार माणसाच्या त्या तीन प्रकारच्या विशेषांवर जसे अवलंबून असतात, तसेच ते त्याच्या ज्या विश्वविषयक निरनिराळ्या कल्पना किंवा समजुती त्यांजवरहि अवलंबून असतात. म्हणून मूळ माणसाच्या सामान्य कल्पनांचें निरूपण आठव्या प्रकरणांत करून, त्याच्या विशिष्ट कल्पनांचें किंवा समजु-

तींचें, व त्यावरून उत्पन्न होणाऱ्या निरानिराळ्या आ-
चारांचें विवेचन क्रमशः नवव्या ते पंचविसाव्या, या स-
तरा प्रकरणांत केलेलें आहे. त्याचें थोडक्यांत तात्पर्य
असें आहे कीं, वाह्य सृष्टीकडे पाहतां पाहतां सांवल्या,
प्रतिबिंबें आणि प्रतिध्वनी, यांचें अवलोकन व श्रवण क-
रून प्रथम रानट्यास असें वाटूं लागतें कीं वस्तू ज्या
एकेऱ्या दिसतात तशा त्या वास्तविक नसून, खरोखर
त्या दुबार आहेत, म्हणजे प्रत्येक वस्तूचा एकेक दुय्य-
म आहे. ही जी द्वित्वाबद्दलची कल्पना ती त्याला पड-
णारीं जीं स्वप्नें त्यावरून दृढ होते; कारण स्वप्नामध्यें तो
आपण अमक्या ठिकाणीं गेलों, अमुक व्यवहार केला,
इत्यादि गोष्टी पाहतो, आणि जागृतीमध्यें तर तसा त्यास
प्रत्यक्ष अनुभव कांहींच येत नाहीं; म्हणून त्यास असें
वाटतें कीं आपलाहि एक दुय्यम असून तो झोंपेमध्यें
हा सर्व व्यवहार करितो. या त्याच्या कल्पनेस, मूर्छा,
बेशुद्धि, अपस्मार, इत्यादि रोगांमध्यें तो ज्या गोष्टी पा-
हतो त्यांनीं जास्तच बळकटी येते. कारण ह्या रोगांम-
ध्येंहि रोगी ज्या चेष्टा करितो त्याची त्यास कांहींच
स्मृति नसते. म्हणून त्याहि प्रत्येक माणसांतील जो दु-
य्यम तोच करीत असतो असें रानटी माणसास वाटतें.
नंतर मरण ही एक बेशुद्धिच आहे, अशी त्याची सका-
रण समजूत होऊन त्या वेळींहि माणसाचा दुय्यम त्या-
च्यांतून निघून गेलेला असतो, व तो केव्हां तरी परत
येईल, असें त्यास वाटूं लागतें.

प्रथम हा दुय्यम अगदीं मूळ माणसासारखाच हा-
डामांसाचा असेल असें मूळ माणसास वाटून तो मृत मा-

णूस आपला आप्त असेल तर त्याच्या खाण्यापिण्याची वगैरे तरतूद तो करूं लागतो, आणि अशा रीतीनें निरनिराळ्या प्रेतसंतर्पणविधींची उत्पत्ति होते. अशा रीतीनें प्रेतपूजा एकदां उत्पन्न झाली म्हणजे तिजपासूनच पुढें सर्व प्रकारच्या पूजांची, म्हणजे पितृपूजा, मूर्तिपूजा, विशिष्टवस्तुपूजा, प्राणिपूजा, वनस्पतिपूजा, आणि सृष्टींतील सूर्य, चंद्र, इत्यादिकांची पूजा, ह्यांची उत्पत्ति होते, आणि त्यापासून एकंदर देवतापूजेची व अतएव एकदेवपूजेची, उत्पत्ति होत असते.

अशा रीतीनें रानटी माणसाच्या निरनिराळ्या समाजांची उपपत्ति पंचविसाव्या प्रकरणापर्यंत लाविल्यावर, सव्विसाव्या प्रकरणांत ह्या एकंदर प्रकरणांचा क्रमशः गोषवारा दिला आहे, आणि माणसाच्या ह्या समजुती उत्क्रान्तीच्या नियमास अनुसरून कशा बनल्या आहेत हें सिद्ध केलें आहे. नंतर सत्ताविसाव्या, म्हणजे शेवटच्या प्रकरणांत, समाजशास्त्राचा एकंदर प्रदेश केवढा आहे, म्हणजे, त्यामध्यें कोणकोणत्या गोष्टींचें विवेचन येणार आहे व आलें पाहिजे, हें सांगितलें आहे.

अशा रीतीनें प्रस्तुत ग्रंथाचा हा अगदीं थोडक्यांत गोषवारा झाला. तो विशेष विस्तृत रीतीनें एथें देण्याचें विशेष कारण बिलकूल नाहीं. कारण त्यांतील कोटिक्रम कोणास मान्य होवो वा न होवो, तो इतका सुगम आहे कीं, आणि त्यांत सिद्ध केलेल्या प्रत्येक गोष्टीच्या पुष्टीकरणार्थ इतकीं विपुल उदाहरणें दिलेलीं आहेत कीं, तो काय आहे हें समजण्याची कोणासच अडचण पड-

णार नाहीं. शिवाय हेंहि सांगणें इष्ट दिसतें कीं, हीं सर्व उदाहरणें निरनिराळ्या देशांतील प्रवाश्यांनीं रानटी लोकांच्या देशांतून प्रत्यक्ष पाहून ज्या ग्रंथांतून वर्णिलेलीं आहेत त्यांतून प्रत्यक्ष घेतलेलीं आहेत, आणि प्रत्येक उदाहरण कोणाच्या कोणत्या ग्रंथाच्या कोणत्या पानावरून घेतलेलें आहे, ह्याचा सविस्तर खुलासा मूळ ग्रंथाच्या शेवटीं पूरणिकेच्या रूपानें केलेला आहे. तें ग्रंथ मराठी वाचकांस प्राप्य नसल्यामुळें तो खुलासा एथें निष्प्रयोजन म्हणून दिलेला नाहीं. म्हणून प्रस्तुत ग्रंथांतील प्रत्येक उदाहरण विश्वसनीय आधारावरून घेतलेलें आहे ही गोष्ट वाचकांनीं विशेष लक्षांत राखावी.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५	१६	संबंधासारखे	संबंधांसारखे
१३	१९	बहुश;	बहुशः
१६	१८	उद्यम संस्था	उद्यमसंस्था
१७	२१	लागतात.	लागतात, व
२५	१४	आहे.	आहे,
४४	९	झालेलें	वृद्धिंगत झालेलें
५०	१०	आकार	वृद्धिंगत होणारा आकार
६३	१	जातींमध्यें	रानटी जातींमध्यें
८३	१७	दिसतें.	कमी दिसतें.
८४	२३	सजजली	समजली
८५	२५	ते	तें
९७	८	समाजाकडे	समाजांकडे
९९	२१	होय.	होत.
१०८	२४	दृश्यदृश्य	दृश्यादृश्य
११८	११	गोष्ट	गोष्ट.
१४४	८	अप्प	अल्प
१४७	२६	तँ	ते
१५२	१३	कांपावयास	कापावयास
१६८	२०	देशच्या	देहाच्या
१७७	११	अस्तित्व	अस्तित्वच
१७९	१६	तो	तें
१८८	२०	कल्पनेमध्यें	कल्प बरोबर
२१०	१६	हिस्टोरिया	हिस्टेरिया

२२३	७	गुहा देऊळ	गुहादेऊळ
२२९	१	नेला"	मेला.
२६०	२२	फारच	फारच अल्प
२६१	१४	मलायो, पो- लिनिशियन	मलायोपोलिनिशियन
२८०	१८	राहत	दिसत.
२८१	७	समाजांस	समजांस
२८२	१८	अशी	अशी जर
२८७	११	मानितात	मानितात.
,,	१४	होत्सातें	होत्साते त्यास
२८९	१८	करावी	करावीं
३०२	१	जती	जरी
३१९	१	त्यान	त्यानें
३२२	१८	समर्थ्य	सामर्थ्य
३२३	६	उदाहरण	उदाहरण.
३४९	२१	स्वरूपानेंच	स्वस्वरूपानेंच
३५०	७	सामर्थ्यांतून	सामर्थ्याहून
३५६	२२	सालमन	सामन
३५७	२५	युरोपियन	युरोपियन,

अनुक्रमणिका

१. सेंद्रियोत्तर उत्क्रान्ति १
२. समाजविषयक चमत्कारांचे उत्पादक... ... ... ९
३. मूळ वाद्योत्पादक २०
४. मूळचे अंतरुत्पादक ४२
५. मूळ माणसाचे शारीरिक विशेष ४८
६. मूळ माणसाचे मनोवृत्तिविशेष... ... ... ६०
७. मूळ माणसाचे बुद्धिविषयक विशेष ७५
८. मूळ माणसाच्या कल्पना ९४
९. सचेतन व अचेतन ह्यांबद्दलच्या कल्पना १२४
१०. निद्रा आणि स्वप्नें एतद्विषयक कल्पना १३२
११. मूर्च्छा, बेशुद्धि, अंगनैश्चल्य, अत्यानंद इत्यादि असंवेदनेचीं रूपें १४४
१२. मरण व पुनरुत्थापन एतद्विषयक कल्पना १५२
१३. भूत, पिशाच, डांव इत्यादिविषयक कल्पना १६६
१४. परजन्माविषयक कल्पना १७८
१५. परलोकविषयक कल्पना... ... ...१९२
१६. निसर्गोत्तर कर्त्यांबद्दलच्या कल्पना २०२
१७. फेंपरें व आळेपिळे, भ्रम व वेड, रोग व मरण ह्यांचीं दैविक कारणें २०८
१८. अवसर, शकुन सांगणें, पिशाच काढणें आणि चेटुक...२१८
१९. पवित्र स्थानें—देवळें व यज्ञस्थळें इत्यादि २३१
२०. पितृपूजा... ... ...२५८
२१. मूर्तिपूजा आणि विशेषवस्तुपूजा २७५
२२. प्राणिपूजा २९७
२३. वनस्पतिपूजा ३१८
२४. सृष्टिपूजा... ... ...३२९
२५. देवता ३४९
२६. वस्तुविषयक मूळ कल्पना ३६९
२७. समाजशास्त्राचा आवांका ३८८–४००

प्रकरण पहिलें
सेंद्रियोत्तर उत्क्रान्ति

१. आदितत्त्वांमध्यें ज्या तीन प्रकारच्या परस्परभिन्न उत्क्रमणांचें स्थूल स्वरूप सांगितलें त्यांपैकीं तिसऱ्याचा विचार एथें कर्तव्य आहे. पहिलें उत्क्रमण म्हटलें म्हणजे निरिंद्रिय उत्क्रमण होय:—म्हणजे, आकाशस्थ सर्व गोल, आणि त्यांपैकीं विशेषतः पृथ्वी हा गोल ह्यांचें उत्क्रमण. ह्याचें सविस्तर निरूपण स्पेन्सरसाहेबांनीं त्यांस वेळ नसल्यामुळें, व इतर दोन प्रकार जास्त महत्त्वाचे असल्यामुळें, केलेलें नाहीं. दुसरा प्रकार सेंद्रिय उत्क्रमण. ह्याचा विचार जीवशास्त्राचीं तत्त्वें आणि आत्मशास्त्राचीं तत्त्वें ह्या ग्रंथांत त्यांनीं केलेला आहे. तेव्हां राहिला तिसरा प्रकार. त्यास सेंद्रियोत्तर उत्क्रमण असें नांव देऊन त्याचें निरूपण प्रस्तुत स्थलीं कर्तव्य आहे.

तें करण्यापूर्वी सेंद्रियोत्तर ह्या शब्दाचा अर्थ जरी त्याच्या रचनेवरून कळण्यासारखाच आहे तरी त्याचा अंमळ जास्त खुलासा करणें इष्ट दिसतें म्हणून तो अगोदर करूं.

२. कोणत्याहि सेंद्रियव्यक्तीची—म्हणजे वनस्पति किंवा प्राणी ह्याची—वाढ,पूर्णावस्था आणि क्षय हीं चालली असतां जे फेरबदल त्याच्या ठिकाणीं दृष्टीस पडतात त्यांचा विचार करणें म्हणजे सेंद्रिय उत्क्रान्तीचा विचार करणें होय. तद्व्यतच ही व्यक्ति आणि ज्या इतर व्यक्तींशीं

हिचा संबंध येत असेल त्या व्यक्ती ह्यांच्या ज्या एकमेकींवर होणाऱ्या क्रिया व प्रतिक्रिया त्यांचा विचार हाहि सेंद्रिय उत्क्रान्तींतच येतो. कारें, संततीचें संवर्धन करणें हा जो व्यापार आहे तो चालला असतांहि त्या व्यक्तीच्या हातून ज्या गोष्टी घडत असतात त्याहि ह्याच प्रकारांत मोडतात. तथापि ज्या प्रकाराचें निरूपण एथें आपण करणार आहों त्याचें बीज ह्या ठिकाणीं (संतति-संवर्धनाचे ठिकाणीं) प्रथम दृग्गोचर होतें; आणि संततीच्या संवर्धनार्थ आईबापांचे जे संयुक्त प्रयत्न त्याच्या पलीकडील जी कृति ती सेंद्रियोत्तर उत्क्रान्तींत स्पष्टपणें मोडते. आतां ह्या दोन प्रकारांमध्यें पूर्ण विभिन्नभाव नाहीं हें सांगावयास नकोच. आणि सर्वच गोष्टी जर उत्क्रान्तीनें उत्पन्न झालेल्या आहेत तर उत्क्रमणाच्या ज्या स्वरूपास आपण सेंद्रियोत्तर म्हणतों तें सेंद्रियस्वरूपापासूनच हळूहळू उत्पन्न झालें असलें पाहिजे. तथापि ज्या ज्या गोष्टी पुष्कळ व्यक्तींच्या व्यवस्थित व्यापारांनीं उत्पन्न झाल्या असतील त्या सर्व सेंद्रियोत्तर उत्क्रान्तींत घालावयाच्या असें आपण एथें समजून चालूं.

ह्या सेंद्रियोत्तर चमत्कारांचे अनेक समुदाय होतात. त्यांपैकीं कांहीं लहानसहान समुदायांचा दृष्टान्तादाखल आपण एथें संक्षिप्त रीतीनें विचार करूं.

३. असल्या उदाहरणांपैकीं अत्यन्त परिचित, आणि कांहीं दृष्टींनीं अत्यन्त बोधप्रद अशीं उदाहरणें समाजशील किंवा समाज करून राहणारे जे कीटक त्यांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतात.

मधमाशा आणि गांधीलमाशा समाज करून राह-

तात, आणि त्यांच्या समाजांतील व्यक्तींचे व समूहांचे परस्परसंबंध फार नियमित असतात, हें सर्वांस माहीतच आहे. पोळ्यांतील मुख्य किंवा राणीमाशी आणि इतर माशा ह्यांच्यामध्यें कांहीं ठराविक संबंध दृष्टीस पडतो. गांधीलमाशीच्या बीजापासून जशी पूर्ण गांधीलमाशीची उत्क्रान्ति होते तशी त्या माशांच्या समाजाची बीजभूत जी वयांत आलेली राणीमाशी तिजपासून अनेक माशा उत्क्रान्त होतात, व त्या माशांच्या व्यवस्था आणि क्रिया ह्या अगदीं ठराविक असतात. आतां ह्या सैंद्रियोत्तर उत्क्रान्तीची उत्पत्ति इतर प्रकारच्या उत्क्रमणाप्रमाणेंच झालेली आहे ह्याची साक्ष, निरनिराळ्या जातींच्या मधमाशांमध्यें व गांधीलमाशांमध्यें वरील व्यवस्था व क्रिया निरनिराळ्या प्रमाणांवर दृष्टीस पडतात, ह्यावरून चांगली पटते. ह्या दोन प्राण्यांच्या कांहीं जाती अगदीं एकलकोंड्या दिसतात, कांहीं अल्प-प्रमाणावर समाजशील दिसतात, आणि कांहीं मोठ्या प्रमाणावर समाजप्रिय आढळून येतात.

कांहीं जातींच्या मुंग्यांमध्यें ही सैंद्रियोत्तर उत्क्रान्ति ह्याच्यापेक्षांहि पुष्कळ जास्त प्रमाणावर दृष्टीस पडते; 'कांहीं' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं ह्या ठिकाणींहि निरनिराळ्या जातींच्या मुंग्यांमध्यें समाजशीलतेचें निरनिराळें प्रमाण दृष्टीस पडतें. मुंग्यांपैकीं ज्या अतिशय श्रेष्ठ जाती आहेत त्यांच्यामध्यें श्रमविभाग इतका पूर्णत्वास पावलेला असतो कीं त्यांच्यांतील निरनिराळ्या वर्गांच्या इंद्रियरचना निरनिराळे व्यापार करण्यास योग्य अशा बनलेल्या आढळून येतात. वाळवी म्हणून जे प्राणी

आहेंत त्यांच्यामध्यें नर व मादी हे भेद असून शिवाय कामंकरी व शिपाई असे दुसरे दोन भेद आहेत; आणि ह्या वाळवीच्या कांहीं जातींत नर व मादी ह्यांजमध्येंहि दोन प्रकार आहेत, पंखाचे व बिनपंखाचे; अशा रीतीनें सहा भिन्न प्रकार झाले. 'सौबा' (Sauba) नांवाच्या मुंग्या आहेत त्यांजमध्यें नर व मादी हे भेद खेरीज करून षंढ मुंग्यांचे तीन प्रकार आहेत, त्यांपैकीं एक प्रकार वारुळांत काम करणारा आहे, व दुसरे दोन प्रकार बाहेर खपणारे आहेत. दुसऱ्या कांहीं मुंग्यांमध्यें हा श्रमविभाग ह्याच्याहि पुढें गेलेला दृष्टीस पडतो. कारण त्या मुंग्या दुसऱ्या मुंग्या पकडून त्यांस गुलाम करीत असतात. शिवाय, कांहीं प्रकारच्या मुंग्या इतर जातीचे कांहीं कीटक पाळीत असतात, त्यांपैकीं कांहीं त्यांच्या द्रवासाठीं किंवा दुधासाठीं; व कांहीं कशाकरितां तें अद्यापि समजलेलें नाहीं. तात्पर्य, कांहीं प्रकारच्या मुंग्या माणसांपेक्षांहि जास्त जनावरें पाळीत असतात असें जें सर जॉन लबक म्हणतात तें अगदीं खरें आहे. शिवाय, ह्या मुंग्या एकमेकींस कांहीं खुणा करीत असतात, ती एक प्रकारची भाषाच असावी; शिवाय, त्यांच्यामध्यें बिळें पाडण्याच्या, रस्ते तयार करण्याच्या आणि घरें बांधण्याच्या कांहीं ठराविक पद्धती दृष्टीस पडतात त्या निराळ्याच. टकी नांवाचा एक प्रवासी असें म्हणतो कीं आफ्रिकेंतील कांगो प्रांतांत मुंग्यांच्या वारुळांचे असे कांहीं गांवच्या गांव वसलेले दृष्टीस पडले कीं त्यांमध्यें तेथील रहिवाशांच्या गांवांपेक्षां जास्त व्यवस्था दिसत होती; आणि स्वीनफर्थ नांवाचा दुसरा एक

प्रवासी असें म्हणतो कीं, वाळवीच्या घरांत कोठारें, खोल्या, रस्ते, आणि पूल इतके दृष्टीस पडतात कीं त्यांचें वर्णन करूं लागल्यास एक ग्रंथच बनेल.

अशा रीतीनें कांहीं समाजशील कीटकांमध्यें केवळ सेंद्रिय उत्क्रान्तीपेक्षां बरीच उच्चतर उत्क्रान्ति जरी दृष्टीस पडते, आणि त्यांचे समूह जरी कांहीं बाबतींत सामाजिकसमूहांसारखेच दिसतात, तरी ते खरे सामाजिक समूह नव्हत. कारण ते समूह म्हणजे वस्तुतः मोठमोठीं कुटुंबेंच असतात. निरानिराळ्या आईबापांपासून उत्पन्न झालेल्या, आणि योग्यतेनें सरासरी परस्परसदृश असलेल्या अशा सारख्याच व्यक्तींचा तो संयोग नसतो. तर तो एका आईच्या लेंकरांचा समुदाय असून, तो कांहीं प्राण्यांमध्यें एक पिढी टिकणारा व कांहीं प्राण्यांमध्यें जास्त पिढ्या टिकणारा असा असतो. असल्या संकीर्ण कीटककुटुंबामध्यें जे विशेषसंबंध दृष्टीस पडतात ते खऱ्या समाजामध्यें दिसणाऱ्या संबंधासारखे नसून नरमादीमध्यें दिसणाऱ्या संबंधांसारखे असतात. फरक इतकाच कीं एकाच आईबापांपासून स्त्री व पुरुष अशा दोनच जातींच्या व्यक्ती उत्पन्न होण्याच्या ऐवजीं अनेक जातींच्या व्यक्ती उत्पन्न होत असतात; आणि शिशुसंवर्धनाचे संबंधानें भिन्नजातीय दोन व्यक्तींचें सरळ असें परस्परसाहाय्य असण्याच्या ऐवजीं ह्या ठिकाणीं दोहोंपेक्षां अधिक भिन्नजातीय व्यक्तींचें संकीर्ण असें परस्परसहकारित्व दृष्टीस पडतें.

४. सेंद्रियोत्तर उत्क्रान्तीचीं खरीं मूलस्वरूपें कांहीं

वरिष्ठ जातींच्या मणक्याच्या प्राण्यांमध्येंच काय तीं दृग्गोचर होतात.

कांहीं पक्षीसमूहांमध्यें थोडीशी समाजव्यवस्था दृष्टीस पडते. एका जातीच्या कावळ्यांमध्यें पिढ्याच्या पिढ्या तींच तींच कुटुंबें कायम राहतात, व तीं परकीयांना आपल्यांमध्यें येऊं देत नाहींत. ह्या काककुटुंबांमध्यें कांहीं अल्पस्वल्प नियंत्रण, कांहीं अल्पस्वल्प मालकी, अपराध्यांना कांहीं शिक्षा, व कधींकधीं त्यांस कुटुंबांतून हांकून लावणें, वगैरे गोष्टी दृष्टीस पडतात. तद्वतच हा काकसमूह भक्ष्य खात असतां त्याच्या संरक्षणार्थ कांहीं पाहरेवाले किंवा संत्री नेमलेले आढळून येतात; आणि हा समूह भक्ष्य मिळविण्यासाठीं बाहेर जात असतां व परत येत असतां त्याच्यामध्यें एक प्रकारचा व्यवस्थितपणा दृग्गोचर होतो. सारांश, ज्या क्षुद्रतम मानवीसमाजांमध्यें सरकार मुळींच नसतें त्यांमध्यें ज्या प्रकारचें सहकारित्व दृष्टीस पडतें, तशासारखें कांहींसें ह्या कावळ्यांमध्यें आढळून येतें.

कळप करून भटकणाऱ्या बहुतेक प्रकारच्या स्तनवत् प्राण्यांमध्यें एके ठिकाणीं राहणें ह्यापलीकडे सांगण्यासारखा कांहींच समाजसंबंध दृष्टीस पडत नाहीं. कळपांत जो सर्वांत बलिष्ठ नर असेल त्याचा जो कळपावर वरचढपणा असतो त्यामध्यें सरकारी व्यवस्थेचा कांहीं अंश दृष्टीस पडतो हें खरें आहे. कळप करून पारध करणाऱ्या जनावरांमध्यें पारधीवर हल्ला करण्याच्या कामीं कांहीं सहकारित्व दृष्टीस पडतें, आणि ज्या जनावरांची पारध होते त्यांच्या ठिकाणीं स्वसंरक्षण करण्या-

च्या कामीं असलें सहकारित्व दृष्टोत्पत्तीस येतें. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील रानटी रेडे, म्हशी विण्याच्या ऋतूंत लांडगे व अस्वलें यांजपासून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं त्यांच्या भोंवतीं एकत्र जमत असतात. बीव्हर नांवाचे जे जलस्थलचर प्राणी आहेत तशासारखे कांहीं कळपी सस्तन प्राणी रहावयास घरें बांधण्याच्या कामीं बरेंच परस्परसहकारित्व दाखवीत असतात. शेवटचें उदाहरण वानर जातीचें घेऊं. ह्या जातीमध्यें कळप करून राहण्याच्या व्यवस्थेशिवाय, कांहींसा उच्चनीचभाव, कांहींसें संमेलन, कांहींशा समाजयोग्य मनोवृत्तींचें आविष्करण, दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, म्होरक्यांचें इतर वानर ऐकतात; सगळे मिळून कोणतेंहि काम करितात; त्यांच्यामध्यें संत्री व खुणा दृष्टीस पडतात; खासगी मालकीची कांहीं कल्पना त्यांजमध्यें दृग्गोचर होते; ते एकमेकांचीं कामें करितात; आपल्यांतील पोरकीं मुलें आपलीं म्हणून संभाळितात; आणि आपल्यापैकीं कोणीं संकटांत पडल्यास त्यास सोडविण्यासाठीं कळपांतील इतर वानर खटपट करितात.

५. वरील गोष्टी एथें सांगण्यांत आमचे कित्येक हेतु आहेत. एक हेतु हा कीं, सेंद्रिय उत्क्रान्तीच्या नंतर अनेक दिशांनीं जास्त उत्क्रमण होऊं लागतें हें वाचकांच्या लक्षांत यावें. दुसरा हेतु असा कीं, हें सेंद्रियोत्तर उत्क्रमण एक प्रकारचें नसून अनेक प्रकारचें असतें, आणि तें निरनिराळ्या जातींच्या प्राण्यांच्या आंगच्या गुणधर्मांवरून ठरलेलें असतें, अशा रीतीची त्याची व्यापक कल्पना वाचकांस व्हावी. आणि तिसरा हेतु असा

कीं, उच्चतम जातीची जी सेंद्रियोत्तर उत्क्रान्ति तीहि सामान्य प्राणिवर्गामध्यें निरनिराळ्या स्वरूपांनीं दिसणाऱ्या सेंद्रियोत्तर उत्क्रान्तीवरूनच उत्पन्न होते हें वाचकांच्या लक्षात यावं.

असो. एवढें सांगून आतां आपण सेंद्रियोत्तर उत्क्रान्तीचा जो प्रकार इतर सर्व प्रकारांहून, विस्तार, संकीर्णपणा आणि महत्त्व ह्या तिन्ही बाबतींत इतका मोठा आहे कीं त्यापुढें ते सर्व प्रकार अगदीं शुष्क भासतात, त्याचाच कायतो विचार करूं. म्हणजे मानवी समाजांच्या वाढी, रचना, व्यापार आणि तदुत्पादित गोष्टी ह्यांच्यामध्यें जो उत्क्रमण प्रकार दृष्टीस पडतो त्याचाच विचार करूं. म्हणून यांमध्यें समाविष्ट होणाऱ्या, आणि समाजशास्त्र असें सामान्य नांव धारण करणाऱ्या, चमत्कारांकडे आतां आपण वळूं या.

प्रकरण दुसरें

समाजविषयक चमत्कारांचे उत्पादक

६. एकाद्या एकेऱ्या अचेतन पृदार्थाची स्थिति, त्याच्या आंगच्या शक्ती, व त्याच्यावर ज्यांचा बाहेरून प्रयोग होत असेल त्या शक्ती, या दोहोंच्या सहकार्यावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, एकादा धातूचा तुकडा घेतला असतां त्याचे अणू घनस्थितींत राहणें किंवा द्रवस्थितींत जाणें ही गोष्ट कांहींअंशीं त्यांचे आंगचे गुणधर्म आणि कांहींअंशीं त्यांजवर येऊन आदळणारे उष्णतातरंग ह्यांच्यावर अवलंबून असते. अचेतनपदार्थांचा एकादा समूह घेतल्यास त्याचीहि स्थिति अशीच असते. विटांची गाडी उलथी झाल्यास त्यांची जी रास बनते तिच्या कडा उभाट असतात; तीच लहान लहान गुंड्यांची गाडी उपडी झाल्यास त्यांची जी रास बनते तिच्या तितक्या नसतात; आणि एकाद्या पोराची गोट्यांची पिशवी उपडी झाल्यास त्या गडबडा लोळत जाऊन चोहोंकडे पसरून जातात; पण ही जी निरनिराळ्या पदार्थांची निरनिराळी स्थिति होते तीस कारण, कांहीं अंशीं त्या त्या राशींतील निरनिराळ्या व्यक्तींचे गुणधर्म, आणि कांहीं अंशीं त्यांच्यावर व्यापार करणाऱ्या ज्या गुरुत्वाकर्षण, आपतन, आणि घर्षण या शक्ती, त्या असतात.

समूह जेव्हां अचेतन नसून सचेतन असतो,—उदाह-

रणार्थ एंकाद्या प्रकारची वंनस्पति किंवा प्राणी—तेव्हां त्याँच्या घटकांचीहि गोष्ट अशींच असते. म्हणजे, त्या प्राण्याची किंवा वनस्पतीची जांत वाढणें किंवा कमी होणें, तिंचा वसतिप्रदेश मोठा होणें किंवा लहान होणें, ती एकाच ठिकाणीं थबकून राहणें किंवा अन्य देशीं जाणें, तिनें नवीन प्रकारची राहणी स्वीकारणें किंवा आहे तीच कांयम राखणें, ह्या सर्व गोष्टी त्या जातीच्या आंगचे गुण-धर्म आणि तिजवर बाहेरून प्रयुक्त होणाऱ्या सेंद्रिय व निरिंद्रिय शक्ती, ह्यांच्या संयुक्त व्यापारांवर अवलंबून असतात.

मानवी समूहांचेंहि असेंच आहे. समाज बाल्यावस्थेंत असो किंवा वृद्धावस्थेंत असो, त्यामध्यें दिसणारे चमत्कार त्याच्या घटकांचे स्वभाव, आणि त्यांच्या परिस्थिती यांजवर अवलंबून राहतात. तात्पर्य, सामाजिक चमत्कारांच्या उत्पादकांचा असा हा पहिला विभाग झाला.

७. पण ह्या उत्पादकांचे आणखीहि विभाग होतात. प्रत्येक उत्पादकसमूहामध्यें परस्परविभिन्न असे कित्येक पोटसमूह दृग्गोचर होतात.

बाह्य उत्पादकांचा प्रथम विचार करूं लागल्यास त्यांचे कित्येक निरनिराळे प्रकार ताबडतोब लक्षांत येतात. पहिली हवा; ही उष्ण, शीत किंवा समशीतोष्ण असते, तशीच कोरडी किंवा ओली असते, आणि स्थिर किंवा वरचेवर बदलणारी अशी असते. दुसरी राहण्याची जमीन; ही थोडी किंवा पुष्कळ असते, कमी किंवा जास्ती प्रमाणानें सुपीक असते, आणि सपाट किंवा उंचसखल असते. तिसरे, तिजमध्यें उत्पन्न होणारे पदार्थ; ते कोठें

विपुल असतात, कोठें बेताचे असतात; कोठें अल्प प्रकारचे असतात, कोठें पुष्कळ प्रकारचे असतात. त्येथें, तेथील निरनिराळे प्राणी; हे ज्या मानानें अल्प जातीय असतील किंवा विविधजातीय असतील, थोडे असतील किंवा पुष्कळ असतील, फायदा करणारे असतील किंवा उपद्रव देणारे असतील, त्या त्या मानानें त्यांचीं भिन्न भिन्न कार्यें होत असतात. अशा प्रकारची जी सेंद्रिय आणि निरिंद्रिय परिस्थिति तिच्यावर सामाजिक उत्क्रमणाची शक्यता मुख्यत्वेंकरून अवलंबून असते.

आतां अंतरुत्पादकांचा किंवा अंतःकारणांचा विचार करतां समाजाचा घटक या नात्यानें माणसाच्या आंगचे जे शारीरिक धर्म त्यांचा प्रथम विचार केला पाहिजे; उदाहरणार्थ, त्याची शक्ति, त्याची चपलता, आणि त्याचा कणखरपणा ह्यांचा विचार केला पाहिजे; कारण ह्या गुणांच्या कमजास्त प्रमाणावर तो ज्या समाजांत असेल त्या समाजाची वाढ व रचना हीं अवलंबून असतात. नंतर त्याच्या सामान्य मनोवृत्तींचा विचार केला पाहिजे, कारण त्याहि समाजाच्या वाढीस व व्यापारांस मदत करूं शकतात, अडथळा आणूं शकतात, किंवा तिच्यांत बदल करूं शकतात. तद्वतच, त्याच्या बुद्धीचें मान, आणि त्याच्या विचारांची सामान्य दिशा, हींहि समाजाचें स्थैर्य किंवा त्याचें स्थित्यन्तर ह्यांस कारणीभूत होतात.

सामाजिक उत्क्रान्तीचीं हीं मूल किंवा मुख्य कारणें झालीं; आतां तिच्या दुय्यम किंवा उत्पादित कारणांचा विचार करूं; हीं कारणें उत्क्रान्ति होत असतां असतां उत्पन्न होत असतात.

८. वर जी सेंद्रिय व निरिंद्रिय पारिस्थिति सांगितली तिजमध्यें समाज जे एकापुढें एक फेरबदल उत्पन्न करीत असतो त्यांचा प्रथम विचार करूं.

पहिला फेरफार हवेच्या संबंधाचा होय; हा रान वगैरे कापून जागा साफसूफ करणें आणि शेताच्या बाजूनीं गटारें वगैरे खणून जमिनींतील फाजील पाणी काढून लावणें हा होय. फाजील झाडी कापून टाकिल्यानें फाजील पाऊस पडत असेल तेथें बेताचा पडूं लागून समाजाच्या वाढीस सुलभ होतें; पण जेथें पूर्वी पाऊस बेताचाच पडत असेल तेथें ह्याचा परिणाम अनिष्ट होतो; कारण तेथें रान कापिल्यानें पाऊस अगदींच कमी पडूं लागतो. उदाहरणार्थ, स्पेनमध्यें अशी स्थिति कांहींअंशीं झाली आहे, व आपल्याकडेहि झाली होती, ह्या मुद्यावरच जंगलखातें उत्पन्न झालेलें आहे.

देशांतील वनस्पतींची संख्या कमजास्त केल्यानें, व त्यांच्या वैविध्यांतहि कमजास्तपणा केल्यानें निरनिराळे परिणाम होतात. हे मुख्यत्वेंकरून तीन प्रकारचे आहेत. समाजवृद्धीला जे वनस्पती (भाजीपाला, धान्यें वगैरे) फायद्याचे असतील त्यांची जास्त जास्त लागवड करणें, व निरुपयोगी वनस्पती काढून त्यांच्या जागीं ती करणें, हा एक प्रकार; ह्या फायदेशीर वनस्पतींचीं कलमें वगैरे करून, किंवा त्यांस योग्य खतें वगैरे घालून, त्यांच्या जास्त जास्त सुधारलेल्या तऱ्हा उत्पन्न करणें हा दुसरा प्रकार; आणि उपयुक्त अशा नव्या वनस्पती बाहेर देशांतून आणून लावणें हा तिसरा प्रकार.

देशांतील एकंदर प्राणिवर्गामध्येंहि वरील फेरफारां-

बरोबरच तसलेच फेरफार सुधारणाशील समाज करीत असतो. जे प्राणी घातुक असतील त्यांचा अजीबाद संहार करणें, किंवा शिदान त्यांची संख्या कमी करणें हा एक प्रकार; उपयुक्त जातींच्या प्राण्यांचें संवर्धन करणें आणि त्यांच्यांत सुधारणा करणें हा दुसरा प्रकार; आणि बाहेर देशांतून नव्या जातींचे प्राणी आणून ते स्वदेशीं वाढविणें हा तिसरा प्रकार.

जेथें प्रथम रान असून केवळ लांडगे डुकरें राहत होतीं, किंवा जेथें केवळ दलदल असून त्यांतील किड्यांवर अनेक प्रकारचे पक्षी राहत होते, तेथें शेतें झालेलीं किंवा उपयुक्त पाळींव जनावरें चरत असलेलीं पाहिलीं, म्हणजे, समाजाची सुधारणा होत असतां त्याची सेंद्रिय व निरिंद्रिय परिस्थिति कशी सारखी बदलत जात असते, आणि त्याच्या उत्क्रान्तीस हें अत्यन्त महत्त्वाचें दुय्यम कारण कसें बनत जातें, ह्या गोष्टी स्पष्टपणें लक्षांत येतात.

९. समाजसुधारणेचें दुसरें एक दुय्यम कारण म्हटलें म्हणजे समाजाच्या एकंदर आकाराची वृद्धि होणें, व त्याबरोबरच बहुश; त्याची घनता वाढत जाणें, हें असतें.

समाजांत एरवीं जे फेरबदल होत असतात त्यांखेरीज कांहीं फेरबदल केवळ लोकसंख्येची वृद्धि झाल्यानेंच होत असतात. लोकसंख्यावर्धन हें सामाजिक व्यवस्थेचें जसें फल आहे, तसेंच बीजहि आहे. रचनावैविध्य जर उत्पन्न करणें असेल तर प्रथम संख्यावृद्धि केली पाहिजे हें अगदीं उघड आहे. ज्या समाजांत लोकसंख्या अल्प असेल तेथें श्रमविभाग फारसा करतां येणें शक्य-

च नाहीं. निरनिराळ्या प्रकारचे आणि निरनिराळ्या द-र्जांचे अनेक लोक मिळूं शकतील एवढी मोठी लोकसं-ख्या असल्याविना शासनविषयक किंवा उद्यमविषयक संकीर्ण संस्था उत्पन्न होणें अशक्य आहे. आणि शांत-तेचे काय किंवा लुटारूपणाचे काय, कित्येक धंदे असे आहेत कीं ते लोकसंख्येच्याच बलावर चालूं शकतात.

सारांश, समाजाची किंवा लोकसंख्येची वाढ हा स-माजाच्या उन्नतीचा आणखी एक दृश्यम उत्पादक अ-सून तो असल्याच इतर उत्पादकांप्रमाणें समाजोन्नत्तीचा कार्यभूत व कारणभूतही असतो.

१०. समाज व त्यांतील व्यक्ती ह्यांचा जो एकमे-कांवर प्रभाव, म्हणजे सगळ्याचा त्याच्या भागांवर, व भागांचा सगळ्यावर, जो प्रभाव तो समाजाच्या उत्क्रा-न्तीचा आणखी एक उत्पादक होय.

एकाद्या जनसमूहास कायमपणा आल्याबरोबर तो समाज आणि त्याचे घटक ह्यांच्यामध्यें अशा कांहीं क्रि-या आणि प्रतिक्रिया सुरू होतात कीं तेणेंकरून परस्प-रांचे घटनेंत फरक होऊन जातो. समाज आपल्या घट-कांचें जें नियंत्रण करीत असतो तेणेंकरून त्यांचे उद्योग, मनोवृत्ती; आणि कल्पना हीं समाजसुस्थितीस अनुकूल अशीं बनत जातात; आणि हे उद्योग, मनोभाव व वि-चार, बदलणाऱ्या परिस्थितीमुळें जसे बदलत जातील त-से ते समाजास स्वानुकूल असें स्वरूप देत असतात.

एवंच व्यक्तीचे मूल स्वभाव, आणि त्यांचे बनलेले जे समाज त्यांचे मूलस्वभाव, यांखेरीज त्यांचे जे फेरफार होऊन बनलेले स्वभाव त्यांचाहि विचार आपणास केला

पाहिजे. परिणामीं, परस्परांवर प्रभाव चालवणें हें दोहों-मध्येंहि रूपान्तरें उत्पन्न होण्यास जबरदस्त कारण होत असतें.

११. अत्यन्त महत्त्वाचा असा आणखी एक दुय्यम उत्पादक राहिलाच आहे. तो सेंद्रियोत्तर परिस्थितीचा प्रभाव हा होय; म्हणजे, विशिष्ट समाज आणि त्याच्या सभोंवतालचे समाज ह्यांच्या ज्या परस्परांवर क्रिया आणि प्रतिक्रिया होत असतात तो प्रभाव होय.

जोंपर्यंत समाज हे केवळ अव्यवस्थित व भटकणाऱ्या अशा केवळ लहान लहान टोळ्याच असतात तोंपर्यंत त्यांचे जे परस्परांशीं होणारे कलह तेणेंकरून त्यांच्या रचनांत कायमचे फेरफार होत नाहींत. पण हे कलह वारंवार झाल्यानें प्रत्येक टोळीचा कोणी तरी कायमचा नायक बनूं लागतो; आणि असें झालें म्हणजे राजकीय रचनेचें अल्पस्वल्प स्वरूप प्रथमउत्पन्न होऊं लागतें. पुढें हीं राष्ट्रें एकमेकांशीं जीं युद्धें करितात तेणेंकरून त्यांच्या राजकीय रचनांची वाढ होण्यास मोठी मदत होते. कारण कोणत्याहि समाजांतलि उद्यम संस्था जशा मुख्यत्वेंकरून त्याच्या सेंद्रिय व निरिंद्रिय परिस्थितीवरून बनत असतात, तशा त्यांच्यांतील राजकीय किंवा नियामक संस्था त्याच्या सेंद्रियोत्तर परिस्थितीवरून, म्हणजे, ज्या शेजारच्या समाजांशीं त्याचा जीवनार्थ कलह चालला असेल त्यांच्या कृतींवरून, बनत असतात.

१२. दुय्यम कारणसमूहापैकीं आणखी एक कारण सांगावयाचें राहिलें आहे. आणि त्याचें महत्त्व फारच आहे. तें माणसाच्या कृतीनें बनलेल्या ज्या अनेक वस्तू

तें होय. ह्या वस्तूंस आपण सामान्यतः कृत्रिम म्हणत असतों, पण तत्त्वदृष्ट्या विचार करतां त्याहि इतर सर्व वस्तूंप्रमाणें स्वाभाविकच आहेत. त्यांचे अनेक प्रकार आहेत.

घरें, हत्यारें, वगैरे भौतिक साधनें, हा पहिला प्रकार. हत्यारांमध्यें ओबडधोबड धार दिलेल्या दगडाच्या चिपांपासून तों अगदीं आलीकडच्या वाफेनें चालणाऱ्या यंत्रांतील हत्यारांपर्यंत सर्व हत्यारें येतात; आणि घरांमध्यें पाल्याच्या व गवताच्या झोंपड्यांपासून तों आलीकडच्या बंगल्यांपर्यंत व राजवाड्यांपर्यंत सर्व इमारती मोडतात.

भाषा हा दुसरा प्रकार; ही केवळ खुणाखुणांची असते, पण तिचीच पुढें वाढ होतां होतां अगदीं संकीर्ण अशा कल्पना देखील बरोबर रीतीनें व्यक्त करून दाखविण्यास ती समर्थ होते. तद्वतच ही प्रथम केवळ तोंडी असते व त्यामुळें तीं बोलणारांस आपल्या कल्पना थोड्याच लोकांस कळवितां येतात; नंतर ती लेखी होते, आणि शेवटीं छापील होते; त्यामुळें आपल्या विचारांच्या छापील पुस्तकरूपानें अनेक प्रती काढतां येऊन त्या अनेक देशांतून असंख्य लोकांमध्यें पसरतां येतात. ज्ञान हा तिसरा प्रकार. हें ज्ञान वाढतां वाढतां त्यास शास्त्राचें स्वरूप येतें. बोटांवर आंकडे मोजण्यापासून गणितशास्त्रास आरंभ होऊन त्याची वृद्धि होतां होतां शून्यलब्धीपर्यंत होते. चंद्राच्या कला कमजास्त होतात हें पाहण्यापासून सूर्यमालेच्या कक्षीपर्यंत ज्योतिःशास्त्राची मजल जाते; आणि ज्यांचीं प्रथम बीजें देखील माहीत नव्हतीं अशीं नवीं नवीं शास्त्रें उत्पन्न होत जातात. धर्म, कायदे, रीतीभाती हा चवथा प्रकार. प्रथम साध्या अशा थोड्याशा

रूढी असतात, त्या वाढत जातां जातां व त्यांस निश्चित आणि कायमचें स्वरूप येतां येतां त्यांचीं धर्मशास्त्रें किंवा कायद्यांचीं बंडें बनतात. प्रथम थोड्याशा देवभोळ्या समजुती असतात. त्यांचीं बनतां बनतां पुराणें, व धर्मपुस्तकें बनतात. शोभेच्या सर्व गोष्टी हा पांचवा प्रकार. माशांच्या हाडांच्या माळांपासून तों मोत्यांच्या हारांपर्यंत दागिन्यांची मजल जाते; आंगें रंगवण्यापासून आणि झाडांच्या साली वापरण्यापासून तों मोठमोठ्या भपकेदार पोषाकांपर्यंत वस्त्रांची मजल जाते; युद्धविषयक बेसूर गाण्यापासून तों सुस्वर संगीतापर्यंत गानकलेची मजल जाते; दगडाच्या साध्या कोनाड्यांची क्रमाक्रमानें सुधारणा होत जाऊन भपकेदार देवळें बनत जातात; ओबडधोबड खाणाखुणांचीं लेणीं जाऊन त्यांच्या ऐवजीं चित्रांचीं प्रदर्शनें येतात; आणि टोळीच्या नायकाच्या पराक्रमाचीं जीं स्थूल वर्णनें त्यांपासून पुराणें, नाटकें, आणि संगीतें व काव्यें, कादंबऱ्या, चरित्रें आणि इतिहास ह्यांची हळूहळू उत्पत्ति होत जाते.

ह्या ज्या विविधजातीय सेंद्रियोत्तर वस्तू, त्या जशा प्रत्येकीं वाढत जातील तसतसे त्यांचे पोटभेद जास्त जास्त वाढत जातात, आणि त्या एकमेकींवर आपले प्रभाव जास्त जास्त चालवूं लागतात. एकमेकींकरवीं चालवून घेऊं लागतात; आणि अशा रीतीनें ही एक फारच मोठी, फारच संकीर्ण, आणि फारच प्रबल अशी कारणपरंपरा बनून जाते. समाजाची उत्क्रान्ति चालली असतां त्या वस्तू आपले व्यापार व्यक्तींवर चालवीत असतात, व समाजावरहि चालवीत असतात, आणि उलटपक्षीं व्य-

क्ती व समाज हे आपले व्यापार त्यांजवर चालवीत असतात. त्या हळूहळू समाजाच्या दुय्यम परिस्थितीच्याच ठिकाणीं होतात, आणि अखेरीस ही दुय्यम परिस्थिति मूल परिस्थितीपेक्षां इतकी जास्त महत्त्वाची होते कीं तिच्या योगानें, एरवीं ज्या परिस्थितींत पूर्वीं राहतां आलें नसतें, तिजमध्यें आतां राहतां येतें.

१३. निरनिराळ्या उत्पादकांचें हें केवळ स्थूल स्वरूप झालें. पण त्या अगदीं सामान्य स्वरूपीं देखील त्यांचा समुदाय संकीर्ण असतो ही गोष्ट एवढ्यावरून लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

समाजविषयक चमत्कार कांहीं अंशीं व्यक्तींच्या स्वभावांवर अवलंबून असतात, आणि कांहीं अंशीं व्यक्तींवर चालणाऱ्या शक्तींवर अवलंबून असतात, हें सत्य ध्यानांत आणिलें म्हणजे दुसरेंहि एक सत्य सहज ध्यानांत येतें तें हें कीं, हे जे परस्परविरुद्ध असे दोन कारणसमूह ते समाजाची जसजशी जास्त जास्त सुधारणा होत जाईल तसतसे दुसऱ्या कारणसमूहांस उत्पन्न करीत असतात. प्रारंभींची जी सेंद्रिय व निरिंद्रिय परिस्थिति, जी प्रथम प्रथम बहुधा कधीं बदलत नाहीं, ती पुढें उत्क्रमण पावणाऱ्या समाजाच्या कृतींनीं हळूहळू बदलूं लागते. लोकवस्तीची केवळ वाढ झाल्यानें समाजाचें स्वरूप बदलण्यास कारणें उत्पन्न होतात. व दिवसेंदिवस त्यांचें महत्त्व वाढत जातें. समाज आपल्या घटक व्यक्तींवर जे प्रभाव चालवीत असतो, आणखी त्या घटक व्यक्ती समाजावर जे प्रभाव चालवीत असतात, त्यांच्या योगानें नवीं नवीं कारणें नित्य उत्पन्न होत असतात. स-

माजांचे आकार आणि रचना यांची प्रगति जशी होत जाईल तसतसे ते कधीं लढाया करून आणि कधीं नवे उद्योग काढून, एकमेकांच्या स्वरूपांत मोठाले भेद उत्पन्न करीत असतात. आणि नेहमीं वाढत जाणाऱ्या व जास्त जास्त संकीर्ण होणाऱ्या ज्या सेंद्रियोत्तर भौतिक व मानसिक वस्तू त्याहि नवीन उत्पादक बनून समाजांत स्वरूपान्तर उत्पन्न करण्यास जास्त महत्त्वाचीं कारणें बनतात. सारांश समाजोत्क्रान्तीचे उत्पादक प्रारंभीं देखील जरी संकीर्णच असतात, तरी प्रगति जशी वाढत जाईल तसतसे नवे उत्पादक उत्पन्न होऊन व ते जसजसे जास्त प्रबल होत जातील तसतसे जास्त संकीर्ण होत जाऊन एकंदर उत्पादक समूहाची संमिश्रता सारखी वाढत जाते.

पण अशा रीतीनें मुख्य आणि दुय्यम अशा सर्व प्रकारच्या उत्पादकांचें जरी आपण संक्षिप्तरीत्या एथवर विवेचन केलें, तरी आतां दुय्यम उत्पादक एकीकडे ठेवून यापुढें केवळ मुख्यांचाच विशेषतः विचार करणार आहों. समाजशास्त्राच्या मूल सिद्धान्तांचा आतां आपण जो विचार करणार आहों तो सामान्य सामाजिक चमत्कारांस लागू असणाऱ्या, आणि अगदीं साध्या अशा समाजामध्यें देखील सहज दृष्टीस पडणाऱ्या, अशा सिद्धान्तांचाच करणार आहों. तर मग बाह्योत्पादक व अंतरुत्पादक असा जो एकंदर उत्पादकांचा प्रथम आपण विभाग केला त्यालाच अनुसरून बाह्योत्पादकांचा अगोदर विचार करूं.

प्रकरण तिसरें

मूल बाह्योत्पादक

१४. समाजोत्क्रान्तीच्या मूल बाह्योत्पादकांची पूर्ण यादी देऊं म्हटल्यास गत कालाचें पूर्ण ज्ञान पाहिजे; तें सध्यां आपणांस उपलब्ध नाहीं, व पुढेंहि कधीं होण्याचा फारसा संभव नाहीं. मानवी प्राण्याची वस्ती अत्यन्त अत्यन्त प्राचीन काळापासून ह्या भूगोलावर झालेली आहे असें हल्लीं भूगर्भशास्त्रज्ञ आणि पुरणेतिहासज्ञ ह्या दोघांचेंहि मत झालेलें असल्यामुळें समाजोत्क्रान्तीवर बाह्य परिस्थितीचे मूळपासून झालेले परिणाम पूर्णपणें उलगून काढतां येत नाहींत हें स्पष्ट झालें आहे. नाईल नदीच्या कांठीं आज वीस हजार वर्षें माणसाची वस्ती आहे असा पुरावा सांपडतो; पण त्या नदीच्या तोंडीं जमलेले जे वाळूचे थर त्यांमध्यें सांगाड्यांच्या रूपानें सांपडणाऱ्या पण हल्लीं अगदीं नष्ट झालेल्या अशा प्राण्यांच्या वेळींहि तेथें माणसाची वस्ती होती असाही पुरावा सांपडतो; आणि हा दुसरा काल वीस हजार वर्षांपेक्षां किती तरी जास्त असला पाहिजे. ज्या प्राचीनकाळीं यूरोप बर्फानें आच्छादित असला पाहिजे असा शास्त्रज्ञांचा अजमास आहे त्याकाळींहि इंग्लंदांत वस्ती होती असें दिसतें. अमेरिकेंतही मास्टोडान नामक नष्ट प्राण्याच्या सांगाड्याबरोबर त्यांस मारणाऱ्या रान-

टी लोकांचे तीर वगैरे सांपडतात. ह्या सर्व पुराव्याचा विचार करतां मनुष्य पृथ्वीवर किती जुना प्राणी आहे, आणि त्यामुळें समाजविषयक चमत्कारांचे बाह्योत्पादक मूळपासून कोणकोणत्या स्वरूपाचे होत गेले आहेत हें शोधून काढणें किती दुरापास्त आहे हें स्पष्टपणें लक्षांत येतें.

वर सांगितलेल्या पुराव्यावरून एक फार महत्त्वाची गोष्ट व्यक्त होते, तिचा मात्र एथें उल्लेख केला पाहिजे. भूगर्भामध्यें होणारे फेरफार आणि हवामानामध्यें होणारे फेरफार ह्यामुळें वनस्पतिवर्ग आणि प्राणिवर्ग ह्यांमध्यें फेरफार उत्पन्न होऊन ते एकसारखे निरनिराळ्या स्थानांहून निरनिराळ्या स्थानीं जात येत असले पाहिजेत. ज्या ज्या ठिकाणीं हवा फार थंड वगैरे होऊन राहण्यास अयोग्य होत असेल तेथून हे वर्ग चोंहोकडे सारखे पसरत गेले असले पाहिजेत; तद्वत् ज्या ठिकाणीं हवा पूर्वीपेक्षां सुधारली असेल, किंवा खाद्य वस्तूंचा नैसर्गिक संग्रह वाढला असेल, त्या ठिकाणीं मनुष्यवस्ती इतर ठिकाणांहून येऊन जास्त जास्त वाढत गेली असली पाहिजे. तद्वतच, भूगर्भांत होणाऱ्या फेरफारांमुळें कोठें जमीन उंच होऊन व कोठें सखल होऊन, मनुष्यवस्तींत अशींच स्थानान्तरें होत गेलीं असलीं पाहिजेत. अशा गोष्टी कित्येक ठिकाणीं तरी प्रत्यक्ष झाल्या असल्याबद्दल जास्त जास्त पुरावा सांपडत आहे. आणि अशी स्थिति झाली म्हणजे निरनिराळ्या ठिकाणीं पसरणाऱ्या माणसांना निरनिराळ्या परिस्थितीचा अनुभव आला असला पाहिजे हें उघडच आहे.

एकंदर गतकालामध्यें बाह्योत्पादकांचा प्रभाव कसा झाला असेल ह्याबद्दल वरील कल्पना ध्यानांत धरून त्या

उत्पादकांचे हल्लीं जे परिणाम दृष्टीस पडतात त्यांकडेच आतां आपण नजर पुरवूं या.

१५. कांहीं विशिष्ट उष्णतामानांच्या मर्यादांतच जीवांची वस्ती होण्याचा संभव आहे; आणि उच्चतर जातीच्या जीवांची वस्ती तर त्याच्यापेक्षांहि जास्त आकुंचित अशा उष्णमानाच्या मर्यादांच्या आंतच होण्याचा संभव आहे; मग हें विशिष्ट उष्णतामान स्वाभाविक असो, किंवा कृत्रिम उपायांनीं उत्पन्न केलेलें असो. असें असल्यामुळें आणि समाजाच्या जीवितास मनुष्यें आणि कांहीं इतर प्राणी व वनस्पती ह्यांची अवश्यकता असल्यामुळें, तें जीवित थंडी व उष्णता ह्यांच्या कांहीं विशिष्ट प्रमाणांच्या आंतच वृद्धिंगत होत असतें.

एकादा प्रदेश अगदीं थंड असून ऊब उत्पन्न करण्याचीं तेथें जर योग्य साधनें असतील तर तेथें माणसासारख्या उष्णरक्ताच्या प्राण्यांची वस्ती होऊं शकते. आर्तिक महासागरांतील प्रदेशांत अनेक प्रकारचे लहानमोठे जलचर व स्थलचर सस्तन प्राणी आढळतात; पण ह्याचें कारण त्यां ठिकाणीं त्यांस खाद्य पुरविण्यास मणक्याचे व बिन मणक्याचे दुसरे हलके प्राणी आहेत हें होय; आणि उष्णकटिबंधांतून उबदार पाण्याचे प्रवाह वाहून येऊन तेथें बर्फ बनूं देत नाहींत म्हणूनच ह्या हलक्या प्राण्यांची तेथें वस्ती होते. तात्पर्य, ह्या अत्यन्त उत्तरेकडील प्रदेशांत राहणारीं माणसें अप्रत्यक्षरीत्या ह्या उष्णतेवर अवलंबून आहेत. पण असल्या ठिकाणीं मानवी जीविताचें रक्षण अशा रीतीनें मारामारीनेंच होत असल्यामुळें तेथें त्यांची सामाजिक उत्क्रान्ति होण्याचा

संभव उत्पन्न होत नाहीं. कारण असल्या ठिकाणीं प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं केवळ जीव धरून राहण्यापलीकडे जास्त शक्ति असत नाहीं, किंवा व्यक्ति समुदायहि समाज बनण्यासारखा मोठा असत नाहीं. उदाहरणार्थ, ग्रीनलंदांत राहणाऱ्या एस्किमो नामक जातीच्या माणसाला आपली शक्ति अंगांतील ऊब कायम ठेवण्याच्या कामींच खर्च करावी लागते; एवढेंच नाहीं, तर त्याचे शरीरव्यापारहि तो हेतु साधण्यासाठीं इतर माणसांच्या मानानें बरेच बदललेले आढळतात. त्याला जाळण्यास सर्पण मिळत नाहीं हें तर खरेंच, पण त्यास सर्पण मिळालें असतें तरी त्याचा त्यास उपयोग झाला नसता, कारण त्याच्या घराच्या भिंती वर्फाच्या असल्यामुळें त्या सर्पण जाळिल्यानें वितुळल्या असत्या. असो. पण अशी परिस्थिती असल्यामुळें, त्याच्या लोंकरीच्या पोषाकानेंहि जी उष्णता कायम राहूं शकत नाहीं ती राखण्याकरितां त्यास माशाची वगैरे पुष्कळशी चरबी व तेल हीं खावीं लागतात आणि त्याच्या पचनेंद्रियांवर शरीराची उष्णता कायम राखण्याचा अशा रीतीनें मोठा बोजा पडल्यामुळें शरीराच्या इतर व्यवहारांना पुरेशी शक्ति त्याच्या अंगीं रहात नाहीं. त्यामुळें त्यास संतति फारशी होत नाहीं, आणि असें झाल्यामुळें समाजोत्क्रमणास विघ्न येतें.

आतां अत्यन्त दक्षिणेकडे राहणाऱ्या फ्यूजियन लोकांकडे पाहिलें तरी तीच स्थिति दृष्टीस पडते. त्यांची स्थिति तर एस्किमो लोकांपेक्षां देखील ज़ास्त वाईट आहे. तेथें वादळें इतकीं होत असून यांच्या अंगावर धड वस्त्रहि नसतें. शिवाय यांचीं घरें गवताचीं व काटक्यांची

असल्यामुळें त्यांतून थंडी सारखी येतच असते. शिवाय यांनां मासे, व गोगलगाई सारखे बिन सांध्याचे लहान लहान प्राणी यांशिवाय दुसरें कांहीं खाद्य मिळत नाहीं. या सर्व कारणांमुळें या लोकांस नुसता जीव संभाळून राहण्याच्या कामीं इतकी शक्ति खर्च करावी लागते कीं त्यांची चांगलीशी वाढ देखील होत नाहीं, आणि ते माणसासारखे देखील दिसत नाहींत. त्यांना अर्थात् संतति अगदीं बेताचीच होते; आणि त्यामुळें त्यांची वस्ती अगदीं आकुंचित राहून त्यांच्यांत समाज म्हणून स्पष्टसा दिसतच नाहीं.

आतां कांहीं उष्ण प्रदेशांत उष्णता फार असल्यामुळें तेथें माणसास इतका थकवा वाटतो कीं तेथेंहि त्याची समाजविषयक वाढ व्हावी तशी होत नाहीं; तथापि असें थोड्याच ठिकाणीं होतें, व तें फारशा मोठ्या प्रमाणावरहि होत नाहीं. अत्यन्त उष्ण प्रदेशांतूनहि एकंदर प्राणिवर्ग विपुल असून वरिष्ठ दर्जाचाहि आढळतो. अशा ठिकाणीं अगदीं दोनप्रहरच्या वेळीं रानांतून पक्ष्यांचा वगैरे आवाज निघत नाहीं, व त्यामुळें तेथील प्राणिवर्गाला त्यावेळीं थकवा येतोसें दिसतें हें खरें आहे; पण सकाळ-संध्याकाळीं हवा थंड असेल तेव्हां त्यांच्यामध्यें जास्त हुशारी दृष्टीस पडते. आणि ह्या प्रदेशांतून राहणारे लोक यूरोपियन लोकांच्या मानानें जरी अमळ सुस्त दिसतात, तरी समशीतोष्ण हवेंत राहणाऱ्या मूळ लोकांपेक्षां त्यांचा सुस्तपणा जास्त नसतो, किंवा तितकाहि नसतो. तात्पर्य एकंदर गोष्टींचा विचार करतां फार उष्ण हवेमुळें समाजाच्या प्रगतीस लोकांस वाटतो ति-

तका अडथळा होत नाहीं. प्राचीन काळचीं सर्व सुधारलेलीं राष्ट्रें उष्णकटिबंधांत किंवा सरासरी तेथल्या इतक्या उष्ण हवेंत भरभराटीस आलेलीं आढळून येतात. हिंदुस्थान व दक्षिण चीन हे देश उष्णकटिबंधांत असून तेथें पुष्कळ समाजोत्क्रान्ति झालेली आजमित्तीस आढळून येते. जावा व कांबोडिया या बेटांतून जीं मोडकीं तोडकीं मोठालीं देवळें वगैरे शिल्प कामें आढळतात त्यावरून तेथील प्राचीन सुधारणेची साक्ष पटते. व हीं बेटें उष्णकटिबंधांतच आहेत. बरें मध्य अमेरिका, मेक्सिको व पेरू हे देश उष्णकटिबंधांतच असून तेथेंहि गतकाळीं बरीच सुधारणा झालेली दृष्टोत्पत्तीस येते.

बरें, ह्याच्यापेक्षां कमी दर्जाचे उष्णकटिबंधांतील समाजांची तसल्याच जास्त थंड हवेंतील समाजांशीं तुलना करतां तीच गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते. ताहिती, टोंगा, आणि सांडविच हीं बेटें उष्णकटिबंधांतच आहेत, आणि तीं जेव्हां प्रथम शोधून काढिलीं तेव्हां तेथें धातूंचा अभाव असूनहि त्या मानानें सुधारणेची प्रगति बरीच झालेली आढळून आली.

आधुनिक कालांत, आकार व संमिश्रता ह्या दोन्ही दृष्टींनीं पाहतां, समाजाची सर्वांत जास्त उत्क्रांन्ति समशीतोष्ण कटिबंधांत झालेली आहे ही गोष्ट खरी आहे; पण प्रारंभींचे मोठाले समाज उष्णकटिबंधांत उत्पन्न झाले, आणि सामाजिक उत्क्रान्तीच्या पहिल्या मजला तेथेंच आक्रमिल्या गेल्या हेंहि विसरतां कामा नये. वास्तविक स्थिति अशी असली पाहिजे कीं ज्या ठिकाणीं निरिंद्रिय बाह्य अडथळे अत्यन्त कमी होते अशा ठिका-

णीं समाजांस आपली पाहिली पाहिलीं वाढ करून घ्यावी लागली असावी; जीवनरक्षणाच्या कलांची जेव्हां पुरेशी वृद्धि झाली असेल तेव्हां वरील अंडथळे जास्त अक्षण च्या प्रदेशांतून ह्या समाजांना आपुली जास्त उत्क्रान्ति करून घेतां येणें शक्य झालें असावें; आणि वरील कलांची जेव्हां अणखी सुधारणा झाली, आणि श्रमविभाग जास्त झाला, तेव्हां वरच्यापेक्षांहि जास्त अडचणी असणाऱ्या प्रदेशांतून नवीन समाजांस उत्पन्न होणें व भरभराटीस येणें शक्य झालें असावें.

सारांश, वनस्पति आणि प्राणी यांचें जीवित चालण्यासाठीं ज्या शक्तींचा उपयोग करावा लागतो त्यांचा प्रत्यक्ष उगम, आणि म्हणून मानवी व सामाजिक जीविताच्या पोषणार्थ लागणाऱ्या शक्तींचा अप्रत्क्ष उगम। सूर्यापासून निघणारी उष्णता हा असल्यामुळें, असें उघडच होतें कीं पृथ्वीच्या ज्या भागांवर ही उष्णता फार अल्प असेल तेथें सांगण्यासारखें सामाजिक उत्क्रमण होण्याचा संभव नाहीं. बरें, उलटपक्षीं, जीवनक्रियांना जितकी उष्णता असणें फारच हितावह आहे त्यापेक्षां कांहीं प्रदेशांत जरी ती बऱ्याच जास्त प्रमाणानें आढळते तरी तिच्या योगानें समाजोत्क्रमणास फारसा अडथळा होत नाहीं. आणखी एक सिद्धान्त असा निघतो कीं, समाजाच्या ज्या प्राथमिक स्थितींत समाजाला अल्पच जीव असतो त्या स्थितींत प्रकाश आणि उष्णता ह्यांचा विपुल पुरवठा असणें विशेषेंकरून अवश्य असतें.

१६. हवेच्या उष्णतामानाव्यतिरिक्त आणखी कांहीं गुणधर्म आहेत, आणि त्यांचाहि माणसाच्या क्रियाशक्तीवर

कमजास्त परिणाम होत असतो; उदाहरणार्थ, हवेमध्यें रोज किंवा वर्षावर्षानें, किंवा केव्हां तरी होणारे जे फेरफार, आणि पुनः उत्पन्न होणारी जी समता, यांचा माणसाच्या क्रियाशक्तीवर, आणि अतएव सामाजिक चमत्कारांवर कमजास्त प्रभाव पडत असतो. पण ह्या गुणधर्माचा विचार एकीकडे ठेवून हवेची शुष्कता किंवा ओलेपणा हा जो महत्त्वाचा गुणविशेष तेवढ्याचाच एथें बारकाईनें विचार करूं.

हवा अत्यन्त शुष्क असणें, किंवा अत्यन्त आर्द्र असणें, ह्या दोन्ही गोष्टींनीं समाजसुधारणेस जसे प्रत्यक्ष अडथळे येतात तसेच अप्रत्यक्षहि येतात. प्रथम दुसऱ्यांचा विचार करूं. हवा अत्यन्त शुष्क असली म्हणजे जमिनींत ओलावा न राहून वनस्पतींची पुष्कळ वाढ होत नाहीं, व अशा रीतीनें माणसास खाद्यपदार्थांची टंचाई पडून समाजोत्क्रमणास विघ्न येतें, ही गोष्ट उघडच आहे. उलटपक्षीं, हवा जर फारच आर्द्र आणि त्याबरोबरच उष्णहि असेल तरीहि प्रगतीस अशींच विघ्नें येत असतात. पदार्थांस बुरशी लागणें, कपडे, कागद वगैरे मिसमिशीत होणें, अंगास घाम फार येणें, भिंतीस मट लागणें, वगैरे गोष्टींचा अनुभव असल्या हवेंतून नेहमीं येत असतो.

पण हवेचें आर्द्रतामान कमजास्त असल्यानें जे प्रत्यक्ष परिणाम होतात तेच फार महत्त्वाचे असतात. कारण हे परिणाम माणसाच्या जीवितव्यापारांवर, व त्यामुळें त्याच्या व्यक्तिविषयक क्रियाशक्तीवर आणि अतएव त्याच्या समाजविषयक क्रियाशक्तीवर होत अस-

तात. त्वचा आणि फुप्फुसें ह्यांतून देव बाष्पीभवनव्यापारानें लवकर निघून जावे अशी जर हवेची स्थिति असेल तर तेणेंकरून शरीरव्यापारास मदत होते. अशक्त माणसांची प्रकृति हवा फार आर्द्र असली म्हणजे बिघडते, आणि शुष्क असली म्हणजे त्यांस बरें वाटतें ह्या गोष्टी प्रसिद्धच आहेत; तद्वतच अशा लोकांस देशावरंच्या कोरड्या हवेंत कोंकणासारख्या आर्द्र व अतएव घामट हवेपेक्षां जास्त बरें वाटतें, हेंहि तितकेंच प्रसिद्ध आहे. आतां व्यक्तीच्या संबंधानें दिसणारा हा कार्यकारणसंबंध जातींच्याहि संबंधानें खरा असला पाहिजे हें उघडच आहे. हवेंतील कमीजास्ती आर्द्रतेमुळें माणसाच्या स्वाभाविक क्रियाशक्तीमध्यें दिसणारे हे भेद उष्ण प्रदेशा इतके समशीतोष्ण प्रदेशांत दिसत नाहींत. याचें कारण असें आहे कीं तेथील हवा थंड असल्यामुळें ती जरी आर्द्र असली तरी माणसाच्या शरीराची स्वाभाविक उष्णता तेथील हवेच्या उष्णतेपेक्षां जास्त असल्यामुळें तिचा शरीराशीं संयोग झाला म्हणजे तिची उष्णता वाढून ती त्यांतील आर्द्रता ओढून घेण्यास समर्थ होते, आणि अशा रीतीनें माणसाच्या अंगांतील पाणी असल्यां हवेंत बरेंच झटकन् निघून जात असतें. पण उष्ण देशांत असें होत नाहीं. तेथें शरीराची उष्णता व हवेची उष्णता हीं बहुतेक सारखींच असतात; आणि कधीं कधीं तर हवा शरीरापेक्षांहि जास्त उष्ण असते. तेव्हां अशा ठिकाणीं बाष्पीभवन कमजास्त प्रमाणानें चालणें ही गोष्ट हवेंत आर्द्रता किती आहे ह्यावरच मुख्यत्वेंकरून अवलंबून असते. हवा जर उष्ण व आर्द्र अ-

सेल तर अंगांतून पाणी निघूँन जाण्यास बराच अडथळा होतो; पण तीच जर उष्ण व शुष्क असेल तर तसें होण्यास फार सुलभ पडतें. म्हणून उष्णकटिबंधांत खोल आणि वाफाळ हवेंतील प्रदेशांत राहणारे लोक आणि उष्णतेनें भाजून निघणाऱ्या प्रदेशांतील लोक ह्यांजमध्यें प्रकृतीच्या चलाखीसंबंधानें भेद दृष्टीस पडतात. उष्ण आणि आर्द्र ठिकाणच्या लोकांपेक्षां उष्ण आणि शुष्क ठिकाणचे लोक जास्त चलाख असतात. कारण शरीरपिंडांतून द्रवांचें अभिसरण योग्य रीतीनें होऊन त्यांच्या अणूंत भराभर फरक व्हावे या गोष्टीस त्वचा आणि फुप्फुसें यांतून बाष्पीभवन जोरानें चालणें हें आवश्यक असतें.

या गोष्टीस प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. ऐतिहासिक पुरावा असलेली अगदीं प्राचीन अशी सुधारणा ईजिप्त या उष्ण व शुष्क अशाच प्रदेशांत झाली; आणि बाबिलोनियन, आसिरियन, फिनीश्यन ह्याहि सुधारणा उष्ण व शुष्क अशाच प्रदेशांत झाल्या. पण ह्याच गोष्टी राष्ट्रांच्या संबंधानें न सांगतां जातींच्या संबंधानें सांगितल्यास जास्तच ठळक दिसतात. पाऊस कमजास्त कोठें पडतो हें दाखवणाऱ्या नकाशाकडे पाहतां " बिन पावसाचा प्रदेश " असें नांव दिलेला एक पट्टा नजरेस पडतो, व त्यामध्यें उत्तरआफ्रिका, आरबस्थान, इराण, तिबेट आणि मोंगोलिया हे देश मोडतात. आणि जुन्या काळच्या जिंकणाऱ्या सर्व जाती या किंवा याच्या नजीकच्या देशांतून आलेल्या आहेत. उदाहरणार्थ, टार्टार ही जात या बिन पावसाच्या पट्टयाच्या दक्षिण सीमेजवळून निघून चीन देश आणि हिंदुस्थान व चीन यां-

च्यामधील देश एथें पसरती झाली; आणि तेथील मूळच्या लोकांस डोंगराळ प्रदेशांत हांकलून देती झाली. ह्याच जातीनें पश्चिमेकडे देखील जिंकणाऱ्या टोळ्या वरचेवर पाठविलेल्या आहेत. हिंदुस्थान आणि यूरोप यांत पसरणारी आर्यलोकांची जातहि एथूनच निघाली. तद्वतच सेमिटिक ही जात उत्तर आफ्रिकेंत प्रबल होऊन मुसलमानी धर्माच्या वेडेपणाच्या भरांत स्पेन वगैरे यूरोपचेहि कांहीं भाग जिंकिती झाली. सारांश, इजिप्शान जाती व्यतिरिक्त आणखी तीन जातींचीं आपल्यास अशीं उदाहरणें सांपडतात कीं त्या तिन्ही जाती परस्परांशीं भिन्न असून निरनिराळ्या उष्ण व शुष्क प्रदेशांत उत्पन्न होऊन त्यांच्या मानानें आर्द्र अशा प्रदेशांत पसरत्या झाल्या. ह्या सर्व जाती पूर्वीच्या श्रेष्ठ होत्या असें नाहीं. टार्टार व इजिप्शान या जाती तर कनिष्ठच होत्या. पण उत्साह हा धर्म ह्या सर्व जातींमध्यें सारखा दिसत होता, व त्याच जोरावर त्यांनीं इतर लोकांस जिंकिलें. ह्या गोष्टीचा विचार करतां, आणि पुढें हेच लोक जिंकलेल्या आर्द्र देशांत राहूं लागून कमी बलवान् झाल्यावर त्यांस पूर्वीच्याच किंवा इतर उष्ण व शुष्क प्रदेशांतील लोकांनीं येऊन जिंकिलें ह्या गोष्टीचा विचार करतां, जीवव्यापार जिच्यांत चांगले चालतात अशी शुष्क व उष्ण हवा आणि शारीरिक बल ह्यांजमध्यें निकट संबंध आहे ह्या अनुमानास बळकटी येते. ह्याबद्दल आणखीहि पुरावा सांपडतो. अमेरिकेच्या नकाशाकडे पाहतां मध्य अमेरिका, मेक्सिको आणि पेरू हे देश विन पावसाचे दिसतात; आणि या तिन्ही प्रदे-

शांत प्राचीनकाळीं सुधारणा झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसतात. या गोष्टीबद्दल आणखीहि बारीक सारीक पुरावा सांपडतो. नीग्रो लोकांच्या निरनिराळ्या जातींविषयीं लिव्हिंग्स्टन असें म्हणतो कीं नुसत्या उष्णतेनें अगदीं काळा रंग उत्पन्न होत नाहीं, तर उष्णता आणि आर्द्रता यांचा संयोग व्हावा लागतो. आणि स्वीनफर्थ म्हणतो कीं अगदीं काळ्या लोकांपेक्षां डोंगरावरून राहणारे कमी काळे लोक जास्त बळकट असतात. यावरून कमी काळे लोक बहुधा सत्ताधारी कां असतात याचा उलगडा होतो. मध्य अमेरिका आणि पेरू या देशींहि अशीच स्थिति होती. स्पीक असें म्हणतो कीं, कमी काळे लोक जास्त काळ्यापेक्षां नेहमीं जास्त दंगेखोर आणि भांडखोर आढळून येतात. तात्पर्य, अंगांतील आर्द्रता लवकर निघून जाईल अशा हवेनें शरीरप्रकृति बळकट राहण्यास साहाय्य होतें असें स्पष्ट दिसतें.

आतां अशी बळकटी ज्यांच्या अंगीं असेल ते तेव्हांच सामाजिक उत्क्रमण जास्त पावतात असें समजावयाचें नाहीं; तर इतकेंच समजावयाचें कीं तेणेंकरून कमी बळकट लोकांस जिंकून त्यांचीं जास्त श्रीमंत आणि जास्त विविध अशीं वसतिस्थानें बळकावणें त्यांस जास्त सुलभ होतें, आणि मग त्यांच्या हातून वसतिस्थानांचा जास्त चांगला उपयोग होण्याचा संभव उत्पन्न होतो.

१७. इतका वेळ हवा या बाह्योत्पादकाचा विचार केला; आतां जमिनीचा विचार करूं. तो करतांना जमिनीच्या आकाराचा समाजोत्क्रमणावर काय परिणाम होतो तो पाहूं.

पारध करून आणि स्थानान्तर करून राहणारे जे रानटी लोक त्यांनीं एका स्थळीं व्यवस्थेनें राहण्यास शिकावें ही गोष्ट साध्य होण्यास ते ज्या देशांत राहतात तो असा असला पाहिजे कीं तेथें त्यांचें दमन करण्यास सुलभ पडावें, व त्या पलीकडे त्यांच्यापैकीं कोणी जाऊं म्हटल्यास तेथें उदरनिर्वाहाची पंचाईत पडावी. डोंगरांतून राहणाऱ्या लोकांवर हल्ला करणें कठीण असल्यामुळें ते अजिंक्य असतात ही गोष्ट पुष्कळवेळां व पुष्कळ ठिकाणीं प्रत्ययास आलेली आहे. इलीरियन लोकांचें उदाहरण पहा. ते शेजारच्या ग्रीक लोकांपासून स्वतंत्र राहिले, त्यांनीं मासिडोनियन लोकांस नकोनकोसें केलें, आणि आलेक्झांडरच्या मरणानंतर आपलें स्वातंत्र्य बहुतेक पूर्ववत् स्थापन केलें. मान्टिनीग्रोमध्यें राहणारे लोक, स्विसलोक, आणि काकेशस पर्वतांतील लोक यांची स्थिती अशीच आहे. डोंगरी प्रदेशाप्रमाणें ओसाड मैदानांतून राहणारे लोक देखील अधिकाराखालीं येण्यास फार त्रास देतात. त्यांस पाहिजे तिकडे पळून जाण्याची सोय असल्यामुळें, आणि रूक्ष देशांत राहण्याची संवय असल्यामुळें, त्यांस समाजबंधन घालण्यास पंचाईत पडते.

खुद्द इंग्लंदांत देखील ह्याचीं उदाहरणें सांपडतात. वेल्स प्रांत डोंगराळ असल्यामुळें चवदाव्या शतकापर्यंत स्वतंत्रच होता, व पुढें तरी त्याजवर पूर्ण अंमल बसविण्यास बरीच मारामारी पडली. स्काटलंदांतील हायलंदर लोकांच्या संबंधानें हीच स्थिति होती. त्यांच्या त्या डोंगराळ प्रदेशांतून जेव्हां रस्ते केले तेव्हांच ते लोक सुधारणेच्या अमलाखालीं आले. हिंदुस्थानच्या वायव्य

वगैरे डोंगराळ भीमांवर तोच अनुभव अद्यापि येतो.

उलटपक्षीं ज्या देशांत मोठ्या लोकसंख्येचा निर्वाह होण्याचीं सुलभ साधनें असतील आणि त्यांस हुकुमांत ठेवणें सोपें असेल तेथें समजोत्क्रमण सुलभ रीतीनें होतें; आणि सभोंवतालचा मुलूख रूक्ष असून तेथें जर कडवे लोक राहत असतील तर हें उत्क्रमण जास्त सुलभ होतें. ईजिप्त देशाची अशीच स्थिति होती. देशांतल्या देशांत सरकारच्या अधिकारास अडथळा आणण्यास कांहींएक नव्हतें, आणि शेजारचा मुलूख असा होता कीं तेथें गेल्यास एक उपासमार व्हावयाची किंवा भटकणाऱ्या टोळ्यांच्या हातीं पडून लुटलें जाण्याची किंवा उपासमार होण्याची पाळी यावयाची. ज्या ठिकाणीं सभोंवतीं वाळूचें रूक्ष मैदान असण्याच्या ऐवजीं पाणी असेल तेथेंहि अशीच स्थिति होते. उदाहरणार्थ सांडविच बेटें, ताहिती, टोंगा, सामोआ, इत्यादि. सारांश, सामान्यतः असें म्हणतां येईल कीं समाजाचें संकलन होण्यास बाहेरून दाब पाहिजे, आणि त्या दाबांतून सुटण्याचा मार्ग नसला पाहिजे.

देश कमजास्त विविधस्वरूप असणें ह्याचाहि समाजाच्या प्रगतीवर परिणाम घडतो. इतर गोष्टींत बदल न झाल्यास, ज्या प्रदेशांची रचना सर्वत्र सारखी असेल ते प्रदेश समाजप्रगतीस प्रतिकूल होत. असल्या प्रदेशाचे प्रतिकूल परिणाम वनस्पतिवर्ग आणि प्राणिवर्ग ह्यांच्यावर होतातच, पण त्याखेरीज अशा ठिकाणीं निरिंद्रिय द्रव्यें विविध नसतात, अशा ठिकाणीं भिन्नभिन्न अनुभव घेतां येत नाहींत, भिन्नभिन्न संवयी लागत नाहींत, आणि

त्यामुळें उद्योगवृद्धि आणि उपयुक्त कलांचा अभ्युदय यांस विघ्न येतें. मध्य एशिया, मध्य आफ्रिका, किंवा दक्षिण व उत्तर अमेरिका यांचे मध्यभाग, या ठिकाणीं सांगण्यासारखी सुधारणा तेथल्या तेथें मुळींच उत्पन्न झालेली दिसत नाहीं. तद्वतच रशियाच्या मध्यभागीं जीं मोठालीं सपाट मैदानें आहेत त्या ठिकाणीं बाहेरून सुधारणा कितीहि जावो, तेथल्या तेथें ती कधींहि उत्पन्न होण्याचा संभव दिसत नाहीं; कारण तेथें विविधत्वाचा अभाव आहे.

उलटपक्षीं, जेथें भूगर्भ आणि भूपृष्ठ यांच्या संबंधाचें वैविध्य असेल तेथें समाजाची वाढ होण्यास सुलभ पडतें. नाईल नदीच्या कांठचा प्रदेश हा सभोंवतालच्या प्रदेशाच्या मानानें पाहतां बराच विविधस्वरूप आहे; आणि शिवाय सुधारणेस लागणारा एक नेहमींचा गुण त्या देशामध्यें आहे; तो जमीन आणि पाणी यांचें परस्परसांनिध्य हा होय. बाबिलोनियन लोक आणि आसीरियन लोक यांचे मुलूख जरी विशेषतः विविधस्वरूप नव्हते तरी त्यांच्या पूर्वेस व पश्चिमेस असणाऱ्या नदीविहीन प्रदेशापेक्षां ते जास्त विविधस्वरूप होते. ज्या प्रदेशांत फिनीशियन राष्ट्र उदयास आलें त्याला फार विस्तृत किनारा होता; आणि त्यांतून पुष्कळ नद्या येऊन समुद्रास मिळाल्या असल्यामुळें त्यांच्या तोंडीं शहरें वसण्यास जागा होती. शिवाय त्यांच्यांत मैदानें व दऱ्या असून मध्यें डोंगर होते, आणि पलीकडे पर्वत होते. ग्रीक राष्ट्र ज्या देशांत उदयास आलें तो ह्याच्यापेक्षांहि जास्त विविधस्वरूप आहे. तेथें जमीन व पाणी ह्यांची निरनि-

राळ्या रीतीनें भेसळ झालेली असून त्याच्या पृष्ठभागाचा आकार आणि त्याची जमीन हींहि भिन्न भिन्न स्वरूप आहेत. ग्रीससारखें वैविध्य यूरोपच्या, कदाचित् सर्व जगाच्या कोणत्याहि भागांत नसेल. इतालीमध्यें भूगर्भ आणि भूपृष्ठ ह्यांच्यासंबंधानें असेंच वैविध्य असून तेथेंहि एका प्राचीन सुधारणेचा उदय झाला. मेक्सिको, पेरू ह्यांचीहि अशीच स्थिति होती. मेक्सिकोच्या उंच सपाटीच्या सभोंवतीं पुष्कळ पर्वत असून त्यांत पुष्कळ सरोवरें होतीं. आणि पेरूमध्यें मोठे व उंच प्रदेशांतील सरोवर जें टिटिकाका त्यांतील डोंगराळ बेटांतूनच इनका लोकांची सत्ता निघून सर्व देशभर पसरली.

आतां जमिनीच्या गुणावर सुधारणा कशी अवलंबून असते एवढेंच पाहणें राहिलें आहे. अन्न सुलभ रीतीनें मिळत असणें ही गोष्ट सुधारणेस प्रतिकूल आहे. ह्या समजुतींत जरी सत्याचा अंश आहे तरी ती मानतात तितकी खरी नाहीं. पासिफिक महासागरांतील सांडविच, ताहिती, टांगो, सामोआ इत्यादि बेटांतील जमीन जरी फार सुपीक आहे तरी तेथील लोक बरेच प्रगति पावलेले दिसतात. तद्वतच सुमात्रा व मादागास्कार हींहि बेटें चांगलीं सुपीक असून तेथें समाजसुधारणा बरीच झालेली आहे. आफ्रिकेंतील काफर लोक ज्या ठिकाणीं राहतात तेथें पुष्कळ कुरणजमीन असून ते सभोंवतालच्या नापीक प्रदेशांतील लोकांच्या मानानें बरेच सुधारलेले आढळतात. आणि मध्यआफ्रिकेंतहि आशांटी, दाहोमीसारखे जे भाग सुपीक आहेत तेथेंच सर्वांत जास्त सुधारणा झालेली आहे. आतां नाईल नदीच्या दरीकडे पाहतां, आणि

ती फारच सुपीक कशी आहे हें ध्यानांत आणतां, प्राचीनकाळच्या सुधारलेल्या सर्व राष्ट्रांमध्यें ते लोक अत्यन्त पुढें कसे गेलेले होते हें लक्षांत येतें.

शिवाय हवेच्यासंबंधानें जें सत्य, आपल्या लक्षांत आलें तेंच सुपीकतेच्यासंबंधानेंहि ध्यानांत आणिलें पाहिजे. तें हें कीं समाजोत्क्रमणाच्या पहिल्या पायऱ्या चढण्यास अडथळे कमीच असले पाहिजेत. अंगांतील ऊब निघून जाऊं नये असा बंदोबस्त करणाऱ्या कलांची बरीच अभिवृद्धि झाल्याशिवाय बऱ्याच थंड हवेंत ज्याप्रमाणें चांगलीशी वस्ती होत नाहीं, तद्वतच शेतकीच्या संबंधाच्या कलांची बरीच सुधारणा झाल्याविना कमी सुपीक प्रदेशांतून सुधारणेला पुरेशी वस्ती व्हावयाची नाहीं. समाज अल्प व दुर्बळ असतात तेव्हां त्यांना भरभराटण्यास परिस्थिति फारशी खडतर असून उपयोगाची नाहीं. असल्या परिस्थितींत निभाव लागण्यास समाज जास्त मोठे व बळकट झाले पाहिजेत.

जमीन सुपीक असून निरनिराळ्या प्रकारचीहि असली पाहिजे. कारण असें असलें म्हणजे निरनिराळ्या जातींच्या वनस्पतींची व धान्यांची उत्पत्ति होऊन समाजोत्क्रान्तीस मदत होते. डमारालांड नामक वालुकामय प्रदेशांत चार प्रकारची सामोसा नांवाची वनस्पति उत्पन्न होऊन इतर कोणत्याहि वनस्पतीला तेथें वर डोकें करूं देत नाहीं. त्यामुळें तेथें फारसें समाजोत्क्रमण होण्याचा संभव नाहीं. पण हा एक निराळ्याच जातीचा उत्पादक होय. म्हणून त्याचा पृथक् विचार करूं.

१८. समाजाचें पोषण करण्याची जी एकाद्या प्रदे-

शाची योग्यता ती तेथील वनस्पतींच्या वैविध्यावर अनेक तऱ्हांनीं अवलंबून असते. त्यांपैकीं कांहींचा एथें विचार करूं.

एस्किमो लोकांपैकीं कांहींना लांकूड मुळींच मिळत नाहीं; आणि दुसऱ्या कांहींना समुद्रांतून वाहून येईल तेवढेंच मिळतें. घरें बांधण्यास त्यांना बर्फाचा उपयोग करावा लागतो; पाणी पिण्याचीं वगैरे भांडीं सील ह्या प्राण्याच्या कातड्याचीं करावीं लागतात, मासे धरण्याचीं जाळीं देवमाशाच्या हाडांचीं करावीं लागतात, आणि तीरकमटे हाडांचेच किंवा शिंगांचे करावे लागतात. ह्यावरून योग्य वनस्पतींच्या अभावीं जीवनकलांची वृद्धि होण्यास किती अडचण पडते हें चांगलें लक्षांत येतें. अंतार्तिक महासागरांतील फ्यूजियन लोकांची अशीच स्थिति आहे, आस्ट्रेलियामध्यें हवा एकंदरींत बरी असूनहि वनस्पतींची दुर्मिलता ही तेथील मूळच्या रानटी लोकांची स्थिति अगदीं नीचतम राहण्यास कारण झाली होती.

वनस्पतींची विपुलता ही जशी सुधारणेस आवश्यक आहे तशीच वनस्पतींची विविधताही आवश्यक आहे. अनेक जातींच्या वनस्पती असल्या म्हणजे अनेक प्रकारचीं मुळें, फळें आणि धान्यें उत्पन्न होतात, आणि त्यामुळें एकाद्या धान्याचें पीक बुडालें तरी दुष्काळ पडत नाहीं. शिवाय वनस्पतिवैविध्यामुळें निरानिराळीं हत्यारें तयार करणें, व अतएव निरानिराळ्या कलांची वृद्धि करून बुद्धि व चातुर्य हीं वाढवणें, ह्या गोष्टी शक्य होतात. ताहितीमधील लोकांच्या बेटांत घरें बांधण्यास उपयोगीं पडणारीं लांकडें आहेत, ओमण घालण्यास ताडाच्या

झावळ्या आहेत; तद्वतच चटया, माशांचीं जाळीं, दोर वगैरे तयार करण्यास योग्य असे तंतू निघतील असलीं झाडें आहेत. तेथील टापा नांवाच्या झाडाची जी साल असते तिची योग्य मशागत केली म्हणजे तिचें त्यांच्या पोषाकाला उपयोगी असें कापड बनतें. नारळाच्या करवंट्या पेल्यांऐवजीं त्यांस उपयोगीं पडतात; तद्वतच टोपल्या, तोबरे आणि इतर घरगुंती सामान तयार करण्याचीं द्रव्यें त्यांच्या बेटांत उत्पन्न होतात. त्यांच्या बेटांत सुवासिक वनस्पती आहेत, आणि माळा व हार करण्यास फुलें आहेत; तसेच पोषाकावर नमुने छापण्यास त्यांच्याकडे निरनिराळे रंग आहेत. त्यांच्याकडे निरनिराळीं धान्यें असून बटाटे, ऊंस, केळीं वगैरे अन्न फळेंहि आहेत. आणि ह्या सर्व पदार्थांचा उपयोग करण्यास लागणारी हुशारी बरेंच समाजोत्क्रमण झाल्याविना यावयाची नाहीं.

आतां एक गोष्ट एथें लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं वनस्पतिवैपुल्य हें कांहीं अंशीं समाजप्रगतीस अडथळाहि आणूं शकतें. ज्या अत्यन्त थंड प्रदेशांत फ्यूजियन लोक राहतात तेथें खडकाळ डोंगरांतून एक प्रकारचीं निरुपयोगी लहान लहान झुडपें दाट वाढल्यामुळें त्यांस तेथें राहण्यास अडचण पडते. आंदमान बेटांध्यें दाट झाडी इतकी आहे कीं तेथील लोकांस समुद्रकिनाऱ्यावरच वस्ती करून रहावें लागतें. विषुववृत्तावरील पुष्कळ भाग असे आहेत कीं तेथें दाट आणि गुंतागुंतीची फार झाडी असल्यामुळें अर्धवट सुधारलेल्या लोकांसहि तेथें वस्ती करण्यास कठीण पडतें; तेव्हां तेथील

मूळच्या रानट्यांपाशीं ती झाडी तोडण्याचीं हत्यारें नस-ल्यामुळें त्यांस तेथें मुळींच वस्ती करतां येत नसे ह्यांत काय नवल ? तात्पर्य, मूळ माणसास ओबडधोबड दगडी हत्यारांपलीकडे कांहीं हत्यार नसल्यामुळें पृथ्वीच्या ज्या थोड्या भागांवर झाडी फार अल्प नव्हती व फार दाटहि नव्हती अशा ठिकाणींच वस्ती करावी लागली हें स्वाभाविक होय. ह्यावरून कोंवळ्या समाजांस परिस्थितीवर किती अवलंबून रहावें लागतें हें स्पष्ट दिसतें.

१९. हा वसतिस्थानांतील वनस्पतिवर्गाचा विचार झाला; आतां तेथील प्राणिवर्गाचा विचार करूं. ह्या प्राणिवर्गावर समाजोत्क्रमणाची जशी जात अवलंबून असते तशीच पायरीहि अवलंबून असते. कशी तें पाहूं.

खावयास योग्य अशीं रानटी जनावरें असणें किंवा नसणें ह्याजवर कशा रीतीनें उदरनिर्वाह करावयाचा ही गोष्ट अवलंबून असल्यामुळें समाजव्यवस्थाहि अर्थात् त्याच्यावरच अवलंबून असते. पूर्वी उत्तर अमेरिकेंतील मूळच्या जातींचें पोषण होण्यास पुरे इतकी जनावरें सांपडत असत; म्हणून ते मुख्यत्वेंकरून पारध करूनच रहात; पण पारध सांपडेल, तिकडे जावें लागल्यामुळें शेतीस अडथळा येई; त्यामुळें लोकवस्ती वाढत नसे, आणि समाजोत्क्रमणहि होत नसे. आतां पॉलिनिशियाकडे पाहूं तर तेथें जमिनीवर राहणारा प्राणिवर्ग फारसा नसल्यामुळें तेथील लोकांस शेतकी करणें भाग पडे; त्यामुळें एके ठिकाणीं रहावें लागे; म्हणून वस्ती वाढे, आणि जीवनकलांची वृद्धि होई. यावरून उपयुक्त जनावरांचें वैविध्य आणि वैपुल्य यांजवर सुधारणा किती अवलंबून अ-

सते हें समजतें. पूर्वी पुष्कळ ठिकाणीं लोक गुरें-ढोरें बाळगून त्यांवर निर्वाह करीत, व हल्लींहि तशा कांहीं धनगरादि जाती आढळतात. त्यावरूनहि समाजीचें स्वरूप अस्तित्वांत असणाऱ्या प्राणिवर्गावर किती अवलंबून असतें हें समजतें. घोडे, उंट, मेंढरें, बैल, बकरीं इत्यादि माणसाळणारीं व गवत खाणारीं जनावरें असल्याविना हें धनगरी जीवित चालावयाचें नाहीं; व असलें जीवित ज्यांचें आहे त्यांस एके ठिकाणीं राहतां येत नसल्यामुळें त्यांची जास्त सुधारणा होत नाहीं. कुत्रे व रेंदीर यांच्यासह राहणारे लॉपलांदर लोक, घोडे आणि गुरेंढोरें यांसह राहणारे तार्तार लोक, आणि लामा व गिनीपिग यांसह राहणारे दक्षिणअमेरिकन लोक यांजकडे पाहतां प्राणिवर्गाची विशिष्ट स्थिति असल्यामुळें सुधारणा कांहीं मजला मारून तेथेंच कशी थबकते हें चांगलें लक्षांत येतें.

उपयुक्त जनावरांची विपुलता किंवा दुर्मिलता यांजवर जसें समाजोत्क्रमण अवलंबून राहतें तसेंच घातुक जनावरांचा सुळसुळाट किंवा विरलता यांजवरहि अवलंबून रहातें. सिंह, वाघ, वगैरे मोठालीं क्रूर श्वापदें असलीं म्हणजे त्यांजपासून समाजास उपद्रव होतो हें स्पष्टच आहे, पण लहान लहान उपद्रवी प्राण्यांपासून देखील कमी त्रास होत नाहीं. उदाहरणार्थ, टोळ वगैरे क्षुद्र प्राणी हे सगळ्या शेताची नासाडी करून टाकितात. आतां असल्या उपद्रवांपासून प्रौढ समाजास जरी फारसा व्यत्यय येत नाहीं, तरी कोंवळ्या व अशक्त समाजांस त्यापासून वाढण्यास मोठी अडचण उत्पन्न होते. कांहीं

ठिकाणीं चिलटांचा इतका उपद्रव असतो कीं, " कसें काय ? चिलटांनीं रात्रीं कशी काय झोंप येऊं दिली ? " हाच सकाळचा रामराम असतो. ओरिनोकोमध्यें अशी स्थिति आहे म्हणून म्हणतात. कांहीं ठिकाणीं वाळवीचा इतका उपद्रव असतो कीं, तेथें ती घरांतील सामानाचा केव्हां चुराडा करून टाकील याचा कांहींच नेम नसतो. पूर्व आफ्रिकेंत अशी स्थिति असल्याबद्दल लिव्हिंग्स्टन सांगतो. अशा ठिकाणीं कोंवळ्या समाजाचें पाऊल पुढें पडण्यास मोठी मारामारी पडते.

अशा रीतीनें एकाद्या ठिकाणच्या मूळच्या सामाजिक जीविताचा नमुना आणि तेथील मूळचा प्राणिवर्ग ह्यांजमध्यें निकटसंबंध आढळून येतो. उपयुक्त जातींचा भाव किंवा अभाव आणि उपद्रवी जातींचा भाव किंवा अभाव यांचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडत असतात; आणि अशा रीतीनें समाजाच्या प्रगतीला मदत किंवा अडथळा होतो. इतकेंच नाहीं, तर सामाजाच्या रचना व त्याचे उद्यम यांतही कमजास्त विशेष उत्पन्न होतात.

२०. असो. ह्या मूळच्या बाह्योत्पादकांचें पूर्ण वर्णन करणें अशक्यच आहे. वर ज्या वर्गांचें निदर्शन केलें आहे त्यांचें देखील साधारणपणें पूर्ण वर्णन तयार करूं म्हटल्यास कित्येक वर्षें लागतील, आणि इतकें करून परिस्थितींतील पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या राहतीलच.

सूर्यप्रकाश कमजास्त असणें व कमजास्त वेळ असणें ह्याचा माणसाच्या उद्योगावर व गृहवासावर परिणाम घडत असतो. तद्वतच आकाश बहुधा निरभ्र अ-

सपें किंवा साभ्र असणें ह्याचाहि मनाच्या स्थितीवर आणि अतएव शारीरिक चपलतेवर परिणाम घडत असतो. हवा नेहमीं स्वच्छ असली म्हणजे माणसें नेहमीं बाहेर पडतात, आणि नेहमीं पावसाळी असली म्हणजे घरांतच बसून राहतात, ह्या गोष्टी परिचितच आहेत; पण यांचे माणसाच्या वर्तनावर निरनिराळे परिणाम घडत असतात. तद्वतच मोठालीं वादळें वगैरे होत असल्यास किंवा भूकंप वगैरे होत असल्यास त्यांचाहि परिणाम होतो. माणसांच्या कल्पनाशक्ति आणि अतएव त्यांचे स्वभाव यांजवर या अद्भुत व प्रचंड सृष्टिव्यापारांचा कसा प्रभाव होतो हें बकलसाहेबानें आपल्या सुधारणेच्या इतिहासांत गौरवून वर्णिलेंच आहे. पण असल्या चमत्कारांचे आणखीहि परिणाम घडत असतात. उदाहरणार्थ, जेथें भूकंप वारंवार होत असतील तेथें लोक घरें सखल व हलक्या सामानाचीं बांधीत असतात. अशा रीतीनें त्यांच्या गृहव्यवस्था आणि सौंदर्यविषयक अभिरुचि ह्या दोहोंस एक विशेष वळण लागतें. तद्वतच लोकांना सर्पण कोणत्या प्रकारचें मिळतें याचाहि नानाविध परिणाम घडत असतो. उदाहरणार्थ, लंडनांत सर्वत्र कोळसाच जाळीत असल्यामुळें आणि पारीस वगैरे शहरीं लांकडें जाळीत असल्यामुळें पहिल्यांतील रस्ते काळे कुळकुळीत झालेले आणि उदासवाणे असे दिसतात, आणि दुसऱ्यांतील चकचकीत उल्लासवाणे दिसतात. याचप्रमाणावर अर्थात् भिन्न भिन्न परिणाम होतो. खनिज पदार्थ कमजास्त असणें याचे परिणाम कसे घडतात हें सांगावयासच नको. एकाद्या ठिकाणीं धातू मुळींच नसल्यास

तेथें सगळीं हत्यारें व भांडींकुंडीं दगडाचींच करावीं लागतील. तेथें तांब्रें सांपडूं लागल्यास प्रगतीस सुरवात होईल; जवळच कथील असल्यास दोहोंची मिळून पंचरस धातू बनवितां येऊन एक पायरी पुढें जातां येईल; आणि लोखंड सांपडल्यास त्याच्यापुढेंहि जातां येईल. तद्वतच चुन्याचा भाव किंवा अभाव ह्याजवर खासगी घरांचे आणि सरकारी इमारतींचे आकार आणि नमुने हे अवलंबून राहतात, आणि त्यामुळें गृहविषयक आणि समाजविषयक संवयी आणि कलांची प्रगति ह्यांच्यांत कमजास्तपणा उत्पन्न होतो. देशांत उन्हाळे (उष्ण पाण्याचे झरे) असणें किंवा नसणें असल्या बारीक गोष्टींचें देखील या बाबतींत महत्त्व असतें. कारण प्राचीन काळीं मध्य अमेरिकेंत एके ठिकाणीं अशा उन्हाळ्याच्या शेजारीं कुंभाराचा मोठा धंदा सुरू झाल्याचा पुरावा सांपडतो. ह्या सर्व गोष्टींचें वर्णन करूं म्हटल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल. तेव्हां तें एथें करण्याच्या भानगडींत पडतां येत नाहीं. कारण अशा दृष्टीनें पाहतां प्रत्येक समाजाचें एकेक विशेष समाजशास्त्र बनवितां येण्यासारखें आहे.

२१. असो. पण याठिकाणीं आमचा उद्देश अशा फंदांत न पडतां निरनिराळ्या प्रकारच्या आणि तऱ्हांच्या मूळ बाह्योत्पादकांची सामान्य कल्पनाच वाचकांच्या लक्षांत आणून देण्याचा आहे. असें कीं समाजविषयक चमत्कार उत्पन्न होण्यांत माणसाचे स्वभाव आणि परिस्थितीचें स्वरूप या दोहोंचाहि उपयोग होतो हें त्यांच्या बरोबर लक्षांत यावें.

निरनिराळे मूळचे बाह्योत्पादक कोणते आहेत हें सांगणें आणि त्यांचा प्रभाव काय होतो हें पाहणें ह्याचा एक परिणाम असा होतो कीं तेणेंकरून समाजोत्क्रान्तीच्या पुढच्या पुढच्या पायऱ्यांपेक्षां पहिल्या पहिल्याच पायऱ्या बाह्यपरिस्थितीवर कशा विशेष अवलंबून असतात हें चांगलें लक्षांत येतें. आपल्याला ज्या समाजांचा फार परिचय आहे ते फारच व्यवस्थित असल्यामुळें, त्यांच्यामध्यें निरनिराळ्या योजना पुष्कळ असल्यामुळें, आणि त्यांचें ज्ञान झालेलें असल्यामुळें, ते जरी निरनिराळ्या युक्त्यांचा उपयोग करून प्रतिकूल परिस्थितींत भरभराटूं शकतात, तरी तशा परिस्थितींत दुर्बल आणि कोंवळे समाज कधीं उदयास यावयाचे नाहींत. ते आपल्या परिस्थितीवरच अवलंबून असतात.

कांहीं लोक असा प्रश्न करीत असतात कीं कांहीं रानटी लोक आज कित्येक शतकें रानटीचे रानटीच राहिले आहेत, याचें कारण काय? या प्रश्नास वरील विवेचनामध्यें समर्पक उत्तर आलेलें आहे असें म्हणतां येईल. कारण असल्या समाजांची प्रगति होण्यास एकंदर अनुकूल गोष्टींचें साहचर्य आणि त्याबरोबरच प्रतिकूल गोष्टींचा अभाव अशा दोन गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून असाव्या लागतात; आणि असला संयोग किती विरल आहे हें ध्यानांत आणिलें, आणि त्याबरोबरच कोंवळ्या समाजांतील लोकांचें ज्ञान किती अल्प असतें, व त्यांजपाशीं साधनें किती थोडीं व ओबडधोबड असतात हें लक्षांत घेतलें म्हणजे असल्या समाजांची प्रगति कशी होत नाहीं, आणि थोडीशी झाल्यास प्रतिकूल

कारणें उत्पन्न झाल्याबरोबर पिछेहाट कशी होते, ह्या गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत येतात.

असो. एथवर मूळच्या बाह्योत्पादकांचा सामान्य विचार झाला; आणि इतकाच आपणास एथें कर्तव्य आहे. कारण एथें आपण समाजोत्क्रान्तीच्या सामान्य तत्त्वांचाच विचार करीत आहों. असो. आतां पुढील प्रकरणांत मूळच्या अंतरुत्पादकांचा विचार करूं.

प्रकरण चवथें

मूळचे अंतरुत्पादक

२२. बाह्योत्पादकांच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली तीच्च अंतरुत्पादकांच्या संबंधानें खरी आहे. ती ही कीं त्यांचा इतिहास देऊं म्हटल्यास त्यास जितकें ज्ञान पाहिजे तितकें आमच्यापाशीं नाहीं. एका पक्षीं फार प्राचीन काळच्या भूगर्भाच्या थरांमध्यें आणि गुहांमध्यें वगैरे माणसांचीं हाडें सांपडतात, व तेव्हांपासून हवा आणि पृथ्वीचा सुका भाग आणि जलाच्छादित भाग ह्यांजमध्यें मोठाले फरक झाले आहेत. ह्यावरून असें अनुमान निघतें कीं माणसांच्या राहण्याच्या ठिकाणांत आजपर्यंत फार बदल झाले आहेत. आणि दुसऱ्या पक्षीं असें अनुमान निघतें कीं असे जर 'बदल झाले आहेत तर त्यांना अनुसरून माणसांच्या रचना आणि व्यापार ह्यांच्यांतहि बदल झालेच असले पाहिजेत. पण ते काय झाले असतील ह्याबद्दल आपणांस बहुतेक मुळींच ज्ञान नाहीं.

कांहीं कांहीं सांगाडे असे सांपडले आहेत कीं त्यांवरून ह्या जुन्या काळचीं माणसें हल्लींच्या माणसांच्या मानानें हलक्या नमुन्याचीं होतीं असें दिसतें. त्यांच्या कपाळाचे पुढचे भाग मोठाले दिसतात, आणि त्यांच्या जबाड्यांच्या दोन हाडांपैकीं मोठें हाड दबलेलें दिसतें. पण हा सर्व पुरावा असावा तितका समाधानकारक नाहीं. हल्लीं माहीत असलेल्या गोष्टींवरून दोन सामान्य अनुमानें मात्र करतां येतात. एक हें कीं हल्लीं जशा हाडां-

ची घटना बरीच भिन्न असलेल्या माणसाच्या निरनिराळ्या जाती सांपडतात तशाच पूर्वी होत्या; आणि दुसरें हें कीं ह्या प्राचीन जातीपैकीं कांहींच्या ठिकाणीं दिसणारीं क्रूरतेचीं आणि कमीपणाचीं कांहीं चिन्हें हल्लीं अगदीं दिसत नाहींत, किंवा अगदीं क्वचित् दृष्टीस पडतात.

२३. सारांश, मूळचे अंतरुत्पादकांबद्दल, म्हणजे प्राचीनतम माणसाचे जे अंतर्विशेष त्यांबद्दल आपणास सांगण्यासारखी माहिती मुळींच सांपडत नाहीं. तथापि भूगर्भशास्त्रज्ञ आणि प्राचीनतम इतिहासव्यासंगी ह्यांच्या शोधांवरून आपणास सामान्यतः असें अनुमान करतां येईल कीं माणसाच्या जाती हळू हळू सारख्या भिन्न होत गेल्या आहेत, विशेष दुर्बळ जातींचा विशेष सबळ जातींकडून पाडाव होत गेलेला आहे, कनिष्ठ जाती अनिष्ट प्रदेशांत हांकलल्या जात आहेत, आणि कधीं कधीं त्यांचा अगदीं संहारहि झालेला आहे.

तेव्हां आतां मूळ माणसाची अशा रीतीनें अगदीं अंधक अशी कल्पना बनवून, हल्लीं अस्तित्वांत असलेल्या जातींपैकीं ज्या जाती त्यांच्या दृश्य स्वभावांवरून आणि हत्यारांवरून मूळ माणसाशीं फारच सदृश दिसतात त्यांजकडे पाहून ह्या मूळ माणसाबद्दल होईल तेवढी स्पष्ट कल्पना करण्याचा यत्न करूं या. हा विचार एक प्रकरणांत करण्याच्या ऐवजीं तीन प्रकरणांत करूं. पहिल्या प्रकरणांत मूळ माणसाच्या शारीरिक विशेषांचा विचार करूं, दुसऱ्यांत मनोवृत्तिविषयक विशेषांचा विचार करूं, आणि तिसऱ्यांत बुद्धिविषयक विशेषांचा करूं.

प्रकरण पांचवें

मूळ माणसाचे शारीरिक विशेष

२४. न सुधारलेल्या जातींमध्यें पाटागोनियन लोकांप्रमाणें कांहीं सहा सात फूट उंच आहेत, आणि आफ्रिकेंतील कांहीं जातींप्रमाणें कांहीं चार पांच फूट उंच आहेत. अशी स्थिति असल्यामुळें सामाजिक स्थिति आणि उंची यांजमध्यें कांहीं प्रत्यक्ष संबंध आहे असें म्हणतां येत नाहीं. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांमध्यें चांगल्या उंच अशा पारध करणाऱ्या जाती आहेत, आणि बुशमेनप्रमाणें ठेंगू जातीहि आहेत. धनगरी जातींमध्यें किरगीझ लोकांसारख्या कांहीं खुज्या जाती आहेत, आणि काफीर लोकांप्रमाणें कांहीं चांगल्या वाढलेल्या जाती आहेत. आणि शेतकी करून राहणाऱ्या जातींमध्येंहि असलेच भेद दृष्टीस पडतात.

असें आहे तरी एकंदर पुराव्याचा विचार करतां रानटीपणा आणि आकाराचा कमीपणा ह्या दोहोंमध्यें कांहींतरी संबंध असावा असें दिसतें. उत्तर अमेरिकेंतील चिंकू आणि दुसऱ्या कांहीं जातींचे लोक ठेंगू असल्याबद्दल लिहिलेलें आढळतें; शोशोन लोकांबद्दलहि असाच उल्लेख आढळतो. दक्षिण अमेरिकेंतील जातींबद्दल असें विधान केलेलें आहे कीं, ग्वायनामधील इंदियन लोक उंचीनें पांच फूट पांच इंचांहून बरेच कमी असतात; आरावाक लोक पांच फूट चार इंचांहून क्वचितच जा-

स्त उंच भरतात; आणि गुराणी लोक पांच फूटहि भरत नाहींत. उत्तर अशियांतील रानटी लोकांची अशीच स्थिति आहे. किरगीझ लोक सरासरी पांच फूट व तीन किंवा चार इंच असतात. आणि कामस्चाडेल लोकहि बहुधा ठेंगणेच असतात. दक्षिण एशियामध्येंहि तेंच आढळतें. फ्यूजियन लोक पांच फुटांहून जास्त उंच असत नाहींत. अंदामानमधले लोक चार फूट दहा इंच ते पांच फूटपर्यंत असतात; आणि वेड्डा नांवाचे लोक चार फूट एक इंच पासून पांच फूट तीन इंचांपर्यंत असतात. बुशमेन सरासरी चार फूट साडे चार इंच असतात; आणि अक्का लोक चार फूट एक इच ते चार फूट दहा इच असतात.

तर आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं ठेंगूपणा हा कनिष्ठ जातींचा नैसर्गिक धर्म किती हिशांनीं आहे, आणि वरिष्ठ जातींनीं त्यांस वाईट प्रदेशांत हांकून लाविल्यामुळें कितपत आलेला आहे ? एस्किमो लोक आणि लापलांदर लोक यांचा जो ठेंगूपणा आहे तो त्यांच्या देशांतील अत्यंत थंड हवेमुळें त्यांस जीव रक्षण करण्यास जीवशक्तींचा जो मोठा व्यय करावा लागतो त्यामुळेंच सर्वांशीं नाहीं तरी निदान कांहीं अंशीं उत्पन्न झाला असेल; आणि असें असल्यामुळें त्यांच्या उदाहरणांवरून मूळचीं माणसें ठेंगू होतीं किंवा असतात हें कांहीं सिद्ध होत नाहीं; जसा शेटलंड बेटांतील तट्टूंच्या ठेंगूपणावरून मूळच्या घोड्यांचा ठेंगूपणा सिद्ध होत नाहीं. बुशमेनच्या संबंधानेंहि असेंच म्हणतां येईल; कारण त्यांचा मुलूख इतका नापीक आणि रूक्ष आहे कीं त्यांतील बऱ्याच भागांत कायमची वस्तीच करतां येत नाहीं; म्ह-

णून नेहमींच्या उपासमारीमुळें त्यांची उंची खालावलेली असेल. दुर्बळ जाती सबळ जातींच्या हातून नेहमीं वाईट हवेंत हाकलल्या गेल्या असल्यामुळें त्यांचा अशक्तपणाकडे किंवा ठेंगूपणाकडे जो मूळचा कल तो जास्तच दृढ होत गेला असला पाहिजे. ह्यावरून ह्या अत्यन्त रानटी माणसांचा छोटेपणा कदाचित् मूळचा असेल, कदाचित् मागून उत्पन्न झालेला असेल, किंवा कदाचित् कांहीं अंशीं मूळचा आणि कांहीं अंशीं संपादित असेल.

ह्या व इतर पुराव्याचा विचार करितां एवढेंच म्हणतां येईल कीं आकार हें जास्त जास्त उत्क्रान्तीचें एक लक्षण आहे, व त्याबरोबर इतर लक्षणें आलेलीं असतील किंवा नसतील; आणि हें लक्षण स्थानिक स्थितीवर अवलंबून असतें. आणखी असें म्हणतां येईल कीं, निरनिराळ्या जातींच्या कलहांत ज्यांचें आकारमान मोठें असेल त्यांना फायदा होतो, आणि अशा रीतीनें जास्त उंच जाती त्या शिल्लक राहतात, आणि कमी उंच त्या नष्ट होतात; आणि ह्यावरून असें अनुमान निघतें कीं सामान्य मूळ माणूस सामान्य सुधारलेल्या माणसापेक्षां कांहींसा कमी उंच होता.

२५. उंचीच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली तीच घटनेच्या संबंधानें खरी आहे; कीं, सुधारलेला माणूस आणि रानटी माणूस ह्यांच्यामध्यें अगदीं स्पष्ट असा भेद दिसत नाहीं. तथापि अल्पस्वल्प भेद आढळून येतो.

रानटी जातींच्या माणसाचे खालचे अवयव, सामान्यतः लहान असतात. ओस्टियाक लोकांच्या तंगड्या बारीक व लहान असतात असें पालास म्हणतो. कामसूचा-

डेल लोकांबद्दलहि तेंच विधान आढळतें. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील डोंगरी लोकांच्या संबंधानें स्टुअर्ट असें म्हणतो कीं शरीराच्या लांबीच्या मानानें कुकी लोकांच्या तंगड्या आंखूड असतात, आणि बाहू लांब असतात. कांहीं अमेरिकन जातींबद्दल असेंच म्हटलेलें आढळतें. चिंकू लोकांबद्दल असें वर्णन केलेलें वाचण्यांत येतें कीं त्यांच्या तंगड्या लहान असून वांकड्या असतात; गुराणी लोकांच्या तंगड्या व बाहू आंखूड व जाड असतात. पाटागोनियन लोक इतके धिप्पाड असूनहि त्यांचे हातपाय त्या मानानें आंखूड व बारीकच असतात. आस्ट्रेलियन लोकांबद्दलहि हेंच म्हणतां येतें. त्या लोकांच्या तंगड्यांचीं हाडें जरी यूरोपियनांच्या त्या हाडांइतकींच लांब असतात तरी तीं जाडीनें कमी असतात. नष्ट झालेल्या जातींचे जे सांगाडे सांपडतात त्यांवरूनहि हेंच अनुमान निघतें. तात्पर्य, सामान्यतः असें म्हणतां येईल कीं लहान किंवा बारीक तंगड्या असणें हें मूळ माणसाचें सामान्य लक्षण होय.

हें लक्षण उत्पन्न होण्याचें कारण मूळ माणसास वानराप्रमाणें भक्ष्यासाठीं वरचेवर झाडावर चढावें लागत असावें हें दिसतें; आणि म्हणून माणसाची जशी सुधारणा होत गेली तसें हें लक्षण बदलत गेलें असावें. निरनिराळ्या जातींच्या कलहांमध्यें ज्यांच्या तंगड्या जरा जास्त जाड होत्या त्यांना इतरांवर फायदा मिळाला असावा. त्या योगानें त्यांस जलद पळतां आलें असावें एवढेंच नव्हे, तर कुस्तीमध्येंहि त्यांचा जय झाला असावा. कुस्तीमध्यें बाहू आणि धड यांची शक्ति त्यांस सां-

वरून धरण्याचें जें तंगड्यांचें बळ त्यावर अवलंबून असतं. या कारणामुळें सबळ तंगड्यांच्या जाती बहुधा सत्तावान् झालेल्या आहेत.

मूळ माणसाच्या शरीरघटनेचा लक्षांत ठेवण्यासारखा आणखी एक विशेष म्हटला म्हणजे त्याच्या दाढा व दांत यांचा आकार मोठा असतो हा होय. हा आकार मोठा होण्याचें एक कारण त्यांस जाडेंभरडें, चामट, कठीण, आणि हिरवें अन्न (मांस व वनस्पति) खावें लागत असे हें होय, आणि दुसरें कारण हत्यारांऐवजीं त्यांस दांतांचा व दाढांचा वरचेवर उपयोग करावा लागे हें होय. (ही गोष्ट सुधारलेल्या माणसांच्या मुलांमध्येंहि दृष्टीस पडतेच. तद्वतच त्यांच्याहि तंगड्या शरीराच्या मानानें लहानच असतात. तात्पर्य, सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांच्या मुलांच्या वाढीमध्यें दृष्टीस पडतात.) वरील कारणें जसजशीं कमी होत गेलीं तसतसा दाढांचा व त्यांस चिकटलेल्या स्नायूंचाहि आकार लहान होत गेला.

समाजसुधारणा होत गेली, आणि साधनवृद्धि झाली, म्हणजे माणसाची रचना कशी बदलते हें ह्यावरून स्पष्ट दिसतें; आणि ह्याच कारणावरून अंतरिंद्रियांमध्यें, म्हणजे मेंदूमध्यें वगैरे, असेच फेरफार कसे होत असतील हें लक्षांत येतें.

२६. हे जे इंद्रियांच्या संबंधाचे विशेष आतां सांगितलें त्यासंबंधानेंच आणखी एक आकारविशेष एथें सांगण्यासारखा आहे. तो पचनेंद्रियांच्या संबंधाचा होय.

कामसूचाडेल लोकांचें पोट लोंबतें असतें असें वर्णन केलेलें आढळतें. बुशमेन लोकांबद्दल ब्यारो साहेब असें

म्हणतो कीं त्यांचीं पोटें फारच पुढें आलेलीं असतात. आक्का लोकांचीं पोटें फुगलेलीं दिसतातं असें स्वीन्फर्थ म्हणतो. ह्यास सुधारलेल्या व रानटी दोन्ही माणसांच्या मुलांचा पुरावा सांपडतो. वेड्डा लोकांच्या मुलांबद्दल टेनंटसाहेब आणि डामारा लोकांच्या मुलांबद्दल गाल्टन साहेब असाच पुरावा देतात.

रानटी लोकांचीं पचनेंद्रियें सुधारलेल्या माणसांच्या त्या इंद्रियांच्या मानानें मोठीं असतात हें ते लोक पुष्कळ खातात व पचवतात ह्यावरून देखील समजण्यासारखें आहे. रांगल साहेब म्हणतो कीं याकूत लोक एका दिवसांत आपल्यापेक्षां सहापट जास्त मासे खाऊं शकत ह्या जातीच्या एका सहा वर्षांच्या मुलाबद्दल कॉक्रेन साहेब असें वर्णन करितो कीं त्यानें तीन मेणबत्त्या, किंत्येक पौंड लोणी, आणि पिंवळ्या साबूचा एक मोठा तुकडा असे खाल्ले; आणखी तो असें म्हणतो कीं, याकूत जातीच्या किंवा टोंगूस जातीच्या माणसास दिवसामध्यें चाळीस पौंड मांस खातांना मीं कितीदां तरी पाहिलें आहे. बुशमेन लोकांबद्दल टॉम्सन असें म्हणतो कीं तेरानटी जनावरांसारखें अधाशीपणानें खातात, व त्यापासून त्यांस कांहीं त्रास होत नाहीं. कोमांची लोकांबद्दल स्कूलक्राप्ट तेंच म्हणतो; क्यापटिन लायन एस्किमो लोकांच्या आणि सर जार्ज ग्रे आस्ट्रेलियन लोकांच्या खादाडपणाबद्दल जीं विधानें करितो त्यांवरून तेंच अनुमान निघतें.

आतां कोठा असा मोठा असणें हें त्या लोकांस जरूरीचेंच आहे. सुधारलेले लोक नियमितपणानें व वरचेंवर खात असतात. म्हणून कधीं मिळेल तेव्हां खाऊन

घेणाऱ्या रानटी लोकांस त्यांच्या एवढा कोठा असून चालावयाचें नाहीं. ज्याचा कोठा अशा रीतीनें मोठा नसेल तो इतरांपुढें सहजच हार जाईल. ह्या लोकांचा कोठा मोठा असण्याचें दुसरें कारण असें कीं त्यांचें अन्न हलकें असतें, त्यामुळें भूक निवण्यास त्यांस तें पुष्कळ खावें लागतें. रानटी फळें, मुळें, पाले वगैरे, किंवा किडे, किडी, फुलपांखरें वगैरे, रगड खाल्ल्याशिवाय जरूर तितकीं नैट्रोजनाविशिष्ट द्रव्यें, चरब्या, आणि शर्करा कोठ्यास मिळावयाच्या नाहींत. तात्पर्य, मोठीं पोटें असणें हें मूळ माणसास त्याच्या परिस्थितीवरून अवश्यच होय.

आतां ह्या मोठ्या पोटांचा आणि अनियमित खाण्याचा काय परिणाम होतो तें पाहूं. एक परिणाम, हें मोठें वजन संभाळण्यास रानटी माणसास सुधारलेल्या माणसापेक्षां कांहीं जास्त शक्ति खर्च करावी लागते हा होय. दुसरा परिणाम, पुष्कळ खाल्लें असेल तेव्हां सुस्ती उत्पन्न होत असेल हा होय. तिसरा परिणाम, कांहीं दिवस खावयास न मिळालें म्हणजे अशक्तपणा उत्पन्न होत, असेल हा होय. तात्पर्य, अनियमित खाण्यामुळें श्रमांमध्येंहि अनियमितपणा उत्पन्न होत असला पाहिजे. आणि अशा रीतीनें मूळ माणसास मूळ स्थितींतून वर येण्यास ज्या अनेक अडचणी असतात त्यांत ह्या एका अडचणीची भर पडत असली पाहिजे.

२७. उंची आणि स्नायूंची वाढ या दोन्ही गोष्टींमध्यें रानटी माणूस सुधारलेल्या माणसापेक्षां कमी असतो. ह्याखेरीज त्याच्या कमी सामर्थ्याबद्दल आणखीहि पुरावा सांपडतो. त्यास सुधारलेल्या माणसाइतकी शक्ति

एकदम खर्च करतां येत नाहीं, आणि सुधारलेली मांणूस जितका वेळ शक्तीचा खर्च करीत राहील तितका वेळहि ह्यास करतां येत नाहीं.

ह्यास बहुधा दोन कारणें असावीं. एक रानट्यांच्या शरीराचें सुधारलेल्या माणसाइतकें चांगलें पोषण होत नाहीं हें होय, आणि दुसरें त्यांचा मेंदू ह्याच्या इतका मोठा नसतो हें होय. घोडा कुरणावर सोडिला म्हणजे लठ्ठ होतो, पण त्यास मग सारखी मेहनत होत नाहीं; तद्वत् रानटी माणसें लठ्ठ असूनहि अशक्त असूं शकतील. तालीम करणाऱ्या माणसांचा असा अनुभव आहे कीं, एकदम श्रम करण्यास किंवा सारखी मेहनत करण्यास योग्य असे स्नायू बनवण्यास त्यांस कित्येक महिने सारखी मेहनत करावी लागते. यावरून निःसत्त्व आणि कधीं तरी मिळणाऱ्या अन्नामुळें रानटी लोकांमध्यें ह्या दोन्ही प्रकारच्या शक्तीचा उणेपणा कसा उत्पन्न होत असेल हें लक्षांत येतें. मनुष्य रागांत असला म्हणजे त्याच्या हातून जेवढें काम होतें तेवढें एरवीं होत नाहीं. तात्पर्य, शक्तीचा प्रादुर्भाव मनोवृत्तींच्या जोरावर अवलंबून असतो; आणि मनोवृत्तींचा मेंदूच्या गठ्ठ्यावर अवलंबून असतो. तेव्हां तो गठ्ठा रानटी माणसामध्यें लहान असल्यामुळें त्याच्या हातून सुधारलेल्या माणसाइतकें मोठ्या शक्तीचें काम कां होत नाहीं हें यावरून लक्षांत येईल.

२८. मूळ माणसें आणि सुधारलेलीं माणसें ह्यांच्यामध्यें इंद्रियविषयक आणखी एक भेद आहे. तो हा कीं रानटी माणसें जास्त टणक किंवा कणखर असतात.

सुधारलेली स्त्री आणि रानटी स्त्री ह्यांच्यामधील बाळंतपणाच्या संबंधाचा भेद पहावा, म्हणजे हें बरोबर लक्षांत येतें. रानटी स्त्रिया जर इतक्यां टणक नसत्या तर त्यांची व त्यांच्या पोरांची बाळंतपणांत कठीणच अवस्था झाली असती. ह्यावरून त्या टणक असतात किंवा नाहीं, व कां असतात, ह्या दोन्ही गोष्टी लक्षांत येतात.

उत्तमाचा टिकाव या तत्त्वाच्या व्यापाराच्या योगानें रानटी माणसें ज्यास्त ज्यास्त टणक होत गेलीं असलीं पाहिजेत; कारण त्यांस थंड किंवा उष्ण हवेंत उघडें वाघडें रहावें लागत असतें. जो फ्युजियन माणूस अंगावर पडणारें बर्फ अंगावरच वितळूं देतो तो, इतका चिवटपणा ज्यांच्या मध्यें नव्हता ते सर्व मरून जाऊनच जगला असला पाहिजे. याकूत लोक इतकी थंडी सहन करूं शकतात कीं ते रात्रंदिवस अगदीं उघडे राहूं शकतात; त्यामुळें त्यांस लोखंडी देहाचीं माणसें असें नांव प्राप्त झालें आहे. हा टणकपणा त्यांस कमी टणक माणसांचा संहार होऊनच प्राप्त झाला असला पाहिजे. तद्वतच कांहीं रानटी लोक हवा कितीहि रोगट असली तरी तेथें निरोगी राहूं शकतात. नीग्रो लोकांची अशीच स्थिति आहे. तद्वतच रानटी लोक जखमा सोसणारेहि जबरदस्त असतात. ज्या जखमांना यूरोपियन लोक खात्रीनें बळी पडतील त्यांतून आस्ट्रेलियन लोक सहज उठतात.

एका दिशेनें असा श्रेष्ठपणा प्राप्त झाल्यामुळें दुसऱ्या दिशांनीं कनिष्ठपणा उत्पन्न होतो कीं काय ह्याबद्दल आपल्यापाशीं प्रत्यक्ष पुरावा नाहीं. पाळींव जनावरांच्या ज्या अधिक टणक जाती असतात त्या कमी टणक जा-

तींपेक्षां आकारानें लहान असतात ही गोष्ट प्रसिद्ध आहे. म्हणून पाहिजे तेवढाले फेरवदल सोसण्यास समर्थ असें जें रानट्यांचें शरीर बनतें तें कदाचित् आकार किंवा उत्साह ह्यांच्यांत कमीपणा आणून बनत असेल. आणि असें जर असेल तर रानटी माणसाचा मूळ स्थितीशीं जो हा अनुरूपपणा त्याच्या योगानें त्यास उच्चतर स्थिति प्राप्त होण्यास आणखी एक अडथळा उत्पन्न होतो असें म्हटलें पाहिजे.

२९. ह्यालाच लागून असणारा आणखी एक इंद्रियविषयक विशेष आतां सांगितला पाहिजे. इजा किंवा जखमा सोसण्याची जी ही विशेष शक्ति रानटी लोकांमध्यें दृष्टीस पडते त्याबरोबरच ह्या इजांपासून उत्पन्न झालेल्या ज्या वेदना त्याबद्दलहि विशेष बेपर्वाई दृग्गोचर होते; किंवा कदाचित् असें म्हणणें जास्त बरोबर होईल कीं त्या वेदना इतक्या तिखट नसतात. हवेच्या उष्णतामानांत कितीहि फेरफार झाले तरी बुशमेन लोकांना त्यांचें कांहींच वाटत ताहीं. झुलू लोक जळतीं लांकडें हातांनीं उचलतात, आणि कढणाऱ्या पदार्थांत हात घालावयास त्यांस कांहींच वाटत नाहीं. रानटी लोकांवर मोठाले शस्त्रप्रयोग करूं लागलें तर ते निमूटपणें करूं देतात. ह्यावरून त्यांना वेदनाच कमी होत असतील असें उघड दिसतें.

आतां हा गुण तरी रानटी लोकांस त्यांच्या परिस्थितीवरूनच प्राप्त झाला असला पाहिजे. त्यांच्यावर वारंवार संकटें येणार, आणि थंडीवारे तर नेहमींच सोसावे लागणार. तेव्हां ज्यांची कातडी इतकी टणक कीं

त्यांस असल्या वेदना भासूंच नयेत तेच ह्या जीवनार्थ-कलहांत दिकाव धरणार, आणि अशा रीतीनें त्यांचा हा तीक्ष्णसंवेदनाभाव वाढत जाणार, व हाडीं खिळणार.

आतां सुधारणा व्हावयाची तर संवेदना तीक्ष्ण पाहिजेत. कोणतीहि गोष्ट दुःखकारक म्हणून अंगाला झोंबली तरच ती सुधारावीशी वाटणार, आणि सुधारण्याचा यत्न हातून होणार. तेव्हां रानटी माणसाच्या संवेदना तीक्ष्ण नसतात हा त्यांच्या सुधारणेस आणखी एक अडथळा होय.

३०. ह्या शारीरिक विशेषांचें पुनः कथन करण्याच्यापूर्वी आणखी एक विशेष सांगितला पाहिजे; तो हा कीं, रानठी लोक लवकर वयांत येतात. इतर गोष्टी सारख्या असल्यास कमी उत्क्रान्त जीव पूर्णस्थितीतें अधिक लकर पावावे असा सामान्य नियमच आहे; तेव्हां हा नियम कमी सुधारलेल्या माणसांसहि लागू असलाच पाहिजे. हा भेद मेंदूच्या वाढीच्या भेदावर अवलंबून असावा. जेवढा मेंदू मोठा असेल तेवढा तो पूर्णत्वास येण्यास जीवशक्तींचा खर्च जास्त होत असला पाहिजे. आणि त्यामुळें शारीरिक पूर्णता प्राप्त होण्यास म्हणजे मनुष्य वयांत येण्यास, जास्त विलंब लागत असला पाहिजे. आतां वयांत माणूस लवकर आला म्हणजे उतारहि लवकरच पावूं लागतो. म्हणजे, पूर्ण उमेदीचा त्याचा काळ आंखूड होतो, आणि अशा रीतीनें त्याच्या सुधारणेस आणखी एक व्यत्यय येतो.

असो. अशा रीतीनें मूळ माणूस सुधारणेच्या पंथास लागण्यास किती अडचणी आल्या असल्या पाहिजेत,

त्या पहा. पहिली अडचण ही कीं तो सुधारलेल्या माणसापेक्षां लहान होता; व त्याचीं शस्त्रेंहि ओबडधोबडच होतीं. त्यामुळें शत्रूपासून रक्षण करण्यास आणि भक्ष्य मिळविण्यास त्यास पंचाईत पडे. शिवाय त्याचे खालचे अवयव आकारानें आणि रचनेनें कमी दर्जाचे असल्यामुळें त्यास शत्रूंपासून लवकर पळतां येत नसे, आणि भक्ष्य लवकर पकडतां येत नसे. हलक्या, अपक्व, घाणेरड्या, आणि अनियमित वेळीं मिळणाऱ्या अन्नाला थोभ्य असा त्याचा मोठा कोठा असल्यामुळें तो वागवण्यास त्यास जास्त शक्ति खर्च करावी लागत असून शिवाय त्यास त्यामुळें ज्ञानतंतूंची शक्तिहि अनियमित रीतीनें प्राप्त होत असे. शिवाय त्याच्या अंगीं संवेदनाभाव असे. यामुळें त्याच्या सुधारणेस जास्तच अडचण येई. अशा रीतीनें शारीरिक उणेपणामुळें उत्पन्न होणारे अडथळे तीन तऱ्हांचे असत. त्याची शरीररचना अडचणींशीं टक्कर देण्यास योग्य अशी नसे; त्याला लागणारा उत्साह कमी असून अनियमित असे; आणि त्याला जे त्रास भोगावे लागत ते त्यास इतके झोंबतहि नसत. त्याची परिस्थिति त्याच्या कह्यांत नसून ती कह्यांत आणण्याची त्यास उत्सुकताहि कमी असे. तात्पर्य, त्याच्या सुधारणेस अडथळे अत्यन्त असून ते काढण्याची शक्ति आणि तगादा हीं दोन्हीहि अत्यन्त कमी असत.

प्रकरण सहावें

मूळ माणसाचे मनोवृत्तिविशेष

३१. सजीव वस्तू उत्क्रान्त कितपत झाल्या आहेत हें ठरवणें असल्यास त्यांच्यामध्यें होणारे फेरफार आणि त्यांच्या परिस्थितींत होणारे फेरफार ह्यांच्यामध्यें आनुरूप्य कितपत उत्पन्न झालें आहे तें पहावें. उत्कट मनोवृत्ती ह्या साध्या मनोभावांच्या संयोगानें बनलेल्या असतात, किंवा कदाचित् त्या मनोभावांच्या ज्या कल्पना त्यांच्या संयोगानें बनलेल्या असतात. सबळ मनोवृत्ती दुर्बळ मनोवृत्तींच्या संयोगानें बनलेल्या असतात. ह्या मनोवृत्ती जशजशा संयुक्त होत जातील तसतशी काळ व स्थळ ह्यांच्या संबंधानें त्यांची व्याप्ति वाढत जाते. रानटी माणसाचा मालकीचा मनोभाव, त्याचें अन्नवस्त्र, त्याचीं हत्यारें, आणि त्याचें राहण्याचें घर ह्यांच्या पलीकडे फारसा जात नाहीं. तोच सुधारलेल्या माणसाचा किती तरी विस्तृत असतो पहा. त्याची एका देशांत जमीन असेल, दुसऱ्या देशांत पेढी असेल, तिसऱ्या देशीं त्यानें कर्ज दिलेलें असेल, आणि चवथ्या देशीं त्याचें हवा बदलण्याचें स्थान असेल. कालाच्या संबंधानें अशीच विस्तृतता उत्पन्न होते. रानटी माणसास आज खावयास मिळालें म्हणजे झालें; उद्यांची तो काळजी करीत नाहीं. तोच सुधारलेला माणूस नातवापणतवाची तरतूद करण्याची खटपट करीत असतो.

३२. हा सामान्य भेद झाला. पण मूळ माणूस मनोवृत्तींच्या संबंधानें कसा होता, हें सांगण्यास, तो शरीराच्या संबंधानें कसा होता हें सांगण्यास जितक्या अडचणी आल्या, तितक्याच आहेत. कारण मूळमाणसाचा अंदाज ज्या सध्यांच्या रानटी जातींवरून करावयाचा त्यांच्यांत मनोवृत्तींच्या संबंधानें पुष्कळ भेद आढळतात.

पण असे हे भेद आढळावयाचेच. कारण रानटी माणसाच्या निरनिराळ्या जाती निरनिराळ्या प्रकारच्या देशांत रहात असल्यामुळें त्यांच्या राहण्याहि निरनिराळ्या झाल्या आहेत, आणि त्यामुळें त्यांच्यामध्यें शरीरभेदांप्रमाणेंच मनोवृत्तिभेदहि उत्पन्न झालेले आहेत. शिवाय त्यांस सामाजिकाशिक्षण निरनिराळ्या तऱ्हांवर व निरनिराळ्या काळपर्यंत मिळालेलें आहे. त्यामुळें निरनिराळ्या सुधारलेल्या जातींत जसे अनेक भेद दृष्टीस पडतात, तसेच निरनिराळ्या रानटी जातींतहि दृष्टीस पडतात.

म्हणून मूळ माणूस मनोवृत्तींच्या संबंधानें कसा होता हें ह्या निरनिराळ्या प्रकारच्या पुराव्यांत जें सामान्य असेल त्यावरून ठरविलें पाहिजे; त्यांत अगदीं कनिष्ठ जातींबद्दलचा जो पुरावा त्यास विशेष महत्त्व दिलें पाहिजे; आणि रानटी व सुधारलेला माणूस ह्यांमध्यें प्रारंभीं जे सामान्य भेद सांगितले ते ध्यानांत राखिले पाहिजेत.

३३. ज्यास्त उत्क्रान्त माणसापेक्षां कमी उत्क्रान्त माणूस ज्यास्त लहरी असावा; पण हा गुण सर्वत्र दृष्टीस पडत नाहीं. एकंदरींनें पाहतां नव्या जगांतील रानटी लोक जुन्यांतील रानट्यांच्या मानानें थंडे दिसतात; आणि त्यांच्यापैकीं कांहींच्या ठिकाणीं आपल्या मनोवृत्तींस आ-

वरण घालण्याची शक्ति सुधारलेल्या माणसापेक्षांहि ज्यास्त दृष्टीस पडते. डाकोटा लोक शारीरिक व मानसिक दुःखें मुकाट्यानें सहन करितात. क्रीक लोक अगदीं सुस्त थंडेपणा व निष्काळजीपणा दाखवितात. ग्वायनामधील इंदियन लोक जरी प्रबळ प्रेमाचे असतात, तरी ते कधींहि रडतांना दिसत नाहींत; तर त्यांस अत्यन्त पिळवटणाऱ्या वेदना झाल्यास किंवा त्यांचें अत्यन्त जिव्हाळ्याचेंहि कोणीं मेल्यास ते अगदीं शांत रहातात. मेक्सिकन लोक, पेरूव्हियन लोक आणि मध्य अमेरिकन लोक ह्यांच्याबद्दलहि अशींच वर्णनें आढळतात. तथापि ह्या लोकांमध्यें ह्याच्या उलट प्रकारचे, व रानटी जातींस अधिक उचित असे गुण आढळतातच. डाकोटा लोक जरी नेहमीं थंडे असतात तरी रेडे मारीत असतां त्यांस अत्यन्त मोठा क्रोध येतो; आणि सुस्त स्वभावाच्या क्रीक लोकांत थोडक्याशा निराशेवरून आत्महत्या केल्याचीं उदाहरणें वरचेवर ऐकूं येतात. चिंकूक इंदियन लोक थोडक्यावरून चिडतात, किंवा थोड्यानें खुष होतात. तद्वतच ब्राझिलियन लोक इतके रागीट असतात कीं, त्यांजपैकीं एकाद्याचा रस्त्यांत जर एकाद्या दगडावर पाय आपटला तर त्यास तो कुत्र्याप्रमाणें चावावयास जातो.

ह्यावरून कित्येक अमेरिकन जातींत जो थंडेपणा दृष्टीस पडतो तो त्यांच्यामध्यें जीवटपणा कमी असल्यामुळेंच कदाचित् उत्पन्न होत असेल. त्यांच्यांत विषयवासना देखील कमी असते म्हणून म्हणतात तें जर खरें असेल तर ह्या अनुमानास जास्तच जोर येतो.

अमेरिकेंतील लोकांची स्थिति कशीहि असो. इतर

ठिकाणच्या जातींमंध्यें लहरीपणा सर्वत्र आढळतो. एशिया-खंडांतील कामसूचडिल लोक फार चिडखोर दिसतात. थोड्क्याशा कारणावरून ते वेडे होतात किंवा जीव देतात; किरगीझ लोक लहरी व अशाश्वत असतात. अरब लोकांचें सामान्य भाषण भांडणासारखें असतें. आफ्रिकेंतहि तीच स्थिति दृष्टीस पडते. डमारामधील लोक घटकेंत सूड घेण्यास तयार होतात, व घटकेंत गळ्यांत गळा घालतात. हाटेटांट लोक आतां अगदीं आळशी दिसले तर घटकेनें मोठ्या उद्योगांत दिसतील. बुशमेन लोक चलाख, उदार, हट्टी, आणि खुनशी असतात. थोडक्याशा कारणावरून त्यांच्यांत बापलेंक एकमेकांस मारावयास तयार होतात. फीजियन, फ्यूजियन आणि टास्मेनियन लोकांमध्यें अशीच स्थिति दृष्टीस पडते.

रानटी लोकांचा असा स्वभाव असेल हें सुधारलेल्या माणसांतील मुलें आणि मोठीं माणसें ह्यांच्यांतील भेदावरूनहि व्यक्त होतें. रानटी माणसाचें मन मुलासारखें असतें आणि त्याचे राग लोभ मोठ्या माणसासारखे असतात असें जें म्हणतात त्यावरूनच हें स्पष्ट होतें. आणि उत्क्रान्तितत्त्व जर खरें असेल तर असें असलेंच पाहिजे. म्हणजे, मनुष्यजाति सुधारतां सुधारतां जे निरनिराळे गुणधर्म तिजमध्यें क्रमाक्रमानें आलेले असतील ते सुधारलेला माणूस लहानाचा मोठा होत असतां त्याच्यामध्येंहि क्रमाक्रमानें दिसले पाहिजेत.

२४. मूळ माणसामध्यें ज्या विशिष्ट मनोवृत्ती दृष्टीस पडतात त्या ह्या सामान्य वृत्तींचींच निरनिराळीं उदाहरणें होत. त्याच्यामध्यें जो हा लहरीपणा दृष्टीस पडतो,

कोणतीहि गोष्ट मनांत आली असतां तिचा पुनः विचार करण्याच्या शक्तीचा जो हा अभाव दृष्टीस पडतो, त्याच्याबरोबर दूरदर्शीपणाचा किंवा शहाणपणाचा अभाव हाही येतो.

आस्ट्रेलियन लोकांस पुढें मिळणाऱ्या फळासाठीं सारखे श्रम करतां येत नाहींत. बुशमेन लोक एक चंगाळी करीत असतील किंवा उपास काढीत राहतील. किरगीझ लोक, भील लोक, सांथाळ लोक, हे सर्व आळशी आहेत. त्यांना पुढची काळजीच दिसत नाहीं. ह्या गुणाबरोबर किंवा दुर्गुणाबरोबर आणखी एक विशेष दृष्टीस पडतो. तो हा कीं रानटी लोक नेहमीं आनंदी असतात. फीजिन, ताहीतियन, न्यूझीलंडर, इत्यादि लोकांविषयीं आपण अशीं वर्णनें ऐकतों कीं ते नेहमीं हंसत असतात आणि थट्टा करीत असतात. नीग्रो लोकांमध्यें तोच स्वभाव दृष्टीस पडतो. ते नेहमीं हंसत खेळत असतात. आनंदी पण निष्काळजी आयरिश लोक, आणि गंभीर पण उद्योगी स्काट लोक ह्यांच्यांतील भेद ध्यानांत आणिला म्हणजे पहिल्या दोन गुणांचें साहचर्य रानटी लोकांत कसें असतें तें ध्यानांत येणार आहे.

पुढंच्याबद्दल निष्काळजीपणाबरोबरच दुसरा एक विशेष रानटी लोकांत आढळत असतो; तो हा कीं मालकीचा मनोभाव त्यांच्यामध्यें चांगला वाढलेला नसतो. वर सांगितल्याप्रमाणें, खाण्याचे पदार्थ आणि लेण्याचे पदार्थ, ह्यांच्या पलीकडे त्यांस फारशी काळजी नसते. रानटी माणूस जेव्हां धनगरी स्थितीस चढतो, म्हणजे मेंढरें वगैरे बाळगून त्यांजवर निर्वाह करूं लागतो, तेव्हां हा

मालकीचा मनोभाव त्याच्या ठिकाणीं प्रथम वृद्धिंपावतो; कारण गुरांढोरांची संख्या जास्त झाल्यानें आपला फायदा होतो हें त्यावेळीं त्याच्या अनुभवास येऊं लागतें. तथापि चाऱ्याचा पुरवठा कमी झाला म्हणजे जनावरांची संख्या कमी होऊं लागते, आणखी रानटी श्वापदें व शत्रू यांचे त्यांजवर हल्ले येत असतातच. म्हणून मालकीचा मनोभाव फारसा वाढत नाहीं. पुढें जेव्हां त्यास शेतकऱ्याची स्थिति येते, आणि गांवशेतकीवरून कुटुंबशेतकीवर, आणि कुटुंबशेतकीवरून स्वतःच्या शेतकीवर माणूस येतो, तेव्हांच हा मनोभाव चांगला विकास पावतो.

तात्पर्य, रानटी माणसामध्यें दूरदर्शीपणाचा अभाव असल्यामुळें, आणि दूरदर्शीपणा आणून देणारा जो मालकीचा मनोभाव तो न्यून असल्यामुळें, हा मनोभाव वाढविणारे, आणि अदूरदर्शीपणा कमी करणारे, असे अनुभव त्यास प्राप्त होण्यास पंचाईत पडते.

३५. आतां समाज बनण्याशीं ज्या मनोवृत्तींचा प्रत्यक्ष संबंध येतो त्यांचा विचार करूं. निरनिराळ्या मनुष्यजाती निरनिराळ्या प्रमाणानें समाजशील असतात, आणि शिवाय त्यांपैकीं कांहीं नियंत्रणक्षम असतात आणि कांहीं अक्षम असतात. तेव्हां हे दोन गुण ज्या मानानें विशिष्ट लोकांमध्यें असतील त्या मानानें त्यांच्यांत सामाजिक समूह बनत असले पाहिजेत.

मलायाच्या द्वीपकल्पांतील जे मंत्र नांवाचे मूळ लोक त्यांबद्दल बोरियन साहेब असें म्हणतो कीं स्वातंत्र्य हें त्यांच्या जीवितास अत्यन्त आवश्यक दिसतें; ह्यांच्यांतील प्रत्येक माणूस जगांत दुसरें कोणीच नाहीं अशा धर्तीवर

रहातो; त्यांच्यांत भांडण झाल्याबरोबर ते लागलेच पृथक् होतात. बोर्निओमधील रानटी ठीक एकमेकांच्या सहवासांत राहत नाहींत; आणि त्यांचीं मुलें मोठीं झाल्याबरोबर लागलींच पृथक् होतात, व नंतर एकमेकांबद्दल मुळींच काळजी करीत नाहींत. त्याच स्वभावामुळें वेड्डा लोकांचीं कुटुंबें एकलकोंडीं राहतात. ब्राझीलमधील इंदियन लोक आणि कारीब लोक अशाच तऱ्हेचे आहेत. कांहीं भटकणाऱ्या जातींमध्येंहि हाच विशेष दृष्टीस पडतो. बिडुइन लोकांबद्दल बर्कहार्ट असें म्हणतो कीं ते हुकूम कधीं मानावयाचे नाहींत; मात्र त्यांची मनवळवणी केल्यास ते लागलेच वश होतील. याच्या उलट कामसूचाडेल लोक त्यांस जे क्रूर रीतीनें वागवतील त्यांच्याशीं नमून वागतात; आणि त्यांना जे गोडीगुलाबीनें वागवतील त्यांचा तिरस्कार करितात. इकडे डमारामधील लोक स्वातंत्र्येच्छू मुळींच नसून उलट ते दास्याची अपेक्षा करितात; भीति आणि स्तुति हेच त्यांचे जाडे मनोविकार होत. तात्पर्य, समाजसुधारणा होण्यास आज्ञापालनानुकूल मनोवृत्ती आणि विरोधानुकूल मनोवृत्ती ह्यांजमध्यें कांहीं विशिष्ट प्रमाण असलें पाहिजे. उदाहरणार्थ, माले लोकांनीं कांहीं अर्धवट सुधारलेले समाज बनविलेले आहेत; ते अधिकाऱ्यांचे हुकूम मानितात; पण त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यांत कोणी हात घातल्यास तें त्यांस खपत नाहीं. विषुववृत्तासभोंवतालच्या आफ्रिकेंतील कांहीं लोकांनीं असेच समाज बनविलेले आहेत, व त्यांजमध्यें असलेच गुण दृष्टीस पडतात.

पण मंत्र लोकांच्या संबंधानें सांगितल्याप्रमाणें एकादे

लोक जर नियंत्रण करून घेण्यास तयार नसतील, आणखी पुनः एकलकोंडे असतील, तर त्यांजमध्यें समाज वनण्यास दुप्पट अडचण पडते. टोडा लोकांप्रमाणें माणसें जर तासच्या त्रास कांहीं न करतां कोणाशीं न बोलतां वसूं शकत असलीं, तर तीं समाजबंधनास कधीं कबूल व्हावयाचीं नाहींत. उलट पक्षीं फीजियन लोक इतके क्रूर आहेत तरी त्यांजमध्यें स्नेहभावाची मनोवृत्ति फार प्रवळ असल्यामुळें ते जुलमास देखील कबूल होतात.

सारांश, मूळ माणसें त्यांच्यांत जीवनकलांची वृद्धि मुळींच झाली नसल्यामुळें एका पक्षीं थोडीं थोडीं मिळून अंतराअंतरावर राहत आणि रानटी अन्नावर काळक्रमणा करीत; त्यामुळें त्यांस एकत्र राहण्याची फारशी संवय नसे; आणि दुसऱ्या पक्षीं कोणतीहि इच्छा झाल्याबरोबर ती एकदम पुरी करण्याची त्यांस संवय लागलेली असे. ही त्यांच्यामध्यें सामाजिक उत्क्रमण उत्पन्न होण्यास आणखी एक अडचण असे.

३६. इतका वेळ आत्मविषयक मनोवृत्तींचा विचार केला; आतां अन्यविषयक मनोवृत्तींचा विचार करूं. पण तो करण्यापूर्वी कांहीं मनोवृत्ती आत्मान्यविषयक (.अर्धवट आत्मविषयक व अर्धवट अन्यविषयक) आहेत त्यांचा विचार करणें योग्य दिसतें. दुसऱ्याच्या सुखानें समाधान पावण्याचे मनोविकार बऱ्याच अंशांनीं उत्पन्न होण्यापूर्वी दुसऱ्यानें केलेल्या वाखाणणीपासून समाधान पावण्याचे मनोविकार बऱ्याच अंशांनीं उत्पन्न होत असतात. कोणतेंहि कृत्य केल्याबद्दल टाळी मिळाल्यास जनावरें देखील संतुष्ट झालेलीं दिसतात; आणि माणसें

एकत्र राहूं लागलीं म्हणजे त्यांस असल्या सुखाचे प्रसंग वरचेवर येऊं लागतात.

सुधारलेल्या लोकांमध्यें स्तुतिप्रियता जरी पुष्कळ असते, तरी असुधारलेल्यांमध्यें त्यापेक्षांहि ज्यास्त असते. तांवडा रंग आणि शिंपल्याच्या माळा हीं अगदीं जुन्या काळचे जे माणसाचे सांगाडे सांपडतात त्यांबरोबर दृग्गोचर होतात. त्यावरून त्यावेळीं देखील आपणास सुशोभित करून वाखाणणी करून घेण्याची इच्छा माणसामध्यें होती असें स्पष्ट दिसतें. रानटी माणसें कपडे निघण्यापूर्वी अंगें रंगवीत असत, यावरून देखील तेंच दिसतें. अंगें गोंदून घेण्याची जी रानट्यांमध्यें चाल आहे ती त्याचीच दर्शक आहे.

रानटी लोकांचें वर्तनहि याच मनोवृत्तीच्या धोरणानें होत असतें. सूड उगविण्याची चाल यावरूनच पडलेली आहे. लग्नाच्या व मर्तिकाच्या संबंधानें पुष्कळ खर्च करण्याच्या चालीचें बीज हेंच होय. मुली मारण्याची चाल पुढें त्यांच्या लग्नाच्या वेळीं योग्य खर्च करतां येणार नाहीं ह्यावरून पडली होती.

ही आत्मान्यपर मनोवृत्ति समाज वाढत असतां माणसांना बंधन घालण्याच्या कामीं फार उपयोगाची असते. राजकीय बंधनें उत्पन्न होण्याच्या पूर्वी बहुधा हिचेंच बंधन समाजावर असावें. यासंबंधानें वॉलेस साहेब असें म्हणतो कीं आपण दक्षिण अमेरिकेंत आणि एशियाखंडांत पुष्कळ रानटी लोक असे पाहिले आहेत कीं त्यांजवर लोकमताखेरीज दुसरें कशाचेंच बंधन नव्हतें. त्यांच्यांतील प्रत्येकजण इतरांच्या हक्कांचें मोठ्या काळ-

जीपूर्वक पालन करीत असे, व सर्वांचा दर्जा बहुतेक सारखाच असे.

२७. आतां अन्यविषयक मनोवृत्तींकडे वळूं. सहानुभूति हें ह्या मनोवृत्तींचें बीज असल्यामुळें ती ज्या मानानें जास्त जास्त होत जाईल त्या मानानेंच ह्या वाढणार आहेत. म्हणजे ज्या मानानें कुटुंबसंबंध वाढत जातील, आणि समाजशीलता वाढत जाईल, आणि इतरांच्या हक्कांचें अतिक्रमण कमी होत जाईल, त्या मानानेंच ह्या मनोवृत्ती वृद्धिंगत होणार आहेत.

पण ह्याबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा मिळण्यास पंचाईत पडते. ह्याचें एक कारण असें कीं निरनिराळे लोक आपल्या स्वभावांचें आविष्करण निरनिराळ्या रीतींनीं करितात. दुसरें कारण हें कीं हे लोक सगळ्याच प्रवाशांशीं सारख्याच रीतींनीं वागत नाहींत; ह्याचें कारण ह्या लोकांशीं सगळ्यांचेंच वर्तन सारखें नसतें. तिसरें कारण रानटी लोक लहरी असतात हें होय.

म्हणून अन्यविषयक मनोवृत्तींशीं साहचर्यानें असणारा जो आईबापांची मुलांवर माया हा मनोविकार त्याचा प्रथम विचार करूं. हा मनोविकार कनिष्ठ प्राण्यांप्रमाणें कनिष्ठ माणसांमध्येंहि फार असतो; व तसा तो असणें हें जरूरीचेंच आहे. कारण रानटी स्थितींत ज्या माणसांमध्यें हा मनोविकार सर्वांत जास्त असेल त्यांचीच संतति मागें राहण्याचा संभव असतो. पण रानटी लोक लहरी असल्यामुळें ते आपल्या संततीस कधीं कधीं फार क्रूरतेनेंहि वागवतात. उदाहरणार्थ, फ्यूजियन लोक आपल्या पोरांवर इतकी ममता करीत असूनहि त्यांस

कधीं कधीं शेजारच्या पाटागोनियन लोकांस गुलाम म्हणून विकण्यास ते कमी करीत नाहीत. सदर्हूप्रमाणेंच टास्मेनियन लोक बालवध करण्यास कांकूं करीत नाहींत; आणि आस्ट्रेलियन लोक आजारी पोरांस टाकून जातात. ह्याच माणसांचीं दुसरीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात.

ह्यावरून रानटी लोक इतरांशींहि कधीं कधीं दयाळूपणानें आणि कधीं कधीं क्रूरपणानें कां वागतात हें ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, फ्यूजियन लोक एकमेकांस मायाळूपणानें वागवूनहि आपल्यांतील वृद्ध स्त्रियांस खाण्यासाठीं ठार करितात. आस्ट्रेलियन लोक व बुशमेन हे अतिशय दयाळू असूनहि ते अतिशय क्रूर असल्याबद्दल पुरावा सांपडतो. पण ह्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या जातींकडे पाहतां त्या सुस्वभावी असल्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, न्यूक्यालिडोनियन लोक फार गरीब आहेत म्हणून सांगतात. टानीज लोक होईल तो उपकार करण्यास तयार असतात. तद्वतच सांडविच बेटांतील लोक, ताहितियन लोक, डायाक लोक, आणि जाव्हा बेटांतील लोक आनंदी, सुस्वभावी, मंडळींतले, अशा प्रकारचे असल्याचीं वर्णनें आढळतात. आतां ह्याच्या उलट वर्णनेंहि नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ ब्राझिलियन लोक पक्के खुनशी असतात म्हणून सांगतात. जनावर पकडलें म्हणजे त्यास ते लहान लहान जखमा करून मारतात, असें कीं त्यास होईल तितका जास्त त्रास द्यावा. फिजियन लोक, डामारा लोक, वगैरे असेच क्रूर असल्याबद्दल वर्णनें आहेत. कधीं कधीं शेजारच्या टोळ्यांमध्यें देखील विरुद्ध स्वभाव दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, भील

लोक क्रूर असून त्यांच्यां शेजारचे नागलोक सुस्वभावी असल्याबद्दल वर्णनें सांपडतात.

एकंदरींत असें आढळून येतें कीं विनाकारण क्रूरपणा हा अत्यन्त कमी सुधारलेल्या लोकांमध्यें सामान्य नसून जास्त सुधारलेल्यांमध्येंच सामान्य दिसतो. क्रूर असे जे फीजियन लोक ते बरेच सुधारलेले आहेत. तद्वतच या रानटी लोकांमध्यें जो चांगलेपणा दिसतो तो प्रत्यक्षापेक्षां अप्रत्यक्षच जास्त असतो; म्हणजे त्यांच्यामध्यें चांगले गुण फारसे असतात असें नाहीं, तर वाईट गुणांचा अभाव असतो.

तथापि अन्यविषयक मनोवृत्तींची वाढ एकाद्या लोकांमध्यें किती झाली आहे हें पहाणें असल्यास ते आपल्या स्त्रियांस कसें वागवितात तें पाहावें; आणि ह्या दृष्टीनें पाहतां रानटी लोकांना अनुकूल असा पुरावा मिळत नाहीं. रानटी लोकांमध्यें स्त्रियांस क्रूरपणानें वागवणारेच पुरुष फार सांपडतात; आणि कांहीं रानटी लोक एरवीं कितीहि चांगले असले तरी त्यांच्या वर्तणुकींत स्त्रियांच्या संबंधानें कनवाळूपणा दृष्टीस पडत नाहीं. रानटी लोकांमध्यें स्त्रिया गुलाम असतात इतकेंच नाहीं, तर ती स्थिति प्रत्यक्ष स्त्रियांसहि मान्य असते; ह्यावरून अन्यविषयक किंवा परोपकाराची मनोवृत्ति त्यांजमध्यें अल्पच असते हें उघड होतें.

३८. आतां ह्या एकंदर मनोवृत्तींची गोळाबेरीज सांगण्याच्यापूर्वी ह्या सगळ्यांना लागू अशा एका मनोवृत्तीचें कथन केलें पाहिजे; ती संवयीची दृढता ही होय. मूळ माणूस फारच पुराणप्रिय असतो. कोणत्याहि समाजाकडे पाहिलें

तरी त्यांत असें दिसून येतें कीं त्यामध्यें जे लोक कमींत कमी सुसंस्कृत असतील ते सुधारणा करून घेण्यास अत्यन्त नाखुष असतात. सामान्य लोकांमध्यें एकाद्दी सोईची पद्धति देखील सुरू करण्याची पंचाईत पडते; आणि त्यांना एकादें नवीन खाद्य देखील नकोसें वाटतें. असुधारलेल्यांमध्यें हीं लक्षणें जास्तच जाड्या प्रमाणावर दृष्टीस पडतात. त्यांचें साधें ज्ञानतंतुजाल जास्त लवकर निगरगट्ट होऊन गेल्यामुळें त्यांस नवी क्रियापद्धति ग्रहण करण्याचें सामर्थ्य जास्त कमी असतें. म्हणून जें रूढ असेल त्यांस ते वळकट चिकटून राहतात.

असो. ह्या संवयीच्या दृढतेमुळें जास्तच ढळढळीत दिसणारे जे रानटी माणसाचे मनोविकारविशेष त्यांचें आतां पुनः कथन करूं. त्यांमध्यें लहरीपणा हा प्रथम येतो, आणि तो मूळ माणसांमध्यें फार भरलेला असल्यामुळें त्यांच्या हातून एकविचारानें कोणतेंही काम होण्यास फार मुष्कील पडते. त्यांचा स्वभाव लहरी आणि अस्थिर असल्यामुळें त्यांच्या शब्दावर विश्वास टाकण्यास पंचाईत पडते; आणि त्यांची सुधारणा होत नाहीं; कारण सुधारणेस एकमेकांचा भरंवसा लागत असतो.

ह्यापासून उत्पन्न होणारा दुसरा एक विशेष गुण म्हटला म्हणजे रानट्याचा अदूरदर्शीपणा हा होय. त्यास कोणतीहि इच्छा उत्पन्न झाली म्हणजे ती तो लागलीच तृप्त करून घेतो, मग ती आपल्याबद्दल असो किंवा इतरांबद्दल असो; त्यास पुढच्या अनिष्टाची भीति वाटत नाहीं; तद्वतच पुढच्या सुखदुःखाची त्यास योग्य कल्पना होत नसल्यामुळें त्याला मेहनत करावीसें वाटत ना-

हीं. समाजशीलताहि रानटी माणसांत कमी अस-ते. अगदीं हलक्या दर्जाच्या रानट्यांमध्यें समूह लहान असतात, व त्यांतील व्यक्तींस एकत्र ठेवणारीं बंधनेंहि दुर्बल असतात. त्यांचा स्वमनोविकारांवर दाब नसल्या-मुळें ते एकमेकांपासून पृथक् होण्याचा संभव नेहमीं अ-सतो; आणि त्यांच्यामध्यें एकत्र राहण्याची इच्छा अल्प असते. नंतर मग रानट्यांमध्यें कांहींशी सुधारणा झाली म्हणजे स्तुतीची आवड हा उच्चतर मनोविकारां-पैकीं जो अगदीं साधा मनोविकार तो प्रथम उत्पन्न हो-तो. त्याच्या रानटी सोबत्यांनीं त्याची कृति पसंत केली असतां त्याचा जो एकदम मोठा फायदा होतो, आणि त्यांचा त्याच्यावर रोष झालां असतां त्याचें जें मोठें नुकसान होतें, त्याच्या योगानें या मनोविकारास प्राब-ल्य येतें. आणि तेणेंकरून टोळीच्या मताप्रमाणें तो कां-हींसा वागूं लागतो, आणि अशा रीतीनें राजसत्तेचें बी-जहि उत्पन्न होण्याच्या पूर्वीच त्याच्या वर्तनास कांहीं बंधन उत्पन्न होतें. समाजबंधन उत्पन्न झालें म्ह-णजे जरी सहानुभूतीस साहाय्य होतें, तरी रानटी माण-साची रोजची कृति ह्या मनोवृत्तीस दाबून टाकीत अस-तें. इतरांच्याबद्दलचा कळवळा त्याजमध्यें जागृत नसतो; आणि ही गोष्ट स्त्रियांशीं जें रानट्यांचें वर्तन होत अ-सते त्यावरून स्पष्ट दिसते. वरें, अन्यविषयक मनोवृ-त्तीचा उच्चतर प्रकार जी न्यायबुद्धि तीहि त्यांजमध्यें फारच अल्प उत्पन्न झालेली असते.

रानट्याच्या ठिकाणीं हे मनोवृत्तिविशेष असे असतात यांत नवल नाहीं; कारण सुधारलेल्या माणसाच्या माना-

नें रानट्याच्या अंतःकरणाचा पारिस्थितीशीं कमी विस्तृत व कमी विविध असा मेळ बसलेला असतो, त्याच्या मनाला कोणत्याहि अनुभवलेल्या गोष्टीची योग्य कल्पना होत नाहीं, आणि त्याच्या एकंदर कृती स्वाभाविक क्रियांपासून फारशा भिन्न नसतात. लहरीपणाचा अर्थ असा कीं कोणताहि एक मनोविकार मनांत उत्पन्न झाला म्हणजे तो त्याची स्वाभाविक कृति लागलीच घडवून आणतो; विरुद्ध मनोविकारांचा तो मुळींच विचार करीत नाहीं, कारण ते त्याच्या मनापुढें योग्य रीतीनें उभे राहत नाहींत. सारांश भावी किंवा इतरत्र होणाऱ्या परिणामांचा त्यास विचार करतां येत नाहीं. लहरी स्वभावाबरोबर उत्पन्न होणाऱ्या अदूरदर्शीपणाची गोष्ट अशीच आहे. तात्कालिक इच्छा तेवढी तृप्त करून घ्यावीशी वाटते; पुढच्या गरजा लक्षांत येत नाहींत. स्तुतिप्रियता उत्पन्न झाली म्हणजे मग पुढच्या गोष्टी मनांत आणण्याची थोडीशी शक्ति उत्पन्न झाली म्हणून समजावें. तरी पण सुधारलेल्या माणसाच्या अन्यविषयक मनोवृत्तींच्या मानानें ही स्वान्यपर मनोवृत्ति कमी दर्जाचीच असते; आणि त्यामुळें त्याच्यामध्यें परोपकारबुद्धि आणि केवळ कर्तव्यबुद्धि ह्यांची वाण असते.

प्रकरण सातवें

मूळ माणसाचे बुद्धिविषयक विशेष

३९. सामान्य गोष्टींच्या कल्पना विशेष गोष्टींच्या अनुभवांपासून उत्पन्न होत असल्यामुळें, आणि त्यामुळें त्यांची उत्पत्ति अर्थात् अनुभवानंतर होत असल्यामुळें, मूळ माणसांत त्यांची वाण असते. एकाद्या विशेष सत्याचें ज्ञान उत्पन्न होण्यास बाह्यस्थिति व अंतःस्थिति ह्यांचा जितका मेळ असावा लागतो त्यापेक्षां सामान्य सत्याचें ज्ञान होण्यास जास्त विविध असावा लागतो; शिवाय मनापुढें कल्पना मांडण्याची शक्तिहि माणसास जास्त असावी लागते, कारण त्या कल्पना जास्त विविध व जास्त विपुल असतात; आणि ही ज्ञानवत्ता मनाच्या स्वाभाविक व्यापारांपासून जास्त भिन्न असते; इतकेंचसें काय, तर तेवढ्यावरूनच कोणत्याहि व्यापाराची उत्पत्तिच होणार नाहीं. मूळ माणसापाशीं पूर्वींचे लेख नसल्यामुळें त्याच्या लक्षांत लांबवरचे परिणाम येत नाहींत. म्हणून काळाच्या संबंधाचा जो मेळ तो असल्या माणसाच्या ठिकाणीं फार अल्प असतो. त्याला आपल्या मनापुढें फार थोड्या क्रमिक चमत्कारांची कल्पना मांडतां येते; आणि तेहि व्यापक नसतात. या माणसास आपल्या गांवापलीकडची माहिती नसल्यामुळें त्याच्या कल्पना बदलण्याचा संभव फारच अल्प असतो. पुढें त्याचे अनुभव जसे वाढत जातील, तशा त्याच्या मूळ कल्पना बदलूं लागून विस्तृत होऊं लागतात.

रानटी माणसाची स्थिति अशी सर्वतोबद्ध असल्यामुळें त्याच्या मनांत तात्त्विक किंवा अमूर्त कल्पना मुळींच नसतात. कारण असल्या कल्पना पुष्कळ मूर्त कल्पनांमधील परस्परभिन्नभाग काढून टाकून त्यांच्यांत सामान्य काय आहे तें पाहून त्याच्या बनवाव्या लागत असतात. हें होण्यास बाह्य व अंतःस्थिति ह्यांचा मेळ जास्तच विविध झाला पाहिजे; मनापुढें कल्पना मांडण्याची शक्ति जास्तच वाढली पाहिजे, आणि स्वाभाविक क्रियांपासून हा व्यापार जास्तच भिन्न असला पाहिजे. सामान्य गुणधर्म आणि सामान्य कारण ह्या कल्पना तर ह्याच्याहि मागून उत्पन्न होतात; कारण त्याहि विशेष गुणधर्म आणि विशेष कारणें ह्यांच्यावरूनच निघावयाच्या.

विशिष्ट कारणापासून विशिष्ट कार्याचीच उत्पत्ति नेहमीं होते हा जो सार्वत्रिक नियम त्याची कल्पना ह्या बरोबरच येऊं लागते. बरें, ही कल्पना बरीच दृढ होईतोंपर्यंत विचारास फारसा निश्चितपणा येत नाहीं. आणि निरनिराळ्या पदार्थांमध्यें किंवा वर्णन आणि वस्तुस्थिति ह्यांमध्यें, किंवा भविष्य आणि त्याची पूर्ति ह्यांमध्यें पूर्ण मेळ असल्याबद्दलचे बरेचसे अनुभव आल्याशिवाय सत्याची कल्पना मनांत स्पष्टपणें उमटत नाहीं.

बरें, सत्य आणि असत्य ह्यांच्या कल्पना बऱ्याचशा स्पष्ट झाल्याविना संशयबुद्धि आणि गुणदोषविवेचनशक्ति ह्या उत्पन्न होत नाहींत. म्हणून रानटी मनुष्य भोळा व सरळ असतो. शेवटची गोष्ट ही कीं मूळ माणसाची जी कल्पनाशक्ति ती रचनात्मक नसून केवळ स्मरणात्मक असते. कारण तशी शक्ति उत्पन्न होण्यास प्र-

त्यक्ष गोष्टींपासून निराळ्या अप्रत्यक्ष गोष्टींकडे मनाची धांव जावी लागते; आणि असें होण्यास तर वरील तीन गोष्टी (मेळ, मांडणी आणि भिन्नता) जास्तच जाड्या प्रमाणावर असाव्या लागतात.

बुद्धिविषयक उत्क्रान्तीच्या ह्या निरनिराळ्या पायऱ्या ध्यानांत ठेवून त्यांच्या आधारानें रानटी माणसाच्या इतर इंद्रियांचीं वर्णनें आतां आपण पाहूं या.

४०. रानट्यांचीं ज्ञानेंद्रियें तीक्ष्ण असतात आणि त्याची पाहणी चलाख असते. उदाहरणार्थ, बुशमेन लोकांची दृष्टि दूरवर पोहोंचते. क्यारेन लोकांना, आपल्याला जितकें नाटकाच्या दुर्बिणीनें दिसतें तितकें नुसत्या डोळ्यांनीं दिसतें. सैबीरियन लोकांचीहि दृष्टि दूरवर पोहोंचणारी व पूर्ण असल्याबद्दल वर्णनें आढळतात. ब्राझिलियन लोकांचे डोळ्याप्रमाणें कानहि तीक्ष्ण असतात. आपणास न दिसणाऱ्या वस्तू त्यांस दिसतात, व न ऐकूं येणाऱ्या ऐकूं येतात.

रानटी लोक जलद व बारीक पाहणारे असतात. ह्याबद्दल ह्याच्यापेक्षांहि जास्त पुरावा सांपडतो. बेडुइन लोक उत्कृष्ट वरवर पाहणारे असतात असें पालग्रेव्ह म्हणतो. दक्षिण आफ्रिकेंत हाटेटांट लोक गुरांची विलक्षण ओळख धरितात. अमेरिकेंतहि अशीच स्थिति आहे. मित वस्तू वरचेवर व बारीक रीतीनें पाहिल्यामुळें इंदियन लोकांची दर्शनशक्ति फारच वाढलेली असते असें बर्टन म्हणतो. आरावाक लोकांबद्दल हिल्हौस् असें म्हणतो कीं, ज्या ठिकाणीं युरोपियनास कांहीं चिन्ह दिसत नाहीं, अशा ठिकाणीं ह्या लोकांपैकीं एकादा नीग्रोलो-

कोंचीं कितीतरी पावलें दाखवील, आणि ते त्या मार्गानें अमुकच दिवशीं गेले होते म्हणून सांगेल. ज्या ठिकाणीं परकी माणसास रस्त्यावर केवळ अस्पष्ट खुणा दिसतात त्या ठिकाणीं ग्वायना टोळींतील माणूस तेथून किती पुरुष, बायका व मुलें गेलीं असतील हें सांगेल. पावलें ओळखून काढण्यास गेलेला एक ग्वायनांतील माणूस असें म्हणेल कीं, ह्या ठिकाणचीं पावलें आमच्या गांवापैकीं कोणाचींहि नाहींत. तात्पर्य, त्यांची ही शक्ति कांहीं विलक्षण आहे.

ह्या तीक्ष्णदर्शनाबरोबरच ह्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यापारांमध्यें हे लोक मोठे तरबेज झालेले असतात. एस्किमो लोक सर्व प्रकारच्या हातकामांत. फार कुशल असतात. कालवेन म्हणतो कीं हाट्टेटांट लोक हत्याराचा उपयोग करण्याच्या कामांत फार चतुर असतात. आंदामानमधले लोक चाळीस किंवा पन्नास यार्डांवरून अचूक बाण मारितात. टांगन लोक आपल्या होड्या मोठ्या हुशारीनें चालवितात. आस्ट्रेलियन लोक उत्कृष्ट भालेगार असतात. सांथाळ लोक नेम इतका अचूक धरितात कीं, ते उडाल्या पक्ष्यास आणि धांवत्या सशास खालीं आणितात.

पण अशा रीतीनें ह्या लोकांमध्यें ह्या साध्या शक्तींची वाढ फार झाल्यामुळें त्यांच्यापेक्षां वरिष्ठ शक्तींची वाढ होण्यास प्रत्यवाय येतो. अविश्रांत पाहणीच्या कामीं मानसिक शक्तींचा जसा जास्त खर्च होईल त्या मानानें स्वस्थ विचार करण्याच्या कामीं कमी खर्च होतो. ह्याच गोष्टीचा आतां आपण एका निराळ्या दृष्टीनें विचार करूं.

४१. चांगलें वाईट निवडण्याचीं इंद्रियें नसल्यामुळें

किडा सांपडेल तें खातो, आणि त्यांत जें कांहीं पोषक असेल तेवढें ठेवून घेण्याचें आणि बाकी शेंकडा ९५ अंश टाकून देण्याचें काम आपल्या पोषक नळीवर (पोटावर) लादतो. उलट पक्षीं त्याच्यापेक्षां जास्त उच्च प्रतीचा कोळ्यासारखा किंवा मधमाशीसारखा प्राणी अनुक्रमें पकडलेल्या माशींतून व फुलांतून पोषक तेवढेच रस चोखून घेतो. मणक्याच्या प्राण्यांमध्येंहि जसजशी जास्त बुद्धि असेल तसतशी अन्नाची निवड करण्याची शक्ति जास्त जास्त दिसून येते. वनस्पतिभक्षक जनावरें जेव्हां पुष्कळ गवतपाला खातील तेव्हां त्यांस जरूर तेवढें पोषक अन्न त्यापासून प्राप्त होतें; पण मांसभक्षक जनावरें बहुतेक फार शहाणीं असल्यामुळें ज्याच्यांत पोषक भाग पुष्कळ असेंच्च मांसरूपी अन्न तीं खातात. वानर आणि हत्ती हे प्राणी जरी वनस्पतिभक्षक आहेत तरी पहिला साधेल तेव्हां खात्रीपूर्वक आणि दुसरा बहुतकरून वनस्पतींतील पोषक भागांची निवड करीत असतो. माणसाच्या अन्नांत पोषक भाग सर्वांतच जास्त असतो; पण त्यांतल्या त्यांत अमुधारलेला माणूस सुधारलेल्या इतकी अन्नाची बारीक निवड करीत नाहीं.

ह्या इतक्या गोष्टी एथें सांगण्याचा हेतू इतकाच कीं शरीरपोषण आणि मनःपोषण ह्यांच्या वाढीमध्यें एकप्रकारचा सारखवटपणा आहे हें वाचकांच्या लक्षांत आणून द्यावयाचें. शारीरिकदृष्टया उच्चतर प्राण्याप्रमाणें मानसिकदृष्टया उच्चतर प्राण्याच्या अंगीं ग्रहण करण्यास योग्य अशीं द्रव्यें निवडण्याची शक्ति जास्त असते. ज्याप्रमाणें श्रेष्ठ प्राणी वास, देखावा, रचना, यांच्यावरून अन्नाची निवड क-

रिते, आणि ज्याच्यांत पोषक भाग फार असेल तेंच अन्न खातां, त्याप्रमाणें श्रेष्ठ मनाचा माणूस जणू काय बुद्धिविषयक घ्राणेंद्रियाचा उपयोग करून ध्यानांत येत गविण्यास अयोग्य अशा अनेक गोष्टी टाकून देऊन झटदिशीं महत्त्वाच्या गोष्टी तेवढ्या उमगून काढितो, आणि त्यांतून महत्त्वाचीं सत्यें निष्पन्न करण्यासाठीं त्या आंत घेतो. इकडे कमी सुसंस्कृत झालेलीं जीं मनें असतील त्यांना ह्या संमिश्र गोष्टींचें सेवन करून त्यांच्या घटकावयवांचें ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळं, आणि म्हणून त्यांना असल्या गोष्टींची भूक नसल्यामुळें, बहुतेक निष्कमतीच्या अशा गोष्टींचेंच यथेष्ट सेवन तीं करीत असतात. पदार्थविज्ञानवेत्त्याचे प्रयोग, अर्थशास्त्रवेत्त्याचे शोध आणि आत्मशास्त्रवेत्त्याचीं पृथक्करणें, हें जें फार पौष्टिक अन्न तें त्यांच्यांत ठरत नाहीं, त्यांस पचवतां येत नाहीं, म्हणून असलीं मनें हावरेपणानें जेवणाच्या वेळच्या गप्पासप्पा, श्रीमंतांबद्दलच्या बारीकसारीक हकीकती, पोलीस कोर्टांतील घटस्फोटाच्या खटल्यांतील मासलेवाईक साक्षी, इत्यादिकांचें सेवन अधाशाप्रमाणें करीत असतात. बरें, अशा लोकांचें वाचन पाहिलें, तर त्यांची धांव विनकिमतीच्या कादंबऱ्या, अर्धवट लोकांचीं चरित्रें, गप्पासप्पांनीं भरलेल्या पत्रव्यवहारांचीं बाडें, आणि कधीं कधीं एकादें ऐतिहासिक पुस्तक, ज्याच्यांत लढाया आणि प्रसिद्ध पुरुषांच्या कृती ह्यांच्या वर्णनापलीकडे कांहीं नसतें, अशापलीकडे बहुधा जात नाहीं. अशा मनांना अशा प्रकारचेंच मानसिक अन्न योग्य असतें; आणि बैलाला मांसाचें अन्न घालणें जितकें वेडेप-

णाचें होईल तितकेंच यांना उच्चतर मानसिक अन्न घालूं पाहणें होय.

आतां सुधारलेल्या माणसांपैकीं सामान्य माणसामध्यें ही स्थिति दृष्टीस पडते तीच जास्त प्रमाणावर असुधारलेल्यामध्यें आढळून येते. तो निरर्थक अशा बारीक सारीक गोष्टींकडे ह्याच्यापेक्षांहि जास्त लक्ष देत असतो. आणि ज्यांपासून महत्त्वाचे सामान्य सिद्धांत काढतां येतील अशा गोष्टी निवडण्याचें सामर्थ्य त्याजमध्यें ह्याच्यापेक्षांहि कमीं असतें. साध्या अशा अनेक गोष्टींची पाहणी तो नेहमीं करीत असतो; पण त्यांपैकीं ज्या कांहीं महत्त्वाच्या असतील त्यांजकडे त्याचें विशेष लक्ष जात नाहीं, किंवा त्यापासून काय तर्क काढावयाचा हेंहि त्याच्या लक्षांत येत नाहीं. अगदीं हलक्या दर्जाच्या जातींच्या निरीक्षणचापल्याबद्दल मागें वर्णन आलेंच आहे; आतां त्याबरोबरच त्यांच्यामध्यें जें विचारशैथिल्य दृग्गोचर होतें त्याचीं वर्णनें पाहूं. ब्राझीलमधील इंदियन लोकांबद्दल बेट्स् साहेब असें म्हणतो कीं, ते रोजच्या जरूरीच्या वस्तूंपलीकडे दुसऱ्या कशाचाहि विचार करीत असतीलसें दिसत नाहीं. ईस्टअफ्रिकन लोकांबद्दल बर्टन असें म्हणतो कीं, त्यांस निरीक्षण चांगलें करतां येतें, पण त्यापासून त्यांस फायदेशीर असा कोणताच सिद्धान्त काढतां येत नाहीं. डमारा लोकांबद्दल तर असा स्पष्ट पुरावा सांपडतो कीं ते सामान्य सिद्धान्त कधींच काढीत नाहींत. गाल्टन साहेब त्यांजबद्दल असें म्हणतो कीं त्यांना एका शहरापासून दुसऱ्या शहराचा आणि दुसऱ्यापासून तिसऱ्या शहरचा रस्ता पूर्ण माहीत

असला तरी पहिल्यापासून तिसऱ्याच्या सरळ मार्गाची कल्पना त्यांस करतां येत नाहीं. हा विचारशक्तीचा अभाव ह्या हलक्या जातींमध्यें इतका आहे कीं, डॉक्टर पिकरिंग म्हणतो कीं फीजियन लोकांखेरीज दुसऱ्या कोणामध्येंहि कारणें देण्याची शक्ति मला दिसली नाहीं, व त्यांच्याशींच कायतें सुसंबद्ध भाषण मला करतां येत असे.

४२. विलक्षण बुद्धीचे लोक विक्षिप्त असतात, अशी म्हण आहे तिजवरून असें व्यक्त होतें कीं असल्या लोकांचे वर्तनमार्ग सामान्य माणसांहून भिन्न असण्याचा संभव फार असतो. लोक करितात तेंच आपण करणें म्हणजे दुसऱ्याची नक्कल करणें होय. रूळलेल्या मार्गापासून भिन्न मार्गानें जाणें म्हणजे इतरांची नक्कल करण्याचें नाकारणें होय. आणि ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं नक्कल करण्याचा कल जितका कमी असेल तितका नव्या कल्पना काढण्याचा कल जास्त असतो. सारांश जितका मनुष्य कमी सुधारलेला तितका त्याचा नकलेकडे कल जास्त असा नियम दिसतो, आणि रानटी लोकांमध्येंहि त्याची साक्ष पटते.

अर्धवट सुधारलेल्या जातीमध्यें नकलीपणा स्पष्ट दृष्टीस पडतो. नीग्रो नोकर साधेल तेव्हां साहेबी पोषाक करून मिरवीत असतात हें सर्वांस माहीतच आहे. न्यूझीलंदर लोक मोठे नकल्ये आहेत म्हणून प्रसिद्धि आहे. डायाक लोकांना देखील नक्कल फार आवडते. क्यारेन लोकांविषयीं मेसन असें म्हणतो कीं त्यांना स्वतः नवें कांहींच करतां येत नाहीं, पण दुसऱ्याचें पाहून तसें करण्याचे कामांत ते चिन्यांसारखे तरबेज आहेत. दक्षिण

अमेरिकेंतील रानटी जातींबद्दल असाच पुरावा सांपडतो. पण अत्यन्त हलक्या दर्जाच्या जातींमध्यें हा नक्कलीपणा फारच आढळून येतो. फ्यूजियन लोकांस एकादा प्रश्न विचारिला असतां त्यास उत्तर देण्याच्या ऐवजीं तो ते तसाच हुबेहूब म्हणून दाखवितील. आंदामानीज लोक असेच मोठे नकल्ये आहेत.

रानटी लोकांमध्यें अत्यन्त जाड्या प्रमाणावर दिसणारा आणि सुधारलेल्या जातींतील श्रेष्ठ माणसांमध्यें फार अल्प प्रमाणावर दिसणारा जो हा नक्कलीपणा त्यावरून निरीक्षणचापल्य आणि विचारचापल्य ह्यांच्यामध्यें विरोध कसा असतो हें स्पष्ट दिसतें. बगळे, मेंढ्या, इत्यादि कळप करून राहणाऱ्या प्राण्यांमध्यें हा नक्कलीपणा इतका दिसतो कीं त्यांच्यापैकीं एक जाईल तिकडे सर्व जातात. त्या नक्कलीपणावरून तो करणाराची मानसिक क्रिया बाह्य कारणांच्या धोरणानें मुख्यत्वेंकरून चाललेली आहे असें दिसतें; म्हणजे त्याच्यांत निरनिराळे विचार, किंवा कल्पनाशक्ति, किंवा नूतन कल्पना ह्यांचें अंग फारच दिसतें.

४२. मूळ माणसाची विचारशक्ति किती अल्प असते ह्याचीं आतां उदाहरणें देऊं; म्हणजे मूळ माणसाच्या बुद्धिविषयक स्थितीबद्दल आपणास त्याच्यापेक्षांहि जास्त स्पष्ट कल्पना येईल.

सामान्य भाषणांत निरनिराळ्या प्रकारच्या बुद्धिचापल्यांतील भेदांचें योग्य कथन होत नाहीं. एकाद्या मुलाच्या अंगीं सरळ कल्पना लवकर ग्रहण करण्याचें सामर्थ्य असलें तर त्यास हुशार म्हणून म्हणतात; मग त्याच्या अंगीं संमिश्र कल्पना ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसेना? बरें दुसरा

एकादा मुलगा घोकंपट्टींत मंद असला तर त्यास जडबुद्धि म्हणून म्हणतात; मग त्यास तांत्त्विक सत्यें त्याच्या शिक्षकांपेक्षांहि जास्त लवकर ग्रहण करतां येत असेनात? असुधारलेल्या लोकांच्या बुद्धिसामर्थ्याबद्दल जो परस्पर-विरुद्ध पुरावा सांपडतो त्याचें कारण काय हें लक्षांत आणावयाचें असल्यास सामान्य भाषणांतील हीं व्यंगें ध्यानांत वागविलीं पाहिजेत. म्हणून फ्यूजियन लोकांबद्दल देखील असें वर्णन आढळतें कीं त्यांची बुद्धि कमी नसते. आंदामानीज लोकांबद्दल असें वर्णन आढळतें कीं ते अत्यन्त चलाख व हुशार असतात; आणि आस्ट्रेलियन लोक यूरोपियन शेतकऱ्या इतके हुशार असल्याचें वर्णन आढळतें. पण ही सगळी हुशारी अगदीं साध्या प्रकारची असते. स्प्रोट साहेब आहाट लोकांबद्दल जें म्हणतो तीच बहुशः सामान्य स्थिति असते. तो म्हणतोः— "ह्या लोकांचीं मनें सुशिक्षित माणसास निद्रिस्त अस्यासारखीं दिसतात. त्यांचें लक्ष पूर्णपणें जागृत केल्यास, उत्तरें देण्यांत आणि कोड्या लढवण्यांत ते बरीच हुशारी दाखवितात. पण थोड्याशा भाषणानें ते कंटाळून जातात; आणि विचार करण्यासारखे किंवा आठवण करण्यासारखे प्रश्न त्यांस विचारले म्हणजे ते फारच कंटाळतात. नंतर त्यांचीं मनें दुर्बलपणामुळें झोंके खावयास लागल्यासारखीं दिसूं लागतात." आम्बिपोन लोकांना एकादी गोष्ट एकदम सजजली नाहीं तर ते लागलेच कंटाळतात आणि म्हणूं लागतात, त्याच्यांत काय आहे? नीग्रो लोकांची अशीच स्थिति आहे. ईस्टआफ्रिकन लोकांबद्दल बर्टन असें म्हणतो कीं, त्यांच्याशीं दहा मिनिटें

संभाषण केलें तर त्यांच्यांतील अत्यन्त बुद्धिमान् माणूस देखील कंटाळून जातो.

एकाद्या जातीची कल्पना करावयाची म्हणजे त्या जातींतील अनेक व्यक्तींच्या अनेक गुणांची कल्पना केली पाहिजे; आणि ह्या गुणांत कांहीं परस्परभिन्न असले तरी पुष्कळ परस्परसमान कसे आहेत हें ध्यानांत आणिलें पाहिजे. ह्या कल्पनाशक्तीचा रानट्यामध्यें अभाव असल्यामुळें अगदीं साध्या विचारापेक्षां अंमळ गहन विचार करण्यास तो असमर्थ कसा असतो हें ध्यानांत येतें. झाडें हिरवीं असतात, जनावरें वाढतात, इत्यादि अगदीं सामान्य सिद्धान्ताची देखील स्पष्ट कल्पना त्याच्या मनांत उभी राहत नाहीं; कारण विशिष्ट जनावर किंवा विशिष्ट वनस्पति ह्यापलीकडे सामान्य जनावर किंवा झाड याची कल्पना त्यास नसते. आतां असल्या क्षुद्रतम तात्त्विक कल्पना त्यास होऊं लागल्याविना त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या तात्त्विक कल्पना त्यास व्हावयाच्या नाहींत हें सांगावयास नकोच. गाल्टन साहेबानें दिलेल्या एका दृष्टान्तावरून ही गोष्ट चांगली व्यक्त होणार आहे. डामारा लोकांबद्दल तो असें म्हणतो कीं ते मोजावयास लागले म्हणजे पांचांनंतर फार घोंटाळतात. कारण एका हाताचीं पांच बोटें दुसऱ्या हाताच्या पांच बोटांनीं धरिलीं म्हणजे पुढें मोजावयास आणखी बोटें शिल्लक रहात नाहींत. असें आहे तरी त्यांचे बैल ते कधीं गमावीत नाहींत. कळपांतील एकादा बैल नाहींसा झाल्यास ते त्यास संख्या कमी झाल्यावरून समजत नाहीं, तर ओळखीचा एक चेहरा कमी झाल्यावरून सम-

संभाषण केलें तर त्यांच्यांतील अत्यन्त बुद्धिमान् माणूस देखील कंटाळून जातो.

एकाद्या जातीची कल्पना करावयाची म्हणजे त्या जातींतील अनेक व्यक्तींच्या अनेक गुणांची कल्पना केली पाहिजे; आणि ह्या गुणांत कांहीं परस्परभिन्न असले तरी पुष्कळ परस्परसमान कसे आहेत हें ध्यानांत आणिलें पाहिजे. ह्या कल्पनाशक्तीचा रानट्यामध्यें अभाव असल्यामुळें अगदीं साध्या विचारापेक्षां अंमळ गहन विचार करण्यास तो असमर्थ कसा असतो हें ध्यानांत येतें. झाडें हिरवीं असतात, जनावरें वाढतात, इत्यादि अगदीं सामान्य सिद्धान्ताची देखील स्पष्ट कल्पना त्याच्या मनांत उभी राहत नाहीं; कारण विशिष्ट जनावर किंवा विशिष्ट वनस्पति ह्यापलीकडे सामान्य जनावर किंवा झाड याची कल्पना त्यास नसते. आतां असल्या क्षुद्रतम तात्त्विक कल्पना त्यास होऊं लागल्यावांचून त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या तात्त्विक कल्पना त्यास व्हावयाच्या नाहींत हें सांगावयास नकोच. गाल्टन साहेबानें दिलेल्या एका दृष्टान्तावरून ही गोष्ट चांगली व्यक्त होणार आहे. डामारा लोकांबद्दल तो असें म्हणतो कीं ते मोजावयास लागले म्हणजे पांचांनंतर फार घोंटाळतात. कारण एका हाताचीं पांच बोटें दुसऱ्या हाताच्या पांच बोटांनीं धरिलीं म्हणजे पुढें मोजावयास आणखी बोटें शिल्लक रहात नाहींत. असें आहे तरी त्यांचे बैल ते कधीं गमावीत नाहींत. कळपांतील एकादा बैल नाहींसा झाल्यास ते त्यास संख्या कमी झाल्यावरून समजत नाहीं, तर ओळखीचा एक चेहरा कमी झाल्यावरून सम-

जतें. क्रयविक्रय चालला असतां प्रत्येक मेंढीची किंमत निरनिराळी द्यावी लागते. उदाहरणार्थ, एका मेंढीची किंमत तंबाकूच्या दोन जुड्या असली आणि त्यास चार जुड्या देऊन त्याजपाशीं दोन मेंढ्या मागूं लागले तर तो अगदीं गोंधळात पडेल. रानटी लोकांच्या भाषांतून रंग, रूप, स्वर, लिंग, जाती इत्यादि तात्त्विक कल्पनांस शब्द नसतात ह्यावरून देखील तेंच व्यक्त होतें.

४४. ज्यांच्यांत कांहीं एक सामान्य गुणधर्म आहे अशा अनेक विशिष्ट कल्पना एकमेकांसंनिध मांडून ह्या सामान्य गुणधर्मावरून त्याजबद्दल व्यापक कल्पना बनवतां आल्याशिवाय, आणि दुसरा एकादा जो सामान्य गुणधर्म त्यांजमध्यें असेल त्याच्याशीं ह्या सामान्य गुणधर्माची सांगड मनांत घालतां आल्याशिवाय, कारणकार्यसंबंधाची कल्पना उत्पन्न व्हावयाची नाहीं. म्हणून मूळ माणसास स्वाभाविक व अस्वाभाविक ह्यांच्यामधील भेद कळूं शकत नाहीं. कारण कार्यपरंपरेची माहिती नसल्यामुळें मूल जसें असंभाव्य गोष्ट नेहमींच्या अनुभवांतील गोष्टीइतकीच खरी मानतें, त्याप्रमाणेंच रानटी माणसास वर्गीकृत व व्यवस्थित असें ज्ञान नसल्यामुळें त्यास सांगितलेली एकादी अगदीं असंभाव्य गोष्ट आणि सिद्ध असें एकादें सामान्य सत्य, ह्यांच्यांत कांहींच विसंगतपणा दिसत नाहीं.

ह्यामुळेंच त्याच्या अंगीं देवभोळेपणा उत्पन्न होतो. ह्यामुळेंच इंदियन माणूस उपवासाच्या दिवशीं स्वप्नांत जें जनावर दिसेल त्यास आपला देव मानितो. नीग्रो माणूस एकाद्या महत्त्वाच्या कामाकरितां बाहेर निघाला म्हणजे

जी वस्तू दृष्टीस पडेल तीस देव समजून नैवेद्य दाखवितो; रेड्डा जातीचा माणूस बाणाचा नेम चुकला तर देव संतुष्ट न झाल्यामुळे तो चुकला म्हणून समजतो. सारांश, त्यांच्या ठिकाणीं स्वाभाविक कार्यकारणपरंपरेची कल्पना उत्पन्न झालेली नसते.

४५. ह्या कल्पनेचा अभाव असल्यामुळें रानट्याच्या ठिकाणीं सकारण आश्चर्याचाहि सहजच अभाव असतो. वस्तूंमधील कांहीं संबंध नित्य असतात अशी समजूत उत्पन्न झाल्याविना त्या समजाविरुद्ध गोष्टी पाहून आश्चर्य वाटावयाचें नाहीं. सुधारलेल्या लोकांमधील जे अशिक्षित असतात त्यांच्या वर्तनावरून हें आपल्या लक्षांत येतें. अत्यन्त सूक्ष्म नलिकेंतून केशाकर्षणाच्या योगानें पाणी वर चढतें, किंवा हवेचा दाब कमी केला म्हणजे ऊन्ह पाणी कढूं लागतें, इत्यादि गोष्टी एकाद्या कुळंबटास दाखविल्यास तो त्याबद्दल कांहींच विस्मय दाखवीत नाहीं, तर अगदीं बेफिकीर दिसतो. सृष्टींतील नेहमींच्या क्रमाच्या ज्या आपल्या कल्पना त्यांच्याशीं विरुद्ध म्हणून जें आपल्या ठिकाणीं आश्चर्य उत्पन्न करितें तें त्यांच्या ठिकाणीं त्या कल्पना नसल्यामुळें आश्चर्य उत्पन्न करीत नाहीं. आतां गांवढ्या माणसाच्या ठिकाणीं ज्या कांहीं अल्पस्वल्प सामान्य कल्पना असतील त्या देखील नष्ट झाल्या असें समजल्यास मूळ माणसाच्या मनाच्या स्थितीची आपणांस बरीच कल्पना येणार आहे.

अगदीं हलक्या जातींचे लोक नवीन वस्तूबद्दल अगदीं बेफिकिरी दाखवितात असें सर्वत्र वर्णन आढळतें.

कूकसाहेब फ्यूजियन लोकांबद्दल असेंच वर्णन करितो. डांपियरसाहेब गलबतावरील आस्ट्रोलियन लोकांबद्दल असें म्हणतो कीं खाण्याच्या पदार्थाशिवाय गलबतावरील दुसऱ्या कोणत्याहि वस्तूकडे त्यांचें लक्ष जात नसे. पाटागोनियन लोकांबद्दल वालिस असें म्हणतो कीं आरशाकडे पाहून जरी त्यांस मोठी मजा वाटली, तरी आश्चर्य वाटलें नाहीं.

४६. आश्चर्याच्या अभावाबरोबरच ह्या लोकांमध्यें जिज्ञासेचा अभाव दृष्टीस पडतो; आणि विचारदौर्बल्य असलें म्हणजे असें व्हावयाचेंच. बुशमेन लोकांबद्दल बर्चेल असें म्हणतो कीं, मीं त्यांस जेव्हां आरसा दाखविला तेव्हां आपण त्यांत दिसतों हें पाहून ते हंसले, आणि पोकळ आश्चर्य त्यांनीं दर्शविलें; पण हें कसें होतें हें जाणण्याची त्यांनीं मुळींच इच्छा दर्शविली नाहीं. जिज्ञासा दृष्टीस पडते ती ह्यापेक्षां अमळ वरच्या दर्जाच्या जातींमध्यें दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, न्यूक्यालिडोनियन लोक जिज्ञासू असल्याबद्दल कूक सांगतो. डायाक लोक, सामोअन लोक, आणि पोलिनिशियन लोक ह्यांच्याबद्दलहि अशींच वर्णनें आढळतात.

असो. असें असल्यामुळें अगदीं हलक्या जातींचे लोक सृष्टींत होणाऱ्या चमत्कारांचीं कारणें शोधण्याच्या भानगडींत मुळींच पडत नाहींत. विचार करण्याची शक्ति आणि जाणण्याची इच्छा ह्या दोन्ही नसल्यामुळें रानटी माणसाचे ठिकाणीं पुढच्या गोष्टी मनांत आणण्याचा कल मुळींच नसतो. मंगोपार्कनें नीग्रोंना विचारिलें, रात्रीं सूर्याचें काय होतें ? दुसरे दिवशीं आपणास तोच सूर्य दि-

सतो किंवा निराळा दिसतो ? पण ह्या प्रश्नांस त्यांनीं मुळींचें उत्तर दिलें नाहीं. त्यांना ते प्रश्न फार पोरकट वाटले; त्यांनीं असल्या गोष्टीबद्दल कधीं तर्क केलेला नव्हता, किंवा त्यांचें कांहींहि उत्तर मनांत कधीं ठरविलेलें नव्हतें.

मॅक्सम्यूलर वगैरे शास्त्रज्ञांच्या मूळमाणसाबद्दलच्या एतद्विषयक कल्पना अगदीं उलट आहेत. ते म्हणतात कीं रानटी माणसें सभोंवतालच्या गोष्टींबद्दल नेहमीं कल्पना वसवीत असतात. पण वास्तविक स्थिति अशी दिसते कीं त्यांना ह्या गोष्टींबद्दल कांहीं कल्पना बसवणें जरूर आहे असें मुळींं वाटतच नाहीं.

४७. आणखी एक बुद्धिविषयक विशेष सांगितला पाहिजे; जो रचनात्मक कल्पनाशक्तीचा अभाव हा होय. रानट्यांचें जीवित साध्या निरीक्षणाचें, नकलीपणाचें, मूर्त कल्पनांचें आणि तात्त्विक कल्पनांच्या अभावाचें बनलेलें असल्यामुळें ही वाण उत्पन्न होत असते.

जनरल पिट रिव्हर्स् यानें हत्यारें व आउतें यांचा जो संचय केला आहे त्याजकडे पाहतां रानटी लोकांमध्यें नेहमींच्या साधनांच्या संबंधानें देखील फारशी नूतन शोधबुद्धि दिसत नाहीं; कारण तीं सर्व हत्यारें एका मूळ हत्यारावरून निघालेलीं दिसतात. तीं पूर्वीच्या हत्यारांत थोडथोडे फेरफार होऊन उत्पन्न झालेलीं आहेत; तीं मुद्दाम नवीन नमुना तयार करून त्याप्रमाणें बनविलेलीं दिसत नाहींत.

नाईल नदीच्या कांठच्या रानटी जातींच्या संबंधानें सर साम्युएल बेकर यानें जो निबंध लिहिला आहे त्यांत

तो असें सांगतो कीं त्या लोकांत पक्ष्यांच्या घरट्यांप्रमाणें निरनिराळ्या जातींचीं घरें अगदीं एका प्रकारच्या नमुन्यावर बांधलेलीं असतात. त्यांच्या पागोट्यांमध्येंहि तसेंच कायमचे भेद दृष्टीस पडतात; आणि हे भेद त्यांच्या भाषांमधील भेदांच्याच प्रमाणानें उत्पन्न झालेले दिसतात. तात्पर्य, ह्या लोकांचे विचार कोत्या अशा कांहीं ठराविक पद्धतीवर चाललेले असल्यामुळें त्यांना नवे संयोग बनविण्यास आणि अशा रीतीनें नव्या प्रकारच्या कृती, आणि नव्या प्रकारच्या वस्तू, उत्पन्न करण्यास जरूर ती मनाची स्वतंत्रता नसते.

ज्या ठिकाणीं चातुर्याचें वर्णन आढळतें त्या ठिकाणीं ताहितियन, जाव्हन, इत्यादि जरा उच्च प्रतीच्या जातींबद्दल आढळतें. त्यांच्यापाशीं तात्त्विक शब्दांचा व कल्पनांच्या बराच भरणा आढळतो; त्यांच्या ठिकाणीं सकारण आश्चर्य आणि जिज्ञासा हीं दृष्टीस पडतात; तात्पर्य त्यांची बुद्धिविषयक जास्त वाढ झालेली असते.

४८. गेल्या दोन प्रकरणांत निरूपिलेल्या विशेष सत्यांवरून जसें एक सामान्य सत्य त्यांतील प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं आपणांस काढतां आलें, तसें ह्या ठिकाणींहि काढतां येतें. तें हें कीं, रानटी माणसाची बुद्धि जलद पक्व होत जाते, आणि लवकरच तिची वाढ खुंटते.

अस्ट्रेलियन, नीग्रो, न्यूझीलंदर, आंदामानिज इत्यादिकांचीं मुलें सरळ कल्पनांचें ज्ञान करून घेण्याच्या कामांत यूरोपियन मुलांपेक्षां देखील जास्त चलाख असतात, पण त्यांस संमिश्र कल्पनांचें ग्रहण करण्याची शक्ति नसल्यामुळें त्यांचें ज्ञान तितकेंच थबकून राहतें. विषुव-

वृत्ताजवळील आफ्रिकेसंबंधानें रीड साहेब असें म्हणतो कीं तेथील मुलांच्या बुद्धीचा विकास फारच लहान वयांत होतो. नीग्रो मुलांसंबंधानें क्याप्टिन बर्टन म्हणतो कीं तींहि मुलें लहानपणीं फार बुद्धिमान् दिसतात, पण ही चलाखी वयांत येण्याच्या सुमारास नष्ट होते. बुद्धीची वाढ अशा रीतीनें अल्प वयांतच खुंटते. यावरून त्यांची बुद्धिच मूळची अल्प असते, व ती वाढण्यास मोठी अडचण असते, ह्या दोन्ही गोष्टी व्यक्त होतात; कारण पुढें अनुभवानें वर्तन बदलण्याचा संभव कमी होतो.

असुधारलेल्याचे जे हे बुद्धिविषयक विशेष अशा रीतीनें बदलण्यास फार कठीण जातें त्यांचें आतां पुनः कथन करूं. तें करतांना इतकेंच ध्यानांत ठेवावयाचें कीं हे विशेष सुधारलेल्यांच्या मुलांमध्यें दृष्टीस पडत असतात.

रानट्यांप्रमाणें लहान मुलें इंद्रियज्ञान आणि निरीक्षण यांमध्येंच गढलेलीं असतात. खेळाच्या वस्तू फोडून पाहणें, मातीच्या भाकरी बनवणें, नवीन वस्तु किंवा माणूस दृष्टीस पडलें म्हणजे त्याजकडे टक लावून पाहणें, ह्या सर्व गोष्टींवरून मुलांची निरीक्षणवृत्ति कशी सबळ असते, आणि विचारवृत्ति कशी दुर्बल असते हें स्पष्ट दिसतें. नक्कल करण्याची वृत्तिहि दोघांमध्यें सारखीच दिसते. मोठ्या माणसासारखें चालणें किंवा स्वर काढून दाखविणें याची मुलांस मोठी हौस वाटते. रानट्यांसहि प्रवाशांची नक्कल करण्यांत मोठी हौस वाटते. उपयोगी व निरुपयोगी यांच्यांतील भेद जसा मुलास कळत नाहीं तसाच रानट्यासहि कळत नाहीं. पोषक गोष्टी ओळखण्याच्या शक्तीची ही वाण बुद्धीच्या

अल्प वाढीमुळें उत्पन्न होते. कारण व्यापक सिद्धान्त बनविण्याची शक्ति घेऊन ती वाढल्यशिवाय एकाद्या गोष्टीचें तात्कालिक महत्त्व नसलें तरी पुढें ती महत्त्वाची होईल ही गोष्ट ध्यानांत येत नाहीं. तद्वतच लहान मुलाप्रमाणें रानटचालाहि एकाद्या तात्त्विक किंवा भानगडीच्या गोष्टीवर सारखें लक्ष बसवतां येत नाहीं; तर तें थकून जाऊन असल्या गोष्टींवरून उडून जातें. उच्चतर प्रकारच्या बुद्धिविषयक शक्तींचा त्यांच्या ठिकाणीं अभाव असल्यामुळें त्या शक्तींनीं आकलणाच्या कल्पनांचीहि त्यांजमध्यें वाण असते. रानटचाप्रमाणें मुलापाशींहि अल्प तात्त्विकतेच्याहि शब्दांचा भरणा फार थोडा असतो, आणि जास्त तात्त्विकतादर्शक शब्दांचा तर मुळींच नसतो. कुत्रें, मांजर, गाय, घोडा हीं जनावरें त्यास चांगलीं परिचित असतात. पण विशिष्ट जातींपासून भिन्न अशी जी सामान्य प्राणिकल्पना ती त्याला नसते; आणि ता, पणा, इत्यादि प्रत्यय जोडून होणारे भाववाचक शब्द त्याच्या कोशांत तो बराच मोठा होईतोंपर्यंत येत नाहींत. सारांश दोघांच्याहि ठिकाणीं पोक्त विचाराचीं साधनेंच मुळीं नसतात. व्यापक सत्यें आणि सृष्टिनियमांची कल्पना ह्यांची मनामध्यें वाण असल्यामुळें रानट्याप्रमाणेंच सुधारलेल्याचें मूल सयुक्तिक आश्चर्य किंवा जिज्ञासा हीं व्यक्त करीत नाहीं. त्याच्या ज्ञानेंद्रियास अगदीं नवीनसें कांहीं दिसल्यास तें त्याच्याकडे वेड्याप्रमाणें डोळे ताणून पाहूं लागतें, किंवा कदाचित् रडूं लागतें; पण त्यास एकादा रासायनिक प्रयोग किंवा नवीन यंत्र दाखविल्यास तें त्याजकडे केवळ

नव्या खेळाच्या दृष्टीनेंच पाहूं लागतें. वंशपरंपरेनें आलेल्या बुद्धिविषयक शक्ती जेव्हां पुढें कांहीं काळानें त्यांच्या ठिकाणीं आपला व्यापार करूं लागतात आणि त्यास मलाया द्वीपकल्पांतील लोकांची मानसिक स्थिति प्राप्त होते, तेव्हां तें सयुक्तिक आश्चर्य व जिज्ञासा हीं दर्शवूं लागतें. पण त्यावेळीं देखील त्याच्यामध्यें जो अत्यंत भोळसरपणा असतो त्यावरून कार्यकारणसंबंध आणि सृष्टिनियम ह्यांबद्दलच्या कल्पना अद्यापि त्याच्यामध्यें किती अपक्व असतात हें स्पष्ट दिसतें. कितीहि असंभाव्य गोष्ट त्यास खरी वाटते, आणि कितीहि वेडगळपणाचें स्पष्टीकरण त्यास बरोबर वाटतें.

आणि ही जी रानटी माणसाची बुद्धिविषयक स्थिति आहे ती त्याच्या समाजविषयक उत्क्रान्तीला अनुसरूनच आहे. समाज जसे वाढत जातील, व्यवस्थित होत जातील, आणि स्थिर होतील तसतसेच विचारवृद्धि करणारे अनुभव माणसास प्राप्त होत जातात. हल्लींचें सर्व ज्ञान नष्ट झालें, आणि मुलांस दाईखान्यांतील भांपेपलीकडे कांहीं राहिलें नाहीं, असें झाल्यास काय होईल असा विचार करावा, म्हणजे गतसुधारणेच्या साहाय्याच्या अभावीं हल्लींं देखील उच्चतर बुद्धी कशा निष्क्रिय होऊन जातील हें ध्यानांत येईल. आणि हें ध्यानांत आलें म्हणजे समाजसुधारणेबरोबर कार्य आणि कारण ह्या दोन्ही रीतींनीं उच्चतर बुद्धिविषयक गुणांची वाढ कशी होते हें कळून येईल; आणि योग्य परिस्थितीच्या अभावीं रानटी माणसास हे गुण कसे उत्पन्न करतां येत नाहींत, हेंहि ध्यानांत येईल.

प्रकरण आठवें

मूळ माणसाच्या कल्पना

४९. समाजविषयक चमत्कार समजूं लागण्यास आणखी कांहीं तयारी केली पाहिजे. बाह्य उत्पादक आणि गेल्या तीन प्रकरणांत वर्णिलेले अंतरुत्पादक एवढ्यांचीच माहिती होऊन पुरे होत नाहीं. समाजांतील व्यक्तींचें वर्तन आणखी कांहीं विशेषांवर अवलंबून असतें. हे विशेष समजुतींच्या संबंधाचे होत. जसें वडिलांकडून आलेले अनुभव ज्ञानतंतूच्या रचनेवर आपला व्यापार करून मानसिक शक्तींस उत्पन्न करीत असतात; त्याप्रमाणेंच स्वतःस येणारे अनुभव दररोज विचाररूप पावून ह्या रचना व शक्ती ह्या दोहोंमध्यें अल्पस्वल्प फरक करीत असतात. तेव्हां मूळ माणसाचा जर पूर्ण इतिहास देणें आहे तर ह्या फरकांचें किंवा तद्व्यंजक कल्पनांचें वर्णन त्यांत आलेंच पाहिजे. कारण स्वतःबद्दल, इतरांबद्दल आणि सभोंवतालच्या जगाबद्दल माणसाच्या ज्या कल्पना बनल्या असतील त्यांचा त्याच्या वर्तनावर बराच परिणाम होत असतो.

ह्या फरकांचें किंवा तद्विषयक कल्पनांचें वर्णन करण्याचें काम कठीण आहे. त्यांजकडे अनुभवदृष्टचा पाहूं लागलें किंवा विचारदृष्टचा पाहूं लागलें, तरी अडचणी उत्पन्न होतात. म्हणून त्या अडचणींकडे प्रथम आपणांस नजर फेंकिली पाहिजे.

५०. खरोखरच्याच मूळ माणसांचे इतिहास जर उपलब्ध असते तर खरोखरच्या मूळ कल्पना क्लेशत्यां हें उद्भवणें सोपें पडलें असतें. पण हल्लीं ज्ञात असलेले जे अगदीं हलक्या दर्जाचे माणूस ते अगदीं मूळ माणसासारखे नाहींत असें मानण्यास कारण सांपडतें. बहुधा त्यांपैकीं बहुतेकांचे पूर्वज त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाचे असावे; म्हणून त्यांच्यामध्यें जे समज हल्लीं दृष्टीस पडतात ते त्या उच्चतर स्थितीपैकीं शिल्लक राहिलेले असावे. मनुष्याची दिवसेंदिवस नीचावस्था होत आहे ही कल्पना जशी बरोबर दिसत नाहीं, तशीच त्याची सारखी प्रगति होत आहे ही कल्पनाहि बरोबर दिसत नाहीं. सुधारणेपासून पिछेहाट होऊन रानटी स्थिति उत्पन्न होते ही समजूत जर एका पक्षीं साधार दिसत नाहीं, तर दुसऱ्या पक्षीं हल्लींहून कमी रानटी स्थिति कधींहि नव्हती ही समजूतहि साधार दिसत नाहीं. तर प्रगतीप्रमाणें पिछेहाटहि वरचेवर झालेली असावी ही गोष्ट विशेष संभाव्य दिसते.

उत्क्रान्ति म्हणजे प्रत्येक बाबतींत उच्चतर होण्याचा खराखुरा कल होय, अशी जी सामान्य समजूत आहे ती चुकीची आहे. उत्क्रान्ति ही नेहमीं बाह्य आणि अंतःकारणें ह्यांच्या सहकारित्वावर अवलंबून असते. व्यक्तीच्या क्रिया आणि सभोंवतालच्या सृष्टींत होणाऱ्या क्रिया ह्यांजमध्यें समतोल उत्पन्न होईतों हें सहकारित्व व्यक्तीमध्यें फेरबदल उत्पन्न करीत असतें. हा समतोल सजीव व्यक्तीमध्यें चल असतो, आणि निर्जीव वस्तूमध्यें स्थिर असतो. एकाद्या जातीच्या व्यक्तिसमूहाच्या संबंधानें स-

भोंवतालच्या क्रिया जर कायम राहिल्या तर ती जातहि कायमच राहते. सभोंवतालच्या क्रियांमध्यें फेरबदल झाल्यास त्यांच्याशीं पुनः समतोल होईतोंपर्यंत ती जातिहि बदलते. पण ह्या बदलामुळें त्या जातीचें उत्क्रमण मींच वृद्धिंगत होतें असें नाहीं. अशा बदलानें बहुधा प्रगति होत नाहीं किंवा पिछेहाटहि होत नाहीं; वारंवार असें घडतें कीं ह्या फेरबदलामुळें पूर्वीची कांहीं रचना निरुपयोगी होऊन ती नष्ट होते, आणि अशा रीतीनें व्यक्तीस पूर्वीपेक्षां सरल स्वरूप प्राप्त होतें. परिस्थितींतील बदलामुळें व्यक्तींत कांहीं भानगड उत्पन्न होऊन तिची घटना पूर्वीपेक्षां उच्चतर झाली असें कधीं कधींच होतें. म्हणून कित्येक प्रकारच्या जीवांमध्यें आज अनंत वर्षें म्हणण्यासारखा मुळींच फेरबदल झालेला नाहीं; इतक्या कांहींमध्यें जास्त उत्क्रमण झालेलें आहे, आणि दुसऱ्या कांहींमध्यें पिछेहाट झालेली आहे. उदाहरणार्थ, हल्लींपेक्षां उच्चतर घटनेचे आणि राक्षसी आकाराचे कांहीं सर्प पूर्वीं होते, पण ते हल्लीं नष्ट झालेले आहेत, आणि त्यांच्यापेक्षां कमी दर्जाचे टिकाव धरून राहिले आहेत. तद्वतच कांहीं स्तनवत् प्राण्यांच्या जाती, हल्लींपेक्षां आकारानें मोठ्या अशा पूर्वीं अस्तित्वांत होत्या. पण ही गोष्ट पोटांतील कृमीसारखे जे परोपजीवी प्राणी त्यांच्यामध्यें फारच मोठ्या प्रमाणावर दिसून येते. ह्यांपैकीं पुष्कळ जातींचे कृमी हल्लींपेक्षां श्रेष्ठ जातीचे होते. म्हणून हे कृमी धरून सर्व प्राणिवर्गांचा जर विचार केला तर त्यांपैकीं पुष्कळ प्रकारचे प्राणी रचनेनें त्यांच्या पूर्वजांहून कमी दर्जाचे झालेले आहेत असें म्हणावें लागतें.

खरोखर पाहतां, कांहीं जातींची प्रगति झाली म्हणजे दुसऱ्या कांहींची पिछेहाट सहजच होऊन जाते. कारण सुधारलेल्या जाती आपल्या अंगीं आलेल्या वर्चस्वाच्या जोरावर सभोंवतालच्या इतर जातींना पूर्वीपेक्षां वाईट हवेंत आणि वाईट परिथतींत ढकलीत असतात, आणि तेथें त्यांच्या शक्तींचा उपयोग न होऊन ऱ्हास होत जातो.

जी गोष्ट जीवांना लागू आहे तीच समाजांनाहि लागू आहे. एकंदर समाजाकडे पाहतां त्यांवर एकसारखा प्रभाव करणाऱ्या बाह्य व अंतःकारणामुळें त्यांचें उत्क्रमण होणें जरी अवश्यच आहे, तरी प्रत्येक समाजाच्या संबंधानें ही गोष्ट अवश्यमेव नाहीं इतकेंच नव्हे तर संभवनीयहि नाहीं. व्यक्तिदेहाप्रमाणें समाजदेहहि परिस्थितीशीं समतोल्यावेतोंपर्यंत फेरबदल पावत असतो; आणि नंतर मग त्याच्या घटनेंत जास्त फेरबदल न होतां तो तसाच राहतो. वारे, पाऊस, इत्यादि गोष्टींत किंवा भूगर्भांत फेरफार होऊन, किंवा वनस्पतिवर्ग व प्राणिवर्ग ह्यांत फेरबदल होऊन, किंवा वस्ती वाढल्यामुळें अथवा जबरदस्त राष्ट्रांच्या हल्लचांमुळें स्थलान्तर होऊन, समाजघटनेंत कांहीं फेरबदल उत्पन्न होतो. पण हा फेरबदल प्रगतिरूपच असतो असें नाहीं. वरचेवर असें होतें कीं असल्या फेरबदलापासून प्रगति होत नाहीं किंवा पिछेहाटहि होत नाहीं. स्थलान्तरामुळें जेथें कमी दर्जाची जीवितसरणी अनुसरावी लागते तेथें पिछेहाट होते. नवीन परिस्थितीमुळें समाजोत्क्रमण एक पायरी पुढें गेलें असें कधीं कधींच होतें. आणि व्यक्तींप्रमाणेंच समाजांमध्येंहि कांहींच्या प्रगतीमुळें कांहींची पिछेहाट होते. जास्त उत्क्रान्त

समाज कमी उत्क्रान्तांस प्रतिकूल प्रदेशांत हांकून लावंतात, व त्यामुळें त्यांचे आकार लहान होतात, किंवा रचना बिघडतात, किंवा ह्या दोन्हीहि गोष्टी होतात.

ह्या गोष्टीबद्दल प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. इजिप्शन, बाबिलोनियन, आसिरियन, फिनीशन, पर्शान, ज्यू, ग्रीक, रोमन, हीं सर्व राष्ट्रें एका काळीं मोठमोठ्या व फार उत्क्रमण पावलेल्या, पण आतां नष्ट झालेल्या, किंवा रानटी बनलेल्या, किंवा पुष्कळ दिवस हळूहळू क्षयास लागलेल्या, समाजाचींच उदाहरणें होत. जाव्हा बेटांतील मोडकळीस आलेल्या इमारतींवरून तेथें पूर्वी आतांपेक्षां अधिक उत्क्रान्त असा समाज होता असें दिसतें. पेरू आणि मेक्सिको ह्या देशांत पूर्वीं मोठमोठे व चांगले व्यवस्थित असे समाज होते; पण ते जिंकले गेल्यामुळें आतां विपन्नावस्थेस पावलेले आहेत; आणि मध्य अमेरिकेंतील ज्या शहरांतून पूर्वीं अनेक उद्योगधंदे चालविणाऱ्या लोकवस्ती होत्या त्या ठिकाणीं आतां रानटी लोकांच्या कांहीं टोळ्या विखरलेल्या आहेत. आतां अशा प्रकारच्या घालमेली मनुष्यप्राणी जगांत आला तेव्हांपासून होत असल्या पाहिजेत ह्यांत बिलकूल शंका नाहीं. हवेंत आणि भूपृष्ठांत असे फेरबदल नेहमीं चाललेच आहेत कीं जेणेंकरून कांहीं ठिकाणें सुधारलीं आहेत व कांहीं बिघडलीं आहेत. वस्ती जास्त व्हावी, टोळ्या पसरत जाव्या, दुसऱ्या टोळ्यांशीं कलह व्हावे आणि पराजित लोकांनीं त्यांच्या सुधारणेस अयोग्य ठिकाणीं पळून जावें, ह्या गोष्टी नेहमीं चालल्याच आहेत; आणि असें झाल्यामुळें अर्थात् त्यांची पिछेहाट झालेली आहे.

ह्यावरून असा संभव दिसतो कीं हल्लीं ज्या जाती अत्यन्त रानटी म्हणून दृष्टीस पडतात त्यांच्या ठिकाणीं दिसणाऱ्या समाजविषयक कांहीं गोष्टी अशा असल्या पाहिजेत कीं त्या त्यांच्या हल्लींच्या परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या नाहींत, तर पूर्वीं त्यांची सामाजिक स्थिति उच्चतर असून तेव्हां उत्पन्न झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियन लोकांच्या ज्या निरनिराळ्या टोळ्या हल्लीं दृष्टीस पडतात त्या एकमेकींपासून दूरदूर राहत असून त्यांचीं एकमेकांशीं वैरेंहि दृष्टीस पडतात. तथापि त्यांच्यामध्यें अशीं कांहीं नातीं आहेत, आणि त्यामुळें लग्नाच्या संबंधानें असे कांहीं प्रतिबंध आहेत, कीं ते कांहीं हल्लीं उत्पन्न झालेले नाहींत. तेव्हां पूर्वीं त्या जाती एकमेकींशीं अधिक संनिध असून त्या कोणाच्या तरी एकाच्या तंत्रानें चालत असल्या पाहिजेत. त्यांच्यामध्यें सुंतेची, आणि कांहीं दांत पाडून टाकण्याची, अशा ज्या चाली दृष्टीस पडतात त्यांचेंहि मूळ हेंच असलें पाहिजे. कारण धर्मविषयक किंवा राजकीय असें कांहीं तरी वरिष्ठ बंधन असल्याशिवाय असल्या शरीरव्यंगाच्या चाली उत्पन्न व्हावयाच्या नाहींत.

अगदीं मूळ माणसाच्या कल्पना काय होत्या हें अनुभवरीत्या ताडण्यास अडचणी आहेत त्या ह्या होय. अत्यन्त रानटी समाजांत देखील हल्लीं ज्या प्रचलित कल्पना आहेत त्यांपैकीं कांहीं पूर्वीच्या उच्चतर स्थितीपासून त्यांस वंशपरंपरेनें प्राप्त झालेल्या असाव्या. म्हणून मूळ कल्पनांपासून ह्या कल्पना निराळ्या काढिल्या पाहिजेत. तात्पर्य केवळ अनुभवपद्धतीनें काम होत नाहीं.

५१. आतां तर्कपद्धतीचा स्वीकार केला तरी तिला दुसऱ्या प्रकारच्या अडचणी येतातच, आणि त्याहि वरच्या इतक्याच मोठ्या आहेत. सभोंवतालच्या सृष्टीकडे पाहून मूळ माणसाच्या मनांत जे विचार उत्पन्न होतात ते जर तर्कानें जाणावयाचे असतील तर त्या सृष्टीकडे त्याच्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. आपल्या ठिकाणीं शिक्षणानें जमलेलें जें ज्ञान तें एकीकडे गुंडाळून ठेविलें पाहिजे; आणि कांही अंशीं वंशपरंपरेनें आणि कांहीं अंशीं शिक्षणानें आपल्या ठिकाणीं दृढ झालेल्या ज्या कल्पना त्या मनांतून काढून टाकिल्या पाहिजेत. ही गोष्ट पूर्णपणें कोणासच करतां यावयाची नाहीं, आणि अर्धवट रीतीनें तरी थोड्यांसच करतां येईल.

शिक्षक लोक लहान मुलांस शिकवितांना त्यांना अयोग्य अशा पद्धतीचा उपयोग कसा करीत असतात हें ध्यानांत आणिलें, म्हणजे आपल्या विचाराहून भिन्न असे विचार बनविण्याची शक्ति शिकलेल्यांमध्यें देखील किती अल्प असते हें ध्यानांत येणार आहे. लहान मुलांस ज्या गोष्टींवर सामान्य सत्यें स्थापिलेलीं असतील त्या गोष्टी सांगण्याच्या अगोदर तीं सत्यें सांगतात; गणितविषय दृष्टान्तपद्धतीनें शिकविण्याच्या ऐवजीं तात्त्विक पद्धतीनें शिकवितात, व्याकरणासारखा गहन विषय शेवटीं शिकविण्याच्या ऐवजीं प्रथम शिकवितात व तोहि संयोगीकरणरीत्या न शिकवितां पृथक्करणरीत्या शिकवितात; ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां अपक्व मनांच्या कल्पना मनांत आणण्याचें सामर्थ्य माणसामध्यें एकंदरींत किती अल्प आहे हें स्पष्ट दिसतें. शिवाय मोठीं माणसें नुस्तींच मुलें

असतांहि मूलत्रयांतले विचार पुनः मनांत आणण्यास जर त्यांस इतकें कठिण जातें, तर रानट्यांचे विचार मनांत आणणें त्यापेक्षांहि जास्त कठिण गेलें पाहिजे. दुसऱ्यांचीं मनें आपल्या मनावरून ताडण्याची जी आपली संवय तिजपासून अगदीं अलिप्त राहणें आपल्या शक्तिबाहेरचें आहे. अगदीं अज्ञानाच्या दृष्टीनें सृष्टीकडे पाहणें, आणि सृष्टीचे धर्म व क्रिया यांचा प्रारंभीं मनावर ठसा कसा उमटला असेल तें ध्यानांत आणणें, ही गोष्ट साधण्यास जी आत्मविस्मृति अवश्य आहे ती आपल्यास साध्य नाहीं.

असें आहे तरी सभोंवतालची सृष्टि मूळमाणसास कशी दिसली असेल ह्याची कल्पना करण्याचा होईल तेवढा यत्न एथें आपण केला पाहिजे; असें कीं तेणेंकरून अनुभवरीत्या मिळणाऱ्या पुराव्याचा अनुमानरीत्या जास्त चांगला विचार करतां यावा. आणि ही कल्पना जरी प्रत्यक्षरीत्या आपणांस करतां येण्यासारखी नाहीं, तरी अप्रत्यक्षरीत्या करतां येण्यासारखी आहे. मूळकल्पनांच्या विशेष गुणधर्मांचा प्रथम तर्क केल्यानंतर मग त्या आपल्या कल्पनाशक्तीपुढें मांडण्याची आपली शक्य ती तयारी होणार आहे.

९२. हा विचार करतांना पहिली गोष्ट ध्यानांत धरावयाची ती ही कीं मूळकल्पना स्वाभाविक असल्या पाहिजेत, आणि त्या ज्या स्थितींत उत्पन्न होतात त्या स्थितीच्या मानानें सयुक्तिक असल्या पाहिजेत. मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखा आहे असें आपल्यास लहानपणीं शिकविलेलें आहे. ह्यामुळें रानट्यांचे समज हे आपल्या-

सारख्याच मनाचे समज असें समजून आपण त्यांच्या वैलक्षण्याबद्दल आश्चर्य करितों, आणि ह्यांत त्यांचा कांहीं तरी विपरीत आग्रह आहे असें समजतों. ही चुकीची समजूत काढून टाकून आपण अशी समजूत धारण केली पाहिजे कीं, विचाराचे नियम सर्वत्र एकच आहेत; आणि मूळमाणसाच्या ज्ञानाच्या मानानें त्यानें केलेलीं अनुमानें सयुक्तिकच असतात.

अगदीं हलक्या दर्जापासून अत्युच्च दर्जापर्यंत सर्व प्रकारची बुद्धि वस्तु आणि संबंध ह्यांचें वर्गीकरण करून चालत असते; आणि हीं दोन्ही प्रकारचीं वर्गीकरणें वस्तुतः पाहतां एकाच व्यापाराचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. एका पक्षीं एकाद्या वस्तूचें ज्ञान म्हटलें म्हणजे त्या वस्तूचे जे गुणधर्म असतील त्यांचें पूर्वी ज्ञात असलेल्या तत्सदृश गुणधर्मांशीं वर्गीकरण करणें होय, आणि त्या गुणधर्मांचे जे परस्परसंबंध असतील त्यांचें तत्सदृश पूर्वज्ञातसंबंधांशीं वर्गीकरण करणें होय; इकडे ती वस्तु ज्ञात होणें म्हणजे ती अमक्या अमक्या वस्तूसारखी आहे असें ओळखणें होय. दुसऱ्या पक्षीं विचार करणें म्हणजे ज्या वस्तूविषयीं कांहीं विधान केलें असेल त्या वस्तूला तत्सदृश पूर्वज्ञात वस्तूंच्या वर्गांत घालणें होय; म्हणजे त्या वस्तूच्या ज्या गुणधर्मांचें किंवा सामर्थ्याचें किंवा क्रियेचें विधान केलेलें असेल त्या गुणधर्माला किंवा सामर्थ्याला किंवा क्रियेला तत्सदृश पूर्व गुणधर्म वगैरेंच्या वर्गांमध्यें घालणें होय; आणि ती वस्तु आणि तिच्याबद्दल सांगितलेला हा गुणधर्म वगैरे ह्यांचा जो संबंध तो तत्सदृश पूर्वज्ञातसंबंधांच्या वर्गांत घालणें होय. सर्व प्रकारच्या

ज्ञानवत्तेचें पूर्व अनुभवांतील सदृश ज्ञानवत्तेशीं हें जें स्-रूपीकरण तो मनुष्याच्या व प्राण्याच्या दोघांच्याहि बुद्धीचा सर्वत्र सारखाच व्यापार असून, त्यापासून जें ज्ञान होतें तें, सादृश्यें व भिन्नभाव हे जाणण्याचें ज्या मानानें त्या माणसामध्यें किंवा प्राण्यामध्यें सामर्थ्य असेल, त्या मानानें यथार्थ असतें. ज्या ठिकाणीं ज्ञानाचे विषय साधे असून त्यांचे संबंध साधे, प्रत्यक्ष, आणि निकट असतात त्या ठिकाणीं हें वर्गीकरण साध्या बुद्धीस करतां येतें; पण ज्या मानानें ज्ञानविषय संकीर्ण असतील आणि त्यांच्यांतील संबंध घोंटाळ्याचे, अप्रत्यक्ष, आणि दूरवरचे असतील, त्या ठिकाणीं हें वर्गीकरण तितकी संमिश्र वाढ झालेल्या बुद्धीसच करतां येणार आहे. अशा प्रकारची बुद्धि नसल्यास ज्ञानविषयांचें आणि ज्ञानविषयकसंबंधांचें हें वर्गीकरण स्पष्टपणें सदृश दिसणाऱ्या विषयांशीं व संबंधांशीं तेवढेंच होतें. पण ह्यामुळें चुकी होण्याचा संभव असतो. कारण वस्तू ज्या परस्परसंबद्ध असतात त्या त्यांच्या अत्यन्त स्पष्ट गुणधर्मांवरूनच नेहमीं असतात असें नाहीं; आणि संबंधांचे जे अत्यन्त स्पष्ट विशेष असतात, तेच नेहमीं मुद्याचे असतात असेंहि नाहीं.

आतां अशा रीतीनें ज्या अत्यन्त सामान्य चुका होतात त्यांपैकीं कांहींचा विचार करूं. प्राणिविषयक पुरातन ग्रंथांत व्हेल ह्या प्राण्यांस माशांच्या वर्गांत घातलेलें आहे. ते पाण्यांत राहतात, आणि आकारानें माशांसारखे दिसतात; तेव्हां ते दुसरे काय असणार? ज्यास गादा किंवा घड्याळ मासा म्हणतात त्याचें कॉड माशा-

पेक्षां कुत्र्याशीं जास्त साम्य आहे असें सांगितल्यास शं-भरांपैकीं नव्याण्णव माणसें आश्चर्यानें तोंडांत बोटें घा-लतील. स्पष्ट सादृश्यांवरून वर्गीकरण केल्यामुळें होणाऱ्या असल्या चुका जर सुधारलेलीं माणसें करितात, तर असुधारलेले लोक ह्याच कारणामुळें असल्या चुका करितात ह्यांत आश्चर्य नाहीं. लोंकरीचें कापड म्हणजे कातडें नव्हे हें एस्किमो लोकांस खरें वाटेना. कांच त्यांना बर्फ म्हणून वाटली, आणि बिस्किट म्हणजे कस्तुरी वैलाचें सुकलेलें मांस वाटलें. त्यांचें वस्तुज्ञान इतकें अल्प असल्यामुळें त्यांनीं हीं जीं वर्गीकरणें केलीं तीं त्यांच्या दृष्टीनें सयुक्तिकच होतीं. हीं वस्तुविषयक वर्गीकरणांचीं उदाहरणें झालीं; आतां संबंधविषयक वर्गीकरणांचीं उदाहरणें पाहूं. प्रथम सुधारलेल्यांच्या समजुती घेऊं. पावसाळ्या दिवसांत हवेंत बाष्प पुष्कळ असल्यामुळें थंड भिंतींशीं त्याचा संयोग होऊन द्रवीभवन होतें, आणि भिंती सदावतात; तेव्हां भिंतीस घाम आला म्हणतात. म्हणजे काय तर भिंतीवर कोणी पाणी घातल्याशिवाय तें तिच्यावर दृष्टीस पडतें ह्यावरून माणसाच्या आंगाच्या त्वचेंतून घाम येतो त्याप्रमाणें तो भिंतींतून येतो असें समजतात. ही जर सुधारलेल्यापैकीं खालच्या वर्गाची स्थिति आहे तर आरिनोकोमधील इंदियन लोक दंव म्हणजे ताऱ्यांची थुंकी होय असें समजतात ह्यांत नवल नाहीं. आतां ही समजूत कशी उत्पन्न होते ती पहा. दंव पानांवर वगैरे दिसतें म्हणून तें थुंकणाराच्या थुंकीप्रमाणें वरून पडल्यासारखें वाटतें. बरें, तें निरभ्र रात्रीं पडतें; तेव्हां त्यावेळीं वर दिसणारे ने

तारे त्यांच्यापासूनच्च अंतलें असावें असें वाटतें. सारांश देव हा पदार्थ, आणि देव व त्याचें उत्पत्तिस्थान ह्यांचा संबंध ह्यांची त्यांच्याशीं स्पष्ट गुणांनीं सदृश दिसणाऱ्या वस्तूंशीं व संबंधाशीं ते जोडं लावून देतात.

रानटचांच्या कल्पनांचा आणखी एक विशेष अशाच रीतीनें स्पष्ट करून दाखवतां येण्यासारखा आहे. ज्ञान जसजसें वाढत जाईल व निरीक्षण बारीक होत जाईल तसतशीच, एकाद्या कारणाची एकादें कार्य उत्पन्न करण्याची शक्ति त्याच्या कांहीं षिशेष गुणावर, किंवा विशेष भागावर, किंवा त्याच्या अनेक गुणांच्या विशेष संयोगावर अवलंबून असते, ही गोष्ट माणसाच्या ध्यानांत येऊं लागते. पण हें ज्ञान रानटचामध्यें नसतें; म्हणून कांहीं विशिष्ट समजुती रानटी लोकांत सर्वत्र दृष्टीस पडतात. एकाद्या पदार्थांत किंवा त्याच्या भागांत जर कांहीं विशेष शक्ति दृष्टीस पडली तर तो पदार्थ किंवा तो भाग खाल्ल्यानें ती आपल्या अंगीं येईल असें रानटी माणसास वाटतें. डाकोटा लोक आपले शौर्य.वाढविण्यासाठीं मारलेल्या शत्रूचें काळीज खातात; न्यूझीलंदरलोक दृष्टि तीक्ष्ण करण्यासाठीं मृत शत्रूचे डोळे खातात. वाघाची शक्ति व क्रूरता अंगीं यावी एतदर्थ आबिपोन लोक त्याचें मांस खातात.

भौतिकशास्त्रविषयक कल्पना अल्प व अस्पष्ट असतील तोंपर्यंत कोणत्याहि कार्याबद्दल कोणतेंहि कारण योग्य वाटतें. खाणवाल्याच्या पिकिंदरानें उघड्या होणाऱ्या व दगडांचें स्वरूप पावलेल्या प्राण्यांच्या किंवा वनस्पतीच्या सांगाड्याबद्दल खाणवाल्यास विचारल्यास ते सृष्टीचे खेळ आहेत असें तो उत्तर देईल; व तेवढ्यानें त्याची तृप्ति

होईल. पाण्याचा बंब नीट करणाऱ्या नळवाल्यास बंबांत पाणी कसें चढतें म्हणून विचारल्यास तें चोखण्यानें चढतें म्हणून सांगेल; पण चोखणें म्हणजे काय, व ती क्रिया कशी उत्पन्न होते ह्याबद्दल तो चवकशी करणार नाहीं. तद्वतच एकादी अपरिचित गोष्ट दिसली म्हणजे सुशिक्षित लोक देखील ती विजेनें उत्पन्न होते असें म्हणून स्वस्थ बसतात. पण ह्याचा व त्याचा वास्तविक संबंध असतो कसा व तो उत्पन्न होतो कसा ह्याबद्दल त्यांस जिज्ञासा किंवा जरूरी वाटत नाहीं. सुधारलेल्या माणसाची जर अशी स्थिति आहे तर कमी अनुभव असलेल्या सैबीरियन माणसास मामथ प्राणी बर्फांत पुरलेले पाहून व त्यांचीं हाडें जमिनींत पुरलेलीं पाहून भूकंप त्यांच्याच योगानें होतात असें वाटल्यास, किंवा ज्वालामुखीसन्निध राहणाऱ्या रानटयांस आपल्या मृत पूर्वजांनीं पेटवलेले ते विस्तव होत असें वाटल्यास, त्यांत नवल तें कोणतें ?

ह्या वरच्या विशेषांवरून आणखी एक विशेष उत्पन्न होतो; तो हा कीं रानटी लोकांच्या मनांत घोंटाळ्याच्या व परस्परविरुद्ध अशा कल्पना उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, मालागासी लोक असें मानतात कीं ते मेले म्हणजे त्यांचें अस्तित्व समूळ नष्ट होतें; आणि असें असूनहि ते आपल्या मृत पूर्वजांची प्रार्थना करितात. आपल्यामध्येंहि असले वेडे समज दृष्टीस पडतात. विंचवानें नांगी मारिली असल्यास विंचवास मारिलें म्हणजे विष उतरतें असें आपण समजतों. तेव्हां रानटी लोकांमध्यें अशा असंबद्ध समजुती उत्पन्न होतात यांत नवल नाहीं.

असो. अशा रीतीनें आपली मूळ कल्पना समजण्या-

ची शक्य ती तयारी झाली आहे. त्याचें वास्तविक समर्थन करण्यास त्यांच्या स्थितींत त्या स्वाभाविक असतां तें हें ध्यानांत वागविलें पाहिजे. सुधारलेल्याचे मनाप्रमाणेंच रानट्याचें मन वस्तूंचें व संबंधांचें गत अनुभवांतील तत्सदृश वस्तूंशीं व संबंधांशीं वर्गीकरण करून पुढें पाऊल टाकतें. पुरेशा मनःशक्तीच्या अभावीं स्पष्ट सादृश्यांच्या आधारानेंच वस्तूंचीं, संबंधांचीं, व क्रियांचीं वर्गीकरणें त्याच्या मनांत उत्पन्न होतात; आणि त्यामुळें उत्पन्न होणारे समजहि स्थूल असून सरल व अल्पसंख्य असतात. शिवाय ह्या स्थूल कल्पना फारच असंबद्ध असतात. असो; तर आतां अशा रीतीनें बनलेल्या आणि असल्या गुणधर्मांनी विशिष्ट असलेल्या कल्पनांकडे नजर फेंकूं या.

५३. कांहीं वेळापूर्वी स्वच्छ असलेल्या आकाशांत रानट्याच्या दृष्टीस लहानसा ढग पडतो, आणि तो तिकडे पाहत असतांच तो आकारानें वाढतो. दुसऱ्या वेळीं एकादा मोठा ढग त्याचे तुकडे तुकडे निघून जाऊन नष्ट होतांना तो पाहतो. ह्या गोष्टी पाहून त्याच्या मनांत काय विचार उत्पन्न होत असतील बरें? पाण्याची वाफ बनणें आणि वाफेचें पुनः पाणी बनणें ह्याबद्दल त्यास कांहींच ज्ञान नसतें. बरें, 'त्यांत काय आहे? तो नुसता ढग आहे.' असें उत्तर देऊन त्याचें समाधान करण्यासहि त्याच्यापाशीं कोणी सुधारलेला माणूस नसतो. पूर्वी दिसत नसलेलें कांहीं दृश्य झालें आहे, आणि आतांच दृश्य असलेलें कांहीं नष्ट झालें आहे असें त्याच्या नजरेस येतें; तें कोठून आलें, कोठें गेलें व कां

गेलें हें त्यास कांहीं सांगतां येत नाहीं; पण कांहीं तरी दृश्य झालें व अदृश्य झालें ही गोष्ट मात्र त्यास निःसंशय वाटते.

ह्याच वरच्या भागांत (आकाशांत) दुसरे कांहीं फेरबदल त्याच्या दृष्टीस पडतात. दिवस मावळूं लागला म्हणजे आकाशांत कांहीं सतेज बिंदू (तारे) त्यास विरळ विरळ दिसूं लागतात, आणि काळोख जास्त जास्त होईल तसतसे ते जास्त चकचकीत दिसूं लागतात, आणि त्यांची संख्याहि वाढते; बरें पुनः पहाटेस ते मंद होऊं लागतात, आणि शेवटीं अगदीं अदृश्य होतात. आकार, रूप, रंग ह्या गोष्टींत जरी ते ढगांपासून अगदीं भिन्न दिसतात, तसेंच ते नेहमीं बहुधा एकाच ठिकाणीं दृश्य होत असल्यामुळें आणि अगदीं हळू हळू चलन पावत असल्यामुळें त्या बाबतींतहि जरी ते ढगांपासून भिन्न दिसतात, तरी दृश्य होणें व अदृश्य होणें ह्या बाबतींत त्यांचें ढगांशीं साहश्य दिसतें. मोठ्या प्रकाशानें लहान प्रकाश अगदीं झांकून जातो, आणि दिवसासहि तारे दिसले नाहींत तरी प्रकाशत असतातच, ह्या गोष्टी अर्थात् त्याच्या अगदीं कल्पनेच्या पलीकडे असतात. त्याला दिसतें तें एवढेंच कीं ह्या वस्तू केव्हां दृश्य असतात, व केव्हां अदृश्य असतात.

'सूर्य आणि चंद्र हे देखाव्यानें ढगांपासून व ताऱ्यापासून जरी इतके भिन्न दिसतात, तरी त्यांच्यामध्येंहि हें क्रमाक्रमानें दृश्यदृश्य होणें आहेच. सूर्य डोंगराच्या पलीकडच्या बाजूस उगवतो; तो क्वचीं कधीं ढगांनीं आच्छादित होतो खरा, पण पुनः दिसूं लागतो, आणि शेव-

टीं समुद्रांत बुडतो. चंद्र याग्रमाणेंच करून शिवाय कांहीं. रात्री अनुक्रमें मोठा होत जातो, व कांहीं रात्री लहान होत जातो.

ह्या नेहमींच्या व नियमित दृश्यादृश्यतेव्यतिरिक्त आणखी ध्यानांत राहण्यासारख्या कांहीं दृश्यादृश्यता आहेत; उदाहरणार्थ, उल्का, शेंडेनक्षत्रें, वगैरे. ह्या सर्व गोष्टी पाहून आकाश म्हणजे निरनिराळ्या वस्तूंच्या आगमनानिर्गमनांचें स्थान होय, त्या कोठूनहि येवोत व कोठेंहि जावोत, असें रानटचाच्या सहजच मनांत येतें.

वस्तू न समजतां दृश्य होणें व पुनः अदृश्य होणें, ह्या गोष्टी केवळ आकाशांतच दिसतात असें नाहीं, तर पृथ्वीच्या पृष्ठभागावरहि त्या दृष्टीस पडतात. वरून कोठून तरी पाऊस पडून पाण्याचीं लहान लहान डबकीं जमतात, आणि थोडक्या वेळानें पुनः तीं अदृश्य होतात. धुक्याच्यासंबंधानेंहि त्यास तोच अनुभव येतो; केव्हां तें दृष्टीस पडतें, व पुनः तें लवकरच, कसें तें न समजतां, नष्ट होतें. एकादे वेळीं कोठें तरी दूर एक सरोवर (मृगजल.) दृष्टीस पडतें, पण त्याच्या नजीक जाऊं लागावें तों तें जास्तच मागें जातें, आणि सांपडत तर नाहीं. समुद्राकडे पाहावें तर कधीं कधीं त्यास एकादें तारूं आकाशांत उलट टांगलेलें एकेरेंच दृष्टीस पडतें, आणि कधीं कधीं त्याच्यावर आणखी एक सुलट तारूं टांगलेलें दृष्टीस पडतें. कधीं कधीं त्याला धुक्यावर आपलीच राक्षसी मुद्रा दृश्य होते, व पुनः ती नष्ट होते. सारांश, हें सर्व कांहीं परिचित व कांहीं अपरिचित असे देखावे तोच तोच अनु-

भव त्यास आणून देतात; तो हा कीं दृश्याचें अदृश्य होणें, आणि अदृश्याचें दृश्य होणें.

आतां आपण असा विचार करूं कीं, वाऱ्याबद्दल मूळ लोकांची कल्पना काय असली पाहिजे? हल्लीं जी आपली हवेची कल्पना आहे ती मूळ लोकांस त्यांच्या अनुभवावरून प्राप्त व्हावी असें त्यांच्या अनुभवांत कांहींच असत नाहीं; आणि आपल्या सभोंवतालचें आवरण हें नेहमींच्या द्रव्यांपैकीं एक आहे, हें लक्षांत आणण्यास आपणास देखील लहापणीं कठीण जातें. सारांश, ज्या वस्तू दिसतात व आपल्यास वापरतां येतात त्यांपैकींच हवा ही एक आहे हें रानट्यास समजण्याचें त्याजपाशीं साधन नसतें. असो. अशा ह्या रित्या दिसणाऱ्या सभोंवतालच्या पोकळींत वेळोवेळीं झाडांना वांकविणारी, पानें उडवून टाकणारी, पाण्याला तरंग उत्पन्न करणारी, कधीं कधीं ह्याच्या अंगावरून मंद मंद वाहणारी आणि कधीं कधीं ह्यास चालतांना पुढें ढकलणारी अशी एक अदृश्य शक्ति उत्पन्न होते हें त्यास कळतें; पण ह्या शक्तीचें स्वरूप काय असेल हें त्यास समजण्याचें साधन कांहींच आढळत नाहीं. तथापि एक गोष्ट मात्र त्याच्या ज्ञानशक्तीवर जोरानें येऊन आदळते. ती ही कीं आपणास दिसत नाहीं किंवा धरतां येत नाहीं, अशी कांहीं तरी वस्तू आवाज करिते, सभोंवतालच्या वस्तूंस हालविते, आणि कधीं कधीं आपणासहि पुढें मागें ढकलण्यास कमी करीत नाहीं.

तेव्हां निरिंद्रिय सृष्टीबद्दलच्या ह्या अनुभवांवरून काय कल्पना मूळ माणसाच्या मनांत होतात बरें? त्यांबद्दल एकादी कृति बसविण्याचें सामर्थ्य तर अर्थात् त्याच्यामध्यें

नसतेंच. तेव्हां निरनिराळ्या कालान्तरांनीं होणारे जे हे निरनिंराळे चमत्कार ते त्याच्या मनांत कोणतें मानसिक साहचर्य उत्पन्न करितात बरें ? दृश्यरूपानें अस्तित्व आणि अदृश्यरूपानें अस्तित्व ह्यांमधील संबंध त्या चमत्कारांवरून अनेक स्वरूपांनीं त्यास व्यक्त होतो ह्यांत संशय नाहीं. तेव्हां ह्या संबंधाबद्दल त्या रानट्यास काय वाटतें ? बाष्पीभवन आणि आर्द्रीभवन ह्या स्वरूपानें, किंवा दृष्टिभ्रमाच्या स्वरूपानें, किंवा भौतिकशास्त्राच्या शब्दांनीं, त्यास ह्या संबंधाचा विचार करतां येणें शक्यच नाहीं. तर मग ह्या संबंधास तो आपल्या मनांत काय स्वरूप देतो बरें ? ह्या प्रश्नाचें उत्तर लहान मुलांच्या कांहीं विधानांकडे लक्ष दिल्यास ध्यानांत येण्यास मदत होणार आहे. जादूच्या कंदिलानें पडद्यावर पाडिलेली छाया जेव्हां भिंगाची पट्टी काढल्याबरोबर झटकन् नाहींशी होते, किंवा आरशानें भिंतीवर पाडिलेलें प्रतिबिंब आरसा फिरविल्याबरोबर झटकन् दिसत नाहींसें होतें तेव्हां मूल विचारितें "तें कोठें गेलें ?" तात्पर्य त्याच्या मनांत तें अगदींच नष्ट झालें अशी कल्पना येत नाहीं, तर केवळ अदृश्य झालें अशी कल्पना येते; आणि ही कल्पना त्याचे मनांत उत्पन्न होण्यास कारण त्याचा माणसांच्या किंवा खेळाच्या वगैरे संबंधानें रोजचा अनुभव होय. याचप्रमाणें मूळ माणसाची वरील गोष्टींच्या संबंधानें अशी कल्पना होते कीं त्या वस्तू कधीं दृश्य होतात आणि कधीं लपून बसतात. वारा न दिसतां निरनिराळे चाळे करितो ह्यावरून ह्या समजास संभाव्यपणा येतो.

आतां एवढेंच सांगावयाचें कीं ह्या दृश्यादृशाच्या

कल्पनेवरून द्वित्वाची कल्पना उत्पन्न होते. ह्यांपैकीं प्रत्येक वस्तू एका अर्थीं दुबार दिसते; कारण तिला दृश्य आणि अदृश्य असें दोन प्रकारचें अस्तित्व दिसतें.

९४. आतां दुसऱ्या एका प्रकारच्या गोष्टींचा विचार करूं; कारण त्यांवरूनहि वस्तूंना एका प्रकारचें स्वरूप जाऊन दुसऱ्या प्रकारचें कसें येतें हें समजतें. त्या गोष्टी अर्थात् प्राणी व वनस्पति यांचीं शवें खडकांत गढलेलीं पाहून रानट्याच्या मनांत ज्या कल्पना येतात त्या.

समुद्रकिनाऱ्यावर खाद्य गोळा करीत असतां त्यास खडकांतून पुढें आलेली एकादी शिंप आढळून येते. आणि ती नेहमींच्याच शिंपेच्या आकाराची अगदीं नसली तरी इतकी सदृश दिसते कीं, तीस तो त्याच वर्गांत घालितो. पण ती सुटी नसून खडकाशींच एकस्वरूप झालेली दृष्टीस पडते; आणि आंत मऊ नसून आंतून बाहेरून सारखीच घट्ट आहे असें त्यास आढळून येतें. सारांश, ह्या ठिकाणीं त्याला दोन स्वरूपें दृष्टीस पडतात; एक शिंप आणि मांस यांचें बनलेलें, आणि दुसरें शिंप आणि दगड यांचें बनलेलें. कधीं कधीं ओढ्याच्या बुडीं दगडावर माशाची आकृति उठलेली त्यास आढळून येते, आणि कधीं कधीं तो पारध करितो तसल्या जनावरांच्या हाडांसारखीं हाडें किंवा माणसाच्याहि हाडांसारखीं हाडें खडकाच्या पोटांत त्यास आढळतात. झाडांचे दगड बनलेले पाहून ही द्वित्वाची कल्पना जास्तच दृढ होते.

आतां ह्या सर्व गोष्टींस भौतिक कारणें आहेत; पण तीं सुधारणा होतां होतां अनुभवानेंच आपल्या ध्यानांत आलेलीं आहेत. तसा अनुभव आपल्यास नसल्यास आ-

पणासहि रानटी माणसाप्रमाणेंच वाटलें असतें; म्हंणजे वस्तूंनां एका जातीच्या द्रव्याचें रूप जाऊन दुसऱ्या जातीच्या द्रव्याचें येऊं शकतें असा आपला समज झाला असता. आणि ह्या द्रव्यान्तरकल्पनेबरोबर द्वित्वकल्पनाहि सहजच आली असती, हेंहि विसरतां कामा नये.

९५. शिक्षणानें स्पष्ट होणारीं सत्यें स्वभावतःच स्पष्ट असतात असें आपण अविचारानें गृहीत करितों; नाहीं तर, द्रव्य आणि आकार यांजमध्यें पाहिजे तितका फेरफार होऊं शकतो असा रानट्याचा समज होणें अगदीं साहजिक आहे ही गोष्ट आपल्या लक्षांत येण्यास कठीण पडलें नसतें. सजीव वस्तूंमध्यें होणारे कांहीं फेरफार स्वाभाविक आहेत आणि कांहीं अगदीं अशक्य आहेत असें आपण लहानपणापासून ऐकत असतों; आणि त्यावरून हा भेद प्रारंभापासूनच आपल्या लक्षांत आला होता असें आपण समजतों. पण प्रारंभीं अनुभवास येणाऱ्या फेरफारांवरून, पाहिजे तो फेरफार शक्य आहे असें रानटी माणसास सहजच वाटत असतें.

बीज आणि वृक्ष यांचे आकार आणि रचना यांमध्यें केवढा मोठा भेद आहे हें लक्षांत आणा. बीजाची वाढ होऊन त्याचेंच रोप बनतें असें आपणास लहानपणीं सांगतात; आणि असें कांहींतरी पोकळ उत्तर मिळालें म्हणजे त्यांतच समाधान पावून आपण त्याबद्दल आश्चर्य मानण्याचें किंवा चवकशी करण्याचें सोडून देतों. पण हें जर आपणास कोणीं सांगितलें नसतें तर आपली काय कल्पना झाली असती बरें? अर्थात् बीजाचें रूपान्तर होऊन त्याच्याऐवजीं रोप बनतें अशी आपली

कल्पना झाली असती. कल्पना कांहींहि असो; एका प्रकारच्या आकार, आकृति व रंग असलेली वस्तू अगदीं निराळ्या प्रकारच्या आकाराची, आकृतीची आणि रंगाची बनलेली ह्या ठिकाणीं दिसते ह्यांत शंका नाहीं.

पक्ष्यांच्या अंड्यांचीहि गोष्ट अशीच आहे. थोड्या दिवसांपूर्वी वाटोळ्या, मऊ आणि ठिपकेदार अशा पांच वस्तू ह्या घरट्यांत होत्या; आणि आतां त्यांच्याऐवजीं खाण्यासाठीं चोंची उघडणारीं पांच पोरें दिसत आहेत. अंडीं उबून त्यांचीं पोरें बनलीं असें आपणास लहानपणापासून सांगत आले आहेत, आणि ह्या उत्तरानेंच आपली तृप्ति आजपर्यंत झालेली आहे. हा फेरफार सृष्टीमध्यें नेहमीं होत असल्यामुळें आपणास त्यामध्यें कांहींच वैलक्षण्य वाटत नाहीं. पण ज्या माणसाला ह्या गोष्टी स्वतःच्या किंवा इतरांच्या अनुभवानें कळलेल्या नाहींत त्याला अंड्याचें पोर बनण्यापेक्षां फळाचें पोर बनणें ह्यांत जास्त चमत्कारिकपणा वाटणार नाहीं.

कीटकसृष्टीमध्यें हीं रूपान्तराचीं उदाहरणें जास्तच चमत्कारिक दृष्टीस पडतात. घुल्याचा कांहीं दिवसांनीं 'कोश्स्थ किडा बनणें, आणि त्याचें कांहीं दिवसांनीं फूलपांखरूं बनणें म्हणजे एका वस्तूची अगदीं भिन्न अशी नवीच वस्तू बनणें असें रानटयास सहजच वाटतें.

हीं वास्तविकरीत्या होणारीं रूपान्तरें आणि बाहेरून होतात म्हणून दिसणारीं परंतु खरोखर अशक्य अशीं रूपान्तरें, ह्यांचा रानट्यांच्या मनांत कसा गोंधळ होतो हें कांहीं किडे सभोंवतालच्या वस्तूंचे रंग वगैरे हुबेहूब कसे धारण करितात ह्यावरून स्पष्ट लक्षांत येईल. पुष्क-

ळ प्रकारचे घुले, झुरळ, पतंग आणि फूलपांखरें त्यांच्या सभोंवतालच्या वस्तूंप्रमाणें नक्की दिसत असतात. कांहीं किडे ते ज्या झाडावर राहतात त्याच्या सालीच्याच रंगाचे असतात; त्यामुळें ते हालूं लागल्याशिवाय ओळखत नाहींत; आणि अशा रीतीनें सालच सजीव झाल्याचा भास उत्पन्न होतो. कांहीं किडे आपलें शरीर असें गुंडाळून घेऊं शकतात कीं ते तेव्हां मातीच्या वाटोळ्या ढिपळासारखे किंवा गोटीसारखे भासतात. कांहीं किडे हुबेहुब लहान लहान डाहाळ्यांप्रमाणें व पानांप्रमाणें दिसत असतात. त्यामुळें हे किडे म्हणजे सजीव झालेलीं पानें किंवा डहाळ्याच आहेत असें अज्ञान माणसास सहजच वाटतें.

अशा रीतीनें कांहीं गोष्टींच्या संबंधानें असला समज उत्पन्न झाला म्हणजे तो इतर गोष्टींनाहि सहजच लागू होत जातो. शेपटीच्या पण बिन पायाच्या बेडकुळीचा पायाचा पण बिनशेपटीचा बेडूक झालेला पाहून, पाहिजे त्या प्रकारच्या प्राण्यास पाहिजे त्या प्रकरच्या प्राण्याचें रूप येऊं शकेल असें रानटी माणसास सहजच वाटतें. आणि अशा रीतीनें द्वित्वाच्या कल्पनेस जोर येतो. म्हणजे प्रत्येक वस्तू प्रत्यक्ष दिसते तशी असून शिवाय तिच्या अंगीं अन्य वस्तू होण्याचें गूढ सामर्थ्य असतें असा त्याचा दृढ समज होतो.

५६. आतां सांवलीचा विचार करूं. सांवली म्हणजे काय हें आपणास समजतें. पण अडाणी माणसास त्याबद्दल काय वाटतें बरें? ज्यांची लहानपणची आठवण अगदींच बुजालेली नाहीं त्यांस स्मरत असेल कीं लहानपणीं

आपल्या छायेकडे पाहण्यास आपणास मोठी मौज वाटते; आपण हात, पाय, बोटें वगैरे हालवून त्याबरोबर त्यांची छाया कशी हालत असते हें मौजेनें पहात असतो. लहान मुलांना छाया म्हणजे स्वतंत्र वस्तूच वाटत असते; आणि तसें वाटणें साहजिकच आहे. कारण तिलाहि आकार व रंग असून शिवाय ती हालते. तेव्हां छाया म्हणजे प्रकाशाचा अभाव हें प्रथमच कसें ध्यानांत यावें ?

लहान मुलाप्रमाणें रानटी माणसासहि छाया स्वतंत्र वस्तू आहे, आणि ती ज्याची ती छाया असेल त्याची सहचारी आहे असें वाटतें; कारण ती नेहमीं त्याच्या समवेत असते. आकाशांत ढग असले किंवा काळोखी रात्र असली म्हणजे ती दिसत नाहीं हें खरें आहे, पण त्यावरून तो एवढाच तर्क करितो कीं ती उन्हाच्या दिवशीं व चांदण्या रात्रीं तेवढी त्याची सहचारी असते. तद्वतच माणूस उभा असेल तेव्हांच हा सहचारी त्याच्यासारखा दिसून त्याच्यापासून पृथक् दिसतो; माणूस आडवा झाला म्हणजे ती अदृश्य होऊन कांहीं अंशीं त्या माणसांतच बुजलेली दिसते. पण हें पाहून छायेच्या वास्तविकपणाबद्दल जो त्याचा ग्रह तो जास्तच दृढ होतो. आपली छाया आपल्यापासून कमजास्त निराळी झालेली पाहून कधीं कधीं छाया अगदींच निराळ्या कशा असतात ह्याची त्यास आठवण होते; उदाहरणार्थ, ढगांच्या डोंगरांवरून चलन पावणाऱ्या छाया आतां त्या ढगांच्याच आहेत किंवा नाहीं हें त्यास न समजलें तरी छाया पदार्थांपासून अगदीं निराळ्या असूं शकतात हें त्यावरून त्याच्या ध्यानांत येतें.

सारांश, छाया म्हणजे मूर्त पदार्थांना जोडलेल्या पण त्यांजपासून भिन्न असलेल्या अशा कांहीं वस्तू आहित असें रानटी माणसास सहजच वाटतें; आणि असें त्यास वाटतें ह्याबद्दल पुरावाहि सांपडतो. बेनिनमधले नीग्रोलोक माणसांच्या छाया म्हणजे त्यांचे आत्मे होत असें मानतात. बानिका लोकांस आपल्या छायांची भीति वाटते. ग्रीनलंदर लोक असें मानतात कीं माणसास दोन आत्मे असून त्यांपैकीं छाया हा एक आत्मा आहे, व तो रात्रीं त्यास सोडून जात असतो. फिजियन लोक देखील छायेस माणसाचा काळा आत्मा म्हणून म्हणतात. आणि पुष्कळ निरनिराळ्या भाषांतून छाया आणि आत्मा ह्यांच्यां अर्थांत जें साम्य दिसतें त्यावरूनहि तीच गोष्ट व्यक्त होते.

५७. छायेवरून जर द्वित्वाची कल्पना उत्पन्न होते तर प्रतिबिंबावरून ती कल्पना जास्तच दृढ होते; कारण प्रतिबिंब म्हणजे मूळाची हुबेहुब नक्कल असून त्याच्या ठिकाणीं आकार, रंग, उजेड, आंधारांतले भाग, हीं सर्व जशींच्या तशीं दिसून शिवाय मूळाच्या चेष्टाहि त्याच्या ठिकाणीं दिसत असतात. आतां इतर वस्तूंपासून दर्शनज्ञानाव्यतिरिक्त जसें स्पर्शज्ञान होत असतें, तसें ह्या वस्तूंपासून होत नाहीं हें खरें आहे. पण त्यावरून एवढीच कल्पना उत्पन्न होते कीं कांहीं वस्तू दर्शनज्ञेय असून स्पर्शज्ञेय नसतात. प्रतिबिंब परावृत्त किरणांपासून उत्पन्न होतें ही गोष्ट शास्त्रीय ज्ञान झाल्याशिवाय ज्ञात व्हावयाची नाहीं; आणि प्रतिबिंब म्हणजे केवळ दिखाऊ गोष्ट आहे हें रानटी माणसास कोणी सांगण्यास नसल्यामुळें त्याला ती वास्तविक वस्तु आहे, व ज्याचें तें

प्रतिबिंब असेल त्याची ती आहे असें त्यास सहजच वाटतें. शिवाय हीं प्रतिबिंबें जेव्हां तो पाण्यांत पाहतो तेव्हां त्यावरून त्यास त्याच्या इतर कांहीं समजुतींचा पडताळा सांपडतो. वर जसे ढग दिसतात तसे स्वच्छ पाण्याच्या बुडींहि दिसत नाहींत काय? वरचे ढग दृश्य होतात आणि अदृश्य होतात; त्यास कारण हे खालचे ढग नसतील-ना? वरें रात्रीचे वर उंच जसे तारे चकाकतात तसे पाण्यांत फार खोलहि तारे चकाकतात. तर मग ताऱ्यांचीं दोन वस्तिस्थानें आहेत कीं काय? आणि दिवसां जे तारे अदृश्य झाले ते वाकीचे तारे जेथें खालीं आहेत तेथें गेले कीं काय? आणखी एक गोष्ट पाण्याच्या डबक्यावर ओथंबलेलें एक मेलेलें झाड आहे; त्याच्या फांद्या तो जाळण्यासाठीं काढीत असतो. त्याचेंहि प्रतिबिंब त्या पाण्यांत दिसत नाहीं काय? आणि जी फांदी तो जाळितो, आणि जी जळतांना नष्ट होत जाते, तिच्या त्या अदृश्य स्थितीमध्यें, आणि पाण्यामध्यें दिसणाऱ्या तिच्या प्रतिबिंबामध्यें कांहीं संबंध नाहीं काय?

प्रत्येक माणसाची एक नक्कल असून तीं नेहमीं जरी अदृश्य असली तरी पाण्याच्या बाजूस गेलें म्हणजे दृश्य होते असा समज प्रतिबिंबापासून उत्पन्न होतो, हा केवळ तर्क नाहीं, तर तसा प्रत्यक्ष पुरावाही सांपडतो. सांवली हा माणसाचा काळा आत्मा होय असें फिजियन लोक मानतात हें वर सांगितलेंच; त्याशिवाय ते माणसास आणखी एक आत्मा आहे म्हणून समजतात; आणि तो कोणता म्हणाल तर आरशांत किंवा पाण्यांत दिसतो तो; हा आत्मा माणूस मरेल त्या ठिकाणाजवळ राहतो म्हणून ते

समजतात. हा दोन आत्म्यांबद्दलचा समज अगदीं स्वाभाविक दिसतो. कारण माणसाची छाया आणि पडच्छाया हीं अगदीं निरनिराळीं नाहींत काय? आणि तीं त्या माणसाबरोबर आणि एकमेकांबरोबर अस्तित्वांत नसतात काय? तो पाण्याच्या बाजूनें चालूं लागला म्हणजे पाण्यावरील त्यांचें प्रतिबिंब आणि किनाऱ्यावरील त्याची सांवली हीं दोन्हीं त्याच्याबरोबर चालूं लागतात हें त्यास दिसत नाहीं काय? हीं दोन्ही जरी त्याचीं असलीं तरी तीं त्याच्यापासून व एकमेकांपासून पृथक् आहेत हें तो स्पष्ट पाहतो; कारण दोन्हीहि एकाच वेळीं गैरहजर असूं शकतात, किंवा एक दुसऱ्याच्या अभावीं हजर असूं शकतें.

९८. आपण अगदीं अज्ञान असून आपणच ठोकलेली आरोळी आपल्या कानावर परत आली, तर आपणास काय वाटेल बरें? निःसंशय आपणास असें वाटेल कीं ती आरोळी दुसऱ्या कोणी तरी दिली असली पाहिजे. तेव्हां अशा रीतीनें पुनः पुनः ठोकलेल्या आरोळ्या आपल्याच सुरावर पुनः आपल्या कानीं आलेल्या पाहून रानटचास असें वाटतें कीं कोणी तरी मनुष्य जवळच लपून बसला आहे आणि आपणास वेडावीत आहे. नंतर त्या माणसास शोधून काढण्याची तो खटपट करीत असेल. आणि तो सांपडत नाहींसें पाहून तो फारलुचा आहे अशी त्याची खात्री होत असेल. नंतर त्याच ठिकाणीं जो जो ओरडेल त्यास त्यास वेडावलेलें पाहून त्या रानटी माणसाच्या मनाला सहजच असें वाटेल कीं अदृश्यस्वरूप धारण केलेला किंवा वाटेल तेव्हां धारण करणारा असा एथें कोणी तरी आहे.

असुधारलेल्या माणसास प्रतिध्वनीचें स्वाभाविक कारण कांहींच ठरावितां येणार नाहीं. ध्वनीच्या लाटा असून त्यांचें परावर्तन होतें त्याबद्दल त्यास काय माहिती असणार ? सुधारलेल्या लोकांत तरी त्याबद्दल कितीकांना माहिती असते ? तेव्हां रानट्याला तसें वाटलें तर त्यांत नवल तें कोणतें ?

तसें त्यास वाटतें ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. आस्त्रिपोन लोकांबद्दल असें वर्णन आढळतें कीं मेलेल्या माणसाच्या आत्म्याचें काय होतें हें त्यांस समजत नाहीं, पण ते त्याला भितात, व प्रतिध्वनि हा त्याचा होय असें मानितात. मध्यअमेरिकेंतील कुमाना येथील इंदियन लोक आत्मा अमर आहे, तो खातो व पितो, आणि जो त्यास अनुलक्षून बोलेल किंवा त्यास हाक मारील त्याला तो प्रतिध्वनिरूपानें उत्तर देतो, असें समजतात. नायजर नदींतील प्रवासाबद्दल लँण्डर असें वर्णन करितो कीं, खाडींत वळण लागलें म्हणजे बोटीचा कप्तान भुताला हाक मारीत असे, आणि जेथें प्रतिध्वनि निघेल तेथें तो कांहीं दारू, मांस वगैरे पाण्यांत फेंकीत असे, आणि त्यांस कारण विचारतां, भुताचा शब्द आतां आपण ऐकिला नाहीं काय ? म्हणून विचारीत असे. असो. एवंच ह्या ठिकाणीं देखील रानट्याच्या मनांत द्वित्वाची कल्पना कशी दृढतर होत जाते हें स्पष्ट दिसतें.

५९. स्वतः मिळविलेल्या कल्पनांव्यतिरिक्त कांहीं ज्ञान नाहीं अशा माणसास, सभोंवतालच्या सृष्टींत अशा तऱ्हेचे पुष्कळ फेरफार ज्ञात होतात. आकाशांत आणि पृथ्वीवर वस्तू दृश्य होतात आणि अदृश्य होतात; आणि

त्या असें कां करितात हें समजण्याचें त्यास कांहींच साधन नसतें. पृथ्वीच्या पृष्ठभागावर आणि पोटांत द्रव्यान्तर पावलेल्या वस्तू म्हणजे मांसाचे दगड झालेल्या आणि लांकडाची गार झालेल्या वस्तू त्याच्या दृष्टीस पडतात. सजीव वस्तूंमध्येंहि सर्वत्र असे कांहीं फेरफार झालेले दृष्टीस पडतात कीं ते सुशिक्षितासहि फार अद्भुत वाटावे; आणि मूळमाणसास तर अगदीं अज्ञेयच वाटतात. आणि वस्तू दोन किंवा अधिक प्रकारचीं अस्तित्वें धारण करूं शकतात ही कल्पना अशा रीतीनें त्याच्या मनावर जी प्रथम ठसते, ती छाया, पडछाया आणि प्रतिध्वनी ह्यांनीं दृढतर होते.

सुधारणा होतां होतां स्थापन झालेलीं, आणि लहानपणीं आपणांस न समजतां प्राप्त होणारीं, अशीं सत्यें स्वतः स्पष्ट असतात असें आपण विचार न करितां गृहीत करितों; नाहींतर मूळ माणूस ह्या ज्या कल्पना बनवितो त्या अनिवार्यच आहेत हें आपल्या तेव्हांच ध्यानांत येईल. रूपान्तर होणें, वस्त्वन्तर होणें, आणि दुबार असणें, ह्या ज्या मूळ माणसामध्यें भावना उत्पन्न होतात त्या मानसिक साहचर्याच्या नियमांस अनुसरूनंच होतात; आणि अनुभवांस व्यवस्थित स्वरूप येईतोंपावेतों असल्या कल्पना बनावयाच्या बंद होणार नाहींत. वाढलेल्या ज्ञानाच्या दृष्टीनें बर्फ म्हणजे गोंठलेल्या पाण्याचें एक विशेष स्वरूप आहे, आणि गारा म्हणजे पडतां पडतां गोंठलेलें पावसाचें पाणी होय, असें आपण समजतों. पुनः त्यांचें पाणी झालें म्हणजे तीं वितुळलीं म्हणून समजतों, व तें उष्णतेचें कार्य होय असेंहि स-

गजतों. पण अगदीं अजाण माणसाच्या दृष्टीनें पाहतां हे सर्व फेरफोर म्हणजे द्रव्यान्तर म्हणून भासतात; म्हणजे एकप्रकारचें अस्तित्व जाऊन दुसऱ्या प्रकारचें अस्तित्व प्राप्त होणें अशा रूपानें भासतात.१ वर सांगितलेल्या इतर सर्व रूपान्तरांच्या संबंधानें त्याच्या मनाची हीच स्थिति होते.

असो. मूळ माणसाच्या मनांत असल्या अर्धवट कल्पना अस्ताव्यस्त रीतीनें बऱ्याचशा जमल्यानंतर पुढें काय होतें तें पाहूं या. तें पाहतांना ह्या कल्पना जरी भिन्नभिन्न असल्या तरी त्यांच्यांत कांहींसा सारखवटपणा असतो हें मात्र विसरावयाचें नाहीं. उत्क्रान्तीचा असा नियमच आहे कीं प्रत्येक समुच्चय संकलीभवन पावण्याच्या व संकलित होतां होतां विभिन्नीभवन पावण्याच्या मार्गास लागतो. तेव्हां मूळ कल्पनासमुच्चयाचेंहि तसें झालेंच पाहिजे. तेव्हां तें कसें होतें तें पाहूं या. ह्या अनेक अर्धवट कल्पनांचा रानट्याच्या मनांत अव्यवस्थित व भुसभुशीत असा एक गोळाच जणूं काय बनलेला असतो. म्हणून तो हळूहळू त्यांचे निरनिराळे समूह बनवूं लागतो; त्यांत सदृश सदृश कल्पना एके ठिकाणीं जमूं लागतात. पुढें ह्या समूहांचा जेव्हां एक व्यवस्थित गोळा त्याच्या मनांत बनूं लागतो, तेव्हां तोहि ह्याच तत्त्वावर बनूं लागतो; म्हणजे त्या समूहांमध्यें जें कांहीं सदृश्य असेल त्याच्या आधारावर तो गोळा बनत जातो. आतां ह्या दृष्टीनें पाहतां ह्या प्रस्तुत कल्पनासमूहांमध्यें काय सादृश्य आहे बरें ! अर्थात् हें द्वित्व सर्वांमध्यें सारखें दिसतें, आणि तद्वतच एका प्रकारचें अ-

स्तित्व टाकून दुसऱ्या प्रकारचें अस्तित्व धारण करण्याचें सामर्थ्यहि सर्वांमध्यें सारखें दिसतें. जोंपर्यंत मनानें कांहीं तरी कृप्ति बसविली नाहीं तोंपर्यंत प्राप्त झालेल्या अनुभवांस व्यवस्थित स्वरूप येत नाहीं; पण कांहीं तरी कृप्ति बसविल्यावरोबर तसें स्वरूप लागलेंच येऊं लागतें.

असो, तर मग, रानटी माणूस ह्या एकंदर अनुभवांना व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं कोणती कृप्ति बसविते बरें ? ह्या प्रश्नास उत्तर देण्यापूर्वी प्रस्तुत विषयाशीं असंबद्ध दिसणाऱ्या बऱ्याच गोष्टींचा विचार आपणास करावा लागेल; आणि रानटी स्थितींतून अमळ वर आलेल्या लोकांच्याहि समजुतींचा व कल्पनांचा विचार करावा लागेल. पण अशा रीतीनें विचार करणें अगदीं जरूरीचें आहे. कारण मूळमाणसाच्या विचारांची बरीचशी यथार्थ कल्पना आपणास झाल्याविना त्याच्या वर्तनाची कल्पना आपणास होणें नाहीं; आणि मूळमाणसाची विचारसरणी बरोबर रीतीनें समजण्यास निराळ्या लोकांच्या विचारसरण्यांची तुलना करणें जरूर आहे. म्हणजे मग सुधारलेल्या विचारसरण्यांच्या आधारानें असुधारलेल्या विचारसरणीबद्दलच्या ज्या आपल्या कल्पना त्या बरोबर आहेत किंवा नाहींत ह्याचा ताळा आपणास पाहतां येईल. म्हणून त्या उद्योगास आतां आरंभ लागू या.

प्रकरण नववें

सचेतन व अचेतन ह्यांबद्दलच्या कल्पना

९०. प्रथमदर्शनीं प्राणी व वनस्पती ह्यांमधील भेद वनस्पती व अचेतन पदार्थ ह्यांमधील भेदापेक्षां अधिक मोठा दिसतो. पशु किंवा पक्षी हे त्यांच्या वरचेवर होणाऱ्या हालचालीमुळें अचेतन वस्तूंहून स्पष्टरीत्या भिन्न दिसतात; पण वनस्पती हे पुष्कळ बाबतींत निश्चल असल्यामुळें अचेतन वस्तूंपासून तितके स्पष्टरीत्या भिन्न दिसत नाहींत. प्राण्यांप्रमाणेंच वनस्पती वाढतात आणि त्यांच्याप्रमाणेंच दुसरे ते उत्पन्न करितात, एवढें ध्यानांत येण्याची योग्यता ज्यांचे अंगीं आली असेल त्यांनाच वनस्पतींचें इतर वस्तूंपेक्षां प्राण्यांशीं जास्त साम्य आहे ही गोष्ट कळणार आहे. म्हणून अगदीं मूळचे लोक प्राण्यांचा एक वर्ग करितात, व इतर सर्व वस्तूंचा दुसरा वर्ग करितात.

ह्यासाठीं सजीव आणि अजीव यांच्यांतील भेद रानटयाच्या मनांत कसा उत्पन्न होतो हा विचार आपण केला तरी चालेल.

मूळ माणसाच्या मनांत हा भेद कशा तऱ्हेचा उत्पन्न होतो हें लक्षांत आणण्यासाठीं, तोच भेद माणसापेक्षां हलक्या प्राण्यांमध्यें कोणत्या स्वरूपानें उत्पन्न होतो हें अगोदर पाहिलें पाहिजे.

६१. समुद्रकिनारीं फिरत असतां एकादे वेळीं 'सूं' असा हलका आवाज ऐकूं येतो, आणि बारीक दृष्टीनें पाहिल्यास खडकावरील शिंपल्यांतून तो निघत आहे असें लक्षांत येतें. ओहोटीच्या वेळीं या शिंपल्यांचीं तोंडें बहुधा अर्धीं उघडीं असतात; आणि ज्यांच्यावर एकदम कसली तरी सावली पडेल ते शिंपले आपलीं तोंडें बंद करूं लागतात; आणि पुष्कळ तोंडांच्या ह्या एकदम बंद होण्यानें हा अस्पष्ट आवाज निघत असतो. ह्या ठिकाणीं लक्षांत घ्यावयाची गोष्ट ही कीं ह्या अर्धवट डोळ्याच्या क्षुद्र प्राण्यांना ती छाया पाहून कोणी तरी आपल्यावर हल्ला करण्यास येत आहे असा भास होतो; कारण बहुधा सजीवाची छाया एकाएकीं पडत असते; आतां ढगाची देखील छाया एकाएकीं पडत असतें हें खरें आहे. तथापि जवळ एकादा प्राणी आल्यास तें ह्या क्षुद्र जीवास देखील समजतें एवढें ह्यावरून व्यक्त होतें.

शेतांतील कीटकहि त्यांच्या नजरेस कांहीं एकदम पडलें म्हणजे उडून जातात किंवा वर उडतात. घुले देखील त्यांस स्पर्श केल्याबरोबर शरीराची गुंडाळी करून घेतात.

अशा ठिकाणीं सजीवाची हालचाल आणि निर्जीवाची हालचाल ह्यांच्यांतील भेद स्पष्ट ओळखलेला दिसत नाहीं. आपल्या डोळ्यांजवळून एकादा मोठा पदार्थ एकदम गेला म्हणजे आपण जसें करितों तसेंच ह्या ठिकाणीं होतें. म्हणजे तो पदार्थ सजीव आहे किंवा निर्जीव आहे हें ठरवण्यापूर्वीच आपण आपोआप दचकतों. सारांश ह्या क्षुद्र जीवांप्रमाणें आपलीहि पहिली कल्पना ही होते कीं

जेथें हालचाल आहे तेथें जीव आहे. फरक एवढाच कीं आपण जाणून बुजून अवलोकन करून तो जीव आहे किंवा नाहीं हें लागलेंच ठरवितों; त्यांस तसें करतां येत नाहीं.

६२. असो. आतां जेथें हालचाल आहे तेथें जीव आहे ही जी क्षुद्र प्राण्याची कल्पना तींत सुधारणा करी होते? म्हणजे, वरच्यापेक्षां श्रेष्ठ प्राण्यांना अजीवाची हालचाल आणि सजीवाची हालचाल ह्यांच्यांतील फरक कसा कळतो? सजीवाची हालचाल स्वैच्छिक असते हें त्या प्राण्यांच्या ध्यानांत येतें. म्हणजे, दुसऱ्या कोणीं ढकलिल्याशिवाय किंवा मारिल्याशिवाय सजीव वस्तू चलन करीत असल्यास थांबतात, आणि स्तब्ध असल्यास चालूं लागतात, हें त्यांच्या लक्षांत येतें.

आगगाडीच्या उदाहरणावरून ही गोष्ट चांगली लक्षांत येते. प्रथम प्रथम आगगाडीकडे पाहून गुरें वगैरे फार भीत असतः पण आतां आगगाडी जरी इतक्या जलद जाते, व एवढा गोंगाट करिते तरी ती सजीव नाहीं ही गोष्ट त्यांच्या चांगली लक्षांत आलेली दिसते. कारण ती फौफावत चालली असतां कावळे देखील शेजारच्या तारेवरून उडून जात नाहींत.

डार्विन साहेबानें एका कुत्र्याची गोष्ट सांगितली आहे तिजवरून उलट गोष्टीचें निदर्शन होतें. वाऱ्यानें पानें व फुलें हाललीं असतां इतर कुत्र्यांप्रमाणें व दुसऱ्या श्रेष्ठ प्राण्याप्रमाणें तो त्याची बिलकूल पर्वा करीत नसे. पण एके दिवशीं शेतांत पडलेली एक हलकीशी उघडी छत्री वाऱ्याच्या झुळकेबरोबर हालत आहे असें पाहून तो कुत्रा मोठ्यानें गुरगुरू लागला व भुंकू लागला. सारांश

त्याच्या केंसांना हालविणाऱ्या ह्या अदृश्य शक्तीमुळें जरी त्यानें पानें वगैरे हालेलेलीं पाहिलीं होतीं तरी छत्रीसारखी मोठी वस्तु हालेलेली पूर्वी कधीं पाहिली नव्हती. म्हणून ती हालेलेली पाहून ती सजीव आहे अशी त्यास शंका आली, व तो जीव अपरिचित व अनाहूत आहे असें पाहून तो भुंकूं लागला.

वरें, ज्या देखाव्यांवरून प्रथम जीवाची कल्पना हुबेहुब उत्पन्न होत असेल त्यांच्यामध्यें जर ह्या स्वैच्छिकतेचा पुढें अभाव दिसला तर ती कल्पना नष्ट होते. आरशाच्या संबंधानें कुत्र्याच्या वर्तनावरून ही गोष्ट व्यक्त होते. प्रथम आपलें प्रतिबिंब म्हणजे दुसरा कुत्रा समजून तो क्षुब्ध होतो; आणि आरशाच्या पाठीकडे जाण्याची सोय असेल तर त्याच्यावर हल्ला करण्यासाठीं तिकडे जातो. पण हेंच प्रतिबिंब त्यास वरचेवर दिसावें अशा ठिकाणीं तो आरसा ठेविला असल्यास तो कांहीं वेळानें तिकडे पाहून कांहींच गडबड करीत नाहींसा होतो. ह्याचें कारण काय ? तें प्रतिबिंब आपोआप चलन पावत नाहीं असें त्याच्या नजरेस येतें हेंच त्याचें कारण होय. तो स्तब्ध असतो तेव्हां तें स्तब्ध असतें, आणि तो हालेल तेव्हांच तसेंच तें हालतें.

६३. निर्जीवापासून भिन्न म्हणून सजीव ओळखण्यासाठीं बुद्धिमान् जनावरें आणखी एका कसोटीचा उपयोग करितात. ती ही कीं हालचाल जी होत आहे ती कांहीं उद्देश सिद्धीस अनुरूप आहे कीं नाहीं हें ते पाहतात. धरिलेला उंदीर जर बराच वेळ निश्चल राहिला तर मांजर त्यास पंजानें डंवचतें, तें अशासाठीं कीं तो जीवंत

असल्यास पळूं लागेल. एकाद्या वस्तूच्या वासावरून ती सजीव आहे किंवा नाहीं हा निर्णय न झाल्यास जनावरें बहुधा त्यांस अशाच रीतीनें डंवचीत असतात.

६४. अशा रीतीनें क्षुद्र प्राण्यांपासून वरवर पहात गेल्यास निर्जीवापासून भिन्न म्हणून सजीव ओळखण्याची शक्ति वाढत गेलेली दृष्टीस पडते. बुद्धि जसजशी वाढत जाईल तसतशी हालचाल, स्वैच्छिक हालचाल, आणि योग्य अशी स्वैच्छिक हालचाल, ह्या कसोट्यांची क्रमाक्रमानें माणसानें योजना केलेली दिसून येते.

दुसऱ्याहि कांहीं कसोट्यांचा जनावरें उपयोग करितात हें खरें आहे. उदाहरणार्थ, हरिण हवा हुंगून शत्रु जवळ आहे किंवा नाहीं हें ओळखितो; आणि हिंस्र जनावरें वासावरून पारध उमगून काढीत असतात. तद्वतच ध्वनींवरूनहि ते सजीव-निर्जीवांची परीक्षा करितात.

आतां एथें एवढेंच सांगणें जरूर दिसतें कीं निर्जीवापासून सजीव ओळखण्याची ही शक्ति उत्क्रान्ति होत असतां सहजच वाढत जाते. कारण ह्या शक्तीचा उपयोग न केल्यास उपासमर होण्याचा किंवा मरण येण्याचा संभव असल्यामुळें तो नेहमीं करावा लागतो, आणि उपयोगानें सहजच वाढ होते.

६५. तर मग मूळ माणूस त्याच्यापेक्षां कमी दर्जाच्या स्तनवत् प्राण्यांपेक्षां, किंवा पक्ष्यांपेक्षां, किंवा सर्पटणाऱ्या जीवांपेक्षां किंवा कीटकांपेक्षांहि कमी बुद्धीचा असतो असें म्हणावयाचें कीं काय? असें जर नसेल तर त्या माणसास निर्जीवापासून सजीव ओळखतां येतें असें म्हटलेंच पाहिजे; आणि त्याच्या अंगीं पशूंपेक्षां जर ज़ास्त

बुद्धि असेल तर त्यांस त्याच्यापेक्षां हा भेद जास्त चांगल्या रीतीनें समजत असला पाहिजे. इतर प्राणी हा भेद ओळखण्यास ज्या कसोट्या लावितात त्यांचा हाहि उपयोग करीत असला पाहिजे, आणि तसा उपयोग करतांना त्यांच्यापेक्षां कमी चुक्या करीत असला पाहिजे.

हल्लीं अस्तित्वांत असलेले कांहीं रानटी लोक कलाकौशल्याचे सजीवासारखे दिसणारे कांहीं पदार्थ पाहून बहुधा असल्या चुक्या करितात हें खरें आहे. उदाहरणार्थ, एस्किमो लोकांस रॉस साहेबाचीं जहाजें सजीवशीं भासलीं; कारण तीं वल्ह्यांशिवाय चालत असत. न्यूझीलंदर लोकांना कूकचें जहाज म्हणजे पंखांचा व्हेल मासासें वाटलें. बुशमेन लोकांना गाडी सजीवशी वाटून तिला खावयास गवत पाहिजेसें वाटलें. रानट्यांना घड्याळ सजीव वाटतें अशाबद्दल पुष्कळ पुरावे आहेत, आणि असें त्यांस वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. पण कलाकौशल्याच्या पदार्थांच्या संबंधानें जरी त्यांच्या अशा चुक्या सामान्यतः होतात तरी सृष्टींतील पदार्थांच्या संबंधानें बहुधा होत नाहींत.

सारांश निर्जीव वस्तू रानट्यास सजीवशा वाटतात ही जी समजूत आहे ती चुकीची दिसते. बुद्धीची जसजशी वाढ होत जाईल तसतसें ह्या दोहोंतील भेदाचें ज्ञान जें वाढत जातें तें इतर प्राण्यांपेक्षां त्याजमध्यें जास्त स्पष्ट असलें पाहिजे. कारणाव्यतिरिक्त सजीव व निर्जीव ह्यांचा तो गोंधळ करितो असें समजणें म्हणजे उत्क्रमणसरणीनें उलट खाल्ली आहे असें समजण्यासारखें होय.

६६. कांहीं लोक असें म्हणतात कीं असला गोंधळ

करण्याकडे अपक्व मानवी बुद्धीची प्रवृत्ति नेहमीं दिसत असते. मुलांना हा भेद कळत नाहीं ह्याबद्दल कांहीं दाखले देण्यांत येतात; पण या ठिकाणीं चूक मुलांचीं-नमून मोठ्या माणसांचींच असते. खुर्ची मुलाच्या पायास लागली म्हणजे "लबाड खुर्ची! आमच्या बाबूच्या पायास लागली! दे तिला ठोक!" अशा रीतीनें आईबापें ओरडत असतात. अर्थात् खुर्ची सजीव आहे असा मुलाचा समज होतो. बाह्य कारणाशिवाय एकादी निर्जीव वस्तू आपोआप चलन पावली तरच तिला जीव आहे असें मुलें आपण होऊन समजतात; एरवीं समजत नाहींत. मुली बावल्यांशीं सजीवांप्रमाणें खेळत असतात असें कोणी उलट उदाहरण आणिल्यास त्या ठिकाणीं त्यांची तशी खरीखुरी समजूत नसते, त्या उगीच ढोंग करितात असें दाखवितां येईल. कुत्रा देखील जरी फेंकलेल्या काठीच्या मागोमाग जातो तरी ती त्यास सजीव वाटत नाहीं. ती पकडल्यानंतर तो जो तिला चावतो तो ती नक्कल केवळ पुरी करितो एवढेंच. जर त्यास ती सजीव वाटली असती तर तो अगोदरहि तिचा चावा घेता असता. मोठीं माणसें देखील कांहीं निर्जीव वस्तु अंगास जोरानें लागली असतां रागानें तीस उलट मारितात, परंतु त्यावरून ती त्यांस सजीव वाटते असें होत नाहीं.

तेव्हां ह्यांपैकीं कोणत्याहि उदाहरणावरून सजीव व निर्जीव ह्यांच्यामध्यें खरोखर गोंधळ केलेला व्यक्त होत नाहीं. ह्या दोहोंमधील भेद ओळखण्याची शक्ति विशिष्ट इंद्रियविहीन प्राण्यांमध्यें देखील व्यक्त होत असून बु-

द्धीचा विकास होईल तसतशी ती वाढत गेलेली दृष्टीस पडते, आणि रानटी माणसामध्यें बहुतेक पूर्णत्वास पावलेली आढळून येते. इतर प्राण्यांचे ठिकाणीं वाढत असलेली ही शक्ति रानट्यामध्यें तेवढी नसेल ही गोष्ट संभवत नाहीं.

६७. ह्यावर कोणी असा प्रश्न करील कीं, "तर मग त्याच्या धर्मभोळ्या समजुती कशा उत्पन्न होतात? आणि ह्या समजुतींतून तर निर्जीव वस्तूंना सजीव मानिलेलें सर्वत्र दृष्टीस पडतें ही गोष्ट निर्विवाद आहे."

ह्यावर आमचें उत्तर असें आहे कीं ह्या समजुती मूळच्या नसून मागून उत्पन्न झालेल्या आहेत; म्हणजे सभोवतालची सृष्टि काय आहे हें समजण्याचा यत्न जेव्हां माणूस करूं लागला तेव्हां ह्या समजुती उत्पन्न झालेल्या आहेत. हा यत्न करतांना सजीव व निर्जीव ह्यांच्यांतील वर सांगितलेले जे भेद त्यांना विरुद्ध अशा कांहीं कल्पना त्याच्या बनतात, आणि ह्यास कारण त्याचा कांहीं विलक्षण अनुभव त्यास चुकवितो हें होय.

ही चूक काय असली पाहिजे बरें? सजीव आणि निर्जीव ह्यांच्यांतील भेद झांकून टाकणारे असे जे कांहीं अनुभव आहेत त्यांमध्यें ह्या चुकीचें बीज असलें पाहिजे. पुनः पुनः उत्पन्न होणाऱ्या अशा अनेक अवस्था आहेत कीं त्या अवस्थांत सजीव वस्तू निर्जिव वस्तूंचें सोंग आणीत असतात; आणि त्या प्रसंगीं जे कांहीं चमत्कार घडत असतात त्यांमध्यें मूळ माणसाच्या भोळ्या समजुतींचें बीज सांपडणार आहे.

प्रकरण दहावें

निद्रा आणि स्वप्नें एतद्विषयक कल्पना

६८. मन म्हणून शरीरापासून कांहीं निराळें असून तें शरीरांत असतें ही कल्पना शिक्षणानें आपणांस लहानपणापासून इतकी परिचित झालेली आहे कीं ती मूळची असून अवश्यक आहे असें आपणास वाटतें. शरीरामध्यें जाणणारें व विचार करणारें असें कांहीं तरी आहे ही क्लृप्ति आमच्या समजांत आणि भाषणांत इतकी गोंवून गेलेली आहे कीं ती मूळ माणसास माहीत नव्हती किंवा माहीत असणें शक्य नव्हतें अशी कल्पनाच आपल्याच्यानें करवत नाहीं.

तथापि आपण जर असा विचार केला कीं अशिक्षित माणसाच्या अनुभवांत असें कांहीं असतें कीं काय, तर अशा गोष्टीच्या अस्तित्वाबद्दल त्यास सांगणारें त्याच्या अनुभवांत कांहीं नसतें असें दिसून येतें. क्षणोक्षणीं त्याला सभोंवतीं वस्तू दृश्य होत असतात, तो त्यांस स्पर्श करीत असतो, हातांत घेत असतो व इकडून तिकडे हालवीत असतो. पण इंद्रियज्ञान आणि कल्पना ह्यांबद्दल त्यास कांहीं एक ठाऊक नसतें, त्यांचे वाचक शब्दहि त्याच्या भाषेंत नसतात. मग ज्ञानवत्ता ही कल्पना किंवा शब्द ह्यांची गोष्ट कशास पाहिजे ? तो विचार करितो हें खरें आहे, पण आपण विचार करीत आहों हें त्याच्या लक्षांत येत नाहीं; म्हणून आपण विचार कसा करितों

किंवा कशाचा करितों असा तो आपणास कधींच प्रश्न करीत नाहीं. त्याचीं ज्ञानेंद्रियें त्यास बाह्यसृष्टींतील वस्तू व त्याचा स्वताचा देह एवढ्यांचीच ओळख करून देत असतात; आणि तो इंद्रियांच्या पलीकडे जातो तो केवळ ह्या वस्तूच्या क्रियांबद्दल मूर्त अनुमानें काढण्यापुरताच जातो. मन हें एक अदृश्य व अस्पृश्य अस्तित्व आहे असें समजतात; तेव्हां अशा प्रकारची अत्यन्त तात्त्विक कल्पना त्यास मुळींच होण्यासारखी नाहीं, व त्याच्या भाषेंत तीस शब्दहि नाहीं.

ही गोष्ट विचारदृष्टया खरी ठरते तशीच अनुभवदृष्टयाहि ठरते. रानट्यास अंतर्ज्ञानाबद्दल बाह्यज्ञानाच्या शब्दाविना बोलतां येत नाहीं. आपणामध्यें देखील आलंकारिक भाषा हीच गोष्ट व्यक्त करिते. मनानें एकाद्या गोष्टीचें आकलन करणें किंवा ग्रहण करणें, ह्यांत ग्रहण व आकलन ह्या शब्दांची योजना लाक्षणिक किंवा आलंकारिकच आहे.

पण मन म्हणजे कांहीं अंतःक्रियेचें साधन आहे ही गोष्ट ध्यानांत आल्याविना आपली जी स्वप्नांबद्दलची कल्पना आहे ती रानट्यास होणें नाहीं. निद्रेमध्यें जें कांहीं आपण पाहतों, बोलतों किंवा करितोंसें आपणास वाटतें त्या सर्व विचार करणाऱ्या इंद्रियांच्या क्रिया असून ज्ञानेंद्रियें निष्क्रिय असतां त्या चालतात असा त्यांचा अर्थ करणें ही गोष्ट विचारेंद्रियाच्या अस्तित्वाची कल्पना प्रथम केल्याविना होणें शक्य नाहीं. म्हणून असा प्रश्न उद्भवतो कीं मनाची कल्पना होण्यापूर्वीं स्वप्नांची प्रतिपत्ति कशी करीत असतात ?

प्रकरण दहावें

निद्रा आणि स्वप्नें एतद्विषयक कल्पना

६८. मन म्हणून शरीरापासून कांहीं निराळें असून तें शरीरांत असतें ही कल्पना शिक्षणानें आपणांस लहानपणापासून इतकी परिचित झालेली आहे कीं ती मूळची असून अवश्यक आहे असें आपणास वाटतें. शरीरामध्यें जाणणारें व विचार करणारें असें कांहीं तरी आहे ही क्लृप्ति आमच्या समजांत आणि भाषणांत इतकी गोंवून गेलेली आहे कीं ती मूळ माणसास माहीत नव्हती किंवा माहीत असणें शक्य नव्हतें अशी कल्पनाच आपल्याच्यानें करवत नाहीं.

तथापि आपण जर असा विचार केला कीं अशिक्षित माणसाच्या अनुभवांत असें कांहीं असतें कीं काय, तर अशा गोष्टीच्या अस्तित्वाबद्दल त्यास सांगणारें त्याच्या अनुभवांत कांहीं नसतें असें दिसून येतें. क्षणोक्षणीं त्यालां सभोंवतीं वस्तू दृश्य होत असतात, तो त्यांस स्पर्श करीत असतो, हातांत घेत असतो व इकडून तिकडे हालवीत असतो. पण इंद्रियज्ञान आणि कल्पना ह्यांबद्दल त्यास कांहीं एक ठाऊक नसतें, त्यांचे वाचक शब्दहि त्याच्या भाषेंत नसतात. मग ज्ञानवत्ता ही कल्पना किंवा शब्द ह्यांची गोष्ट कशास पाहिजे ? तो विचार करितो हें खरें आहे, पण आपण विचार करीत आहों हें त्याच्या लक्षांत येत नाहीं; म्हणून आपण विचार कसा करितों

किंवा कशाचा करितों असा तो आपणास कधींच प्रश्न करीत नाहीं. त्याचीं ज्ञानेंद्रियें त्यास बाह्यसृष्टींतील वस्तू व त्याचा स्वताचा देह एवढ्यांचीच ओळख करून देत असतात; आणि तो इंद्रियांच्या पलीकडे जातो तो केवळ ह्या वस्तूच्या क्रियांबद्दल मूर्त अनुमानें काढण्यापुरताच जातो. मन हें एक अदृश्य व अस्पृश्य अस्तित्व आहे असें समजतात; तेव्हां अशा प्रकारची अत्यन्त तात्त्विक कल्पना त्यास मुळींच होण्यासारखी नाहीं, व त्याच्या भाषेंत तीस शब्दहि नाहीं.

ही गोष्ट विचारदृष्टचा खरी ठरते तशीच अनुभवदृष्टचाहि ठरते. रानट्यास अंतर्ज्ञानाबद्दल बाह्यज्ञानाच्या शब्दाविना बोलतां येत नाहीं. आपणामध्यें देखील आलंकारिक भाषा हीच गोष्ट व्यक्त करिते. मनानें एकाद्या गोष्टीचें आकलन करणें किंवा ग्रहण करणें, ह्यांत ग्रहण व आकलन ह्या शब्दांची योजना लाक्षणिक किंवा आलंकारिकच आहे.

पण मन म्हणजे कांहीं अंतःक्रियेचें साधन आहे ही गोष्ट ध्यानांत आल्याविना आपली जी स्वप्नांबद्दलची कल्पना आहे ती रानट्यास होणें नाहीं. निद्रेमध्यें जें कांहीं आपण पाहतों, बोलतों किंवा करितोंसें आपणास वाटतें त्या सर्व विचार करणाऱ्या इंद्रियांच्या क्रिया असून ज्ञानेंद्रियें निष्क्रिय असतां त्या चालतात असा त्यांचा अर्थ करणें ही गोष्ट विचारेंद्रियाच्या अस्तित्वाची कल्पना प्रथम केल्याविना होणें शक्य नाहीं. म्हणून असा प्रश्न उद्भवतो कीं मनाची कल्पना होण्यापूर्वीं स्वप्नांची प्रतिपत्ति कशी करीत असतात ?

६९. भुकेलें राहणें किंवा पोटभर खाणें ह्या दोन्हीं गोष्टींचा रानट्यास नेहमींचा अनुभव असून त्याच्या योगानें फारच हुबेहुब किंवा स्पष्ट अशीं स्वप्नें पडत असतात. एकादे वेळीं पुष्कळवेळ फुकट पारध करून थकलेला व भुकेलेला असा तो जमिनीवर पडतो, त्याचा डोळा लागतो, व त्या तंद्रींत त्याची पुनः पारध चालते; तो पारध धरितो, मारतो, सोलतो, शिजवितो, आणि पहिला घांस तोंडांत घालण्याच्या सुमारास एकदम जागा होतो. जागा झाल्यावर, " अरे ! हें सर्व स्वप्नच होतें. " असें तो आपल्याशीं म्हणेल अशी कल्पना करणें म्हणजे जी कृति त्यास उपलब्ध होणें शक्य नाहींसें आपणास दिसतें ती त्यास उपलब्ध आहेसें म्हणणें होय. तात्पर्य, त्या गोष्टी तो जशाच्या तशाच झाल्या असें समजतो. स्वप्नांत पाहिलेल्या वस्तू व केलेल्या क्रिया यांची त्यास स्पष्ट आठवण होते; म्हणून त्यास आपल्या स्मरणशक्तीच्या पुराव्याची मुळींच शंका येत नाहीं. पुनः आपण पडलेले ते पडलेलेच, असा त्यास अनुभव येतो हें खरें आहे; आणि ही गोष्ट कशी झाली हें त्यास समजत नाहीं हेंहि खरें आहे. पण मागच्या प्रकरणांतून दाखविल्याप्रमाणें कारणाविना वस्तू एकदम दृश्य व एकदम अदृश्य होणें हे अनुभव त्यास आधींच आलेले असतात. तेव्हां हीहि गोष्ट तशीच झाली असेल असें त्यास कां वाटूं नये ? असो. पुनः अशी कल्पना करा कीं दुसऱ्या एकाद्या वेळीं ओ होईपर्यंत खाऊन तो निजला असतां त्याच्या रुधिराभिसरणांत चलबिचल होऊन त्याला कोणी आपल्या छातीवर बसल्याचें स्वप्न पडलें, आणि त्याच्या

तडाक्यांतून निघण्याची खटपट करीत असतां आस्वलानें आपल्यांस धरल्याचा त्यास भास झाला, आणि तो ओरडून उठला; तर मग खरोखरच आस्वलानें आपल्यास धरल्यामुळें आपण अेरडलों असें त्यास कां वाटूं नये ? कोणीहि आस्वल आलें नव्हतें असें सांगण्यास त्याची बायको जरी तेथें असली तरी तिनें त्याची (नवऱ्याची) किंकाळी ऐकिलीच आणि त्याच्या मनाची विशिष्ट स्थिति होऊन ही गोष्ट झाली अशी जशी त्यास मुळींच कल्पना नाहीं तशी तीसहि नाहीं.

स्वप्नें म्हणजे प्रत्यक्ष अनुभव होत ही जी रानट्याची समजूत ती त्यांची हकीकत अपक्व भाषेंत सांगितल्यामुळें दृढ होते. जे भेद आपल्या भाषणांत येतात ते रानट्याच्या मित व अपक्व भाषेंत येत नाहींत हें आपण विसरतों. त्याच्या भाषांतून अनेक अर्थी एकाच शब्दाची योजना होत असते; मधले मधले शब्द गाळलेले असतात, आणि उच्चार स्पष्ट नसतात; त्यामुळें त्यांस आपले विचार स्पष्टपणें प्रदर्शित करण्यास तोंडें पुष्कळ वेडींवांकडीं करावीं लागतात, व खुणाखाणाहि कराव्या लागतात; त्या इतक्या कीं बुशमेन सारख्या लोकांचें भाषण रात्रीचें स्पष्ट समजत नाहीं असें म्हणतात. ह्या गोष्टी ध्यानांत आणतां, खऱ्याखुऱ्या झालेल्या गोष्टी आणि काल्पनिक गोष्टी ह्यांच्यांतील भेदाविषयीं त्याच्या मनांत अल्पस्वल्प कल्पना आल्यास ती त्यांस शब्दांनीं कशी व्यक्त करतां येत नाहीं हें स्पष्ट होतें. " मला दिसलें " असें म्हणण्याच्या ऐवजीं " मला स्वप्नांत दिसलें " असें म्हणण्यास त्याची भाषा त्यास समर्थ करीत नाहीं.

ह्यामुळें त्यांच्यामध्यें प्रत्येकजण आपलीं स्वप्नें घडलेल्या गोष्टींच म्हणून सांगतो, आणि अशा रीतीनें ह्याच्यां स्वप्नांप्रमाणें आपलींहि स्वप्नें खऱ्याखुऱ्याच गोष्टी असल्याचें असा समज इतरांमध्यें तो दृढ करितो.

यावरून तर मग त्याच्या ठिकाणीं काय कल्पना उत्पन्न होते बरें? झोंपेंत स्वप्नें पडलेला माणूस जागा झाल्यावर झोंपेंत घडलेल्या अनेक गोष्टींचें कथन करितो. तो म्हणतो मी झोंपेंत अन्य ठिकाणीं गेलों होतों, सभोंवतालचे लोक म्हणतात, तूं गेला नव्हतास; आणि तो पूर्वी होता त्याच ठिकाणीं आतांहि असल्यामुळें त्यांचें म्हणणें खरें ठरतें. तेव्हां त्याला सहजच असें वाटतें कीं आपण झोंपेंत अन्यत्र गेलों होतों व निजल्या ठिकाणींहि होतों; म्हणजे आपल्या दोन व्यक्ती आहेत, त्यांपैकीं एक दुसरीला सोडून जाते व नंतर कांहीं कालानें परत येते; म्हणजे इतर पुष्कळ वस्तूंप्रमाणें आपणासहि दुरें अस्तित्व आहे.

७०. रानटी लोकांची स्वप्नांच्या संबंधानें खरोखरच अशी कल्पना झालेली असते, आणि त्यांची बरींच सुधारणा झाल्यावरहि ती कायम राहते, याबद्दल सर्वत्र पुरावा सांपडतो. त्यापैकीं कांहींचा एथें उल्लेख करूं.

उत्तर अमेरिकेंतील इंदियन लोकांबद्दल स्कूलक्राफ्ट साहेब असें म्हणतो कीं त्यांना वाटतें कीं आत्मे दुरे असतात, त्यांपैकीं एक शरीरास धरून राहतो, व दुसरा झोंपेंत दूर फिरावयास जातो. ग्रीनलंदर लोकांनाहि असें वाटतें कीं आत्म्यास झोंपेंत शरीर सोडून जातां येतें. न्यूझीलंदमधील लोकांची समजूत अशी आहे कीं मन

झोंपेंत शरीर सोडून जातें व तें फिरत असतां त्यास दिसणाऱ्या वस्तू म्हणजे स्वप्नें होत. फिजियन लोकांस असें वाटतें कीं माणूस जीवंत असतांहि त्यांचा आत्मा झोंपीं गेलेल्या लोकांस श्वास देण्यासाठीं शरीर सोडून जातो. बोर्निओंतील लोकांची समजूत अशीच आहे. पेरू देशांतील लोक जरी बरेच सुधारलेले होते तरी त्यांचीहि समजूत अशीच असे. ते असें म्हणत कीं आत्म्यास झोंप घेतां येत नाहीं. त्यामुळें त्यास शरीर झोंपीं गेलें असतां जगांतील जें दिसतें त्याचें नांव स्वप्न. ज्यू लोक असें म्हणतात कीं झोंप म्हणजे एक प्रकारचें मरण आहे, त्यावेळीं आत्मा शरीरांतून प्रयाण करितो, आणि जागृति झाल्यावर परत येतो.

झोंपेंमध्यें व्यवहार करण्याचा किंवा निद्राभ्रमण म्हणून जो रोग आहे त्यानें ह्या समजुतीस जोर येतो. कारण वरवर पहाणारास ह्या दोन्ही गोष्टी सारख्याशा दिसतात. पुष्कळ वेळां असला माणूस झोंपेंत उठतो, अनेक गोष्टी करितो, आणि जागा न होतां पुनः जाग्यावर येऊन झोंपीं जातो; आणि जागा झाल्यावर जेव्हां तो ह्या गोष्टींची आठवण करूं लागतो तेव्हां त्यास सभोंवतालचे लोक सांगतात कीं तूं अशा गोष्टी खरोखरच केल्या होत्या. तेव्हां अशा अनुभवाविषयीं मूळ लोकांची काय समजूत होईल बरें? त्या निद्राभ्रमणकाराची तर त्यावरून अशी खात्री होते कीं झोंपेमध्यें आपणास पाहिजे तो व्यवहार करतां येऊन पुनः आपलें जागच्याजागींच राहतां येतें. बरें, इतरांची तर खात्री होते कीं माणसें झोंपेमध्यें खरीं खुरींच दूर जात असतात, त्यांना स्वप्नें पड-

ह्यामुळें त्यांच्यामध्यें प्रत्येकजण आपलीं स्वप्नें घडलेल्या गोष्टींच म्हणून सांगतो, आणि अशा रीतीनें ह्याच्या स्वप्नांप्रमाणें आपलींहि स्वप्नें खऱ्याखुऱ्याच गोष्टी असल्याचा असा समज इतरांमध्यें तो दृढ करितो.

यावरून तर मग त्याच्या ठिकाणीं काय कल्पना उत्पन्न होते बरें? झोंपेंत स्वप्नें पडलेला माणूस जागा झाल्यावर झोंपेंत घडलेल्या अनेक गोष्टींचें कथन करितो. तो म्हणतो मी झोंपेंत अन्य ठिकाणीं गेलों होतों, सभोवतालचे लोक म्हणतात, तूं गेला नव्हतास; आणि तो पूर्वी होता त्याच ठिकाणीं आतांहि असल्यामुळें त्यांचें म्हणणें खरें ठरतें. तेव्हां त्याला सहजच असें वाटतें कीं आपण झोंपेंत अन्यत्र गेलों होतों व निजल्या ठिकाणींहि होतों; म्हणजे आपल्या दोन व्यक्ती आहेत, त्यावेळीं एक दुसरीला सोडून जाते व नंतर कांहीं कालानें परत येते; म्हणजे इतर पुष्कळ वस्तूंप्रमाणें आपणासहि दुसरें अस्तित्व आहे.

७०. रानटी लोकांची स्वप्नांच्या संबंधानें खरोखरच अशी कल्पना झालेली असते, आणि त्यांची बरींच सुधारणा झाल्यावरहि ती कायम राहते, याबद्दल सर्वत्र पुरावा सांपडतो. त्यापैकीं कांहींचा एथें उल्लेख करूं.

उत्तर अमेरिकेंतील इंदियन लोकांबद्दल स्कूलक्राफ्ट साहेब असें म्हणतो कीं त्यांना वाटतें कीं आत्मे दुरे असतात, त्यांपैकीं एक शरीरास धरून राहतो, व दुसरा झोंपेंत दूर फिरावयास जातो. ग्रीनलंदर लोकांनाहि असें वाटतें कीं आत्म्यास झोंपेंत शरीर सोडून जातां येतें. न्यूझीलंदमधील लोकांची समजूत अशी आहे कीं मन

झोंपेंत शरीर सोडून जातें व तें फिरत असतां त्यास दिसणाऱ्या वस्तू म्हणजे स्वप्नें होत. फिजियन लोकांस असें वाटतें कीं माणूस जीवंत असतांहि त्यांचा आत्मा झोंपीं गेलेल्या लोकांस त्रास देण्यासाठीं शरीर सोडून जातो. बोर्निओंतील लोकांची समजूत अशीच आहे. पेरू देशांतील लोक जरी बरेच सुधारलेले होते तरी त्यांचीहि समजूत अशीच असे. ते असें म्हणत कीं आत्म्यास झोंप घेतां येत नाहीं. त्यामुळें त्यास शरीर झोंपीं गेलें असतां जगांतील जें दिसतें त्याचें नांव स्वप्न. ज्यू लोक असें म्हणतात कीं झोंप म्हणजे एक प्रकारचें मरण आहे, त्यावेळीं आत्मा शरीरांतून प्रयाण करितो, आणि जागृति झाल्यावर परत येतो.

झोंपेंमध्यें व्यवहार करण्याचा किंवा निद्राभ्रमण म्हणून जो रोग आहे त्यानें ह्या समजुतीस जोर येतो. कारण वरवर पहाणारास ह्या दोन्ही गोष्टी सारख्याशा दिसतात. पुष्कळ वेळां असला माणूस झोंपेंत उठतो, अनेक गोष्टी करितो, आणि जागा न होतां पुनः जाग्यावर येऊन झोंपीं जातो; आणि जागा झाल्यावर जेव्हां तो ह्या गोष्टींची आठवण करूं लागतो तेव्हां त्यास सभोंवतालचे लोक सांगतात कीं तूं अशा गोष्टी खरोखरच केल्या होत्या. तेव्हां अशा अनुभवाविषयीं मूळ लोकांची काय समजूत होईल बरें? त्या निद्राभ्रमणकाराची तर त्यावरून अशी खात्री होते कीं झोंपेमध्यें आपणास पाहिजे तो व्यवहार करतां येऊन पुनः आपलें जागच्याजागींच राहतां येतें. बरें, इतरांची तर खात्री होते कीं माणसें झोंपेमध्यें खरीं खुरींच दूर जात असतात, त्यांना स्वप्नें पड-

तात त्या गोष्टी तीं खरोखरीच करीत असतात, आणि क-धीं कधीं ह्या गोष्टी दृश्य होतात. आतां स्वप्नें व निद्रा-भ्रमण ह्या गोष्टींचें बारीक रीतीनें परीक्षण केल्यास निद्राभ्रमणामध्यें निद्रास्थानीं शरीर गैरहजर असतें ही गोष्ट ध्यानांत येईल. पण रानटी लोक दृष्टीस पडणाऱ्या गोष्टींचें काळजीपूर्वक परीक्षण करितात कोठें? शिवाय तो झोंपेंत इतरत्र जातो ही गोष्ट त्याची त्यास आठवत नसल्यास इतर लोक त्यास ती सांगण्यास असतात. शिवाय कधीं कधीं असें होतें कीं अशा रीतीनें भ्रमण करीत असतां तो कधीं कधीं कशावर तरी आपटतो व जागा होतो, व त्यावेळीं आपण खरोखर झोंपेंत जागा सोडतों हें त्याचें त्यासच समजतें. आतां तो पुनः निद्रास्थळीं परत आला म्हणजे तेथें त्यास त्याची दुसरी कुडी किंवा आत्मा दिसत नाहीं. परंतु नेहमींच्या समजुतीविरुद्ध जी ही गोष्ट ती त्याच्या समजुतीस फिरविण्याच्या ऐवजीं केवळ त्याच्या मनाचा गोंधळ जास्त करिते. झोंपेमध्यें आपण खरोखरच फिरतों ही गोष्ट नाकबूल करण्यास असमर्थ होत्साता तो आपल्या अनुभवांतील प्रतिकूल पुरावा लक्षांत न आणतां तेणेंकरून आपल्या समजुतीचें दृढीकरणच होतें असें तो समजतो.

दंतकथेमध्यें सहजच अतिशयोक्ति होत असल्यामुळें ह्या विलक्षण चमत्कारांचें तिच्या योगानें काय होत असेल याचा विचार केल्यास स्वप्नाविषयींच्या मूळ समजुतींस त्याच्या योगानें जोर कसा येत असेल हें ध्यानांत येईल.

७१. ह्या समजुतीबरोबरच दुसरी एक समजूत अशी उत्पन्न होते कीं स्वप्नांत पाहिलेल्या माणसांची खरो-

खरच गांठ पडली होती. स्वप्नवाल्यास जशा स्वताच्या कृतीं खऱ्या वाटतात तशाच पाहिलेल्या गोष्टीहि, म्हणजे स्थळें, पदार्थ, व प्राणी, हेहि वास्तविक वाटतात. म्हणून पुढें सांगितल्यासारखीं वर्णनें वाचण्यांत येतात.

इरोक्विस लोकांबद्दल मॉर्गन असें सांगतो कीं त्यांस स्वप्नें खरीं वाटतात, व त्यांच्या आज्ञा ते पाळतात, म्हणजे स्वप्नांत जे त्यांना दिसतील त्यांनीं सांगितलें असेल तसें ते करितात; आणि चिपिवाज लोकांबद्दल असें सांगतात कीं स्वप्नें पडावीं म्हणून ते उपवास काढितात, इतकी त्यांस स्वप्नांची किंमत वाटते. मालागासी लोकांस असें वाटतें कीं स्वप्नांत देव येतो आणि आपण काय करावें व काय करूं नये हें आपल्यास सांगतो. सांडविच बेटांतील लोक असें म्हणतात कीं मृत माणूस कुटुंबांतील इतर माणसांच्या स्वप्नांत येऊन त्यांच्या बऱ्यावाईटावर नजर ठेवितो. ताहिती बेटांतील लोकांची समजूत अशीच आहे. आफ्रिकेंतहि अशीच स्थिति आहे. कांगो लोकांना असें वाटतें कीं स्वप्नांत जें आपणास दिसतें व ऐकूं येतें तें भुतांपासून होय. काफिर व वानिका लोकांचीहि समजूत अशीच आहे. झुलु लोक जरी बरेचं सुधारलेले आहेत आणि स्वप्नांत पाहिलेल्या गोष्टीं व जागेपणीं पाहिलेल्या गोष्टी ह्यांच्यांतील भेद दाखविण्या इतकी जरी त्यांच्या भाषेची वाढ झालेली आहे, तरी त्यांना असें वाटतें कीं स्वप्नांतील दिसलेलीं माणसें खरींखुरींच असतात.

७२. स्वप्नांविषयींच्या ह्या समजुतींचा इतर समजुतींवर उलट परिणाम घडत असतो. ह्यांच्या योगानें चु-

कीच्या कल्पनांस उत्तेजन येतें इतकेंच नाहीं, तर समुदित अनुभवांच्या जोरावर ज्या वास्तविक कल्पना बनत चाललेल्या असतात त्यांच्याबद्दल संशय उत्पन्न होऊं लागतो. कसा तो पहा.

जागृतपणीं जरी वृक्ष व दगड यांचें स्वरूपान्तर होऊन अन्य वस्तू बनत नाहीं, तरी रात्रीं डोळे मिटले म्हणजे तशी स्थिति होते. भरदिवसा माणसाकडे पाहत राहिलें असतां त्याचें रूपान्तर होत नाहीं; पण झोंपेंमध्यें या क्षणीं आपला संवगडी म्हणून जो आपल्यास दिसतो त्याचाच दुसऱ्या क्षणीं भयंकर वाघ बनतो; किंवा ह्या क्षणीं जो सुंदर तलाव असेल तो क्षणान्तरानें सुसरींनीं भरून जातो. जागेपणीं माणसास जरी कांहीं फुटांहून जास्त उंच उडी मारतां येत नाहीं, तरी झोंपेंत माणूस पाहिजे तितक्या अधांतरीं चालूं किंवा उडूं शकतो.

एवंच झोंपेंत नेहमीं जागृतावस्थेच्या उलट अनुभव येत असतात, व त्यामुळें त्या अनुभवांच्या सत्यतेबद्दल संशय उत्पन्न करूं लागतात. किंवा असेंहि म्हणतां येईल कीं दिवसा जे चुकीचे अनुभव आलेले असतील त्यांचें हे समर्थन करूं लागतात. कारण अदृश्यांना एकदम दृश्य स्वरूप येणें आणि दृश्यांना अदृश्य स्वरूप येणें हा जो जागृतावस्थेंत वरचेवर येणारा अनुभव त्यास झोंपेंतील वरील अनुभवांनीं दुजोरा मिळत नाहीं काय? उदाहरणार्थ, खाणींतून झाडांना दगडांचें स्वरूप आलेले पाहणें आणि स्वप्नांत दगडाचा सर्प झालेला पाहणें हे दोन अनुभव परस्परसदृश दिसत नाहींत काय?

सारांश, अशा रीतीनें स्वप्नांतील गोष्टी खऱ्या वाट-

ल्यामुळें दुसऱ्या खोट्या समजुतींस जोर येतो; हा जोर प्रत्यक्षरीत्या येतो आणि अप्रत्यक्षरीत्याहि येतो. कारण ज्यांपासून बरोबर सिद्धान्त काढावयाचे अशा जागेपणाच्या अनुभवांना तेणेंकरून संशयितपणा उत्पन्न होतो, आणि ज्यांपासून चुकीचे सिद्धान्त निघावयाचे त्यांच्याबद्दल विश्वास उत्पन्न होतो.

७३. मूळ माणसाची स्वप्नविषयक कल्पना स्वाभाविक कशी असते हें आतां लक्षांत येईल. प्रारंभींच सांगितल्याप्रमाणें त्याच्या कल्पना विलक्षण दिसतात याचें कारण आपल्याप्रमाणेंच त्यांच्या ठिकाणीं मनाच्या अस्तित्वाची कल्पना आहे असें आपण घेऊन चालतों हें होय. पण रानट्याच्या ठिकाणीं ही कल्पना वसत नाहीं, कारण इंद्रियद्वाराहि तें ज्ञान होण्याचा संभव नसतो किंवा प्रत्यक्ष होण्याचाहि संभव नसतो. ठसे व कल्पना ह्यांव्यतिरिक्त कशाचेंहि अस्तित्व आपणास समजण्याचा संभव नाहीं असें जर अद्यापिहि कांहीं अध्यात्मवाद्यांचें म्हणणें आहे, तर मनाचें अस्तित्व अंतर्ज्ञानानें होत नसून अनुमानानें होतें हें उघड आहे. म्हणून विचारशक्तीची बरीच वाढ झाल्याविना त्याची कल्पना होणें नाहीं.

" मी विचार करितों, माझ्या ठायीं कल्पना आहेत " असें म्हणतां येण्यास जी अंतःपरीक्षणशक्ति अवश्यक आहे ती मुलाप्रमाणें मूळमाणसाचेहि ठिकाणीं उत्पन्न झालेली नसते. इंद्रियाभास व तद्विषयक ज्ञान ह्यांबरोबर होणारे विचार इतके मुकाट्यानें व जलद होत असतात कीं ते लक्षांत येत नाहींत; कारण ते ध्यानांत येण्यास लागणारी आत्मपरीक्षा त्याचे ठिकाणीं नसते. पण ज्ञा-

नवत्तेच्या ह्या ज्या अस्पष्ट अवस्था दिवसा स्पष्ट अवस्थांनीं झांकून गेलेल्या असतात, त्या रात्रीं डोळे मिटले, आणि इतर इंद्रियें शिथिल झालीं म्हणजे स्पष्ट दिसूं लागतात. सूर्य मावळला म्हणजे जसे तारे स्वच्छ दिसूं लागतात तशा नंतर मग आत्म्याच्या क्रिया स्पष्ट लक्षांत येऊं लागतात. म्हणजे काय तर स्वप्नविषयक अनुभव आत्मविषयक अनुभवांच्या आधीं येत असतात; आणि त्या अनुभवांपासूनच पुढें आत्मविषयक कल्पना उत्पन्न होते. ही अवलंबनमालिका कशी आहे ती पहा:—हल्लींची जी स्वप्नविषयक कल्पना आहे ती मन म्हणून स्वतंत्र वस्तु आहे या कल्पनीवर अवलंबून आहे; ही मनोविषयक कल्पि उत्पन्न होण्यास ती उत्पन्न करणारे अनुभव अगोदर आलेच पाहिजेत; हे अनुभव म्हटले म्हणजे स्वप्नविषयक अनुभव होत, व ते दोन प्रकारचें अस्तित्व आहे अशी कल्पना उत्पन्न करितात; आणि प्रारंभीं अशी कल्पना असते कीं, ह्या दोन प्रकारच्या अस्तित्वांत फरक इतकाच असतो कीं रात्रीं एक अस्तित्व स्वस्थ असलें म्हणजे दुसरें गैरहजर असून कांहीं तरी क्रिया करीत असतें. पुढें हळूहळू वस्तुस्थितीशीं विसंगत असे ह्या दुसऱ्या अस्तित्वाचे शारीरिक विशेष गळून जाऊं लागतात, आणि नंतर मनोविषयक जी आपली कल्पना तिची स्थापना होते.

मूळमाणसाच्या अव्यवस्थित अनुभवांवरून त्याच्या ठिकाणीं जी कांहीं व्यवस्थित कल्पना उत्पन्न होते ती ह्या मूलतत्त्वावर होते. आपल्याला दुसरें अस्तित्व आहे, अशी जी ही त्याची समजूत ती इतर वस्तूंच्या दुहेऱ्या

नवत्तेच्या ह्या ज्या अस्पष्ट अवस्था दिवसा स्पष्ट अवस्थांनीं झांकून गेलेल्या असतात, त्या रात्रीं डोळे मिटले, आणि इतर इंद्रियें शिथिल झालीं म्हणजे स्पष्ट दिसूं लागतात. सूर्य मावळला म्हणजे जसे तारे स्वच्छ दिसूं लागतात तशा नंतर मग आत्म्याच्या क्रिया स्पष्ट लक्षात येऊं लागतात. म्हणजे काय तर स्वप्नविषयक अनुभव आत्मविषयक अनुभवांच्या आधीं येत असतात; आणि त्या अनुभवांपासूनच पुढें आत्मविषयक कल्पना उत्पन्न होते. ही अवलंबनमालिका कशी आहे ती पहा:—हल्लीं-ची जी स्वप्नविषयक कल्पना आहे ती मन म्हणून स्वतंत्र वस्तु आहे या कल्पनीवर अवलंबून आहे; ही मनोविषयक कल्पि उत्पन्न होण्यास ती उत्पन्न करणारे अनुभव अगोदर आलेच पाहिजेत; हे अनुभव म्हटले म्हणजे स्वप्नविषयक अनुभव होत, व ते दोन प्रकारचें अस्तित्व आहे अशी कल्पना उत्पन्न करितात; आणि प्रारंभीं अशी कल्पना असते कीं, ह्या दोन प्रकारच्या अस्तित्वांत फरक इतकाच असतो कीं रात्रीं एक अस्तित्व स्वस्थ असलें म्हणजे दुसरें गैरहजर असून कांहीं तरी क्रिया करीत असतें. पुढें हळूहळू वस्तुस्थितीशीं विसंगत असे ह्या दुसऱ्या अस्तित्वाचे शारीरिक विशेष गळून जाऊं लागतात, आणि नंतर मनोविषयक जी आपली कल्पना तिची स्थापना होते.

मूळमाणसाच्या अव्यवस्थित अनुभवांवरून त्याच्या ठिकाणीं जी कांहीं व्यवस्थित कल्पना उत्पन्न होते ती ह्या मूलतत्त्वावर होते. आपल्याला दुसरें अस्तित्व आहे, अशी जी ही त्याची समजूत ती इतर वस्तूंच्या दुहेऱ्या

अस्तित्वाबद्दल जी त्यास सृष्टींत उदाहरणें दिसतात त्यांच्याशीं जुळते; आणि वस्तूंना जीं दृश्य व अदृश्य स्वरूपें प्राप्त होतात त्यांच्याशींहि जुळते. इतकेंच नाहीं, तर तुलना करून पाहतां आपलें दुसरें अस्तित्व आणि इतर वस्तूंचीं दुसरीं अस्तित्वें ह्यांच्यांत सादृश्य दृग्गोचर होतें. कारण ह्याची जशी छाया आहे तशा त्यांच्याहि नसतात काय? त्याची छाया रात्रीची अदृश्य होत नाहीं काय? तर मग असें स्पष्ट दिसत नाहीं काय कीं दिवसा जी ही छाया त्याच्या देहाच्या मागून जाते ती रात्रीं दूर भ्रमण करणारी व निरनिराळ्या कृती करणारी त्याची दुसरी व्यक्ति असावी? तेव्हां ग्रीनलंदर लोकांची जी ही अशी समजूत आहे ती उगीच नव्हे.

प्रकरण अकरावें

मूर्छा, बेशुद्धि, अंगनैश्चल्य, अत्यानंद, इत्यादि असंवेदनेंचीं रूपें

७४. झोंपीं गेलेल्यास त्रास दिल्यास त्याची निश्चलता नाहींशी होऊन त्यास चांचल्य उत्पन्न होतें, असें रानट्याच्या नेहमीं अनुभवास येतें. आतां असें होण्यास कधीं त्यास कमी त्रास द्यावा लागतो, कधीं जास्त द्यावा लागतो, कधीं अगदीं अप्प आवाज पुरे होतो, कधीं मोठी आरोळी ठोकावी लागते, कधीं त्यास हालवावा लागतो, आणि कधीं चिमटा घ्यावा लागतो. तरी त्याला अनुभवावरून असें दिसतें कीं माणसाचें शरीर निश्चल आणि निर्ज्ञान पडलेलें असतां, केवळ त्याच्या नांवानें हाक मारिल्यास देखील त्यास जागृति येते.

पण कधीं कधीं कांहीं निराळाच प्रकार दृष्टीस पडतो. एकादे वेळीं एकादा माणूस फार वेदना झाल्याचीं लक्षणें दाखवून एकदम भूमीवर निचेष्ट पडतो; आणि कधीं कधीं एकाद्या अशक्त माणसास फार भीति किंवा फार आनंद वाटल्यास तशीच स्थिति होते. असे लोक लवकर शुद्धीवर येत नाहींत. अशा स्थितींत फिजियन माणूस जरी त्या मूर्छितास नांवानें हाक मारितो, आणि शेवटीं तो शुद्धीवर आल्यावर हाक मारिल्यानें त्याच्या दुसऱ्या आत्म्यास परत आणतां येतें असें जरी त्यास वाटतें, तरी त्याच्या दुर्ज्ञेय आत्म्याचें हें भ्रमण इतर

भ्रमणांहून भिन्न होय असें त्याच्या लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. आतां 'मिनिट दोन मिनिटें किंवा कधीं कधीं' तासच्यातास ही जी बेशुद्धि उत्पन्न होते, तिच्या योगानें दुय्यम आत्म्याच्या भ्रमणकृतीस जोर येतो हें खरें आहे. कारण ह्या ठिकाणीं शरीर सोडून जाणें जास्तच स्पष्ट असतें, आणि त्यावेळीं काय झालें किंवा काय पाहिलें याबद्दल तो माणूस कांहींच सांगत नाहीं.

इंग्रजींत शुद्धीवर येणें यास "स्वतःकडे परत येणें" (Come back to oneself) असा जो शब्द आहे त्यावरून देखील याच कृतीचें स्पष्टीकरण होतें. तात्पर्य मूर्छा येणें म्हणजे दुय्यम आत्मा शरीरांतून निघून जाणें असें जरी ते लोक समजत नाहींत तरी पूर्वी एकाकाळीं तसें ते समजत असत हें त्यावरून स्पष्ट दिसतें.

७९. एकादे वेळीं मनुष्य धाडकन् पडतो आणि त्याची शुद्धि, किंवा मनोविकार किंवा स्वैच्छिक हालचाल हीं अगदीं गेल्यासारखीं दिसतात. अशा माणसाचा श्वासोच्छ्वास कधीं कधीं थंड झोंपेंतल्याप्रमाणें अगदीं स्वाभाविक असतो; आणि कधीं कधीं रोगी गाढ झोंपेंत असल्याप्रमाणें मोठ्यानें घोरतो; पण त्यास मोठ्यानें हाक मारिली किंवा जोरानें हालविलें तरी तो उठत नाहीं. या रोगास अपॉप्लेक्सी किंवा बेशुद्धि म्हणतात.

अशा स्थितींत आपला सोबती पडलेला पाहून रानड्यास काय वाटत असेल बरें? कारण ही स्थिति कधीं कधीं तासच्यातास व कधीं कधीं दिवसच्यादिवस चाललेली असते. अर्थात् त्याचीं दुहेऱ्या अस्तित्वाबद्दलची जी समजूत तीस यानें जोर येतो. दुसरा आत्मा कांहीं वेळ हांके-

च्या पलीकडे गेल्यासारखा दिसतो; आणि तो परत आला म्हणजे त्याच्या दूर भ्रमणांतील अनुभवांविषयीं त्यास कांहींच सांगतां येत नाहीं.

कांहीं महिन्यांनीं किंवा वर्षांनींपुनः तीच स्थिति होते व तशीच बेशुद्धि उत्पन्न होते; व पुनः शुद्धि आल्यावर तशीच विस्मृति दृष्टीस पडते; आणि तिसऱ्या प्रसंगींही बेशुद्धि पुष्कळ वेळ राहिल्यावर त्यास हांक मारून किंवा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें तो परत येतच नाहीं.

७६. क्याटालेप्सि किंवा अंगनैश्चल्य म्हणून जो ज्ञानतंतूचा रोग आहे त्याचाहि हल्ला असाच अकस्मात् होत असतो; तोहि कधीं कधीं कित्येक तास आणि कधीं कधीं कित्येक दिवस टिकत असतो; बाकी सर्व गोष्टी निराळ्या असतात. या रोगांत शुद्धि एकदम जाऊन रोग्याची अशी कांहीं स्थिति होते कीं तो माणूस जिवंत माणसासारखा न दिसतां दगडी पुतळ्यासारखा दिसूं लागतो. त्याचे हातपाय ठेवावे तसे निश्चल राहतात; त्यांना चालविणारा कर्ता गैरहजर आहे कीं काय असा भास होतो; आणि तें शरीर सभोंवतालच्या लोकांच्या अगदीं कह्यांत राहतें.

नंतर मग शुद्धि जी येते तीहि एकदम येते; आणि त्या लहरींत काय झालें याचें त्यास स्मरण मुळींच नसतें. म्हणजे मूळ लोकांच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास, भटकावयास गेलेला दुय्यम आत्मा भटकींत आपण काय केलें त्याची हकीकत सांगत नाहीं.

ह्या रोगाबद्दल रानटयाची अशी कल्पना खरोखरच असते ह्याबद्दल आपल्यास प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. आ-

ल्यांच्या भ्रमणाविषयीं चिपिवाज लोकांची अशी समजूत आहे कीं, भ्रमण करणारे कांहीं आत्मे बेशुद्धींत असलेल्या माणसांचे असतात; आणि त्यांस परलोकचा दरवाजा न उघडल्यास आपल्या देहांकडे ते परत येतात, व त्यांस पुनः सजीव करितात. मध्ययुगांत लोकांची अशीच समजूत असल्याबद्दल फिस्क साहेब आपल्या ग्रंथांत उल्लेख करितो.

७७. एक्स्टसी किंवा अत्यानन्द म्हणून जो बेशुद्धीचा दुसरा रोग आहे त्यांतहि अशीच स्थिति दृग्गोचर होते. हा रोग ज्यास झाला असेल तो जरी हाक मारिली असतां उत्तर देत नाहीं, व अशा रीतीनें तो शुद्धीवर नाहीं असें जरी दिसतें, तरी इतर ठिकाणच्या गोष्टींचें ज्ञान त्यास स्पष्ट झालें आहे असेंहि दिसून येतें.

ही स्थिति पुष्कळ वेळ खोल विचार केल्यानें उत्पन्न होत असते, व त्यावेळीं मनाचा मोठा क्षोभ झालेला असून सभोंवतालच्या वस्तूंविषयीं मुळींच भान नसतें. स्नायू ताठर झालेले असून शरीर ताठ व उभें असतें, आणि भान व स्वैच्छिक हालचाल यांचा पूर्ण अभाव असतो. ह्या स्थितींत विलक्षण प्रकारचे देखावे दिसत असतात, व त्यांचें मागून बारीक वर्णन करतां येतें.

प्रत्येक व्यक्ति दुहेरी असते, व तिचा एक भाग दुसरीस सोडून जाऊं शकतो, ह्या मूळ समजुतीचें दृढीकरण होण्यास वरच्यासारखे अनुभव कारणीभूत होतात, ह्याबद्दल पुरावा सांपडतो. झुलू लोकांच्या कल्पनांविषयीं वर्णन करतांना बिशप क्यालावे असें म्हणतो कीं, अत्यानन्दांत असलेल्या माणसास एरवीं न दिसणारें दिसतें असें तें समजतात.

७८. कोमा किंवा झांपड म्हणून जो रोग आहे त्याचीं जीं निरनिराळीं रूपें आहेत त्यांचें एथें सविस्तर वर्णन करीत नाहीं. पण प्रत्यक्ष जखम झाल्यानें जी बेशुद्धि उत्पन्न होत असते तिचा थोडासा विचार करूं. हिचे दोन प्रकार आहेत. एक रक्त फार गेल्यानें होणारी बेशुद्धि, व दुसरी डोक्यास वगैरे जबर धक्का बसल्यानें येणारी बेशुद्धि.

मूळ माणसास नेहमीं जनावरांशीं वगैरे झगडा करावा लागत असल्यामुळें रक्तस्राव होऊन भोंवळ येण्याचा प्रसंग बरेच वेळां येतो. अशा वेळीं बराच वेळ हाक मारिल्यानें किंवा हालविल्यानेंहि माणूस ओ देत नाहीं. नंतर मग तो शुद्धीवर येतो, डोळे उघडितो व बोलूं लागतो. पुनः कांहीं वेळानें जखम वाहूं लागते व पुनः बेशुद्धि येते. कधीं कधीं असें होतें कीं असें रक्त वाहून बेशुद्धि येत नाहीं, व कधीं कधीं फार वेळपर्यंत येते.

कधीं कधीं ही बेशुद्धि लढाईत वगैरे डोक्यावर सोंटा वगैरे बसल्यानें येते. कधीं कधीं ती थोडा वेळ टिकते, व माणूस पुनः सावध होतो, कधीं कधीं मेंदूस धक्का बसण्यासारखा मोठा बुक्का बसल्यास बेशुद्धि पुष्कळ वेळ येते; मनुष्य बडबडूं लागतो, व त्याची हालचाल मंद होते.

७९. झोंप व स्वप्नें यांबद्दल आलेले अनुभव आणि निरनिराळ्या बेशुद्धीबद्दलचे अनुभव हे एकत्र झाल्यानें दुय्यम आत्म्याच्या प्रासंगिक भ्रमणांबद्दल एकप्रकारच्या नव्या कल्पना उत्पन्न होतात.

मूर्छा येण्याच्या अगोदर पुष्कळ वेळां असें होतें कीं

माणसास स्वतः अशक्तपणा वाटूं लागतो, व इतरांच्या ती गोष्ट दृष्टोत्पत्तीस येऊं लागते. तेव्हां दोघांच्याहि मनांत असा संशय उत्पन्न होतो कीं दुय्यम आत्मा आतां शरीर सोडून जाण्याच्या बेतांत आहे; म्हणून त्यास जाऊं नये अशी इच्छा उत्पन्न होते. हाक मारतां मारतां बेशुद्ध होणारा माणूस शुद्धीवर आला असें वरचेवर झालेलें असतें. म्हणून पुढच्यासारखी कृति उत्पन्न होते. कारेन लोकांत मृतास मूठमाती देऊन परत निघाले म्हणजे प्रत्येक माणूस आपल्याजवळ एकाद्या झाडाच्या फांदीचे तीन लहान हूक किंवा गळ घेतो, आणि चालतां चालतां मध्यें मध्यें थांबून आपल्या आत्म्यास हाक मारितो, आणि त्यास गळानें अडकवल्यासारखें करून तो गळ जमिनींत पुरतो. आपला आत्मा मृताच्या आत्म्याशीं अडकून मागें राहूं नये ह्यासाठीं तो असें करीत असतो. उत्तर एशियेंतील कांहीं लोक आत्मा निघून गेल्यामुळें रोग होतो असें समजतात आणि कारेन्स लोक असें समजतात कीं जो कोणी आजारी पडून मरावयास टेंकला असेल त्याचा आत्मा कोणी जादू करून दुसऱ्याच्या शरीरांत नेऊन टाकिला आहे.

असल्या भ्रमणांत आत्मा काय करितो, ह्याविषयीं नानाविध समज उत्पन्न झालेले आहेत. डायाक लोकांमधील वृद्ध माणसें व उपाध्यायिणी असें सांगत असतात कीं, स्वप्नांत आपले आत्मे देवाच्या वाड्यांतून जातात, व तेथें बंदुका, घंटा वगैरे त्यांच्या दृष्टीस पडतात व देवाचेंहि दर्शन होतें. आस्ट्रेलियन लोक, ग्रीनलंदर्स, खोंड, व तार्तार लोक हे सर्व लोक आपले आत्मे स्व-

भांत वगैरे भुतांच्या राज्यांत फिरावयास जातात असें समजतात. ग्रीनलंदर लोकांमध्यें अशीहि समजूत आहे कीं, लांबच्या प्रवासास जातांना आपल्याला आपले आत्मे घरीं ठेवून जातां येतें, व तसें केलें तरी आपली प्रकृति बिघडत नाहीं.

सारांश, इंग्लिश लोकांत जें आलंकारिक भाषेनें बोलतात त्याचा ह्या लोकांत शब्दशः अर्थ समजतात. दक्षिण आस्ट्रेलियांतील लोक वेशुद्ध माणसास "आत्मविहीन" असें म्हणतात; त्यालाच इंग्रज लोक "जीवविहीन" (Inanimate) असें म्हणतात. तद्वतच अशक्त माणसाबद्दलची इंग्रजांची समजूत जरी केवळ रानट्यासारखीच नाहीं, तरी अशा माणसास त्यानें "आपला आत्मा गमाविला आहे" (has lost his spirit) अशा अर्थाच्या शब्दाची योजना करितात.

८०. ह्या वेशुद्धीच्या अवस्था कमजास्त जोराच्या असून त्या कमजास्त वेळ टिकत असतात हें मूळ माणसाच्या लक्षांत येतें. पहिली अवस्था डुलकी होय. ही येते न येते तों माणूस सावध होतो. दुसरी, नेहमींचो झोंप, मग ती कित्येक मिनिटें चालो किंवा कित्येक तास चालो; तिच्यांताहि प्रकार असतात; कित्येक अगदीं 'चूं' झाल्याबरोबर जागे होतात, कित्येक त्यांच्या कानांत ओरडलें तरी जागे होत नाहींत. तिसरी, सुस्ती; ही आली म्हणजे मनुष्य जागा झाला तरी तो पुनः झोंपी जातो. चवथी, मूर्च्छा; हीहि कित्येक तास किंवा मिनिटें चालून पुष्कळ हाका मारल्यानें माणूस शुद्धीवर येतो, किंवा बराच वेळ येत नाहीं; आणि वेशुद्धि, अंग-

नैश्चल्य, अत्यानंद ह्या आणखी अवस्था आहेतच; त्या सर्वांमध्यें जरी गैरसावधपणा हा सामान्य धर्म आहे तरी रोगी सावध झाल्यावर जी आपली हकीकत सांगतो ती प्रत्येक स्थितींत निराळी असते. शिवाय ह्यांच्यांत ह्यासंबंधानें निराळेपणा असा असतो कीं कधीं कधीं रोगी पुनः शुद्धीवर येतो, व कधीं कधीं मुळींच च येत नाहीं, व शरीर थंड पडतें.

पण बुक्के आणि जखमा ह्यांच्यामुळें होणाऱ्या बेशुद्धी फार ध्यानांत ठेवण्यासारख्या असतात; कारण इतर बेशुद्धीचें कारण जरी रानड्यास दिसत नाहीं, तरी ह्यांचें दिसतें; कारण हा बुक्का कोणीं शत्रूनें दिलेला असतो, किंवा ही जखम कोणी शत्रूनें केलेली असते. ह्या ठिकाणींहि कधीं कधीं रोगी लवकर शुद्धीवर येतो, व पुनः बेशुद्ध होत नाहीं, आणि कधीं कधीं पुष्कळ वेळानें शुद्धीवर येऊन पुनः कायमचा बेशुद्ध होतो. कधीं कधीं धक्का खाल्लयाबरोबर जो माणूस बेशुद्ध होतो तो पुनः शुद्धीवर येतच नाहीं; म्हणजे दुय्यम आत्मा जो एकदां निघून जातो तो पुनः परत येतच नाहीं.



प्रकरण बारावें

मरण व पुनरुत्थापन एतद्विषयक कल्पना

८१. मनुष्य मृत झाला असें केव्हां म्हणावयाचें हें आपण सहज सांगूं शकूं असें आपणांस वाटतें; आणखी आपण असेंहि समजतों कीं ह्याबद्दल कधींच कोणास अडचण वाटलेली नसावी. पण ह्या दोन्ही समजुती चुकीच्या आहेत.

" मृत्यूपेक्षां अधिक निश्चित गोष्ट कोणतीच नाहीं; पण कधीं कधीं मृत्यु खरोखरच आला आहे कीं काय ह्यापेक्षां अधिक अनिश्चित गोष्ट कोणतीच नसते; आणि माणूस मेला नसतां तो पुरल्याचीं, किंवा पुरावयास नेल्याचीं पुष्कळ उदाहरणें सांगण्यांत येतात आणि मृतशरीर म्हणून कांपावयास घेतलें असतां माणूस उठलें अशींहि उदाहरणें सांगतात. "

हा उतारा एका डाक्टरी पुस्तकावरून घेतलेला आहे; व त्यानंतर त्या पुस्तकांत मरणाच्या नेहमींच्या परीक्षांची चर्चा करून त्या सर्व चुकीच्या आहेत असें दाखविलें आहे. सुधारलेल्या लोकांत मरणाबद्दल इतक्या अनुभवानंतर जर इतका अनिश्चितपणा आहे, तर रानटचाच्या ठिकाणीं किती असेल ? अनुभवानें निश्चितपणा आल्याशिवाय मरण हें प्रत्येकास स्वाभाविक आहे हें त्यास समजण्याचा संभव नाहीं; आणि रानट्याची राहणी भक्ष्यार्थ भटकण्याची असल्यामुळें त्यास स्वाभाविक मरणाचा अनुभव फार कमी.

असो. तर मग रानट्याची परिस्थिति अशी असल्यामुळें मरणाबद्दल मूळ माणूस काय कल्पना बसवितो बरें? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं त्याच्या विचारसरणीकडे आपण लक्ष देऊं या,, व तदनुरूप त्याचें वर्तन कसें होतें हें पाहूं या.

८२. तो निरनिराळ्या प्रकारच्या व निरनिराळ्या वेळ टिकणाऱ्या बेशुद्धि पाहतो; त्यांपैकीं बहुतेकांच्या नंतर पुनः शुद्धि येते; उदाहरणार्थ झोंपेनंतर रोज, मूर्छेनंतर पुष्कळ वेळां, अंगनैश्चल्यानंतर कधीं कधीं, आणि आघात व जखमी झाल्यानंतर प्रसंगवशात्. तेव्हां आतां ह्या अन्य बेशुद्धीबद्दल (मृत्यूबद्दल) काय होतें बरें? याच्यानंतरहि पुनः शुद्धि येणार नाहीं काय?

क्वचित् प्रसंगीं अकस्मात् मृत मनुष्य उठतो, यावरून पुनः शुद्धि येईल या समजुतीस जोर येतो. म्हणजे आमाणूस जाळावयास व पुरावयास नेला असतां एकदम तो हालचाल करूं लागतो. ह्यावरून मृत म्हणून सगळे अमाणूस खरोखर मेला नव्हता असें रानटी माणूस समजत होते. नाहीं; तर अन्य बेशुद्धीप्रमाणें हीहि बेशुद्धि कांहीं वेळ टिकणारीच असेल अशी त्याची समजूत होते.

अशी खरोखरच त्याची समजूत होते ह्याबद्दल पुरावाहि सांपडतो. बुशमेन लोकांत अशी म्हण आहे कीं, मरण म्हणजे केवळ एकप्रकारची निद्रा होय. टास्मेनियन लोकांस मृताच्या थडग्यांत भाला पुरण्याचें कारण विचारतां, "झोंपेंत लढण्यासाठीं" म्हणून उत्तर देतात. डायाकसारख्या सुधारलेल्या रानट्यास देखील झोंप व मरण यांतील भेद ओळखण्यास मारामार पडते. टोडा लोकांस

प्रेत कुजूं लागेतोंपर्यंत तें कदाचित् जिवंत होईल अशी आशा असते. डमारा लोकांत प्रेत बैलाच्या कातड्यांत शिवून पुरतात, आणि त्यानें वर उठूं नये म्हणून नंतर थडग्यावर मागें पुढें उड्या मारितात. तुपी लोक असेंच कांहीं करितात. आतां ह्या समजुतीवर मृतास जिवंत करण्यासाठीं कांहीं लोक काय खटपटी करितात तें पाहूं.

आसवाक लोकांबद्दल आलेक्झांडर असें सांगतो कीं एकाचे दोन भाऊ मेले होते; तो कांटेरी डाहाळ्या घेऊन त्यांनीं त्यांचीं प्रेतें झोडपूं लागला, व हाय हाय म्हणून ओरडूं लागला; ते जीवंत होत नाहींत असें पाहून तो त्यांचे डोळे उघडूं लागला, व त्यांच्यांत कांटे बोंचूं लागला. हाटेटांट लोकांत मृतास व मरावयास पडलेल्या-
ला तो निघून जातो म्हणून शिव्या देतात व मारितात.
स नयेनें परत यावें व संतुष्ट व्हावें एतदर्थ त्याच्या-
मृतशरीराचीहि रानटी लोकांत चाल आहे. फिजियन
लें अशी समजूत आहे कीं हाक मारिल्यानें आत्मा
हळीं परत येत असतो. होस लोकांचें मत असेंच
हे. फान्टीज लोक कधीं कधीं मृताच्या आत्म्यास
आपणास सोडून गेल्याबद्दल शिव्या देतात, आणि कधीं
कधीं आपलें रक्षण त्यानें करावें यासाठीं त्याची प्रार्थना
करितात. सामोआ बेटांतील लोक उपाध्यायाकडे जाऊन
त्यास माणूस मेल्याचें कारण विचारितात. गोल्डकोस्ट-
वरील लोक मृतास तसे प्रश्न करीत बसतात. मृतास
पाहिजे तें ऐकूं येतें असें यहुदी लोकांस देखील वाटत
असे. बेचुआना लोकांत एक वृद्ध बाई थडग्याजवळ
कांहीं वस्तू आणून ही तुझी चीज वस्त आहे म्हणून मृ-

तास ओरडून सांगते. इन्युइट लोक मृतास अन्न व वस्त्र दोन्ही आणून देतात.

प्रथम मनुष्य मेल्याबरोबर ह्या ज्या क्रिया होत असतात त्या पुढें तो मेल्यावरहि कांहीं काळानें होऊं लागतात. मेक्सिकन लोक मृतास मुखानें मार्गक्रमण करतां यावें म्हणून त्यास कांहीं कागद देतात.

असो. मृत्यु म्हणजे एकप्रकारचें निश्चल जीवित आहे असें जर एकदां मानिलें तर मग ह्या सर्व गोष्टींत विलक्षण कांहींच दिसत नाहीं. झोंपेंतल्यास हाक मारण्यापासून जी ह्या चालीस सुरवात होते तिची मजल जातां जातां अनेक तऱ्हांनीं मृतास हाक मारण्यापर्यंत जाते, आणि हाक मारून मृत मनुष्य ताबडतोब जिवंत होणार नाहीं असें कळूं लागलें तरी ती कायम राहते.

८४. मरण म्हणजे फार वेळ टिकणारी बेशुद्धि आहे ह्या समजुतीचा आणखी एक परिणाम होतो तो हा कीं, प्रेतास प्रत्यक्ष चारण्याची किंवा त्याच्याजवळ अन्नपाणी नेऊन ठेवण्याची चाल त्यापासून उत्पन्न होते.

वायूच्या लहरींत कधीं कधीं रोगी तोंडांत घातलेलें अन्न खात असतो. आतां ह्यावरून वरील चाल उत्पन्न झालेली असो वा नसो; तशी चाल आहे ह्यांत शंका नाहीं. पापुअन लोक मृताच्या तोंडांत इतकें अन्न कोंबतात कीं तें त्याच्या अंगावर पडूं लागतें. ताहीतियन लोकांत एकादा कोणी प्रतिष्ठित माणूस मरण पावला म्हणजे त्यास वेळोवेळीं अन्न चारण्यासाठीं एकादा उपाध्या किंवा दुसरा कोणी नेमीत असत. बोर्निओमधील मलान्वा लोकांत अशीच चाल आहे. त्यांच्यांतील एकादा मुख्य स-

रदार मेला म्हणजे त्याचे गुलामांस त्यास अन्न, पाणी, पानसुपारी; पंख्याचा वारा, वगैरेची तरतूद करण्यास लावीत असत. कुरुंबार लोक मृतास जाळण्याच्या पूर्वी त्याच्या तोडांत थोडेथोडें खाद्य वरचेवर घालीत राहतात. न्यूझीलंदर लोक असें समजतात कीं, मृताचा आत्मा रात्रीं येऊन अन्नपाणी घेऊन जातो.

मृतास पुरल्यानंतर त्याच्या थडग्यावर अन्नपाणी नेऊन ठेवण्याची चाल पुष्कळ रानटयांत दृष्टीस पडते. अफ्रिकेंतील शेब्रो लोक मृताच्या थडग्यावर भात नेऊन ठेवितात, आणि डाहोमन लोक रक्त किंवा पाणी नेऊन ठेवितात. आपल्याकडेहि ही चाल आहेच. भिल लोक प्रेतास जाळिले असेल तेथें भात नेऊन ठेवितात. व त्याच्या खोलीच्या उंबरठ्यावरहि ठेवितात. सांताळ, कुकी, कारेन, ह्या लोकांत अशाच चाली आहेत. अमेरिकेंत कारिब लोक असेंच करितात.

८५. मृताचा आत्मा लवकर परत आला नाहीं, तरी केव्हां येईल याचा नेम नाहीं असें समजून रानटी लोक थडग्यावर वरचेवर अन्न वगैरे नेऊन ठेवूं लागतात. मेक्सिकोमध्यें मृतास पुरल्यानंतर वीस दिवसपर्यंत ते दररोज त्याच्याकडे अन्नपाणी नेतात, आणि नंतर ऐंशी ऐंशी दिवसांनीं नेतात. पेरूव्हियन लोक थडगीं उकरून नवीं वस्त्रें व अन्न प्रेतास अर्पण करीत असत. इन्का लोकांत प्रेतें मालमसाला घालून तशींच ठेवण्याची वहिवाट असल्यामुळें ही चाल जास्तच पुढें गेलेली होती. ते दररोज हीं प्रेतें त्यांच्या नात्याप्रमाणें लावून त्यांस अन्न देत.

८६. प्रेत पुनः जिवंत होईल ह्या समजुतीपांसून आणखी कांहीं समज उत्पन्न होतात. प्रेत कसें तरी सं-जीवें आहे असें वाटल्यामुळें त्यास हवेची व उबेची आवश्यकता आहे असा समज उत्पन्न होतो; व त्यास अनुसरून कांहीं चाली कांहीं लोकांत दृष्टीस पडतात.

ग्वारानी लोकांस असें वाटे कीं कुडीबरोबर आत्मा-हि थडग्यांत जातो, म्हणून ते त्याच्यासाठीं थडग्यांत जागा राखून ठेवीत; आणि कधीं कधीं त्याच्या तोंडा-वर एकादें अर्धगोल भांडें ठेवीत, अशासाठीं कीं आ-त्मा कोंडून जाऊं नये. एक्सिमो लोकांस असें वाटतें कीं प्रेतावर कांहीं दडपण पडल्यास त्यास दुःख होईल. पेरूव्हियन लोक एकादा नवा मुलूख जिंकल्यावर ते-थील थडगीं उघडीं करीत आणि म्हणत कीं प्रेतांस मो-कळया हवेंत बरें वाटतें.

इरक्वाइस लोक प्रेतास ऊब मिळावी व खाणें शिज-वितां यावें म्हणून थडग्याशीं रात्रीचा विस्तव नेऊन ठे-वीत. ब्राझिलीयन लोकांत नवीन थडग्यापाशीं विस्तव ठेव-ण्याची अशीच चाल आहे. शेब्रों लोक थंडीच्या व पा-वसाच्या दिवसांत असेच विस्तव थडग्याजवळ नेऊन ठे-वितात. पश्चिम आस्ट्रियन लोकांत मृत माणूस श्रीमान् असेल तर त्याच्या थडग्याशीं असल्या शेकोट्या वर्षें-चयावर्षें ठेवीत असतात.

८७. मृताचें पुनरुत्थापन व्हावयाचें तर कुडी शा-बूद पाहिजे; म्हणून ती तशी ठेवण्याबद्दल खबरदारी घे-तलेली आढळण्यांत येते; आणि कुडीस इजा झाल्यास जीव परत येणार नाहीं अशाहि समज दृष्टीस पडतो. आ-

बिसिंनियन लोक गुन्हेगारांचें प्रेत पुरीत नसत, असें कीं तेणेंकरून तें कुजलें जाऊन किंवा खालें जाऊन त्याचें पुनरुज्जीवन होऊं नये. इजिप्शन लोकांतहि मृताचें शीर न पुरणें म्हणजे मोठें पाप समजतात, कारण एरवीं अमरणपणा यावयाचाच नाहीं. न्यूझीलंदर लोक असें समजतात कीं, माणसास मारून खाऊन टाकिल्याशिवाय त्याचा पूर्ण नाश व्हावयाचा नाहीं. डमारा लोकांची अशी समजूत आहे कीं, मृत माणसें पुरल्यास स्वस्थ रहावयाचीं नाहींत; त्यांस लांडग्यापुढें टाकिलें पाहिजे; तरच त्यांच्यापासून पुनः आपणास त्रास व्हावयाचा नाहीं. मटचांबामधील नीग्रो लोकांच्या बायका नवऱ्यांच्या प्रेतांनीं आपणास त्रास देऊं नये म्हणून तीं पाण्यांत टाकून देतात. कामश्चाडेल लोक प्रेतें कुत्र्यांपुढें टाकितात. ह्याचें कारण बहुधा हेंच असावें.

उलटपक्षीं जेथें प्रेताचें चांगलें व्हावें अशी इच्छा असेल तेथें त्याची योग्य निगा घेतल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात. चिबचा लोक थडगीं दिसूं नयेत म्हणून त्यांजवर झाडें लावीत. न्यूझीलंदमधील मुख्यांचीं प्रेतें कांहीं काळपर्यंत उपाध्ये लोक डोंगराच्या माथ्यावर किंवा झाडींत किंवा गुहेंत नेऊन मुकाट्यानें पुरीत. ताहितियन लोक मृतांचीं हाडें चोरीस जाऊं नयेत म्हणून अति उंच डोंगरावर नेऊन ठेवीत. काफिर लोकांत सामान्य माणसांचीं प्रेतें लांडग्यापुढें टाकीत असून नाईक लोकांचीं प्रेतें गुरांच्या वाड्यांत पुरून टाकितात. बेचुआना लोकांत प्रेत अशा रीतीनें पुरल्यानंतर एक दोन तासपर्यंत त्या जाग्यावर गुरें फिरवितात, असें कीं, प्रेत पुरल्याचा मा-

गमोस अगदीं नाहींसा व्हावा. बोगोटा लोकांत तर ह्या-च्यापेक्षांहि विलक्षण चाल असे. ते नदीचा प्रवाह दुस-रीकडे वळवून तिच्या पात्रांत आपल्या नायकास पुरीत, आणि थडगे वाळलें म्हणजे पुनः वरून प्रवाह सोडीत. उरुआ नांवाच्या आफ्रिकन संस्थानांत ही चाल अद्या-पि मुरू आहे.

वरील उदाहरणांत प्रेतास माणसांपासून किंवा इतर प्राण्यांपासून त्रास होऊं नये ही इच्छा जशी बलवत्तर दिसते तशी इतर कांहीं उदाहरणांत त्यास दुःख होऊं नये ही दिसते. श्वासोच्छ्वासासाठीं पोकळ जागा ठेवण्या-ची चाल वर आम्हीं सांगितलीच; उंचावर प्रेतें ठेवण्या-ची जी कांहीं ठिकाणीं चाल दृष्टीस पडते तिचा हेतु हा-च असावा. उदाहरणार्थ कांहीं पालिनिशान लोक प्रेतें पराचीवर ठेवितात; आस्त्रेलिया व आंदमान एथेंहि कधीं कधीं हीच चाल दृष्टीस पडते. झुलू लोकांत कांहीं प्रेतें पुरतात, कांहीं जाळतात, आणि कांहीं झाडांवर नेऊन ठेवितात. डायाक व कायान लोकांत अशीच चाल आ-हे. पण अमेरिकेंत ही चाल फारच सामान्य आहे. तेथें डाकोटा, इराक्विस, आणि मंडन ह्या लोकांत ती दृष्टी-स पडते. त्यांत त्यांचा उद्देश प्रेतें लांडग्यांच्या व कु-त्र्यांच्या तावडींत सांपडूं नयेत हा असतो. चिपिवाज लोकांबद्दल स्कूलक्राप्ट तेंच म्हणतो. दक्षिण अमेरिकेंत हाच हेतु साधण्यसाठीं गुहांचा व गिरिकंदरांचा उपयोग करितात. कारिब लोक असेंच करीत. ग्वायानामधले इं-डियन लोक गुहा न सांपडली तरच प्रेतास इतरत्र पुर-तात. चिब्चा लोक व पेरूमधील लोक असेंच करीत, किं-

वा मालमसाला घालून प्रेतें देवळांतून ठेवून देत.

इतर खंडांतून प्रेतास भुताकडून किंवा जीवाकडून इजा होऊं नये एवढ्याच बद्दल खबरदारी घेतलेली दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, मांडिंगो लोक थडग्यावर कांटे घालितात, असें कीं तेणेंकरून लांडग्यांनीं वगैरे तें उकरूं नये. आरब लोक त्याच उद्देशानें थडग्यावर दगड रचतात; आणि एस्किमो लोक तसेंच करितात. बोंडो आणि ढिमाल हे लोक कोल्ह्यांनीं तसें करूं नये म्हणून थडग्यावर दगड ठेवितात. ही दगड ठेवण्याची चाल कित्येक ठिकाणीं इतकी शिखरास गेली आहे कीं ज्यानें जावें त्यानें थडग्यावर एक दगड टाकावा अशा रीतीनें थडग्यांवरून दगडांच्या राशींच्या राशी बनतात. कोठें ह्या राशी मृताच्या योग्यतेनुरूप कमजास्त बनवितात. दगड टाकणारांस दारू प्यावयास देऊन ह्या राशी डोंगराप्रमाणें उंच बनविल्याचींहि उदाहरणें कोठें आढळून येतात. ईजिप्शमधील मनोऱ्यांची उत्पत्ति ह्याच धोरणावर झालेली आहे; पण सर्वांचा मूळ हेतु मृतास इजा होऊन पुनरुत्थापनास विघ्न येऊं नये हाच होय.

८८. ह्या हेतूमुळेंच आणखी एका चालीची उत्पत्ति होते. पुनरुत्थापनास, शरीरास जखम वगैरे कांहीं होऊं नये किंवा तें नष्ट होऊं नये हें जसें आवश्यक होय, तसेंच तें कुजून जाऊं नये हेंहि आवश्यक होय. पण अगदीं रानटी लोकांस प्रेत कुजूं न देण्याची युक्ति माहीत नसल्यामुळें त्यांच्यांत ह्या चालीचीं उदाहरणें दृष्टीस पडत नाहींत; तीं जरा पुढें गेलेल्या लोकांत दृष्टीस पडतात. मेक्सिकन लोक ह्याच हेतुस्तव मृताचीं हाडें झाडाच्या

फांद्यांस बांधून ठेवितात, असें कीं पुनरुत्थापनाचे वेळीं मृतास तीं हुडकून काढण्यास अडचण पडूं नये. गार्सिलासो ह्यास ह्यासंबंधाच्या आपल्या चाली स्पष्ट करून सांगत असतां पेरुव्हियन लोक असें म्हणाले:—" पुनरुत्थापनाचे वेळीं सर्वांची एकच गर्दी व गडबड होईल; त्यांवेळीं आपणास त्रास पडूं नये म्हणून आम्हीं आपले केंस व नखें देखील जपून ठेवितों, आणि जमेल तितकें एकाच ठिकाणीं थुंकतों."

प्रेत कुजूं नये एतदर्थ लोआंगो लोक तीं मंदाग्नीवर सुकवितात; आणि मेक्सिकन व पेरुव्हिअन वगैरे लोक त्यांत मालमसाला भरितात. इजिप्शन लोकांच्या ममी प्रसिद्धच आहेत.

८९. दुसऱ्या कांहीं अशा चाली आहेत कीं त्यांजवरून पुनरुत्थापनाविषयक विश्वासाचें अप्रत्यक्ष निदर्शन होतें. म्हणून त्यांचें एथे दिग्दर्शन करूं. कांणा मेलें म्हणजे शरीरास कांहीं तरी व्यंग करून घण्याच्या ज्या चाली आहेत त्या ह्या होत.

ईलियडमध्यें मृतास केंस अर्पण करण्याच्या चालीचा उल्लेख आहेच. टास्मेनियन लोकांतहि स्त्रिया आपले केंस कापून थडग्यावर टाकून देतात. सुसू लोकांत आईच्या थडग्यावर वडील मुलीनें केंस कापून टाकलेले पहाण्यांत येतात. कोस्टनीग्रो लोकांत मृताचे निकट संबंधी हजामत करून टाकितात; आणि डमारा लोकहि सन्मान्य मित्रासाठीं तसेंच करितात. काफर, वांग्वे व हाटेटांट लोकांचें असेंच आहे. हवाई व सामोआ एथें केंस कापतात किंवा तोडतात. टोंगान लोक हजामत करितात; न्यूझीलं-

दर लोक अर्धें डोकें करितात, आणि तानीज लोक कैंस कापणें हें सुतकाचें चिन्ह समजतात. माद्गास्करमध्यें राजा राणी वगैरे मेल्यास सगळेच लोक कैंस कापितात. अमेरिकेंतहि तसेंच आहे. ग्रीनलंदरची विधवा नवऱ्यास वेणीदान करित, आणि मृत चिंकुकाचे नातेवाईक कैंस कापितात; चिपिवायन, कोमांची, डाकोटा, मण्डन व तुपी लोक असेंच करितात. लवकरच जिवंत होणाऱ्या मृतास संतुष्ट करण्यासाठीं हा विधि केला जातो असें कित्येक गोष्टींवरून स्पष्ट दिसतें. तोडा लोकांत वडील माणसास मान देण्यासाठीं म्हणून लहान माणसें केशकर्तन करितात, आणि आरब लोकांत दुःखप्रदर्शनार्थ मुली व मुलगे दोन्ही आपलीं झुलपें कापितात. दक्षिण अमेरिकेंतील आविपोन लोकांत एकादा सुभेदार मेला म्हणजे त्याच्या हाताखालचे सर्व लोक आपल्यास तासटून घेतात.

दुःखप्रदर्शनार्थ आणखीहि कांहीं व्यंगें करण्याच्या चाली आहेत. मर्तिकाचे वेळीं तास्मेनियन लोक आपल्या देहास शिंपांनीं व दगडांनीं जखमा करून घेत. आस्ट्रेलियन, ताहितियन, टांगन व न्यूझीलंदर लोक असेंच करीत. ग्रीनलंदर लोकांत कधीं कधीं असें करीत असें वाचण्यांत येतें. कोमांची लोकांच्या विधवा रक्त वाहून थके तोंपर्यंत आपल्या हातांस, पायांस व धडास जखमा करून घेतात, आणि कधीं कधीं आत्महत्याहि करितात. डाकोटा लोकांत बायका जखमा करून घेऊन शिवाय हाताचीं बोटेंहि कापून घेतात. टोंगा लोकांत महोपाध्याय मेला म्हणजे करांगळी कापून घेतात, आणि सांडविच

बेटांतील लोक राजा मेला म्हणजे जिभेवर गोंदून घेतात, किंवा कान कापून घेतात, किंवा एक दांत पाडून घेतात. डाहोमन लोक लढईंत मदत मिळण्याकरितां आपल्या मृत राजांच्या थडग्यांवर माणसाच्या रक्ताचें सिंचन करीत, मेक्सिकन लोक आपल्या देवांच्या मूर्तींस रक्त प्यावयास देत, व कांहीं धर्मोपदेशक रोज अंगांतील रक्त काढून टाकीत; यूकाटन, ग्वाटिमाला, सान्सालव्हेडार इत्यादि ठिकाणीं.असाच प्रचार असे; आणि पेरूच्या किनाऱ्यावरील लोक थडग्यावर व मूर्तीवर रक्तसिंचन करीत. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां मृताच्या दुय्यम आत्म्याचें संतर्पण करणें हाच ह्या सर्व विधींचा उद्देश असला पाहिजे ह्याबद्दल शंका वाटत नाहीं.

ह्या गोष्टीचा हाच उद्देश असे असें एके ठिकाणीं प्रत्यक्ष विधानच केलेलें आढळतें. टर्नर असें सांगतो कीं सामोअन लोक मर्तिकाचे वेळीं रक्तस्राव होईतोंपर्यंत दगडांनीं डोकें फोडून घेत असत, व मृतास आपण रक्तदान करितों असें म्हणत.

२०. ह्या सर्व चालींवरून मरण म्हणजे पुष्कळ वेळ बेशुद्ध राहणें होय, असें रानटी लोकांस वाटतें हीं गोष्ट सिद्ध होते. मारहाण करून प्रेतास जिवंत करण्याची खटपट करणें, मृताच्या नांवानें हाका मारणें, किंवा त्यास प्रश्न करणें व शिव्या देणें, प्रेतास खावयास घालणें व त्याच्याशीं खाणें पिणें ठेवून देणें, त्याच्यावर दाब पडून. त्यास त्रास होऊं नये, व त्यास श्वासोच्छासास हरकत होऊं नये अशा तजविजी योजणें, व अन्न शिजविण्यासाठीं व शीतनिवारणासाठीं त्याच्या-

पाशीं विस्तव नेऊन ठेवणें, श्वापदांकडून त्यास इजा होऊं नये व त्याचें प्रेत कुजूं नये एतदर्थ खबरदारी घेणें, आणि कोणी मेलें म्हणजे स्वतांस जखमा वगैरे करून घेणें, ह्या सर्व गोष्टींवरून हींच समजूत स्पष्ट होते; आणि ती लोक प्रत्यक्ष बोलूनहि दाखवितात.

उदाहरणार्थ, आफ्रिकेंतील आंबांबा लोकांस असें वाटतें कीं मोठ्या माणसांस व तरुगांस देवाचे उपाध्ये तीन दिवसपर्यंत बेशुद्ध करून ठेवितात, आणि कधीं कधीं कित्येक वर्षेपर्यंत देवाच्या घरांत पुरून ठेवितात, आणि नंतर जिवंत करितात. खुद्द लिव्हिंग्स्टनबद्दल एका झांबिझी सरदारास असें वाटलें कीं तो मिरियाटोंवा नामक इतालियन जिवंत होऊन आलेला आहे. फिजियन लोकांची अशी समजूत असे कीं, सर्व लोक मरावयास लागले याचें कारण अगदीं पहिल्या माणसाच्या मुलांनीं एका देवाच्या हुकुमाप्रमाणें त्यास पुनः खणून काढिलें नाहीं हें होय; तो देव म्हणाला त्यांनीं जर तसें केलें असतें तर थोडे दिवस पुरल्यानंतर सर्व माणसें पुनः जिवंत झालीं असतीं. पेरूमध्यें प्रेताची इतकी काळजी घेत याचें कारण हेंच कीं, मृत माणसें पुनः जिवंत व्हावयाचीं अशी त्यांची पक्की समजूत असे.

उच्चतर जातींमध्येंहि ही समजूत दृष्टीस पडतेच. उदाहरणार्थ मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें भविष्यवादी, धर्मार्थ जीव देणारे, आणि साधुसंत हे मरत नाहींत असें समजतात, म्हणून त्यांची मालमत्ता कायम राहते. ख्रिस्ती लोकांतहि शार्लेमेनपासून तों तहत नेपोलियनपर्यंत सर्व मोठे लोक पुनः जिवंत होतील असें समजतात. ता०

९ जुलई १८७५ रोजीं लिंकनचा बिशप डा. वर्डस्वर्थ यानें प्रेतें जाळण्याचीं चाल सुरू करण्याविरुद्ध अशी एक कोटी लढविली कीं, तसें करूं लागल्यास पुनरुत्थापनाबद्दलचा जो लोकांचीं विश्वास त्यास धक्का बसेल. तात्पर्य काय कीं, मूळ माणसाप्रमाणें डा. वर्डस्वर्थ यास पुरलेल्या प्रत्येक माणसाचें प्रेत पुनः जिवंत होईल असें वाटतें इतकेंच नव्हे तर प्रेत नष्ट झाल्यास पुनरुज्जीवन होणार नाहीं असेंहि वाटतें.

आतां पुनरुत्थापनाबद्दलचीं ही सुधारलेल्या लोकांची समजूत रानट्याच्या समजुतीपासून कांहीं अंशीं निराळी कशी होते ती पहा. सुधारलेला माणूस ती अजिबाद सोडून देत नाहीं, तर पुनरुत्थापन केवळ लांबणीवर टाकितो; म्हणजे मृत माणूस कांहीं तासांनीं किंवा दिवसांनीं किंवा वर्षांनीं जिवंत होईल, असें न समजतां अगदीं अखेरीस सृष्टिप्रलयाच्या वेळीं जिवंत होईल असें समजतो.

प्रकरण तेरावें

भूत, पिशाच, डांव इत्यादि विषयक कल्पना

—:०:—

९१. प्रसिद्ध प्रवासी मंगोपार्क आपल्यास दोघे नीग्रो घोडेस्वार एकाएकीं कसे भेटले, व आपल्यापासून भीतीनें पळून कसे गेले, हें सांगून पुढें म्हणतो:—" पश्चिमेकडे एका मैलावर त्यांची माझ्या नोकरांशीं गांठ पडली. तेव्हां त्यांनीं त्यांना एक भयंकर गोष्ट सांगितली. ते म्हणाले, मोठ्या जंगी आंगरख्याचें आम्हीं एक भूत पाहिलें, व तें दृष्टीस पडतांच थंड पाण्याच्या वर्षावाप्रमाणें मजवर थंड वाऱ्याचा वर्षाव झाला असें त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला. "

मनांत पूर्वीच एकादी समजूत दृढ झालेली असली म्हणजे भयाच्या योगानें तीस जास्तच जोर कसा येतो हें या गोष्टीवरून स्पष्ट कळतें. यावरून मृत लोक पुनः जिवंत होतात असें रानटयास कसें सहज वाटत असेल-हेंहि सहज लक्षांत येईल.

स्पेन्सर साहेबांच्या ओळखीचा एक धर्मोपदेशक आहे त्यास जातिविषयक उत्क्रमणकृति कबूल असूनहि ईश्वरानें माणूस मातीपासून बनविलें, आणि त्याच्या नाकांत जीववायु सोडिला, ही ख्रिस्ती धर्मांतील काहणी अक्षरशः खरी वाटते.

सुधारलेल्या लोकांतील सुशिक्षिताची जर ही कथा, तर अपक्व व अज्ञान अशा रानट्याच्या मनांत परस्पर-

विरुद्ध समजुतींस थारा सहज मिळतो यांत नवल तें काय? मृतांस पुरिलें तरी तीं प्रत्यक्ष देह धारण करून पुन्हां येतात असें तें कसें समजतात, याचें आपणास आश्चर्य वाटतें. आणि देह मागें ठेवून दुय्यम निघून जातो असें जर ते म्हणतात, तर त्यास अन्नवस्त्राची जरूर लागेल असें त्यांस वाटतें हेंहि चमत्कारिक दिसतें. हा दुय्यम जर वायुरूप किंवा सूक्ष्मरूप असतो अशी त्यांची कल्पना असेल तर तो नेहमींचें खाणेंपिणें खातो पितो असें त्यांस कसें वाटतें? बरें तो जर स्थूलरूप असतो असें त्यांस वाटत असेल तर तो प्रेताव्यतिरिक्त असतो आणि थडगें उघडल्याविना त्यांतून निघतो, असें कसें वाटत असेल याचेंहि आश्चर्य वाटतें.

पण सुशिक्षितांची जी वर स्थिति सांगितली ती ध्यानांत आणतां, मूळ माणसाच्या दुय्यम विषयक कल्पना जरी परस्परविरुद्ध दिसतात तरी त्या त्यास खऱ्या वाटतात असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

९२. आस्त्रेलियन लोकांची समजूत अशी असे कीं काळीं माणसें खाण्याच्यापूर्वी त्यांची कातडी सोलून काढिल्यास गोरीं बनून पुनः जिवंत होतात. सर जार्ज ग्रे आस्त्रेलियांत गेला तेव्हां आपला मृत मुलगा परत आला म्हणून तेथील एक बाई त्यास मिठी मारावयास आली. मिसेस टाम्सन हिचीहि गोष्ट अशीच सांगतात. ज्या आस्त्रेलियन लोकांत ती रहात असे ते तीस आपल्याच पैकीं मेलेल्या एका बाईचें हें भूत म्हणून समजत, व तिची कींव करीत. तेथील एका रहिवाशाचा हात वळलेला होता. त्यास तसल्या हाताच्या मृत माणसाचें पि-

शाचं समजून, अरे माझ्या बालूडेरि, तूं गोरा माणूस-हांऊन आलास, म्हणून त्या मृताचें आत्म म्हणूं लागले. न्यूकालिडोनियन लोक असें समजतात कीं गोरे लोक हे पिशाच असून रोग आणतात. डान्लें बेट, प्रिन्स आफ वेल्स नामक बेटें, आणि केप पार्क एथील लोकांच्या भाषेंत गोरा व भूत यांस एकच शब्द आहे. क्रूमेन लोक युरोपियनांस भूतांची जात म्हणून म्हणतात; जुन्या कालाबार मधले लोक त्यांस भूतमाणसें म्हणतात, आणि गाबूनमधले पांग्वे लोक त्यांस भुतें म्हणून म्हणतात. तात्पर्य दुय्यम किंवा पिशाचि हें मूळमाणसाप्रमाणेंच स्थूलदेह धारण करून असतें ही समजूत ह्यावरून व्यक्त होते.

हीच समजूत अन्य तऱ्हांनीं इतर लोकांमध्येंहि दिसून येते. उदाहरणार्थ क्यारेन्स लोक असें समजतात कीं आत्मा कधीं कधीं मरणानंतर दृष्टीस पडतो, व तो हुबेहूब पूर्वीच्या माणसासारखाच दिसतो; आत्मा शरीरापासून भिन्न झाला म्हणजे नंतरच्या कारकीर्दींत पूर्वीच्या सारखेच व्यापार करीत असतो, फरक इतकाच कीं श्वास आतां थकवा येत नाहीं, किंवा पुरेसें होत नाहीं. प्राचीन काळचे पेरूदेशस्थ लोक असें स्पष्ट समजत कीं आत्मे हे पूर्व देशच्या सर्व लवाजम्यासहित थडग्यांतून वर उठलेच पाहिजेत. शिवाय ते असेंहि मानीत कीं मृतांचे आत्मे इकडे तिकडे भटकत असतात, आणि थंडी, तहान, भूक, व प्रवास हीं सोशीत असतात. आणि सामोआंतील लोक सुभेदारांच्या थडग्यांशीं विस्तव ठेवीत, व असें समजत कीं, न पुरलेल्या मृतांचे आत्मे, अरे कायरे ही थंडी ! कायरे ही थंडी ! असें ओरड असतात.

प्रत्यक्ष उद्गारांशिवाय कृतींनींहि ही समजूत व्यक्त होत असते. कांहीं पेरू लोक वरांत दाणे, मीठ, वगैरे पसरून ठेवीत, अशासाठीं कीं, मृतांचे आत्म्यांच्या पावलाची चाहूल त्यावरून कळावी. ज्यू लोकांत ह्याच हेतूनें राख पसरीत, व समजत कीं भुतें म्हणजे दुष्ट मृतांचे आत्मे होत. कांहीं नीग्रो लोक भुतें आपल्या गांवांत येऊं नयेत म्हणून रस्त्यांत कांटे पसरीत, त्यांचीहि कल्पना हीच असावी. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांत अशी समजूत आहे कीं भुतें तंबाकू ओढितात, आणि फीजी लोकांत अशी आहे कीं माणसांनीं मारलेल्यांचे आत्मे देव " भाजून " खातात. त्यांच्यांत अशीहि समजूत आहे कीं कांहीं आत्म्यांस माणसेंहि ठार करितात; म्हणजे काय तर मूळ माणसाप्रमाणें त्याच्या दुश्यमाशींहि लढाई करावी लागते व करतां येते. आमाझुलू लोकांतहि अशीच समजूत आहे, आणि स्पेन्सर साहेब म्हणतात, प्राचीन काळचे हिंदु लोक, टार्टर लोक, आणि अगोदरचे युरोपियन लोक हेहि आत्मा मूर्त असतो असें मानीत.

९३. ही जी मूळ कल्पना तिजवरून नंतर कमी अपक्व कल्पना कशा उत्पन्न झाल्या हें स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं; पण त्यांच्यांत हळूहळू बदल होत गेला असें मात्र दिसतें.

ताहितियन लोकांचें असें मत आहे कीं मृतांचे आत्मे देवांकडून खाल्ले जात नाहींत, तर कांहीं खाल्ले जातात आणि बाकीचे स्वप्नांतून दृग्गोचर होतात. याकूत लोक आत्म्यांस डोळे आहेत असें समजतात, कारण

त्यांस भक्ष्य कोठें ठेविलें आहे तें दिसावें म्हणून ढोबळ खुणा करून ठेवितात. यूकाटन मधले इंदियन लोक मृताच्या आत्म्यास घरीं सहज येतां यावें म्हणून थडग्यापासून घरापर्यंत खडूच्या खुणा करून ठेवितात. निकोबार मधले लोक घरांवर दुष्ट भुतांची दृष्टि पडूं नये म्हणून त्यांच्या समोर पडदे उभारितात.

हीब्रचू लोकांत भुतास कधीं कधीं स्थूल शरीर असतें असें समजत, कधीं कधीं त्यास शरीरविहीन समजत, आणि कधीं कधीं ह्या दोहोंमधली स्थिति त्यांस असते असें समजत. येशू ख्रिस्त पुनः जिवंत झाला तेव्हां त्याच्या अंगावर प्रत्यक्ष जखमा होत्या असें वर्णन आढळतें; तथापि तो बंद केलेल्या दरवाज्यांतून व भिंतींतून बेलाशक जात होता असेंहि वर्णन आढळतें. तसेच देवदूत अदृश्य फिरतात असेंहि वर्णन आढळतें, आणि ते पंखांनीं उडतात असेंहि आढळतें.

प्राचीन काळीं युरोपियन लोकांच्या भुतांविषयीं अशाच समजुती असत असें आढळतें. दरवाजे उघडणें, सांखळ्या वाजवणें व दुसरे आवाज करणें हें जें भुतें करीत म्हणून समजत तें करण्यास स्थूल इंद्रियें असलींच पाहिजेत; आणि तशीं असतात असें जरी प्रत्यक्ष कोणी म्हणत नसे, तरी तीं मुकाट्यानें ते गृहीत करीत असलेच पाहिजेत. शिवाय मृताच्या आत्म्यास अग्निकुंडांत घालितात ही जी समजूत अद्यापि आहे ती सयुक्तिक होण्यास कांहीं तरी मूर्तपणा कल्पिलाच पाहिजे.

९४. ह्या अर्धवट मूर्त आत्म्याच्या कल्पनेबरोबर वा युगपत किंवा अमूर्त आत्म्याविषयीं देखील कल्पना धा-

रण केलेल्या दृष्टीस पडतात. मरूं घातलेला माणूस व नुस्ताच मेलेला माणूस ह्यांच्यामध्यें जो फरक दृष्टीस पडतो, त्यावरून तशा प्रकारची दुय्यमविषयक कल्पना उत्पन्न झालेली आहे, व ती प्रत्येक फरकानुरूप निरनिराळी बनलेली आढळते.

मनुष्य मेला म्हणजे काळीज उडण्याचें बंद होतें. तर जो दुय्यम मरणाचे वेळीं निघून जातो तो काळीजच असेल कीं काय? कांहीं जाती म्हणतात, होय. निकाराग्वामधील इंदियन लोकांस बोबाडिलानें विचारतां त्यांनीं असेंच उत्तर दिलें. आणखी प्रश्न करतां ते म्हणाले, माणसास दोन काळजें असतात; त्यांतलें जें निघून जातें तें त्याच्या सजीवपणाचें कारण असतें. प्राचीन पेरूंतील इंका लोकांची समजूत अशीच होती. त्यांच्यांत काळीज व आत्मा ह्यांस एकच शब्द असे. पण काळीज उडण्याचें बंद होण्यापेक्षां श्वासोच्छ्वास बंद होणें ही माणूस मेल्याची जास्त स्पष्ट खूण असल्यामुळें निघून गेलेला श्वास म्हणजे निघून गेलेला दुय्यम होय अशी समजूत जास्त पसरलेली आढळते. मध्य अमेरिकेंतील लोकांत ह्या दोन्ही समजुती असत. उच्चतर जातींमध्येंहि हीच दुसरी समजूत आहे हें सर्वांस माहीतच आहे. ख्रिस्ती लोकांच्या जुन्या चित्रांतून माणसाच्या तोंडांतून त्यांच्याच लहान आकृती निघून जातांना, व त्यांपैकीं कांहीं देवदूतांनीं व कांहीं भुतांनीं सांवरतांना, दाखविलेल्या दृष्टीस पडतात. कांहीं लोक आत्मा म्हणजे छायाच समंजतात. उदाहरणार्थ, ग्रीनलंदर लोकांत दोन आत्मे आहेत म्हणून समजतातः एक सांवली व एक

श्वास. आमाझालू लोकांत हाच समज असल्यामुळें मृत मांणसास सांवली नसते असें समजतांत.

दुय्यमाविषयीं अशा सूक्ष्मपणाच्या कल्पना उत्पन्न झाल्या म्हणजे दुसऱ्या सहजच अशा उत्पन्न होतात कीं भुतांस निघून जाण्यास द्वारें लागत असतात, पण तीं लहान पुरतात. इराक्वाईस लोक मृताच्या आत्म्यास शरीरांत पुनः शिरतां यावें एतदर्थ थडग्यास लहानसें छिद्र ठेवितात. आंसाईरी लोकांत आगतस्वागताच्या दिवाणखान्यास बरींच छिद्रें ठेवितात, असें कीं निरनिळ्या आत्म्यांस एकमेकांस न भेटतां जातां येतां यावें.

९५. दुय्यमाबद्दलच्या कल्पना अशाच रीतीनें उत्पन्न होतात अशाबद्दल प्रत्यक्ष पुरावा जरी नसता तरी भाषेच्या अप्रत्यक्ष पुराव्यावरूनहि ती गोष्ट सिद्ध झाली असती. हा पुरावा जगाच्या सर्व भागांतून व सर्व प्रकारच्या लोकांकडून आपणास मिळतो.

टास्मेनियन लोकांबद्दल वर्णन करीत असतां मिलिगन असें म्हणतो कीं तें आपल्या संरक्षक देवदूतांस "वारावा" म्हणून म्हणत असतात, व त्या शब्दाचा अर्थ, सांवली किंवा भूत असा आहे. आझ्टेक भाषेंत "चेकाटल" शब्दाचे अर्थ हवा, जीव व आत्मा असे आहेत. न्यू इंग्लंद देशांतील जाती आत्म्यास "चेमंग" म्हणजे सांवली असें म्हणत. मोहाक भाषेंत आत्म्यास "आटूरिझ" असा शब्द असून तो "आटूरियान्" म्हणजे श्वासोच्छ्वास करणें या क्रियापदापासून उत्पन्न झालेला आहे. आलगांक्विन, आरावाक, आविपोन व बासूटो ह्यांच्या भाषांतून अशाच अर्थाचे शब्द सांपडतात.

सुधारलेल्या लोकांच्या म्हणजे सेमिटिक व आर्यन ह्या भाषांतून आत्मा म्हणजे छाया होय किंवा वायु होय अशा अर्थाचे शब्द आढळतात ह्याबद्दल टायलर साहेबानें हवा तितका पुरावा दिला आहे.

९६. आतां ह्या कल्पनांपासून आणखी कांहीं कल्पना उत्पन्न होतात त्यांचा विचार करूं; प्रथम त्यांच्यापैकीं ज्या अत्यन्त उघड आहेत त्या घेऊं.

माणसें श्वासोच्छ्वास करितात त्याप्रमाणें पशुपक्षीहि करतांना नजरेस येतात. म्हणून मरणाचे वेळीं जो दुय्यम निघून जातो तो जर माणसाचा श्वासच असेल तर जनावराचाहि मरते वेळीं निघून जाणारा जो श्वास तो त्याचा दुय्यमच असला पाहिजे; म्हणजे जनावरांचेंहि भूत असलें पाहिजे. हें अनुमान मूळ माणसासहि करतां येण्यासारखें आहे. त्याप्रमाणेंच ज्याठिकाणीं माणसांच्या छाया म्हणजे त्यांचे आत्मे होत अशी समजूत आहे त्याठिकाणीं जनावरांच्या छाया म्हणजे त्यांचे आत्मेच होत अशीहि अनुमानावरून समजूत बनलेली आढळते.

हलक्या प्रतीचा रानटी माणूस एथेंच थांबतो; पण ज्याची विचारशक्ति अमळ वाढली आहे तो आणखी एक पायरी पुढें जातो. झाडांना दृश्य श्वासोच्छ्वास नसल्यामुळें तीं जरी त्या बाबतींत त्याच्यापासून भिन्न दिसतात तरी तींहि त्यांच्यासारखींच वाढतात, व दुसऱ्या झाडांना उत्पन्न करितात; म्हणजे तीं वाढतात, क्षीण होतात आणि प्रजोत्पत्ति करून मरण पावतात. शिवाय त्यांची छाया पडतेच; आणि त्यांच्या फांद्या जशा हालतात तशा त्या छायाहि हालतात. म्हणून त्यांनाहि आ-

त्मे असतात असें मानणें स्वाभाविक दिसतें. अशा प्रकारचा समज डायाक, क्यारेन, आणि कांहीं पालिनिश्यन इत्यादि कांहीं अंशीं पुढें गेलेल्या जातींमध्यें दृष्टीस पडतो, व त्यामुळें ते वनस्पतींचीहि पूजा करीत असतात. हाच समज त्यांच्यापेक्षांहि जास्त सुधारलेल्या लोकांत आहे हें सांगावयास नकोच.

पण एवढ्यावरच ही गोष्ट थांबत नाहीं. इतकी प्रगति झाली म्हणजे वाढत जाणाऱ्या बुद्धीस आणखीहि पुढें जावेंसें वाटतें. कारण छाया ह्या माणसें, जनावरें, व झाडें ह्यांनाच असतात असें नाहीं, तर इतर वस्तूंसहि असतात. म्हणून छाया जर आत्मे असतील तर ह्या इतर वस्तूंना आत्मे असलेच पाहिजेत. आतां ही गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं हा समज अगदीं कनिष्ठ प्रतीच्या रानटी लोकांत आढळून येत नाहीं. उदाहरणार्थ, फयूजियन, अस्त्रेलियन, तास्मेनियन, आंडामानीस किंवा बुशमेन ह्या लोकांत हा समज वसत नाहीं, किंवा वसत असल्यास प्रवाशांचें लक्ष जाईल इतक्या स्पष्ट रीतीनें वसत नाहीं. पण जास्त सुधारलेल्या जातींत तो उत्पन्न होऊन वाढतहि जातो. क्यारेन्स लोकांस वाटतें कीं सृष्टींतील प्रत्येक वस्तूचा देव किंवा धनी असून तो तिचें संरक्षण करीत असतो; ते समजतात कीं हत्यारांसारख्या ज्या उपयुक्त वस्तू आहेत त्यांनाहि प्रत्येकीं 'ले' किंवा आत्मा असतो. चिपिवाज लोकांचा समज असाच आहे. फिजियन लोकांनीं तर हा समज फारच पुढें नेला आहे; कारण ते घरांस, जहाजांस, व सर्व प्रकारच्या हत्यारांस आत्मे आहेत असें समजतात.

ह्या सर्व उदाहरणांवरून असें लक्षांत येईल कीं व-स्तूंना आत्मे असतात हा समज, माणसांना आत्मे अ-सतात ह्या समजावरून, बुद्धीची विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढ झाली म्हणजे उत्पन्न होत असतो; आणि मूळचा समज चुकलेला असल्यामुळें हाहि चुकलेला असतो; पण एरवीं अगदीं स्वाभाविक असतो.

९७. असो. आतां अशा दृष्टीनें किती प्रकारचे आ-त्मे व भुतें उत्पन्न होतात त्यांचा एकदा गोषवारा घेऊं.

पहिले मेलेल्या आईबापांचे व नातेवाईकांचे आत्मे होत. नंतर निजलेल्या माणसांचे किंवा बेशुद्ध पडलेल्यां-चे भटकणारे दुय्यम आत्मे येतात. नंतर जागृत माण-सांचे त्यांना कांहीं वेळ सोडून गेलेले आत्मे येतात. श-त्रूंचे आत्मे व शत्रूंचे आत्मे, आपल्या टोळींतील लो-कांचे आत्मे व इतर टोळ्यांतील आत्मे, असाहि विभाग होतो; शिवाय न पुरलेल्यांचे दुष्ट आत्मे हा एक नवीन वर्ग बनतोच.

ह[illegible]नर मग अन्य वस्तूंचे आत्मे येतात, म्हणजे जना[illegible]तींचे, आणि जड पदार्थांचे. मेक्सिकन लोक पशूंचे आत्मे अमर असतात असें समजत, आणि मालागासी लोक पशूंचे व माणसांचे आत्मे दक्षिणेकडे एका मोठ्या पर्वतांत वास करितात असें मानीत. पण पशूंचे आत्मे जरी सर्वच रानटी लोक मानीत नाहींत, आणि फीजियन व इतर लोक फुटलेल्या भांड्यांचे आ-त्मे परलोकीं जातात असें जरी समजतात, तरी अशा प्रकारचे आत्मे माणसाच्या कामांत हात घालितात, असें कोणी समजत नाहीं.

९८. शरीर व आत्मा ह्यांबद्दलच्या कल्पना, ह्या गोष्टींवरून जास्त जास्त भिन्न झालेल्या कशा दिसतात एवढेंच आतां पाहणें राहिलें आहे. मरणाची कायमची बेशुद्धि आणि इतर प्रकारच्या कांहीं मुदतीच्या बेशुद्धी ह्यांच्या संबंधाच्या कल्पना, अक्कल वाढत जाईल त्याप्रमाणें जास्त जास्त भिन्न झालेल्या जशा आपणास गतप्रकरणांत दृग्गोचर झाल्या, तशाच प्रस्तुत प्रकरणांत स्थूल आत्मा व सूक्ष्म आत्मा ह्यांचलद्दच्या कल्पना हळूहळू भिन्न झालेल्या दृष्टीस पडतात; व त्या भिन्नतेचें कारण हळूहळू वाढणारें ज्ञान व विवेकबुद्धि हें दिसतें.

उदाहरणार्थ, बासूटो लोकांस आत्मा इतका स्थूल वाटतो कीं, त्यांस वाटतें कीं माणूस नदीच्या कांठानें चाललेला असला, व त्याची सांवली पाण्यावर असली तर आंतील मुसर त्या सांवलीस धरून त्या माणसास आंत ओढूं शकेल. आतां हा समज अनुभवाशीं इतका विरूप आहे कीं भौतिक ज्ञान जसें वाढत जाईल तसा तो बदलत गेलाच पाहिजे, आणि आत्म्यास कमी कमी स्थूल स्वरूप येत गेलेंच पाहिजे. किंवा दुसरी कोणती कल्पना घ्या. फाक्षीं फिजियन लोकांस आत्मा इतका द्रव्यमय वाटतो कीं मरणानंतर तो प्रवास करीत असतां देवांकडून तो धरला जाऊन ठार होण्याचा संभव आहे; आणि दुसऱ्या पक्षीं ते असें समजतात कीं सांवली आणि प्रतिबिंब असे माणसाचे दोन आत्मे आहेत. आतां हे दोन समज इतके परस्परविरुद्ध आहेत कीं, विचारांनीं ते बदलत गेलेच पाहिजेत. विचारशक्ति वाढत जाईल तसतसा हा विरोध जास्त जास्त स्पष्टपणें लक्षांत आला पाहिजे, व त्यामुळें

मूळ समजुतींत जास्त जास्त फरक होत गेले पाहिजेत. म्हणजे दुय्यम व्यक्ति पहिल्या प्रथम जी मूळ व्यक्तीप्रमाणेंच स्थूल समजली जात असते ती क्रमाक्रमानें कमी कमी स्थूल होत गेली पाहिजे. प्रथम ती अर्धवट घन झाली पाहिजे, नंतर वायुमय झाली पाहिजे, आणि नंतर सूक्ष्म झाली पाहिजे. आणि ही शेवटची पायरी एकदां प्राप्त झाली म्हणजे अस्तित्वांतील वस्तु ज्या गुणधर्मांनीं आपण ओळखतों ते तिच्या अंगीं असतील असें मानण्याचें बंद झालें पाहिजे. तात्पर्य ज्याला मर्यादा मुळींच घालून दिलेल्या नाहींत असें काय तें अस्तित्व त्यांच्यासंबंधानें शिल्लक राहिलें पाहिजे.

प्रकरण चवदावें

परजन्मविषयक कल्पना

९९. पुनर्जागृतिविषयक समजामध्यें पश्चाज्जीवित्तावद्दलच्या समजाचा अंतर्भाव होतो. मूळ माणूस दीर्घ विचार करण्यास असमर्थ असल्यामुळें, व तसा विचार करण्यास योग्य अशी भाषाहि त्याजपाशीं नसल्यामुळें, त्यास ह्यावद्दलची कल्पना कशी तरी करावी लागते. म्हणून मृताच्या पश्चात्स्थितीविषयींच्या त्याच्या कल्पनांत इतका गोंधळ उत्पन्न होतो. मरण म्हणजे समूळ विनाश असें मानणारांमध्येंहि असा समज दृष्टीस पडतो कीं पळून गेलेल्या मृतांचे दुष्टआत्मे गुहांतून वास करीत असतात.

पुढील जीविताबद्दलच्या कल्पना प्रथम जरी असंबद्ध असतात तरी त्यांचे मुख्य मुख्य विशेष काय असतात, आणि त्यांस जास्त जास्त सुसंबद्ध स्वरूप कसें येत जातें हें आपणास पाहिलें पाहिजे. प्रथम हा समज अर्धवट असून मर्यादित असतो. गतप्रकरणांत आपण असें पाहिलें कीं कांहीं लोक पुनः जीव येणें ही गोष्ट प्रेतास जपून ठेवण्यावर अवलंबून असते असें समजतात, व त्याचा नाश झाल्यास जीविताचाहि समूळ नाश होतो असें मानितात. शिवाय द्वितीय जीवित देखील मारून नष्ट करतां येतें, असें कांहीं लोक समजतात. मृताचा दुष्यम लढाईत पुनः ठार होऊं शकतो; किंवा मृतांच्या लोकीं जात असतां रस्त्यांत नष्ट होऊं शकतो; किंवा देव त्याला भक्षून टाकूं

शकतात, असे समज दृष्टीस पडतात. कांहीं लोक या बाबतींत कांहीं ज्ञातिमर्यादा मानितात. टोंगामध्यें असें समजतात कीं नायकांस तेवढे आत्मे असतात. इतर कांहीं ठिकाणीं पुनः जीव येणें ही गोष्ट वर्तन व त्याचे आनुषंगिक परिणाम यांवर अवलंबून असते असें समजतात. कांहीं जाती समजतात कीं पुनर्जीवित शौर्यानें प्राप्त होतें. उदाहरणार्थ, कोमांची लोक असें समजतात कीं चांगल्या माणसांस, म्हणजे डोकीं उडवण्यांत व घोडे चोरण्यांत धिट्टाई दाखवणारांस, तें प्राप्त होतें. उलटपक्षीं न्यूझिलंडच्या गरीब व बिनलढाऊ लोकांस असें वाटे कीं स्वाभाविक मरणाहून इतर मरण आल्यास परजन्माची मुळींच आशा नको; म्हणून ते ठार झालेल्यांस पशूंनीं व गिधाडांनीं खावें एतदर्थ उघड्यावर टाकीत. कोणी कोणी पुनर्जीवन देवाच्या मर्जीवर अवलंबून असतें म्हणून समजतात; उदाहरणार्थ प्राचीनकाळचे आर्य लोक पुनर्जीविताबद्दल प्रार्थना करीत व तो मिळण्यासाठीं यज्ञ करीत. आणि पुष्कळ लोकांची अशी समजूत दिसते कीं हें दुसरें जीवित दुसऱ्यानें मरण येऊन संपतें. असो. आतां 'पुनर्जीविताची मर्यादा' ह्या विशेषाचें प्रथम विवेचन करूं.

१००. मृत लोक स्वप्नांत दिसतात ह्या गोष्टीवरून जशी पुनर्जीविताची कल्पना उत्पन्न होते तशी त्याच्या मर्यादेचीहि होते. स्वप्नामध्यें दिसणारीं माणसें जागेपणीं माहितींतीलच असलीं पाहिजेत हें उघडच आहे. म्हणून बरेच पूर्वीं मेलेले माणूस स्वप्नांत न दिसल्यामुळें ते अस्तित्वांत नाहींत असें समजतात. उदाहरणार्थ, नीग्रो लोक बापाचा किंवा भावाचा आत्मा जिवंत आहे असें सम-

जंतात. पण आज्याचा जिवंत आहे असें समजत नाहींत. आमाझालू लोकहि पुष्कळ दिवसांपूर्वी मेलेल्यांचे आत्मे अंगदीं मरून गेले आहेत म्हणून समजतात. मरणानंतरचें जीवित अल्पकाळ टिकतें अशी जी प्रथम कल्पना असते तीच तें दीर्घकाळ टिकतें अशा रीतीची कशी बनते ह्याचा विचार सध्यां कर्तव्य नाहीं. सध्यां इतकेंच सांगून ठेवितों कीं ही कल्पना पायऱ्यापायऱ्यांनीं उत्पन्न होत जाते.

१०१. आतां हें पुनर्जीवित कोणत्या स्वरूपाचें असतें ह्याचा विचार करूं. पूर्वीच्या एका प्रकरणांत वर्णिलेल्या कांहीं मरणोत्तर क्रियांवरून असें दिसतें कीं त्या करणारे लोक मरणोत्तरजीवित मरणपूर्वजीविताप्रमाणेंच बहुतेक असतें असें समजतात. उदाहरणार्थ चिनूक लोक म्हणतात कीं रात्रीं मृतलोक उठतात आणि खाणें शोधूं लागतात. कोमांची लोक असें समजतात कीं, मृतांस भक्ष्यार्थ रात्रीं पृथ्वीवर येण्याची परवानगी असते, पण उजाडतांच त्यांनीं परतलें पाहिजे. दक्षिण अमेरिकेंतील लोकांत द्वितीय जीवित हें पहिल्याचेंच शेंपूट समजतात, आणि मरण म्हणजे जीवितांतील गोष्टींपैकीं एक गोष्ट असें समजतात. ह्याच समजुतीवर तुपी लोक मृतास बसलेल्या स्थितींत घरांतच पुरीत असत, व त्याच्यापुढें अन्न ठेवीत. सारांश, इतर समजुतींत बारीक सारीक फरक असले तरी ह्या बाबतींत सामान्य ऐकमत्य दिसतें.

१०२. मरणानंतर आपणास खावयास पृथ्वीवर मिळणारेच पदार्थ मिळतील असें रानटी लोक समजतात, मात्र ते जास्त चांगले व जास्त विपुल असतील असें

ते मानतात. इन्युइट लोकांस वाटतें कीं आपणास मरणोत्तर रेन्दीरचें मांस खावयास मिळेल. क्रीक लोकांस वाटतें कीं मरणोत्तर आपण जेथें जाऊं तेथें अन्न विपुल व पाणी स्वच्छ प्यावयास मिळेल; कोमांची लोकांस वाटतें कीं आपणास लठ्ठ म्हशीरेडे विपुल खावयास मिळतील, आणि पाटागोनियन लोकांस वाटतें कीं परजन्मीं आपणास यथेष्ट दारू प्यावयास मिळेल. टोडा लोकांस वाटतें कीं मरणोत्तर आपणास दुधाचा पुरवठा करण्यासाठीं आपल्या म्हशी आपणास तेथें येऊन मिळतील.

खाण्यापिण्याप्रमाणें धंदेउद्योगाहि तेथें एथल्याचसारखे असतील असें ते समजतात. तास्मेनियन लोकांस वाटे कीं तेथें शिकार करतांना आपणास कधीं थकवा येणार नाहीं, किंवा फसगत कधीं होणार नाहीं. डाकोटा लोकांस वाटतें कीं तेथें आपणास पूर्वीच्या शत्रूंशींहि लढाई करावयास सांपडेल. स्कांडिनेव्हियन लोकांहि तेथें आपणास रोज खावयास व लढावयास सांपडेल असें समजतात.

१०३. मृत मनुष्याची जंगम मालमत्ता त्याच्याबरोबर पुरण्याची चाल प्रवास पुस्तकांवरून पुष्कळ वाचकांना परिचितच झालेली असेल. समाजस्थिति प्रथम प्रथम जशी सुधारत जाईल तशी ही चाल वाढत जाते. म्हणून त्याचीं आतां थोडीं उदाहरणें देऊं.

मृत रानट्यास पारध करणें व लढणें अवश्य असल्यामुळें शस्त्रांची तरतूद केलीच पाहिजे; म्हणून प्रेताबरोबर शस्त्रें व हत्यारें पुरण्याची चाल सुरू झाली; व म्हणूनच टोंगूज लोक मृत माणूस जागा झाला म्हणजे त्याच्या उपयोगीं पडण्यासाठीं ह्या व इतर वस्तू त्याच्या प्रे-

तावरोवर पुरीत असतात. कालमक, एस्किमो, इरोक्विस, नाग, वगैरे लोक असेंच करितात; व त्यांपैकीं कांहीं बायकामुलांचीहि योग्य तरतूद करितात, म्हणजे बायकांचीं भांडींकुंडीं व मुलांचीं खेळणीं त्यांच्या प्रेतांवरोवर पुरीत असतात.

मृताच्या दुय्यमास वस्त्रांची जरूर लागेल, म्हणून आबिपोनीस लोक थडग्याजवळच्या झाडावर वस्त्रें टांगून ठेवितात, असें कीं मृतास थडग्याबाहेर यावेंसें वाटल्यास त्यास तें लेतां यावें. डाहोमन लोकहि मृतांना मृतांच्या भूमीस गेल्यावर वस्त्रांतर करतां यावें एतदर्थ इतर मालमत्तेवरोवर एक वस्त्रहि पुरीत असतात. पाटागोनियन लोक दरवर्षीं प्रेताच्या सांगाड्यावर नवीं नवीं वस्त्रें घालतात. सामोयेद लोक, डामारा लोक, व न्यूझीलंदर लोक, मृताची मालमत्ता पुरीत असतात असें सामान्यतः सांगितलेलें सांपडतें. नाग लोक जिवंतपणीं मृताची जी आवडती वस्तु असेल ती त्याच्याबरोबर पुरीत असतात; पापुअन लोक त्यांचीं शस्त्रें व लेणीं पुरीत असतात. मिश्मी लोकांत थडग्यावर घर बांधून त्यांत जिवंतपणीं लागणाऱ्या सर्व वस्तू ठेवीत असतात. कांहीं लोकांत ही चाल इतकी फाजील झालेली आहे कीं, तेणेंकरून त्याच्या कुटुंबाची मोठी धांदल उडून जाते. फान्टी लोकांत प्रेतकार्य गरीब कुटुंबास अगदीं भिकेस लाविते, डायाक लोकांत मृताबरोबर त्याचा रोकड पैसाहि पुरितात. अमेरिकेंत, कांहीं नष्ट जातींत, मृतांची जमीन त्याच्याबरोबर पुरतां येत नाहीं म्हणून तेवढी कायती मृताच्या मुलांबायकांस मागें रहात असे.

परजन्माची ही कल्पना कांहीं ठिकाणीं इतकी पुढें गेलेली आहे कीं ते मृताच्या जड मालमत्तेबरोबर त्याची सजीव मालमत्ताहि त्यास अर्पण करीत असतात; उदाहरणार्थ, मरणसमयीं त्याच्या गुराढोरांची ते कत्तल उडवितात. किरगीझ लोकांच्या नायकाबरोबर त्याचे आवडते घोडे पुरितात. याकूत, कोमांची, पाटागोनियन, यांच्यांतही अशीच चाल आहे. बोर्गू लोकांत मृताचा घोडा व कुत्रा हे त्याजबरोबर पुरितात. होडा लोकांत पूर्वी मृताचीं सर्वच गुरें ढोरें पुरीत. व्हेटिअन लोकांत मनुष्य मरावयास टेंकला म्हणजे त्याचीं डुकरें त्याच्या मणगटास बांधून मारितात. पेरूमधील इंडियन लोकांत सर्व प्रकारचीं धान्यें मृताबरोबर पुरीत असत, असें कीं त्यास पुढें पेरण्यास पंचाईत पडूं नये.

१०४. ह्याच समजुतीची आणखी वाढ झाली म्हणजे तिच्यांत आणखीही कांहीं सहजच येतें. मृतास परलोकीं जर वस्त्रें, धान्य, गुरें ढोरें वगैरे सर्व पाहिजे तर अर्थात् माणसांचीही संगत सोबत हवीच. जिवंतपणीं त्याची चाकरी नोकरी करणारीं माणसें मेल्यावर त्याचे बरोबर पाहिजेतच.

म्हणून बायका, गुलाम, मित्र वगैरेस बळी देण्याची चाल समाजाची पहिली पहिली वाढ चालू असतां सुरू होते. फ्यूजियन, आंडामानीस, आस्त्रेलियन व टास्मेनियन या जातींत ही चाल आढळत नाहीं. पण न्यूकालिडोनियन, फिजियन, चिनूककारिब, डाकोटा, कांगोमधील लोक, नीग्रो लोक व डाहोमन लोक वगैरे अमळ पुढें गेलेल्या रानट्यांत ती आढळून येते. पैकीं डाकोटा, कारिब व

चिनूक लोक लढाईंत केलेल्या कैद्यांस मृतापुढें बळी देत असतात. क्रियानव मिलना लोक मृताचे गुलामांस मारितात; झुलु लोक राजाच्या नोकरांस मारितात, आणि फीजी बेटांत मृत सरदाराच्या मुख्य स्त्रियांस मारितात.

पण प्राचीन अमेरिकेंतील बऱ्याच सुधारलेल्या लोकांमध्यें ही चाल ह्याच्याही पलीकडे गेलेली दृष्टीस पडत असे. मेक्सिकोमध्यें प्रत्येक बड्या माणसाच्या उपाध्यास त्याच्याबरोबर ठार करीत, असें कीं त्यास तेथें धर्मकृत्यें करण्यास अडचण पडूं नये. व्हेरापाझमधील इंदियन लोकांस मृत नायकाचें घर बांधण्यासाठीं अवश्य तेवढे गुलाम मारीत असत. पेरू देशांत इंका (मुख्य राजा) मेला म्हणजे त्याजबरोबर त्याचे नोकर व लाडक्या रांडा यांचा संहार करीत, व ही संख्या कधीं कधीं हजारांवर जात असे.

असल्या रूढींवर असल्या लोकांचा विश्वास इतका पूर्ण असे कीं हे मारूं घातलेले लोक बहुधा मरण्यास तयार असत, इतकेंच नव्हे तर उत्सुकही असत. प्राचीन काळीं गुराणी लोकांत विश्वासू नोकर मृत नायकाच्या थडग्यासमोर स्वतास मारून घेत. मृत इंकाच्या इतक्या बायका मरावयास तयार असत कीं सरकारी हपीसरांस ' सध्यां पुरे ' म्हणून त्यांपैकीं कांहींस आवरावें लागे; कांहीं बायका तर इतक्या उत्सुक झालेल्या असत कीं थडगें तयार होईपर्यंत देखील त्यांस वेळ निघत नसे, म्हणून त्या आपल्या वेण्यांनींच आपल्यास टांगून घेत. चिबूचा लोकांबद्दल असेंच सांगतात. पूर्वी कांगोमध्यें राजास पुरण्याचे वेळीं एक डझन पोरी थडग्यांत उड्या

टाकींत व त्यांस जिवंतच पुरीत; त्या उड्या घेण्यास इतक्या उत्सुक असत कीं एकमेकीपुढें जाण्याच्या हमरी तुमरींत एकमेकींचा जीव देखील घेत. डाहोमीमध्यें असेंच करीत, आणि शिवाय मरणापूर्वी राजाच्या बायका त्याच्या सर्व सामानसुमानाचा चुराडा करून टाकीत.

कधीं कधीं हे बळी मुलासाठीं देखील देतात. केन म्हणतो, एक चिनूक सरदार आपल्या मृत पुत्राच्या तैनातीसाठीं आपल्या बायकोस मारावयास तयार झाला; आनिटीयममध्यें लाडक्या मुलाच्या मृत्युसमयीं त्याची आई, काकी, आजी, कोणी तरी ठार करितात.

अशा ह्या क्रूर चालींच्या संबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, कधीं कधीं हे मुख्य लोक देखील स्वतः मरण्यास तयार होतात. वृद्ध पितरांस आज्ञाधारक मुलें फीजीमध्येंच जिवंत पुरितात असें नाहीं; व्हेटमध्येंहि हीच चाल आहे; तेथें वृद्ध नायक आपल्या मुलांस अशा रीतीनें आपला संहार करण्यास विनंति करितो.

१०५. परजन्मामध्यें समाजांतील उच्चनीच भाव एथल्याप्रमाणेंच असतात असें समजतात. उदाहरणार्थ, कुक असें सांगतो कीं, ताहितियन लोक एथल्यासारखेच तेथें लोकांचे वर्ग असतील म्हणून मानितात. फीजियन व टांगन लोकांचीही समजूत अशीच आहे. चिब्चा लोकांस वाटे कीं आपले नोकर तेथेही आपली नोकरी एथल्याप्रमाणेंच करावयास येतील. कुकी लोकांची समजूत अशी आहे कीं आपण मारलेल्या माणसाचें भूत परजन्मीं आपलें गुलाम बनतें. डाहोमन लोक, काफर लोक

व नीग्रो लोक ह्यांच्यांत अशीच समजूत आहे. ग्रीक, हीब्रयु व क्रिश्चन, वगैरे उच्चतर जातींतही तीच समजूत असे, हें त्यांच्या त्यांच्या प्राचीन इतिहासावरून स्पष्ट दिसतें.

१०६. प्रथम प्रथम, परलोक व हा लोक ह्यांजमध्यें वरचेवर व निकट व्यवहार चालत असतो, असें समजतात. डाहोमीमध्यें मृत राजास नोकरांचा वरचेवर पुरवठा करण्यासाठीं वरचेवर बळी देत असतात. शिवाय एथील राजानें अल्पहि नवें कृत्य केलें म्हणजे तें बापाच्या भुतास निवेदित करण्यासाठीं तो नवा जासूद पाठवीत असतो. कित्येक ठिकाणीं व्यापाराच्या कामासंबंधानेंहि ही समजूत उत्पन्न झालेली दिसते. कारण पुढच्या जन्मीं जबर व्याजासहित पैसे मिळावे म्हणून ह्या जन्मीं कांहीं रानटी लोक कर्जे देतात.

वरिष्ठ जातींतहि ही समजूत असे असें 'इलियड' काव्यावरून दृष्टोत्पत्तीस येतें. कारण देवदूत कधीं कधीं ग्रीक लोकांच्या आणि कधीं कधीं ट्रोजन लोकांच्या वतीनें लढत, असे उल्लेख त्यांत सांपडतात. ज्यू लोकांस असें वाटे कीं पृथ्वीवर निरनिराळ्या लोकांच्या लढाया सुरू झाल्या म्हणजे स्वर्गांतहि त्यांचे त्यांचे देवदूत एकमेकांशीं लढूं लागतात. ख्रिस्ती लोकांतहि ही समजूत आहेच. जिवंत लोक मृतासाठीं प्रार्थना करीत असतात, आणि देवापाशीं जिवंतासाठीं मृत साधूसंतांनीं रदबदली करावी एतदर्थ त्यांची प्रार्थना केली जाते.

१०७. द्वितीय जीवित इतर बाबतींत प्रथम जीविताप्रमाणें असतें अशी समजूत प्रथम प्रथम असल्यामुळें, वर्तन, विचार, आणि नीति ह्या बाबतींतहि तें ह्याच्या

सारखेंच असेल असें प्रथम प्रथम समजत असतात. देव आपसांत लढत असतात असें तिबेटन लोक समजतात. फीजियन लोकांचे देव गर्विष्ठ व सूड घेणारे असून ते एकमेकांशीं लढतात व एकमेकांस ठार करितात; व्यभिचार करणारा, बायका चोरून नेणारा, खून करणारा, ही त्यांच्यामध्यें मोठ्या मानाचीं नांवें समजतात. फीजीयन सरदारांचें भूत परलोकीं गेलें म्हणजे मीं पुष्कळ शहरें जाळिलीं आहेत, व पुष्कळांस ठार केलें आहे, अशी शेखी तें मिरवूं लागतें म्हणून समजतात.

ग्रीक लोकांत अशाच कल्पना होत्या हें इलियडवरून स्पष्ट दिसतें. फरक एवढाच कीं, त्यांच्या देवांमध्यें रानट्यांच्या देवांइतका रानटीपणा किंवा क्रूरपणा दिसत नाहीं. बाकी आमाझुलू लोकांत वाडवडिलांच्या भुतांस संतुष्ट ठेवण्यांत चुकणें म्हणजे त्याचा राग आपल्यावर ओढून घेणें म्हणून जसें समजतात; तद्वतच ग्रीक लोकांत आलिंपस एथील देवांस तृप्त ठेवण्याच्या कामीं हयगय करणें म्हणजे त्यांचा अक्षम्य अपराध करणें असें समजत.

हीब्रू लोकांतहि ही समजूत कमजास्त अंशानें दृष्टीस पडतेच. मात्र न्याय व दया ह्या दोन गोष्टी त्यांच्याप्रमाणें त्यांच्या देवांमध्येंहि जास्त प्रमाणावर दृष्टीस पडतात.

१०८. असो. आतां परजन्मविषयक सुधारलेल्या लोकांच्या कल्पना रानट्यांच्या कल्पनांपासून मुख्यत्वेंकरून कोणत्या कोणत्या संबंधानें भिन्न असतात हें पाहूं.

दृश्यम पूर्णपणें जडदेहयुक्त समजला गेल्यामुळें परजीवितहि त्यास अगदीं योग्य असें समजलें जातें हें इ-

तका बेळ आपल्या दृष्टीस पडलेंच. मृत माणूस कसा तरी अदृश्य राहून पूर्वीप्रमाणेंच खातो, पितो, पारध करितो आणि लढतो. त्याचें जीवित एथल्याप्रमाणेंच अगदीं स्थूल कसें समजलें जातें हें काफर लोकांच्या वर्तनावरून चांगलें लक्षांत येतें; कारण मृताच्या भुतास आपल्यास कधीं काळीं इजा करतां येऊं नये म्हणून ते त्याचीं शस्त्रें वांकवून किंवा मोडून ठेवितात. तद्वतच आस्त्रेलियन लोक मारलेल्या शत्रूस आपल्यावर पुनः भाला उगारतां येऊं नये म्हणून त्याचा आंगठा कापून टाकितात. पुढें प्रेतास जाळून किंवा अन्य रीतीनें त्याची कायमची विल्हेवाट करण्याची चाल सुरू झाली म्हणजे मग दुय्यमाविषयक कल्पनेंत अमळ फरक उत्पन्न होऊन परजन्माच्या कल्पनेंतहि तसाच फरक उत्पन्न होतो; आणि तदनुसार मृताच्या उपयोगीं पडतील अशा वस्तू जाळण्याची, किंवा फोडण्याची, किंवा फाडण्याची पद्धति सुरू होते. मृताचें अन्न व मालमत्ता त्याच्याबराबर कांहीं रानटी लोक जाळितात ह्याचें इंगित हेंच आहे. म्हणजे अर्थात् ते लोक असें समजतात कीं ह्या जिन्नसांचीं भुतें मृतांबरोबर परलोकीं जातात. अशा रीतीनें परजन्मींच्या स्थूलदेह-कल्पनेमध्यें इतर कल्पनांत कांहीं फरक उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, मृतास वाहिलेले पदार्थ प्रत्यक्षच न सेवितां त्यांचे अर्क तो सेवितो अशी कल्पना कांहीं ठिकाणीं उत्पन्न होते. मृताच्या वस्तूचे नमुने करून ते जाळण्याची जी चाल कोठें कोठें आहे तिच्यावरून ही गोष्ट जास्तच व्यक्त होते. उदाहरणार्थ, टॉम्सन साहेब चीन देशांतील एका मृत सुभेदाराच्या

दोन विधवांबद्दल असें वर्णन करितो कीं, घरें, खुर्च्या, चोटी, दासदासी, इत्यादिकांच्या मोठाल्या कागदी आकृती करून त्या त्यांनीं जाळून टाकिल्या. सारांश ज्या जीवितामध्यें वस्तूंच्या जाळलेल्या आकृती उपयोगीं पडतात तें जीवित त्या लोकांच्या कल्पनेप्रमाणें पाहतां वरेंच अमूर्त असलें पाहिजे.

ह्या द्वितीय जीवितांतील उद्योग व त्यांचीं फलें हीं प्रथम जीं अगदीं पाहिल्यासारखींच समजत असतात तीं हळूहळू त्याच्यापासून भिन्न म्हणून समजूं लागतात. लुटारूपणावर उदरनिर्वाह करणारे लोक दुसऱ्या जीवितामध्यें लुटारूपणा करावा लागेल, व शेती करणारे लोक शेती करावी लागेल म्हणून जसें समजतात, तसेंच पैशाचा उपयोग माहीत आहे इतके सुधारलेले लोक मृतावरोबर पैसे पुरून परलोकीं क्रयविक्रय चालतो ह्याच समजुतीचें निदर्शन करितात. पण हें साम्य हळूहळू बदलत जाऊन त्यास वैषम्याचें स्वरूप येत जातें. त्याचें विशेष वर्णन न करतां सामान्यतः इतकेंच सांगतों कीं सध्यांच्या ख्रिस्ती कल्पनेप्रमाणें ते लोक परलोकीं लग्नें वगैरे इहलोकींचे उद्योग चालत नसून सर्व दिवस रविवारच समजून व्यवहार चालत असतो, असें समजतात. सारांश परजीवित इहजीविताप्रमाणेंच सर्वांशींच समजावयाचें बंद होऊन हळू हळू तें कांहीं अंशींच तेवढें तद्वत् समजूं लागतात.

शिवाय, तेथील समाजव्यवस्थेची कल्पनाहि एथील कल्पनेहून हळू हळू भिन्न होऊं लागते. प्रथम प्रथम, सरकार, जातिभेद, गुलामव्यवस्था, इत्यादि गोष्टी इकडच्या

उचलून जशाच्या तशाच तिकडच्या कल्पनासाम्राज्यांत स्थापन करीत असतात. पंण सुधारलेल्या लोकांच्या कल्पनांत द्वितीय जीवित प्रथम जीवितापासून बरेंच भिन्न होऊं लागतें. मुख्य वरिष्ठ देवदूत, कनिष्ठ देवदूत, इत्यादिकांमध्यें एथील उच्चनीच भाव जरी दिसूं लागतो, तरी त्याचें मूळ कारण भिन्न समजतात.

परजन्मांतील नीतिविषयक कल्पना आणि तदनुरूप मनोभाव ह्यांच्यामध्येंहि असाच फरक होऊं लागतो. सूड उगविणें व त्यांत जय मिळविणें ह्यांमध्यें जें परलोकींचे देव प्रथम मोठें भूषण मानीत असतात, तें हळूहळू नाहींसें होतें. सारांश शत्रुत्वाचा धर्म नाहींसा होऊन मित्रत्वाचा धर्म उत्पन्न होऊं लागतो. स्तुतिप्रियता जशी एथे सर्वत्र दृष्टीस पडते तशी ती तेथेहि आहे, असें मात्र समजूं लागतात; आणि स्तुति करणें व करून घेणें हीं तेथींलें सुखाचीं मुख्य साधनें होत अशींहि समजूत उत्पन्न होते.

शेवटची गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, हीं दोन जीवितें जास्त जास्त पृथक् होत जातात. प्रथम प्रथम, इकडचे लोक आणि तिकडचे लोक ह्यांच्यामध्यें सारखा व्यवहार चालू असतो म्हणून समजत असतात. प्रथम प्रथम रानटी माणूस मृतांचें संतर्पण रोज करीत असतो; कारण मृत लोक जिवंतांच्या व्यवहारांत रोज मदत करीत असतात किंवा विघ्नें आणीत असतात, असें ते समजत असतात. पण ही निकट-व्यवहार-कल्पना सुधारणा होईल तसतशी कमी होत जाते. मृतांच्या आत्म्यांसाठीं धर्माधिकाऱ्यांस पैसे देण्याच्या रूपानें, आणि

प्रसन्नतेसाठीं साधूची व देवांची प्रार्थना करण्याच्या रूपानें ही विनिमय कल्पना जरी अद्यापि सामान्य लोकांत दृष्टीस पडते, तरी अत्यन्त सुधारलेल्यांत ती नष्ट झालेली आहे.

एवंच तर मग, मरणाची कल्पना जशी हळूहळू वेशुद्धीच्या कल्पनेपासून भिन्न होऊं लागते, आणि अपेक्षित पुनरुत्थापन दूर दूर काळावर जसें जाऊं लागतें, तसतसा प्रथम जीवित व द्वितीय जीवित ह्यांच्यांतील भेद हळूहळू ठळक होत जातो. पहिला भेद द्वितीय जीवित कमी मूर्त होऊन उत्पन्न होतो; नंतर मग उद्योगधंदे निराळे होऊन होतो, नंतर तेथील समाजव्यवस्था इकडच्याहून निराळी समजली जाऊं लागते; नंतर तेथील सुख इंद्रियसुखाहून भिन्न असतें अशी कल्पना उत्पन्न होऊं लागते, आणि शेवटीं तेथील वर्तनकल्पनाहि उच्चतर होते. आणि अशा रीतीनें दोहोंमध्यें स्वरूपभेद वाढत असतां दुसरें जीवित पहिल्यापासून जास्त जास्त पृथक् होत जातें. दोन्ही लोकांमधील परस्पर दळणवळण कमी होऊं लागतें, आणि एका जीविताचा शेवट व दुसऱ्याचा प्रारंभ ह्यांच्यामध्येंहि जास्त जास्त काळाचें अंतर पडूं लागतें.

प्रकरण पंधरावें

परलोकविषयक कल्पना

१०९. गत प्रकरणांत परजीविताच्या संबंधाच्या कल्पनांचें वर्णन करीत असतां परलोकाचा समावेश ज्यांच्यांत होतो असें कांहीं उतारे आलेच आहेत. वास्तविक रीत्या ह्या दोन कल्पना इतक्या निकट रीतीनें परस्परसंबद्ध आहेत कीं एकीचा कधींहि उल्लेख न करतां दुसरीचें कथन व्हावयाचेंच नाहीं. तथापि परलोकाच्या स्थानाच्या संबंधाचा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे. व तद्विषयक कल्पनेंत फेरबदल कसा होत जातो हें पाहणें मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

ह्या चवकशींत आपल्या असें नजरेस येईल कीं मृताच्या राहणीचें स्थान हळू हळू जिवंताच्या वसातिस्थानापासून भिन्न होत जातें.

११०. प्रारंभीं हीं दोन स्थानें एकच असतात; रानट्यास वाटतें कीं आपले मृत आप्त आपल्या नजीकच आहेत. त्यांच्या थडग्यापाशीं पुनःपुनः अन्न नेऊन ठेवणें, आणि इतर रीतींनीं त्यांचें संतर्पण करणें, ह्या गोष्टींवरून त्याच्या मनांतील भाव असा दिसतो कीं ते फारसे दूर नाहींत, किंवा लवकरच जवळ येतील.

सांडविच बेटांतील लोक असें समजतात कीं मृताचा आत्मा त्याच्या पूर्वीच्या स्थानानजीक भटकत असतो, आणि मादागास्कारमध्यें असें समजतात कीं पूर्वजांचीं

भुतें थडग्यांत वरचेवर येऊन जात असतात. ग्वांया-नामधील इंदियनांस वाटतें कीं जेथें कोणीहि मेलें असेल तेथें भुतांची फेरी असते. सर्व आफ्रिकाभर अशीच समजूत आहे. झांबीझीच्या उत्तरेकडे तर अशी समजूत आहे कीं मृतांचे आत्मे जिवंतांत येऊन मिसळत असतात, व त्यांच्या खाण्यापिण्यालाहि भागीदार होतात.

कांहीं लोक कोठें कोणी मेलें म्हणजे तें घर किंवा तो गांवहि सोडून देतात, व प्रेत तेथेंच ठेवितात; अशासाठीं कीं मृताच्या आत्म्यानें तेथेंच रहावें. उदाहरणार्थ, कामसचाडेल, लेप्चा वगैरे लोकांत अशी चाल आहे. वालोंडा लोकांत लाडकी बायको जेथें मेली असेल तें घर नवरा सोडून देतो, आणि तेथें परत आलाच तर तिच्यासाठीं प्रार्थना करण्याकरितां किंवा तिला बलिदान करण्यासाठींच येतो. हाटेंटाट, बूची, बेचुआना, वगैरे लोक जेथें कोणी मरेल तो गांवच्या गांवच सोडून देतात.

सारांश, हे सर्व लोक पहिलें जीवित गेलें असेल तेथेंच दुसरेंहि जातें असें मानितात हें त्यांच्या इतर सर्व समजांस अनुसरूनच आहे.

१११. इतरत्र ह्या समजांत अल्पस्वल्प फेरबदल झालेले दृष्टीस पडतात. म्हणजे, मृतांच्या आत्म्यांच्या भटकण्याचा प्रदेश पूर्वापेक्षां जास्त विस्तृत झालेला असतो. मग ते जरी आपल्या पूर्वीच्या वसतिस्थानांस कधीं कधीं भेटी देण्यास येतात, तरी एकंदर ते तेथून जराशा अंतरावरच राहतात.

न्यूकालिडोनियांमध्यें असें समजतात कीं मृतांचे आत्मे झाडींत जाऊन राहतात. किनाऱ्यावरील नीग्रोंस असें

वाटतें कीं झाडींत कांहीं रानटी लोक राहतात व ते आपल्या आत्म्यांस गुलाम करण्यासाठीं बोलावीत असतात; आणि बुलाव लोक असें समजतात कीं हलके आत्मे गांवानजीकच्या झाडींत राहतात, व वरिष्ठ आत्मे त्याच्या अमळ पुढें जातात.

इतरत्र मूठमाती देण्याच्या पद्धतीवरून अशी समजूत उत्पन्न होते कीं मृतांचें वसतिस्थान शेजारच्या डोंगरावर आहे. कारिब लोक आपल्या नायकांस डोंगरावर पुरीत असत; कोमांची लोक त्यांस शेजारच्या अत्यन्त उंच डोंगरावर पुरीत. पाटागोनियन लोक तसेंच करीत, आणि पश्चिम आरब स्थानांत तशीच चाल आहे. ह्या चालीवरून, भुतें डोंगरांवरून असतात अशी समजूत उत्पन्न झालेली आहे.

जेथें गुहांतून प्रेतें पुरण्याची चाल आहे तेथें तींच त्यांचीं वसतिस्थानें समजलीं जातात; आणि अशा रीतीनें पाताळाची कल्पना उत्पन्न होते. उदाहरणार्थ, पाटागोनियन लोक असें मानतात कीं ज्या देवांच्या गुहांतून आपण उत्पन्न झालों, व जेथें ते आपले देव राहतात तेथें आपल्यापैकीं कांहींजण मरणोत्तर जावयाचे आहेत.

११२. पण हा समज कसा उत्पन्न होतो हें पूर्णपणें समजण्यास मृतांच्या दूरवरच्या स्थानांसंबंधानें समज कसा उत्पन्न होतो हें जाणण्याची प्रथम खटपट केली पाहिजे. शेजारच्या परलोकाची कल्पना दूरवरच्या परलोककल्पनेंत रूपान्तर पावून कशी जाते? ह्याचें उत्तर सरळ आहे. तें हें कीं स्थानान्तर. कसें तें पहा.

ज्यांनीं नुकतेंच देशान्तर केलें आहे त्यांना जीं स्वप्नें

पडतात त्यांजवरून दीर्घ प्रवासानें प्राप्त होणारीं जीं मृतांचीं परलोकस्थानें त्यांची कल्पना प्रथम उत्पन्न होते. मागें राहिलेल्या नातेवाईकांवर त्यांचें प्रेम असल्यामुळें आणि घराचें त्यालाँ वेड फार असल्यामुळें, लढाई किंवा दुष्काळ ह्यांमुळें स्थानान्तरीं गेलेल्या रानटी माणसास पूर्वस्थानांचीं व आप्तांचीं वरचेवर स्वप्नें पडतात. तीं स्वप्नें म्हणजे प्रत्यक्ष अनुभव होत अशी प्रारंभीं समजूत असल्यामुळें त्यांवरून ज्याला तीं पडतात त्याचा व तीं तो सांगत असतां ऐकणारांचा असा समज होतो कीं झोंपेंत तो खरोखरच पूर्वस्थानीं गेला होता. ह्यामुळें मरणोत्तरहि द्वितीय आत्मा शरीर सोडून पुष्कळ वेळ दूर गेलेला पाहून रानटी माणूस असा तर्क बांधतो कीं तो तेथेंच, म्हणजे पूर्वीच्या घरीं, गेला असेल. तेथें मला जाण्याची फार इच्छा आहे, केव्हां तरीं मी तेथें जाईन, असें जें तो म्हणत असे त्याप्रमाणें त्यानें केलें असावें असा तो सहजच अंदाज करितो.

हाच समज सर्वत्र दृष्टीस पडतो. पेरुव्हियन लोकांत त्यांचा इंका किंवा मुख्य मेला म्हणजे त्याचा बाप जो सूर्य त्याच्या वाड्यांत तो गेला म्हणून समजत. गण्डन लोकांस असें वाटतें कीं आपण मेलों म्हणजे आपल्या पूर्वजांच्या मूळ ठिकाणीं आपण जाऊं. सांथाळ लोकांत अशी चाल आहे कीं त्यांच्यांत कोणी मेला म्हणजे त्याच्या शरीराचा कांहीं अंश ते शेजारच्या नदींत नेऊन टाकितात, असें कीं ज्या दूरच्या पूर्व भागांतून त्याचे पूर्वज पूर्वीं आले तेथें तो जावा. नदींत प्रेतें टाकण्याची चाल ह्यावरूनच पडलेली असावी. टचूटानिक लोकांत

मरणें म्हणजे आकाशांतील बापाच्या घरीं जाणें म्हणून समजत.

रानटी स्थानान्तर पुष्कळ दिशांनीं करीत असतात, आणि म्हणून परलोक कोणत्या दिशेला आहे ह्याबद्दल-हि निरनिराळ्या समजुती उत्पन्न झालेल्या आढळतात. दक्षिण अमेरिकेंतील चोना लोक समुद्रापलीकडील पाश्चिमदेशांतून आपण आलों असें समजत असल्यामुळें मरणोत्तर तिकडे आपण जाऊं म्हणून समजत. पेरुव्हियन लोक मृतास पूर्वेकडे जावयाचें म्हणून त्याचें तोंड तिकडे करून ठेवीत. उत्तर अमेरिकेंतील चिनू लोक आपला स्वर्ग दक्षिणेस आहे म्हणून समजतात. आशिया खंडांतील कालमक लोक तो पश्चिमेस आहे असें समजतात, व टोडा लोक उत्तरेस आहे म्हणून समजतात. मापुची लोक मृताचें तोंड पश्चिमेकडे करितात, आणि डमारा व बेचुआना लोक उत्तरेकडे करितात.

परलोकस्थानविषयक ह्या निरनिराळ्या कल्पनांस अनुसरून मृतास मरणोत्तर कराव्या लागणाऱ्या प्रवासाबद्दलहि निरनिराळ्या कल्पना उत्पन्न होतात; व त्याबद्दल तयाऱ्याहि निरनिराळ्या बनूं लागतात. उदाहरणार्थ, पाताळप्रवास, समुद्रावरून प्रवास, जमिनीवरून प्रवास, आणि नदींतून प्रवास, ह्यांबद्दल तयारी होऊं लागते.

अमेरिकेंतील निम्मे तरी ज़ाती माणसाची उत्पत्ति प्रथम जमिनीच्या तळीं, किंवा डोंगरांतील खडकाळ गुहांतून, झाली असें समजतात. ज्यांचे पूर्वज गुहांतून रहात असतील त्यांजमध्यें असली कल्पना उत्पन्न होणें अगदीं साहाजिक आहे. जन्म देणें व निर्माण करणें ह्यां-

तील भेदद्दर्शक शब्दांचा त्यांच्यांत अभाव असल्यामुळें आपण गुहेंत निर्माण झालों, किंवा आपण गुहेंतून बाहेर आलों, असें ते एकच शब्दांनीं म्हणतात. अशा रीतीनें रसातळांतून मनुष्योत्पत्तीची कल्पना सुरू झाली म्हणजे पाताळलोकाची कल्पना तिजपासून उत्पन्न होते, व त्याठिकाणीं मृत लोक आपल्या पूर्वजांस परत जाऊन मिळतात अशीहि कल्पना उत्पन्न होते.

आतां पाताळास जावयाचें म्हणजे योग्य तयारी पाहिजेच. म्हणून फिजियन लोकांत मृताच्या हातांत संरक्षणासाठीं दण्ड किंवा काठी देतात. न्यूकालिडोनियन लोक त्याच्या हातांत भाला देतात, आणि स्कान्डिनेव्हियन लोक हातांत यमदण्ड देतात. मृतास उंट किंवा घोडा बळी देण्याचा हेतु हाच आहे. एस्किमो लोकांत मेलेल्या मुलाच्या थडग्यावर कुत्र्याचें डोकें तोडून ठेवितात, आणि त्याच्यापाशीं तरीकरितां मासें, व भुतांकरितां भक्ष्य देऊन ठेवितात.

देशान्तर करावयाचें असलें म्हणजे बहुधा लहान मोठ्या नद्या वलांडण्याचा प्रसंग येतोच, म्हणून मरणोत्तर मृतास नदी वलांडावी लागते अशी कल्पना पुष्कळ लोकांत उत्पन्न झालेली आढळते. बरें, नदी वलांडणें हें काम रानटी लोकांस अमळ कठीणच जातें. म्हणून बेशुद्ध झालेला माणूस शुद्धीवर आला म्हणजे त्याच्या दुःखमास नदी वलांडतां न आल्यामुळें तो परत आला असें त्यांच्यांत समजतात. ह्यावरून पुढें अशी समजूत उत्पन्न होते कीं भुतांस नदी वलांडून जातां येत नाहीं.

कांहीं ठिकाणीं ह्यावरून मृताच्या वस्तू एका होडींत

घालून ती नदींत सोडून देण्याची चाल उत्पन्न होते; व नंतर थडग्यालाच होडी बांधून ठेवण्याची चाल सुरू होते. उदाहरणार्थ बोर्निओंत असें करितात. चिनूक लोक प्रेतच होडींत घालून नदीजवळ नेऊन ठेवितात.

नदींतून प्रवास म्हटला म्हणजे त्याच्यापुढें समुद्रांतील प्रवास आलाच; आणि जेथें समुद्र वलांडून देशान्तर झालेलें असेल तेथें मृतास समुद्रापलीकडे जावें लागतें ही कल्पना सहजच उत्पन्न होते. टोंगन लोकांचा स्वर्ग एका दूरच्या बेटावर आहे. फिजियन लोकांचा स्वर्ग जो बूलू तो कोठें आहे हें जरी बरोबर समजत नाहीं तरी त्यास जाण्यास बोट लागते, ह्यावरून तो समुद्रापलीकडे असावा. सामोअन लोकांच्या पाताळाचें द्वार सवाईच्या पश्चिम टोंकाजवळ आहे; म्हणून मृताच्या आत्म्यास तेथें पोहून जावें लागतें; त्यांच्या भाषेंत 'मेला' यास 'शीड लावून गेला' असा शब्द आहे.

११३. आतां रानटी लोकांत मृतांच्या एकापेक्षां अधिक स्थानांबद्दल, म्हणजे, एकापेक्षां अधिक परलोकांबद्दल, कल्पना कशी उत्पन्न होते तें पाहूं. जेथें एका देशचे लोक दुसऱ्या देशीं जाऊन तेथल्या लोकांस जिंकितात तेथें अर्थात् जित व जेते ह्यांचे निरनिराळे परलोक असतातच. पुढें कांहीं काळानें सगळ्याच लोकांचे मिळून हे दोन परलोक होत अशी कल्पना उत्पन्न होते, व हळू हळू जेत्यांचा तो स्वर्गलोक, व जितांचा तो पाताळ किंवा नरकलोक अशी कल्पना उत्पन्न होते. अशा रीतीनें सुखाचा परलोक व दुःखाचा परलोक अशा दोन परलोकांची कल्पना बनून जाते.

११४. आतां परलोक हा ह्या लोकाच्या वर किंवा बाहेर असतो ही कल्पना कशी उत्पन्न होते हें पाहूं. मूळ रहाणसाची आकाशाची कल्पना काय असते हें पाहतां डोंगरावरून स्वर्गाची कल्पना कशी उत्पन्न होते हें सहज ध्यानांत येईल

डोंगरांवर प्रेतें पुरण्याची चाल पुष्कळ लोकांत आहे; आणि ज्या ठिकाणीं मुख्य नायकाचें प्रेत चढून जाण्यास कठीण अशा पर्वतावरील अत्यन्त उच्च ठिकाणीं पुरतात तेथें असा समज असतो कीं, मृतांचे आत्मे ह्या शिखरांवरून रहात असतात. आता आकाशात गेलेल्या उच्च शिखरावर राहणें, व आकाशांत राहणें ह्या दोन गोष्टींचा रानट्यांच्या भापणांत गोंधळ होण्याचा सहज संभव आहे. शिवाय आकाश म्हणजे एक मोठा घुमट असून तो ह्या उच्चत्तम शिखरांनीं तोलून धरिलेला आहे अशीहि रानटी लोकांत समजूत असल्यामुळें ह्या शिखरांवर गेला तो स्वर्गांत गेलाच असेंहि त्यांस वाटणें साहजिक आहे.

शिवाय संरक्षणासाठीं डोंगरावरून किल्ले वगैरे बांधणें ही चाल फार जुन्या काळापासून चालू आहे. आतां एकादा परदेशस्थ माणूस हे किल्ले घेऊन सभोंवतालच्या सखल प्रदेशावर जर राज्य करूं लागला, तर कांहीं काळानें त्यास त्या जित लोकांत देवाचें स्वरूप येण्याचा संभव आहे, आणि अशा रीतीनें डोंगरावर व आकाशांत देव राहतात, व स्वर्ग म्हणजे देवांचें वसतिस्थान अशी कल्पना सहज उत्पन्न होणार आहे.

११५. ह्या सर्व विवेचनावरून सामान्य निर्णय असा निघतो कीं परलोकविषयक कल्पना क्रमाक्रमानें जास्त उ-

दात्त होत जातात. मृताचें वसतिस्थान प्रथम जें जिवंताच्या स्थानाशीं समस्वरूप असतें तें हळूहळू निराळें होऊन जातें, मग कोठें त्यास शेजारच्या रानाचें स्वरूप येतें, कोठें दूरच्या रानाचें येतें, आणि कोठें दूरवरच्या डोंगराचें किंवा पर्वताचें येतें. मृत आपल्या पूर्वजांस परत जाऊन मिळतात ह्या समजामुळें आणखी भेद उत्पन्न होतात, व ते दंतकथेप्रमाणें निरनिराळे असतात. गुहांमध्यें राहणारांचे स्थाईक वंशज असें समजतात कीं ज्या पाताळांतून आपण वर आलों तेथें मृतांचे आत्मे जातात; आणि स्थानान्तर केलेले लोक असें समजतात कीं, ते पूर्वीच्या घरीं जातात, व तेथें जाण्यास त्यांस जमीन, नदी, किंवा समुद्र वलांडावा लागतो. जित व जेते ह्यांचे वनलेले जे समाज त्यांच्यामध्यें स्वोत्पत्तिविषयक निरनिराळ्या दंतकथा असल्यामुळें त्यांचे निरनिराळे परलोक असतात; आणि त्या दोन जातींच्या निरनिराळ्या स्थितीस अनुसरून त्या परलोकांस उच्च व नीच अशीं स्वरूपें येतात. ह्या संमिश्र लोकांवर त्यांच्यापेक्षां जास्त बलवान् लोकांनीं येऊन राज्य स्थापिल्यास, आणखी घोंटाळे उत्पन्न होतात, आणखी परलोक उत्पन्न होतात, व ते परस्परांपासून कमजास्त भिन्न असतात. जेथें मृतांचीं किंवा श्रेष्ठांचीं वसतिस्थानें पर्वतशिखरें हीं असतात, तेथें परलोक आकाशांत निघून जातो; व तो प्रथम जवळ व स्पष्ट असून पुढें दूर व अस्पष्ट असा बनतो. सारांश, मृताचें कल्पित वसतिस्थान प्रथम जिवंताच्या वसतिस्थानाशीं समस्वरूप असून, पुढें हळूहळू दूर जाऊं लागतें. अंतर व दिशा दोन्ही जास्त जास्त

संदिग्ध होऊं लागतात, आणि शेवटीं विशिष्ट स्थानाबद्दल केवळ पोकळी येते.

ह्या सर्व कल्पना मृत्यूविषयीं जी मूळ कल्पना तिजवरून उत्पन्न झालेल्या असून त्यांच्यांत एकसमयावच्छेदेंकरून तसेच जास्त जास्त उदात्त असे बदल होतात. पुनरुज्जीवन जें प्रथम एकदम होईलसें वाटत असतें, तें बरेंच पुढें जातें; भूत प्रथम जें स्थूल द्रव्यात्मक समजलें जात असतें त्यास अत्यंत सूक्ष्म स्वरूप येतें, परजीवित जें प्रथम ह्या जीविताशींच समस्वरूप असतें, तें जास्त जास्त भिन्न होत जातें; आणि परलोक जो प्रथम अगदीं जवळ व ज्ञात असा असतो, तो कोठें तरी दूर जाऊन अज्ञात व अकल्पित असा बनतो.

प्रकरण सोळावें

निसर्गोत्तर कर्त्यांबद्दलच्या कल्पना

११६. आमच्या शब्दांना आमच्या विचारांस अनुसरून विशिष्ट अर्थ आलेले असल्यामुळें त्यांच्या द्वारा रानट्यांच्या विचाराचें कथन बरोबर होत नाहीं; आणि कधीं कधीं तर भलतेंच कथन होतें. निसर्गोत्तर म्हटलें कीं त्याच्या आधीं नैसर्गिक आलेंच पाहिजे; म्हणून ज्या व्यवस्थित कार्यकारणभावास आपण नैसर्गिक असें म्हणतों त्याची कल्पना आल्याशिवाय, ज्यास आपण निसर्गोत्तर म्हणून समजतों, त्याची कल्पना येणें नाहीं. तेव्हां रानट्याच्या कल्पनांस निसर्गोत्तर (supernatural) हा शब्द जो एथें योजिला आहे तो त्याच्या दृष्टचा योग्य म्हणून योजिलेला नाहीं, तर त्याच्यापेक्षां जास्त चांगला शब्द सांपडत नाहीं म्हणून योजिला आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

ही गोष्ट ध्यानांत बागवून, गेल्या चार प्रकरणांत वर्णिलेल्या कल्पनांनुरूप मूळ माणूस आपल्यासाठीं कशी कल्पित परिस्थिति उत्पन्न करितो ह्याची कल्पना आपण करूं. सभोंवतालच्या कृत्यांबद्दलच्या त्याच्या कल्पना प्रत्येकीं जरी असंबद्ध दिसतात, तरी त्यांचा सर्वांचा मिळून एकत्र विचार करतां त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेल्या ज्या कल्पना त्यांच्याशीं त्या सुसंबद्धच असतात असें दिसतें.

११७. प्रत्येक टोळींत जेव्हां जेव्हां कोणी मरेल,

तेव्हां तेव्हां पूर्वी मेलेल्यांच्या पुष्कळ भुतांमध्यें आणखी एकाची भर पडते. प्रथम हीं भुतें अगदीं जवळ असतात असें समजतात, म्हणजे, पूर्वीच्या घराभोंवतीं घिरट्या घालीत, किंवा थडग्याच्या आसपास, किंवा शेजारच्या झाडींत भटकत, तीं असतात असें समजतात, हें आपल्या आधीं नजरेस आलेंच आहे. अशा रीतीनें भुतांच्या संख्येंत सारखी भर पडत गेल्यानें त्यांची गांवाभोंवतीं एक वस्तीच बनते. हीं भुतें बहुधा अदृश्य असतात, पण कधीं कधीं नजरेस पडतात, असें समजतात. त्याबद्दल थोडींशीं उदाहरणें देऊं.

आस्ट्रेलियन लोक ह्या निसर्गोत्तर व्यक्ती सर्वत्र आहेत असें समजतात; जंगलें, पाणथळी, खडक, ह्या सर्व ठिकाणीं त्यांची गर्दी असते. वेड्डा लोकांची अशी समजूत आहे कीं हवा ही भुतांनीं भरलेली आहे; आणि प्रत्येक झाडाची, रानाची, व डोंगराची स्थानिक देवता आहे. टास्मेनियन लोक असें समजतात कीं दुष्ट व खोडकर भुतें सर्वत्र भरलेलीं आहेत. जेथें घरांतून प्रेतें पुरण्याची चाल आहे तेथें भुतें जिवंताच्या अगदीं कोंपराशीं असतात असें समजतात. क्यारेन लोक असें समजतात कीं जगांत माणसापेक्षां भुतेंच जास्त आहेत. निकोबार लोकांत अशी चाल आहे कीं वर्षांतून एकदां, व विशेषतः गांवांत एकदां आजार झाला असेल तेव्हां, ते एक मोठी बोट बांधितात, व ती प्रत्येक घराजवळ नेऊन उपाध्याय मोठा गोंगाट करून तेथील भुतें तिच्यांत हांकलितो, नंतर मग घराचे दरवाजे बंद करितात, व घरें उंच असतात त्यांच्या शिड्या काढून घेतात, व सर्व

धरांची अशा रीतीनें झडती घेतल्यावर ती होडी समुद्रांत नेऊन लोटतात. मालदिव बेटांत अशीच चाल आहे.

११८. पुढें मग कोणत्याहि गोष्टीचें कारण सांगण्याचें झालें म्हणजे हीं जीं शरीरविहीन असंख्य भुतें त्यांच्याकडे वोट दाखवूं लागतात. कारण नंतर ह्या भुतांच्या उत्पत्तीबद्दल नवीनच कल्पना उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, ज्यू लोक पुढें पुढें असें मानूं लागले कीं भुतें हीं पतित देवदूत व मनुष्य जातीच्या स्त्रिया ह्यांच्यापासून उत्पन्न झालेलीं आहेत. असें झालें म्हणजे मग पुढें वरचेवर दिसणारे व नाहींसे होणारे ढग, तद्वत् एकदम दिसूं लागून नष्ट होणारे अशनी, कीटकांचीं निरनिराळीं रूपें, पदार्थांस येणारीं निरनिराळीं स्वरूपें, वादळें, भूकंप, ज्वालामुखी, इत्यादि सर्वांचीं कारणें आपणास समजलीं असें ह्या रानटी लोकांस वाटूं लागतें. म्हणजे, हे सर्व चमत्कार हीं भुतें उत्पन्न करितात, व हे सर्व चमत्कार होतात तेव्हां भुतें असलींच पाहिजेत, अशा परस्परावलंबी समजुती उत्पन्न होतात, व त्यांच्या योगानें रानट्यांव्यतिरिक्त इतर पुष्कळांचेंहि समाधान होऊं लागतें.

आतां सृष्टचमत्कारांचीं शास्त्रीय कारणें समजूं लागण्याच्या अगोदर हींच कारणें देण्यासारखीं असतात. रानांत दिसणारे विलक्षण देखावे व ऐकूं येणारे विलक्षण ध्वनी दुष्ट साणसांचीं भुतें उत्पन्न करितात असें जें क्यारेन लोकांस वाटतें, तें शास्त्रीयज्ञानाच्या अभावीं ठीकच आहे. दोन प्रहरच्या उन्हानें अत्यन्त तापलेले व संध्याकाळीं एकदम निवालेले दगड फुटलेले पाहून हें भुतांचें काम आहे असें रानटी लोकांस वाटणें अगदीं

साहजिक आहे. निरनिराळ्या भागीं निरनिराळ्या प्रमाणांवर आकुंचन पावणारे पदार्थ आपोआप फुटतात हें रानटी माणसांस समजण्याचा संभव नसतो, तेव्हां दगड एकाएकीं फुटलेले पाहून हें काम भुतांचें असलें पाहिजे असें त्यांस वाटणें साहजिक आहे. तद्वतच, उष्ण कटिबंधांतील वाळवंटांत वाळू तापून पाण्याच्या पृष्ठभागाप्रमाप्रमाणें तिच्यावर तरंग उत्पन्न झालेले दिसूं लागतात; नंतर मग झाडें, डोंगर, सर्वच डोलतातशीं दिसूं लागतात. हे चमत्कार किरणांच्या वक्रीभवनानें उत्पन्न होतात, हें रानट्यास समजणें अशक्य आहे. तेव्हां तो हें भुतांचें कृत्य होय असें सहजच समजतो.

प्रथम हीं भुतें अमक्यांचींच म्हणून समजलीं जात असतात; पण कांहीं काळानें त्यांस सामान्य भुतांचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ एकाद्या ठिकाणीं पाण्याचा एकादा भोंवरा असतो व तेथें एकादा मनुष्य मेलेला असतो, तेव्हां तेथें पुनः कोणी सांपडून मेल्यास त्यास पहिल्याच्या भुतानें ओढून नेलें असें समजतात; पण एक दोन पिढ्या गेल्या म्हणजे तें अमक्याचेंच भूत होय असें कोणास स्मरण न राहून तें सामान्य भूत बनून जातें, व मग केवळ जळभूत म्हणून बनतें. अशा रीतीनें भुतांस त्यांचें व्यक्तीचें स्वरूप जाऊन जातीचें वगैरे स्वरूप येऊं लागतें.

११९. आतां सभोंवतालच्या सृष्टींतील चमत्कार भुतें करितात अशी एकदां समजूत झाली म्हणजे माणसास जें बरें वाईट होतें, तेंहि तींच करितात असें रानट्यास सहजच वाटूं लागतें. भुतें जर जवळ आहेत, आणि मित्रत्व व शत्रुत्व हे भाव जर त्यांच्यांत भरलेले आहेत,

तर त्यांनीं माणसांचें बरें वाईट करण्यास प्रवृत्त व्हावें हें अगदीं स्वाभाविक दिसतें. सारांश, मृत शत्रूचा आत्मा नुकसान करण्याची संधि केव्हां येईल म्हणून वाट पहात असतो, आणि मृत आप्ताचा आत्मा खुशींत असल्यास बरें करण्यास, व रागावला असल्यास वाईट करण्यास तत्पर असतो, असें रानटयास वाटत असतें.

म्हणून सर्व जातींतून अशा समजुती दृष्टीस पडतात. वेड्डा लोकांत पारधीच्या वेळीं मृत मुलगा किंवा बाप याची मदतीसाठीं प्रार्थना करीत असतात, आणि नेम चुकल्यास प्रार्थना बरोबर झाली नाहीं म्हणून समजतात. आस्ट्रेलियन लोकांत एकादा मनुष्य झाडावरून पडून त्याची मान मोडल्यास, दुसऱ्या टोळींतील बोयला लोकांनीं त्याचें जीवित मंत्र घालून नेलें म्हणून समजतात. अशांटी लोकांत मृत आप्ताचे आत्मे संरक्षक म्हणून समजले जातात, आणि मृत शत्रूंचे घातुक म्हणून समजतात. ज्यू, ग्रीक, क्याथलिक सर्व लोकांत अशा प्रकारची समजूत कमजास्त प्रमाणानें आढळतेच आढळते. फरक इतकाच कीं उच्चतर उच्चतर जातींमध्यें ह्या भुतांस जास्त जास्त लोकोत्तर किंवा दैविक स्वरूप आलेलें असतें.

१२०. शेवटची व विशेष महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, ही कार्यकारणपरंपरा एकदां प्राथमिक माणसाच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे ती इतर कोणत्याहि परंपरेचा त्याच्या मनांत प्रवेश होऊं देत नाहीं. अनुभवाच्या योगानें भौतिक कारणांचें ज्ञान मनांत प्रवेश करण्यापूर्वीच ही पिशाचकारणकल्पना मनांत कायम होऊन जाते. आपल्यामध्यें देखील एक मत जाऊन

दुसरें उत्पन्न होण्यास किती तरी कठीण जातें; तर मग ज्यांच्या ठिकाणीं अनुभूत गोष्टी थोड्याच असून त्यांचें वर्गीकरण झालेलें नाहीं, ज्यांच्या ठिकाणीं व्यवस्था, नियम, कारण, इत्यादिकांच्या कल्पना उत्पन्न झालेल्या नाहींत, गुणदोषज्ञान आणि संशय हीं ज्यांच्या ठिकाणीं केवळ बीजभूत आहेत, आणि ज्यांच्या ठिकाणीं चमत्कारशी करण्यास आवश्यक जी जिज्ञासा तिचाहि अभाव आहे, त्यांच्या ठिकाणीं एकप्रकारचा समज जाऊन दुसरा उत्पन्न होण्यास किती कठीण जात असेल बरें?

म्हणून प्राथमिक लोकांच्या ह्या कारणकल्पनेविषयीं लोक जें आश्चर्य व्यक्त करितात, तें फुकट आहे. प्रथमच माणसास स्वाभाविक कारणकल्पना असते असें समजणें हीच चुकी आहे. समाज जसजसे वाढत जातील, कला जास्त जास्त होत जातील, अनुभव जमत जातील, आणि चमत्कारांचे नित्यसंबंध लक्षांत येत जातील, मनांत बिंबत जातील, आणि परिचित होत जातील, तसतशीच स्वाभाविक कारणकल्पना उत्पन्न होणें शक्य होत जातें.

मृतांचे आत्मे व त्यांच्यापासून कमजास्त प्रमाणानें भिन्न असलेले आत्मे परिस्थितींत घडणाऱ्या गोष्टी बनवून आणितात असें रानटचास कसें वाटतें हें इतका वेळ पाहिलें. आतां तेच आत्मे त्याच्या शरीरांत व इतरांच्या शरीरांत घडून येणाऱ्या गोष्टीहि बनवून आणितात असें त्यास कसें वाटूं लागतें ह्याचा विचार करूं.

प्रकरण सतरावें

फेंपरें व आळेपिळे, भ्रम व वेड, रोग व मरण ह्यांचीं दैविक कारणें

१२१. उत्क्रांति होत असतां होणारे चमत्कार एकाच रेषेंत दाखवतां येणार नाहींत; कारण नेहमीं त्यांस भिन्न भिन्न दिशांनीं नव्या नव्या फांद्या फुटत असतात. बेशुद्धि, मरण, आणि पिशाच ह्यांजबद्दलच्या मूळ कल्पना घेऊन कांहीं दिशांनीं परजन्म व परलोक ह्यांबद्दलच्या कल्पना कशा बनत जातात हें आपण पाहिलें; आणि अन्य दिशांनीं त्याच कल्पनांपासून सर्वत्र निसर्गोत्तर सत्त्वें आहेत ही कल्पना कशी बनत जाते हेंहि पाहिलें. आतां बेशुद्ध शरीरापासून पुनः सुरवात करून वरील कल्पनांच्या साहाय्यानें अन्य कांहीं दिशांनीं अन्य कांहीं कल्पना कशा उत्पन्न होतात हें पाहिलें पाहिजे.

झोंप, मूर्च्छा, गुंगी, सूनबाहिरी, इत्यादि रोगांत बहुतेक पूर्ण स्वास्थ्य असतें; आणि मरणसमयीं तें स्वास्थ्य कायमचें होतें. सारांश, दुष्यम जेव्हां गैरहजर असतो, तेव्हां शरीर कांहीं करीत नसतें. पण कधीं कधीं शरीर डोळे मिटून जमिनीवर पडलें असतां जोरानें धडपड करूं लागतें; आणि तो माणूस पुनः शुद्धीवर आला म्हणजे धडपड केल्याचें मुळींच कबूल करीत नाहीं. तो म्हणतो तुम्हीं माझी जी कांहीं हालचाल पाहिली तिजबद्दल

मला मुळींच माहिती नाहीं. आतां त्याबेळीं त्याचा आत्मा गैरहजर होता हें तर उघडच आहे. पण तो गैरहजर असतां त्याच्या शरीराची ही धडपड कशी झाली ?

ह्या प्रश्नास रानटी माणूस जें उत्तर देतो तें त्याच्या बुद्धीला जें अत्यंत सयुक्तिक दिसेल तेंच देतो.

१२२. सर्व प्रकारच्या बेशुद्धींत आत्मा जर भटकत असतो, आणि परत आल्यावर जर शरीरास त्याची पूर्वीची कृति प्राप्त होते, आणि अशा रीतीनें जर आत्म्यास शरीराबाहेर जातां येतें व पुनः शरीरांत येतां येतें, तर दुसरा एकादा आत्मा शरीरांत प्रवेश करूं शकणार नाहीं काय ? रानटी म्हणतो, शकेल.

म्हणून तो अपस्मारचें कारण असें दाखवितोः—कांगो लोक समजतात कीं भूत अंगांत शिरून अपस्मार होतो. पूर्व आफ्रिकन लोकांत धाडकन् पडण्याचा (फेंपऱ्याचा) रोग फार आहे, व तेहि त्याचें कारण अंगांत भूत शिरणें किंवा भुतानें ' पछाडणें ' हेंच समजतात. एशिया खंडांत कालमक लोक असेंच समजतात. ज्यू लोक असेंच समजत हें स्पष्ट आहे. आरबी भाषेंत फेंपरें व पछाडणें यांस एकच शब्द आहे. सुधारलेल्या लोकांत परवांपर्यंत असेंच समजत हें सांगावयास नकोच.

सारांश, मूळ तर्क असा आहे कीं, रोग्याचा आत्मा निघून गेला असतां एकादा विनष्टशरीर आत्मा त्याची जागा बळकावून त्या शरीराचे असे हाल करीत असतो. ह्या बळकावणाऱ्या आत्म्यास रानटी लोक भूत समजतात.

१२३. मूळमांणसापुढें आणखी एक प्रश्न येत असतो, आणि तो आणखी एक सयुक्तिक तर्क काढीत

असतो, त्यापासून आणखी विलक्षण पण एकमेकांशीं सुसंबद्ध अशा कल्पना निघत असतात.

कधीं कधीं असें होतें कीं एकादा माणूस शुद्धींत असतांहि त्याला आपल्या शरीरक्रिया आपल्या कह्यांत ठेवतां येत नाहींशा होतात. त्याच्या इच्छेविना किंवा इच्छेविरुद्धहि त्याला कांहीं गोष्टी कराव्या लागूं लागतात. अशा वेळीं त्याचा आत्मा बाहेर गेला नसूनहि दुसरा कोणी त्याच्यांत शिरला असें समजावयाचें कीं काय? होय, असें उत्तर देणें त्यास भागच वाटतें.

अपस्मारांत जें निरर्थक हंसणें, रडणें, व ओरडणें चाललेलें असतें त्याचें स्पष्टीकरण ह्याच आधारावर करितात. आमाझुलू लोकांत जो इन्यांगा किंवा भविष्यवादी झाला आहे किंवा पछाडला जात आहे, त्यास अपस्मार झाला म्हणून समजतात. आबिसिनियन लोकांत पुरुषांपेक्षां बायकांमध्यें हें वारें जास्त येतें म्हणून समजतात, आणि तें बरोबरच आहे, कारण हिस्टेरिया हा अपस्मारपेक्षांहि स्त्रियांसच जास्त होत असतो.

ह्या मोठाल्या आळ्यापिळ्यांस कारण जर भूतबाधा समजावयाची तर लहान सहान अंगविक्षोभास तीच कारण समजली पाहिजे. म्हणून शिंक व जांभई यांचें रानटी लोक हेंच कारण समजतात. उदाहरणार्थ, आमाझुलू लोकांची समजूत अशी आहे कीं, माणूस इन्यांगा व्हावयाचा असला, म्हणजे त्याच्या डोक्याच्या ठिकाणीं त्याचीं लक्षणें दिसूं लागतात. तो वरचेवर शिंका काढूं लागतो व जांभया देऊं लागतो. खोंड लोकांस उपाध्यास पुढचें विचारावयाचें असलें म्हणजे त्याच्या अंगावर

तें पाणी मारितात, व त्याच्या अंगांत येतें. आतां हें अंगांत येणारें भूत कधीं कधीं मित्र असतें, व कधीं कधीं शत्रु असतें. म्हणूनच आपल्यामध्यें कोणी शिंकलें म्हणजे " शतं जीव " म्हणून म्हणतात. याकूत लोकांत डांग्या खोकल्याचें कारण भूतच समजतात. किरगीज लोकांत तर बाळंत बाईला देखील भूतबाधा झाली आहे म्हणून म्हणतात, व त्यास हाकलण्यासाठीं तीस मारितात.

१२४. दुसरे कांहीं रोग आहेत तेहि भूतबाधेनेंच होतात असें रानट्यास सहज वाटतें, कारण एरवीं त्यांचा त्यांस उमजच पडत नाहीं. ते रोग कोणते म्हणाल तर भ्रम व वेड हे होत.

हा एथें मनुष्य पडला आहे; हा कांहीं खात नाहीं, व कोणास ओळखीत नाहीं; केव्हां केव्हां वेडेंविद्रें बोलतो, व केव्हां केव्हां बडबडतो; केव्हां केव्हां सभोंवतालच्या माणसांस न दिसणाऱ्याच माणसांस उद्देशून बोलता; केव्हां केव्हां अदृश्य शत्रूस पाहून भितो, आणि केव्हां केव्हां उगीच हसतो. बरें, पुढें तो शुद्धीवर आला म्हणजे ह्याबद्दल आपणांस कांहींच माहीत नाहीं म्हणून म्हणतो किंवा दुसरेंच कांहीं पाहिलें म्हणून सांगतो. ह्या सर्वांचें उघड कारण हेंच असलें पाहिजे कीं रात्रीं हा (ह्याचा आत्मा) बाहेर गेला असतां सभोंवतालच्या अनेक भुतांपैकीं एक ह्याच्यांत शिरलें, आणि त्यानें त्याचा असा हा उच्छाद मांडिला आहे. रानटी लोक भ्रमाची उपपत्ति अशीच करितात, ह्याबद्दल फारसा पुरावा नाहीं, ह्याचें कारण प्रवांशांस त्यांच्यामध्यें हा रोग फारसा दिसत नाहीं. तथापि आरब लोकांत फार ताप येऊन भ्रम

झाला म्हणजे रोग्यास पिशाचानें घेरिलें म्हणून समजतात.

पण तात्कालिक भ्रमाबद्दल जरी असा पुरावा मिळत नाहीं, तरी कायमच्या वेडाबद्दल पुष्कळ मिळतो. सामो-अन लोक व टांगन लोक वेडे हें पिशाचाचेंच काम होय म्हणून समजतात. सुमात्रांतले लोक देखील वेडे पछाडलेले असतात म्हणून मानितात. मानसिक अवस्था ज्ञानतंतूंच्या क्रियांवर अवलंबून असतात, व ह्या क्रिया बिघडण्यास भौतिक कारणें होत असतात, ही कल्पना शास्त्राच्या योगानें परिचित होईतोंपर्यंत वेड्याचे विलक्षण मनोविकार व कल्पना ह्यांचें कारण भूतबाधा हेंच असलें पाहिजे असें वाटणें अगदीं साहाजिक आहे.

शिवाय वेड्याच्या वर्तनावरून जगांत भुतेंखेतें आहेत ह्या समजास बळकटी कशी येते हें आपण विसरतां कामा नये. पुऱ्या किंवा अर्धवट रानट्यास आत्मविषयक भ्रांतीविषयीं कांहींएक माहीत नसतें. असें असल्यामुळें तो जेव्हां एकादा वेडा एकाद्या अदृश्य पुरुषास उद्देशून रागानें बोलतांना, किंवा त्याच्यावर शस्त्र उगारतांना पाहतो, तेव्हां त्यास काय वाटावें बरें ? त्याचे ते रागाचे हावभाव, फाटलेले डोळे, कर्कश आवाज, ह्या सर्वांवरून त्याच्यापुढें भूत असलें पाहिजे ह्याबद्दल त्या रानट्यास मुळींच संशय रहात नाहीं.

वेड्याच्या वर्तनावरून आणखी एक कल्पना उत्पन्न होते. वेडाच्या लहरींत वेड्यास अत्यंत बळ येतें; इतकें कीं तो तेव्हां कित्येक माणसांस भारी होतो. ह्यावरून काय तर्क काढावयाचा ? अर्थात् हा कीं पछाडणाऱ्या भुताच्या अंगीं लोकोत्तर किंवा दैविकशक्ति आहे. ह्या

समजावरून आणखी कांहीं समज उत्पन्न होतात त्यांचा विचार पुढें करूं.

१२५. शरीराच्या व मनाच्या असामान्य क्रियांची अशा रीतीनें उपपत्ति लावण्याची पद्धति एकदां सुरू झाली म्हणजे ती पसरत जाते. हळू हळू ती इतर विलक्षण प्रकारांसहि लागू होऊं लागते. मग सर्व रोगांची उपपत्ति अशीच करूं लागतात. तापांत शरीर व मन दोन्ही बिघडलेलीं असल्यामुळें दोहींचें कारण तेंच समजतात. म्हणजे कोणी तरी दुष्ट भूत शरीरांत वास करीत आहे, किंवा सभोंवतीं फिरत्या वालीत आहे, असें समजूं लागतें.

ह्याचें प्राथमिक उदाहरण आमाझुलू लोकांत दृष्टीस पडतें. जरा कुशींत कसकसूं लागलें तरी त्याचें कारण ते लोक असेंच समजतात. रोग बराच वेळ राहिल्यास तो इटोगोनें उत्पन्न केला म्हणून म्हणतात. सामोअन लोकांची अशी समजूत असे कीं मृतांचे आत्मे परत येऊं शकतात, आणि कुटुंबांतील इतर माणसांत रोग व मृत्यु उत्पन्न करितात. न्यूक्यालिडोनियन लोकांस असें वाटतें कीं गोरे लोक हे मृतांचे आत्मे आहेत, व ते रोग आणितात. डायाक लोक रोगांस पौरुष स्वरूप देतात. देवीच्या रोगांस ते फोड्या म्हणून म्हणावयाचे नाहींत, तर त्यानें तुला सोडिलें काय म्हणून विचारतील. खुद्द देवी शब्दाची तीच कथा आहे. कधीं कधीं त्यास ते नाईक म्हणतात. अर्थात् ह्या रोगांचें कारण पिशाच म्हणून ते समजतात, व कांहीं रोगांत पिशाच अंगांत शिरतें व कांहींत बाहेरून पीडा देतें असें समजतात. आरावाक

लोक दुखण्यास दुष्ट भुताचा बाण म्हणतात. डायाक लोक समजतात कीं भुतें अदृश्य भाल्यांनीं अदृश्य जखमा करून रोग आणितात. पण सर्वत्र कल्पिलेलें कारण पौरुष स्वरूप समजलें जातें. एशिया खंडांत क्यारेन्स लोक अदृश्य भुतांची करणी रोगाचें कारण समजतात. बोडो, ढिमाल व लेपूचा लोक असेंच समजतात. आफ्रिकेंत किनाऱ्यावरील नीग्रो लोक आजाराचें कारण जादुगिरी व देवांची कृति हें समजतात; आणि कुसा लोक शत्रू व दुष्ट भुतें रोग करितात असें म्हणतात. अमेरिकेंत कोमांची लोक रोग हे शत्रूच्या घातुक फुंकरानें उत्पन्न होतात असें समजतात, आणि मुंद्रुकू लोक म्हणतात कीं अज्ञात शत्रूच्या मंत्रानें रोग येतात.

भुताच्या ऐवजीं दैविकशक्ति हा शब्द घातला म्हणजे रानटी कल्पनेस अर्धवट सुधारलेल्या कल्पनेचें स्वरूप येतें. ईलियडमध्यें सांथीनें मरणाऱ्या ग्रीक लोकांस अपॉलोनें आपल्या बाणांनीं वेधिलें आहे असें वर्णन आढळतें. बाबिलोनियन लोकांचा अगदीं मूळचा वीर जो इझ्दुबार त्यास रागावलेली देवी इष्तार इनें रोगपीडित केलें असें दाखविलें आहे.

१२६. मागील समजांची उत्पत्ति कशी झाली आहे ह्याचा विचार करतां मृत्युहि दैविक कारणांनींच येतो ह्या समजाबद्दल आश्चर्य वाटावयाचें नाहीं.

ही समजूत कोणत्या तरी रूपानें सर्वत्र दृष्टीस पडते. ऊपी इंडियन लोकांस असें वाटतें कीं, मरण हें स्वाभाविक रीत्या येतच नाहीं. चिपीवायन लोक जादूनें मरण येतें, व ती एस्किमो करितात असें समजतात. कालमक

लोक समजतात कीं, मरण हें देवतेच्या हुकुमावरून कोणी तरी भूत उत्पन्न करितें खोंड लोकांचा असा समज आहे कीं, देवांचे कांहीं विशेष अपराध केल्यास शिक्षा म्हणून मरण येतें. लोआंगो लोकांस असें वाटतें कीं, बुडून देखील माणूस स्वाभाविक रीत्या मरावयाचा नाहीं, तर त्याजवर देवाचा राग झाला पाहिजे. ताहितियन लोकांची विषांच्या संबंधानेंहि अशीच कल्पना असे.

ह्याच्यानंतर उत्पन्न होणारी एक कल्पना सांगितली पाहिजे, ती ही कीं, सरतेशेवटीं मरण आणणाऱ्या निरनिराळ्या भुतांचें भिन्न भिन्न व्यक्तित्व जाऊन त्यांस सामान्य स्वरूप येतें; म्हणजे अनेक भुतांबद्दल एक यमाजी भास्कर उत्पन्न होतो; आणि त्याचें मूळ बहुधा कोणी तरी पुष्कळ सूड घेणारा शत्रु असतो, व त्यानें आणखी सूड घेतल्याचीहि दंतकथा सुरू होते. खिस्ती लोकांत रविवारीं कोणी बुडून मेल्यास तो देवाच्या रागानें बुडाला असें समजतात. तात्पर्य, मरणास कारण देवाचा राग ही समजूत निरनिराळ्या रूपांनीं सर्वत्र दृष्टीस पडते.

१२७. सारांश, रानटी लोकांची जी स्वप्नांच्या संबंधाची कल्पना, आणि त्यावरून उत्पन्न झालेली जी भुतांच्या संबंधाची कल्पना ह्यांजवरून ह्या समजुती उत्पन्न होतात अशा दृष्टीनें त्यांजकडे पाहिल्यास त्यांत कांहीं विरुद्ध दिसत नाहीं.

आत्म्यांस जर शरीर सोडून जातां येतें, व त्यांत त्यांस जर पुनः प्रवेश करतां येतो, तर खताचे आत्मे गैरहजर असतां त्यांत परकी आत्म्यांनीं प्रवेश कां करूं नये? अपस्मारासारख्या रोगांत रोगी जी कृति करितो,

तीं तो केली असें म्हणत नाहीं; तेव्हां असा कोणी तरी बाह्य कर्ता मानणें भागच पडतें, आणि हिस्टेरिया रोग झाला असतां, शिंकेच्या वेळीं, जांभईच्या वेळीं, आणि डांग्या खोकला झाला असतां शरीराच्या कांहीं हालचाली जर इच्छेविरुद्ध होतात, तर असें अनुमान करणें भागच पडतें कीं, कोणी तरी परकी आत्मा शरीर बळकावून त्यास त्याच्या इच्छेविना तशा हालचाली करावयास लावीत असतो.

भ्रमिष्ट व वेड्या लोकांचें जें विलक्षण वर्तन त्याचेंहि ह्या कृतीनें विवरण होतें. वेड्याच्या शरीरांत शत्रूचें भूत शिरलें आहे ही गोष्ट तो आपल्या स्वतास इजा करून घेतो ह्यावरूनच सिद्ध होते. शरीराचा खरा मालक त्यास स्वतास मारावयास किंवा चावावयास लावावयाचा नाहीं. शिवाय शिरलेलें भूत दुसऱ्या भुतांशीं बोलू शकतें, आणि तीं जरी इतरांस दिसत नाहींत तरी त्यास दिसतात.

आणि ह्या शरीराच्या व मनाच्या विलक्षण विकृती जर अशा रीतीनें उत्पन्न होतात, तर त्यावरून उघडच असें अनुमान निघतें कीं क्रमी विलक्षण असे रोग त्याच कारणानें उत्पन्न होत असतील. ते उत्पन्न करणारें भूत जर शरीरांत नसलें तर निदान आसपास तरी अदृश्य असलें पाहिजे, व तें ह्या विलक्षण उलाढाली करीत असलें पाहिजे.

पुष्कळ दिवसांच्या रोगानंतर वरचेवर मरण येत असल्यामुळें रोगाचें जें कारण तेंच मरणानेंहि कारण असलें पाहिजे अशी समजूत स्वाभाविकरीत्या उत्पन्न होते. जेथें मरणाच्या आधीं स्पष्ट कारण दिसत नसेल तेथें हीच कल्पना शक्य दिसते; आणि जेथें कांहीं स्पष्ट कारण

झालें असेल तेथेंहि भुताचा त्यांत कांहीं तरी हात अस-
ण्याचा बराच संभव आहे असें वाटणें साहजिक आहे.
कड्यावरून पाय घसरून आपला संवगडी पडला व मे-
ला, किंवा कांहीं विशेष हालचालीमुळें भाला त्याच्या उ-
रांत खुपसला गेला, तर त्यास कारण बहुधा शत्रूचा दुष्ट
आत्मा असला पाहिजे, असें रानट्यास वाटतें.

प्रकरण अठरावें

अवसर, शाकुन सांगणें, पिशाच काढणें, आणि चेटुक.

१२८. एकाद्या माणसाच्या शरीरांत जर मृत शत्रूचा दुष्ट आत्मा शिरूं शकतो, तर कधीं कधीं मृत मित्राचा सुष्ट आत्मा शिरत नसेल कशावरून? अपस्मारवाल्याचे आळेपिळे, भ्रमिष्टाच्या बडबडी, आणि वेड्याच्या स्वयंकृत जखमा, ह्या जर शरीरस्थ अपकारक भूत उत्पन्न करितें, तर एकाद्या माणसामध्यें कधीं कधीं दृष्टीस पडणारी विलक्षण शक्ति किंवा अद्भुत चातुर्य, हीं शरीरस्थ उपकारक पिशाच कशावरून उत्पन्न करीत नसेल? मनुष्य शुद्धीवर असतांना देखील शत्रूचें भूत जर त्याच्या शरीराचें संयुक्त मालक होऊं शकतें, आणि त्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्या कृतीवर दाब ठेवूं शकतें, आणि अशा रीतीनें शिंका, जांभया, व डांग्या खोकला यांस उत्पन्न करितें, तर वाडवडिलांच्या भुतासहि त्याच्या शरीराची अशीच संयुक्त मालकी घेतां येणार नाहीं काय आणि त्याला विघ्न करण्याच्या ऐवजीं मदत करून त्यास विशेष शक्ति, ज्ञान, किंवा चातुर्य देतां येणार नाहीं काय?

ह्या प्रश्नांचीं उत्तरें रानटी माणूस मूळ कल्पनेस अनुसरून होय म्हणूनच देतो, आणि त्यामुळें पुढें सांगितलेल्या कल्पनांची उत्पत्ति होते.

१२९. वेडे लोक वेडाच्या भरांत विलक्षण शक्ति दाखवितात ह्यावरून त्यांच्या अंगांत येणाऱ्या अस्वाभाविक कृत्यांच्या अंगीं अमानुष शक्ती असल्या पाहिजेत असा समज सहजच उत्पन्न होतो.

विलक्षण इच्छाशक्ति आणि विलक्षण शरीरशक्ति ह्यांचें कारण हेंच समजतात ही गोष्ट पुराणकथांवरून दिसून येते. इजिप्शन, आसीरियन, बाबिलोनियन, ग्रीक, ह्या सर्व पुराणजातींमध्यें सामान्य कल्पना अशी होती कीं देव हे इतर बाबतींत जरी पुष्कळ अंशीं माणसासारखेच असले, तरी त्यांच्या अंगीं शक्ति माणसाहून फारच जास्त असते; आणि ह्या कल्पनेवर दाब मुळींच नसल्यामुळें ती प्रसरण पावून तीस सर्वशक्तिमत्तेचें रूप आलें. ह्याचा साहजिक परिणाम असा झाला कीं कोणीं असामान्य शक्तीचें प्रदर्शन केलें कीं पाहणारास असा संशय येई कीं ह्याच्या अंगांत कोणी दैविक पुरुष शिरला आहे, किंवा कोणी दैविक सत्त्वच सोंग घेऊन आल्यापुढें उभें आहे.

१३०. विलक्षण मनःशक्तीबद्दल त्यांस असेंच वाटे. डांव किंवा देव जर विलक्षण शरीरशक्ति उत्पन्न करूं शकतो तर तो विलक्षण बुद्धि किंवा इच्छाशक्ति उत्पन्न करूं शकेलच.

ताहितियन लोक असें समजत कीं ज्याच्या अंगांत देव आला तो तो देव सांगेल तसेंच बोलूं किंवा करूं शकतो. "अगे देवते, आकिलसच्या क्रोधाग्नीबद्दल गा" असें जें होमर कवीनें ईलियड काव्याच्या प्रारंभीं प्रार्थनारूपानें म्हटलें त्यांत त्याचा हेतु केवळ औपचारिक न-

व्हता, तर गानदेवतेनें खरोखरच आपल्या अंगांत शिरावें असा होता. कारण त्या वेळीं असाच सामान्य ज होता कीं सर्व मोठे विचार देवांपासून आपल्यास प्राप्त होतात. मनांत उत्पन्न होणाऱ्या कल्पना अशा रीतीनें उत्पन्न होतात अशी एकदां समजूत झाली म्हणजे मग ती सामान्य कल्पनेस देखील लावतां येते. उदाहरणार्थ, ईलियडमध्यें हेलेन असें म्हणते कीं, माझ्या मनांत माझ्या पूर्वीच्या नवऱ्याविषयीं, नगराविषयीं, आणि आईबापांविषयीं आयरिस देवतेनें उत्सुकता उत्पन्न केली आहे. ही कल्पना वाढतां वाढतां इतकी लांबते कीं, पूर्वकालीन ग्रीक लोक सामान्य चुकी देखील देवाच्या फसवणुकीनें आपल्या हातून होते असें समजत.

ही समजूत सुधारलेल्या लोकांमध्यें देखील कांहीं स्वरूपानें दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, ख्रिस्ती लोकांत उपाध्यायाची दीक्षा देतें वेळीं असें म्हणतात कीं, देवाच्या देवळांत उपाध्यायाचें काम करण्यासाठीं पवित्र आत्म्याचें ग्रहण कर. विलक्षण बुद्धिमत्ता देवाच्या प्रेरणेनेंच उत्पन्न होते, व अशा लोकांच्या अंगीं वारें येत असतें, असेंहि कोणी अद्यापि समजतात.

१३१. प्रेरणा आणि भविष्यकथन किंवा शकुन सांगणें ह्यांच्यामध्यें फारच अल्प भेद आहे. कारण भविष्यवादी म्हटला म्हणजे प्रेरित माणूस आपल्या दैविकशक्तीचा विशिष्ट कार्यासाठीं उपयोग करणारा होय.

आमाझूलू लोक असें समजतात कीं भविष्यवाद्यास प्रथम उपवास करावा लागतो; कारण मनाची चलबिचल उत्पन्न होण्यास शरीरामध्यें अगोदर चलबिचल उत्पन्न

झाली पाहिजे. ते समजतात कीं, सारख्या भरीत राहिलेल्या पोटास गुह्य ज्ञान होत नाहीं. शिवाय जो इन्यांगा व्हावयाचा आहे, तो स्वस्थ झोंपहि घेत नाहीं. तो केवळ थोडथोडी झोंप घेतो, व तिजमध्यें त्यास सारखीं स्वप्नें पडत राहतात. शिवाय कांहीं मानसिक चलबिचलहि व्हावी लागते असें ते समजतात. जेथें योग्य चलबिचल झाल्याचें दिसत नसेल तेथें ते म्हणतात, छे, तो केवळ वेडा आहे; त्याच्यांत इटॉंगो शिरलेला नाहीं. शिवाय लपवलेल्या वस्तू तो शोधून काढितो किंवा नाहीं हेंहि तो इन्यांगा झाला आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं पहातात.

एथें दाखविलेली समजूत सामान्यत्वें सर्वत्र दृष्टीस पडते; फरक दिसतो तो अंगांत येणाऱ्या दैविक शक्तीच्या संबंधानें होय. शिवाय प्रथम विलक्षण उत्क्षोभ झाला पाहिजे ही समजूत सर्वत्र आहेच, आणि हा उत्क्षोभ अंगांत येणारें भूत उत्पन्न करितें हीहि समजूत सर्वत्र आहेच; आणि बोलतें तें तें बोलतें. अर्धवट व पुऱ्या सुधारलेल्या लोकांत अशा प्रकारची कांहीं समजूत आढळतेच. उदाहरणार्थ, होमर म्हणतो कीं, देव माणसांशीं नेहमींच व्यवहार करीत असतात, आणि पुढच्या गोष्टींचें ज्ञान त्यांस करून देतात. पोपाचें वचन प्रमाण धरितात ह्यास कारण हेंच समजतात कीं त्यास देव प्रेरणा करीत असतो.

१३२. पुढें ह्या कल्पनांस आणखी विशिष्ट स्वरूप अवश्यमेव येतें. शत्रूचें भूत जर एकाद्याच्या अंगांत शिरलेलें असेल तर तें हांकलून लावितां येईल किंवा नाहीं? आणि ती गोष्ट जर एरवीं साध्य झाली नाहीं, तर एका-

द्या दैविक शक्तीच्या द्वारां साध्य होईल किंवा नाहीं? जर कांहीं माणसांच्या अंगांत दुष्ट भुतें शिरून त्यांचें नुकसान करितात, आणि कांहींकांच्या अंगांत सुष्ट भुतें शिरून त्यांचा फायदा करितात, आणि तीं जर दुष्ट भुतांइतकींच किंवा जास्त शक्तिमान असतात, तर त्यांच्या साहाय्यानें दुष्ट भुतें हांकलतां येतील किंवा नाहीं? येतील असा संभव दिसतो, आणि म्हणून भूत काढण्याची विद्या उत्पन्न होते.

वैद्य हा प्रथम भूत काढणाराच असतो. प्रारंभीं कोणी आजारी पडला म्हणजे भूत काढण्यासाठीं उपाध्यायाकडे आमंत्रण जातें. आणि तो उपाध्याय रोग्याचें शरीर भुतास राहण्यास घाणेरडें वाटावें अशी खटपट करितो. उदाहरणार्थ, सुमात्रांतले लोक वेड्या माणसाच्या अंगांतील भूत घालविण्यासाठीं त्यास एका खोंपटांत कोंडून ठेवितात, आणि त्यास आग लावून देतात, मग त्यानें वाटेल तसें बाहेर पडावें. कांहीं कांहीं ह्याच हेतूनें रोग्यास भयंकर पेयें प्यावयास देतात किंवा घाणेरड्या वस्तू हुंगावयास देतात. शिवाय भूतकाढ्या भुतास भिववून हाकलण्यासाठीं त्याच्या अंगावर मोठ्यानें ओरडतो, किंवा त्यास मारण्याचे हातवारे करितो, किंवा त्याच्यापुढें तोंडें वेडीं-वांकडीं करितो. कालिफोर्निया बेटांत वैद्य रोग्याच्या समोर बसून तासच्या तास रागावलेल्या कुत्र्यासारखा भुंकत राहतो. कोलंबियामधील इंडियन लोकांत वैद्य भूत हाकलण्यासाठीं रोग्याच्या पोटाच्या खळींत हाताच्या घट्ट मुठी करून खुपसतो. कुमानामधील इंडियन लोकांत रोग वाढल्यास रोग्याच्या अंगांत भूत शि-

रलें म्हणून समजतात; मग त्याचें सर्व आंग कुरवाळतात, मंत्र म्हणतात, त्यांचे कांहीं सांधे चाटतात, कांहीं ठिकाणीं चोखतात, , आणि म्हणतात कीं असें केल्यानें भूत बाहेर पडतें. शिवाय ते एका झाडाची लहानशी डहाळी घेतात, त्या झाडाचे गुणधर्म वैदूसच माहीत असतात; आणि ती डहाळी आपल्या घशांत कोंबून कोंबून रक्त काढितात, नंतर ओरडतात, पाय आपटतात, तोंडें वेडीं-वांकडीं करितात, आणि घाम काढितात; असें दोन तास करितात; नंतर त्यांच्या तोंडांतून कांहीं चिकट पदार्थ निघतो, त्यांत एक लहानशी वाटोळी काळी गोळी असते; ती आजाऱ्याचे आप्त शेतांत घेऊन जातात. आणि म्हणतात भुता! जा आपल्या मार्गानें चालतें हो. पण भूत काढण्याची जास्त सुधारलेली रीत म्हटली म्हणजे एका भुताकरवीं दुसरें भूत काढणें ही होय. म्हणजे वैदू किंवा भट आपल्या अंगांत येणाऱ्या भुताकडून रोग्याच्या अंगांतील भूत वठणीस आणितो, किंवा कांहीं दैविक शक्तीची मदत घेतो.

ह्या शेवटच्या रूपानें भूत काढण्याची कला सुधारलेल्या लोकांत देखील सुरू राहते. हीब्र्यू लोक प्रारंभीं प्रारंभीं रानट्यांसारखेच कांहीं भौतिक उपाय करीत असत; म्हणजे माशाचें काळीज व हृदय हीं जाळून भयंकर घाण उत्पन्न करीत. पण पुढें ह्या कामीं दैविक शक्तीची मदत मागण्याची पद्धति त्यांच्यामध्यें सुरू झाली. ती रोमन कॅथलिक लोकांत अद्यापि चालू आहे, व त्यांच्यांत मुद्दाम दीक्षा देऊन तयार केलेले भूतकाढ्येहि आहेत. सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दींत प्राटेस्टंट लोकांतहि ती

चाल होतीच; कारण मुलांला बाप्तिस्मा देण्याच्या अगोदर ह्या शब्दांनीं त्यांच्या अंगांतील भूंतखेत काढून टाकीत. " हे भुता, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांच्या नांवानें मी तुला अशी आज्ञा करितों कीं, तूं ह्या अर्भकांच्या अंगांतून बाहेर पड आणि निघून जा. " देवाच्या पूजेचें पाणी भूतविहीन करण्याची चाल ख्रिस्ती धर्मांत प्राटेस्टंट धर्म सुरू होईपर्यंत व पुढेंहि सुरू होतीच, व ती अर्थात् भुतें सर्वत्र पसरलेलीं आहेत ह्या समजुतीचीच निदर्शक होय.

१२३. अनुकूल भुतांच्या साहाय्यानें दुष्ट भुतें हाकलणारा वैद्य सहजच आपल्याशीं असा विचार करितो कीं ह्या भुतांच्या मदतीचा आपणास इतर कामीं उपयोग करतां येईल किंवा नाहीं ? त्यांच्या साहाय्यानें आपणास आपल्या शत्रूवर सूड उगवितां येईल किंवा नाहीं ? किंवा दुसरे कांहीं इष्ट हेतू साध्य करून घेतां येतील किंवा नाहीं ? त्यास वाटतें करतां येतील; आणि अशा रीतीनें जादूटोण्याची उत्पत्ति होते.

ह्या समजाचें एक मूळ स्वरूप काफर लोकांत दृष्टीस पडतें. त्यांची अशी समजूत आहे कीं, वाईट लोक मृतशवांस सजीव करितात, आणि आपल्या दुष्टकृत्यांत त्यांची मदत घेतात. ताहितियन लोकांस वाटतें कीं आजार आणि मृत्यू हीं मटांच्या मंत्रांनीं उत्पन्न होतात, कारण ते त्या मंत्रांनीं भुतांस आजाऱ्यांच्या शरीरांत प्रवेश करण्यास लावितात. आस्ट्रेलियन लोक समजतात कीं आपणांवर येणाऱ्या बहुतेक संकटांचें कारण आपले शत्रूंचे ताब्यांत भुतें असतात, हें होय. भूत आणि माणूस एकच ही

समजूत काफर लोकांत जी प्रत्यक्ष दिसते ती ह्या दोन लोकांत अप्रत्यक्ष दिसते. ज्यू लोक जादूटोणा करणाराचें लक्षण असें करीत कीं तो सर्व दिवस उपाशी राहून रात्रीं स्मशानांत जाऊन राहतो, अशासाठीं कीं भुतें आपल्यांत येऊन शिरावीं.

जादूगाराचा पहिला उद्देश जिवंत माणूस आपल्या कह्यांत आणावें हा असतो, व द्वितीय उद्देश मृत माणसांचे आत्मे किंवा दैविकशक्ती ह्यांस कह्यांत आणावें हा असतो; आणि त्यासाठीं तो काय करितो हें पाहणें मोठें मजेदार आहे.

पूर्वी एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं एकाद्या वस्तूचे गुणधर्म त्या वस्तूच्या सर्व भागांत असतात अशी रानटी माणसांची समजूत असते. ह्या समजावरून कांहीं विशिष्ट कृती उत्पन्न होतात. आस्ट्रेलियन लोक एकाद्या अर्भकाला मारिलें म्हणजे त्याचें मांस त्याच्या अगोदरच्या मुलास घालितात; अशासाठीं कीं त्याच्या अंगीं त्याची शक्ति यावी. इतर ठिकाणीं मृत आप्तांस ह्याच समजुतीवर खातात. उदाहरणार्थ, कुकामा लोक. तार्यांना व तुकानो लोक ह्याच उद्देशानें मृताची राख पाण्यांत कालवून पितात. आरावाक लोक मृतांच्या हाडांची पूड पाण्यांत कालवून पिणें म्हणजे त्यास अत्यन्त मोठा मान देणें म्हणून समजतात. वस्तूच्या आंगचे गुण तिची छाया किंवा नांव ह्यांच्याहि ठिकाणीं आलेले असतात असें रानटी लोक समजतात. म्हणून रानटी लोकांस त्यांचा फोटो घेणें आवडत नाहीं. कारण त्यांस वाटतें कीं आपल्या चित्राबरोबर आपल्या जीवाचा कांहीं

भाग निघून जात असावा; व तो दुसऱ्याच्या हातीं गेल्यानें तो आपल्यास पीडा देऊं शकेल. चिनूक व मापुंची ह्या लोकांची अशी समजूत दिसते. कित्येक रानटी लोक आपलें नांव देखील सांगण्यास भितात. त्यांस वाटतें आपलें नांव सांगितल्यास तें कोणी चोरून नेईल; उदाहरणार्थ, चिनूक लोक. ह्याच उद्देशानें डायाक लोक मुलें आजारीं पडलीं म्हणजे त्यांचीं नांवें वरचेवर बदलतात. ह्याच समजुतीमुळें कित्येक रानटी जाती मृताचें नांव घेण्यास भितात. त्यांस वाटतें तसें केल्यास त्यांच्या पिशाचास राग येईल; उदाहरणार्थ, तास्मेनियन लोक.

जादूटोणा करणाराच्या समजुती व कृती ह्यांचें ह्यावरून चांगलें स्पष्टीकरण होतें. सर्वत्र हे लोक ज्याच्यावर जादू करावयाची असेल त्याच्या शरीराचा कांहीं भाग, किंवा त्याच्या शरीराशीं निकट संबंध असलेली कांहीं वस्तू किंवा त्याचें चित्र हें प्रथम मिळवितात; आणि नंतर त्या भागास किंवा सबंद वस्तूस किंवा चित्रास कांहीं करितात, व तें त्या माणसास केल्यासारखें होतें म्हणून समजतात. पाटागोनियन लोकांची अशी समजूत आहे कीं एकाद्या माणसाचीं नखें किंवा केंस हातीं लागल्यास त्याजवर जादूगार जादू करूं शकतो. न्यूझीलंदर लोक ह्याच कारणासाठीं आपलीं नखें काढावयास भितात. आमजूलू लोकांस वाटतें कीं जादूगार लोक नखें, केंस, किंवा वापरलेला कपडा घेऊन त्यांत कांहीं औषधीं मिळवून गुप्त ठिकाणीं पुरितात. पेरू देशांतील जादूगार लोक रक्तावर जादू करितात; तानीस लोकांत उष्टच्या अन्नावर करितात; म्हणून ते तसलें अन्न पुरितात किंवा

समुद्रांत फेंकून देतात. चिपिवाज लोकांत जादूगार लांकडी आकृति बनवून तिच्या उरांत भोंक पाडून त्यांत कांहीं पूड भरितो.

आतां जादूच्या कामीं दैविक शक्तीचा उपयोग करण्याच्या प्रघाताचा विचार करतां पहिला प्रश्न असा उद्भवतो कीं हा प्रघात वरच्या प्रघातावरून उत्पन्न होतो कीं काय? याचें उत्तर होय म्हणून देण्यास आधार आहेत. जिवंत मनुष्य व मृत मनुष्य ह्यांच्यामध्यें रानटी लोकांस फारसा भेद दिसत नाहीं. ह्या गोष्टीचें स्मरण करितां दोघांवर एकाच प्रकारची जादू चालेल असें त्यांस वाटावें हें साहजिक दिसतें. मृत माणसास त्याच्या सर्व भागांची आवश्यकता असते असें त्यांस वाटतें हें अगोदर सांगितलेंच आहे. मेक्सिकन लोक मृताचीं हाडें पुनरुत्थापनाच्या वेळीं त्यास सहज सांपडतील अशा ठिकाणीं ठेवितात हें वर सांगितलेंच. पेरूमधील लोकांत ह्याच उद्देशानें त्याचीं नखें व केंस एके ठिकाणीं त्याच्यासाठीं राखून ठेवीत. ह्याच्यावरून असा गर्भितार्थ निघत नाहीं काय कीं ज्याच्या हातीं ह्या वस्तू लागतील त्याला त्यांच्या मालकास दुखापत करण्याचें सामर्थ्य येईल? होय असें उत्तर दिल्यास चेटकाचें महत्त्व ध्यानांत येतें. प्राचीन काळीं यूरोपांत मृतांचीं प्रेतें अरक्षित ठेवण्यास भीत, कीं न जाणों चेटकिणी त्यांस छिन्नभिन्न करतील आणि त्याच्या जादूटोण्यासाठीं त्यांतला उत्तम तो भाग काढून घेतील. सन १६०४ त इंग्लिश पार्लमेंतानें असा कायदा केला होता कीं चेटकासाठीं वगैरे जे प्रेतें उकरतील त्यांस देहान्त शिक्षा होईल. माणसाचें

नांव' त्याचाच भाग असतें ही मूळ कल्पना आणि भूतास नांवानें हांक मारिल्यास त्यास लागते, व कदाचित् राग येतो ही तज्जन्य कल्पना, ह्यांवरून भुतांस आव्हान करण्याची जी मंत्र्यांची पद्धति ती प्रथम उत्पन्न होते. " तिळा उघड " वगैरे गोष्टींवरून, नांवाची माहिती असल्यानें कसा फायदा होतो म्हणून समजतात हें स्पष्ट दिसतें. भुताची गोष्ट बोलला कीं तें आलेंच (Talk of the devil and he is sure to come) असें जें इंग्रजींत हल्लीं थट्टेनें म्हणतात त्याचें मूळ इंगित तेंच आहे.

सारांश मूळची जी पिशाचविषयक कल्पना त्या कल्पनेप्रमाणें जिवंत व मृत ह्यांच्यामध्यें फारसा भेद नसल्यामुळें अशी दुसरी कल्पना उत्पन्न होते कीं जिवंत माणसें ज्या युक्त्यांनीं वश होतात त्याच युक्त्यांनीं मृतहि वश होतात. म्हणून कांहीं विशेष माहिती मिळविण्यासाठीं मृतास आव्हान करण्याची चाल प्रथम उत्पन्न होते, आणि नंतर कोणास कांहीं इजा करण्यासाठीं भुतें उठविण्याची चाल सुरू होते.

१३४. भूत काढणें व जादूटोणा ह्यांस हळू हळू दैविक चमत्काराचें रूप येतें, पुढें त्यांत जो फरक राहतो तो चमत्कारांच्या संबंधानें रहात नाहीं, तर ते करणारांच्या संबंधानें राहतो. अद्भुत चमत्कार उपत्न्न करणारे दैविक कर्ते प्रेक्षकांचे जर शत्रु असतील तर त्या कलेस जादूटोणा म्हणतात, आणि जर मित्र असतील तर दैविक चमत्कार म्हणतात.

बेचुआनामधील लोक मिशनरी लोकांस पाऊस आणणारे म्हणून समजतात. झुलू लोकांत हवा उष्ण व

कोरडी असली म्हणजे त्यांचा पर्जन्यवैद्य म्हणतो, आतां आकाशाकडे पहा, म्हणजे पाऊस पडेल. पाऊस पडला तर लोक म्हणतात वैद्य चांगला आहे; न पडला तर ते त्याचा छळ आरंभितात, आणि म्हणतात ह्यानें पावसास बिथरविलें आहे.

१३९. या प्रकरणांत व गत प्रकरणांत वर्णिलेल्या चमत्कारांवरोबरच आणखी एक प्रकारचे चमत्कार उत्पन्न होतात; त्यांचें पुढच्या प्रकरणांत वर्णन करूं. तत्पूर्वी प्रस्तुत प्रकरणाचा एकदां गोषवारा सांगूं.

रानटी समज असा असतो कीं मृतांचीं भुतें जिवंतांच्या शरीरांत शिरून अपस्मार, वेड, इतर रोग आणि मृत्यु हीं उत्पन्न करितात, आणि हा समज वाढत चालला असतां ह्या मूळच्या दैविक शक्तींस अनेक प्रकारच्या दैविक शक्तींचें स्वरूप येतें. अंगांत येण्याच्या कल्पनेपासून उत्पन्न होणाऱ्या कांहीं समजांचा वर विचार केला आहे. अहितकारक दैविक शक्तींबरोबर हितकारक शक्तींची कल्पना उत्पन्न होते; आणि अद्भुत शक्ति, ज्ञान, व प्रेरणा हीं उत्पन्न व्हावीं एतदर्थ त्यांची लोक प्रार्थना करूं लागतात. नंतर मग भुतें अंगांत शिरतात ह्या कल्पनेवरून तीं काढतां येतील ही कल्पना उत्पन्न होते, व तीस पिशाच काढण्याची कला म्हणतात. नंतर मग त्यांस कह्यांत वागवून त्यांच्याकडून आपलें कार्य करून घेतां येईल ही कल्पना उत्पन्न होते, व तीस मंत्र तंत्र किंवा दैविक चमत्कार, कार्यशक्ति असें म्हणतात.

पण अशा रीतीनें मृतांचीं भुतें किंवा त्यांपासून उत्पन्न झालेले व निराळ्या वर्गांत घातलेले जे दैविक कर्ते

ते जर वैर असलें तर नुकसान करूं शकतात आणि सख्य असलें तर फायदा करूं शकतात, तर ते प्रसन्न होतील अशा रीतीनें त्यांच्याशीं वागणें हें शहाणपणाचें काम नव्हे काय? असा प्रश्न उत्पन्न होतो, व त्यास होय म्हणून उत्तर मिळतें. हीं भुतें किंवा हे आत्मे ह्यांच्या बुद्धि व अकला माणसाप्रमाणेंच असतात अशी कल्पना असल्यामुळें त्यांस टाळतां येईल किंवा फसवितां येईल असें रानट्यांस सहजच वाटूं लागतें; किंवा वर वर्णिलेल्या रीतीनें त्यांस हांकलतां येईल असेंहि वाटूं लागतें; किंवा उलट ते रागावले असल्यास थंड करतां येईल आणि मित्रभावानें वागत असल्यास प्रसन्न करतां येईल असेंहि वाटूं लागतें.

ह्या शेवटच्या विचारावरून एकंदर धर्मविषयक विधींची उत्पत्ति होते; म्हणून त्यांचा आतां आपणांस विचार कर्तव्य आहे. हा विचार करतांना कोणत्याहि विशिष्ट पंथाच्या कल्पना आणि क्रिया यांचें मूळ आणि वर वर्णिलेल्या निरनिराळ्या कल्पना व ह्या क्रिया यांचें मूळ हीं दोन्ही एकच असतात, व पहिल्या क्रिया व कल्पना दुसऱ्यांपासून हळू हळू भिन्न होत जातात असें आपणांस दिसून येईल.

प्रकरण एकोणिसावें

पवित्र स्थानें—देवळें, व यज्ञस्थळें; यज्ञ, उपवास, व संतर्पण; स्तुति, प्रार्थना इत्यादि

१३६. थडग्यावरील लेखांतून पहिले शब्द बहुधा हे असतातः—"अमक्या अमक्याच्या स्मरणासाठीं पवित्र" अशा रीतीनें थडग्यावर लादलेली पवित्रता मृताशीं निकट संबंध असलेल्या सर्वच वस्तूंस लावितात. प्रेत असलेल्या खोलींत पाय वाजवल्याशिवाय शिरतात, बोलावयाचें झालें तर हळू बोलतात; सारांश तेथील सर्व वर्तनांत एकप्रकारची भीति दृग्गोचर होत असते.

मृत, मृताचें स्थान, आणि मृतांच्या इतर वस्तू, यांच्या योगानें आपल्यामध्यें जो हा मनोविकार उत्पन्न होत असतो तो रानटयाच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या विकारांपेक्षां जरी कांहीं अंशीं निराळा असला, तरी स्वतः ते दोन्ही एकच आहेत. हाटेंटाट लोक जेथें कोणी मेलें असेल ती झोंपडी तशीच ठेवून जातात, व त्यांतील कोणत्याहि वस्तूस स्पर्श करीत नाहींत, डाकोटा लोक मृतांच्या आप्त्यांस फार भितात, इत्यादि वर्णनें वाचतां ह्या मनोविकारांत भीतीचाच अंश असतो ही गोष्ट ध्यानांत येते. मेलें असेल त्या खोलींत जावयाचें टाळणें आणि रात्रीं स्मशानांत जाण्यास तयार नसणें, ह्यासहि कारण एकप्रकारची कांहीं तरी भीति हेंच असतें. मृतापासून ज्या

कल्पनां उत्पन्न होतात त्या सर्वांस हा मनोविकार आपलें रूप देत असतो.

जेथें मृत असतील तें स्थान रानट्यांच्या मनांत भीतीचा विकार उत्पन्न करितें, तेथें ते भीत भीत जातात, व त्यास हळू हळू पवित्रता येते, ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. टोंगा बेटांत अत्यंत मोठ्या राजांचीं थडगीं पवित्र समजतात. न्यूझीलंडांतील राजा ज्या खेड्यांत पुरला असेल त्यांत जाण्यास कोणासहि परवानगी नसते. मेलेल्याच्या घराची ताहितियन लोक दुरुस्ती करीत नाहींत किंवा त्यांत रहात नाहींत. आशांटी लोक बाहामा शहर सोंवळें समजतात, कारण तेथें आशांटीचे राजे पुरलेले आहेत.

आपल्याला एथें लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं मृतानें उत्पन्न केलेली ही भीति वृद्धिंगत होतां होतां तीस धर्माच्या कामीं लागणाऱ्या वस्तूंनीं व स्थानांनीं उत्पन्न केलेल्या मनोविकृतींचें स्वरूप येत जातें. सांडविच बेटांत देऊळ व स्मशान एकच असतें असें जें कूक सांगतो त्यावरून हें त्या दोहोंचें साम्य ध्यानांत येतें; पण देवळें आणि यज्ञस्थळें यांची उत्पत्ति कशी होते ह्याची चवकशी करूं लागलें म्हणजे हा संबंध स्पष्ट ध्यानांत येतो.

१३७. गुहांतून राहणारे वेड्डा लोक परवांपर्यंत मेलेल्या माणसास मरेल तेथेंच टाकून जात असत; बार्काचे लोक दुसऱ्या कोणत्या तरी गुहेंत जात, आणि पहिली गुहा मृताच्या आत्म्यासाठीं राखून ठेवीत. बांगो लोक मृतांचे आत्मे असतील अशा संशयित गुहेंत कांहीं केल्या शिरावयाचे नाहींत. त्यांच्या दक्षिणचे लोक गुहा

ही देवाचें स्थान म्हणून पवित्र समजतात. सारांश, मृळ माणसें गुहांतून रहात व त्यांत मृतांस पुरीत ही गोष्ट ध्यानांत आणतां, तसेंच ते गुहांतून रहात नाहींसे झाल्यावर त्यांचा उपयोग स्मशानवत् करूं लागले ह्या गोष्टीचें स्मरण करतां, आणि शिवाय जेथें मृतांस पुरिलें असेल तेथें बळी नेण्याची सामान्य चाल आहे ही गोष्ट ध्यानांत आणतां, पवित्र गुहा किंवा गुहा देऊळ उत्पन्न कसें होतें ह्याचा उमज पडेल. ईजिप्त देशांतील गुहादेवळांची उत्पत्ति अशाच रीतीनें झाली आहे ही गोष्ट बरीच स्पष्ट आहे. जगाच्या अनेक भागांत पुष्कळ निसर्गजन्य गुहांच्या भिंतींवरून ओबडधोबड चित्रें रंगवलेलीं आढळतात, आणि ईजिप्तमधील ज्या ह्या कृत्रिम गुहा, ज्यांच्यांत राजांस पुरिलेलें आहे, त्यांच्याहि भिंतींवर असलीं चित्रें आहेतच. आणि राजांच्या राखून ठेविलेल्या शावांस नैवेद्य आणून देत असत ही गोष्ट जर गृहीत केली तर पवित्र स्मशानगुहेस गुहादेवळाचें स्वरूप आलें होतें असें अनुमान करावेंच लागतें. आणि ईजिप्त देशांत स्मशानें नाहींत अशीं गुहादेवळें आहेत हें ऐकिलें म्हणजे तीं त्यांपासूनच उत्पन्न झालीं असावीं असें मानणें भाग पडतें. कारण पूर्वीची कांहीं संवय नसतां खडक तोडून लोक एकाएकीं त्यांचीं देवळें करूं लागले ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं.

दुसऱ्या एका प्रकारचीं देवळें दुसऱ्या एक प्रकारच्या स्मशानभूमीवरून उत्पन्न झालेलीं आहेत. आरावाक लोक शव एका लहान होडींत घालतात आणि एका खोपटांत पुरितात. गायना लोक खोपटांत एक खळगा

खणितात आणि त्यांत प्रेत पुरितात. क्रीक लोकांत मृत रहात असेल त्याच घरांत त्यास पुरितात. आफ्रिकेंत अशींच चाल आहे. फान्टी लोक मृतास रहात्याच घरांत मूठमाती देतात. डाहोमन लोक, फुल्ला लोक, बागो लोक असेंच करितात. असल्या घराचें देऊळ बनणें ही गोष्ट तें घर टांकिलें आहे किंवा नाहीं या गोष्टीवर अवलंबून असते. एक दोन प्रेतें पुरल्यानंतर जेथें बाकीचीं माणसें घरांत तशींच रहातात तेथें त्यास देवळाचें स्वरूप येत नाहीं; पण ज्या ठिकाणीं मृताचें घर रिकामें टाकण्यांत येतें त्या ठिकाणीं तेथें मृताचें भूत वसत आहे अशी समजूत उत्पन्न होऊन त्या जाग्यावद्दल दरारा वाटूं लागतो; पुढें तेथें अन्न नेऊन ठेवूं लागतात, व दुसरे कांहीं विधी सुरू होतात, आणि अशा रीतीनें त्यास देवळाचें स्वरूप प्राप्त होऊं लागतें.

ज्या ठिकाणीं प्रेतें घरांत पुरण्याची चाल नसेल तेथें थडग्यांवर जें आच्छादन उभारितात तेंच पवित्र स्थानाचें बीज बनतें. न्यूगिनीमधील लोक असलीं आच्छादनें उभारीत असत. सुमात्रा व टोंगा एथेंहि असेंच करीत. एका ताहितियन राजाच्या प्रेतविधीचें वर्णन करतांना एलीस असें म्हणतो कीं मढ्यास वस्त्रें नेसवून बसविलें, आणि त्यास आच्छादिलेल्या स्थानीं नेऊन ठेविलें; त्याच्यापुढें एक लहानशी वेदी बांधिली, आणि तेथें आप्तलोक फळें, फुलें, अन्न वगैरे रोज नेऊन ठेवूं लागले. ह्या ठिकाणीं आच्छादित जागा हेंच पूजेचें स्थान बनलें ही गोष्ट स्पष्टच दिसते. पेरू देशांत तर ही गोष्ट जास्तच स्पष्टरीत्या दृष्टीस पडे; कारण तेथील इन्का (राजा)

नेल्ला म्हणजे त्याचें सर्व द्रव्य व उत्पन्न हीं त्यास पुरतील तेथें पूजेच्या खर्चाकडे लावून देत, आणि कित्येक प्रसंगांची नेमणूक त्याच्च कामावर स्वतंत्र होई.

मृतासाठीं मुद्दाम केलेल्या गृहापासून देवळाची उत्पत्ति होते ही गोष्ट केवळ रानटी लोकांतच दृष्टीस पडत नाहीं, तर वरच्या जातींतूनहि दृष्टीस पडते. उदाहरणार्थ डायोडोरस ईजिप्तमधील लोकांत थडगीं इतकीं उत्तम असून घरें इतकीं भिकार कां, याचें एक कारण असें देतो कीं, ते लोक जिवंतांच्या घरांस धर्मशाळा म्हणत, कारण ते म्हणत एथें आपणांस थोडेच दिवस रहावयाचें आहे, परंतु थडग्यांस तें नेहमींचीं वसतिस्थानें समजत.

ह्यानंतरच्या काळींहि देवळाची उत्पत्ति अशा रीतीनें झालेली आढळून येते. साहारा वाळवंटांतील पाणथळीच्या ठिकाणीं मुसलमान साधूंच्या थडग्यांवर लहान लहान देवळें बांधलेलीं आहेत, आणि त्या ठिकाणीं भाविक लोक यात्रेकरितां जातात, आणि नैवेद्य अर्पण करितात. रोमन क्याथलिक लोकांच्या मोठाल्या देवळांतून प्रसिद्ध माणसांच्या थडग्यांवर लहानसें देऊळ उभारलेलें आढळतेंच, आणि एकादा प्रसिद्ध माणूस जेथें पुरलेला असेल तेथें लोक भाविकपणानें जाऊं लागतात, आणि अशा रीतीनें त्याचें देऊळ बनण्याची तयारी होऊं लागते.

१३८. आतां देवळांत जी वेदी असते तिची उत्पत्ति कशी होते ह्याचा विचार करूं. ज्या ठिकाणीं प्रेतें प्लाटफार्म बांधून त्याच्यावर ठेवीत असतात, आणि त्याच्यावरच खाद्य वैगरे ठेवितात, तेथें वस्तुतः त्याच वेद्या बनतात, आणि देवतांच्या पूजेच्या वेद्या अशाच रीतीनें

उत्पन्न झालेल्या आहेत अशाबद्दल पुरावा सांपडतो. ताहिती बेटांत 'जेव्हां कुक गेला होता तेव्हां देवांचे नैवेद्य ठेवण्याच्या वेद्या प्रेतें ठेवण्याच्या छपऱ्यांसारख्याच होत्या; दोन्ही लहानसे प्लाटफार्म असून त्याला आधार पांच सात फूट उंचीच्या लांकडी खांबाचा असे. सांडविच बेटांत कुकचा एक खलाशी मेला त्याच्यापुढें अन्न नेऊन ठेवण्यासाठीं असलीच रचना केली होती. कोठें कोठें ही वेदी थडग्यावरच उभारितात; ती चुन्याची व दगडाची बनवितात, आणि तिची उंची हातभर असते; त्यावर ते धूप जाळतात आणि नैवेद्य वगैरे आणून ठेवितात. कांहीं ठिकाणीं वेदी थडग्याच्या नजीक बांधितात.

१३९. वेद्या म्हटल्या कीं यज्ञ किंवा बळी आलेच; आणि म्हणून आतां त्यांच्या उत्पत्तीचा विचार करूं. मृतास अन्नाचा पुरवटा करण्याची चाल सर्वत्र आहे, ह्याची उदाहरणें पूर्वी (क० ८४) दिलींच आहेत. त्यांत त्यांचे अनेक हेतू असतात. कालिफोर्नियांतील लोक आत्म्याच्या प्रवासासाठीं हा पुरवटा करितात. मेक्सिकोमधील कोराक लोक मृतानें आपलीं गुरें नेऊं नये म्हणून शेतांतूनं काठ्यांवरून कांहीं मांस टांगून ठेवितात. डामारा लोक मृतापुढें खाद्य व पेय आणून ठेवून त्यास मजा मारावयास सांगतात व त्याबद्दल त्याचा आशीर्वाद मागतात. शिवाय हीं खाद्यें वरचेवर ठेवीत असतात; कोठें कोठें मृत्यूनंतर थोडका काळपर्यंत, आणि कोठें कोठें पुष्कळ काळपर्यंत. क्यारेन लोकांत तर अशी समजूत आहे कीं, मृतांचे आत्मे नेहमीं आपल्या सभोंवतीं असतात, आणि म्हणून त्यांस नेहमीं निरनिराळ्या प्रकारचे नैवेद्य देऊन

संतुष्ट ठेविलें पाहिजे. ह्या एकंदर गोष्टींचा विचार करतां प्रेताला केलेल्या दानांस धर्मविषयक बळींचें स्वरूप कसें येत जातें हें ध्यानांत येतें.

नेहमींच्या या बळीव्यतिरिक्त दोघांसहि (मृतांस व देवतांस) सणासुणाच्या दिवशीं बळी देत असतात हीं गोष्ट ध्यानांत आणतां हें दोहोंमधील नातें जास्तच स्पष्ट होतें. नेहमीं बळी देणारे जे क्यारेन लोक वर सांगितले ते मृतांसाठीं दरवर्षीं भोजनें घालतात, आणि त्या ठिकाणीं भुतांस खावयास व प्यावयास आव्हान करितात. वोडो आणि ढिमाल लोक कापणीच्या घरांत मृत पितरांस एक कोंबडी व फळें अर्पण करितात. असल्या चाली जुन्या पेरुव्हियन लोकांप्रमाणें आधुनिक चिनी लोकांतहि आढळून येतात.

शिवाय योग्य प्रसंगीं योग्य बळी देण्याचीहि चाल आढळते. डायाक लोक स्मशानावरून जातेसमयीं मृतास आवडेल असें कांहीं टाकून जातात. हाटेंटाट लोकहि असेंच करितात, आणि भुतांची राखण मागतात. सामोआमध्यें भुतें झाडींतून भटकत असतात असें समजतात, म्हणून त्या वाजूस बरेंच दूर जावयाचें असल्यास त्यांस संतुष्ट ठेवण्यासाठीं इकडे तिकडे थोडेंसें अन्न टाकीत जातात. प्रत्येक जेवणाचा कांहीं भाग भुतांकरितां राखून ठेवणें ही ह्या प्रघाताची पुढची पायरी होय. फीजी बेटांत लोक कांहीं खावयास किंवा प्यावयास लागले म्हणजे त्यांतला कांहीं भाग फेंकून देतात आणि म्हणतात कीं हा आमच्यो मृत पूर्वजांकरितां होय. भिलांस दारू प्यावयास दिल्यास त्यांतील थोडीशी पितरांकरितां म्ह-

णून ते जमिनीवर ओतितात, आणि ज्याअर्थीं त्यांचे पितर हेच त्यांचे देव होत त्याअर्थीं ह्या चालीचा अर्थ स्पष्ट दिसतो. आराकेनियन आणि विझिंचर लोक असेंच करितात.

हे हवी देण्याचे हेतूहि ते लोक बरेंच वेळां स्पष्टपणें सांगत असतात. एका बेरोट्सीबद्दल लिंव्हिंगटन असें सांगतोः—तो म्हणाला, माझें कपाळ दुखतें ह्याचें कारण मला माहीत आहे; माझ्या बापास मी खातों त्यापैकीं कांहीं एक देत नाहीं म्हणून तो मला शिव्या देत आहे. मीं त्यास विचारिलें, तुझा बाप कोठें आहे? तो म्हणाला देवाकडे आहे.—काफिर लोक कांहीहि अनिष्ट गोष्ट घडली म्हणजे ती कोणत्या तरी भुतानें केली आहे म्हणून समजतात, आणि त्यास संतुष्ट करण्यासाठीं एकादें जनावर मारितात. आमाझुलू लोकांत हीच गोष्ट दृष्टीस पडते. ते म्हणतात, " रे भुतांनो, हें पहा तुम्हांला अन्न आणून ठेविलें आहे; अहो आमच्या टोळींतील सर्व भुतांनो, एकमेकांस निमंत्रण द्या. अमक्या अमक्या, हें अन्न घे असें मी म्हणत नाहीं; कारण तुम्ही मत्सरी आहां; पण अरे अमक्या अमक्या, जो तूं ह्या माणसास आजारी करीत आहेस तो तूं सर्व भुतांस बोलाव; तुम्ही सर्वजण हें अन्न खावयास या. "

सारांश, हेतु व पद्धति एकच असल्यामुळें मृताला खाद्य व पेय देण्याची जी ही चाल ती देवतेस खाद्य व पेय देण्याच्या चालीसारखीच आहे. उदाहरणार्थ, जेवणाचा कांहीं भाग द्यावयाचा, हें दोन्हीं ठिकाणीं सारखेंच आहे. कुक म्हणतो, सांडविच बेटांत भट लोक जेवावयास बसण्यापूर्वी कांहीं स्तोत्र म्हणतात, आणि नंतर

थोडेसें अन्न देवास देतात. भुतांच्या संबंधानेंहि असेंच करितात हें प्रसिद्धच आहे. विशिष्ट प्रसंगीं जे मोठाले बळी देतात तेहि दोन्ही ठिकाणीं सारखेच देतात. मृत पूर्वजांची लढाईंत मदत मिळावी म्हणून काफिर सरदार जसा बैल मारितो, तसा आगामेम्ननने बलवान् देव क्रोनियन यास पांच वर्षांचा बैल बळी दिला. आमाझुलू लोक पिकाच्या कापणीच्या वेळीं स्वप्नांत पितर कांहीं भाग मागतात असें पाहून त्यांस भोजन घालितात. तेव्हां त्यांचें तें करणें हंगामाच्या वेळचें नवें देवास अर्पण करण्यापासून निराळें नसतें. नियमित वेळीं देण्याच्या बळींच्या संबंधानेंहि असाच सारखेपणा दृष्टीस पडतो. मृतांचीं जशीं वार्षिक श्राद्धें करितात तसे देवांचे वार्षिक सण करितात.

बरें, खावयास देण्याच्या वस्तूहि दोन्ही ठिकाणीं सारख्याच दिसतात. कारण बैल, बकरे वगैरे जसे दोन्ही ठिकाणीं दिसतात, तशा पोळ्या भाकऱ्याहि दोन्ही ठिकाणीं आहेतच; तद्वत्च त्या त्या ठिकाणीं जें पेय तयार होत असेल तें देतात; धूप, फुलें इत्यादिहि दोन्ही ठिकाणीं असतातच. आफ्रिकन सरदार देवांपुढें तपकिरीची डबी पालथी करून जसें त्याचें सहाय्य अपेक्षितो, तसाच काफिर सरदारहि भुतांस जेवावयास बोलावून त्यास दारू व तपकीर हीं अर्पण करितोच. बरें, दोन्ही ठिकाणीं उद्देशहि एकच असतो; तो हा कीं देवांस संतुष्ट करावयाचें, तसेंच भुतांस संतुष्ट करावयाचें. शिवाय असें कीं, कांहीं ठिकाणीं देवांस व भुतांस दोघांसहि सारख्याच रीतीनें नैवेद्य अर्पण करण्याची चाल आहे. उदाहरणार्थ, इजिप्शान लोकांत असें करीत असत.

१४९. धर्मासाठीं म्हणून उपवास करण्याची जी चाल आहे तीहि उत्तरकार्यविधीपासूनच उत्पन्न झालेली आहे. मूळ माणसास अन्न न मिळाल्यामुळें पुष्कळ वेळां इच्छेविरुद्धहि उपास काढावे लागतात; आणि त्या वेळीं त्यास स्पष्ट स्वप्नें पडत असल्यामुळें, भुतांची गांठ घेण्यासाठीं तो मुद्दाम उपास काढूं लागतो. कधीं कधीं अंगांत येण्यासाठीं रानटी लोक उपास काढीत असतात. ह्याशिवाय, मृतासाठीं अन्नाचा फाजील पुरवठा केल्यामुळें-हि रानट्यास कधीं कधीं उपास पडत असतात. सहजच ह्या उपवासांस आदराचें चिन्ह असें स्वरूप येऊं लागलें, आणि शेवटीं तो धर्मविषयक विधि होऊन बसतो.

थडग्यांशीं पुष्कळ वेळां मालमत्तेचा, गुरांढोरांचा व अन्नाचा नाश होत असतो हें १०२ कलमांत आपल्या नजरेस आलेंच आहे. डायाक लोक असें केल्यानें वरचेवर अगदीं भिकेस लागतात. टोडा लोकांत अशीच स्थिति आहे ही गोष्ट ध्यानांत आणतां, आणि गोल्डकोस्टवर व डाहोमामध्यें मृताचे आप्त उपास करितात ही गोष्ट ध्यानांत आणतां, असा सिद्धांत सहजच निघतो कीं जी गोष्ट प्रथम निरुपायास्तव करीत असतात ती पुढें धर्मविधि म्हणून होऊन बसते. युकाटन लोकांत अशीच चाल होती, व इजिप्शन लोक त्यांचा राजा मेला म्हणजे सर्वच्या सर्व उपवास करीत.

मृतास रोज अन्नदान करण्याच्या चालीनें ह्या उपवासाच्या पद्धतीस बळकटी येते. रानट्यांस अन्न बेतानेंच मिळत असल्यामुळें त्यांतलें कांहीं पूर्वजांच्या भुतांस टाकल्यानें त्यांस जरा अर्धपोटीं रहावें लागतें. आतां

अशा रीतीनें मृतासाठीं उपवास करण्याच्या चालीस देवासाठीं उपास करण्याच्या चालीचें रूप कसें येतें हें "मावी व त्याचे भाऊ" ह्यांच्याबद्दल जी पॉलिनिश्यन लोकांत दंतकथा आहे, तिजवरून चांगलें व्यक्त होतें. एके दिवशीं मासे पुष्कळ मिळाल्यावर मावी भावांस म्हणतो, मी गेल्यावर धीरानें व धिमेपणानें रहा, मी परत येईपर्यंत जेवूं नका; आणि देवाला ह्या मेहेरबानीबद्दल नैवेद्य घालून मी येईपर्यंत मासे कापूं नका. गोष्टीचा पुढील भाग असा आहे कीं, भावांनीं हें न ऐकल्यामुळें त्यांच्यावर मोठा अनर्थापात कोसळला.

आतां अशा रीतीनें उत्पन्न झालेली उपवासपद्धति मूळ उद्देश विसरून गेल्यावर आत्मसंयमनादाखल शिल्लक रहावी असें पुष्कळ वेळां होतें. तथापि उपवास केल्यानें देव संतुष्ट होतो ही कल्पना अजीबाद नष्ट होत नाहीं.

१४१. उपवाससंबंधी हा जो जातां जातां विचार केला तो पुरा करून आतां स्मशानहवींस धार्मिक हवींचें रूप कसें येतें हें पाहूं.

प्रेत पुरतांना माणसांचे बळी देतात ते दोन हेतूंनीं देतात हें मागें सांगितलेंच; एक हेतु मृतास खाद्याचा पुरवठा करणें आणि दुसरा मृतास परलोकीं नोकरांचा पुरवठा करणें. मृताचें भूत जीवंतपणींच्या आवडी नावडी कायम राखीत असल्यामुळें नरमांसभक्षक रानट्यांमध्यें मृतास मनुष्य बळी देणें आवश्यकच समजतात. फीजीयन लोकांत मृताबरोबर जिवंत माणसें पुरीत, व त्यांच्या राजांस भेल्यावर देवांचें स्वरूप येऊन ते इतर देवांच्या सन्निध रहावयास जात, व तेथेंहि त्यांना नर-

बळी प्रिय असतच. ह्या उदाहरणांवरून एकंदर गोष्ट कशी बनत जाते हें स्पष्ट दिसतें. कारण ह्या ठिकाणीं नरभक्षक माणसें, नरभक्षक भुतें, नरभक्षक देवता, आणि धार्मिक विधी म्हणून नरबलिदान, ह्या सर्व गोष्टी अनुक्रमें दृष्टीस पडतात. जुन्या मेक्सिकन लोकांत हींच चाल होती. त्यांच्यांतील राजे लोक माणसें खात असून त्यांना पुरतेसमयीं गुलाम मारीत असत, व त्यांच्या देवांपुढें कैद्यांना मारीत असत, आणि नंतर हे गुलाम खाद्य म्हणून जरी मारीत नसत तरी प्रारंभीं तसा उद्देश असावा असें दिसतें; कारण देवापुढें जे कैदी मारीत त्यांचीं काळजें काढून देवांच्या तोंडांत घालीत, व त्यांच्या ओठांस रक्त फांशीत. खोंड लोकांची समजूत अशी आहे कीं, देवासाठीं मारलेला माणूस तो खातो. ताहितीयन लोक असें समजत कीं देव माणसांचे आत्मे खातात; म्हणून ते वरचेवर कत्तल करीत. टोंगन लोक आपलीं मुलेंच आपल्या देवांपुढें मारून ठेवीत, व ते देव म्हणजे देव बनलेले त्यांचे राजे होत. ह्या सर्व उदाहरणांवरून असें स्पष्ट दिसतें कीं थडग्याजवळ जे बळी देत त्यांचा मूळ उद्देश मृतास इतर अन्नाबरोबर नरमांसाचाहि पुरवठा करावा हा असे, आणि त्यापासून धर्मविधि म्हणून माणसें मारण्याची चाल नंतर उत्पन्न झाली. नोकर म्हणून जे लोक मारितात त्यांचीहि गोष्ट अशीच आहे. अमुधारलेल्या आणि अर्धवट सुधारलेल्या लोकांतून कैदी, गुलाम, बायका, इत्यादिकांस मृताच्या मागून जाण्यासाठीं मारण्याची चाल किती साधारण आहे हें १०४ कलमांत आपल्या नजरेस आलेंच आहे; आणि कांहीं

ठिकाणीं ही कत्तल एकदां करून रहात नाहींत. मेक्सिकन लोक मृतास पुरल्यानंतर पांचवे दिवशीं आणखी कांहीं गुलाम मारीत; आणि तसेंच विसाव्या, चाळिसाव्या, साठाव्या, आणि ८० व्या दिवशीं करीत. डेहामीमध्यें मृत राजास जिवंत राजाची हकीकत कळविण्यासाठीं जासूद म्हणून पाठविण्यासाठीं वरचेवर माणसें मारण्याची चाल असे. मृतांच्या भुतांस तृप्त करण्यासाठीं वरचेवर नरबळी देण्याची जी ही चाल तिलाच रानट्यांच्या धर्मांत देवांस वरचेवर बळी देण्याच्या चालीचें स्वरूप येत जातें ही गोष्ट ह्यावरून उघड दिसते.

८९ व्या कलमांत मृतांस रक्तदान करण्याचीं उदाहरणें सर्व जगांतून गोळा करून दिलीं होतीं. अशा प्रकारचीं दानें इतर कोणीं केल्यास जरी निरर्थक दिसतील तरी नरभक्षक लोकांनीं केल्यास तशीं दिसत नाहींत. कारण आस्ट्रेलियामध्यें सूड उगविण्यासाठीं माणसाचें मांस हिरवेंच खात असतात; फिजीयन सरदार टानोआ यानें एका आप्ताचा हात कापून काढिला; त्यांतलें रक्त तो प्याला, आणि तो शिजवून त्याच्या समक्ष खात्ला झाला. नरभक्षक व्हॅटियन लोक तीन तीन दिवस पुरून झालेलीं प्रेतें देखील उकरून शिजवून खातात; आणि पासिफिक स्टेट्समधील हैदा लोकांमध्यें तामीश किंवा अंगांत आलेला वैदू प्रथम दृष्टीस पडेल त्या माणसावर उडी घालितो, आणि दांतांस त्याच्या शरीराचा जो भाग लागेल त्याचा लचका तोडितो; अशा रीतीनें अनेक माणसांस तो जखमां करीत जातो; त्याच्याच शेजारच्या नुट्का लोकांतला वैदू असें न करतां केवळ प्रेतांवरच

झडप घालितो. ह्यावरून रानटी लोक आपल्या कल्पनेबाहेर भयंकर कृत्यें कशीं करितात हें स्पष्ट दिसतें; आणि मंतिकाचे वेळीं जें माणसांस मारीत तें मृताच्या भुताच्या संतुष्टयर्थच असलें पाहिजे. डाहोमन लोक लढाईत मृत राजाच्या भुताची मदत मिळण्यासाठीं तसें करीत; तेव्हां देवतांस माणसाचें रक्त अर्पण करण्याची चाल ह्यावरूनच उत्पन्न झाली असली पाहिजे. ह्या चालीच्या संबंधानें मेक्सिकन लोकांची गोष्ट मोठी नमुनेदार आहे. त्यांचे राजे नरमांस भक्षकापासून उत्पन्न झालेले होते; त्यांचे देवहि नरभक्षक असून त्यांना ते माणसांचीं काळिजें चारीत असत. असले बळी देऊन बरेच दिवस झाले म्हणजे त्यांचे उपाध्ये त्यांना सुचवीत कीं देवांची भुकेनें उपासमार चाललेली आहे. मग ते माणसें पकडण्यासाठीं लढाई करीत आणि देवांना नवें भक्ष्य आणून देत; अशा रीतीनें दरवर्षी हजारों माणसांचा संहार होई. ह्या ठिकाणीं हें सांगणें जरूर दिसतें कीं, रक्त मांसापासून निराळें करून दिलें जाई; तद्वतच इंदियन लोक आपल्याच कानाचें रक्त काढून देवास देत; आणि भट व इतर सभ्य गृहस्थ आपल्या पायांचें रक्त काढून त्यानें सर्व देवालय रंगवीत. हीब्रयू लोक व त्यांचे शेजारी ह्यांच्यामध्येंहि देवांस रक्तदान करण्याची रूढी असे.

प्रश्न एवढाच आहे कीं वशतेची खूण म्हणून ह्या चालीस कितपत स्वरूप आलें होतें? ८९ व्या कलमांत प्रेतविधि ह्या दृष्टीनें अंगास व्यंग करून घेण्याचीं पुष्कळ उदाहरणें दिलीं होतीं, व आणखी पुष्कळ देतां येण्यासारखीं आहेत. उत्तर अमेरिकेंतील नाटिओटेटिन

लोकांमध्यें जवळचा आप्त मेल्यास बायका कोताचा एक सांधा कापून टाकितात. सालिश सरदार मेला म्हणजे त्याच्यामागून गादीवर बसणारा सरदार व त्याची बायको एकमेकांच्या अंगाचें मांस कापून दुसऱ्या कांहीं मांसाबरोबर विस्तवांत टाकितात. ह्या प्रेतविषयक अंगव्यंगीकरणासारखींच धर्मविषयक व्यंगीकरणाचीं अमेरिकेंत इतरत्र उदाहरणें आढळतात. कांहीं मेक्सिकन लोक देवसंतुष्टचर्थ सुंता व सुंतेपेक्षांहि जास्त भयंकर जखमा करून घेत. ग्वांकाव्हिल्का नांवाचे पेरू देशांतील लोक आपल्या मुलांच्या प्रत्येक जबड्यांतील तीन तीन दांत काढून देवांस अर्पण करीत, व ते त्यांस फार आवडतात म्हणून समजत. इकडे सांडविच बेटांत मुख्य नाईक मेला म्हणजे त्याचे मर्तिकाचे वेळीं सर्व लोक एकेक दांत पाडून घेत हें मागें सांगितलेंच आहे.

मर्तिकाचे समयीं रानट्यांमध्यें केंशकर्तनाची चाल अगदीं सामान्य आहे. त्याचीं उदाहरणें पुष्कळ दिलीं आहेत; आणि ही धर्मरूढी म्हणूनहि दृष्टीस पडते. सांडविच बेटांत १८०३ सालीं ज्वालामुखी सुरू झाला, तेव्हां देवांस संतुष्ट करण्यास अनेक प्रकारचीं दानें केलीं पण फुकट; तेव्हां शेवटीं तेथील राजा टामाहानेहा ह्यानें आपले कांहीं केंस कापिले, आणि तें अति मोलवान दान म्हणून लोंढ्यांत फेंकून दिलें. पेरूव्हियन लोक पूजेदाखल केशदान करीत असत. पापण्यांचे केंस ते देवास अर्पण करीत. मध्य अमेरिकेंत प्राचीन काळीं केशदान हा विवाहविधीचा एक भाग असे. ग्रीक लोकांत देखील अशीच चाल असे. विवाहसमयीं वधू आफ्रेडाइट देवतेस

कैसांचा एक झुबका अर्पण करी. सारांश, मनुष्य बळी देण्याचे कामीं, रक्तदान करण्याचे कामीं, आणि अवयवदान व केशदान करण्याचे कामीं, प्रेतविधि व धर्मविधि ह्यांमध्यें पुष्कळ साम्य आढळून येतें.

१४२. ह्या अदृश्य भूतांची मर्जी संपादन करण्याचा आणखी कांहीं मार्ग नाहीं काय? जिवंत असतां त्यांच्या आसांस स्तुतीपासून आनंद होत असे; म्हणून हल्लीं जरी ते अदृश्य आहेत तरी त्यांस ऐकूं जाईल इतके जवळ ते वरचेवर असल्यामुळें आतांहि त्यांस स्तुतीपासून आनंद झालाच पाहिजे. ह्या मुद्यावर आणखी कांहीं विधींची उत्पत्ति होते.

तुपी लोक मर्तिकभोजनाच्या वेळीं मृतस्तुत्यर्थ गाणीं गात असत. कालिफोर्नियन लोकांत मृताची स्तुति करण्याचें काम उपाध्याकडे सोंपविलेलें असतें. चिपिवाज लोक मृताच्या थडग्यापाशीं एक खांब पुरतात, व त्याजवर त्यानें लढाया जिंकल्या असतील व डोकीं कापिलीं असतील त्यांची संख्या दर्शविणाऱ्या कांहीं खुणा करून ठेवितात. अर्धवट सुधारलेल्या अमेरिकन लोकांत ह्या स्तुत्यांस जास्तच संकीर्ण स्वरूप आलेलें होतें. सान्साल्व्हेडारमध्यें मृताच्या कृती आणि वंशावळी ह्यांचें वर्णन चार दिवस व रात्रीं करीत रहात असत. प्राचीन पेरूव्हियन लोकांत मृत नायकाचे गुण वर्णन करीत गांवांतून फिरत. ताहितीमध्यें भाटांनीं तयार केलेलीं स्तुतिपर गाणीं मृताच्या कुटुंबाच्या समाधानार्थ गाण्याची चाल असे. आफ्रिकेंतहि तीच चाल दृष्टीस पडते. मांडिं-

गो लोक मृतास पुरतेवेळीं त्याची प्रशंसा करितात, आणि प्राचीन ईजिप्शन लोकांत ही चाल त्यांच्या समाजस्थितीच्या मानानें बरीच वृद्धिंगत झालेली होती. ते लोक मृताची प्रशंसा करण्याकरितां भाड्यानें रडवय्ये आणीत; आणि एकादा मोठा माणूस वारला म्हणजे त्याचे मर्तिकाचे वेळीं उपाध्या जेव्हां त्याचा स्तुतिपाठ गाई तेव्हां सभोंवतालचे लोक त्यास हुकार देत.

पुष्कळ ठिकाणीं हें स्तुतिकरण प्रेतविधीबरोबर संपत नाहीं. ब्राझीलमधील इंडियन लोक मृताच्या थडग्याजवळ जातांना प्रत्येक वेळीं त्याची स्तुति गात असतात. पेरू देशांत मृत इंकाचे लढाईंतील पराक्रम तो मेल्यावर एक महिनाभर सतत मोठ्यानें गात, आणि नंतर वर्षभर प्रत्येक पंधरवड्यास तसें करीत. शिवाय त्याचे पराक्रमांचीं कवनें करून मोठ्या सणाच्या दिवशीं तीं गाण्यासाठीं भाट लोकांची नेमणूक करीत.

ह्यामधील हेतू व धर्मविषयक हेतू हे सारखेच दिसतात. आमाझुलू लोक ह्या स्तुती उघड उघड संकट टाळण्यासाठीं किंवा प्रसन्नता करून घेण्यासाठींच करीत असतात. आपल्या भावाच्या रागावलेल्या भुताच्या शिव्यांस उत्तर म्हणून एक झुलू म्हणतो, मी तुला हांक मारीत असतोंच, आणि तुझ्या स्तुतिपर नांवांनीं तुझी प्रशंसा करण्यास कधीं विसरत नाहीं. तसेंच गांवांत रोगशिरला म्हणजे वडील मुलगा बापानें लढाईंत मिळविलेलीं नांवें घेऊन त्याला स्तवितो, आणि त्याबरोबर इतर सर्व आमाटोंगोंची (पूर्वजांच्या भुतांची) प्रशंसा करितो. शिवाय हीं भुतें स्तुतीच्या कामांत मोठीं मत्सरी अस-

तात, भलत्याची स्तुति केलेली त्यांस खपत नाहीं. म्हणून आजार उत्पन्न झाल्यास कोणत्या भुतानें तो आणिला आहे हें जोशाकडून प्रथम ठरवितात, आणि नंतर त्याचीच तेवढी स्तुति करितात.

सारांश, प्रेतविधि म्हणून ह्या मृतप्रशंसेस सुरवात होऊन तीस कांहीं दिवस होणाऱ्या स्तुतीचें रूप नंतर येतें, नंतर तीस विशिष्ट प्रसंगीं होणाऱ्या स्तुतीचें रूप येतें, आणि शेवटीं धर्मविषयक स्तुतीचें येतें. शिवाय ह्या दोन्ही प्रकारच्या स्तुतींमध्यें दैविक भुतें तिची मागणी करितात, हें साम्य आहेच; महत्कृत्याचें कथन दोहोंमध्येंहि असतें हें दुसरें साम्य आहे, आणि दोहोंचाहि उद्देश फायदा करून घेणें किंवा नुकसान टाळणें हा असतो हें तिसरें साम्य आहे.

१४३. आणखी एक साम्य दोहोंमध्यें दृष्टीस पडतें. मृतांच्या स्तुतीबरोबर त्यांच्या प्रार्थनाहि होऊं लागतात. वांबिरी लोक मृत नायकांच्या व आप्तांच्या प्रार्थना करितात. मध्य आफ्रिकेंत विपत्तीच्या वेळीं लोक रानांत जाऊन मृताच्या आत्म्यास हाका मारूं लागतात. आमाझुलू लोक हविर्दानाबरोबर प्रार्थनाहि करितात. वेड्डा लोकांची अशी समजूत आहे कीं आपल्या वाडवडिलांचे आणि आपल्या मुलांचे आत्मे आपली राखण करीत असतात. ते त्यांच्या नांवानें हाका मारून म्हणतात, या आणि हें खा. जिवंत असतां तुम्हीं जसा आमचा प्रतिपाळ केला तसा आतांहि करा. एकादा डाकोटा पारधीस निघाला म्हणजे अशी प्रार्थना करितो:—भुतांनो किंवा आत्म्यांनो, मजवर दया करा, आणि मला हरिण सांप-

डेल ती जागा दाखवा. व्हाटिअम लोक पूर्वजांच्या आत्म्यास पेयाचा पेला अर्पण करून आरोग्य आणि संपत्ति हीं त्यांजपाशीं मागतात, आणि शेजारचेच टानीज लोक आपल्या मृत व देवभूत नायकांस पहिलें पीक अर्पण करून मोठ्यानें प्रार्थितात:—दयाळू बापा, हें तुझ्यासाठीं खाद्य ठेविलें आहे, हें खा,व त्याबद्दल आमच्यावर दया कर.

आतां जसजशी सुधारणा होत जाईल तसतसा प्रार्थनांच्या स्वरूपांत बदल होत जातो, कारण तद्विषयक कल्पनांतहि बदल होत असतो. हीब्रयू भविष्यवादी आलीकडच्या आलीकडच्या आपल्या देवास हविर्भागाचा गंध आवडत नाहीं असें वर्णन करितात. सारांश, भौतिक सुखप्राप्त्यर्थ भौतिक बळी देण्याची जी स्थूल कल्पना तिच्या पलीकडे ते गेलेले दिसतात. पण अर्धवट सुधारलेल्यांची एतद्विषयक कल्पना जरी रानट्यांच्या कल्पनेहून बाह्यस्वरूपतः भिन्न असली तरी तत्त्वतः त्या दोन्ही एकच आहेत. रानटी माणूस मृत पूर्वजास स्वसंरक्षणासाठीं खाद्य अर्पण करितों तर अर्धवट सुधारलेला माणूस लढाईत जय आल्यास देवीस देऊळ बांधीन म्हणून म्हणतो.

१४४. मर्तिकविधि आणि धर्मविषयकविधि ह्यांजमध्यें आणखी कांहीं साम्यें आहेत त्यांचें आतां दिग्दर्शन करूं.

ईस्ट आफ्रिकन लोकांची अशी समजूत आहे कीं मागें राहिलेले काय करीत आहेत हें मृतांच्या आत्म्यांस समजत असतें, आणि त्यांचीं करणीं चांगलीं वाईट असतील त्या मानानें ते संतुष्ट किंवा रुष्ट होत असतात. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोक मर्तिकाचे वेळीं रडत अ-

सतां मृतांच्या आत्म्यांस असें आश्वासन देत असतात कीं आह्मी चांगल्या रीतीनें वागूं. सारांश, सुधारलेल्या लोकांत जसें देवाच्या रागास भितात तसें असुधारलेल्या लोकांत पूर्वजांच्या भुताच्या रागास भितात; आणि एकाच उद्देशानें त्यांच्या पसंतीची अपेक्षा करितात.

पिशाच रागावलें असतां पश्चात्ताप वाटल्याचाहि पुरावा सांपडतो. टर्कोमन लोकांबद्दल व्हाम्बरी असें सांगतो कीं मृत बापापुढें किंवा पूर्वजापुढें आरोप आणणें ही ते लोक सर्वांत मोठी शिक्षा समजतात. ही गोष्ट थडग्यावर भाला पुरून ते करितात. ओराझ ह्या टर्कोमन माणसानें एकाचा घोडा चोरून नेला होता. तो आपल्या आजाच्या थडग्यावर भाला पुरलेला पाहून लागलाच त्यानें दुसऱ्या रात्रीं मालकाच्या तंबूंत मुकाट्यानें नेऊन बांधिला.

मृताच्या सोईसाठीं थडग्यापाशीं विस्तव पेटवणें हीहि चाल बरेच ठिकाणीं दृष्टीस पडते; आणि हा विस्तव बरेच दिवस जिवंत ठेवितात किंवा पुनः पुनः पेटवितात. इजिप्शन लोकांच्या थडग्यांत दिवे लावून ठेवीत, आणि रोमन लोकांच्या थडग्यांत ठेवीत, ही गोष्ट ध्यानांत आणतां देवळांत नंदादीप लावून ठेवणें ही रूढी मृतापाशीं दिवा लावून ठेवणें ह्या चालीपासून कशी उत्पन्न झाली असावी हें स्पष्ट दिसतें.

मर्तिकाचे वेळीं अर्थात् दुःखाचे उद्गार निघत असतात, व त्यास मर्तिकविधींचें स्वरूप येतें. तें इतकें कीं सुधारलेल्या समाजांत कधीं कधीं भाडोत्री रडवय्ये लावतात. प्राचीन इजिप्शन लोकांत अशी चाल होती, आणि

त्यांच्यांत मृतासाठीं रडणें हा एक धर्माविधि देखील होता. वर्षांतून एकदां इसिस देवतेपुढें ते पाहिलें पीक नेऊन ठेवीत आणि रडत. बुसिरिस एथें वार्षिक उत्सवाचे समयीं भक्तमंडळ उपवास करून व सुतकाचे पोषाक चढवून अग्नींत टाकलेल्या हवीसभोंवते दुःखोद्गार काढीत आणि प्रदक्षिणा करीत, व ते उद्गार आसिरिसच्या मरणासंबंधानें असत.

रानटी लोकांस स्वतःचें नांव सांगणें आवडत नाहीं, कारण तसें केल्यानें ज्याला नांव सांगितलें त्याच्या तावडयात आपण जाऊ अस त्यास वाटत. त्याप्रमाणच मृताचें नांव घेण्यासहि ते भितात, कारण तसें केल्यानें त्यांस राग येतो असें ते समजतात. कांहीं रानट्यांत देवांचीं नांवें घेणें हें देखील मोठें पाप समजलें जातें. चिनी लोक देवाचें उगीच नांव घेणें हें गैर समजतात, आणि घेण्याचीच पाळी आली तर त्याच्या वसतिस्थानाचें म्हणजे स्वर्गाचें नांव घेतात. हीब्रचू लोकांत हीच समजूत होती. हिरोडोटस या ग्रीक ग्रंथकारानें आसिरिसचें नांव घेण्याचें काळजीपूर्वक टाळिलें आहे.

काफिर देशांत राजाचें थडगें म्हणजे आश्रयस्थान समजलें जातें; आणि टोंगा बेटांत राजांचीं थडगीं इतकीं पवित्र मानिलीं जातात कीं शत्रूंची तेथें गांठ पडल्यास त्यांनीं एकमेकांस मित्र समजावें अशी समजूत आहे. गोल्डकोस्टवर पळालेले गुलाम देवळांत शिरल्यास त्यांस कोणीं पकडावयाचें नाहीं.

नासामोनियन लोकांमधील शपथेसंबंधानें हिरोडोटस म्हणतो कीं मनुष्य शपथ घेऊं लागला म्हणजे चांगला

व खरा म्हणून जो प्रसिद्ध मृत राजा असेल त्याच्या थडग्यावर हात ठेवितो, आणि त्याच्या नांवानें शपथ घेतो. सुमात्रामध्यें शपथ घालण्यास अति पवित्रस्थान म्हटलें म्हणजे पूर्वजांची स्मशानभूमि होय. यूरोपांत प्राचीनकाळीं साधूंच्या थडग्यांवर हात ठेवून शपथ घेत असत.

मृताकरितां अन्न नेऊन ठेवण्यासाठीं, किंवा त्याचा स्तुतिपाठ करण्यासाठीं अथवा मदत मागण्यासाठीं त्याच्या थडग्यापाशीं जाणें म्हणजे अल्प स्वल्प प्रवास आलाच, आणि थडगें जर दूर असलें तर तीच यात्रा बनते. यात्रेची उत्पत्ति अशीच होते याबद्दल व्हाम्बेरी असा पुरावा देतो कीं, टर्कोमन लोकांच्या कांहीं लुटारू जातींत त्यांच्यापैकीं एकादा लुटारूपणाच्या कामांत मारला गेला म्हणजे त्याला ते मोठ्या कामाला बळी पडलेला म्हणून समजतात, आणि त्याच्या थडग्याला शृंगारून तें पवित्रस्थान समजून तेथें यात्रा करूं लागतात, आणि पश्चात्तापाचे अश्रू ढाळून त्या साधु बनलेल्या चोराची मदत मागतात. अशा रीतीनें यात्रास्थानांची उत्पत्ति होते.

कांहीं ठिकाणीं मृताच्या शरीराचे कांहीं भाग मागें राहिलेले लोक खातात; त्यांत त्यांचा उद्देश त्याचे चांगले गुण आपले अंगीं यावे हा असतो; आणि तेणेंकरून मृताला मान दिल्यासारखा होतो असेंहि कोठें कोठें समजतात. कांहीं नीग्रो लोक असें समजतात कीं देवाला वाहिलेलें अन्न खाल्यानें प्याल्यानें स्वतः देवासच खाल्यासारखें व प्याल्यासारखें होतें व हा देव म्हणजे कोणी मृत पूर्वज असतो. कांहीं ठिकाणीं त्याच समजुतीवर

देवाच्या अन्नाच्या प्रतिमा करून त्या खातात. अशा रीतीनें जो मर्तिकविधि म्हणून सुरू होतो त्यास धार्मिक विधीचें स्वरूप येतें.

१४५. एवंच गत प्रकरणाच्या शेवटीं जें म्हटलें त्याबद्दल हवा तितका पुष्कळ व हवा तितका विविध पुरावा सांपडतो. त्या ठिकाणीं असें सांगितलें होतें कीं, मृतांचे आत्मे कधीं कधीं उपकारक, पण बहुशः अपकारक असे समजले जात असून, त्यांच्याशीं निरनिराळ्या तऱ्हेचा व्यवहार करतां येईल, म्हणजे त्यांस फसवितां येईल, त्यांच्याशीं विरोध करतां येईल, त्यांना हांकलून लावतां येईल, किंवा ते सुप्रसन्न होतील व त्यांचा राग निवेल अशा रीतीनें त्यांच्याशीं वागतां येईल, असें रानटी लोक समजत असतात. आणखी असें विधान केलें होतें कीं धर्मविषयक एकंदर विधी जे उत्पन्न होतात ते ह्या शेवटच्या हेतूवरून उत्पन्न होतात. ते कसे होतात तें आतां आपल्या नजरेस आलें आहे.

मूळची पवित्रभूमि म्हटली म्हणजे जेथें मृत पुरलेले असतात आणि जेथें भुतें वरचेवर येतात म्हणून समजतात ती होय. आच्छादलेली गुहा किंवा घर किंवा दुसरी एकादी मृताची खोली हीच पवित्र खोली किंवा देवालय बनतें; आणि ज्याच्यावर मृतास अर्पण केलेले नैवेद्य ठेवितात ती वेदी बनते. मृतासाठीं नेऊन ठेविलेल्या खाद्य, पेय व इतर वस्तू ह्यांनाच देवांना दिलेल्या खाद्यांचें व पेयांचें स्वरूप येतें; आणि माणसाचे बळी, रक्ताचीं दानें, व्यंगीकरणें, केशकर्तन हीं जीं प्रथम थडग्यापाशीं होत असतात तीं पुढें मूर्तीपुढें होऊं लागतात,

आणि देवावर निष्ठा असल्याची साक्ष असें त्यांस स्वरूप येतें. मर्तिकविधि म्हणून होणारीं उपोषणें धार्मिकविधि म्हणून होऊं लागतात; आणि रुदनें दोन्ही स्वरूपीं होऊं लागतात. मृतास पुरतेसमयीं व नंतर कांहीं दिवसपर्यंत किंवा कांहीं कांहीं काळानें गाइलेल्या मृतांच्या स्तुतींस धार्मिक पूजेचें स्वरूप येऊं लागतें; आणि साहाय्यासाठीं, अशीर्वादासाठीं, व संरक्षणासाठीं केलेल्या मृतप्रार्थनांस त्याच हेतूनीं केलेल्या देवप्रार्थनांचें रूप येतें. देव जसे पृथ्वीवर सांथी पाठवितात तशींच पूर्वजांचीं भुतें रोग उत्पन्न करितात असें कल्पून त्यांना विशिष्ट बळी देऊन संतोषविलें जातें. असें करण्यांत देवांच्या व भुतांच्या हेतूंबद्दल कल्पना एकच असल्यामुळें त्यांना संतुष्ट करण्याच्या पद्धतीहि एकच असतात. देव व भूतें ह्यांच्या संबंधानें आणखीहि साम्य दिसून येतें. देव जशी माणसाच्या वर्तनावर नजर ठेवितात तशीच भुतेंहि ठेवितात; म्हणून देवांनाहि चांगल्या रीतीनें वागण्याबद्दल वचनें देण्यांत येतात; आणि देवांहि पुढें पश्चात्तापप्रदर्शन केलें जातें. देवांच्या आज्ञा जशा पढल्या जातात तशाच भुतांच्याहि पढल्या जातात. देवांपुढें जसा अग्नि ठेवितात तसाच थडग्यापुढेंहि ठेवितात. कधीं कधीं देवळाप्रमाणें थडग्यांतूनहि आश्रय घेतात. देवाला साक्षी ठेवून जशी शपथ वाहतात तशीच प्रसिद्ध माणसाच्या पिशाचासहि साक्षी ठेवून शपथ घेतात. जसें कधीं कधीं देवाचें नांव गुप्त ठेवितात तसेंच मृताचेंहि ठेवितात. कल्पिलेल्या दैविक पुरुषांच्या थडग्यांना जशा यात्रा करितात तशा आप्तांच्या व एकाद्या कार्याकरितां बळी पडलेल्यांच्या

थडग्यांना यात्रा करितात. कांहीं विधी करून देवाचे गुण अंगीं आणण्याबद्दल जशी खटपट करितात, तशीच मृतांचे संबंधानेंहि करितात.

तर मग, मर्तिकविधि आणि देवविधि ह्यांच्यामध्यें जीं इतकीं प्रचुर व इतकीं विविध साद्दश्यें दृष्टीस पडतात तीं जन्यजनक संबंधाशिवाय उत्पन्न झालीं असतील काय ? अशी कल्पना करा कीं ह्या दोन प्रकारच्या विधींचा कांहीं एक परस्परसंबंध नाहीं, आणखी अशी कल्पना करा कीं मूळ लोकांना त्यांची व इतर वस्तूंची उत्पत्ति करणाऱ्या विश्वशक्तीची कल्पना होती. अस जर असल तर आपल्यापका काणा मृत झाल्यास त्याला जे तो विधी करीत तसलाच ते त्या महाशक्तीला करीत ही गोष्ट संभवते काय ? आणखी एका विधीच्या संबंधानें जर हें साद्दश्य संभवत नाहीं, तर दोहोंच्या संबंधानें किती संभवेल ? आणि चारांच्या संबंधानें किती संभवेल ? आणि वर निरूपिलेल्या पंचवीस गोष्टींच्या संबंधानें किती संभवेल ? ह्या दोन प्रकारच्या विधींमध्यें जर कार्यकारण संबंध नसेल तर अशा प्रकारचें अनेकविध साद्दश्य असण्याचा संभव बहुतेक एक विरुद्ध अनंत इतका अत्यल्प असला पाहिजे.

पण हे दोन प्रकारचे विधी जर एकाच मुळांतून निघालेले असतील, तर ते एकाच काळीं व एकाच स्थळीं दृष्टीस कसे पडतात, व त्यांच्यामध्यें संकीर्णतेच्या संबंधानें तेवढा भेद कसा उत्पन्न होतो हें स्पष्ट होतें; एरवीं होत नाहीं. ईजिप्त देशांत प्रथम मर्तिकाचेसमयीं आणि नंतर थडग्यापाशीं देवांप्रमाणेंच मृतांच्या स्तुती गात असत,

व त्यांना बळीहि अर्पीत असत. मेक्सिकोमध्यें दररोज देवाप्रमाणें मृतांनाहि खाद्यें व पेयें अर्पीत असत. त्यांच्यासाठीं नोकर मारीत असत, व त्याला फुलें वहात असत; आणि देवांच्या मूर्तीप्रमाणें मृतांच्याहिं मूर्तींची पूजा करीत, व स्तुति करीत असत. पेरूव्हिअन लोक रक्ताचें थडग्यावर सिंचन करीत, व देवांसहि देत असत; ते मृत राजांना माणसें मारून बळी देत व देवांनाहि देत; मृतासाठीं आपलें केंस कापून टाकीत, व सूर्यास अर्पण करीत; देवांच्या जशा स्तुती व प्रार्थना करीत तशा राखून ठेविलेल्या प्रेतांच्याहि करीत; आणि एकाप्रमाणें दुसऱ्यासहि अभिवंदन करीत. पूर्वज म्हणून समजलेला बाप आणि देव म्हणून समजलेला बाप ह्या दोहोंमध्यें जर संबंध नसेल, तर एकसमयावच्छेदंकरून होत असणारे जे हे विधी त्यांच्यांतील सारखेपणाचें स्पष्टीकरण मुळींच होत नाहीं.

इतकेंच नाहीं. धर्मविधी जर प्रेतविधींपासून उत्पन्न झालेले नसतील तर उघड उघड असे जे वेडेपणाचे विधी ते कसे उत्पन्न झाले हें सांगणें दुरापास्त होईल. उदाहरणार्थ, रक्तानें भरून दगडाचा पेला सूर्यास अर्पण केल्यास तो संतुष्ट होईल असें मेक्सिकन लोकांस वाटलें तरी कसें? किंवा धूप जाळल्यानें सूर्य संतोषेल असें इजिप्शन लोकांस कसें वाटलें? आपल्या पापण्यांचे केंस काढून सूर्याकडे फुंकले म्हणजे तो प्रसन्न होतो असें पेरुव्हिअन लोकांच्या मनांत तरी आलें कसें? किंवा समुद्रावर तसेच केंस फेंकिले म्हणजे तो शांत होईल असें तरी त्यांस वाटलें कसें? सांताळ लोक "मोठ्या पर्वताला" ज-

नावरें, फुलें आणि फळें जीं अर्पण करितात ती कल्पना त्यांच्या डोक्यांत कोठून आली ? किंवा इजिप्शन लोक जे मांस, भाकर, दारू व धूप आपल्या ममीपुढें (सुकवून ठेविलेल्या प्रेतापुढें) ठेवीत त्याच जिनसा आपल्या जेहावेपुढें (देवापुढें) ठेवण्याचें हीब्रयू लोकांस कसें सुचलें ? माणसें उगीच मूर्खपणानें कांहीं तरी कृती करितात असें कांहीं म्हणतां येत नाहीं. पण मृतांना संतुष्ट करण्यापासून देवांना संतुष्ट करण्याचे हे विधी उत्पन्न झाले असें जर म्हटलें तर त्यांची उपपत्ति योग्य लागते.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां धर्मविधी कसे उत्पन्न झाले असतील ह्याबद्दल मुळींच शंका रहात नाहीं; मृतांच्या विधींची वाढ होतां होतां त्यांस मृतांच्या पूजेचें स्वरूप आलें, आणि अखेरीस देवतांच्या पूजेचें आलें, ही गोष्ट स्पष्ट दिसते. यापुढें आपल्यास असें दिसून येईल कीं आणखी कांहीं गोष्टींचा आणखी कांहीं तऱ्हांनीं विचार करतां हीच गोष्ट जास्त स्पष्ट होते.

प्रकरण विसावें
पितृपूजा

१४६. जगाच्या निरनिराळ्या भागांतून निरनिराळ्या राष्ट्रांतील व निरनिराळ्या धर्मांचे लोक असा पुरावा आणिनात कीं असे लोक जगाच्या पाठीवर आहेत कीं ज्यांना दैविक भूतांबद्दल मुळींच कल्पना नाहीं, किंवा ज्यांच्या तद्विषयक कल्पना अत्यन्त अस्पष्ट आहेत. " डोलोरिस या ठिकाणीं फादर ज्युनिपेरो सेरा यानें जेव्हां आपल्या मिशनाची स्थापना केली तेव्हां सॅन्फ्रान्सिस्कोच्या उपसागराच्या किनाऱ्यावर आश्वांटी, ओहलोनो, आल्टेमो, रोमेनॉन्, टुलोमो, वगैरे जातींच्या लोकांची दाट वस्ती होती. फादरबुवाला हें क्षेत्र अगदीं मोकळें सांपडलें होतें, कारण ह्या लोकांच्या भाषांत, देव किंवा भूत किंवा देवदूत यांना मुळींच शब्द नव्हते, आणि जगाचा आदि व अंत ह्याबद्दल त्यांची कांहीं कल्पना नव्हती. " दक्षिण अमेरिकेंतील लोकांबद्दल स्प्यानिश लोक असेंच सांगतात. गासिलासो म्हणतो कीं चिरीहाहुआनाज आणि केपडी पासॉ एथील रानटी लोक ह्यांना भीतीनें किंवा लोभानें कशाचीहि अर्चा करावी असें वाटत नाहीं. आव्हान्डानो म्हणतो माझ्या वेळीं आन्टीज् लोकांत मुळींच पूजा नव्हती. सर जॉन लबक आणि मि. टायलर ह्यांनीं आपल्या ग्रंथांतून अशाच प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. तथापि पुनः जिवंत होणाऱ्या दुय्यमाची कांहीं तरी स्पष्ट वा अस्पष्ट कल्पना पुष्कळ लोकांत दृष्टीस

पडते असें जें टायलरसाहेब म्हणतो तें खरें आहे. ज्या ठिकाणीं ह्या कल्पनेस नियमित स्वरूप आलेलें नसतें त्या ठिकाणीं प्रेतविधि आणि मृताची भीति ह्यावरून त्यांचा समज काय आहे हें दिसून येतें.

स्वप्नाच्या योगानें ज्याच्यात दुय्यमाचा कल्पना व मृत्यूचे वेळीं तो निघून जातो ही कल्पना उत्पन्न झालेली नाहीं असे लोक आहेत किंवा नाहींत, हा प्रश्न एकीकडे ठेवतां असें सिद्ध झाल्यासारखें म्हणतां येईल, कीं दैविक भूताबद्दल पहिली जी कल्पना नजरेस येते ती भूताविषयीं होय. ह्या जातीच्या इतर कल्पना जेथें मुळींच नसतात तेथें ही असते, आणि जेथें असल्याच अनेक कल्पना असतात तेथेंहि असते.

मृत्यूनंतर दुय्यम मागें रहातो हा समज रानट्याच्या ठिकाणीं उत्पन्न होतो, आणि सुधारलेल्यामध्यें सारखा पुनः पुनः उत्पन्न होत असतो, ही गोष्ट फार अर्थप्रचुर आहे. सर्व प्रकारच्या माणसामध्यें जी गोष्ट सारखीच दृष्टीस पडते, तिचा, ज्या गोष्टी केवळ वरिष्ट लोकांमध्येंच दृष्टीस पडतात त्या गोष्टींपेक्षां, माणसाच्या मनांत जास्त खोल पाया असला पाहिजे; आणि मागून उत्पन्न झालेले समज, प्राथमिक समजामध्यें फेरफार होऊन व त्याची वाढ होऊन उत्पन्न होण्याजोगे जर असतील, तर ते तसेच उत्पन्न झाले आहेत ही गोष्ट त्यावरून निष्पन्न होते. आणि आतां ज्या गोष्टी आम्ही सांगणार आहों त्यावरून हा तर्क किती ग्राह्य आहे हें लक्षांत येणार आहे.

१४७. पिशाचाची कल्पना जसजशी स्पष्ट व उघड होत जाईल, तसतशी त्यास संतुष्ट करण्याची इच्छा व

यत्न हीं उद्भवतात. ह्यामुळें जेथें जेथें पिशाचांचें अस्तित्व मानिलें जातें तेथें तेथें कोणत्या तरी प्रकारची पितृपूजा दृष्टीस पडलीच पाहिजे, व तशी पडतेहि. ह्यावद्दल आतांपर्यंत जो अप्रत्यक्ष पुरावा दिला आहे, त्यांत आतां प्रत्यक्ष पुराव्याची भर घालूं.

ज्या ठिकाणीं मानासिकस्थिति आणि समाजस्थिति हीं अगदीं कनिष्ठ प्रतीचीं असतात त्या ठिकाणीं धर्मविषयक कल्पनांचा बहुतेक अभाव असून त्याबरोबरच पितृपूजेचाहि बहुतेकांशीं अभाव असतो, किंवा फारच अल्प विस्तार झालेला असतो. बंगाल प्रांतांत जुआंग म्हणून एक रानटी जात आहे. त्यांचें उदाहरण ह्या बाबतींत नमुनेदार आहे; त्यांच्यांत देवाला शब्द नाहीं व मरणोत्तर स्थितीची मुळीं कांहींच कल्पना नाहीं; कोणतेहि धर्मविधी नाहींत, आणि पूर्वजपूजेचीहि कांहीं कल्पना नाहीं. फ्यूजीअन लोकांना युरोपियनांशीं सहवास घडण्यापूर्वीं त्यांच्यामध्यें धर्मसंबंधी कांहींएक दिसत नसे असें कूक सांगतो, व ते पूर्वजपूजा करीत असाहि उल्लेख तो किंवा इतर कोणी करीत नाहीं. आंडामानीज लोकांबद्दल जो काय अल्पस्वल्प पुरावा मिळतो त्यावरून तीच गोष्ट व्यक्त होते. बेरें, आस्ट्रेलियन व टास्मेनियन लोक जरी भुतें आहेत म्हणून समजतात तरी त्यांच्यांत पिशाचसमाराधान फारच दृष्टीस पडतें. इकडे, वेड्डा लोक जरी अगदीं कनिष्ट आहेत तरी त्यांच्यांत साधी परंतु स्पष्ट पितृपूजा आढळून येते, पण ह्याचें कारण त्यांच्या मानानें सुधारलेले जे सिंगालीज लोक त्यांच्याशीं त्यांचा सहवास हें बहुधा असावें.

परंतु मृतांना जेथें पुरलें असेल ती जागा सोडून दूर दूर जाण्याच्या भटकणाऱ्या टोळ्यांचा विचार सोडून जेव्हां आपण ज्यांच्यामध्यें स्मशानें अगदीं वस्ती नजीक आहेत अशा स्थाईक टोळ्यांचा विचार करूं लागतों, तेव्हां त्यांच्यांत प्रेतविधींची वाढ होण्याचा संभव असल्यामुळें मृतांचें सारखें समाराधन करीत राहणें ही चाल दिसून येते. सर्व प्रकारच्या लोकांत ही गोष्ट दिसून येते. प्रथम नीग्रीटो जातींचा विचार करतां फीजीयन लोकांबद्दल आपण असें वाचतों कीं त्यांचे आईबाप मेले कीं लागलेच ते त्यांच्या गृहदेवतांमध्यें जाऊन बसतात; आणि त्यांच्या नांवानें ते देवालयें बांधितात. टानीज लोकांत देवांना आरेम्हा हें सामान्य नांव आहे, वे त्याचा अर्थ मृत माणूस असा आहे. न्यूकालिडोनियन लोकांत असेंच आहे. मलायो, पोलिनिशियन लोकांतहि असेंच आहे; फरक एवढाच कीं त्यांच्यांत साध्या पितृपूजेवरोवर देव बनलेल्या जास्त प्राचीन पूर्वजांचीहि जास्त संकीर्ण पूजा आढळते. ताहितियन लोक आपल्या देवांना बळी अर्पण करून त्यांचे मृत राजे व पूर्वज ह्यांच्याहि आत्म्यांनाहि अर्पण करितात. सांडविच बेटांतील लोक, सामोअन लोक, माल्लागासी आणि सुमात्रांतील लोक ह्यांच्याबद्दलहि अशींच वर्णनें आढळतात; पैकीं सुमात्रन लोकांबद्दल **मार्स्डेन** असें सांगतो कीं ते यद्यपि देवाची किंवा भुताची किंवा मूर्तीची पूजा करीत नाहींत, तथापि ते आपल्या पूर्वजांच्या थडग्यांना आणि आत्म्यांना फारच पूज्य मानितात. आफ्रिकेंतहि अशींच स्थिति आहे. आंगोलाचे लोक मृतांच्या आत्म्यांच्या

रागाचें प्रार्थनांनीं नेहमीं निवारण करूं पाहतात; आणि ब्रांबिरी लोकहि मृत सरदार व आप्त यांच्या प्रार्थना करितात. तद्वतच काफिर लोक मृतांच्या आत्म्यांस वस्तुतः देवांच्या पदवीस चढवितात. वानीका, बालोंडा आणि कांगोनीज यांजबद्दल अशींच वर्णनें आढळतात.

एशिया खंडांतील हल्क्या जाती ह्याहून जरी अगदीं भिन्न नमुन्याच्या आहेत तरी त्यांच्यांतहि असलींच उदाहरणें सांपडतात. भिल्ल, खोंड, क्यारेन हे सर्व पितृपूजक आहेत म्हणून सांगतात. सांथाळ लोकांच्या धर्माचा पाया कुटुंबावर रचलेला असून ते कौटुंबिक देवतेशिवाय पूर्वजांचीं पिशाचें पूजीत असतात, आणि कौटुंबिक देवतेची उत्पत्ति कशी होते ह्याबद्दल कांहीं संशय असल्यास खोंड लोकांबद्दल **म्या**कफर्सनच्या पुढील कथनानें तो दूर होतो. " टोळीचे, तिच्या फांद्यांचे व त्यांच्या पोटभेदांचे विशेष प्रसिद्ध पूर्वज भटांस आठवत असतात, आणि त्यांच्या प्राचीनत्वाप्रमाणें त्यांचें पावित्र्य वाढत जात असतें. उत्तर एशियेपैकीं किरगीझ व ओस्तिआक लोकांत अशींच उदाहरणें सांपडतात, आणि नांत्राच्या एकेश्वरी (मुसलमानी) धर्माबरोबर मृतपूजा कशी कायम राहते ह्याचें उदाहरण टर्कोमन लोक होत. आतां अमेरिकेंत गेल्यास तेथेंहि अगदीं उत्तरेपासून तहत दक्षिणेपर्यंत, म्हणजे एस्किमो लोकांपासून पाटागोनियन लोकांपर्यंत अशींच उदाहरणें आढळतात; आणि त्यांच्यापैकीं जे प्राचीन काळचे सुधारलेले म्हणून होते त्यांच्यांत ही पूजा फारच संकीर्ण बनलेली होती.

नाईल नदीच्या कांठीं राहणाऱ्या व प्राचीन काळ-

च्या फार सुधारलेल्या इजिप्शन लोकांनीं पितृपूजेस कसें संमिश्र स्वरूप दिलें होतें हें अगोदरच आपल्या नजरेस आलें आहे. इकडे एशिया खंडांत चिनी व हिंदू लोकांत पितृपूजा इतर धर्मांबरोबर जारीनें नांदत आहे ह सांगावयास नकोच.

असो. एवंच पितृपूजा स्वाभाविकरीत्या कशी उत्पन्न होते, ती पृथ्वीवर सर्वत्र कशी पसरलेली आहे, आणि वरच्या वरच्याहि जातींत इतर धर्मांबरोबर तिचें वास्तव्य कसें कायम आहे, ह्या गोष्टी इतका वेळ आपण पाहिल्या. आतां तिच्या बाह्य स्वरूपावरून नजर काढून. अंतःस्वरूपावर लावूं. म्हणजे जे ती खुद्द करितात त्यांच्या दृष्टीनें तिजकडे पाहूं या. सुदैवानें दोन उदाहरणें—एक कमी संकीर्ण प्रकाराचें आणि एक विशेष संकीर्ण प्रकाराचें,—अशीं ह्या पूजकांच्याच खुद्द तोंडून निघालेलीं आपणांस प्राप्य आहेत.

१४९. आमचे जुने ओळखीचे जे आमाझुलू लोक, ज्यांच्या कल्पना त्यांच्याच तोंडून उतरून घेतल्या आहेत, त्यांचें उदाहरण पहिल्या प्रकारचें होय. निरनिराळ्या आमाझुलूंचीं जरा जरा निराळीं, पण मुख्यत्वें परस्परसदृश अशीं विधानें खालीं दिलीं आहेत.

"वृद्ध लोक म्हणत कीं माणसें आणि इतर सर्व, म्हणजे पाळींव व रानटी जनावरें—हीं सर्व अंकुलंकुलूपासून उत्पन्न झालीं."

"सूर्य, चंद्र, आणि जगांतील वस्तू आणि तें पलीकडील आकाश हीं सर्व आह्मी अंकुलंकुलूचीं समजतों."

"काळे लोक जेव्हां अंकुलंकुलू किंवा उथलांगा, किंवा

निर्माणकर्ता, असें म्हणतात, तेव्हां त्यांच्या बोलण्याचा अर्थ एकच असतो. ”

“ असें म्हणतात कीं अंकुलंकुलू उत्पन्न झाला आणि त्यानें माणसांस उत्पन्न केलें. ”

“ त्यानें फार प्राचीन काळच्या माणसांस उत्पन्न केलें; त्यांस मुलें झालीं व ते मेले. त्या मुलांस मुलें झालीं, व ते मेले. त्यांच्यापासून दुसरे उत्पन्न झाले. अशा रीतीनें शेवटीं आह्मांस अंकुलंकुलूची वार्ता समजली. ”

“ अंकुलंकुलूबद्दल आतां कोणास माहिती नाहीं. तोच पहिला माणूस होता. तो प्रारंभींच नाहींसा झाला. ”

“ अंकुलंकुलू माणसांस म्हणाला, मी देखील बोरूच्या बेटांतून निष्पन्न झालों. ”

“ अंकुलंकुलू हा काळा माणूस होता; कारण आह्मी पाहतों कीं ज्यांपासून आह्मी उत्पन्न झालों ते सर्व लोक काळे आहेत. ”

ह्या सगळ्यांवरून तात्पर्यार्थ असा निघतो कीं ह्या लोकांच्या समजाप्रमाणें अगदीं प्राचीनतम पूर्वज बोरूपासून किंवा बोरूच्या बेटापासून निघाला, व त्याच्यापासून सर्व वस्तू उत्पन्न झाल्या; पण आमाझुलू लोक यास नांवाचाच मान देतात. ते जे संतुष्ट करितात तें नजीकच्या पूर्वजांस म्हणजे दुय्यम अंकुलंकुलूस होय; ज्यांस कोठें कोठें ओंकुलंकुलू म्हणून म्हटलें आहे. दूरवरचे पूर्वज व नजीकचे पूर्वज ह्यांजबद्दलच्या कल्पना व त्यांच्या संबंधाचें वर्तन हीं पुढील उताऱ्यांवरून लक्षांत येण्यासारखीं आहेत :—

" लोक म्हणतात बोरूच्या बेटांतून उत्पन्न झालेला अंकुलंकुलू मरून गेला आहे. "

" त्यावरून असें उघड झालें कीं त्याची पूजा करील असा त्यास (अंकुलंकुलूस) मुलगा आतां राहिला नव्हता; ....अंकुलंकुलूचीं स्तुतिपर नांवें नष्ट झालीं आहेत."

" प्रत्येक टोळीचा निरनिराळा अंकुलंकुलू आहे. "

" आमच्या कुटुंबाचें उष्टांग हें स्तुतिपर नांव आहे. तो आमच्या कुटुंबांतील पहिला माणूस होता, म्हणजे आमच्या कुटुंबाची स्थापना करणारा अंकुलंकुलू तो होता."

" आम्हीं ज्यांना आपल्या डोळ्यांनीं पाहिलें होतें, म्हणजे जे आमच्यामध्यें राहिले होते व मेले होते, तेवढ्यांचीच आम्ही पूजा करीत असूं. "

" आम्हांला एवढेंच समजतें कीं, तरुण आणि वृद्ध मरतात, आणि त्यांची छाया निघून जाते. आमचा काळ्या लोकांचा अंकुलंकुलू तो आहे, ज्याची आम्ही आमच्या गुरांढोरांसाठीं प्रार्थना करितों, आणि ज्यास बाप म्हणून पूजितों. आम्ही म्हणतों, ' उश्लामिनी ! उद्धादेबे ! उमुटिंकुलू ! उथ्लोमो ! देवा ! मी इच्छितों तें मला मिळूं दे. मला मरूं दे पण जगूं दे, आणि पृथ्वीवर पुष्कळ दिवस राहूं दे. ' वृद्ध माणसांस रात्रीं तो स्वप्नांत दिसतो. "

एवंच ह्या ठिकाणीं पितृपूजा अगदीं अल्प प्रमाणावर दृष्टीस पडते. ह्या ठिकाणीं, पुष्कळ पिढ्यांपर्यंत आपलें व्यक्तित्व कायम ठेवतील व लहानसहान व्यक्तींवर वरचढ करितील, अशा ठळक व्यक्ती उत्पन्न झालेल्या दिसत नाहींत.

१४९. ह्यापेक्षां जास्त स्थाईक व जास्त पुढें गेलेल्या

लोकांत ह्यासंबंधानें सुधारणा दृष्टीस पडते. आलीकडील आणि स्थानिक पूर्वजांबरोबर तत्पूर्वीच्या आणि शक्तिमत्तेमुळें श्रेष्ठ मानले गेलेल्या पूर्वजांची पूजा त्यांच्यांत दृष्टीस पडते. ह्या गोष्टीबद्दल फारसे दृष्टांत नकोत, कारण प्राचीन जातींच्या रुढींवरून ती गोष्ट व्यक्त होते. ग्रीसचा इतिहासकार ग्रोट म्हणतो:—

"ग्रीक लोकांच्या प्राचीन धर्माचा विचार करितां पूजा आणि पूर्वज ह्या दोन कल्पना त्यांच्यांत संयुक्त झालेल्या होत्या. प्रत्येक लहान मोठा समाज आपला मूळ पूर्वज एक होता असें समजे. व तो पूर्वज बहुधा ते पूजीत असा कोणी सामान्य देव असे, किंवा त्याच्याशीं निकट संबद्ध असा कोणी अर्धवट देव बनलेला असे."

अशा प्रकारची ही स्थिति म्हणजे कांहीं पिढ्यांपूर्वीच्या पूर्वजांची पूजा आणि त्याबरोबरच अगदीं फार प्राचीन काळच्या, संबंध आठवत नाहीं अशा, एकाद्या पूर्वजाची जास्त पसरलेली पूजा—ही स्थिति इतरत्र दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, पेरू देशांत सवितृपूजा व इंकापूजा यांजबरोबर पूर्वजांची पूजा जारीनें चालू असे. आव्हेन्डानो यास त्यासंबंधानें चवकशी करतां असें उत्तर मिळालें:—"आमच्या पूर्वजांपैकीं प्रत्येकजण मार्कायांकची पूजा करीत असे; तो आमच्या गांवचा मूळ स्थापक किंवा वडील माणूस असे, व त्याच्यापासून आमची उत्पत्ति झालेली आहे. दुसऱ्या कोणत्याहि गांवचे इंडियन लोक त्याची पूजा करीत नाहींत; कारण त्यांचा दुसरा मार्कायॉक् आहे." पण ह्या ठिकाणीं विशेष लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, ह्या स्थाईक जातींच्या धर्मांत

त्यांचे अत्यंत प्राचीन पूर्वज देव बनलेले असतात. आमाझुलू लोक अगदीं जुना जुना माणूसं आपला व इतर सर्व वस्तूंचा उत्पादक म्हणून जरी समजतात तरी त्याची ते पूजा करीतं नाहींत; तो कायमचा मेलेला आहे, व त्याचे मुलगेहि कायमचे मेलेले आहेत असें ते समजतात; म्हणून पूजा जी होते ती नंतरच्या पूर्वजांची होते, कारण ते जातीचे संस्थापक म्हणून स्मरले जात असतात. पण वर सांगितलेल्या अमेरिकन जातींत अत्यंत जुनीं माणसें दुसरीकडे कोठें तरी जिवंत आहेत अशीं समजलीं जाऊन त्यांची पूजा आलीकडील पूर्वजांपेक्षां जास्त होत असते. ही गोष्ट फ्रायर बोबाडिलाचीं कांहीं निकाराग्वन् लोकांशीं जीं कांहीं प्रश्नोत्तरें झालीं त्यांवरून स्पष्ट दिसते.

प्र.—" स्वर्ग व पृथ्वी हीं कोणीं केली हें तुला माहीत आहे काय ?

उ.—"मी लहान होतों तेव्हां माझ्या आईबापांनीं मला सांगितलें कीं, टामागोसाट व सिपाटोनाल ह्यांनीं तीं केलीं.

प्र.—" ते कोठें आहेत?

उ.—" तें मला माहीत नाहीं; पण ते आमचे मोठे देव आहेत, व त्यांस आह्मी टिओटीज् (Teotes) असें म्हणतों.

प्र.—" टिओटीजची नोकरी कोण करितो ?

उ.— " मीं म्हाताऱ्यांच्या तोंडून असें ऐकिलें आहे कीं त्यांची नोकरी करणारे कोणी लोक आहेत; जे इंडियन लोक घरांत मरतात ते जमिनीखालीं जातात, व जे लढाईंत मरतात ते टिओटीजची नोकरी करण्यास जातात.

प्र.—" ह्यांपैकीं चांगलें कोणतें ? जमिनीखालीं जाणें किंवा टिओटीजची नोकरी करण्यास जाणें ?

उ.—" टिओटीजची नोकरी करावयास जाणें अधिक चांगलें; कारण तेथें लोक आपल्या वाडिलांकडे जातात.

प्र.—" पण त्यांचे बाप जर आंथरुणावर पडून मेलेले आहेत तर ते त्यांना कसे दिसावे ?

उ.—" आमचे बाप तेचे हे टिओटीज्. "

दुसऱ्या एका माणसानें अशीं उत्तरें दिलीं :—

प्र.—" सर्व पृथ्वी, तारे, चंद्र, माणूस आणि इतर सर्व हीं कोणीं उत्पन्न केलीं ?

उ.—" टामागोसाट व सिपाटोनाल यांनीं; यांपैकीं पहिला पुरुष आहे, व दुसरी स्त्री आहे.

प्र.—" त्या स्त्रीपुरुषांस कोणीं निर्माण केलें ?

उ.—" कोणीं नाहीं. उलट, सर्व पुरुष व सर्व स्त्रिया त्यांच्यापासून उत्पन्न झेतात.

प्र.—" हे जे देव तूं सांगतोस ते मांसाचे केलेले आहेत, कीं लांकडाचे, कां कसले ?

उ.—" ते मांसाचे केलेले आहेत व स्त्रीपुरुष आहेत; ते तरुण आहेत व नेहमीं तसेच राहतात; आणि आह्मां इंडियनांप्रमाणें ते फिकट उदी रंगाचेच आहेत, आणि ते पोषाक घालून पृथ्वीवर फिरत व इंडियन लोक खातात तेंच खात.

प्र.—" हल्लीं ते काय खाऊन राहतात ?

उ.—" इंडियन खातात तेंच ते खातात, कारण सगळीं खाद्यें टिओटीज् राहतात तेथूनच आलीं. "

दुसरा एक साक्षीदार साठ वर्षांचा असून तो त्यां-

च्यांतील भट होता, तो ख्रिस्ती होण्यास कबूल होईना, त्यानें अशीं उत्तरें दिलीं:—

प्र.—" ते माणूस आहेत काय?

उ.—" होय, ते माणूस आहेत.

प्र.—" तुला कसें समजलें?

उ.—" माझ्या पूर्वजांनीं मला सांगितलें.

प्र.—" हे तुमचे देव कोठें आहेत?

उ.—" माझ्या पूर्वजांनीं सांगितलें कीं जेथें सूर्य उगवतो तेथें ते आहेत.

प्र.—" तुमच्या देवळांतून तुम्हांस सांगावयास ते आले काय?

उ.—" आमचे वाडवडील सांगत कीं पुष्कळ काळापूर्वीं ते येत असत व आमच्याशीं बोलत असत; पण हल्लीं ते येत नाहींत.

प्र.—" हे टिओटीज् खातात काय?

उ.—" मीं आपल्या वाडवडिलांच्या तोंडून असें ऐकिलें आहे कीं, ते माणसाचें रक्त व काळिजें खातात, व कांहीं पक्षी खातात, आणि आम्ही त्यांना मेणबत्तीचें लांकूड, धूप आणि राळ देतों; हें त्यांचें खाणें."

आणखी कांहीं प्रश्नोत्तरांतून पुढील उतारा देतों:—

प्र.—" तुम्हांस पाऊस आणि सर्व वस्तू कोण पाठवितो?

उ.—" पाणी आम्हांस कायाटिआट पाठवितो, तो माणूस आहे व त्याला आईबाप आहेत, बापाचें नांव आमेयाटीट आणि आईचें नांव ओमेयाटिझिगोट; आणि तीं जेथें आकाशांत सूर्य उगवतो तेथें राहतात."

ह्या सर्व पुराव्यावरून असें दिसतें कीं स्मरणांत असलेले अत्यंत प्राचीन जे पूर्वज ते देव बनलेले असतात; पण शारीरिक व मानसिक धर्मांनीं माणूसच राहिलेले असतात, मात्र त्यांचें सामर्थ्य जास्त असतें. प्रस्तुत माणसांचे ते जनक किंवा कर्ते असल्यामुळें ते सर्व वस्तूंचेच कर्ते म्हणून समजले जातात, आणि जेथून जात आली तेथें ते राहतात, व मृत जातात ते त्याच परलोकांत. मर्तिक विधींपासून मृतपूजा, व मृतपूजेपासून धार्मिक-पूजा, या स्वरूपांतरानें पूर्वजांचे देव बनतात ही जी गोष्ट इतर रीतींनीं अप्रत्यक्षरीत्या दिसून येते, ती वरील विधानांवरून प्रत्यक्षरीत्या दिसून येते.

१९०. वरें, ही पितृपूजा हलक्या जातींत तेवढीच आहे असेंहि नाहीं, तर उच्चतर जातींतहि हल्लीं आहे किंवा पूर्वीं एका कालीं होती. ग्रीक लोक प्रत्येक ठिकाणचे जे मुख्य वीर त्यांची, रानटी पेरूव्हिअन लोकांप्रमाणेंच देव समजून पूजा करीत असत. रोमन लोक नुकत्याच मेलेल्या लोकांच्या भुतांस बळी देत; इतकेंच नाहीं तर फार प्राचीन कालीं मेलेल्यांच्याहि भुतांस देत असत; ते लोक आमाझुलू लोकांतल्याप्रमाणेंच त्यांच्या कुटुंबांचे स्थापक असत. या ठिकाणीं ह्या चाली त्यांनीं रानटी लोकांपासून घेतल्या असें म्हणतां येत नाहीं; कारण त्यांच्यांत पितृपूजा होती ह्याबद्दल प्रत्यक्ष लेखच सांपडतात.

ही आर्य लोकांची गोष्ट झाली; पण सेमिटिक जातींमध्येंहि ती असलीच पाहिजे. कारण त्याबद्दल जरी प्रत्यक्ष पुरावा मिळत नाहीं तरी अप्रत्यक्ष मिळतो. उदाहरणार्थ हीब्रयू लोकांत जाहवेला (देवाला) पहिलें पीक

अर्पण करतेवेळीं बळी देणारास असें म्हणावें लागतें कीं ह्यापैकीं मी मृताला कांहीं एक देत नाहीं. ह्यावरून तं-त्पूर्वीं मृताला बळी देण्याची चाल त्या लोकांत होती व हा उच्चतर धर्म स्वीकारल्यावर त्यांनीं ती टाकून दिली ही गोष्ट व्यक्त होते. मुसलमानांचीहि गोष्ट तशीच आहे. टर्कोमन लोक कडकडीत मुसलमान असून संत बनलेल्या चोरांच्या थडग्यांना ते यात्रा करितात हें वर सांगितलेंच आहे. बिडुइन लोकहि त्याचप्रमाणें थडग्यांपाशीं बळी देतात. तात्पर्य, आर्य लोकांप्रमाणें सेमिटिक लोकांमध्यें-हि पितृपूजा नव्हती किंवा नाहीं असें म्हणतां येत नाहीं.

१५१. कांहीं लोक असें म्हणतात कीं, पितरांच्या संबंधाचे जे विधी आर्य वगैरे उच्चतर जातींत दिसतात, ते धार्मिक नसून केवळ नैतिक होते; उदाहरणार्थ, हिंदूंचीं श्राद्धें किंवा पारशांनीं पूर्वजांच्या आत्म्यांना केलेल्या प्रार्थना, किंवा रोमन लोकांनीं थडग्यांपाशीं दिलेले बळी; पण आमाझुलू लोक, किंवा नीग्रो लोक, किंवा मेक्सिकन ह्यांच्या तसल्याच कृतींस जर धार्मिक म्हणावें लागतें तर यांच्याच तसल्या विधीस नैतिक कसें म्हणावें हें समजत नाहीं. असलें तर्कशास्त्र बरोबर ठरल्यास पाहिजे त्या गोष्टीस पाहिजे तें म्हणतां येईल.

१५२. उच्चतर जाती ह्या नीचतर धर्मांतून एका काळीं गेलेल्या नाहींत हें म्हणणें किती निराधार आहे ही गोष्ट, ह्या सुधारलेल्या जातींतून पितृपूजा अद्यापिहि अल्पस्वल्प आढळते, ह्यावरून स्पष्ट होणार आहे. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्माचा एवढा दाब असतां सर्व यूरोपभर ती थोडी फार दृष्टीस पडते.

प्राटेस्टंट लोकांत देखील रानटी लोकांच्या कल्पना, विचार व कृती ह्यांचे स्पष्ट लेश दृष्टीस पडतात. रानटी लोकांप्रमाणें तेहि थडग्यांवर फुलें वाहतात. मृत आईबाप अमुक एक कृति पसंत करितील किंवा नापसंत करितील हा विचार मुलांचे मनांत येत असतो. दिवाणखान्यांत टांगलेली वडील माणसाची तसबीर आज्ञाभंग करणाऱ्या धाकट्याकडे रागानें पहात आहे ही कल्पना अद्यापि त्या लोकांतून गेलेली नाहीं, आणि मृताची शेवटची इच्छा पूर्ण न करणें म्हणजे अमळ धोक्याचें समजलें जातें.

क्याथलिक लोकांमध्यें तर ही गोष्ट विशेषच दृष्टीस पडते. व्हर्जिन (कुमारी) मेरीच्या पूजेसाठीं त्यांच्यांत जशीं लहान लहान देवळें बांधतात तशींच मृत आईबापांसाठीं बांधतात, आणि असल्या देवळांतून सामान्यतः जरी मृतासाठीं प्रार्थना केल्या जातात, तरी कधीं कधीं व विशेषतः मृत आईबाप पवित्र समजून जेव्हां स्वर्गांत गेल्याबद्दल कल्पना असते, तेव्हां मध्यस्तीसाठीं त्यांच्याहि प्रार्थना केल्या जातात. शिवाय बोहिमिया वगैरे प्रांतांतून शनिवारीं पानांतील राहिलेले भाकरीचे तुकडे चुलींत टाकण्याचा संप्रदाय आहे, अशासाठीं कीं ते दुसऱ्या दिवशीं आत्म्यांच्या उपयोगीं पडावे. तशींच टेबलावर आमटी सांडेल ती भुतांसाठीं किंवा आत्म्यांसाठीं राखून ठेवितात. एकादी बाई कणीक मळूं लागली कीं अगोदर ती थोडीशी सुकी कणीक आपल्या पाठीकडे टाकते, आणि थोडासा ओला मलीदा चुलींत टाकिते. रानवाले सुकलेल्या भाकरीचे तुकडे झाडांवर फेंकितात. हें सर्व गरीब भुतांकरितां होत असतें. ह्या सगळ्याचा अर्थ

पितृपूजा त्यांच्यांत आहे असाच होतो.

१५२. सारांश, अनुभवावरून अनुमितीचेंच समर्थन होतें, आणि गत प्रकरणांत केलेलें अनुमान खरें ठरतें.

एकंदर लोकसमूह—म्हणजे जाती, समाज व राष्ट्र—हीं घेतां असें दिसून येतें कीं त्यांच्यापैकीं अगदीं सर्वांचे ठिकाणीं जर नाहीं तर बहुतेक सर्वांचे ठिकाणीं तरी, मृत मनुष्याचा पुनः जिवंत होणारा दुय्यम असतो, ही समजूत स्पष्ट किंवा अस्पष्ट दृष्टीस पडते. ह्या एकंदर लोकसमूहांत एक त्याच्यापेक्षां लहान असा समूह आहे कीं त्यांतील व्यक्तीला हा दुय्यम मरणानंतर कांहीं काळपर्यंत किंवा नेहमीं अस्तित्वांत राहतो असें वाटतें. ह्याच वर्गांत आणखी एक मोठा वर्ग असा आहे कीं त्यांतील लोक मर्तिकसमयीं आणि नंतर कांहीं काळपर्यंत पिशाचसंतर्पण करीत असतात. ह्यां शेवटच्या वर्गांत लहान असा एक पोटवर्ग आहे कीं ज्यांतील लोक भुतांस कायमचें अस्तित्व आहे असें समजून नेहमीं पितृपूजा करीत असतात. आणखी एक वर्ग असा आहे कीं त्यांतील लोक प्रसिद्ध पूर्वजांची पूजा अप्रसिद्ध पूर्वजपूजेपेक्षां जास्त महत्त्वाची समजतात. असें होतां होतां शेवटीं प्रसिद्ध पूर्वज निजेत्या जातीचे पुढारी असतील त्यांचें महत्त्व इतरांपेक्षां विशेषच जास्त होतें.

देवांची उत्पत्ति अशा रीतीनें मृतांच्या दुय्यमांपासून झालेली आहे ही गोष्ट निरनिराळ्या पारलौकिक भूतांना निरनिराळीं नांवें सुधारलेल्या समाजांतून असतात ह्यावरून देखील व्यक्त होते. दुष्ट भुतें व सुष्ट भुतें हा भेद प्रथम उत्पन्न होतो; नंतर देव व देवदूत असा होतो, नंतर

मग देवांचे व देवदूतांचे अनेक वर्ग बनत जातात. इ. इ. ह्या सर्व पुराव्यावरून निरानिराळ्या प्रकारचे समजलेले दैविक पुरुष प्रथम सामान्यतः कल्पिलेल्या भुतापासूनच उत्पन्न झाले आहेत असें व्यक्त होत नाहीं काय? सामान्य उत्क्रमणाच्या नियमावरून देखील पाहतां एका सामान्य कल्पनेपासून अनेक भिन्न कल्पना उत्पन्न झाल्याच पाहिजेत. मृतांचे आत्मे प्रथम जे सर्वच सारखे समजले जात असतात, ते हळू हळू जास्त जास्त परस्परभिन्न समजले गेलेच पाहिजेत. समाज जसे सुधारत जातील, आणि स्थानिक व राष्ट्रीय दंतकथा जास्त जास्त जमून जास्त जास्त संकीर्ण होत जातील, तसतसें ह्या आत्म्यांना लोकांच्या मनांत निरानिराळें महत्त्व येऊन ते भिन्न भिन्न होत गेलेच पाहिजेत; ते इतके कीं, ते सर्व प्रारंभीं एकाच उगमापासून निघाले हें देखील ओळखण्यास पंचाईत पडावी.

अशी स्थिति असल्यामुळें, म्हणजे लोकवस्ती वाढत जाईल व निरानिराळ्या प्रदेशांतून पसरत जाईल, त्याप्रमाणें भुतांना जास्त जास्त विजातीयत्व येणें स्वाभाविक असल्यामुळें त्यांचे अशा रीतीनें बनलेले जे निरानिराळे वर्ग त्यांतील अत्यंत ठळकांपैकीं कांहींचा विचार आतां करूं.

प्रकरण एकविसावें

मूर्तिपूजा आणि विशेष वस्तुपूजा

१५४. नुकत्याच मेलेल्या मनुष्यास दिलेल्या बळींना त्याच्या राखून ठेविलेल्या शवास दिलेल्या बळींचें स्वरूप कसें येतें हें आतांपर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरून दिसून आलेंच आहे. १३७ व्या कलमांत आपल्या असें नजरेस आलें कीं, ताहितीमधील मृत नायकाच्या शवास कोणी तरी भट रोज बळी अर्पण करीत असे; आणि मध्य अमेरिकेंतील लोक कृत्रिम उष्णतेनें सुकवून ठेविलेल्या शवापुढें असलेंच विधी करीत असत. शरीरांत 'मालमसाला भरून तें तसेंच ठेवण्याची कला जशी वृद्धिंगत झाली तसें ह्यालाच ममीपूजेचें स्वरूप आलें हें पेरूव्हियन आणि इजिप्शन लोकांच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. ह्या ठिकाणीं लक्षांत ठेवावयाचें तें हें कीं हे लोक मृत माणसाचें भूत मृत्युसमयीं शरीरांतून निघून गेलें असें समजून शिवाय असें समजत कीं तें भूत ममींत परत येऊन शिरतें, किंवा त्या ममीला आंगचेंच चैतन्य असतें. इजिप्शन लोक ममीला भोजनसमयीं पाटावर आणून बसवीत ह्यावरून हेंच दिसतें. पेरूव्हियन लोक असें करून शिवाय इतरहि कांहीं गोष्टी करीत. त्यांच्यापैकीं कांहीं लोक बापाचें सुकवलेलें शव शेतांतून फिरवीत, अशासाठीं कीं त्यानें शेताच्या स्थितीची पाहणी करावी. अशा रीतीनें मृत आईबाप हजर असून तीं आपला अधिकारहि चालवितात असें कसें समजत हे सांटा-

कूझनें सांगितलेल्या एका गोष्टीवरून व्यक्त होतें. व्हायना क्यापाक ह्याची दुसरी बहीण जेव्हां त्याच्याशीं लग्न करण्यास तयार होईना तेव्हां तो कांहीं नजरणा घेऊन आपल्या बापाच्या शवाकडे गेला, आणि तिला माझ्याशीं लग्न करूंदे म्हणून त्याची प्रार्थना करूं लागला; तेव्हां त्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं; पण आकाशांत भयंकर चिन्हें दिसूं लागलीं.

एकाद्या सगळ्या वस्तूचा जो विशेष गुणधर्म तो तिच्या सर्व भागांमध्यें असतो ही जी रानट्यांची कल्पना तिच्या आधारावर ह्या सिद्धांतापासून एक उपसिद्धांत निघतो. तो हा कीं जशाच्या तशाच राखलेल्या मृत शरीरामध्यें असलेला आत्मा त्याच्या राखून ठेविलेल्या निरनिराळ्या भागांमध्येंहि असतो; म्हणून शरीरावशेषावर रानट्यांचा विश्वास असतो. उदाहरणार्थ, सांडविच बेटांत राजांचीं व मुख्य मुख्य सरदारांचीं हाडें त्यांचे वंशज नेहमीं आपल्यापाशीं बाळगीत असत, अशा समजुतीवर कीं तीं आपली राखण करतील. क्रीज लोक मृत आप्तांचीं हाडें व केंस तीन वर्षें आपल्यापाशीं बाळगितात. क्यारिब लोकांत आणि गायनामधील कित्येक जातींचे लोकांत मृतांचीं हाडें स्वच्छ करून त्यांच्या आप्तांमध्यें वांटून देतात. टास्मेनियन लोक आपल्या मृत आप्तांच्या कपाळाचें किंवा बाहूंचें हाड मिळविण्यास उत्सुक असतात. आंडमानमध्यें मृतांच्या विधवा नवऱ्यांच्या नरोट्या गळ्यांत बांधलेल्या दृष्टीस पडतात.

अवशेषांवरील ह्या विश्वासामुळें, पुढें त्यांची पूजा होऊं लागते. लॉयल्टि बेटांपैकीं लिफूमधले लोक आप-

ल्या मृतांचे अवशेष जपून ठेवितात.—उदाहरणार्थ, नखें, दांत, केंस इत्यादि—व त्यांस देवाप्रमाणें मान देतात. आजार किंवा दुसरी कांहीं आपत्ति आली असतां न्यू-कालिडोनियन लोक मृतांच्या कपाळाच्या नरोट्यांस अन्नाचे बळी देतात. मंडन लोकांत प्रत्येक बाई आपल्या नवऱ्याच्या किंवा मुलाच्या नरोटीपाशीं गोड गोड खाद्य नेऊन ठेविते, व त्याच्याशीं गोड गोड बोलत राहते.

अशा रीतीनें नुकत्याच मेलेल्या माणसाच्या संतर्पणापासून त्यांचें राखून ठेवलेलें शरीर किंवा शरीराचा भाग ह्याच्या संतर्पणाची चाल उत्पन्न होते, आणि भूत ह्या प्रत्येकांत हजर असतें असें समजूं लागतात.

१९५. राखून ठेविलेल्या शरीराच्या किंवा शरीरभागाच्या पूजेवरून मूर्तिपूजा उत्पन्न होते अशी कोणास कल्पना करावयास सांगितल्यास त्याला बहुधा साधणार नाहीं; पण अशी स्थिति वस्तुतः घडून येते.

पूजावस्तु कधीं कधीं मृताची प्रतिमा असते, व ती अंशतः त्याच्या अवशिष्ट भागांची व अंशतः इतर पदार्थांची बनवलेली असते. यूकाटानीज लोक आपल्या मृत राजाचीं डोकीं कापून काढीत, व तीं शिजवून त्यांचें वरचें मांस काढून टाकीत, आणि मांसाच्या जागीं एकप्रकारचें सिमिट लावून तीं मृत राजांसारखीं होतील तितकीं हुबेहुब करीत व त्यांस देवांत ठेवून सणाच्या दिवशीं त्यांस खाद्य अर्पण करीत. मेक्सिकन लोकांची चाल अमळ निराळी होती. मृत राजास जाळिलें म्हणजे त्याची राख काळजीपूर्वक जमवून रक्तामध्यें ती भिजवीत, व तिची मृताची प्रतिमा करून ती मृताच्या स्मरणार्थ

ठेवीत. *कामागोंमध्यें मृताच्या प्रतिमांची पूजा करीत.*

कधीं कधीं मृताची राख माणसासारखी मातीची आकृति करून तींत भरीत, व त्यांवर देवळें बांधीत. मेक्सिकन लोकांबद्दल गोमारा असें लिहितो कीं, मृत राजाचें प्रेत जाळिल्यावर ते त्याची राख, हाडें व दागिने कपड्यांत गोळा करीत आणि माणसासारखी आकृति बनवून तिची व ह्या अवशेषांची दोघांचीहि पूजा करीत.

ईजिप्शन लोकांची चाल अशी होती कीं ते आपल्या मर्मी उघड्या न ठेवितां माणसासारख्या बनवून रंगविलेल्या चवकटींत बसवीत व पूजीत.

१५६. आतां ज्या उदाहरणांमध्यें शवाबद्दल केलेल्या प्रतिमांचे मर्तिकाचे वेळीं संतर्पण करितात त्यांचा विचार करूं.

मेक्सिकन लोकांत प्रेतें जाळीत असत; म्हणून लढाईंत मेलेल्यांचीं प्रेतें जर सांपडलीं नाहींत तर त्यांच्या प्रतिमा बनवून त्या पूजीत व नंतर जाळीत. तद्वतच एकादा व्यापारी प्रवासांत असतां मेला तर त्याचे आप्त त्याच्या सारखी ओबडधोबड लांकडाची आकृति करीत, आणि मृताला जे जे मर्तिकविधी करावयाचे ते ते सर्व त्या आकृतीला करीत. कोणी एकादा बुडून मेला किंवा जाळतां येत नाहीं अशा कांहीं अन्य तऱ्हेनें मेला तर ते त्याची प्रतिमा बनवून घरांतल्या मूर्तींत नेऊन ठेवीत, व तीस भाकर व दारू ह्याचा मोठा नैवेद्य दाखवीत. आफ्रिकेंत असल्याच चाली दृष्टीस पडतात. कांगोमध्यें मृत राजाच्या शवांत मालमसाला भरण्याचें काम चाललें असतां त्याची एक मूर्ति बनवून ती राजवाड्यांत ठे-

वितात, व तीस खाद्य व पेय यांचा पुरवठा रोज करितात. आबिसिनियन लोकांत सुतकाचे विधी तिसरे दिवशीं होतात, आणि मृतास मृत्यूचेच दिवशीं पुरीत अमल्यामुळें प्रतिमेस ते विधी करितात. कांहीं पापुअनवेटवाले थडगें भरून काढिल्यानंतर एका मूर्तीभोंवतीं गोळा होतात, व तीस खाद्य पेय देतात. जाव्हा बेटांतील कांहीं लोकांबद्दल राफल्स असें म्हणतो कीं, मृत्यूनंतर त्यांच्यामध्यें भोजनसमारंभ होत असतो, व त्यांत मृत माणसाचे कपडे नेसविलेली एक आकृति जेवावयास आणून बसवितात.

हे विधी आह्मांस विलक्षण वाटतात; पण अशा प्रकारचे विधी सुधारलेले लोकांत देखील होते हें आह्मी विसरतों हें जास्त विलक्षण आहे. फ्रान्सचा सहावा चार्लस जेव्हां मेला तेव्हां त्यास पुरतेसमयीं त्याच्या कफनीवर त्याची एक मूर्ति ठेविली होती. तिच्या डोक्यावर रत्नजडित मुकुट बसविला असून दोन हातांत दोन ढाली दिल्या होत्या, एका हातांत सोन्याची व एका हातांत रुप्याची; हातांत सफेत हातमोजे असून बोटांतून मोलवान् आंगठ्याहि होत्या, आणि अंगावर सर्व सोनेरी पोषाख होता. इंग्लंदच्या पांचव्या हेन्रीस पुरिलें तेव्हां अशाच मूर्तीची योजना केली होती असें मान्स्ट्रेलेट म्हणतो, आणि वेस्टमिन्स्टर आबेमध्यें राजांच्या अशा प्रकारच्या पुष्कळ मूर्ती आहेत.

ह्या गोष्टींचा विचार करतां रानटी लोकांच्या त्यासंबंधानें काय कल्पना होत्या, हें समजण्यास कठीण पडत नाहीं. कांहीं प्रांतांत कोस्टनीग्रो लोक थडग्यांवर लां-

कडाच्या कित्येक मूर्ती ठेवितात. न्यूझीलंडांत राजा मेला म्हणजे वीसपासून चाळीस फूट उंचीच्या लांकडी आकृति उभारीत असत, इत्यादि गोष्टी वाचून ही भावी मूर्तिपूजेची. पहिली पायरी होय ह्याबद्दल शंका राहात नाहीं. पेरूव्हियन लोकांत एकादा सरदार मेला म्हणजे त्याची एक सोन्याची प्रतिमा बनवीत, व ती जिवंत असल्याप्रमाणें तिची निगा ठेवीत, आणि तिला वस्त्रें वगैरे सगळ्याचा पुरवठा करण्याकरितां कांहीं गांवांचें उत्पन्न लावून देत. यूकाटानीज लोक त्यांच्यांतील एका मोठ्या सरदाराची मूर्ती बनवून तिची पूजा करीत.

१९७. अशा प्रकारच्या प्रतिमा पाहून रानट्यांच्या ठिकाणीं कसले मनोभाव उत्पन्न होतात हें जास्त स्पष्ट रीतीनें लक्षांत यावें एतदर्थ सुधारलेल्या लोकांतहि त्यांच्या योगानें काय मनोभाव व्यक्त होतात ह्याचा विचार करावा.

कामातुर माणूस जेव्हां आपल्या प्रिय पात्राच्या तसबिरीचा मुका घेतो तेव्हां त्यास चित्र व मूळवस्तू ह्यांच्यांत कांहीं तरी साम्य राहत असतें ह्यांत शंका नाहीं. स्पेन्सर साहेब म्हणतात, मला अशी एक बाई माहीत आहे कीं, ज्या खोलींत पुष्कळ तसबिरा टांगल्या असतील त्या खोलींत तिला झोंप येत नाहीं, आणि अशीं दुसरीं कित्येक उदाहरणें आहेत. तात्पर्य अशा ठिकाणीं चित्र म्हणजे कागद व रंग ह्यांचें बनलेलें आहे ही गोष्ट माहीत असतांही तें पाहून त्याच्या मुळाची कल्पना पाहणाराच्या मनांत उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं.

ही जर शिकल्यां संवरलेल्याची गोष्ट, तर रानटी माणसांचें काय सांगावें? त्याला गुणधर्म, नियम, कारण, ह्या कल्पना नसतात, आणि नैसर्गिक व कृत्रिम, शक्य व अशक्य, ह्याहि कल्पना नसतात. तेव्हां चित्र सजीव आहे असें त्यास वाटतें ह्यांत नवल नाहीं.

१२३ व्या कलमांत अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या समाजांस उल्लेख केलेला होता. एथें त्याबद्दल आणखी कांहीं उदाहरणें देऊं. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांस तसबिरी दैविक वाटतात, व मृतांप्रमाणेंच ते त्यांना मान देतात. ओकानागन लोक किनाऱ्यावरील लोकांप्रमाणेंच आपल्या तसबिरा काढूं देत नाहींत. मण्डन लोकांस वाटे कीं, चित्रांत जितका जीव घालावा तितका मुळांतला कमी होतो. क्याटलिन म्हणतो कीं, ते मला मोठा वैद्यू (Medicine man) म्हणून समजत. ते म्हणत मीं जिवंत माणसें उत्पन्न करितों. ते म्हणत आम्हांला आमचे सरदार दोन ठिकाणीं जिवंत दिसतात. ते म्हणत मीं केलेले जरासे सजीव आहेत, कारण त्यांचे डोळे हाललेले आम्हांस दिसतात ! जास्त पुढें गेलेल्या लोकांत देखील असले समज आढळून येतात. मादागास्कर-मध्यें राजाचे स्नेही त्याचा फोटो पाहून टोप्या उचलिते झाले व तोंडानेंही नमस्कार बोलले.

तसबिरीसंबंधानें जी ही गोष्ट सांगितली तीच प्रतिमांसंबंधानें लागू पडते, आणि जास्तच लागू पडते; कारण प्रतिमा ही घन असल्यामुळें मुळासारखी ती अधिकच स्पष्ट भासते. त्यांतून जर तीस रंग दिला व डोळे लाविले तर मग ती सजीव आहे असें रानट्याच्या अ-

संशयी मनास जास्तच निश्चयानें वाटतें. मोठ्या माणसा-नें एकादा वेडावांकडा मुखवटा तोंडावर चढविला, मग तो पूर्वी मुलानें पाहिलेला असेना-तें किती भितें हें ध्यानांत आणिलें म्हणजे ओबडधोबड मूर्ति पाहून रानट्यास काय वाटत असेल ह्याची कल्पना होईल. खोदीव मूर्ति पाहून त्यास प्रत्यक्ष मेलेल्या माणसाचाच भास होतो व त्यामुळें त्या मूर्तीत तो प्रत्यक्ष हजर आहे असें त्यास खात्रीपूर्वक वाटूं लागतें.

१५८. आणि वाटूं नये कां ? द्रुव्यमास जर शरीर सोडून जातां येतें व त्यांत पुनः प्रवेश करतां येतो—जर भूत परत येऊन मृत शरीरास पुनः सचेतन करूं शकतें—राखून ठेविलेल्या पेरूव्हियनच्या शवास परत आलेल्या द्रुव्यमाकडून पुनः जीव यावयाचा असल्यामुळें त्याच्या काळजीपूर्वक राखून केंसांची व नखांची जर जरूर लागते—इजिप्शनचा आत्मा हजारों वर्षें दुसऱ्या योनींतून भ्रमण करून पुनः ममींत शिरेल अशी कल्पना होती, तर भुतास प्रतिमेंत कां जातां येऊं नये ? विणीच्यासंबंधानें ममी व सजीव प्राणी ह्यामध्यें जितका भेद आहे त्याहून ममी व लांकूड ह्यांमध्यें कमी आहे. मृताच्या आत्म्यासाठीं सुकविलेल्या शरीराबरोबर ज्या एक किंवा जास्त खोदीव मूर्ती इजिप्शन लोक थडग्यांत पुरून ठेवीत ते हेंच तर्कशास्त्र बहुधा लढवीत असावे.

प्रतिमेंत जीव असतो असें रानट्यास वाटतें ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. यारूबन लोकांत आई कांहीं दिवसपर्यंत आपल्या मृत मुलाची लांकडी आकृति आपल्यापाशीं बाळगीत असते, आणि प्रत्येक जेवणाचें वेळीं

त्याच्या तोंडाला कांहीं अन्न लावितें. सामोइडीज लोकं मृतांच्या लांकडी आकृतींस भरवितात. ऑस्टिआक लोकांत मृतांची एक ओबडधोबड लांकडी आकृति करितात, आणि उपाध्या सांगेल तितके दिवस तीस देवाप्रमाणें पूजितात. प्रत्येक जेवणाचे वेळीं ते तिच्यापुढें अन्न ठेवितात, आणि मृताची बायको असेल तर ती वेळोवेळीं त्या आकृतीस आलिंगन देते. हा विधि सरासरी तीन वर्षें चालतो, नंतर त्या मूर्तीस पुरितात. मृत उपाध्याय असेल तर त्याचे वंशज त्याची मूर्ति पिढ्यानुपिढ्या ठेवितात, आणि भविष्यकथन वगैरे युक्त्यांनीं सर्वमान्य इतर देवतांप्रमाणें ह्यांना नैवेद्य मिळवितात. ह्यावरून मृत माणसाच्या आकृतीसच दैविक मूर्तीचें स्वरूप कसें येतें हें स्पष्ट होतें. सामोइडीज लोकांत कोणी प्रवासास निघाला म्हणजे मूर्तीचें तोंड तो जात असेल त्या दिशेस फिरवितात, असें कीं त्याची राखण व्हावी. इरकुट्स्क येथील राशियन लोक मूर्तींत जीव आहे असें इतकें पक्कें समजतात कीं त्यांच्यांतील तरुणी देवांसमोर कधीं प्रियकरांबरोबर एकट्या रहावयाच्या नाहींत, निरुपायच झाला तर मध्यें एक पडदा तरी टाकतील.

अशाच प्रकारचे समज ह्यांच्याहून अगदीं निराळ्या जातींतूनहि दृष्टीस पडतात. सांडविच बेटांतील लोकांत कोणी मृत झाला म्हणजे कुटुंबांत त्याची आकृति करून पूजितात, आणि समजतात कीं त्याच्या आत्म्याचा त्याच्या मूर्तीशीं कांहीं तरी संबंध आहे; आणि त्यांची मोठी राष्ट्रीय देवता जी ओरो ती उपाध्यांच्या प्रश्नांना जाब देते म्हणून समजत.

सारांश, मृत माणसाच्या प्रतिमेंत त्याचें भूत असतें असें समजून रानटी माणूस तिचें संतर्पण करूं लागतो; आणि ह्या प्रतिमेस देवाच्या मूर्तीचें स्वरूप जसजसें येऊं लागेल तसतसे त्यास देव समजून बळी देऊं लागतात.

१५९. प्रतिमेचें माणसाशीं कितपत सादृश्य असलें म्हणजे तिच्यांत माणसाचा आत्मा राहतो असें रानट्यास वाटूं लागतें ? रानटी बनवितो त्या प्रतिमा फार ओबडधोबड असतात. थडग्यावर कोरून जो खांब तो बसवितो, किंवा मृत आप्ताच्या प्रत्यक्ष अवशेषाच्या ऐवजीं जी लहान दगडी प्रतिमा तो आपल्या गळ्यांत आडकवितो, तिचें मानवी आकृतीशीं फारच अल्प साम्य असतें व प्रत्यक्ष मृताशीं मुळींच नसतें. तथापि तेवढें त्यास पुरतें. आणि संशयवृत्तीची बाधा मुळींच नसल्यामुळें रानट्याची अत्यल्प सूचकत्वानें सहज तृप्ति कशी होते याचा विचार करतां, याच्यापेक्षांहि कमी सदृश वस्तू त्यास पुरत असतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याच्या जिवंत राहिलेल्या फांद्या विलक्षण रीतीनें पसरलेल्या आहेत असें एकादें मेलेलें झाड, किंवा वाहेरून कांहींशी तोंडाची आकृति दिसते असा खडक, इत्यादि वस्तू पाहून त्यांच्यांत माणसाचा आत्मा राहतो असें रानट्यास वाटत असेल. ही गोष्ट ध्यानांत ठेवून वस्तुविशेषपूजा रानटयांत उत्पन्न होण्याची याच्यापेक्षांहि जास्त जोरदार कारणें कोणतीं आहेत याचा आतां विचार करूं.

९४ व्या कलमांत आपल्या असें दृष्टीस पडलें कीं, खडकाच्या पोटांत रुतलेल्या वनस्पती व जीव पाहून,

कांहीं निर्जीव वस्तू सजीव असतील असा रानट्याच्या मनास संशय येऊं लागतो. ही पहा दगड बनलेली शिंप; ही पहा दगड बनलेला मासा. तंतुमय देखावा कायम सहूनहि लांकडाचा जर दगड बनतो, तर माणसाचाहि बनत नसेल कशावरून? आणि ममीच्या शुष्क व कठीण शरीरांत जर आत्मा प्रवेश करूं शकतो—जर लांकडी आकृतींतहि करूं शकतो—तर माणसाच्या कांहीं अवयवांप्रमाणें दिसणारे जे दगड त्यांच्यांतहि आत्मे रहात नसतील काय? पहा हीं हाडें, जीं आतांच खणून काढिलीं आहेत; जड, दगडासारखीं, पण रानट्यास फसण्यास पुरेशीं माणसाच्या हाडासारखीं दिसणारीं. तर मग त्यांच्या संबंधानें काय समजावयाचें? माणसाच्या इतर अवशेषांप्रमाणें ज्यांचीं हीं हाडें असतील त्यांचे आत्मे त्यांच्यांत रहावयास वरचेवर येत नसतील काय? कधीं तरी त्यांस पुनः जीव येणार नाहीं काय?

दगडांबद्दल रानट्याच्या मनांत जी पूज्यबुद्धि उत्पन्न होते त्यास हें कारण असो वा नसो, ती पूज्यबुद्धि ज्यांच्या ठिकाणीं वास करिते त्यांस असेंहि वाटतें कीं ते दगड पूर्वीं मनुष्य होते, आणि ते अखेरीस पुनः माणूस बनतील. आज्यागा म्हणतो, पेरूव्हियन लोक कांहीं उंचवटे, डोंगर आणि फार मोठे दगड हे पूर्वी माणूस होते असें म्हणून पूजितात. कोस्टनीग्रो लोकांत कोणी मेला, म्हणजे एक दगड एका घरांत नेऊन ठेवितात व तेथें खाण्यापिण्याची तजवीज करितात. बुलॉम लोकांत मृतांच्या 'स्मरणार्थ जपून ठेविलेल्या दगडांस कांहीं वायका कांहीं प्रसंगीं भाताचे व इतर बळी दे-

तात. त्यांच्यापुढें त्या साष्टांगनमस्कारहि घालितात.

विशेषवस्तुपूजा उत्पन्न होण्यास आणखी एक कारण होत असतें. तें हें कीं मनुष्याचा प्राण म्हणजे वायु समजला जातो, हें प्राण शब्दांतील धातूवरूनहि व्यक्त होतें. ह्यावरून रानट्यांची अशी कल्पना होते कीं माणसाचे कपडे व इतर वस्तु ह्यांमध्यें त्याच्यांतून निघत असणाऱ्या श्वासोच्छ्वासादिक वायूंचा प्रवेश होऊन त्याबरोबर त्यांच्यांत त्याचा आत्मा शिरतो; आणि ही समजूत वस्त्रांच्याच संबंधानें आहे असें नाहीं तर दगडांच्या संबंधानेंहि आहे. व्हेरापाझमध्यें एकादा सरदार मेला म्हणजे ते त्याच्या तोंडांत एकादें हिरामाणीक घालीत; कांहीं म्हणतात, तो मरावयास टेंकला म्हणजे घालीत. त्यांची समजूत अशी असे कीं असें केलें म्हणजे त्याचा आत्मा त्यांत शिरतो.

सारांश, रानटी लोकांस असें वाटतें कीं मृत शरीरांत किंवा ममींत किंवा प्रतिमेंत जसा आत्मा शिरतो तसाच आकारहीन दगडांतहि शिरतो. म्हणून भूत संचारलेल्या जड वस्तूंची पूजा म्हणजे वास्तविकपणें त्यांच्यांत संचारणाऱ्या भुताची पूजा होय, आणि ह्या वस्तूंच्या अंगीं जीं सामर्थ्यें आहेत म्हणून समजतात तीं त्या भुतांचीं सामर्थ्यें होत.

१६०. ह्या कल्पनेची एकदां स्थापना झाली म्हणजे सर्व दिशांनीं वाढीस लागते. मग प्रत्येक गोष्टीचें स्पष्टीकरण ताबडतोब व्हावयास लागतें. जेव्हां भुतांची संख्या वाढत जाऊन, व त्यांचें व्यक्तिविषयक स्मरण नाहींसें होऊन तीं केवळ अदृश्य भूतांचे समूह बनतात, तीं व-

रांतील माणसांशीं खांद्याला खांदा घांशीत आहेत, किंवा रानाच्या कोंपऱ्यांतून टोळ्या बनवून रहांत आहेंत किंवा सभोंवतीच इतकी गर्दी करून राहिलीं आहेत कीं कांहीं-हि वस्तु कोठेंहि फेकिली तरी तीं त्यांस लागण्याचा संभव असतो–अशी भुतांविषयीं कल्पना उत्पन्न झाली म्हणजे मग सर्व अपरिचित गोष्टींचीं तींच कारणें आहेत असें वाटूं लागतें. ह्यांचीं उदाहरणें प्रत्येक जातींत दृष्टीस पडतात.

आफ्रिकेंत बुलॉम लोकांना जें जें विलक्षण किंवा असामान्य दिसेल त्याच्यांत भूत आहे असें समजून त्याला ते पूज्य मानितात कांगो लोक कांहीं शिंपांना देवांचीं मुलें म्हणतात, आणि नैजरनदीवरचे नीग्रो लोक यूरोपांतील एका गलबताचा मोठा आकार पाहून चकित होत्सातें ते पूजिते झाले. पालिनिशियामध्यें अशीच स्थिति आहे. बर्फावर चालण्याची गाडी कूक किंवा त्याचे सोबती ह्यांनीं तेथें ठेविली होती, तिची तेथील लोक पूजा करूं लागले. फीजी बेटांत एका माडाच्या झाडाला दोन सोंट फुटले होते, म्हणून तेथील लोक त्यास पूज्य मानूं लागले. अमेरिकेंतहि तीच स्थिति आहे. डाकोटा लोकांस जें जें समजणार नाहीं तें तें ते दैविक समजतात, आणि मण्डन लोक सर्व विलक्षण वस्तूंस तसेंच मानितात. चिपिवाज लोकांस कांहींही न समजलें कीं तें भूत आहे म्हणून म्हणतात; आणि प्राचीन पेरूव्हियन लोकांस हीच कल्पना होती; कारण ते लोक सर्व विलक्षण वस्तूंस देव समजून पूजीत.

एवंच ज्या विलक्षणत्वामुळें वस्तू पूज्य बनते त्यावरू-

न-असें समजण्यांत येतें कीं तिच्यांत भुताची वस्ती आहे; कारण तसें असल्याशिवाय ती वस्तु असामान्य कां बनली हें सांगतां येत नाहीं. उगीच सृष्टीस द्वित्व लावण्याकडे रानट्याच्या मनाचा कल नसतो; तर जेव्हां एकाद्या वस्तूच्या ठिकाणीं कांहीं विलक्षण देखावा, किंवा हालचाल, किंवा आवाज, किंवा रूपांतर दृष्टीस पडेल तेव्हां तिच्यांत भुताचा संचार आहे ही कल्पना त्याच्या मनांत उत्पन्न होते. चिबूचा लोक तळीं, ओहोळ, खडक, डोंगर, आणि इतर विलक्षण वस्तू ह्यांची पूजा करीत, आणि म्हणत कीं असल्या ठिकाणीं आपणांस पुजण्याबद्दल भुतानें आपणांस कांहीं गोष्टी करून सूचना केली आहे.

ह्या सर्व पुराव्यावरून असा सिद्धांत निघतो कीं विशेष वस्तुपूजा म्हणजे त्या वस्तूंत संचार करणाऱ्या विशिष्ट आत्म्याची पूजा होय; आणि हा आत्मा म्हणजे इतर दैविक कर्त्यांप्रमाणें मूळचा मृत माणसाचा दुय्यम होय.

१६१. पण हा अप्रत्यक्ष पुरावा झाला. म्हणून आतां प्रत्यक्ष पुरावा देऊं. पूर्व आफ्रिकेंत पूज्य वस्तूंच्या देवळांत भुतांचें संतर्पण करण्याकरितां दारू व खाद्य नेऊन ठेवितात. किनाऱ्यावरील नीग्रोंच्या कृतींवरूनही त्यांचा असाच समज आहे—म्हणजे ते पूजित वस्तूस भूत समजतात—असें दिसतें. सेरालोनमधील लोक मद्यपान करावयास लागले म्हणजे थोडीशी दारू आपल्या देवाच्या मूर्तीवर ओतल्याशिवाय रहावयाचे नाहींत. नैजर नदीवर एका खेड्यांत एक कोरींव वस्तु देव म्हणून मानिलेली होती, तिजबद्दल लाण्डर असें सांगतो कीं तीस

आमच्या शिजणाऱ्या बैलाचा वास मिळावा म्हणून तिच्याखालीं त्यास भाजण्यास तेथील लोकांनीं आह्मांस विनंति केली. डेहामीमध्यें रस्त्यांतून, घरांतून व खेड्यांतून, सर्वत्र विशेष वस्तूंचे बनलेले देव व त्यांस दिलेले बळी ह्यांची समृद्धि असते. हा देव मृत माणसाच्या वस्तूंचा बनलेला असो, किंवा त्याच्या प्रतिमेचा बनलेला असो, किंवा एकाद्या ऐतिहासिक व्यक्तीच्या मूर्तीचा बनलेला असो, त्यांत संचारणारा आत्मा म्हणजे एक प्रकारचें भूतच असतें. तें कधीं कधीं दृष्टीस पडतें, त्यास खाद्याची जरूर असते, व तें स्त्री अगर्तें किंवा पुरुष असतें; इत्यादि समजांवरून ही गोष्ट खचीत होते. पण एवढ्यावरहि कांहीं शंका राहिल्यास कांगो लोकांबद्दल पुढील विधानावरून ती दूर होईल.

" एथील लोक म्हणतात कीं बांबा एथील मोठा देव झाडीच्या मध्यभागीं राहतो, व तेथें तो कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं. तो मेला म्हणजे त्याचे पुजारी त्याचीं हाडें काळजीपूर्वक गोळा करितात, अशासाठीं कीं तीं पुनः जिवंत करावी आणि त्यांजवर रक्तमांस येईपर्यंत त्यांचें पोषण करावें. "

सारांश, हा विशेषवस्तुरूपी देव इतर बाबतींतच भुतासारखा समजला जातो असें नाहीं, तर तो पुनः पूर्व देह धारण करितो, ह्या बाबतींतहि तसा समजला जातो.

१६२. विशिष्ट वस्तुपूजेची जी ही उपपत्ति आह्मीं एथें केली आहे तिजवरून आतां एक उपसिद्धान्त काढूं. आणि तो वस्तुस्थितीशीं पूर्णपणें कसा जुळतो हें पाहूं.

अगोदरच आह्मीं असा पुरावा दिला आहे कीं कांहीं

हलक्या जातींमध्यें माणूस मृत्यूनंतर पुनः जिवंत होतो ह्याबद्दलच्या मुळींच कल्पना नाहींत, किंवा असल्यास अनिश्चित व डळमळणाऱ्या अशा आहेत; म्हणजे भुताच्या कल्पना त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या नसतें. आतां आम्ही म्हणतों त्याप्रमाणें वस्तुपूजा म्हणजे जर त्यांत राहणाऱ्या भुताची पूजा असेल, किंवा त्या भुतापासून उत्पन्न झालेल्या देवाची पूजा असेल, तर ती कल्पना भूतकल्पनेवर अवलंबून असल्यामुळें तिच्या मागून उत्पन्न झालेली असली पाहिजे, आणि जेथें भूतकल्पना नसेल तेथें ती नसली पाहिजे; पण अशीच वास्तविक स्थिति असते ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो.

हिंदुस्थानांतील डोंगरी टोळ्यांपैकीं जुआंग लोक हे अगदीं कनिष्ठ दर्जाचे आहेत; त्यांच्यांत देवास शब्द नाहीं, परजन्माची कल्पना नाहीं व पूर्वजपूजाहि नाहीं. त्यामुळें त्यांच्यांत विशेष वस्तुपूजाहि नाहीं, आणि जादूटोणाहि नाहीं. आंडामानीज लोक हेहि अत्यंत हलके असून त्यांच्यांत त्यांच्या उत्पत्तीबद्दल कल्पना नाहीं, किंवा स्वर्गाबद्दलची नाहीं, व त्याप्रमाणेंच विशेष वस्तुपूजेचीहि नाहीं. निदान त्यांचें ज्यांनीं वर्णन केलें आहे ते तरी याबद्दल कांहीं बोलत नाहींत. फ्यूजियन लोकांतहि धर्माची कांहींच खूण कुक यास दिसली नाहीं, व तोहि याबद्दल कांहीं बोलत नाहीं. आस्ट्रेलियन लोक जरी भुतें मानतात तरी त्या कल्पनेपासून ही कल्पना उत्पन्न व्हावी इतकी त्यांची पायरी पुढें गेलेली नाहीं; म्हणून ते जडवस्तूची पूजा करीत नाहींत. आतां नष्ट झालेल्या टास्मेनियन लोकांचीहि अशीच स्थिति होती,

आणि वेड्डा लोक जरी आप्तांचे आत्मे सर्वत्र पसरलेले आहेत म्हणून समजतात आणि पितृपूजा करितात, तरी त्यांची बुद्धि फार अल्प असल्यामुळें भूतकल्पनेची ही पुढची पायरी त्यांच्यांत उत्पन्न झालेली नाहीं.

अगदीं बुद्धिविहीनास एकाद्या कल्पनेपासून निघणाऱ्या इतर कल्पना सुचत नाहींत, तर ज्यांच्यांत विचारशक्तीचा अंकुर फुटला आहे, त्यांसच त्या सुचतात, म्हणून तर्कशक्ति जितकी चांगली असेल तितके चुकीच्या आधारावर चुकीचे सिद्धांत जास्त काढिले जातात. कलमें ९७ व ९६ यांत दाखविलेंच आहे कीं, माणसास दोन आत्मे असतात; त्याची छाया व त्याचें प्रतिबिंब असें अगदीं बुद्धिशून्य जे रानटी लोक ते समजत नाहींत, तर फीजियन लोकांसारखे फार हुषार जे रानटी लोक ते समजतात, आणि हेच लोक त्यावरून असा सिद्धांत काढितात कीं वस्तूंस ज्याअर्थीं छाया आहेत, त्याअर्थीं त्यांस आत्मेहि असलेच पाहिजेत.

आफ्रिकेंतील अनेक जातींच्या लोकांकडे पहातां असेंच दिसतें. बुशमेन लोकांत जडवस्तुपूजा आहे असें कोणी सांगत नाहीं, आणि सर्व आफ्रिकन जातींत हेच अगदीं कनिष्ठ आहेत. डामारा लोकांतहि बुद्धि फार अल्प असून भूतकल्पनाहि अर्धवटच आहे, त्यामुळें त्यांच्यांत जडपूजा आलेली नाहीं. पण कांगो लोक, किनाऱ्यावरचे नीग्रो, आंतले नीग्रो, डाहोमन लोक, आशांटी लोक, इत्यादि ह्यांच्या पुढें गेलेल्या जातींत ती आढळून येते. जेथें शहरांना तटबंदी आहे, सरकारची व्यवस्था आहे, मोठालीं सैन्यें आहेत, तुरुंग आहेत,

पोलीस आहे, बराच श्रमविभाग आहे, बाजार आहे व नेहमींचीं दुकानें आहेत, तेथें ती फारच भरभराटलेली दृष्टीस पडते. अमेरिकेंत तर ही गोष्ट जास्तच स्पष्टपणें दिसून येते. पुराण पेरू देशांतील अडाणी चिरीन्हन लोकांत ती आपणांस आढळत नाहीं; पण सुधारलेल्या पेरूव्हियनांत ती फारच संकीर्ण झालेली होती. ते मुळ्या, वनस्पती, फुलें, सर्व प्रकारचे वृक्ष, मोठाले डोंगर, मोठाले खडक, त्यांक्यांतील भेगा, गुहा, गोटे आणि निरनिराळ्या रंगाचे लहान दगड, ह्या सर्वांस पूजीत असत.

आणि जडवस्तुपूजेचा कळस कोठें झाला आहे म्हणाल तर ज्यांची सुधारणा इंग्रजांच्या अगोदरची आहे, ज्यांनीं विशाल शहरें, मोठाले धंदे, सुसंस्कृत भाषा, महाकाव्यें आणि सूक्ष्म तत्त्वदर्शनें उत्पन्न केलीं, त्या लोकांत. त्यांच्यांत शेतकरी नांगराची, कोळी मासे धरावयाच्या जाळ्याची आणि कोष्टी मागांची पूजा करितो; इतकेंच नाहीं, तर कारकून आपल्या लेखणीची व सावकार आपल्या वह्यांचीहि पूजा करीत असतो.

देवभोळ्या समजुतींत विशेष वस्तुपूजा प्रथम येते ही कल्पना किती निराधार आहे हें आतां स्पष्टपणें लक्षांत येईल. तसें असतें तर जुआंग, आण्डामानीज, फ्यूजियन, आस्ट्रेलियन, तास्मेनियन व बुशमेन वगैरे अगदीं अडाणी लोकांत तिचा विशेष प्रसार दृष्टीस पडला असता. त्यांच्याहून जास्त सुधारलेल्यांत कमी दिसला असता, आणि प्राचीन पेरूव्हियन वगैरे फार सुधारलेल्या लोकांत अगदीं कमी दृष्टीस पडला असता. पण ज्या-

अर्थीं वस्तुस्थिति अगदीं उलट आहे, त्या अर्थीं वरील कल्पनाहि अगदीं असमर्थनीय आहे.

१६३. ही कल्पना अनुभवाच्या किती विरुद्ध आहे हें इतका वेळ दाखविलें. आतां ती अनुमानाच्याहि किती विरुद्ध आहे तें दाखवूं.

" सचेतन व अचेतन ह्यांविषयीं कल्पना " या प्रकरणांत असें दाखविलें होतें कीं बुद्धीचा जसा विकास होत जाईल तशी सचेतन व अचेतन यांमधील भेद ओळखण्याची शक्ति वाढत जाते, आणि वरच्या दर्जाचीं जनावरें तो भेद ओळखण्यास बहुधा चुकत नाहींत, आणि म्हणून जो प्राणी शहाणपणानें सर्वांत श्रेष्ठ आहे तो दोहोंच्या संबंधानें विनाकारण घोंटाळा करीत असेल असें मानण्यास आधार नाहीं. पूर्व प्रकरणांतून रानट्याच्या मनाचें जें वर्णन केलें आहे, त्याचा विचार करा. त्याकरून तें तर्कविहीन, गुणदोषानभिज्ञ, सामान्यसिद्धांत काढण्यास असमर्थ, आणि इंद्रियद्वारा उत्पन्न होणाऱ्या कल्पनांव्यतिरिक्त कल्पनाविहीन असें दिसतें. त्याच्या भाषेंत निरनिराळ्या गुणधर्मांना निरनिराळे शब्द नसतात, आणि सामान्य गुणधर्माला मुळींच नसतात. आणि ज्या वस्तूचा एकादा गुणधर्म असेल त्या वस्तूव्यतिरिक्त त्या गुणधर्माची कल्पना करण्यास जर तो असमर्थ असेल तर दृश्य वस्तूचीं कार्यें अदृश्य वस्तु करीत असेल असें त्याच्या डोक्यांत तरी येईल? अशी कल्पना उत्पन्न होण्यास विचार करण्याची जी शक्ति पाहिजे ती त्याच्या ठिकाणीं नसते, आणि असल्या कल्पनेचें आकलन करण्यास जी मानसिक शक्ति पाहिजे

तीहि नसते. जेव्हां पिशाचकल्पना उत्पन्न होईल तेव्हां-च, परिस्थिति तत्सूचक असेल तर, जड वस्तूंत सचेतन कर्ता असल्याची कल्पना उत्पन्न होते. परिस्थिति सूच-क पाहिजे ही गोष्ट महत्त्वाची आहे, कारणं वस्तूंत भू-तसंचार आहे ही गोष्ट रानटी माणूस उगीच कधीं मानूं शकणाार नाहीं. भूतसंचार आहे असें सुचविणारें कांहीं तरी विलक्षण त्या वस्तूच्या संबंधानें असलें पाहिजे. पुढें मग त्याची सुधारणा होत जाईल तसा तो जो अनेक वस्तू भूतसंचारित म्हणून समजूं लागतो त्यास कारण त्याला जिकडे तिकडे भुतें आहेत असें वाटूं लागतें हें होय.

विशेष वस्तुपूजा पिशाचकल्पनेपासून उत्पन्न होते हें सुधारलेल्या लोकांच्या समजांवरून देखील सिद्ध हो-ण्यासारखें आहे. मेजें आपोआप फिरूं लागतात आणि खुर्च्या हालूं लागतात आणि यास कारण भुतें होत, असें मानणारे स्पिरिच्युआलिस्ट (भूतवादी) लोक सु-धारलेल्या यूरोपांत हल्लीं थोडे थोडके नाहींत. सारांश कोणतीहि कृति कशी होते हें समजलें नाहीं म्हणजे भूतकल्पना लढविणें ही स्थिति अद्यापि कायम आहेच.

१६४. एवंच ज्या मृतसंतर्पणावरून मर्तिकविधि व सामान्यतः सर्व प्रकारची पूजा हीं उत्पन्न होतात, त्याचवरून पिशाचपूजा व वस्तुपूजा हीं उत्पन्न होतात. त्या कोणत्या कोणत्या पायऱ्यांनीं होतात त्या सर्व पा-यऱ्या दृश्य आहेत.

नुकत्याच मृत झालेल्या शरीरास बळी देत असतात, सुकवून ठेविलेल्या शरीरास किंवा ममींस देत असतात, आणि मृतावशेषासहि देत असतात; तद्वतच कांहीं

अंशीं मृतावशेषांच्या व कांहीं अंशीं इतर वस्तूंच्या बनवलेल्या ज्या आकृती त्यांनाहि बळी अर्पितात, आणि झाडग्यांवर ठेविलेल्या आकृतीसहि बळी देत असतात. नंतर मग मृतदर्शक प्रतिमेची पूजा करण्याची चाल सुरू होते, आणि तिजवरून मूर्तिपूजेची चाल निघते.

शिवाय, ज्यांच्या ठिकाणीं रूपसादृश्य असेल त्यांच्या ठिकाणीं गुणसादृश्यहि असेल ह्या मूळ कल्पनेवरून आकृतींत भूत वसत असतें ही कल्पना उत्पन्न होते, आणि ह्यावरून पुढें अशी कल्पना निघते कीं देवता मूर्तींत प्रवेश करितात आणि कधीं कधीं त्यांतून बोलतातहि.

मूर्तिपूजा आणि विशेष वस्तुपूजा ह्यांच्यामध्यें भंग दिसत नाहीं. आफ्रिकेंत ही पूज्य विशेष वस्तु म्हणजे बहुधा मनुष्यसदृश आकृति असते. ही आकृति कधीं कधीं केवळ बागुलबोवासारखी असते आणि कधीं कधीं माणसाशीं केवळ तिचा संबंध असतो. उदाहरणार्थ, एकादा ताईत किंवा तोडगा. आकार, देखावा, वर्तन किंवा लहानमोठेपणा ह्यासंबंधानें विलक्षण वस्तूंची पूजा ह्यापासूनच उत्पन्न होते, आणि त्यांच्यांत भूत आहे असा समज उत्पन्न होतो. ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. हा समज जेथें रोग उत्पन्न करणें व ते बरे करणें, इष्ट करणें व अनिष्ट करणें, हें सर्व भुतें करितात असें समजलें जातें, तेथेंच उत्पन्न होतात, आणि नंतर सर्व विलक्षण गोष्टी भुतांच्या माथीं मारूं लागतात.

छाया म्हणजे आत्मे होत ही जी कल्पना तिनें ह्या समजांस बळकटी येते; कारण ९६ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें रानटी माणसें ही छायाकल्पना स्वशरीर-

व्यतिरिक्त इतर वस्तूंच्या छायांसहि लावूं लागतात. हळू हळू त्यांची विचारशक्ति हा समज त्यांस ग्रहण करण्यास लाविते, आणि त्यामुळें पदार्थांना आत्मे असतात ही जी इतर कारणांवरून उत्पन्न झालेली कल्पना तीस जोर येतो. नंतर मग त्या वस्तूंत भूत आहे असें वाटून त्यांची पूजा सुरू होते, व पुढें तें भूत पूर्वजांचें आहे असें रानट्यास वाटूं लागतें.

एवंच मूर्तिपूजा आणि विशेष वस्तुपूजा हीं पितृपूजेवरून उत्पन्न होतात हें बरेंच स्पष्ट होतें. आतां पुढच्या प्रकरणांत ज्या कांहीं गोष्टी आम्ही सांगणार आहों त्यांवरून तें जास्तच स्पष्ट होणार आहे.

प्रकरण बेविसावें

प्राणिपूजा

१६५. " मूळ कल्पना " ह्या प्रकरणांत असें दाखविलें होतें कीं प्राणिकोटींत जीं रूपांतरें होतात, तीं प्रथमदर्शनीं पुष्कळ कल्पित रूपांतरांपेक्षां अद्भुत असतात, आणि माशीचा किडा व माशी, किंवा अंडें व त्यांतून उत्पन्न होणारा पक्षी ह्यांच्यांतील भेद, मूल आणि कुत्रें, किंवा माणूस आणि बैल ह्यांच्यांतील भेदापेक्षां जास्त मोठा आहे.

असलीं रूपांतरें रानट्याच्या नेहमीं दृष्टीस पडत असल्यामुळें, एकाद्या प्राण्यास नवीन आकार आला आहे असें त्यास भासविणारी जर एकादी गोष्ट त्याच्या नजरेस आली तर ती रानटी लागलींच खरी मानितो. कधीं कधीं एका प्राण्याचा दुसरा प्राणी बनला असा त्यास भ्रम होतो; पण पुष्कळ वेळां माणसाचा इतर प्राणी बनला किंवा इतर प्राण्याचा माणूस बनला, असाच त्यास भ्रम होतो.

ह्याबद्दल सर्व जातींतून पुरावा सांपडतो. त्याबद्दल प्रथम आपण कांहीं उदाहरणें घेऊं, आणि त्यांचा अर्थ काय होतो तें पाहूं.

१६६. मानवी प्राणी पशूचें रूप धारण करितात हा समज कांहीं लोकांच्या संबंधानें सामान्यतः सांगितलेला आढळतो; उदाहरणार्थ, थ्लिंकिट लोकांबद्दल असें

सांगतात कीं ते विशेष जरूर पडल्याशिवाय आस्वला-स·मारावयाचे नाहींत, कारण आस्वल म्हणजे मनुष्यानें प्राण्याचें धारण केलेलें स्वरूप होय असें ते समजतात. ह्याच्या उलट सामान्य कल्पना क्यारेन्स लोकांत दृष्टीस पडते. ते असें समजतात कीं पाण्यामध्यें कांहीं प्राणी असे आहेत कीं त्यांचा वास्तविक आकार नक्राचा आहे, पण ते कधीं कधीं माणसांचा आकार धारण करितात, आणि माणसांच्या मुलींशीं लग्नेंहि करितात. पण सामान्यतः ज्या माणसामध्यें कांहीं विशेष सामर्थ्य आहे अशा समज असेल त्यांनाच ही प्राणिस्वरूपधारणशक्ति आहे असें मानीत असतात.

प्रत्येक प्रकारचें विशेष चातुर्य दैविक समजून कांहीं आफ्रिकन् जाती असें मानितात कीं सुतार हा वैदूच्या खालोखाल असून तो भुताच्या साहाय्यानें आपलें काम करीत असतो; आणि आबिसिनियामध्यें असें समजतात कीं लोहारांस हैना (एक कुत्र्याच्या जातीचें डुकरासारखें दिसणारें जनावर) व इतर प्राणी यांचीं स्वरूपें धारण करतां येतात. हा समज तेथें इतका बळकट आहे कीं तो कधीं कधीं युरोपियन वसाहतकारांना देखील पछाडितो; बिल्किन्सन म्हणतो कीं हें रूपान्तर मीं स्वतः पाहिलें आहे असें एक प्रवासी म्हणत असे. पण बहुधा हें सामर्थ्य जादूगारांच्याच अंगीं तेवढें लावीत असतात. खोंड लोकांचा असा समज आहे कीं चेटकिणी वाघाचें स्वरूप धारण करूं शकतात. नदींत स्नान करीत असतां एकाद्या नक्रानें एकाद्या मुलास धरून नेलें किंवा एकाद्या चित्त्यानें एकाद्या बकऱ्यास धरून

नेलें, तर बुलॉम लोक असें समजतात कीं हें काम एकाद्या चेटकिणीनें तें तें स्वरूप घेऊन केलेलें आहे. मेक्सिकन लोकांचीहि अशीच समजूत होती. हॉण्डुरासमध्यें असें समजत कीं चेटकिणी वाघ व सिंह ह्यांचीं स्वरूपें घेऊन डोंगरांतून राहतात व माणसास मारितात; म्हणून ते त्यांस धरून मारीत. कांहीं ठिकाणीं सरदारांनाहि हें सामर्थ्य असतें असें समजतात; उदाहरणार्थ चिब्चा लोकांत आफ्रिकेंतहि अशीच समजूत आहे; त्यामुळें तेथील लोक सिंहांस मारीत नाहींत; तर एकादा सिंह दिसला म्हणजे टाळ्या वाजवूं लागतात, कारण तींच त्यांच्यांत नमस्काराची पद्धत आहे. कांहीं ठिकाणीं हें सामर्थ्य सरदाराचे आप्तांचे ठिकाणींहि असतें म्हणून समजतात. **स्वीनफर्थ**नें गालाबाट येथें एका हैन्यास मारिलें, तेव्हां तेथील शेक त्याच्यावर रागावला; कारण तो म्हणाला माझी आई हैना झालेली आहे.

कांहीं ठिकाणीं मनुष्य रूपांतर पावून पशु बनण्याच्या ऐवजीं त्याच्या आत्म्याचें त्या पशूंत वारें येत असतें असें समजतात; म्हणजे माणसांचे आत्मे वाघ, सिंह इत्यादि जनावरांत शिरतात असें समजण्यांत येतें. उदाहरणार्थ, आफ्रिकेंत टेटी येथें असें समजतात कीं माणूस जिवंत असतां वाघ, नक्र इत्यादि जनावरांत प्रवेश करूं शकतात, आणि पुनः स्वशरीरांत येऊं शकतात. ग्वायना लोकांत असलीच समजूत आढळते.

जिवंत माणसांचे दुय्यमाप्रमाणेंच मृतांचेहि दुय्यम असले प्रवेश करूं शकतात असें मानणारे लोक आहेत हें सांगावयास नकोच. उदाहरणार्थ, सुमात्रांतील लोक

असें समजतात कीं मृतमाणसाचे आत्मे वाघांतून शिरत असतात, म्हणून स्वसंरक्षण करावयाचें असल्याविना, किंवा एकाद्या स्नेह्यास वाघानें मारलें असल्याविना, ते वाघावर हात टाकावयाचे नाहींत. आतां अस्तित्वांत असलेल्या रानटी जातींच्या संबंधानें पाहतां आपाची लोक असें समजतात कीं प्रत्येक खळखुळ्या सापामध्यें दुष्ट माणसाचा आत्मा असतो, व तो सैतानाचा दूत असतो. कालिफोर्नियन लोक हरण वगैरे मोठी पारध खावयाचे नाहींत, कारण असल्या प्राण्यामध्यें पुराणकालीं मेलेल्या माणसांचे आत्मे वसत असतात असें ते समजतात. प्राचीन अमेरिकन जातींचीहि अशीच समजूत होती. आफ्रिकन लोकांतहि असेच समज आढळतात.

आतां ह्या समजांचा अर्थ काय याचा विचार करूं. आपल्या अगोदर असें नजरेस आलेंच आहे कीं परिस्थिति सूचक असल्यास, अशा रीतीचें रूपान्तर होऊं शकतें अशी कल्पना करण्यास लावणारे अनुभव रानट्यास आधींच आलेले असतात; पण सूचक परिस्थितीविना तो अशी कल्पना करील असें आपणास गृहीत करतां कामा नये. म्हणून प्रश्न उद्भवतो कीं ही सूचक परिस्थिति कोणती? ती तीन प्रकारची असते, व तिजमुळें तीन प्रकारचे परस्परसंबद्ध पण अंशतः परस्परभिन्न असे समज त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होतात.

१६७. झुलू लोक म्हणतात कांहीं आमाटोंगो सर्प असतात; आणि आमाटोंगो हें त्यांच्यांत पूर्वजांच्या भुताला नांव आहे हें आधीं सांगितलेंच आहे. पण सर्प म्हणजे रूपान्तर पावलेले आपले पूर्वज होत असें या

लोकांस कां म्हणून वाटतें ? ह्याचें उत्तर वाचकांस समजावें म्हणून बिशप कालावेच्या ग्रंथांतून कांहीं उतारे देतों. त्यांत त्यानें ह्या लोकांस विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें आहेत.

" माणसें ज्या सर्पांचीं स्वरूपें घेतात त्यांच्या फारशा जाती नाहींत. त्या सर्वांस माहीत आहेत. त्या काळा इमाम्बा व हिरवा इमाम्बा ह्या होत. सरदार लोक ह्या सर्पांचीं रूपें घेतात. सामान्य लोक उम्थलवाझी ह्या जातीचे सर्प बनतात. "

" हे सर्प जेव्हां माणसाच्या झोंपडींत शिरतात तेव्हां ते माणूस आहेत असें ओळखतात. ते बहुधा दरवाज्यानें यावयाचे नाहींत. कदाचित् ते कोणी तेथें नसेल तेव्हां शिरतात, आणि माळ्यावर जाऊन तेथें वेटाळें करून बसतात. "

" त्या सापाच्या कुशीवर जर डाग असेल तर तेथें पूर्वी कुशीवर डाग असून हल्लीं गेलेला असा माणूस ज्या कोणास माहीत असेल तो पुढें येतो आणि म्हणतो ' हा अमुक अमुक आहे; त्याच्या कुशीवरचा डाग तुम्हांस दिसत नाहीं काय ? ' मग तें त्यास तसाच राहूं देतात आणि निजावयास जातात. "

" जे साप माणूस असतील ते झोंपड्यांतून येतात 'यावरून ओळखले जातात; तद्धतच ते उंदीर खात नाहींत, आणि माणसांच्या गडबडीला भीत नाहींत, ह्यावरूनहि ओळखले जातात. "

आतां ह्या गोष्टी आणि कलमें ११० व १३७ ह्यांत सांगितलेल्या गोष्टी ह्यांचा एकत्र विचार करा, म्हणजे

वरील समज कसा उत्पन्न होतो हें लक्षांत येईल. जगांत सर्वत्र असा समज पसरलेला दिसतो कीं मृत माणसाचें भूत घरासभोंवतीं घिरट्या घालीत असतें. असें जर आहे तर हे सर्प झोंपड्यांतून शिरतात ह्याचा अर्थ काय समजावयाचा? परत आलेले आप्त ते नव्हत काय? त्यांच्या अंगावर कधींकधीं ज्या खाणाखुणा दिसतात त्यांवरून ही गोष्ट सिद्ध होत नाहीं काय? आस्ट्रेलियांतील एका रहिवाशाचा हात वांकलेला असल्यामुळें तो जसा तशाच हाताचा मृत रानटी समजण्यांत आला (कलम ९२), तद्वतच माणसाच्या अंगावरचा डाग व सर्पाच्या अंगावरचा डाग हे, ते दोघे एकच आहेत अशी साक्ष देतात असें रानट्यास वाटतें. तात्पर्य, ह्या ठिकाणीं बऱ्याच गोष्टी सूचक आहेत, व घरांत वारंवार येणें ही त्यांपैकीं मुख्य आहे.

जरी बहुतेक माणसें घरांतून येणाऱ्या निरुपद्रवी सर्पांचें स्वरूप धारण करितात असें समजलें जातें, तरी कांहीं माणसें उघड्या जाग्यांतून राहणाऱ्या इमाम्बाचें स्वरूप धारण करितात अशी समजूत आहे. इमाम्बा म्हणजे मुख्यत्वेंकरून सरदार होत असें समजतात. ही जात विषारी असून "ती शत्रूसारखी टक लावून पाहते, व त्यामुळें माणसें घाबरतात." सारांश, खाणाखुणांवरून जसें व्यक्तितादात्म्य समजलें जातें, तसें स्वभावैक्यावरून जातितादात्म्य समजलें जातें. ह्या समजुतीच्या खरेपणाबद्दल आफ्रिकेच्या इतर भागांतून पुरावा सांपडतो असें लवकरच दाखविण्यांत येईल.

आमाझूलू लोक आपले पूर्वज सर्पांचीं सोंगें घेऊन

परत येतात असें जती मानितात, तरी त्यावरून ते केवळ सर्पांची पूजा करावयास लागलेले नाहींत; त्यांच्यांत त्यांचें संतर्पण आणि पितृसंतर्पण यांचें अस्पष्टरीत्या मिश्रण झालेलें दृष्टीस पडतें. अशाच नमुन्याचीं दुसरींहि उदाहरणें आहेत; उदाहरणार्थ, क्युलिकन प्रांतांत माणसाळलेले सर्प लोकांच्या घरांतून आढळत; व ते त्यांस भीत व पूज्य मानीत. पण धर्माची वाढ व कलासुधारणा जशी होत जाईल तशी सर्पपूजा निश्चित होत जाते. ह्याचें उदाहरण हिंदू लोक होत. त्यांच्यांत नागपूजा पुष्कळ देवळांतून होत असते, व नागहि घरांतून फार शिरतात. इजिप्शन लोकांतहि सर्पपूजा आहेच, व तेथेंहि एक प्रकारचा नाग बागांतून व घरांतून फिरत असतो, व तो इतका माणसाळलेला आढळतो कीं खुणा केल्याबरोबर तो मेजाशीं खावयास येतो.

घरांतून येणाऱ्या इतर प्राण्यांच्या संबंधानेंहि अशाच समजुती आढळतात. पुष्कळ देशांत घरांतून पाली सांपडतात. आणि आमाझुलू लोकांत अशी समजूत आहे कीं ह्यापैकीं एका जातीच्या पालीचें स्वरूप बायका घेत असतात. न्यूझीलंडर लोकहि असें समजतात कीं आपले पूर्वज पालीचें रूप धारण करून आपल्यास भेटावयास येतात. रशियामध्येंहि कांहीं ठिकाणीं पालीच्या जातीचा एक प्राणी पूजण्याची व त्यास अन्नपाणी घालण्याची चाल आहे. आमाझूलू लोकांत एक प्रकारच्या गांधील माशीस अशीच समजतात. प्राचीनकाळीं कबूतरालाहि कोठें कोठें देव मानीत.

१६८. बहुतेक लोकांत असा समज असतो कीं

भूत कधींकधीं पूर्वींच्या घरीं येतें आणि कधींकधीं शरीर पुरलें असेल तेथें जातें. म्हणून घरांतून येणारे प्राणी जर रूपान्तर पावलेले पूर्वज समजले जातात, तर प्रेतांसन्निध नेहमीं आढळणारे प्राणी हेहि तसेच समजले जाणार नाहींत काय? सहजच समजले जातील, व तसे ते समजले जातात ह्याबद्दल पुरावाहि सांपडतो.

प्राथमिक लोकांत सर्वत्र गुहांतून मृतांस पुरीत हें आधीं दाखविलेंच आहे. आतां गुहांतून कोणते प्राणी बहुधा आढळतात? मुख्यत्वेंकरून उन्ह व उजेड टाळणारे प्राणी, म्हणजे वागळें व घुबडें. जेथें पोंकळ झाडें नसतील तेथें दगडांतील भेगा व गुहा ह्यांतूनच हे रात्रिंचर प्राणी रहात असतात, व तेथें त्यांची संख्याहि फार असते. ह्यावरून फिलिपाईन बेटांत पूर्वी असल्या गुहांतून तेथील लोक प्रवेश करावयास फार भीत, आणि शिरलेच तर वागूळ राजास नमस्कार करावयास विसरत असत. आसिरियन लोकांत घुबडासंबंधानें अशीच समजूत होती. त्यांच्या मतें आत्मा शरीर सोडतेवेळीं एका जातीच्या घुबडाचें स्वरूप धारण करितो, आणि थडग्याभोंवतीं घिरट्या घालून दीन वाणीनें ओरडत रहातो. आत्म्यांना पंख असतात अशी जी कित्येक लोकांत समजूत आढळते तिचें मुळ हेंच असलें पाहिजे.

१६९. आतां तिसऱ्या जातीच्या कल्पित रूपान्तरांचा विचार करण्यापूर्वी दोन गोष्टींचें स्पष्टीकरण करणें इष्ट दिसतें; एक प्राथमिक भाषा, आणि दुसरी प्राथमिक नांवें.

रानट्यांची भाषा फार कोती असते. त्यामुळें त्या-

च्या भाषेंत त्याच्या सभोंवतालच्या कृतींपैकीं व वस्तूंपैकीं थोड्यांसच शब्द असतात किंवा तेच तेंच शब्द अनेक कृतींस व वस्तूंस लाविताते. त्यामुळें ऐकणाराचा गैरसमज अवश्यमेव उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, बांगो भाषेंत एकाच शब्दाचा अर्थ छाया व ढग असा होतो, दुसऱ्या एकाचा आकाश किंवा पाऊस असा होतो, आणि तिसऱ्याचा रात्र व उद्यां असा होतो. तेव्हां अशा लोकांच्या बोलण्याचा अर्थ तर्कानेंच करावा लागणार व तर्क पुष्कळ वेळां चुकणार. तर, तम हे भेद दाखविणारे शब्द त्यांच्या भाषांतून नसल्यामुळें अर्थाचा हा अनिश्चितपणा जास्तच वाढतो. डुमारामधील माणसास पुढची मजल मागचीपेक्षां लांब आहे काय? हा प्रश्न समजत नाहीं. त्यास असें विचारलें पाहिजे:—मागची मजल लहान आहे. पुढची, ती मोठी आहे काय? आणि तो, ती तशी आहे, किंवा तशी नाहीं, एवढेंच उत्तर देईल. कांहीं ठिकाणीं—उदाहरणार्थ, आबिपोन लोकांत—कोणत्याहि गोष्टीचा तमभाव किंवा अत्यन्त पुष्कळपणा सांगावयाचा असल्यास तो मोठ्यानें ओरडून सांगण्यांत येतो. अर्थाचा अशा रीतीनें उत्पन्न होणारा जो अनिश्चितपणा तो वाढण्यास, प्राथमिक भाषा वरचेवर बदलतात हें दुसरें कारण होतें. देवभोळ्या समजुतीमुळें जुन्या शब्दांऐवजीं नवे शब्द वरचेवर वापरण्यांत येतात. त्यामुळें एका पिढीनें सांगितलेल्या गोष्टी दुसऱ्या पिढीनें दुसऱ्या शब्दांनीं सांगितल्यामुळें, त्यांचा भलताच अर्थ होतो. भाषणाची असंबद्धता ही हा घोंटाळा वाढविण्यास कारणीभूत होते. दक्षिण ब्राझिलमधील

मूळ. भाषांतून विभक्तिप्रत्यय किंवा कालप्रत्यय नाहींत, आणि वाक्यांची नियमित रचना तर त्याच्याहूनहि क-मी. ते बहुधा धातूच्या मूलरूपींच बोलतात, आणि स-र्वनामांचा उपयोग फार क्वचित् करितात." त्यामुळें वा-क्याचा अर्थ समजण्यासाठीं त्याच्यावर कमजास्त जोर देणें, हळूं किंवा लवकर बोलणें, आणि तोंडानें व हातां-नीं खुणा करणें, ह्या सगळ्याची जरूर त्यांस लागते. उदाहरणार्थ, " मी रानांत जाईन " असें इंद्रियनास म्हणावयाचें असल्यास " रान जाणें " असें तो म्हणतो, आणि ज्या दिशेस जावयाचें असेल त्या दिशेकडे जो-रानें तोंड वळवितो. शिवाय ह्या भाषांतून सामा-न्य व तात्त्विक कल्पनावाचक शब्द नसतात. आबिपोन व गुराणी ह्या लोकांत ' असणें ' किंवा ' बाळगणें ' ह्या अर्थाचे शब्द नाहींत. तसेंच, मनुष्य, शरीर, देव, काळ, स्थळ, कधीं, कोठें, वगैरेलाहि शब्द नाहींत. कू-सा भाषेंत ' मी आहें ' ह्याला शब्द नाहीं.

अशा रीतीनें रानटी भाषा दुर्बल, असंबद्ध व अनि-श्चित असल्यामुळें गैरसमजुतीनें हजारों चुकीचे समज उत्पन्न होण्याचा संभव असतो. डोब्रिझाफर म्हणतो, गुराणीभाषेंत " आत्रा चे " ह्याचे तीन अर्थ आहेत.— (१) मी गुराणी आहें; (२) मी माणूस आहें; (३) मी नवरा आहें. तेव्हां यांतील कोणता अर्थ द्यावयाचा हें संदर्भावरूनच ताडावें लागतें. तेव्हां अस-ल्या भाषांतून जर कोणी दंतकथा सांगूं लागलें तर ऐ-कणारा त्यांचा पुष्कळ ठिकाणीं सहजच अगदीं भलताच अर्थ समजेल हें अगदीं उघड आहे.

१७०. विशेषनामें माणसांमध्यें पाहिल्यापासूनच आहेत असें नाहीं; तीं हळू हळू उत्पन्न झालेलीं आहेत. निरनिराळ्या आवाजांनीं निरनिराळ्या लोकांस ओळखावें हें नूतनकल्पनाविहीन रानट्यास कधीं सुचलेलें नाहीं. प्रथम विशेष व्यक्तीला उल्लेख करावयाचा तो त्याच्यासंबंधी कांहीं गोष्टींस—उदाहरणार्थ, त्याला घडलेली एकादी गोष्ट, त्याच्याजवळची एकादी वस्तु, किंवा त्याचा एकादा गुण ह्यांस उल्लेख करून करीत असत.

वर्णनात्मक नाम हें सर्वांत प्रथम उत्पन्न झालें असें बहुधा गृहीत करितात; उदाहरणार्थ आपण असें समजतों कीं रुंदतोंड्या, टकल्या, कुरळ केंसांचा, अशा प्रकारचीं नांवें प्रथम सुरू होतात; पण ही चूक आहे. मुलांच्या अंगीं विशेष गुण येण्याच्या अगोदरच त्यास दर्शविण्याची जरूर लागल्यामुळें रानटी माणूस त्याच्या जन्माच्या वेळच्या कांहीं परिस्थितीस अनुसरून त्यास तो नांव देतो. उदाहरणार्थ, लोअर मरेमधील आस्ट्रेलियन लोकांत कांहीं लहानशा गोष्टींवरून त्यांचीं नांवें ठेवितात,—उदाहरणार्थ ते जन्मास आले असतील ती जागा, किंवा बाळंतीण झाल्याबरोबर आईस दिसलेली वस्तु. डामारामधील मुलांचीं नांवें मोठाल्या सार्वजनिक गोष्टींवरून ठेवितात. बोडो व ढिमाल लोकांत चालू गोष्टींवरून मुलांचीं नांवें ठेवितात. काफिर मुलांचीं नांवें त्यांच्या जन्माच्या वेळच्या कांहीं गोष्टींवरून ठेवितात. चिपिवायन मुलांचीं नांवें एकादें स्थान किंवा ऋतु किंवा प्राणी यांवरून तीं ठेवितात. बिडुइन लोकांत असलीच

चाल आहे. जन्माच्या वेळीं जवळ कुत्रा असल्यास तेंच नांव ते मुलास ठेवितात.

प्रथम अशा रीतीनें नांव ठेवण्याची चाल सुरू झाली. म्हणजे त्या माणसाच्या कारकीर्दीतील विशेष गोष्टीवरून किंवा पराक्रमावरून किंवा त्याच्या अंगच्या कांहीं विशेष गुणावरून त्याला दुसरें नांव पडूं लागतें. वर सांगितलेल्या लोकांपैकीं काफिर, डमारा, व कोमांची ह्या लोकांत द्वितीय नांथाची चाल दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, काफिर लोकांत 'उमगोडी' ह्याचा अर्थ, 'बिळांत जन्मलेला मुलगा' असा असून तें मुलाचें मूळ नांव आहे, आणि 'उंजिंक्सिसागो' ह्याचा अर्थ 'जनावरास लोळवणारा पारधी' असा असून तें मागून दिलेलें नांव आहे. क्यारेन्स लोकांत 'वाघ', 'पिंवळा वाघ', 'भयंकर वाघ', इत्यादि, जनावरांवरून ठेविलेलीं नांवें आढळतात. न्यूझीलंदांत जलद चालणारास 'कवा' म्हणजे पक्षी असें नांव असतें. जनावरांवरून नांवें ठेवण्याची ही चाल सर्वत्र दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, याकूचन लोक, हाटेंटाट्स् आणि सर्व उत्तर अमेरिकन लोक ह्यांच्यांत ही चाल आढळते. राजे व सरदार ह्यांना सिंह म्हणण्याची चाल सर्वत्रच आहे. तद्वतच त्यांस बैल हें नांव देण्याची चाल कोठें कोठें आढळते.

आतां सुधारलेल्या लोकांतहि लुच्चा माणसास कोल्हा, ढोंगी माणसास सुसर, घाणेरड्यास डुकर, इत्यादि नांवें देण्याची चाल आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवून, असल्या चालीपासून अगदीं प्रारंभीं काय परिणाम झाले ह्याचा आतां विचार करूं.

१७१. शब्दांच्या खुणा प्रथम अपुऱ्या असल्यामुळें आणि त्यांची वाण हातवाऱ्याच्या वगैरे खुणांनीं भरून काढणें जरूर असल्यामुळें अलंकार आणि वस्तुस्थिति ह्यांच्यांतील भेद तेव्हां दर्शवितां येत नसे, मग दंतकथेंतून तो कायम राखतां येत नसे हें सांगावयासच नको च. असें असल्यामुळें एकाद्या पूर्वजाचें नांव 'वाघ' असल्यास तो खराखुराच वाघ होता असें रानट्यास वाटल्यास आश्चर्य नाहीं. असल्या चुकीचे परिणाम सर्वत्र दृष्टीस पडतात.

उदाहरणार्थ, डायाक लोक कांहीं जनावरें आपले पूर्वज होते व त्यांपासून आपण उत्पन्न झालों असें समजून त्यांस ते खात नाहींत. बेचुआना लोकांत 'बकट्ला' ह्याचा अर्थ माकडापासून उत्पन्न झालेले असा असून 'बाक्वेना' ह्याचा अर्थ नक्रापासून उत्पन्न झालेले असा आहे; आणि 'बतूलापी' ह्याचा अर्थ माशापासून उत्पन्न झालेले असा आहे. व ते त्या त्या जनावरास पूज्य मानितात. पाटागोनियन लोकांत अस ल्या देवता पुष्कळ आहेत. प्रत्येक इंदियन जातीची किंवा कुळाची एकेक देवता असून त्यापासून ती जात किंवा कुळी उत्पन्न झाली असें समजतात. कालिफोर्नियांतील रानटी लोक आपले पूर्वज लांडगे होते असें समजतात. चिपिवायन लोक आपला मूळ पूर्वज कुत्रा होता असें समजतात.

कांहीं रानटी लोक ह्याच्याहि पुढें जातात; म्हणजे आपण हल्लीं आहों तसे कसे झालों ह्याचीं कारणें ते देऊं लागतात. उदाहरणार्थ वर सांगितलेले कालिफोर्नियन

लोक असें सांगतात कीं आपण सरळ बसावयास लाग-ल्यामुळें आपली शेंपटी निघून गेली.

१७२. जनावरांपासून मनुष्यजाती उत्पन्न झाल्या. ह्या समजाचे आणखीहि कांहीं परिणाम होतात त्यांचा आतां विचार करूं.

माणसांसारखाच जनावरांना विचार करितां येत असला पाहिजे व समजहि असला पाहिजे; कारण दोघांचीहि उत्पत्ति एकाच पूर्वजांपासून झालेली नाहीं काय? म्हणून पापागो लोकांत अशी समजूत आहे कीं, प्राचीन कालीं माणसें व जनावरें एकमेकांशीं बोलत असत. म्हणूनच कामस्चाडेल लोक मासे धरीत असतां आपली होडी पालथी न करण्याविषयीं पाणघोडे व देवमासे ह्यांची प्रार्थना करितात, आणि पारध करीत असतां आपणास इजा न करण्याविषयीं आस्वलें व लांडगे ह्यांची प्रार्थना करितात. म्हणूनच डाकोटा लोक सर्पास आपणाशीं स्नेहभावानें राहण्यास विनवितात.

माणसें आणि जनावरें सजातीय आहेत असें समजण्याचा आणखी एक परिणाम असा होतो कीं जनावरांस चांगल्या रीतीनें वागविण्याची चाल उत्पन्न होते. मारलेल्या जनावरांच्या आत्म्यांची परलोकीं गांठ पडेल असें समजून चिपिवायन लोक आस्वलाची त्यास मारण्याबद्दल क्षमा मागत, आणि असें ढोंग करीत कीं जणूकाय अमेरिकनच त्यास मारीत आहे, आपण नव्हे. त्याचप्रमाणें आस्टियाक लोक मारलेल्या आस्वलाच्या डोक्याची पूजा करून त्यास सांगत कीं तुला रशियन लोकांनीं मारिलें. कुकी लोकांत वाघ, हत्ती, आस्वल वगैरे

मारिलें कीं त्याच्या भुताच्या संतर्पणार्थ ते लागलीच एक जेवणावळ घालितात. सुमात्रांतले लोक, क्यांबोजि-. आमधले स्टियेन लोक, डायाक लोक, काफर लोक व आरब लोकहि असलेच विधी करितात.

साहजिकच, ज्या जनावरापासून जातीस नांव प्राप्त झालें असेल त्यास आप्त समजून त्याच्यावर विशेष मेहेरनजर दाखविली जाते. मानवी पूर्वजाप्रमाणें पशुरूपी पूर्वजहि आपल्या वंशजांस ब्रेरें वाईट करूं शकतो असें समजतात. म्हणून करड्या आस्वलापासून आपण उत्पन्न झालों असें समजणारे इंदियन लोक तसल्या आस्वलास कधीं मारावयाचे नाहींत. आसेज लोक बीव्हर या जलस्थलचर जनावरास मूळ उत्पादक समजून त्यांस मारीत नाहींत. बेचुआना लोकांत अशीच चाल आहे. आस्ट्रेलियन लोकांत असल्या जनावरास तें झोंपीं गेलें असतां मारीत नाहींत, किंवा मारावयाचें झालयास त्यास अगोदर पळण्याची संधि देतात. यावरूनच तीं तीं जनावरें आपलीं रक्षक आहेत व संकट यावयाचें असल्यास खुणांनीं किंवा ध्वनींनीं तीं आपणांस अगोदर कळवितात असा समज रानटी लोकांत उत्पन्न होऊं लागतो.

१७२. पुढें ह्या जनावरांच्या पूजेस सुरवात होते. थ्लिंकिट लोकांत कावळा आणि लांडगा ह्या दोन देवता आहेत, व त्या त्यांच्या जातीच्या मूळ उत्पादक म्हणून समजल्या जातात. आशांटी व झुलू लोकांत सर्पास सरदार समजून देवहि समजतात. मादागास्कर बेटांत राजास बैल ही पदवी असून तें तेथील लोकांत दैवतहि

आहे. ईजिप्शन लोकांत , हिंदु लोकांत आणि आसिरियन लोकांतहि ह्या पशूची पूजा करितात.

अशा रीतीनें आलंकारिक पदव्यांचा भलताच अर्थ होऊन त्यापासून प्राणिपूजा सहजच उत्पन्न होते. स्तनवत् प्राणी, पक्षी, सर्प, मासे ह्या सर्वांपासूनच आलंकारिक नांवें उत्पन्न झालेलीं आहेत, आणि त्या सर्वांनाहि कोठें ना कोठें मूळ पूर्वज समजलेलें आहे, आणि त्यामुळें या सर्व वर्गांतील प्राण्यांना पावित्रता प्राप्त होऊन तिची पूजेपर्यंत कोठें ना कोठें मजल गेलेली आहे. जेथें जातीस नांव दिलेला प्राणी जात्याच मानार्ह नसून तिरस्कारार्ह असेल तेथेंहि तो एकदां पूर्वज समजला गेला कीं लागलाच पूजार्ह होतो. उदाहरणार्थ, वेड्डा लोक कांसव हा आपला पूर्वज समजून त्याची पूजा करितात.

१७४. आतां ह्याच समजावरून उत्पन्न होणाऱ्या आणखी कांहीं विलक्षण समजांचा विचार करूं. उदाहरणार्थ अर्धा माणूस व अर्धा पशू अशा देवांच्या पूजेचा विचार करूं.

आशान्टीमधील पुढील पिढ्यांच्या रानांत, त्यांचा पूर्वज बोर नांवाचा एक विषारी सर्प होता ही दंतकथा जर कायम राहिली, आणि तो कायदे करीत असून राज्य करीत असे व माणसासारखा बोलतही असे हीहि कथा जर कायम राहिली, तर काय होण्याचा संभव आहे बरें? अर्थात् ह्या दोन्ही गोष्टी अगदीं खऱ्या आहेत असें त्या रानट्यांस वाटणार आहे, आणि म्हणून त्यांच्यापैकीं एकादा माणूस त्याची जर प्रतिमा मनांत आणूं लागला किंवा प्रत्यक्ष बनवूं लागला तर अर्धा सर्प व अर्धा मा-

णूस अशीच बनवील. तद्वतच मालागासीमधील लोकांत राद्रामा हा मोठा बैल असून राजा व देवहि होता अशी जी दंतकथा आहे तिचाहि परिणाम असाच होणार आहे, म्हणजे तिजपासून बैलाचें शरीर व माणसाचें डोकें अशासारखी आकृति बनण्याचा संभव आहे.

अशा प्रकारच्या देवतेची उत्पत्ति होण्यास आणखी एक कारण होत असतें. प्राणिरूपी कांहीं पूर्वजांबद्दल अशा दंतकथा असतात कीं त्यांनीं दुसऱ्या जातीच्या मादीशीं किंवा मनुष्यजातीच्या स्त्रीशीं लग्न केलें होतें. अशा ठिकाणीं त्या लग्नापासून झालेली संतति अर्धवट इतर प्राणी व अर्धवट माणूस अशा प्रकारची होती असें वाटण्याचा सहज संभव आहे. आल्यूशन लोकांत अशा प्रकारची समजूत होती असें बँक्राफ्ट सांगतो. त्यांच्यांत कुत्रीचा व एका वृद्ध माणसाचा संयोग होऊन अर्धवट श्वान व अर्धवट माणूस अशी जात उत्पन्न झाली असें समजतात. किरगीझ लोकांत ह्याच्या उलट दंतकथा आहे; म्हणजे मनुष्य जातीची स्त्री व कुत्रा ह्यांजपासून संमिश्र संततीची उत्पत्ति वर्णिलेली आहे. ह्यावरून कुत्र्याच्या तोंडाचीं माणसें, किंवा माणसाच्या तोंडाचे कुत्रे, अशा प्रतिमा सहज उत्पन्न होणार आहेत.

अर्धवट सुधारलेल्या लोकांत संमिश्र देवता कशा उत्पन्न होतात हें यावरून ध्यानांत येणार आहे. चालडियन व बाबिलोयन लोकांचा 'नेर्गल' नांवाचा पंखांचा नृसिंह हा सामान्य देव होता, आणि 'निन' नांवाचा मत्स्यदेव असून त्याचें डोकें व पाय माणसाचे होते. त्यांच्याच शेजारच्या फिलिस्टाईन लोकांत 'डेगॉन' नांवाचा

असलाच एक देव असून त्याचें तोंड व हात माणसाचे असत व शेंपटी माशाची असे. आसिरियन लोकांत पंखांचा नरवृषभ असे.

१७५. ईजिप्शान लोकांत पितृपूजा फार वाढलेली असल्यामुळें त्यांच्यामध्यें माणसांचे पूर्वज इतर प्राणी होते ह्या गैरसमजाचे सर्व परिणाम एकत्र दृष्टीस पडतात. त्यांच्यांतील निरनिराळ्या टोळ्यांचे निरनिराळे पूज्य प्राणी होते, व ते एकमेकांच्या पूज्य प्राण्यांचा तिरस्कार करीत. प्राण्यांवरून नांवें देण्याची चाल त्यांच्यामध्यें पुष्कळ कालपर्यंत होती. त्यांच्या राजांचीं वैशेषिक नांवें मानवी असून शिवाय टोपण नांवें प्राणिवाचक असत. त्यांच्या पूज्य प्राण्यांचीं कांहीं नांवें व माणसांतील सन्मानार्थक नांवें हीं एकच असत. ते माणसाच्या प्रेताप्रमाणेंच जनावरांचींहि प्रेतें मालमसाला भरून सुकवून ठेवीत. त्यांच्यांत प्राणिदेवता होत्या, आणि संमिश्रदेवताहि पुष्कळ प्रकारच्या होत्या.

कांहीं ठिकाणीं ह्याच्या उलट समजूत दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, सालिशा, निस्क्वाली व याकिमा या लोकांत अशी समजूत होती कीं पशू, मासे, व कंदमुळें ह्या सर्वांचे मूळ उत्पादक मानवी प्राणी होते. टोपण नांवाचा भलताच अर्थ केल्यानें अशी कल्पना सहज होण्यासारखी आहे. एकाद्या जातीच्या मूल स्थापकाचें टोपण नांव जर आस्वल हें असलें, व त्याच्या पराक्रमामुळें त्याचें नांव जर दंतकथेनें कायम राहिलेलें असलें तर ती जात आस्वलापासून झाली किंवा त्या स्थापकापासून आस्वलें उत्पन्न झालीं, ह्यांतून कोणताहि गैरसमज उत्पन्न हो-

ण्याचा संभव सारखाच आहे. निरनिराळ्या लोकांच्या पुराणांतून प्राण्यांचीं व माणसांचीं रूपांतरें झाल्याच्या ज्या गोष्टी आहेत त्यांचें मूळ बहुधा हेंच असावें.

मानवी स्त्रियांस इतर प्राणी झाल्याबद्दल ज्या गोष्टी सांगण्यांत येतात, त्यांचाहि उगम हाच असला पाहिजे. लण्डूमधील लॅण्डडायाक लोक नागास मारणें पाप समजतात. कारण, " त्यांची एक पूर्वज स्त्री सात वर्षें गर्भार राहिलेली असून तिला पुढें जुळें झालें, एक मानवी प्राणी व एक नाग." बटेव्हियन लोकांत अशी समजूत आहे कीं " स्त्रियांस पुष्कळ वेळां जुळीं होत असून त्यांतील एक सुसर असते. " ह्यावरून असा संभव दिसत नाहीं काय कीं जुळ्यापैकीं एकास सुसर हें टोपण नांव प्राप्त होऊन त्यापासून पुढें ही विलक्षण दंतकथा उत्पन्न झाली असावी.

प्राणिवाचक नांवाचा उपयोग जर मानवी वैशेषिक नांवाच्या पूर्वी करावयास लागले असतील, वैशेषिक नामें उत्पन्न झाल्यावर प्राणिवाचक नामांचा उपयोग बंद न होतां जर त्यांचा व यांचा एकत्र उपयोग व्हावयास लागला असेल, आणि नंतर कांहीं काळानें प्राणिनामें बंद होऊन मानवी आडनांवें विशेषेंकरून उपयोगांत आलीं असतील, तर त्यावरून असें अनुमान निघतें कीं पशुदेवता प्रथम उत्पन्न होतात, अर्धवट पशु व अर्धवट मानव देवता मागून उत्पन्न होतात, आणि केवळ मानवाकार देवता मागून उत्पन्न होतात. निरनिराळ्या लोकांच्या पौराणिक कथांचीं संमिश्रणें होऊन घोंटाळे उत्पन्न झाले असल्यामुळें ही गोष्ट सिद्ध करणें क-

ठीण आहे, पण ज्या लोकांत प्राणिवाचक टोपण नांवाच्या प्रघात फार असेल त्यांच्यांत अशीच स्थिति झाली असली पाहिजे असें मानण्यास कारण दिसतें.

१७६. असो. ह्या एकंदर विवेचनावरून, तर मग, असें ठरतें कीं आपला मूळ पूर्वज इतर प्राणी होता असें मूळ माणसास वाटण्यास तीन कारणें होतात.

मृत आप्ताचा दुय्यम आत्मा पूर्व स्थानाप्रत कधीं कधीं येतो असें प्रथम मानूं लागतात; एरवीं तेथें निजणाऱ्या लोकांस स्वप्नांत तो कसा दिसावा? 'बरें, कांहीं प्राणी असे दिसतात कीं ते बहुधा घरांतून शिरतात, आणि पुनः रात्रीचे गुप्तपणें शिरतात. ह्यावरून काय दिसतें बरें? अर्थात् असें दिसतें कीं ते प्राणी म्हणजे ते दुय्यमच असले पाहिजेत. अशा रीतीनें आफ्रिका, एशिया व अमेरिका ह्या खंडांतील लोकांचा समज सर्पाच्या संबंधानें विशेषतः अशा प्रकारचा होऊन जातो आणि तेथें पुजलेल्या सर्पांचा विशेष घरांतून प्रवेश करणें हाच सामान्यतः असतो, आणि अशाच रीतीनें मानलेल्या पालींचा, पक्ष्यांचा व इतर जंतूंचा हाच विशेष असतो.

भूत हें कधीं कधीं घरांतून येत असून शिवाय प्रेतांसन्निधहि टेहळीत असतें असें समजण्यांत येतें. अशा रीतीनें प्रेतें पुरण्याच्या गुहांतून आढळणारे प्राणी हेहि मृतांच्या आत्म्यांनीं धारण केलेले आकार म्हणून मानण्यांत येऊं लागतात. वाघळें व घुबडें हे सपक्ष आत्मेच होत असें मानण्यांत येऊं लागतें, आणि त्यांजपासून पुढें दुष्ट भुतें व देवदूत ह्यांच्या कल्पना उत्पन्न होतात.

शेवटीं प्राणी आणि पूर्वज ह्यांचें तादात्म्य उत्पन्न

होतें, व त्यास कारण आलंकारिक रीत्या योजिलेल्या नांवाचा शब्दशः अर्थ करणें हें होय. प्राणी आणि त्याचें नांव दिलेला माणूस ह्यांच्यांतील भेद पुढल्या पिढ्यांना पोंचविण्याचें सामर्थ्य रानटी भाषांतून नसतें. म्हणून ते दोहोंचा गोंधळ करूं लागतात; त्यापासून पूर्वज समजून प्राण्यांबद्दल कळवळा उत्पन्न होऊं लागतो; व त्यापासून प्राणिपूजेची उत्पत्ति होते. प्राणिरूपी देवतांची कल्पना ह्या कृतीवरून स्पष्ट होऊन शिवाय इतर कांहीं चमत्कारिक समजांचाहि तिजवरून उलगडा होतो.— उदाहरणार्थ, अर्धवट प्राणी व अर्धवट माणूस असल्या देवतांचा, बोलणाऱ्या व इतर रीतींनीं माणसांशीं व्यवहार करणाऱ्या प्राण्यांचा, प्राणिरूपान्तराचा, इत्यादि.

भेदावर भेद उत्पन्न होऊन, आणि त्यांपासून असंख्य घोंटाळे व भिन्नभाव उत्पन्न होऊन, उत्क्रांतितत्त्व मूळ बीजापासून अत्यन्त भिन्न असे पदार्थ उत्पन्न करीत असतें, आणि पिशाचमंतर्पणापासून उत्पन्न होणारी जी प्राणिपूजा तें त्याचेंच एक उदाहरण होय.

प्रकरण तेविसावें

वनस्पतिपूजा

१७७. उपास, ताप, हिस्टेरिया किंवा वेड इत्यादि कोणत्याहि प्रकारचा मोठा उत्क्षोभ झाला म्हणजे तो अंगांत संचार करणाऱ्या भुतानें केला असें रानटी व अर्धवट सुधारलेले लोक ह्यांस वाटतें: ही गोष्ट १२३ ते १३१ ह्या कलमांत आपल्या नजरेस आलीच आहे. कांहीं मादक पदार्थाच्या योगानें उत्पन्न झालेला जो मानसिक उत्क्षोभ त्याचेंहि कारण हे लोक हेंच समजतात. त्यांस वाटतें कीं, सविलेल्या घन किंवा द्रव पदार्थांत कोणी तरी दैविक सत्त्व अमून त्यानें ती स्थिति उत्पन्न केली आहे.

अफू खाणारावद्दल बोलत असतां व्हाम्बेरी म्हणतो— मला अत्यंत आश्चर्य वाटलें तें हें कीं, ह्या भिकारी लोकांस ते मोठे धार्मिक म्हणून समजत, आणि खुदा व पैगंबर ह्यांजवरच्या त्यांच्या भक्तीमुळें ते वेडे झाले, व क्षुब्ध स्थितींत आपण त्यांच्या अधिक सन्निध जाऊं ह्या हेतूनें ते अफूचें सेवन करितात असें समजत. मांडींगो लोकांच्या संबंधानेंहि अशीच समजूत आहे कीं देवाजवळ जाण्यासाठीं ते झिंगत असतात; म्हणजे काय तर मनाचा होणारा जो उत्क्षोभ त्यास दैविक स्फूर्ति म्हणून समजतात. पापुआ बेटांतील एका रानट्यास जेव्हां खिस्त्यांच्या देवीबद्दल सांगण्यांत आलें तेव्हां तो जो म्हणाला कीं हा तुमचा देव तुमच्या दारूंत असलाच पाहिजे, कारण ही मी पुष्कळ प्यालों म्हणजे मला जितकें

मुख वाटतें तितकें एरवीं कधींच वाटत नाहीं, तें त्यान स्पष्ट ह्याच समजानें म्हटलें.

तर मग ज्या वनस्पतींपासून मद्यें निघतात त्यांच्या संबंधानें कांहीं समजुती ह्यांपासून उत्पन्न होत नसतील काय? होय, उत्पन्न झाल्याच पाहिजेत, आणि शोध केल्यास त्या आपणांस कळून येणार आहेत.

१७८. पेरू देशांत तंबाकूला पवित्र औषधि असें म्हणत. कोका नांवाची उत्साहजनक दुसरी एक वनस्पति आहे तिच्यासंबंधानेंहि असाच समज आहे. पेरूव्हियन लोक अद्यापिहि ती फार पूज्य मानितात. इन्कांच्या कारकीर्दींत ती सूर्याला वहात असत, आणि हा अर्पणविधि चालला असतां त्यांचा महोपाध्याय हुइलाक उमू हा तिचें पान चावीत असे. चिबूचा लोकांतहि कोका ही वनस्पति स्फूर्तिकारक आहे असें समजून उपाध्याय तिचें सेवन करीत; आणि कांहीं लोक अंगांत भविष्यकथनशक्ति यावी म्हणून तंबाकू खात व ओढीत. उत्तर अमेरिकेंत कांहीं लोक कांहीं विषारी वनस्पतींत कांहीं गुप्त गुण आहेत असें समजून त्यांस फार पूज्य मानितात. आणि हल्लीं फिलिपाइन बेटांत इग्नेश्यस ह्या वनस्पतीचें बीज, ज्यांत स्ट्रिक्निया असतो व ज्याचा औषध म्हणून उपयोग करितात तें, ताईत म्हणून वापरतात आणि त्याच्यांत अद्भुत चमत्कार घडविण्याची शक्ति आहे असें समजतात.

वेदांतील सोम ही वनस्पति देवता असून ती उत्साह व शक्ति देते, आणि काव्य करण्याचीहि स्फूर्ति उत्पन्न करिते असें समजंत हें सर्वश्रुतच आहे. पारशी लोकां-

च्या झेंदावेस्तामध्येंहि अशीच कल्पना दृष्टीस पडते. तेथें सोम हें नांव नसून होम असें आहे, तथापि त्याचे गुणधर्म तसेच असून त्याचीहि देव समजून ते लोक पूजा करीत असत.

मादक पदार्थ उत्पन्न करणाऱ्या वनस्पतींत दैविक सत्त्वें असतात ही जी कल्पना तिचीं आणखीहि उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, द्राक्षलता ही होय. ग्रीक ग्रंथकार युरिपाइडिस हा "बॅकी" (मद्य देवता) नामक आपल्या ग्रंथांत असें म्हणतोः—"द्राक्षाचा आसव हा दुःखितांचीं दुःखें नाहींशीं करितो. तो जन्मतः देव असून त्याचे घुटके देवांस अर्पण करितात. तो भविष्यवक्ताहि आहे. कारण त्याचें सेवन केलें म्हणजे अंगांत मद येऊन पुढचें दिसूं लागतें."

१७९. वनस्पतींच्या ठिकाणीं मानवी व्यक्तित्वाचा आरोप करणें, आणि त्यामुळें त्यांची पूजा करावयास लागणें, ह्याचीं अन्यहि कारणें आहेत; त्यांपैकीं एकाचा एथें विचार करूं.

१४८ व्या कलमांत आमाझूलू लोकांच्या विश्वकल्पनेंतून कांहीं उतारे देऊन विशेष कालावे त्यांचा काय अर्थ करितो तें सांगितलें, व म्हटलें कीं, अधिक स्वाभाविक अर्थ पुढें आपल्यास कळणार आहे. ही जास्त स्वाभाविक उपपत्ति त्यांच्याच दंतकथेवरून निष्पन्न होते असें नाहीं, तर त्यांच्या शेजाऱ्यांच्या दंतकथांशीं तुलना करून पाहतां त्यावरूनहि निष्पन्न होते.

माणसांचें निर्मितिस्थान गुहा हें होय असें इतर ठि-

काणांप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंतहि समजतात हें अगोदर दाखविलेंच आहे. त्याचीं आणखीहि उदाहरणें देतां येतील. बेचुआना लोक असें म्हणतात कीं उत्तरेकडे बाकोन नांवाचा प्रदेश आहे, तेथून आमचा देव मारिमो, माणूस, आणि निरनिराळ्या जातींचीं सर्व जनावरें, हीं एका गुहेंतून आलीं, आमि तेथें त्यांचीं पावलें खडकावर अद्यापि उमटलेलीं दिसतात. बासूटो लोकांत माणसें व इतर प्राणी पृथ्वीच्या पोटांतून एका गुहेच्या द्वारावर आलीं असें समजतात, आणि तीं एका पाणथळ जाग्यांत बोरूचें वेट होतें तेथून आलीं, असेंहि समजतात. सारांश कोठें गुहेला महत्त्व दिलेलें दृष्टीस पडतें, आणि कोठें बोरूच्या बेटाला दिलेलें दृष्टीस पडतें.

आमाझूलू लोकांत ह्यावरून बोरूची पूजा उत्पन्न झालेली दिसत नाहीं; आणि आलीकडचे पूर्वजांची पूजा करून अगदीं प्राचीन पूर्वजांची ज्या अर्थीं ते करीत नाहींत त्या अर्थीं ही गोष्ट ठीकच आहे. पण डमारा नांवाची जी दुसरी आफ्रिकन जात आहे ती एका झाडाला पूजते, व तें झाड आपलें मूल उत्पादक होय म्हणून समजते.

कांगोमधील लोकांतहि ते वृक्षांपासून उत्पन्न झाल्याची दंतकथा आहे; आणि असेंहि सांगतात कीं ज्या रानांतून तेथील राजकुल आलें त्याचीहि लोक नंतर पूजा करीत असत. तात्पर्य, ह्या ठिकाणीं रानांतून येणें व झाडापासून उत्पन्न होणें ह्या दोहोंचा गोंधळ केलेला दृष्टीस पडतो, आणि त्यामुळें सगळें रान व त्यांतील एक झाड हीं दोन्ही पूज्य झालेलीं दृष्टीस पडतात.

१८०. प्राणिपूजेप्रमाणें वनस्पतिपूजेचाहि तिसरा उगम भाषाविषयक आहे; पण त्याचा विचार करण्यापूर्वी भाषेच्या ज्या व्यंगांमुळें तो उत्पन्न होतो तिकडे वाचकांचें लक्ष पुरविलें पाहिजे.

पाल्ग्रेव्ह म्हणतो आरबी भाषणांत हिरवा, काळा व उदी ह्या रंगांचा पुष्कळ वेळां गोंधळ करितात. हंटर म्हणतो सांताळी भाषेंत वेळास शब्द नाहीं. कामस्चाडेल लोकांत सूर्य व चंद्र यांना एकच शब्द आहे, आणि मासे व पक्षी ह्यांना बहुतेक शब्दच नाहीं. ह्यावरून अपक्व भाषांच्या अंगीं एकादी वस्तु व तिचें नांव दिलेला माणूस ह्यांच्यांतील भेद ओळखण्याचें सामर्थ्य नसतें ह्या म्हणण्यास जोर येतो.

पण ह्या गोष्टीचा असा अजमासच करीत बसण्याचें कारण नाहीं; ती प्रत्यक्षच सिद्ध होते. कारण अपक्व भाषांतून नांव असा शब्दच नसतो; मग नांव देण्याची क्रिया ह्याला शब्द असण्याची गोष्ट कशास पाहिजे? इजिप्शान भाषेंत देखील माझें नांव आणि मी नांव देतों, ह्यांतील भेद दाखविण्याचें समर्थ्य नव्हतें. तात्त्विकदृष्ट्या पाहतां नांव हा शब्द खुणांची खूण आहे. एकादा शब्द नांव आहे अशी कल्पना उत्पन्न होण्यापूर्वी, कांहीं विशिष्ट आवाजाचा कांहीं विशिष्ट वस्तूशीं साहचर्यसंबंध आहे एवढीच त्याज्याविषयीं कल्पना झाली पाहिजे असें नाहीं, तर त्याच्या अंगीं त्या वस्तूची कल्पना इतरांच्या मनांत उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे अशीहि त्याज्याविषयीं कल्पना झाली पाहिजे. पण अपक्व भाषांतून सामान्य वाचक व तात्त्विक शब्द इतके कमी असतात कीं

त्यांच्यांत निरनिराळ्या जातींच्या झाडांना जरी शब्द असले तरी झाड असा सामान्य शब्द नसतो. डमारा लोकांत एका नदीच्या प्रत्येक घांटास निराळा शब्द आहे, पण सगळ्या नदीस शब्द नाहीं; तेव्हां सामान्य नदीवाचक शब्द मुळींच नाहीं हें काय सांगावें ? ह्याच्यापेक्षांहि विलक्षण उदाहरण चिरोकी लोकांत अंगाचें निरनिराळे भाग व इतर वस्तू हीं धुण्यास तेरा निरनिराळे शब्द आहेत, पण सामान्यतः धुणें ह्यास शब्द नाहीं. ह्यावरून नांव ही तात्त्विक कल्पना उत्पन्न होण्यास सामाजिक व भाषाविषयक किती सुधारणा झाली पाहिजे हें लक्षांत येईल.

आणि ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावाहि आहेच.. रीपस्टार्फ नांवाच्या गृहस्थानें कांहीं रानटी भाषांचे शब्दकोश तयार केले आहेत, त्यांवरून निकोबार, टेरेसा आणि आंदामान, एथील भाषांतून नांव यास शब्द नाहीं असें स्पष्ट दिसतें.

ह्यावरून काय अनुमान काढावयाचें तें उघडच दिसत आहे. नांव ह्यालाच जर भाषेंत शब्द नाहीं, तर त्या भाषेंत दंतकथांचें कथन करणारास एकादी वस्तु, व तिचें नांव दिलेला माणूस, ह्यांच्यांतील भेद सांगतां येणार नाहीं हें उघड आहे. असें असल्यामुळें काय गोंधळ होतो हें आतां आपणास वनस्पतिपूजेच्या संबंधानें पाहणें आहे.

१८१. तास्मेनियन लोकांत सभोंवतालच्या स्वाभाविक वस्तूंवरून व गोष्टींवरून पुरुषांचीं व बायकांचीं नांवें ठेविलेलीं असत; उदाहरणार्थ, कांगारू, बर्फ, गार,

मवगर्जना व वारा. हिंदुस्थानांतील पहाडी लोकांतून अशीच स्थिति आहे; उदाहरणार्थ, क्यारेन लोकांत कापूस व पांढरा कापूस अशीं माणसांचीं नांवें आहेत. उत्तर दक्षिण अमेरिकेंतहि तीच स्थिति आहे. आरावाक लोकांत तंबाकू, तंबाकूचें पान, तंबाकूचें फूल, अशीं नांवें आहेत; आणि पेरूव्हियन लोकांतील एका इन्काचें नांव सायरी, म्हणजे तंबाकूचा वृक्ष, असें होतें.

आतां या गोष्टीबरोबर दुसरी एक गोष्ट ध्यानांत आणावयाची ती ही कीं, प्यूब्लो लोकांच्या ज्या अनेक जाती आहेत त्यांपैकीं एकीस तंबाकूच्या झाडाची जात असें नांव आहे. ह्यावरून माणसास झाडाचीं नांवें दिल्याचा परिणाम काय होतो हें स्पष्ट दिसतें. ह्याच लोकांच्या इतर कांहीं जातींस आस्वल, लांडगा, सर्प, ससा इत्यादि नांवें आहेत.

आतां एकादा प्राणी मूळ उत्पादक समजला जाऊन त्याची जर पूजा सुरू होते, तर तशाच समजल्या जाणाऱ्या वनस्पतीचीहि होऊं लागेल हें सहजच आहे. आतां जनावराइतकी माणसांचें बरें वाईट करण्याची शक्ति वनस्पतींत नसल्यामुळें ही गोष्ट कदाचित् इतकी स्पष्टपणें होणार नाहीं हें खरें आहे, पण कांहीं वनस्पती ज्या पवित्र मानिल्या जातात त्यास कारण हेंच असावें हें उघड आहे.

माणसांचे मूळ उत्पादक प्राणी किंवा वनस्पति आहेत, अशी जशी समजूत कोठें कोठें आहे, तशीच वनस्पतींचीं व प्राण्यांचीं मूळ उत्पादक माणसें होतीं अशीहि कोठें कोठें समजूत आहे; ही गोष्ट मागें सांगितलीच आहे, व

तिची उपपत्ति कशी करावी ह्याचाहि निर्देश केला आहे. त्या गोंधळास आणखी एक कारण होतें तें आतां सांगतों. कित्येक लोकांत अशी चाल आहे कीं मुलावरून आईबाप आपणास नांवें घेत असतात; जसें अमक्याचा बाप किंवा अमक्या अमक्याची आई. आतां एकाद्या मुलाचे जर एकाद्या प्राण्यावरून किंवा वनस्पतीवरून नांव पडलेलें असलें तर बापाचें नांव " कांसवाचा बाप " किंवा आईचे नांव " मक्याची आई " असें सहज पडणार, आणि त्यावरून त्या प्राण्याचा किंवा वनस्पतीचा मूल उत्पादक माणूस होता अशी समजूत पुढें उत्पन्न होणार. तद्वतच मुलांसहि त्यांच्या विशेष गुणावरून नांव देण्याची अशीच चाल दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, कुणाचेन लोकांत एकादा मुलगा कामांत चपळ असला तर त्यास " चपळाईचा बाप " असें नांव देतात, एकादी मुलगी बोलण्यांत हुशार असली तर तीस " बोलकेपणाची आई " असें नांव देतात. तद्वतच फार फार गोऱ्या मुलीस " शुभ्र कापसाची आई " असें नांव पडतें, इ०.

अरब लोकांतहि अशीच चाल आहे. असो; तर मग, ह्यावरून केवळ प्राणी व वनस्पती ह्यांचेच केवळ नव्हत, तर इतर वस्तूंचेहि पूर्वज माणूस होते अशी समजूत उत्पन्न होण्यास कशीं कारणें होतात हें ह्यावरून स्पष्ट दिसतें.

१८२. वनस्पतींस आत्मे असतात ही समजूत व त्यावरून उत्पन्न होणारी वनस्पतिपूजा, हीं वर सांगितलेल्या एका किंवा अन्यमार्गानें उत्पन्न झालेलीं आहेत, ह्याबद्दल एक अप्रत्यक्ष प्रमाण सांपडतें तें आतां सांगतों.

कांहीं लोक असें म्हणतात कीं वनस्पतींना आत्मे असतात ही कल्पना पिशाचकल्पनेच्या मागून उत्पन्न झालेली नाहीं, तर अगोदरचीच आहे, आणि सर्व वस्तूंना द्युय्यम असतात असें मानण्याची अपक्व मनांची जी प्रवृत्ति तिजवरून ती उत्पन्न झालेली आहे. पण अशी वास्तविक स्थिति असती तर वनस्पतीच्या आत्म्याच्या आकाराबद्दल कल्पना निराळी झाली असती. रानटी माणूस पुरुष, स्त्री, किंवा मूल ह्यांच्या द्युय्यमांच्या आकारांची जी कल्पना करितो, ती त्यांच्या सारखीच करितो; पण वनस्पतींच्या द्युय्यमाच्या आकाराची वनस्पतीसारखी करीत नाहीं, किंवा वनस्पतीचे इतर गुणधर्महि त्याच्या ठिकाणीं समजत नाहीं.

पूर्वदेशांत बोलणाऱ्या झाडांच्या गोष्टी आहेत; म्हणजे झाडांच्या अंगीं जी शक्ति नाहीं ती त्यांच्यांत संचारणाऱ्या द्युय्यमाच्या अंगीं लाविलेली ह्यां ठिकाणीं आढळून येते. कांगो लोक आपल्या पवित्र झाडांच्या बुंध्याशीं त्यांस तहान लागूं नये म्हणून मद्यपात्रें भरून ठेवितात; सारांश मृतांना जें करितात तेंच ते ह्या झाडांना करितात. मेक्सिकोमध्यें पवित्र झाडांना दांत आणि केंस लावून ठेवितात; आडाकूडामध्यें झाडांना कोंबडीं, बदकें अडकवून ठेवितात, आणि सांताळ लोकांत त्यांस नैवेद्य अर्पण करितात. ह्या सर्वांवरून संतर्पण करितात तें झाडाचें नसून त्यांतील आत्म्याचें होय हें स्पष्ट दिसतें.

पण प्रत्यक्ष पुरावा ह्यापेक्षांहि जास्त निर्णायक सांपडतो. सारावाक लोकांत अशी समजूत आहे कीं माणसांस कधीं कधीं झाडांचें स्वरूप येतें. लॅण्डडायाक लोक

पवित्र झाडांच्या शेजारीं बांबूच्या वेद्या उभारितात व तेथें ठेविलेला नैवेद्य त्या झाडांतील भुतांस चढून खातां यावा एतदर्थ त्यांस शिड्या लावून ठेवितात. इरोक्वाइस लोक धान्यें, दाणे, इत्यादिकांचे आत्मे सुंदर ललनाकार आहेत असें समजतात.

ह्या सर्व गोष्टी वनस्पतिपूजा पिशाचपूजेच्या अगोदर उत्पन्न झाली ह्या कल्पनेशीं जुळत नाहींत, तर ती मागून उत्पन्न झाली ही जी ह्या ठिकाणीं प्रतिपादिलेली कृति तिच्याशींच जुळतात.

१८३. सारांश, मूर्तिपूजा व प्राणिपूजा ह्यांप्रमाणेंच वनस्पतिपूजा पूर्वजपूजेचा एक भरकटलेला प्रकार आहे; म्हणजे बाहेरून तो बराच निराळासा दिसतो; पण दोघांचेंहि अंतःस्वरूप एकच आहे. त्याची वाढ जरी तीन निरानिराळ्या दिशांनीं होते तरी उगम एकच आहे.

कांहीं प्रकारच्या वनस्पती किंवा त्यांचे अर्क ह्यांनीं उत्पन्न होणारे जे उत्क्षोभ ते इतर उत्क्षोभांप्रमाणेंच आत्मे किंवा भुतें उत्पन्न करितात अशी समजूत प्रथम उत्पन्न होते. जेथें हा उत्क्षोभ सुखकारक असेल तेथें त्या पदार्थांत संचरणारा आत्मा उपकारक आहे असें समजलें जातें, आणि हळूहळू त्यास प्रशस्त्य व प्रार्थ्य अशा देवतेचें स्वरूप येऊं लागतें.

विशिष्ट वृक्ष किंवा वनस्पति जेथें विशेष असतील अशा ठिकाणांहून मूळ आलेले लोक तेथून आल्याची जी दंतकथा तीस, न समजतां, तेथून उत्पन्न झाल्याच्या दंतकथेचें स्वरूप देतात; कारण ह्या दोन गोष्टींतील भेद दाखविणाऱ्या शब्दांची त्यांच्या भाषांत वाण असते.

म्हणून ते वृक्ष आपले पूर्वज होत अशी त्यांची समजूत बनते, व ते त्यांस पवित्र मानूं लागतात.

व्यक्तींस वनस्पतींचीं नांवें देण्याचा जो प्रघात तोहि भ्रममूलक समजुतीस कारण होतो. आणि दोन्ही एकच आहेत अशी एकदां पक्की समजूत झाली म्हणजे प्राणि-पूर्वज किंवा मानवी पूर्वज ह्यांच्यासारख्याच ह्या वनस्पतिपूर्वजांबद्दल कल्पना व मनोवृत्ती बनूं लागतात.

एवंच पिशाचकल्पना जशी इतर प्रकारच्या देव-भोळ्या समजुतींचा उलगडा करिते तसाच ह्याहि प्रकारच्या समजुतींचा करिते; आणि असा जर त्यांचा उलगडा न केला तर त्या धारण करणारांच्या माथीं असा कांहीं मूर्खपणा लादावा लागतो कीं तो ह्या रानटी माणसांच्याहि माथीं मारणें वाजवी होणार नाहीं.

प्रकरण चोविसावें

सृष्टिपूजा

१८४. ह्या मथाळ्याचा शब्दशः अर्थ केल्यास त्यांत गेल्या दोन प्रकरणांतील विषयांचा समावेश होतो, पण त्याचा औपचारिक अर्थ घेतल्यास तो जास्त आकुंचित आहे; म्हणून त्याअर्थीं ह्या प्रकरणांत विशेष ठळक अशा जडपदार्थांविषयीं व शक्तीविषयीं ज्या भोळ्या समजुती त्यांचा विचार करण्याचें योजिलें आहे.

दुसऱ्या कृतींनीं जो घेरलेला नसेल त्यास ह्या समजांची उत्पत्ति व आतांपर्यंत निरूपिलेल्या समजांचीं उत्पत्ति ह्यांमध्यें साहश्य दृष्टीस पडेल असा वाचकाचा सहजच अंदाज होणार आहे. आतां ह्या ठिकाणीं पूज्य वस्तूचें मृताच्या आत्म्याशीं तादात्म्य समजण्यास पूर्वीच्या इतकीं कारणें सांपडणार नाहींत हेंहि त्याच्या लक्षांत येणार आहे. कांहीं प्राण्यांप्रमाणें सूर्य व चंद्र पूर्वीच्या घरीं येत नाहींत किंवा प्रेतें पुरण्याच्या गुहेभोंवतींहि घिरट्या घालीत नाहींत; म्हणून त्यांस ह्या कारणावरून मृतांचे आत्मे असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं वनस्पतींप्रमाणें समुद्र आणि पर्वत सेवन करतां येत नाहींत किंवा ते उत्क्षोभहि उत्पन्न करूं शकत नाहींत; म्हणून त्यांना जे देव समजतात ते ह्या कारणास्तव, असें म्हणतां येणार नाहीं. पण दंतकथांचा आणि नांवांचा भलताच अर्थ करणें किंवा होणें हें जें कारण तें मात्र

दोन्ही ठिकाणीं सारखेंच लागू पडण्यासारखें आहे. म्हणून त्या दृष्टीनें ह्या सृष्टिपूजेचा विचार केला पाहिजे. पण तसें करण्यापूर्वी अपक्व भाषांचें आणखी एक व्यंग वाचकांच्या नजरेस आणून दिलें पाहिजे, जें इतर व्यंगांबरोबर हे भोळे समज उत्पन्न करण्यास कारण होतें.

मिसेस **सामरव्हिली** ही बाई आपल्या स्मरणवहींत आपल्या छोट्या भावाबद्दल असें म्हणते कीं सन १७८३ चा मोठा धूमकेतू पाहून तो ओरडून म्हणाला, आई तो पहा चंद्र पळून जात आहे. ह्या ठिकाणीं जडाच्या गतीस सजीवाच्या गतीचा वाचक शब्द जो लाविला आहे तसली चूक मुलें व रानटी लोक वरचेवर करीत असतात. मुलें ही चूक करितात ह्यास कारण त्यांच्याशीं संबंध ठेवणारीं जीं माणसें व इतर प्राणी त्यांच्याच संबंधाचे शब्द त्यांच्या भाषेंत मुख्यत्वेंकरून येत असतात. रानटी माणसांचीहि गोष्ट अशीच असते. आफ्रिकेच्या मध्यभागांतील जे नीग्रो लोक पश्चिम किनाऱ्यापर्यंत लिव्हिंगस्टन बरोबर आले, त्यांनीं परत गेल्यावर समुद्रापर्यंत आपण गेलों होतों ही गोष्ट अशा रीतीनें सांगितली:—" जग आह्मांस म्हणालें, मी संपलों, ह्यापुढें माझें कांहीं नाहीं. " आशांटीच्या लढाईंत एका बातमीदारानें वाटाड्यास विचारिलें, ब्यूला शहर नजीकच आहे, नाहीं काय ? त्यानें उत्तर केलें, " होय, ब्यूला त्या डोंगराच्या पलीकडच्या बाजूस राहतो. " तसेंच बेचुआनामधील एक सरदार कसालिस यास म्हणाला, " एक गोष्ट नेहमीं दुसरीचा मुलगा असते; ही त्यांची वंशावळ आपण कधीं विसरतां कामा नये. " सारांश, सा-

मान्य सिद्धान्त असा आहे कीं, जितकी भाषा जास्त दरिद्री तितकी जास्त लाक्षणिक असते; आणि त्यापासून दुसरा एक सिद्धान्त असा निघतो कीं, भाषेंत मानवी व्यवहारदर्शक शब्द प्रथमच येत असल्यामुळें, तिची जगांतील इतर वस्तूंच्या संबंधानें वाढ व्हावयास लागली म्हणजे त्या व्यवहाराचे वाचक शब्द त्या वस्तूंच्या संबंधानें प्रथम लावूं लागतात. ह्या व्यंगामुळें व पूर्वीं सांगितलेल्या इतर व्यंगांमुळें रानटी भाषेंत निर्जीवाला सजीवाचें स्वरूप देण्याचा प्रचार सुरू होतो. एकादा जड गोळा पूर्वीं मानवी प्राणी होता, किंवा हल्लीं त्याच्यांत मृत माणसाचें भूत रहात आहे असा संशय येण्यास कांहीं कारण झाल्यास, सजीवसंबंधी शब्दाचा उपयोग करण्याच्या ह्या अुवश्यकतेमुळें त्या संशयास जोर येतो. एरवीं केवळ लाक्षणिक शब्दांच्या अुपयोगानें असा संशय येत नाहीं. "पृथ्वी म्हणाली मी संपलें." असें म्हणणारा नाग्रा ता सजीव प्राणी आहे असें तेवढ्यावरूनच समजतो असें नाहीं. सांगण्याचा मुद्दा एवढाच आहे कीं, एकादी जड वस्तु सजीव आहे असा संशय अन्य कांहीं कारणानें आल्यास हा सजीवसंबंधी शब्दांचा प्रयोग तो दृढ करितो.

असा भलताच समज होण्याचें आणखी एक कारण असें असतें कीं अपक्व भाषेंत त्याच त्याच शब्दाचा प्रयोग निरनिराळ्या अर्थीं होत असतो. उदाहरणार्थ, आफ्रिकेंतील वानीका लोकांस त्यांच्या भाषेंतील मुलुंगू शब्दाचा अर्थ विचारतां, एक म्हणाला, मेघगर्जना; दुसरा म्हणाला, आकाश; तिसरा म्हणाला, रोग उत्पन्न

करणारा एक जीव; चवथा म्हणाला, परमेश्वर; आणि कांहीं म्हणाले, प्रत्येक माणूस मरणानंतर मुलुंगू बनतो. ह्यावरून, सृष्टींतील मोठमोठ्या वस्तु सजीव आहेत असें रानट्यांस सहजच कसें वाटूं लागतें हें लक्षांत येईल.

सृष्टींतील ठळक ठळक वस्तूंना व शक्तींना सचेतन समजून त्यांजविषयीं जी पूज्यबुद्धि उत्पन्न होते त्यास कारण भाषाविषयक चुका होत असें एथें म्हटलें आहे; ह्यावरून पौराणिक कथावाद्यांची कृति आह्मांस मान्य आहे असें कोणास वाटेल, तर तसें समजूं नये. कारण त्यांच्या मतेंहि भाषाविषयक चुका हेंच जरी ह्या पूज्यबुद्धीबद्दल कारण आहे, तरी त्या चुका निराळ्या जातीच्या आहेत, व त्याजमुळें उत्पन्न होणाऱ्या चुकीच्या समजुतींची दिशा उलट आहे. हे वादी असें म्हणतात कीं, सृष्टींतील शक्ती प्रथम अपौरुष समजूनच पूजिल्या जातात, आणि नंतर त्यांना लाविलेल्या शब्दांच्या कांहीं विशेष गुणधर्मावरून त्या पौरुष समजल्या जातात; आणि ह्या सृष्टींतील शक्तींशीं एक समजलेल्या पुरुषाबद्दलच्या कथा मागून उत्पन्न होतात. ह्याच्या उलट आह्मी असें म्हणतों कीं, मानवी पौरुषेयता ही मूळ गोष्ट आहे; तिचें सृष्टींतील एकाद्या वस्तूशीं किंवा शक्तीशीं जें तादात्म्य समजलें जातें, त्यास कारण नांवाचा एकवटपणा हा होय; आणि त्या शक्तीची जी पूजा उत्पन्न होते ती मागून उत्पन्न होते.

ह्या दोन उपपत्तिसरणी किती परस्परविरुद्ध आहेत हें स्पष्टपणें लक्षांत यावें म्हणून एक उदाहरण घेऊन दाखवूं.

१८९. सर्व हिवाळाभर सुंदर सूर्यज्योति कृष्ण चं-

डवात पाठीस लागल्यामुळें एकसारखी छपून बसत होती, कधीं ढगांच्या मागें आणि कधीं पर्वतांच्या खालीं. ती जेव्हां जेव्हां म्हणून हळूच तोंड बाहेर काढी, तेव्हां तेव्हां चंडवात मोठी घनगर्जना करून तिच्या पाठीस लागलाच धांवून लागत असे, व त्यामुळें तीस पुनः पडद्यामागें जावें लागे. पण पुष्कळ पंधरवडे निघून गेल्यावर चंडवात तिच्यामागें कमी जोरानें लागूं लागल्यामुळें ती त्यास अधिक स्पष्ट दिसूं लागली, व त्यामुळें तो पूर्वीपेक्षां जास्त सभ्य झाला. आणि सूर्यज्योतीस जास्त धीर येऊन ती कधीं कधीं जास्त वेळ दृश्य राहूं लागली. पाठीस लागून सांपडत नाहीं असें पाहून, आणि तिच्या सौंदर्यानें मऊ होऊन, तो जास्त नम्रपणें तिच्याशीं सलगी करावयास खटपट करूं लागला. शेवटीं त्यांचा संगम झाला. नंतर पृथ्वीस आर्द्र उबारा मिळूं लागून आनंद होऊं लागला; आणि त्यांच्यापासून वनस्पती जन्मास येऊन तीस त्यांनीं आच्छादून टाकिलें आणि पुष्पांनीं प्रफुल्लित केलें. पण प्रत्येक वर्षाऋतूंत चंडवात क्रुद्ध मुद्रा करूं लागतो व गुरगुरूं लागतो; सूर्यज्योति त्याच्यापासून दूर पळून जाऊं लागते, आणि तिचा पाठलाग पुनः सुरू होतो.

असें समजा कीं तास्मेनियन लोक अर्धवट सुधारलेल्या स्थितींत असून त्यांच्या पुराणांत अशा प्रकारची कांहीं कथा आढळून आली; तर पौराणिक कथावादी असें म्हणूं लागतील कीं उन्ह व वादळ मिश्रित असलीं म्हणजे जे परिणाम दृष्टीस पडतात त्यांचें हें आलंकारिक वर्णन कोणीं केलें; आणि सूर्यज्योति व चंडवात हीं पौ-

रुपस्वरूप धारण करून एकाकाळीं पृथ्वीवर रहात होतीं असें जें त्यां वर्णनास अखेरीस स्वरूप आलें त्यास कारण पौराणिक कथा उत्पन्न करण्याची जी माणसाची स्वाभाविक प्रवृत्ति ती होय, व ती ह्याठिकाणीं ही कथा बनवितांना ह्या शब्दांच्या लिंगाचें धोरण घेती झाली.

आतां तास्मेनियन लोकांच्या ह्याच कल्पित कथेची उपपत्ति आमच्या दृष्टीनें कशी होते तें पहा. पूर्वी आम्हीं सांगितलेंच आहे कीं रानटी लोकांत जन्माच्या वेळच्या गोष्टीवरून मुलांचीं नांवें ठेवीत असतात; व ह्या गोष्टींमध्यें दिवसाची घडी आणि हवेची स्थिति ह्यांचा समावेश होत असतो. ह्याप्रमाणें " ढकलत जाणारा ढग " " चांदणी रात्र " " गारांचा पाऊस " इत्यादि नांवें इंडियन लोकांत सांपडतात; क्यारेन लोकांत, " सायं संध्या, " " उगवता चांद " इत्यादि सांपडतात. तद्वतच प्लूरानालूना (सूर्यज्योति) असें टास्मेनियन बाईचें नांव असतें. तद्वतच गारा, मेघगर्जना, वारा, इत्यादि नांवें त्या लोकांत आहेत. सारांश, वरील कथेची उपपत्ति ह्या दृष्टीनें अशी होते कीं चंडवात व सूर्यज्योति हीं माणसांचीं नांवें प्रथम पडलीं. पुढें ह्यांचा व त्या नांवांनीं दर्शित अशा सृष्टिचमत्कारांचा घोंटाळा होऊं लागला, आणि शेवटीं त्या चमत्कारांस पौरुषस्वरूप येऊन, ते माणसापासून उत्पन्न झाले व माणसासारखीच कृति करितात, अशी दंतकथा उत्पन्न झाली; आणि तीस पिढीपिढीला त्या सृष्टचमत्कारांशीं जास्त जास्त अनुरूप असें स्वरूप येऊं लागलें.

आतां ह्या दोन कुलचांपैकीं कोणती कृति मनोविषयक नियमांस आणि निरनिराळ्या जातींच्या प्रत्यक्ष इ-

तिहासास जास्त धरून आहे ह्याचा विचार करूं.

१८६. सुधारलेल्या माणसाची बुद्धि काय, व रा-. नटी माणसाची बुद्धि काय, एकंदर बुद्धीप्रमाणें पदार्थ, गुण, क्रिया इत्यादिकांचें सजातीयांशीं वर्गीकरण करूनच ती चालत असते. बुद्धीची ही जी नैसर्गिक प्रवृत्ति तिच्यावरूनच ही गोष्ट असंभवनीय ठरते कीं रानटी माणसें विभिन्न वस्तू सदृश म्हणून एकाच वर्गांत घालतील. ज्या ज्या मानानें त्यांच्यांतिल वैसदृश्य जास्त असेल त्या मानानें त्यांस एकांच समूहांत गोंवण्याला जास्त निरोध उत्पन्न होईल. म्हणून अगदीं परस्परभिन्न वस्तू जर एकाच जातीच्या म्हणून समजल्या जात असतील तर तसें होण्यास मनाची प्रवृत्ति तिकडे करणारें कांहींतरी जबरदस्त कारण झालें पाहिजे.

आतां माणूस आणि पर्वत ह्यांच्यामध्यें काय सादृश्य आहे बरें? ते दोन्ही द्रव्यघटित आहेत ह्यापलीकडे दुसरें कांहींच सादृश्य दिसत नाहीं. एक मोठा विस्तृत आहे, दुसरा अगदीं लहान आहे; एकाला बहुतेक मुळींच आकार नाहीं, व दुसऱ्याचा समग्रमाण आकार आहे; एक अचल आहे, दुसरा चल आहे; एक थंड आहे, दुसरा उबदार आहे; एक घन आहे, दुसरा अगदीं लिवलिवित आहे; एकाला अंतर्रचना असल्यास फारच अल्प आहे, व तीहि अनियमित आहे, दुसऱ्याला अंतर्रचना फार असून ती फार नियमित आहे. म्हणून त्यांस मनानें सजातीय मानणें हें विचाराविषयक नियमांच्या अगदीं उलट आहे. करितां त्यांच्यावर लादलेला जो जन्यजनक संबंध तो खरा वाटण्यास अमर्याद विश्वासच

पाहिजे. तथापि कांहीं विधानांचा चुकीचा अर्थ होऊन हा समज उत्पन्न होत असतो.

प्रथम ब्यांक्राफ्टच्या ग्रंथामधला हा उतारा वाचा:-

" सृष्टीचा निर्माता " इकानम् " हा चिनूक लोकांचा एक प्रबल देव आहे, आणि त्यानें एका पर्वतावर आपल्यास दगड करून घेतलें ह्या समजुतीवर त्यांनीं त्यास त्याचें नांव दिलें आहे. "

" क्यालिफोर्नियन लोकांचा असा समज आहे कीं नाव्हाजो लोक सान्ज्युआन् नदीजवळील एका पर्वताच्या पोटांतून बाहेर आले. "

" मेक्सिकोचे रहिवाशी क्याकाटेपेक नांवाच्या एका टेंकडीस भेटावयास जात असत, कारण ते म्हणत ती आमची आई आहे. "

पर्वताची पूजा रानट्यांत कशी उत्पन्न होते ह्याचें एक कारण वरील उतऱ्यांत दृष्टीस पडतें. तें हें कीं तेथून ती जात आली, तो त्या जातीचा उगम आहे, जनक आहे, असें त्यांस वाटतें, आणि असें वाटण्याचें कारण हें कीं ह्या निरनिराळ्या शब्दांतील भेद त्यांच्या भाषेस व्यक्त करतां येत नाहीं. त्या जातीचे मूळ वंशज त्या पर्वतावरील गुहेंत रहात असले पाहिजेत, किंवा तेथून ते निघाले असले पाहिजेत. हा कल्पनासंबंध अन्यत्रहि दृष्टीस पडतो. हिमालयावरून निघून खालच्या सखल प्रदेशांत पसरलेले पुष्कळ लोक आपलीं मृत माणसें त्या पर्वताच्या शिखरांवर परत रहावयास जातात असें समजतात. कांहीं लोक आपण त्यापासून जन्मास आलों असें समजून त्याची पूजा करितात.

फार लांब कशाला ? खुद्द सुधारलेल्या इंग्रजी भाषेंत डिसेंड् (descend) शब्दाचे दोन अर्थ आहेत; उंच जाग्यावरून सखल जाग्यावर येणें, किंवा पूर्वजापासून उत्पन्न होणें; आणि कोणता अर्थ कोठें घ्यावयाचा हें पूर्वापर संबंधावरून ठरवावें लागतें. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां कांहीं ठिकाणीं पर्वतपूजा उत्पन्न होण्याचें कारण पर्वतांपासून अन्यत्र जाणें, व पर्वतापासून जन्मास येणें, ह्या दोन गोष्टींचा गोंधळ होणें हें असलें पाहिजे. वनस्पतिपूजेची उपपत्ति गत प्रकरणांत दिली आहे ती च्यावरून हिला जोर येतो व हिच्यावरून तिला येतो.

असल्या कल्पना उत्पन्न होण्यास कदाचित् आणखी एक भाषाविषयक कारण असेल. पर्वत व महापर्वत हीं रानटी लोकांत मोठीं मानाचीं नांवें म्हणून समजतात. उदाहरणार्थ, सामोआमधील पांगोपांगो ह्या राजास ती पदवी आहे. आराक्केनियन लोकांत पर्वत हें आडनांवच आहे.

१८७. हालचाल तेवढी वजा करतां समुद्राच्या ठिकाणीं माणसाशीं पर्वतापेक्षांहि कमी सादृश्य आहे. स्वरूप, द्रवता, आकारविहीनता, ह्या सर्व गोष्टींनीं तो माणसापासून जास्तच भिन्न आहे. असें आहे तरी समुद्राची पूजा प्राचीनकाळीं जगाच्या पश्चिम भागांत आणि पूर्व भागांतहि सुरू झालेली आहे. पेरूव्हियन लोकांबद्दल आ-च्यागा म्हणतो कीं सेरा डोंगरांतून जे जे खालीं मैदानांत येतात, ते ते समुद्र नजीक आला कीं त्यास पूजितात, भिंक्याचे केंस उपटून त्यास अर्पण करितात, आणि आजार येऊं नये म्हणून त्यास प्रार्थितात. ही भोळी समजूत कोठून उत्पन्न झाली ?

एकाद्या स्थानापासून निघणें, व त्याच्या पोटीं जन्मास येणें, ह्या दोहोंचा गोंधळ होऊन पर्वत आणि रान ह्यांची पूजा उत्पन्न झाली असें अनुमान आपण केलें आहे. समुद्रपूजा कांहीं ठिकाणीं असल्याच्च धर्तीवर उत्पन्न झाली असावी असें दिसतें. इंग्रजींत खलाशांस जरी सीमेन् (समुद्र माणसें) असें नांव आहे तरी त्या लोकांच्या व्यवस्थित ज्ञानवत्तेमुळें व पक्क भाषेमुळें त्याचा कोणी शब्दशः अर्थ घेत नाहीं. तथापि एकाद्या रानटी माणसांच्या देशाच्या किनाऱ्यावर जर अपरिचित माणसें अपरिचित ठिकाणांहून आलीं, आणि त्यांस समुद्राचीं माणसें ह्या नांवानें उल्लेखूं लागले, तर तीं समुद्रांतून वर आलीं किंवा समुद्राच्या पोटीं जन्मास आलीं, अशा प्रकारची दंतकथा तेवढ्यावरून उत्पन्न होण्याचा फार संभव आहे. " समुद्राचीं माणसें " ह्याच्या ऐवजीं " समुद्राचीं मुलें " एवढा फरक सहज होणार आहे; आणि त्यावरून समुद्र हा त्यांचा जनक किंवा पिता अशी दंतकथा सहज उत्पन्न होणार आहे. ह्याबद्दल खात्रीलायक पुरावा सांपडत नाहीं; तथापि अप्रत्यक्ष सांपडतो. तो हा कीं, १८०० च्या सुमारास इरोक्वाइस लोकांत एक धर्मसुधारक उत्पन्न झाला होता. त्यास " सुंदर सरोवर " असें नांव होतें; आणि सरोवर हें जर विशेषनाम होऊं शकतें तर समुद्रहि होऊं शकणार आहे. शिवाय पेरूव्हियन लोकांपैकीं कांहीं जातींचे लोक समुद्र आपला पूर्वज म्हणून म्हणत हें १६४ व्या कलमांत सांगितलेंच आहे.

१८८. समुद्र व पर्वत ह्यांपेक्षांहि माणसाशीं अगदीं

कमी सदृश असें उदाहरण आपणास पाहिजे असल्यास तें प्रातःसंध्या किंवा उषा हें होय; कारण तीस आकार नाहीं इतकेंच नव्हे, तर ती स्पर्शक्षमहि नाहीं. तर मग तीस पौरुष स्वरूप येण्याचें कारण काय झालें असावें ?

उषा हें जन्माचें वेळीं दिलेलें नांव आहे ह्याबद्दल स्पष्ट पुरावा सांपडतो. जन्माच्यावेळीं होणाऱ्या गोष्टींवरून मुलांस नांवें देण्याची चाल रानट्यांत आहे हें आधीं आपल्या नजरेस आलेंच आहे. लुपी लोकांत मुलाचें नांव 'सकाळ' ठेविलेलें ह्यान्सस्टेड ह्यानें पाहिलेलें आहे. तसेंच न्यूझीलंदांत एका मावरी सरदाराचें नांव " रंगीहिआटा " (स्वर्गीय सकाळ) असें होतें, दुसऱ्याचें स्वर्गीय वीज असें होतें. सारांश, उषा किंवा सकाळ हें जर माणसाचें प्रत्यक्ष नांव असेल, जर तें सकाळीं जन्मलेल्यांस दिलेलें असेल, तर असल्या एकाद्या प्रसिद्ध माणसाविषयींच्या दंतकथेवरून तो. आणि सकाळ एकच असा समज उत्पन्न होणार आहे.

१८९. ताऱ्यांची पूजा अशीच उत्पन्न झाली असेल काय ? तेहि आपले पूर्वज होत असें रानट्यांस वाटत असेल काय ? असें होणें असंभवनीय दिसतें; तथापि तसें तें आहे असा संशय उत्पन्न होण्यास कारणें दृष्टीस पडतात.

ज्यू लोक ताऱ्यांस सजीव समजत असून, ते कधीं कधीं पाप करितात व नंतर त्यांस शिक्षा होते असेंहि मानीत; ग्रीक लोकांचीहि ते सचेतन आहेत अशी कल्पना असे. रानटी लोकांत ह्याबद्दल ह्याच्या अगोदरचाहि पुरावा सांपडतो. पाटागोनियन लोक म्हणतात कीं तारे हे पूर्वीचे इंदियन लोक होत. फीजी बेटांत असें समजतात

कीं मोठाले पडणारे तारे किंवा अशनी हे देव होत, आणि धाकटाले मृत माणसांचे आत्मे होत. हर्वे बेटांतले लोक समजतात कीं लढाईत मेलेल्या वीरांचीं भुतें पर्वताच्या शिखरावर जाऊन निळ्या आकाशांत उडी मारितात, व तेथें ते ठिपक्यांमध्यें तरंगू लागतात. दक्षिण आस्ट्रेलियन लोक असें समजतात कीं तारासमूह हे मुलांचे समूह आहेत. तास्मेनियन लोकांत अशी कथा आहे कीं विस्तव हा दोघां काळ्या माणसांनीं प्रथम जगांत आणिला, तो त्यांनीं आपल्यामध्यें फेंकिला, आणि कांहीं दिवस पृथ्वीवर राहून नंतर ते आकाशांत गेले, आणि क्यास्टर व पोलक्स (पुनर्वसूंची जोडी) असे दोन तारे बनले. उत्तर अमेरिकन लोक असें समजतात कीं आकाशगंगा हा भुतांचा मार्ग आहे; त्याच्यावरून तीं स्वर्गलोकीं जातात, व त्यांत दिसणारे जे मोठाले तारे ते त्यांनीं मार्गांत पेटविलेले विस्तव होत. ह्यान लोकांपैकीं कांहीं जातींचा असा समज आहे कीं त्यांचे वैदू आकाशांतल्या भोंकांतून वर गेले आहेत व त्यांतून ते खालीं डोकावीत असतात, व तेच तारे.

आतां अशा समजुती कशा उत्पन्न होतात हें नुसत्या कृत्यांवरूनच नक्की सांगणें कठीण जाईल. पण कांहीं कांहीं प्रत्यक्ष घडून येणाऱ्या गोष्टींकडे पाहतां त्यांचा उलगडा अल्पस्वल्प होतो. क्याहाराक्स नांवाच्या एका कालिफोर्नियन जातींत अशी दंतकथा आहे कीं त्यांचा मूळ पूर्वज जो कोयोट (एक जातीचा लांडगा) तो इतका गर्विष्ट होता कीं त्यास एकदां आकाशांतून एका ताऱ्याबरोबर नाचत जाण्याची हांव उत्पन्न झाली. म्हणून

तो एका उंच डोंगरावर जाऊन नजीकच्या. ताऱ्याची प्रार्थना करूं लागला कीं माझा पंजा धरून मला वर ने. "तो ऐकेना; तेव्हां त्यानें भोंकून भोंकून कित्येक रात्री त्यास सारखा त्रास दिला. तेव्हां तो तारा शेवटीं कंटाळून तसें करण्यास कबूल झाला, व त्यानें त्यास वर ओढून नेलें. तेथें नाचतां नाचतां तेथल्या अत्यन्त थंडीनें गारठून कोयोट त्याच्या हातांतून निसटला, व नंतर एक कृष्णवर्ण प्राणी त्या ताऱ्याबरोबर नाचतांना दिसूं लागला, व त्याचें नांव मृत्यु.

आतां अडाणी लोकांत आकाश हें डोंगरावर टेंकलेलें आहे अशी सामान्य कल्पना असते हें ध्यानांत आणतां वर सांगितलेल्या तऱ्हेनें किंवा अन्य तऱ्हेनें तेथें माणसास जातां येईल असें रानटचास वाटणें साहजिक आहे, आणि त्यावरून तारे व माणसें हीं दोन्ही एकच होत असें वाटणेंहि असंभवनीय नाहीं. आकाशांतील निरनिराळ्या तारापुंजांस जीं माणसांचीं व जनावरांचीं नांवें दिलेलीं आढळतात त्यांचाहि ह्यावरूनच उलगडा होण्यासारखा आहे; एरवीं त्यांच्यांत व त्या जनावरांत किंवा माणसांत सांगण्यासारखें कांहींएक साम्य दिसत नाहीं.

तद्वतच विशेष नांवें व लाक्षणिक नांवें ह्यांचाहि ह्या समजुतीशीं संबंध असेल हें संभवनीय आहे. एका आमेझॉन टोळीचें नांव तारे असें आहे. एका डायक सरदाराचें नांव आकाशांतील आस्वल अशा अर्थाचें आहे.

बरें, प्राणीरूपी किंवा मनुष्यरूपी पूर्वज आकाशांत जाऊन तारे बनले ह्या कल्पनेवरून फलज्योतिषाच्या कल्पनेचाहि उलगडा होतो. कारण जातीचा मूळ पुरुष जर

तारा होऊन वर गेला तर तो आपल्या वंशजांबद्दल काळजी करीत राहील असें वाटणें साहजिक आहे, आणि त्यावरून वैर करणाऱ्या टोळ्यांचे पूर्वज वरून दुष्टावा करीत असतील असेंहि वाटूं लागणें असंभवनीय नाहीं. तात्पर्य, दुष्टग्रह व सुष्टग्रह ह्यांची कल्पना ह्यावरून उलगडण्यासारखी आहे.

१९०. आकाशास एकदां पाय लागूं लागले म्हणजे चंद्र हा पुरुष आहे किंवा स्त्री आहे अशी कल्पना कशी उत्पन्न होते हें समजण्यास कठीण पडत नाहीं.

एस्किमो लोकांस असें वाटतें कीं सूर्य, चंद्र, आणि तारे हे मेलेल्या एस्किमोंचे किंवा अन्य प्राण्यांचे आत्मे आहेत, आणि दक्षिण आस्ट्रेलियन लोक असें समजतात कीं सूर्य, चंद्र इत्यादि जिवंत प्राणी असून पूर्वी पृथ्वीवर रहात होते. सारांश, कांहीं नीच जाती सूर्य चंद्राची वगैरे पूजा करीत नसूनहि त्यांस ते पौरुष स्वरूप देऊन आपले पूर्वज मानितात. पण चंद्राचे जीवनवृत्तांत जे सांपडतात ते ह्याच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या लोकांत होत. उदाहरणार्थ, चिब्चा लोक असें समजतात कीं पृथ्वीवर चिया (चंद्रकला) ही दुष्ट उपदेश करीत असे म्हणून तिला स्वर्गीं पाठविलें आणि सूर्याची बायको करून देऊन रात्रीचें तेवढें तोंड बाहेर काढण्याची तीस परवानगी दिली. मेक्सिकन लोकांत अशी दंतकथा असे कीं जो माणूस अग्नींत उडी टाकून सूर्य होऊन वर गेला, त्याच्याबरोबर दुसरा एक गुहेत जाऊन चंद्र बनून बाहेर आला.

चंद्रास पौरुष स्वरूप येण्यास नांवांचा भलताच अर्थ करणें हें कारण झालें असेल काय ? ह्याबद्दल प्रत्यक्ष पु-

रावा सांपडत नसला तरी अप्रत्यक्ष पुराव्यावरूनहि तसा संशय येण्यासारखा आहे. रानटी व अर्धवट सुधारलेले ह्या लोकांत चंद्र हा पुरुष आहे असें न मानतां बहुधा तो स्त्री आहे असें मानिलेलें आढळतें; आणि कवितेमध्यें सुंदर स्त्रीस चंद्राची उपमा दिलेली किंवा चंद्रच म्हटलेलें कितीदां आढळतें हें वाचलेल्या वाचकांस सांगावयास नको. आणि पूर्वकालीं चंद्र ही पदवी स्त्रियांस जर बहुमानार्थ देत असले तर चंद्र म्हणजे एक स्त्रीच आहे अशी दंतकथा उत्पन्न होण्यास काय उशीर लागणार आहे?

आतां ह्या कल्पनेवर रचलेल्या कोटीस प्रत्यक्ष गोष्टीवर बांधलेल्या प्रमाणाचा दुजोरा देऊं. बहुमानार्थ चंद्र या नांवाचा उपयोग होत असो वा नसो, तें पाळण्यांतलें नांव म्हणून आढळतें ह्यावद्दल मुळींच संशय नाहीं. क्यारेन लोकांतल्या असल्या नांवाची मेसननें जी यादी दिली आहे त्यांत पूर्ण चंद्र हें नांव आढळतें. आतां जे लोक जन्माच्या वेळच्या गोष्टींवरून मुलांस नांवें देत असतील—जसे आफ्रिकेंतील वारावरून आणि इतरत्र दिवसाच्या घडीवरून देत असतीत,—त्यांच्यांत चंद्राच्या निरनिराळ्या कलांवरून नांवें पडण्यांत कांहीं अशक्य नाहीं. आतां अशीं एकदां नांवें पडत गेलीं म्हणजे चंद्र व त्या नांवाचा माणूस हे एकच होत असा चुकीचा समज सहज उत्पन्न होण्यासारखा आहे.

दुसरी एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं चंद्रावरून ठेविलेलीं पाळण्यांतील नांवें त्यावेळच्या चंद्राच्या कलेस, म्हणजे जन्माच्या वेळच्या त्याच्या आकृतीस, अनुलक्षून ठेवितील, केवळ चंद्र असें ठेवणार नाहींत;

आणि तशीच वस्तुस्थिति आढळते. उदाहरणार्थ, इजिप्शन लोकांची देवी बुबास्टिस हिचें नांव नूतनचंद्र (कोणी म्हणतात पूर्णचंद्र) असें होतें. सारांश, मोघम 'चंद्र' असें नमून कुलवाचक होतें. ह्या गोष्टींचा उलगडा मोक्षमूलर प्रभृतींच्या कृतीवरून कसा करावयाचा ?

१९१. तारे आणि चंद्र ह्यांप्रमाणें सूर्य हाहि कोणा तरी प्राचीन मानव प्राणी होता अशी समजूत उत्पन्न होऊन त्यास पौरुष स्वरूप येणें साहजिकच आहे.

चंद्रासंबंधी ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या त्यांमध्यें सूर्यविषयक ह्या समजुतीस उल्लेख आलेलाच आहे; आतां त्याबद्दल आणखी कांहीं गोष्टी सांगतों. कोमांची लोक असें म्हणतात कीं आमचा मूळ पूर्वज आमच्यासारखाच पण राक्षसी आकाराचा असून हल्लीं तो सूर्यांत राहतो. त्याप्रमाणेंच चिचिमेका लोक सूर्यास आपला पिता म्हणतात. ओरिनोकोमधील सालीव्हे नामक एका जातींत सूर्यास " वर गेलेला पृथ्वीवरील माणूस " असें म्हटलें आहे. ह्या ठिकाणीं सूर्य प्रथम पृथ्वीवर असून पुढें तो आकाशांत गेला ह्या गोष्टीस सामान्य उल्लेख दिसतो; पण जास्त सुधारलेल्या लोकांत ह्यापेक्षां जास्त स्पष्ट उल्लेख आढळतो. उदाहरणार्थ, एका इंदियन जातीची अशी समजूत आहे कीं सूर्य हा देव असून तो इतका महारोगग्रस्त व रुग्ण होता कीं त्यास जाग्यावरून हालतां येत नसे. तेव्हां इतर देवांस त्याची दया येऊन त्यांनीं एक प्रचंड भट्टी तयार करून तींत त्यास टाकून दिलें, अशासाठीं कीं त्याचा रोग जावा, किंवा त्यास मरण येऊन दुःखांतून त्यानें मुक्त व्हावें. किशी लोकां-

त अशी दंतकथा आहे कीं पुष्कळ दिवस सूर्य नाहींसा झाल्यामुळें मेक्सिकोपासून सहा मैलांवर टिओटिव्हाकान ह्या ठिकाणीं सर्व देव जमले, तेथें त्यांनीं एक अग्नि पेटविला, आणि आपल्या भक्तांस सांगितलें कीं तुमच्यांतला जो प्रथम ह्यांत उडी टाकील तो सूर्य बनून बाहेर येईल.

सूर्यविषयक कथांचें एक कारण जात ज्या दिशेकडून आली असेल तिजसंबंधी लाक्षणिक विधानांचा शाब्दशः अर्थ करणें हें होय. रानांतून आलेले लोक त्यांतील झाडांतून उत्पन्न झाले, आणि दूरच्या डोंगरावरून आलेले लोक त्याच्याच पोटीं जन्मास आले, अशा चुकीच्या समजुती होऊन त्यांची पूजा कशी सुरू होते हें अगोदर सांगितलेंच आहे. सूर्य उगवतो किंवा मावळतो तिकडून आलेल्या लोकांबद्दलहि अशीच समजूत झालेली आढळते. उदाहरणार्थ, मध्य अमेरिकेंतले लोक असें म्हणतात कीं सूर्य उगवतो त्याठिकाणीं आमचे देव राहतात, व ते आपले पूर्वज होतं. डिने किंवा टिने लोकांबद्दल फ्रांक्लिन असें म्हणतो कीं त्यांची प्रत्येक टोळी ज्या नदीवर किंवा तळ्यावर पारध करीत असेल, किंवा ज्या प्रांतांतून आली असेल त्यावरून एक नांव आपल्यास लावीत असते. उदाहरणार्थ, चिपिवायन किल्लुचावरून आलेले लोक " सॉ-ईसॉ-डिने "—उगवणाऱ्या सूर्याकडून आलेले इंदियन—असें आपणांस म्हणवितात.

आतां असल्या नांवावरून अपक्व भाषेच्या लोकांत सूर्यापासून उत्पन्न झालेले असा ह्या लोकांबद्दल सहज समज उत्पन्न होणार आहे. इंग्रज लोक देखील उष्ण कटिबंधांत राहणाऱ्या लोकांस " सूर्याचीं मुलें (Child-

ren of the sun) असें म्हणत असतात. तर मग, ज्यांची भाषा अगदीं अपक्व आहे त्यांनीं पूर्वेकडून येणाऱ्या लोकांस तेंच नांव दिलें तर त्यांत काय नवल ? पेरूव्हियन लोकांसारखे सुधारलेले लोक असें करीत ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. त्यांचे इन्का किंवा राजेलोक पकारी टांपू ह्या ठिकाणाहून आले अशी सार्वत्रिक दंतकथा त्यांच्यांत होती. ती कुझकोमधील होती व तेंच पूर्वेकडील शेवटचें ठिकाण त्यांच्या स्वाधीन प्रथम होतें. पण पुढें जेव्हां त्यांनीं आणखी मुलूख तिकडे जिंकिला, तेव्हां सूर्य त्यांस टिटिकाका ह्या सरोवरांतून उगवतोसा दिसूं लागला, म्हणून ते राजे लोक तेथून आले अशी पुढें दंतकथा उत्पन्न झाली. शिवाय हे इन्का लोक 'सूर्य आपला पूर्वज' ह्या समजुतीमुळें सूर्यपूजक असून, त्यांच्यांतील जो कोणी मरेल तो त्याचा बाप जो सूर्य ह्याच्याकडे जातो, असें त्यांची प्रजा समजत असे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां इन्का लोक पूर्वेकडून आले म्हणून त्यांस सूर्यज समजूं लागले हें उघड दिसतें. त्याचप्रमाणें मेक्सिकोतील लोक त्यांचे स्प्यानिश राजे पूर्वेकडून आल्यावरून त्यांस सूर्याचे पुत्र म्हणून म्हणत.

पूर्वीप्रमाणें ह्याठिकाणींहि नांवाचा भलताच अर्थ करणें हें अशी समजूत उत्पन्न होण्यास एक कारण आहे. उदाहरणार्थ, क्यारेन लोकांत " पिंवळा उगवता सूर्य " असें नांव आढळतें. एस्किमो लोकांत नुसतें " उगवता सूर्य " असें नांव आहे. दुसरी गोष्ट अशी कीं सूर्यावरून जीं पाळण्यांतलीं नांवें दिलीं आहेत तीं वेळास अनुलक्षून दिलेलीं आहेत, उदाहरणार्थ, उगवता

सूर्य, मावळता सूर्य, इत्यादि; पण जीं बहुमानार्थ दिलेलीं आहेत तीं त्याची गुणदर्शक आहेत; उदाहरणार्थ, विजयी सूर्य, तेजस्वी सूर्य, इत्यादि.

१९२. सूर्याच्या कांहीं दंतकथांत सूर्यास लांडगा, चपलपाद, सिंह, इत्यादि विशेषणें दिलेलीं आढळतात; तीं सूर्याच्या दृश्य गुणधर्मांशीं जमत नाहींत; त्यांचा अर्थ असा समजावयाचा कीं तीं सूर्यास लाविलेलीं नाहींत, तर ज्याला सूर्य म्हटलें त्याचींच मुळचीं इतर विशेषणें होत; व पुढें कांहीं कालानें तो व सूर्य हे दोघे एकच समजले जाऊन तीं सूर्यासहि लावूं लागले. ह्याबद्दल इजिप्शन लोकांच्या जुन्या इतिहासांत चांगला पुरावा सांपडतो. तेथें दुसरा राम्सीस ह्याच्या विजयांचें वर्णन करीत असतां इतर विशेषणांबरोबर त्यास सूर्य व मोठा वृषभ हीं विशेषणें लाविलीं आहेत, आणि शेवटीं देवहि म्हटलें आहे. ह्या उदाहरणावरून इंद्रासारख्या देवाची कथा कशी उत्पन्न होते हें स्पष्ट दिसतें. कारण, इंद्रालाहि विजयी वीर, वृषभ व सूर्य, अशीं विशेषणें लाविलेलीं आढळतात.

१९३. एवंच असें स्पष्ट ठरतें कीं इतर पूजांप्रमाणें सृष्टिपूजाहि पितृपूजेवरूनच मूळ उत्पन्न झालेली आहे. फरक इतकाच कीं ती इतर पूजांपेक्षांहि पितृपूजेहून जास्त भिन्न झालेली आहे.

कांहीं अंशीं, जातीच्या जन्मभूमींतील कांहीं विशेष-वस्तु जातीची जनक समजली गेल्यामुळें, कांहीं अंशीं, पाळण्यांतील नांवांचा शब्दशः अर्थ करूं लागल्यामुळें, आणि कांहीं अंशीं, प्रशंसापर विशेषणांचाहि तसाच

अर्थ करूं लागल्यामुळें, पर्वत, समुद्र, प्रातःकाळ, नक्षत्रें आणि सूर्य चंद्र, हे माणसांचे जनक अशा समजुती उत्पन्न झाल्या आहेत; आणि त्यामुळें रानटी लोक पितरांप्रमाणें ह्यांनाहि रक्त, मांस, व इतर खाद्यें, ह्यांचे बळी देत असतात.

प्रकरण पंचविसावें

देवता

१९४. गेल्या पांच प्रकरणांत देवतांची उत्पत्ति कशी होते ही गोष्ट अप्रत्यक्ष रीत्या इतक्या पूर्ण रीतीनें निरूपिली आहे कीं, तीच गोष्ट प्रत्यक्ष रीत्या एका निराळ्या प्रकरणांत सांगण्याची जरूरी दिसत नाहीं. पण ज्यांच्यामध्यें मानवी पुरुषांचें अंतर्धान बरेंच झालें आहे अशा देवतांचें निरूपण जरी आतांपर्यंत आलें आहे, तरी अमल्या व्यक्तींस केवळ देववेल तितकें उत्तम स्वरूप देऊन व त्यांच्या गुणधर्मांचा विस्तार करून ज्या देवता बनतात त्यांचें निरूपण केलेलें नाहीं.

हा शेवटचा देवतावर्ग जो आहे तो इतर वर्गांबरोबरच अस्तित्वांत येत अमून, शेवटीं सर्वांत जास्त महत्त्वाचा बनतो. जोंपावेतों सभोंवतालच्या वस्तूंवरून मापसांस नांवें देत होते तोंपावेतों ते दंतकथेंत माणूस म्हणूनच राहत नव्हते; आणि त्यामुळें त्यांची पूजा जी होऊं लागली ती त्या वस्तूंची म्हणूनच होऊं लागली. परंतु वस्तूंचीं नाहींत अशीं विशेषनामें जेव्हां उत्पन्न झालीं तेव्हां माणसें स्वरूपानेंच दंतकथेंत राहूं लागलीं. तेव्हां मग भुतांचीं मनुष्य ह्या रूपानें स्वरूपें कायम राहूं लागलीं, आणि अशा रीतीनें मानवरूपी देवतावर्गाची उत्पत्ति झाली.

विसाव्या प्रकरणांत ह्या देवतांच्या उत्पत्तीचें दिग्दर्शन केलें आहे; आणि इतर प्रकारच्या देवतांचें उत्क-

मण इतका वेळ सांगितल्यामुळें आतां ह्या प्रकारच्या देवतांचें उत्क्रमण सांगण्याचा समयच आला आहे.

१९५. आकार किंवा चेष्टा ह्यांनीं कांहीं विलक्षण दिसलें कीं प्राण्याप्रमाणेंच रानटी माणूसहि त्यास भितो. त्यास वाटतें कीं ह्या दृश्य विलक्षण गुणांप्रमाणेंच त्याच्या अंगीं दुसरे कोणते विलक्षण गुण आहेत कोण जाणे. परिचित सामर्थ्यांतून जास्त अशा ह्या सामर्थ्यांपासून त्यास धोका वाटतो; आणि अशी भीति आपणास वाटत आहे अशा रीतीनें त्या विलक्षण सामर्थ्यांच्या मालकाशीं तो वागूं लागतो. जें जें त्यास समजणार नाहीं तें तें त्यास लोकोत्तर किंवा दैविक वाटतें. बेचुआनामधील माणसांच्या दृष्टीस प्रथम जेव्हां तारूं पडलें तेव्हां ते म्हणाले, ही खरोखर अनिर्मित वस्तु आहे, ही आपोआपच झाली असली पाहिजे, ही माणसाच्या हातून झालेली नव्हे. विलक्षण असेल त्यांस दैविक समजावयाचें हें जसें वस्तूंच्या संबंधानें खरें आहे तसेंच माणसांच्या संबंधानेंहि आहे. उत्तर अमेरिकेंतील इंदियनास जें कांहीं समजणार नाहीं त्यास तो भूत म्हणतो आणि विशेष बुद्धीच्या माणसासहि ते भूतच म्हणतात.

ह्यामुळें पुष्कळ रानटी भाषांतील देववाचक शब्द, खुबी न समजणारी वस्तु आणि शक्ति न समजणारा माणूस ह्या दोघांसहि सारख्याच रीतीनें लाविलेला आढळतो. फीजीयन भाषेंत देवास कालाव् असा शब्द असून तो पाहिजे त्या मोठ्या किंवा अद्भुत वस्तूस लावितात. त्यामुळें ते छापण्याच्या यंत्रास जसे देव समजतात तसेच युरोपियनांसहि देवच म्हणतात. मालागासी लोक

आपल्या राजास देव म्हणतात, आणि विलक्षण वस्तूंसहि देवच म्हणतात. त्यांच्या मतें रेशीम, तांदूळ, पैसा, बीज, मेघगर्जना, आणि, भूकंप, हे सगळे देवच होत. पुस्तक म्हणजे देवच, आणि मखमल हा देवाचा मुलगा. मनुष्यपूजक जे टोडालोक त्यांचीहि गोष्ट अशीच आहे.

सुधारणेच्या पहिल्या पहिल्या पायऱ्या चढत असतां माणसांस इतक्या चमत्कारिक रीतीनें देव ही संज्ञा दिलेली कशी आढळते ही गोष्ट आतां आपणास समजण्यास कठीण पडणार नाहीं. त्या लोकांत तिचा अर्थ आपल्याप्रमाणें नसल्यामुळें ते ती जिवंत व मृत अशा अनेक प्रकारच्या प्रबल माणसांस सहजीं लावीत असतात. कशी ती पहा.

१९६. ज्यांचें वर्चस्व कमींत कमी निश्चित आहे अशा व्यक्तींपासून आपण सुरवात करूं. म्हणजे ज्या व्यक्तींस इतर लोक किंवा ते स्वतःच इतरांपेक्षां मोघम चांगले म्हणून समजतात, त्यांचा विचार अगोदर करूं.

वर सांगितलेल्या टोडा लोकांत ह्याचें चांगलें उदाहरण सांपडतें. त्यांच्यांतील पालाल म्हणजे पवित्र गवळी किंवा उपाध्याय यांचें वर्णन करीत असतां कर्नल मार्शल त्याच्याशीं झालेल्या संभाषणाचा एक भाग असा देतोः—

"मीं विचारिलें टोडा लोक सूर्यास नमस्कार करितात हें खरें आहे काय? तो म्हणाला, होय, ते गरीब बिचारे करितात खरे, पण (छातीवर हात मारून) मी, मी देव, मी कशास सूर्यास नमस्कार करूं?" शिवाय ध्यानांत ठेवावयाचें तें हें कीं पलाल स्वतः देव असल्यामुळें त्यालाच तेवढी देवाचें नांव घेण्याची मुभा

आहे, इतरांस नाहीं. ज्याच्या अंगीं कांहीं अनिश्चित श्रेष्ठ गुण असेल त्यांस देवपणास चढाविण्याची ही प्रवृत्ति मध्यअमेरिकेंतील लोकांतहि दृष्टीस पडते. तालतीक एथील इंदियन लोक अशा एका देवाचें पूजन करीत असल्याबद्दल माँटगॉमरी असें वर्णन करितोः—

"हा एक वृद्ध इंदियन होता; त्यास त्यांनीं विलक्षण पोषाक देऊन एका झोंपडींत बसाविलें होतें; तेथें ते त्याची पूजा करावयास जात व त्यास नैवेद्य अर्पण करून त्यांच्या पौराणिक चालीस अनुसरून कांहीं धर्मविधी करीत."

अशा रीतीनें आपणांपैकीं एकास भिऊन जाऊन तो आपलें हिताहित करूं शकेल या समजुतीनें त्याची पूजा करणारे लोक देवतेची स्थापना करतील हें उघडच आहे. कारण सामान्य भूत म्हटलें कीं त्याची जर भीति वाटत असते, तर जिवंतपणीं नामांकित असलेल्या माणसाच्या भुताची भीति जास्तच वाटणार. पिशाचपूजेची उत्पत्ति बहुधा नेहमींच अशा रीतीनें होत असली पाहिजे. आमाझुलू लोक कुटुंबाचा मूळ पूरुष म्हणून जो अगदीं प्राचीन पूर्वज आठवत असेल त्याची पूजा कशी करितात हें मागें सांगितलेंच आहे, आणि त्याचा अर्थ असा कीं हा मूळ पुरुष कोणत्या तरी रीतीनें आपणापेक्षां श्रेष्ठ होता. काममूचाडेल लोकांत असेंच आहे. ते म्हणतात, कट हा (ज्यास ते कधीं कधीं देव म्हणतात व कधीं कधीं मूळपुरुष म्हणतात) प्रत्येक नदीवर दोन दोन वर्षें रहात असे, व ज्या नदीवर जीं मुलें उत्पन्न होतील त्यांस ती नदी तो देत असे.

विलक्षण माणसाच्या कल्पनेपासून देवतेची कल्पना कशी भिन्न होऊं लागते हें ह्यावरून सामान्य रीत्या दृष्टीस पडतें. आतां हीच कल्पना विशिष्ट रीतीनें कशी उत्पन्न होते ह्याचा विचार करूं.

१९७. श्रेष्ठ आणि दैविक ह्या कल्पना जर प्रथम एकच असतील, तर टोळींतील मुख्य किंवा राजा हा जिवंतपणींच देव व्हावयास लागेल, आणि मरणानंतर मोठाच देव बनून जाईल. आतां असें वास्तविक होतें ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावाच सांपडतो.

एक मावरी सरदार आपण पृथ्वीवर जन्मास आलेलों नाहीं, आणि मरणानंतर आपले पूर्वज जे देव तिकडे आपण जाऊं, असें म्हणत असे, ह्या गोष्टीस पूर्वीं उल्लेख आलाच आहे. पोलिनिशियामध्यें इतरत्रहि अशीच स्थिति आहे. सेमोसेमोचा नाईक तुइकिलाकिला म्हणाला, मी देव आहें. फीजीयन लोक वरच्या दर्जाचा सरदार आणि द्वय्यम प्रतीचा देव हे बहुतेक एकच समजतात. ताहितीयन लोकहि देवासारखीच राजाची स्तुति करीत असतात. "राजाच्या घरास ते "आवराई" किंवा आकाशांतील ढग असें म्हणतात, तो ज्या बोटींतून जातो तीस "आनुआनुआ" किंवा इंद्रधनुष्य असें म्हणतात, त्याच्या शब्दास मेघगर्जना म्हणतात, आणि त्याच्या घरांतील मशालींच्या उजेडास वीज म्हणतात." आफ्रिकेंत अशीच स्थिति आहे. बेनीन प्रांतांत राजा म्हणजे देवाचा पृथ्वीवरील केवळ प्रतिनिधि नव्हे, तर प्रत्यक्ष देवच समजला जातो; आणि त्याची लोक दोन्ही स्वरूपीं पूजा करितात. "लोआंगो एथील

राजास देवासारखा मान मिळतो, व त्यास साम्बा व पांगो किंवा देव असें म्हणतात." सांबाराचे लोक म्हणतात, आह्मी सर्व आमच्या झंबीचे (राजाचे) गुलाम आहों, व तो आमचा मुलुंगु (देव) आहे. प्राचीन अमेरिकन लोकांचीहि अशीच समजूत असे. बरें रानटी लोकांतच असें आहे असें नाहीं; तर सुधारलेल्या आर्य लोकांताहि तशीच स्थिति होती. पूर्वेकडील ग्रीक राजांना वेद्या उभारीत इतकेंच नाहीं, तर त्यांच्या नाण्यावर देव असा छाप असे; रोमन बादशहांची जिवंतपणींच पूजा होत असे, आणि प्रिन्स आव् वेल्स (हल्लींचा सातवा एडवर्ड) जेव्हां हिंदुस्थानांत आला होता तेव्हां एथील कवींनीं त्यास देवाचा अवतार म्हणण्यास कमी केलें नाहीं.

आतां अशा रीतीनें श्रेष्ठ माणूस व देव हे एकच समजले जाऊन राजांची व नायकांची जिवंतपणीं पूजा सुरू झाली म्हणजे मरणानंतर तीस जास्तच जोराचें स्वरूप येतें हें सांगावयास नको च. पेरू देशांत राजा मेला कीं लागलाच तो देव समजला जात असे, आणि त्याला नैवेद्य, पुतळे, वगैरे मुरू होत. सांडविच बेटांतील लोक आपल्या पुराण राजांपैकीं एकाच्या आत्म्यास आपली कुलदेवता समजत. टोंगा एथें मृत सरदारांचे आत्मे हे दुसऱ्या प्रतीचे देव समजले जात. न्यूझीलंदर लोक असें समजत कीं आपले कित्येक मोठाले नाईक मरणानंतर देव बनलेले आहेत; आणि दुष्ट कृत्यांबद्दल पृथ्वीवर ज्या शिक्षा भोगाव्या लागतात त्या सर्व ते पाठवितात. आफ्रिकेंतहि अशीच स्थिति आहे. डेहामीमध्यें जिवंत राजे मृत राजांकडे बातमी पाठविण्यासाठीं

गुलाम मारितात. हें मागें सांगितलेंच आहे. म्हणजे काय, तर, मृत राजे हे देव बनले आहेत असें त्यांच्यांत समजतात.

सारांश, प्राचीन काळच्या ऐतिहासिक जातींतून म्हणजे इजिप्शन, बाबिलोनियन वगैरे लोकांतून राजांचे देव बनविण्याची जी पद्धति होती ती त्यांनीं रानटी स्थितींतूनच आणिलेली होती.

१९८. पण राजे व टोळ्यांचे मुख्य यांनीं दाखविलेली जी शक्ति तेवढीच शक्ति जगांत आहे असें नाहीं. म्हणून श्रेष्ठ म्हणजे दैविक असा जर अर्थ असेल, तर राजे नसतां एरवींहि जे श्रेष्ठ असतील तेहि देव म्हणून मानिले जाणारच. ह्याबद्दलहि प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, जादूगार आणि इतर विलक्षण कौशल्याचे लोक, ह्यांसहि अद्दाणी लोक देव बनवितात.

वैद्य लोकांस जिवंतपणीं देव समजल्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा फारसा सांपडत नाहीं. जेथें वैद्य हाच राजकीय दुष्ट्या टोळीचा मुख्य असेल तेथें मात्र दोन्ही स्वरूपीं त्याचें समाराधन केलेलें आढळतें; उदाहरणार्थ, लोआंगोमध्यें राजा हा देव असून तो वाटेल तेव्हां पाऊस पाडितो असें समजतात; म्हणून दिजंबरांत ते त्याच्याकडे पाऊस मागावयास जातात, व प्रत्येकजण कांहीं तरी भेट घेऊन येतो. पण वैद्य मरणोत्तर देवता बनतो ह्याबद्दल पुरावा आहे. इतकेंच नव्हे तर प्रथम जे भुतास भ्यावयास लागतात ते ह्याच्याच होत. पाटागोनियन लोक समजतात कीं फिरणारीं भुतें हे जादूटोणा करणारांचे आत्मे होत. चिपिवाज लोकांचा एक देव मा-

नाशांबो हा आपलें जादूचें पडघम वाजवीत आहे असें त्याचें वर्णन आढळतें. डामारा लोकांत ओमाकूरू हा मर्जीनुरूप पाऊस पाडितो किंवा बंद ठेवितो असें समजलें जाऊन त्याची पूजा होते. सांडविच बेटांतील लोकांत अशी कथा आहे कीं एक माणूस देव बनून वर गेला, व तो आपणास सर्व वनौषधी पुरवितो. चीन देशांतहि वैद्य, जादूगार वगैरे लोकांस देवच समजतात.

वैद्य आणि नूतनकलाशिक्षक ह्यांच्यांत नांवाचाच फरक आहे; कारण सामर्थ्याहून जास्त असें कसलेंहि सामर्थ्य असलें तरी तें रानट्यास दैविकच वाटतें; आफ्रिकेंतील लोकांस लोहार देखील एकप्रकारचा जादूगार वाटतो. म्हणून ज्यांनीं विशेषज्ञानवत्तेमुळें किंवा कौशल्यामुळें आपलें श्रेष्ठत्व स्थापिलें असेल, त्यांना देवपण प्राप्त होणें साहजिकच आहे, आणि तसें तें प्राप्तहि होतें. ब्राझिलियन लोक असें समजतात कीं आपला गुरु टुपान यानें प्रथम शेतकी जगांत आणिली; हा टुपान त्यांच्या जातीचा मूल उत्पादक अमून, त्यांच्या कल्पनेप्रमाणें तो परमेश्वरच होय. चिनूक लोकांत अशी दंतकथा आहे कीं इकानम नामक एका प्रबळ भुतानें त्यांस त्यांच्या केनो नांवाच्या होड्या व इतर सर्व हत्यारें व भांडीं करावयास शिकविलें; तद्वतच त्यानें नद्यांतून मोठाले दगड टाकून, सालमन मासे आपणास धरतां यावे म्हणून त्यांचा मार्ग अडकवून टाकिला. मेक्सिकन लोक समजतात कीं आपला देव क्वेट्झालकोटल हा पृथ्वीवर वास करीत असतां त्यानें आपणास धातूंचे उपयोग, शेतकी, आणि राज्यव्यवस्थेची

कला, हीं शिकविलीं. तद्वतच त्यांच्या समजुतीप्रमाणें चिकोमेकोटल हिनें प्रथम भाकर तयार केली; म्हणून तीसहि त्यांनीं देव बनविलें होतें. मध्य अमेरिकेतील लोकांमध्येंहि, शेतकी, कापड विणणें, लिहिणें, छापणें, इत्यादि कलांचे स्थापक निरनिराळे देव होते. ऐतिहासिक लोकांच्या अगदीं प्रारंभींच्या इतिहासांतहि अस-ल्याच गोष्टी सांपडतात. इजिप्शान लोकांचे देव, ओ-सिरिस, ओम्ट्री, नेफ आणि थॉथ, ह्यांनीं त्यांस वि-विध कला शिकविल्या असें म्हणतात. बाबिलोनियन लोकांचा देव ओआनिस यानेंहि असलाच उपदेश के-ला म्हणून वर्णन आहे. ग्रीक व रोमन लोकांत निर-निराळ्या कलांच्या निरनिराळ्या देवता होत्या हें तर सुप्रसिद्धच आहे.

सारांश, तेंच सत्य निराळ्या स्वरूपीं एथेंहि आपल्या दृष्टीस पडतें. पूर्वज्ञात सामर्थ्यापेक्षां ज्यास्त सामर्थ्य असलें कीं त्याबद्दल भीति किंवा पूज्यबुद्धि रानट्याच्या मनांत लागलींच उत्पन्न होते आणि तें ज्याच्या अंगीं असेल त्यास ते लोक जिवंतपणीं भीत असून मरणो-त्तर ज्यास्तच भितात.

१९९. आतां देवत्वास पावणारे दुसरे लोक म्हटले म्हणजे बाहेरून रहावयास आलेले श्रेष्ठ जातीचे लोक हे होत. त्यांजबद्दल आतां विचार करूं.

हल्लीं कधीं कधीं असें होतें कीं, गलबत फु-टून कोठें तरी लागलेले खलाशी, पळालेले गुन्हेगार इत्यादि युरोपियन रानटी लोकांत जाऊन पडतात, आणि आपल्या ज्ञानानें व कौशल्यानें त्या लोकांत वरचढ हो-

तात. आतां असे लोक मेले म्हणजे त्यांच्या सामर्थ्यास दंतकथेमध्यें अतिशयोक्तीचें स्वरूप येऊन त्यांच्या भुतांस इतर भुतांपेक्षां रानटी सहजच ज्यास्त भिऊं लागतील ही गोष्ट ध्यानांत आणतां, देवता बनण्याचा हा एक नवा मार्ग आहे हें ध्यानांत येणार आहे. हलक्या जातीचे लोक उच्च जातीच्या नवऱ्यांस अजूनहि देव म्हणून समजतात ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. मुशमेन असें म्हणतात कीं, " ते गोरे लोक ईश्वराचे पुत्र आहेत; त्यांस सर्व समजतें. " पूर्व आफ्रिकेतील लोक युरोपियनांस म्हणतात, " खरोखरच तुम्ही देव आहां." कांगोमध्येंहि युरोपियनांची देवांतच गणना होते. नायजर नदीवरच्या एका नायकास जेव्हां युरोपियन प्रथम दिसले तेव्हां तो त्यांस देवाचीं मुलें म्हणाला. बेचुआनामधील स्त्रियांचा एक विलक्षण धर्मविधि टामसन व मोफाट यांस पाहावयाचा होता; तेव्हां त्या म्हणाल्या, " ते देव आहेत, त्यांस आंत येऊं दे. " फुला नांवाची जी बरीच सुधारलेली आफ्रिकन जात आहे, तिच्यांतील देखील कांहीं खेडवळ **बार्थ** साहेबास आपला देव फीटे म्हणून समजले, व त्यांस वाटलें कीं आपला देव आपल्याकडे एक दिवस रहावयास आला आहे. दुसऱ्या जातींतूनहि अशींच उदाहरणें सांपडतात. खोंड लोकांच्या कांहीं स्त्रिया क्यांबेलचा तंबू पाहून म्हणाल्या,हें देवाचें घर आहे. निकोबारियन लोकांस असें वाटतें कीं, यूरोपियन लोकांनीं आपलीं बेटें निर्माण केलीं, व तेच हवा चांगली वाईट करितात. जीयन लोकांचा एक सरदार इंटसाहेबास म्हणाला, तूं माझ्या अगोदर मेलास तर मी तुला

माझा देव करीन. आल्फ्रेड वालेस आरूबेटवाल्यांबद्दल असें म्हणतो कीं, " पुढील पिढींत किंवा त्यांच्या अगोदरहि मी या लोकांच्या मतें जादूगार किंवा अर्धवटं देव बनून जाईन; " आणि शेजारच्या बेटांतले डायाक लोकांनीं तर राजा ब्रूक यास प्रत्यक्ष देव बनविलेंच होतें, व इतर देवांबरोबर ते त्याचींहि प्रार्थना करीत.

आतां हल्लींच जर अशी स्थिति आहे, तर पूर्वीहि असेल याबद्दल शंका नाहीं. मेक्सिकन लोक असें समजत कीं आपला देव क्वेटझाल कोटल हा पश्चिमेकडून आला असून तो उंच गोरा मनुष्य होता. त्याचें कपाळ रुंद, डोळे मोठे, केंस लांब, आणि दाढी विस्तीर्ण होती. तो त्यांस उपदेश करून व त्यांच्या चालीरीति सुधारून आल्या रस्त्यानें परत गेला. तद्वतच चिब्चा लोकांचा मोठा देव बोचाया हा दाढीवाला गोरा माणूस असून त्यानें त्यांस त्यांच्या संस्था व कायदे दिले, आणि सोगामोसो एथें पुष्कळ दिवस राहून नंतर तो अदृश्य झाला. दक्षिण अमेरिकेंतहि अशाच समजुती आहेत. ह्म्बोल्ट सांगतो कीं टामानाक लोकांचा मूळ पुरुष आमालिव्हाका हा एका जहाजांत बसून आला, आणि नंतर जहाजांतूनच परत गेला, अशी त्यांच्यांत समजूत आहे.

कांहीं ठिकाणीं देव बनलेले हे परके लोक आपल्यांतीलच विलक्षण लोकांचे आत्मे आहेत असें हे लोक समजतात. प्रथम भुतें व देव ह्यांच्यांत भेद होत नसल्यामुळें, आणि ते व जिवंत माणसें ह्यांच्यामध्येंहि होत नसल्यामुळें, आस्ट्रोलियन, पालिनिश्यन व आफ्रिकन लोक गोऱ्या लोकांस आपल्या मृत पूर्वजांचे दुय्यम समजतात.

काफिर लोकांतील उलुंगा शब्दाप्रमाणें वानिका लोकांतील मुलुंगा शब्द, परमेश्वर आणि एकादा चांगला किंवा वाईट पुरुष ह्या दोहोंसहि लागतो. यावरून हे लोक युरोपियनांस भुतें किंवा देव कसें समजतात हें व्यक्त होतें. म्हणूनच **क्या**पटिन कूक जेव्हां सांडविच बेटांत गेला तेव्हां अशी बातमी उठली कीं त्यांच्यांतला चांगला माणूस रोनो हा परत आला आहे, आणि म्हणून ते त्याच्या पुढें सस्टांग प्रणिपात घालूं लागले. स्प्यानिश लोक जेव्हां प्रथम मेक्सिकोंत गेले तेव्हां तेथील लोकांस असें वाटलें कीं आपला देव क्वेटझाल कोटल हा आला आहे. चिब्चा लोकहि त्यांस देव समजून त्यांच्यापुढें धूप जाळूं लागले, ह्याचेंहि तेंच कारण होय.

सारांश, ह्या ठिकाणींहि तेंच सत्य निराळ्या रीतीनें पुनः उदाहृत झालेलें दृष्टीस पडतें; तें हें कीं रानटी लोकांचा देव श्रेष्ठ माणूस असतो, मग तो त्यांच्यांतील असो किंवा परकी असो; आणि ते त्याचें समाराधन जिवंतपणींहि करीत असून तो मेल्यावर जास्तच करूं लागतात.

२००. आतां वरिष्ट जातींतील विशेष व्यक्तींस ह्या प्रमाणें देव बनवूं लागले कीं पुढें ती सगळीच जात देव बनविणें ही पुढचीच पायरी आहे; आणि त्यावरून पुष्कळ लोकांच्या भाषांतून 'देव व माणसें' असे जे शब्द संयोग करून आढळतात त्यांची उपपत्ति ध्यानांत येते.

आपण असें धरून चालत असतों कीं रानट्यांच्या प्रत्येक भाषेंत माणसाला शब्द असतो, व तो ते आपल्या व इतर जातींच्या लोकांना सारखाच लावीत अस-

तात; पण ही चूक आहे. पुष्कळ वेळां असें घडतें कीं टोळीचें नांव व मनुष्यवाचक नांव हें त्यांच्यांत एकच असतें. दक्षिण अमेरिकेंतील गुराणी लोकांत एकाच शब्दाचा अर्थ मनुष्य व गुराणी असा आहे. तद्वतच उत्तर अमेरिकेंतील थ्लिंकीट लोकांमध्यें थ्लिंकीट हाच शब्द जातिवाचक व मनुष्यवाचक आहे. शेजारच्याच टिने लोकांतहि तसलीच स्थिति आहे. शिवाय ह्या जातींतून अशी समजूत असते कीं आपण तेवढेच माणूस. आफ्रिकेंत काफिर लोकांस आबाटू हें त्या जातीच्या लोकांचें नांव आहे, व त्याचा अर्थ माणसें असाहि आहे. हाटेंटाट लोकांत कॉइकाइन असें आहे, व त्याचाहि अर्थ माणसें असाच आहे. एशियाखंडांत क्यारेन व कामस्चाडेल लोकांत अशीच स्थिति आहे. म्हणजे ते माणूस हेंच नांव आपल्याला लावीत असून आपण एकटेच जगांत आहों असें कदाचित् समजत असतात.

आतां असा विचार करावयाचा कीं आपणास माणसें म्हणून म्हणणारी एकादी रानटी लोकांची टोळी, निराळ्या नांवानें प्रसिद्ध, परंतु जेतृत्वामुळें श्रेष्ठ म्हणजे देव म्हणून समजल्या जाणाऱ्या दुसऱ्या एकाद्या टोळीकडून जिंकली गेली तर काय स्थिति होईल ? अर्थात जेते आणि जित ह्यांच्या नांवाचे अर्थ अनुक्रमें देव व माणसें असे होतील.

ह्या सर्व पुराव्याचा विचार करतां स्कांडिनेव्हियन, ग्रीक व हिब्रयू इत्यादि जातींच्या दंतकथांमध्यें देव आणि माणसें अशीं जीं वचनें येतात त्यांची उपपत्ति काय ठरते बरें ? अर्थात् जित आणि जेते असा संबंध तेथें येतला पाहिजे. शिवाय वर सांगितल्याप्रमाणें अद्यापि-

हि रानटी लोकांत यूरोपियनांच्या नांवांवरून व गुणांवरून देव व माणसें असे भेद उत्पन्न होत आहेत हें ध्यानांत आणतां ह्याबद्दल मुळींच संशय रहात नाहीं. आणि कांहीं राहिला असल्यास कीशी लोकांची दंतकथा वाचून तो नाहींसा होईल. ती अशी:—कांहीं वाहेरचे लोक स्वारी करून येऊन उंच प्रदेश बळकावून बसले, आणि सखल प्रदेशांतील लोकांस जरबेंत ठेवून त्यांचे देव बनते झाले.'

२०१. आतां आर्य लोकांच्या देवांची उपपत्ति जी अन्य तऱ्हेनें करितात त्याचा विचार पुनः एथें करूं. आमची कृप्ति वस्तुस्थितीशीं जास्त जुळते किंवा पौराणिकवाद्यांची जुळते हें ध्यानांत आणण्यासाठीं ग्रीक लोकांची देवविषयकल्पना कशी उत्पन्न झाली ह्याचा विचार नें करतां ती काय होती ह्याचा विचार करूं; आणि तो करण्याकरितां त्यांच्या देववृंद आणि फीजीयन लोकांचा देववृंद ह्यांची तुलना करून पाहूं. ही तुलना ग्रीक लोकांस अपमानकारक होईल असें जर कोणास वाटलें तर त्यानें हें ध्यानांत आणावें कीं, फीजीयन लोकांच्या देवांप्रमाणें ग्रीक लोकांचेहि कांहीं देव नरमांसभक्षक होते, आणि झीअस ह्या ग्रीक देवास ते लोक पुष्कळ दिवसपर्यंत मनुष्यबळी अर्पण करीत होते.

फीजीयन लोकांच्या देवाप्रमाणेंच ग्रीक देव सर्वत्र प्रबल माणूस ह्या रूपानेंच वर्णिलेला आढळतो. फीजीयन लोक असें समजत कीं देव कधीं कधीं माणसांचीं स्वरूपें धारण करितात आणि नंतर ते माणसांस दृश्य होतात. ग्रीक लोकांतहि अशीच समजूत होती हें

ईलियडच्या प्रत्येक पानावरून व्यक्त होत आहे. ग्रीक देव इतका माणसासारखा असे कीं त्यास इतर माणसांहून भिन्न म्हणून ओळखण्यास दैविक दृष्टीच असावी लागे; बरें, फीजीयन लोकांतहि राजा आणि देव यांच्यांत मुळींच फरक दिसत नसे. फीजीयन लोकांत देवांचे निरनिराळे वर्ग होते, व त्यांचीं कामेंहि निरनिराळीं होतीं; मुख्य देव, मध्यस्थी करणारे देव, निरनिराळ्या वस्तूंवर व ठिकाणांवर अधिष्ठान करणारे देव, इ०. ग्रीक लोकांतहि असेंच वर्गीकरण होतें. फीजीयन लोकांच्या देवांचे वास्तविक देव आणि देवभूत मानव असे दोन वर्ग करतां येतात; ग्रीक लोकांमध्येंहि देवभूत माणसें होतींच. एका फीजीयन देवाचें वर्णनात्मक नांव जार असें होतें; आणि ही पदवी कित्येक ग्रीक देवांसहि देण्यासारखी आहे; दुसरें एक नांव स्त्रीचौर असें होतें, आणि तें झीअसला लावतां येईल; आणखी एका फीजीयन देवाचें टोपण नांव "कत्तल करून नुकताच आलेला" असें होतें, व तें ग्रीक देव आरीस ह्याच्या "रक्तपात करणारा" ह्या नांवाशीं जुळतें. फीजीयन लोकांचे देव प्रीति, द्वेष, असूया इत्यादि विकारयुक्त असत, तसेच ग्रीक लोकांचेहि असत. फीजीयन लोकांच्या देवांप्रमाणें ग्रीक लोकांचे देवहि एकमेकांस फसवीत असत. फीजीयन लोक कधीं कधीं आपल्या देवांवर रागावतात, त्यांस शिव्या देतात, आणि त्यांस लढाईसहि आव्हान करितात; तद्वतच ग्रीक लोकांत देवांस त्यांच्या तोंडावर देखील शिव्या देत असत, आणि त्यांच्याशीं लढतहि असत. सारांश फीजीयन लोकांच्या देवांप्रमाणें-

च ग्रीक लोकांचे देव मनुष्यवत् खात असत, पीत असत, व रहात असत.

आतां असा प्रश्न उभा राहतो कीं ह्या दोन्ही कल्पना जर परस्परसदृश आहेत तर त्यांची उत्पत्तिहि सारख्याच रीतीनें झाली आहे किंवा नाहीं ? फीजीयन लोकांचे देव माणसांस देवस्वरूप येऊन बनलेले आहेत ह्यांत मुळींच संशय नाहीं; आणि ग्रीक लोकांचेहि देव तसेच बनले आहेत असें म्हणणें सयुक्तिक दिसतें. पण पुराणवादी म्हणतात, नाहीं; सृष्टींतील कांहीं वस्तू व शक्ती ह्यांस पौरुषस्वरूप येऊन ते उत्पन्न झालेले आहेत. म्हणजे काय, तर, सारख्याच कल्पना परस्परविरुद्ध रीतींनीं उत्पन्न झाल्या आहेत ! एके ठिकाणीं माणसांची उन्नत्ति होऊन ते देव बनतात; दुसरीकडे नैसर्गिक शक्तींची अवनति होऊन त्यांस देवस्वरूप येतें; आणि अशा विरुद्ध मार्गांनीं उत्पन्न झालेले देव पुनः वस्तुतः सारखेच !

ज्यांनीं विशेष कृतीच्या गळ्यांत केवळ माळच घातलेली नाहीं ते मागील सर्व प्रकरणांच्या अभावीं देखील खचीत असें म्हणतील कीं पौराणिकवाद्यांचें हें म्हणणें सयुक्तिक ठरण्यास ते देतात त्यापेक्षां फारच जास्त सबळ पुरावा पाहिजे.

२०२. आतां प्रश्न असा उभा राहतो कीं इतर सर्व लोकांच्या देवांची उत्पत्ति जर अशा रीतीनें झाली आहे तर ज्यू लोकांच्या व अतएव ख्रिस्ती लोकांच्या देवाची उत्पत्ति अन्य तऱ्हेनें झाली आहे कीं काय ? एकंदर पक्षपातबुद्धि एकीकडे ठेवून ते लोक

जर याचा निःपक्षपातबुद्धीनें विचार करतील, आणि इतरांच्या धर्माचा विचार करतांना त्यांतील खरें खोटें निवडण्यास ज्या कसोट्या लावितात त्याच जर स्वधर्म-परीक्षणार्थ लावितील, तर त्यांचे देव सामान्य नियमास अपवादभूत नाहींत अशी त्यांची खात्री होईल.

२०२. एवंच सर्वत्र जें देवास मनुष्यस्वरूप दिलेलें दृष्टीस पडतें त्यास कारण दैविक माणसाची जी कल्पना निघाली ती प्रत्यक्ष पाहिलेल्या माणसावरून निघालेली आहे हें होय. मूळ माणूस ही कल्पना अशाच रीतीनें बनविते ह्यावद्दल जो विपुल पुरावा आतांपर्यंत दिला आहे, त्यास तो दुसरी कोणतीहि कल्पना बनवूं शकत नाहीं असें दाखविणारा पुरावा देऊन जोर आणतां येईल.

ईसानजीक संबू ठेवून वर्टन एकदां राहिला असतां दांत दुखणारी एक बाई असें ओरडून म्हणाली, "रे अल्ला, तुझेहि दांत माझ्यासारखेच दुखोत." शिवाय तो असें सांगतो कीं विशेष रानटी बिडुइन लोक असें म्हणतांना आढळतात कीं, अल्ला कोठें आहे तो आम्हांस दाखवा, म्हणजे त्याच्या अंगांत आम्ही भाला खुपसतों. मोफाट सांगतो कीं हाटेटांट लोकांस ख्रिस्ती बनविलें तरी ते ख्रिस्त्यांचा देव मोठा शक्तिमान् लढवय्या आहे असेंच समजतात. हंटर सांगतो एका सांताळ माणसानें पाद्र्याच्या तोंडून देवाच्या सर्वशक्तिमत्तेचें वर्णन ऐकून विचारिलें, "त्या प्रबलानें मला खाल्लें तर मी काय करूं?" ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां असें स्पष्ट दिसतें कीं रानटी माणसास देव केवळ प्रबळ माणसाप्रमाणें दिसतो

इतकेंच नाहीं, तर त्याला तद्विषयक उच्चतर अशी कल्पनाच होत नाहीं. प्राचीन इजिप्शन लोकांसारख्या सुशिक्षित लोकांस देखील माणसापासून तत्त्वतः भिन्न अशी देवाची कल्पना झाली नाहीं; भीति घालून माणसांच्या मागण्या देवांकडून कबूल करून घेतां येतील ह्या पलीकडे ते गेले नव्हते.

देव हे मर्त्य आहेत अशी जी रानटी माणसांत सर्वत्र समजूत आढळते तिजवरून हीच गोष्ट व्यक्त होते. कीशी लोकांच्या एका दंतकथेंत देव माणसाप्रमाणें मेले असें सांगितलेलें आहे. वेदांतील कल्पनेप्रमाणें देव सोमरस पिऊन अमर झाले असें आहे. बुद्धाविषयीं एक दंतकथा अशी आहे कीं प्रेत पाहून तो जेव्हां हें काय म्हणून विचारूं लागला, तेव्हां त्याच्या मार्गदर्शकानें सांगितलें कीं, " ही स्थिति सर्वांसच यावयाची आहे; गरीब व श्रीमंत, देव व माणसें, सर्वच मरावयाचीं आहेत. " स्कान्डिनेव्हियन लोकांचे देव मरत असत व त्यांस जाळीतहि असत. आणि ग्रीक लोकांत पॅनं एवढाच देव जरी मर्त्य आहे, तरी त्यांच्यांतहि पूर्वीं सर्व देव मर्त्य समजत हें त्यांच्यांतील दंतकथांवरून ध्वनित होतें.

देवविषयक ह्या कल्पना माणसाच्या हाडीं किती खिळलेल्या असतात हें त्या किती हळू हळू बदलतात ह्यावरून स्पष्ट दिसतें. सुधारणेचा काल येईतोंपावेतों ग्रीक लोक आपल्या देवांचे देह रक्तमांसाचे बनलेले आहेत असें समजत असत. ख्रिस्ती लोकांतहि ही कल्पना अद्यापि पुरती गेलेली नाहीं. कारण १८७३ सालीं मिलन एथें एका क्याथलिक शेतकऱ्यानें माडोना हिच्या मूर्तीस

रागानें चाबकानें मारिलेलें पाहण्यांत आलें. सारांश, संस्कृत लोकांच्या मनांत ज्या देवविषयक कल्पना असतात त्या नैसर्गिक नसून, केवळ वृद्धिंगत होणारें ज्ञान, वाढत जाणारी बुद्धीची आकलनशक्ति, आणि उदात्त मनोवृत्ति, ह्यांच्या योगानें त्या बनत असतात.

२०४. तात्पर्य, इतर प्रकारच्या दैविक व्यक्तींप्रमाणें ह्याहि दैविक व्यक्तींच्या बुडीं मानवी व्यक्ति आढळून येते.

कांहींहि सामान्याच्या पलीकडचें भासलें म्हणजे रानट्यास तें निसर्गोत्तर किंवा दैविक वाटतें; व त्यांत विलक्षण माणसाबद्दल विशेष वाटतें. आतां हा विलक्षण माणूस कधीं कधीं जातीचा आठवत असलेला असा अगदीं प्राचीन पूर्वज असतो, किंवा तो टोळीचा नाईक असून शक्ति व शौर्य ह्यांबद्दल त्याची ख्याति असते; तो मोठा प्रसिद्ध असा वैदू असतो, किंवा कदाचित् कांहीं नवीन गोष्ट त्यानें शोधून काढिलेली असते. आणि कधीं कधीं तो त्या टोळीपैकीं नसून बाहेरून आलेला असतो, व त्यानें कला व ज्ञान हें टोळींत आणिलेलें असतें; किंवा तो कदाचित् त्या टोळीवर विजय मिळवून तिजवर अंमल करणाऱ्या श्रेष्ठ जातीपैकीं असतो. ह्यापैकीं कोणत्या तरी प्रकारचा तो प्रथम असून लोक त्याच्याबद्दल भीति बाळगून असतात, आणि तो मेला म्हणजे त्याजविषयीं जास्तच भीति बाळगूं लागतात; आणि कमी भीति उत्पन्न करणाऱ्या इतर भुतांपेक्षां त्याच्या भुताचें समाधान जास्त व्हावयास लागून त्यास हळूहळू कायमच्या पूजेचें स्वरूप येतें.

इतकेंच नाहीं, तर त्याला तद्विषयक उच्चतर अशी कल्पनाच होत नाहीं. प्राचीन इजिप्शन लोकांसारख्या सुशिक्षित लोकांस देखील माणसापासून तत्त्वतः भिन्न अशी देवाची कल्पना झाली नाहीं; भीति घालून माणसांच्या मागण्या देवांकडून कबूल करून घेतां येतील ह्या पलीकडे ते गेले नव्हते.

देव हे मर्त्य आहेत अशी जी रानटी माणसांत सर्वत्र समजूत आढळते तिजवरून हीच गोष्ट व्यक्त होते. कीशी लोकांच्या एका दंतकथेंत देव माणसाप्रमाणें मेले असें सांगितलेलें आहे. वेदांतील कल्पनेप्रमाणें देव सोमरस पिऊन अमर झाले असें आहे. बुद्धाविषयीं एक दंतकथा अशी आहे कीं प्रेत पाहून तो जेव्हां हें काय म्हणून विचारूं लागला, तेव्हां त्याच्या मार्गदर्शकानें सांगितलें कीं, "ही स्थिति सर्वांसच यावयाची आहे; गरीब व श्रीमंत, देव व माणसें, सर्वच मरावयाचीं आहेत." स्कान्डिनेव्हियन लोकांचे देव मरत असत व त्यांस जाळीतहि असत. आणि ग्रीक लोकांत पॅन एवढाच देव जरी मर्त्य आहे, तरी त्यांच्यांतहि पूर्वी सर्व देव मर्त्य समजत हें त्यांच्यांतील दंतकथांवरून ध्वनित होतें.

देवविषयक ह्या कल्पना माणसाच्या हाडीं किती खिळलेल्या असतात हें त्या किती हळू हळू बदलतात ह्यावरून स्पष्ट दिसतें. सुधारणेचा काल येईतोंपावेतों ग्रीक लोक आपल्या देवांचे देह रक्तमांसाचे बनलेले आहेत असें समजत असत. ख्रिस्ती लोकांतहि ही कल्पना अद्यापि पुरती गेलेली नाहीं. कारण १८७३ सालीं मिलन एथें एका क्याथलिक शेतकऱ्यानें माडोना हिच्या मूर्तीस

रागानें चाबकानें मारिलेलें पाहण्यांत आलें. सारांश, संस्कृत लोकांच्या मनांत ज्या देवविषयक कल्पना असतात त्या नैसर्गिक नसून, केवळ वृद्धिंगत होणारें ज्ञान, वाढत जाणारी बुद्धीची आकलनशक्ति, आणि उदात्त मनोवृत्ति, ह्यांच्या योगानें त्या बनत असतात.

२०४. तात्पर्य, इतर प्रकारच्या दैविक व्यक्तींप्रमाणें ह्याहि दैविक व्यक्तींच्या बुडीं मानवी व्यक्ति आढळून येते.

कांहींहि सामान्याच्या पलीकडचें भासलें म्हणजे रानट्यास तें निसर्गोत्तर किंवा दैविक वाटतें; व त्यांत विलक्षण माणसाबद्दल विशेष वाटतें. आतां हा विलक्षण माणूस कधीं कधीं जातीचा आठवत असलेला असा अगदीं प्राचीन पूर्वज असतो, किंवा तो टोळीचा नाईक असून शक्ति व शौर्य ह्यांबद्दल त्याची ख्याति असते; तो मोठा प्रसिद्ध असा वैदू असतो, किंवा कदाचित् कांहीं नवीन गोष्ट त्यानें शोधून काढिलेली असते. आणि कधीं कधीं तो त्या टोळीपैकीं नसून बाहेरून आलेला असतो, व त्यानें कला व ज्ञान हें टोळींत आणिलेलें असतें; किंवा तो कदाचित् त्या टोळीवर विजय मिळवून तिजवर अंमल करणाऱ्या श्रेष्ठ जातीपैकीं असतो. ह्यापैकीं कोणत्या तरी प्रकारचा तो प्रथम असून लोक त्याच्याबद्दल भीति बाळगून असतात, आणि तो मेला म्हणजे त्याजविषयीं जास्तच भीति वाळगूं लागतात; आणि कसी भीति उत्पन्न करणाऱ्या इतर भुतांपेक्षां त्याच्या भुताचें समाधान जास्त व्हावयास लागून त्यास हळूहळू कायमच्या पूजेचें स्वरूप येतें.

एवंच सामान्य नियमास कोठेंहि अपवाद दिसत नाहीं. पितृपूजा म्हणजे एकंदर मृतपूजा,—मग ते मृत स्वजातीय असोत वा परजातीय असोत—असा व्यापक अर्थ घेतां, असें म्हणतां येईल कीं पितृपूजा हीं सर्व धर्मांचें मूळ होय.

प्रकरण सव्विसावें

वस्तुविषयक मूळ कल्पना

२०५. एवंच पोरकट कृत्या आणि विचित्र अनुमानें ह्यांचे कसे तरी बनलेले असे जे धर्मभोळे समज सर्वत्र दृष्टीस पडतात, त्यांचा विचार आपल्या विस्तृत दृष्टीनें न करतां मूळ माणसाच्या आकुंचित दृष्टीनें जर केला, तर ते अव्यवस्थित न दिसतां व्यवस्थित दिसतात.

लहान मुलांचे शिक्षक ज्या चुका करितात त्याच मूळ माणसांच्या कल्पनांची उपपत्ति करणारे करीत असतात. आत्मशास्त्राचा अभ्यास कधीं न केल्यामुळें पंतोजीबुवास शिष्याच्या मनाची अत्यन्त अंधुक कल्पना असते; आणि विवृद्ध बुद्धीला ज्या कल्पना साध्य आहेत त्या अपक्व बुद्धीलाहि आहेत असें समजून तो त्याला अगदीं अबोध्य अशा गोष्टी शिकवूं लागतो; उदाहरणार्थ, सामान्य नियम ज्यांच्यावरून बसवावयाचे अशीं उदाहरणें प्रथम न सांगतां ते सामान्य नियमच अगोदर सांगूं लागतो, आणि ज्या अनुभवांवरून तात्त्विक कल्पना बसवावयाच्या ते अनुभव प्रथम न सांगतां त्या तात्त्विक कल्पनाच अगोदर सांगूं लागतो. त्याचप्रमाणें मूलमाणसाच्या दंतकथांची हकीकत देणारे आणि त्याच्या भोळ्या धर्मसमजुतींवर कल्पना लढविणारे, सुधारणेनें आपल्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या सामान्य कल्पना खिशांतून बरोबर नेतात, आणि रानटी माणसालाहि त्या प्राप्य आहेत असें समजून, त्याचे कसले चम-

त्कारिक विचार हे, असें आश्चर्य व्यक्त करितात, किंवा त्याच्या विचारांचें विवरण करण्याच्या नादीं लागून, अशा कांहीं कल्पना त्याचे माथीं मारितात कीं त्या त्यास असण्याचा संभवच नाहीं.

परंतु त्याच्या मनोव्यापारांचा अर्थ आपल्या दृष्टीनें करावयाचें आपण सोडिलें म्हणजे हा सर्व गोंधळ नाहींसा होतो. मूळ तर्काचा अनुभवानें पडताळा पाहून जेव्हां आपण ध्यानांत आणितों कीं मूळ माणसास स्वाभाविक व अस्वाभाविक, शक्य व अशक्य, ह्यातील भेद कळत नाहीं; त्यास भौतिक नियम, व्यवस्था, कारण, इत्यादिकांबद्दल मुळींच कल्पना नसते; आणि त्यास सयुक्तिक आश्चर्य वाटत नसून, परीक्षणार्थ लाविणारी जिज्ञासाहि जशी नसते, तशी त्यास सारखा विचार करण्याची शक्ति नसून तसला विचार करण्यास लागणाऱ्या शब्दांचाहि पुरवठा नसतो. यामुळें तो तर्क लढविण्याच्या किंवा उपपत्त्या लावीत बसण्याच्या भानगडींत न पडतां, जे सिद्धान्त त्याच्या डोक्यावरच येऊन आदळतील तेवढ्यांचें मात्र तो मुकाट्यानें ग्रहण करीत असतो. शिवाय, असें आढळून येतें कीं त्याची अनिवार्य रीतीनें मुळांतच चूक होत असते, आणि त्यामुळें चुकीची विचारसरणी उत्पन्न होऊन तो पुढें पुढें जाईल तसतशी ती जास्त जास्त संकीर्ण होत जाते.

ही विचारसरणीची वृद्धि त्याच्यामध्यें अगदीं स्वाभाविक रीतीनें कशी होत असते हें गेल्या अठरा प्रकरणांमध्यें स्थापिलेल्या सिद्धान्तांचा अगदीं थोडक्यांत पुनः आढावा घेतल्यानें चांगलें लक्षांत येणार आहे.

२०६. दररोज, दर घटकेस, किंवा कमजास्त अवकाशानें आकाशांत व पृथ्वीवर घडणारे फेरबदल अशा कांहीं रीतींनीं चाललेले असतात कीं त्यांबद्दल रानट्यास कांहींच कळस नसतें. उदाहरणार्थ, आकस्मिक देखावे आणि अंतर्धानें, आणि रूपान्तरें, वस्त्वन्तरें. ह्यावरून त्यास असा भास होतो कीं ह्या सर्व गोष्टी पाहिजे तशा होत असतात, आणि त्यामुळें कधीं दिसणाऱ्या व कधीं नष्ट होणाऱ्या, किंवा कधीं रूपान्तर पावणाऱ्या व कधीं वस्त्वन्तर पावणाऱ्या ह्या वस्तू दुचार आहेत अशी त्याच्या मनांत कल्पना उत्पन्न होते, आणि ती सांवल्या, प्रतिबिंबें आणि प्रतिध्वनी ह्यांनीं दृढ होते.

अशा रीतीनें बाह्यसृष्टीशीं व्यवहार ठेविल्यानें उत्पन्न होणारे जे कल्पनातरंग ते स्वप्नांबद्दल जो अधिक निश्चित अनुभव त्यास प्राप्त होतो त्यानें उत्पन्न झालेल्या समजास पुष्टिदायक होतात. मूळ माणसाला मनाची भावना नसल्यामुळें स्वप्न म्हणजे प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी असें वाटतें. त्याला वाटतें कीं स्वप्नांत पाहिलेल्या गोष्टी मीं प्रत्यक्ष केल्या, म्हणजे त्या त्या ठिकाणीं प्रत्यक्ष गेलों, आणि तीं तीं माणसें प्रत्यक्ष पाहिलीं. असंबद्धताभावांचा त्यास त्रास होत नसल्यामुळें, तो ज्या गोष्टी जशा दिसतील तशाच स्वीकारितो; आणि ज्या मानानें तो विचार करूं लागेल त्या मानानें त्यास असें वाटूं लागतें कीं झोंपेमध्यें बाहेर जाणारा आणि नंतर परत येणारा असा आपला दुसरा आत्मा आहे. ही त्याची स्वताविषयींची जी द्वित्वकल्पना तीस, निद्रेत व्यवहार करण्याचे चमत्कार तो जो कधीं कधीं इतरांच्या

संबंधानें पाहतो, त्यामुळें दृढता आल्यासारखी दिसते. इतर प्रकारच्या अनियमित बेशुद्धी उत्पन्न होतांना त्यांनीं ह्या द्वित्वकल्पनेस जास्तच स्पष्ट दृढता आल्यासारखी दिसते. मूर्छा, अपस्मार आणि उन्मत्तवायू हीं झालीं असतां त्यावेळीं असें दिसतें कीं हा दुय्यम बोलावतांक्षणींच परत येण्याच्या ऐवजीं कांहीं मिनिटांपासून कांहीं दिवसपर्यंत परत येत नाहीं. कधींकधीं असली लहर येऊन गेली म्हणजे मध्यें काय झालें तें तो दुय्यम सांगूं शकतो; कधीं कधीं त्याबद्दल कांहींच सांगूं शकत नाहीं; आणि कधीं कधीं तो फार वेळ राहिल्यानें असा संशय उत्पन्न होतो कीं हा कांहीं अनिश्चित काळपर्यंत निघून गेला आहे कीं काय ?

कांहीं कालपर्यंतच्या बेशुद्धीच्या ह्या अवस्था आणि कायमच्या बेशुद्धीच्या अवस्था ह्यांच्यांतील भेद असा आहे कीं तो कधीं कधीं सुशिक्षित माणसाच्याहि लक्षांत येत नाहीं, आणि रानटी माणसाच्या तर मुळींच येत नाहीं. जिच्यापासून माणसाचा दुय्यम सहज परत येतो अशी जी निद्रारूप नियमित बेशुद्धि आणि जिच्यापासून तो कधींच परत येत नाहीं अशी जी मृत्युरूप कायमची बेशुद्धि, ह्या दोहोंची सांगड ज्यांच्यापासून तो कष्टानें परत येतो अशा ज्या ह्या अनियमित बेशुद्धी त्यांच्यायोगानें पडून जाते.तथापि सादृश्यावरून तो असें अनुमान करितो कीं तो अखेरीस परत येईल. असें वाटण्यास एक कारण झोंपेचा स्वस्थपणा आणि मृत्यूनंतरचा स्वस्थपणा हे दोन्ही त्यास सारखेच दिसतात हें होय. अशा रीतीनें उत्पन्न झालेली पुनरुत्थापनाची ही कल्पना, स्वप्नविषयक कृतीनें भटक-

णाऱ्या दुय्यमाची कल्पना जशी दृढ होत जाईल, तशी जास्त स्पष्ट होत जाते.

प्रत्येक माणसाला आहे म्हणून समजलेला हा जो दुय्यम तो प्रारंभीं मूळ देहापासून मुळींच भिन्न नसतो. म्हणजे, तो त्याच्याइतकाच दृश्य आहे, व त्याच्यासारखाच द्रव्यमयहि आहे, आणि म्हणून त्याला त्याच्यासारखीच क्षुधा, तृषा, श्रम आणि दुःख ह्यांची पीडा होत असते, असें रानट्यास वाटतें. प्रथम तो दुय्यम मूळ देहापासून अभिन्न म्हणून वाटत असून त्याच्यासारखेंच त्यास ठार मारतां येईल, बुडवितां येईल, किंवा दुसऱ्या कांहीं मार्गानें नष्ट करतां येईल, असें त्यास वाटत असतें; आणि तो जो (पिशाच्च, आत्मा, किंवा भूत) पुढें त्यास मूळापासून निराळा दिसूं लागतो तो मागून दिसूं लागतो, व हळूहळूच दिसूं लागतो. त्याला प्रथम हें दुसरें जीवित केवळ नियमितकालिक असून पुढें हळूहळू तें कायमचें होतें; इकडे तो मूळ देहापासून हळूहळू द्रव्यात्मकतेसंबंधानें जास्त भिन्न होत जातो, आणि शेवटीं तो निर्द्रव्यात्मक किंवा सूक्ष्मतमद्रव्यघटित बनून जातो.

मृत माणसाचा हा दुय्यम प्रथम जेव्हां इतर बाबतींत त्याच्यासारखाच वाटत असतो, तेव्हां धंद्याउद्योगाच्यासंबंधानेंहि तसाच वाटत असतो. तो जर लुगरूंच्या जातीपैकीं असला तर पूर्वीप्रमाणेंच लढाया व पाशवी करीत रहातो; जर धनगरी जातीपैकीं असेल तर गुरें ढोरें वळवून दूध पीत रहातो; आणि शेतकरी वर्गापैकीं असेल तर पेरणी, कापणी इत्यादि धंदे पुनः करूं लागतो. आणि दुय्यमाची शरीरघटना व सामाजिक स्थिति

संबंधानें पाहतो, त्यामुळें दृढता आल्यासारखी दिसते. इतर प्रकारच्या अनियमित बेशुद्धी उत्पन्न होतांना त्यांनीं ह्या द्वित्वकल्पनेस जास्तच स्पष्ट दृढता आल्यासारखी दिसते. मूर्छा, अपस्मार आणि उन्मत्त-वायू हीं झालीं असतां त्यावेळीं असें दिसतें कीं हा दुःख्यम बोलावतांक्षणींच परत येण्याच्या ऐवजीं कांहीं मिनिटांपासून कांहीं दिवसपर्यंत परत येत नाहीं. कधींकधीं असली लहर येऊन गेली म्हणजे मध्यें काय झालें तें तो दुःख्यम सांगूं शकतो; कधीं कधीं त्यांत्रदल कांहींच सांगूं शकत नाहीं; आणि कधीं कधीं तो फार वेळ राहिल्यानें असा संशय उत्पन्न होतो कीं हा कांहीं अनिश्चित काळपर्यंत निघून गेला आहे कीं काय ?

कांहीं कालपर्यंतच्या बेशुद्धीच्या ह्या अवस्था आणि कायमच्या बेशुद्धीच्या अवस्था ह्यांच्यांतील भेद असा आहे कीं तो कधीं कधीं सुशिक्षित माणसाच्याहि लक्षांत येत नाहीं, आणि रानटी माणसाच्या तर मुळींच येत नाहीं. जिच्यापासून माणसाचा दुःख सहज परत येतो अशी जी निद्रारूप नियमित बेशुद्धि आणि जिच्यापासून तो कधींच परत येत नाहीं अशी जी मृत्युरूप कायमची बेशुद्धि, ह्या दोहोंची सांगड ज्यांच्यापासून तो कष्टानें परत येतो अशा ज्या ह्या अनियमित बेशुद्धी त्यांच्यायोगानें पडून जाते.तथापि सादृश्यावरून तो असें अनुमान करितो कीं तो अखेरीस परत येईल. असें वाटण्यास एक कारण झोंपेचा स्वस्थपणा आणि मृत्यूनंतरचा स्वस्थपणा हे दोन्ही त्यास सारखेच दिसतात हें होय. अशा रीतीनें उत्पन्न झालेली पुनरुत्थापनाची ही कल्पना, स्वप्नविषयक कृतीनें मटक-

णाऱ्या दुय्यमाची कल्पना जशी दृढ होत जाईल, तशी जास्त स्पष्ट होत जाते.

प्रत्येक माणसाला आहे म्हणून समजलेला हा जो दुय्यम तो प्रारंभीं मूळ देहापासून मुळींच भिन्न नसतो. म्हणजे, तो त्याच्याइतकाच दृश्य आहे, व त्याच्यासारखाच द्रव्यमयहि आहे, आणि म्हणून त्याला त्याच्यासारखीच क्षुधा, तृषा, श्रम आणि दुःख ह्यांची पीडा होत असते, असें रानट्यास वाटतें. प्रथम तो दुय्यम मूळ देहापासून अभिन्न म्हणून वाटत असून त्याच्यासारखेंच त्यास ठार मारतां येईल, बुडवितां येईल, किंवा दुसऱ्या कांहीं मार्गानें नष्ट करतां येईल, असें त्यास वाटत असतें; आणि तो जो (पिशाच्च, आत्मा, किंवा भूत) पुढें त्यास मूळापासून निराळा दिसूं लागतो तो मागून दिसूं लागतो, व हळूहळूच दिसूं लागतो. त्याला प्रथम हें दुसरें जीवित केवळ नियमितकालिक असून पुढें हळूहळू तें कायमचें होतें; इकडे तो मूळ देहापासून हळूहळू द्रव्यात्मकतेसंबंधानें जास्त भिन्न होत जातो, आणि शेवटीं तो निर्द्रव्यात्मक किंवा सूक्ष्मतमद्रव्यघटित बनून जातो.

मृत माणसाचा हा दुय्यम प्रथम जेव्हां इतर बाबतींत त्याच्यासारखाच वाटत असतो, तेव्हां धंद्याउद्योगाच्यासंबंधानेंहि तसाच वाटत असतो. तो जर लुगारूंच्या जातीपैकीं असला तर पूर्वीप्रमाणेंच लढाया व पाठ्यी करीत रहातो; जर धनगरी जातीपैकीं असेल तर गुरें ढोरें वळवून दूध पीत रहातो; आणि शेतकरी वर्गापैकीं असेल तर पेरणी, कापणी इत्यादि धंदे पुनः करूं लागतो. आणि दुय्यमाची शरीरघटना व सामाजिक स्थिति

ह्यासंबंधानें प्रथम अशी मूळ माणसासारखीच कल्पना असल्यामुळें, प्रेतापाशीं खाद्य, पेय, वस्त्र, शस्त्र वगैरे ठेवण्याच्या, आणि थडग्यानजीक ग्राम्य पशू, स्त्रिया व गुलाम ह्यांचे बळी देण्याच्या चाली उत्पन्न होतात.

मृत्यूनंतरचें हें जीवित वालवण्याचें ठिकाण जातीच्या मूळ इतिहासानुरूप निरनिराळ्या प्रकारचें कल्पिलें जातें. पुष्कळ ठिकाणीं असें समजतात कीं भुतें त्यांच्या जिवंत वंशजांमध्यें येऊन मिसळत असतात,आणि ह्या समजुतीवर त्यांना दररोज अन्नाचा घांस ठेवीत असतात; कधीं कधीं तीं शेजारच्या रानांत रहातात म्हणून समजतात, आणि म्हणून त्यांना तेथें बळी नेऊन ठेवितात, व ते तीं खातात असें समजतात; आणि इतरत्र अशी कल्पना असते कीं जातीच्या मूळ ठिकाणीं तीं गेलीं आहेत. ह्या मृत लोकीं किंवा परलोकीं जाण्यास प्रवास जमिनीवरून किंवा नदींतून किंवा समुद्रांतून करावा लागत असतो, आणि जातीच्या दंतकथेप्रमाणें तो ह्या किंवा त्या दिशेस करावा लागत असतो. म्हणून थडग्यापाशीं प्रवासाचीं योग्य साधनें ठेवण्याची चाल उत्पन्न होते; उदाहरणार्थ, जलप्रवासास होड्या किंवा स्थलप्रवासास घोडे, वाट दाखवावयास कुत्रे, संरक्षणार्थ शस्त्रें, आणि रस्ता खुला मिळावा म्हणून द्रव्य आणि परवाने. आणि ज्या ठिकाणीं पर्वतावर पुरीत असल्यामुळें, किंवा जेत्या जातीच्या ताब्यांत तो असल्यामुळें, पर्वत हेंच भुतांचें वसतिस्थान समजलें जात असतें, त्या ठिकाणीं पर्वतांच्या शिखरांवरून जेथें जातां येईल असें वाटत असतें तें आकाश परलोक म्हणून, किंवा कदाचित्

परलोकापैकीं एक म्हणून मानलें जाऊं लागतें.

मृत माणसांचे दृश्यमांना हें द्वितीय जीवित कांहीं कालपर्यंतच असतें असें प्रथम मानीत असल्यामुळें, त्यांचा मोठा संघ बनत जातो अशी कल्पना प्रथम होत नाहीं; पण जेव्हां त्यांना हें जीवित कायमचें असतें म्हणून समजूं लागतात, तेव्हां असल्या संघाची कल्पना सहजच उत्पन्न होते. ते जिकडे तिकडे गर्दी करीत असल्यामुळें, त्यांस वाटेल तेव्हां दृश्याऽदृश्य होतां येत असल्यामुळें, आणि आपणास कळत नाहीं अशा मार्गांनीं ते स्वव्यापार करीत असल्यामुळें, विलक्षण, अनपेक्षित, आणि अविवरणीय अशा सर्व गोष्टींचीं कारणें तेच आहेत असें रानटी लोक समजूं लागतात. नेहमींपेक्षां किंचितहि निराळें असें कांहीं झालें कीं तें त्यांनीं केलें म्हणून ते मानूं लागतात, आणि ज्यास आपण स्वाभाविक कारणत्व म्हणून म्हणतों तें जेथें स्पष्ट दिसत असेल त्या ठिकाणींहि त्यांचें कर्तृत्व समजलें जाऊं लागतें.

सभोंवतालच्या सृष्टींत घडणाऱ्या विशिष्ट चमत्काराचे ते कर्ते म्हणून एकदां समजले जाऊं लागले म्हणजे जिवंत माणसांत दिसणाऱ्या विलक्षण क्रियांचेहि कर्ते तेच होत अशी समजूत उत्पन्न होऊं लागते. नियमित किंवा अनियमित बेशुद्धीच्या वेळीं दृश्यम आत्म्यानें शरीर सोडिलें असतां त्यांत दुसऱ्या कोणा मृताचा किंवा जिवंताचा आत्मा प्रवेश करूं शकतो; आणि ह्या समजुतीवर झटके, फेंपरें, भ्रम आणि वेड हे रोग मत्सरी मृतांचे दृश्यम उत्पन्न करितात असें मानूं लागतात. शिवाय, ह्या संचारकृतीवर माणसाच्या इ-

च्छेविरुद्ध होणाऱ्या सर्व शरीरव्यापारांचा उलगडा एकदां होऊं लागला म्हणजे शिंक येणें, जांभई येणें, इत्यादि गोष्टींपासून तों एकंदर रोग आणि मृत्यु एथपर्यंत सर्व चमत्कार त्याच कृत्तीच्या माथीं मारूं लागतात; आणि ते कोणी अदृश्य शत्रु उत्पन्न करितो असें समजूं लागतात.

पुढें, सृष्टभुतांचा शरीरांत प्रवेश झाल्यास दैविक शक्ति व ज्ञान हीं प्राप्त होतात, अशा समजुतीवर तसले प्रवेश इष्ट समजूं लागतात, व त्यांबद्दल प्रार्थनाहि करूं लागतात; इकडे दुष्ट भुतांचा संचार शारीरिक व मानसिक दुःखांचा उत्पादक समजला जाऊन तो अनिष्ट मानला जाऊं लागतो; आणि तो झाल्यास त्या भुतास हाकलून देणें. हाच उपाय होय अशी समजूत उत्पन्न होते. अशा रीतीनें भूत काढणाराची उत्पत्ति झाली म्हणजे तो मोठा गलबला करून, तोंडें अत्यंत वेडीं वांकडीं करून, अत्यन्त दुर्गंधि उत्पन्न करून, वगैरे उपायांनीं भूत घालवितों म्हणून म्हणूं लागतो. भूत काढण्याची जी ही साधी युक्ति तीस पुढें संकीर्ण स्वरूप येतें; म्हणजे तो ह्या कामीं जास्त प्रबल अशा सुष्ट भुतांची मदत घेऊं लागतो. ह्यापासून पुढें चेटूक करणाराच्या कलेची उत्पत्ति होते, व तो मृतांच्या आत्म्यांना आपल्या ताब्यांत आणण्याच्या युक्त्या करून त्यांच्या करवीं आपले दुष्ट हेतु साध्य करून घेऊं लागतो.

पण एकीकडे रानटी लोक सभोंवतालच्या भुतांच्या आपण स्वाधीन आहों असें समजून भूतकाढ्ये आणि चेटकी ह्यांची मदत घेत असतां, दुसरीकडे ते त्यांच्याशीं (भुतांशीं) ह्याच्या उलट रीतीनें वागूं लागतात,—म्हण-

जे त्यांचें समाराधन करूं लागतात. ह्या दोन उद्देशांनीं प्रेतांशीं दोन प्रकारची वागणूक सुरू होते. कांहीं ठिकाणीं मृतापासून जिवंतास त्रास होऊं नये म्हणून त्याचें पुनरुज्जीवनच बंद करण्याची खटपट सुरू होते, आणि तो पुनः जिवंत झाला असें वाटल्यास त्याच्याशीं वैरव्यापार सुरू होतात. पण पुष्कळ ठिकाणीं त्याचें पुनर्जीवन झालें म्हणजे त्याच्या हातून आपलें कल्याण व्हावें हाच उद्देश असतो, आणि असल्याच उद्देशानें भुतांचे संतर्पणविधि सुरू होतात.

हा उद्देश आणि हे विधी ह्यांपासून सर्व प्रकारच्या पूजांची उत्पत्ति होत असते. भुतांविषयीं भीति उत्पन्न होऊन थडग्यावरचें आच्छादन पवित्र बनतें, व त्यास हळूहळू देवळाचें स्वरूप येतें, आणि खुद्द थडग्याची वेदी बनूं लागते. कधीं दररोज आणि कधीं कांहीं कांहीं कालानें मृताकरितां नेऊन ठेविलेलीं जीं खाद्यपेयें त्यांपासून धर्मविषयक सामान्य व विशेष बलींची,—म्हणजे आह्निक व सणासुदीच्या दिवशींच्या बलींची उत्पत्ति होते. थडग्याशीं माणसांस वगैरे ठार मारणें किंवा त्यांचे अंगच्छेद करणें ह्यांस देवतेच्या बलींचें व हवींचें रूप येतें. मृताच्या फायद्यासाठीं न जेवणाच्या चालीपासून पवित्र कृत्य म्हणून उपास करण्याची चाल उत्पन्न होते; आणि भेटी घेऊन थडग्यापाशीं जाण्याच्या पद्धतीस पवित्रस्थानीं होणाऱ्या यात्रांचें स्वरूप येतें. मृताच्या होणाऱ्या प्रशंसा व त्याच्या केलेल्या प्रार्थना ह्यांपासून धार्मिक प्रशंसा व प्रार्थना उत्पन्न होतात. एवंच प्रत्येक देवविषयक विधीची उत्पत्ति कोणत्यातरी मृतविधीपासून होते.

निसर्गोत्तर सत्त्वाची जी अगदीं पहिली कल्पना उत्पन्न होते आणि जी सर्व जातींमध्यें सामान्यत्वें दृष्टीस पडते ती भुताची होय, आणि देवतांचें समाराधन करण्याच्या मार्गांचें मूळ भुतांचें समाराधम करण्याचे मार्ग हेचं सर्वत्र होत असें आढळल्यानंतर, असा प्रश्न उत्पन्न झाला कीं, निसर्गोत्तर सत्त्वांचे सर्व प्रकार भूत ह्या प्रकारापासूनच उत्क्रान्त झाले आहेत किंवा नाहींत. 'होय' अशा उत्तराच्या पुष्टीकरणार्थ जो पुरावा आणिला तो अनेक प्रकारचा होता. प्राथमिक लोकांच्या-च तोंडून असा पुरावा वदविला कीं सामान्य पिशाच-पूजेपासून निर्माते किंवा देव म्हणून मानिलेल्या पुरातन पूर्वजांच्या भुतांची पूजा उत्पन्न झाली. अशा रीतीनें उत्क्रान्त झालेली देवतापूजा पृथ्वीच्या दोन्ही अर्धांतील प्राचीन समाजांत नुकत्याच मृत झालेल्या पूर्वजपूजेबरोबरच दिसत असे असें नंतर आपल्यास आढळून आलें. नंतर असा पुरावा दिला कीं अत्युच्च व अतिनीच दोन्ही प्रकारच्या समाजांत अशाच तऱ्हेच्या पूर्वजपूजेपासून अशाच तऱ्हेनें देवतोत्पत्ति झाली; आणि शिवाय आपल्या असें नजरेस आलें कीं हल्लीं देखील अत्यन्त उच्च जातींत पूर्वजपूजा जरी जास्त वृद्धिंगत झालेल्या पूजाप्रकारांनीं मागें सारिलेली अशी दिसते तरी ती जिवंत आहेच. ह्यावरून मृतपूजेपासून इतर सर्व प्रकारची पूजा उत्पन्न झाली आहे असा सिद्धान्त ठरवून नंतर आपण ज्या पूजा बाह्यतः तिच्या सारख्या दिसत नाहींत, त्यांचेंहि तिच्याशीं नातें सांपडतें किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं त्यांचें विवेचन करिते झालों.

हें निवेचन करीत असतां, पुरण्याच्या पूर्वी बळी घेणाऱ्या प्रेतापासून बळी घेणाऱ्या मसाला घातलेल्या प्रेताकडे जाऊन, आणि तेथून कांहीं अंशीं मृत माणसाचे अवशेष आणि कांहीं अंशीं इतर वस्तू ह्यांच्या बनलेल्या आकृतींकडे नजर फेंकून, शेवटीं सर्वांशीं कृत्रिम अशा आकृतींकडे आपण वळलों. आणि अशा रीतीनें आपणास असें आढळून आलें कीं मृताच्या ऐवजीं त्याच्या प्रतिमेलाच खाद्य, पेय, इत्यादिकांचा पुरवठा होऊन तिचें संतर्पण होऊं लागतें. नंतर आपणास असा पुरावा सांपडला कीं मृत-माणसाची ही प्रतिमा कधीं कधीं देवाची मूर्ति बनते; आणि समाराधन सारखें चालविल्यानें तीच कायमची पूजा बनते. आणि ज्याअर्थीं ह्या प्रतिमांत हजर असलेल्या मृतांच्या दुय्यमांनाच हे बळी वास्तविकरीत्या अर्पण करीत असतात, त्याअर्थीं असें सिद्ध होतें कीं, एकंदर मूर्तिपूजा म्हणजे पितृपूजेची वाढ होऊन बनलेला एक निराळा प्रकार आहे. हा समज पुढें वाढत जातो. मानवी प्राण्यांशीं व त्यांच्या कांहीं भागांशीं ओबड धोबड रीतीनें सदृश दिसणारे पदार्थ, आणि त्याप्रमाणें त्यांच्या सहवासानें त्यांचा गंध किंवा वाफारा ओढून घेतलेले पदार्थ, हे त्या मूर्तींतच मोडूं लागतात; आणि अशा रीतीनें मूर्तिव्यतिरिक्त पुष्कळ वस्तूंच्या ठिकाणीं भुतें रहातात असा समज उत्पन्न होतो. आणि विशेषेंकरून ज्या वस्तूंचे बाह्याकार, गुणधर्म, किंवा व्यापार विलक्षण असतील त्यांच्या संबंधानें तर हा समज विशेषतःच उत्पन्न होतो. वस्तूंत संचरणाऱ्या भुताची पूजा म्हणजे विशेषवस्तुपूजा ही अशा रीतीनें पिशाचपूजे-

पासून अप्रत्यक्षरीत्या उत्पन्न झालेली आहे, हें पुष्कळ गोष्टींवरून दिसून येतें; पण मुख्यत्वेंकरून ह्या गोष्टींवरून दिसून येतें कीं जेथें पिशाचकल्पना उत्पन्न झालेली नसेल, किंवा फारच कमी प्रमाणावर उत्पन्न झालेली असेल, त्या ठिकाणीं विशेषवस्तुपूजाहि प्रचारांत आलेली नसते; आणि पिशाचकृतीची जशी उत्क्रान्ति होत जाईल तसाच तिचा प्रसार होत जातो.

नंतर असें सिद्ध करून दाखविलें कीं प्राणिपूजा हा पितृपूजेचाच एक अप्रत्यक्ष प्रकार आहे. रानट्यांच्या अनुभवाला वास्तविक व दिखाऊ रूपान्तराचीं जीं उदाहरणें येत असतात त्यांवरून असल्या रूपान्तराचें सूचक कांहीं झालें म्हणजे तसें रूपान्तर झालेंच असेल असें त्यास वाटूं लागतें. आणि सर्व जातींमध्यें असा समज दृष्टीस पडतो कीं, माणसांचीं जनावरें आणि जनावरांचीं माणसें होत असतात. म्हणून घरांतून प्रवेश करणारे प्राणी हे नवीं रूपें धारण केलेले मृतच आहेत असें त्यांस वाटूं लागतें; आणि थडग्यांनजीक जाणारे प्राणी मागें घेतलेले आत्मेच आहेत असेंहि त्यांस वाटूं लागतें. शिवाय जनावरांच्या नांवांवरून माणसांचीं नांवें ठेवण्याची चाल पुष्कळ ठिकाणीं असल्यामुळें, दंतकथांचा अनिवार्य रीतीनें भलताच अर्थ होऊन, जनावरांपासून माणसें उत्पन्न झालीं आहेत असे समज होतात. आणि अशा रीतीनें पवित्र प्राण्याला कधीं विशिष्ट मान दिला जाऊन, कधीं त्याचें संतर्पण होऊन, आणि कधीं पूजा होऊन, तो जवळचा किंवा दूरचा पूर्वजच समजला जातो आणि त्यास देवपण येतें.

ह्याप्रमाणेंच वनस्पतिपूजा म्हणजे वनस्पतीमध्यें आहे म्हणून कल्पिलेल्या मनुष्याच्या आत्म्याची पूजा होय; ती कल्पना त्या वनस्पतीच्या उन्मादक गुणधर्मावरून उत्पन्न होते; किंवा दंतकथेचा भलताच अर्थ होऊन जात त्या वनस्पतीपासून उत्पन्न झाली ह्या समजावर उत्पन्न होते; किंवा नांवाचा भलताच अर्थ होऊन ती पूर्वज आहे ह्या समजावरून उत्पन्न होते. सर्व ठिकाणीं वनस्पतीच्या कल्पिलेल्या मानवी आकारावरून किंवा मानवी मनोरथांवरून असें वाटूं लागतें कीं वनस्पतीचा आत्मा माणसापासून उत्पन्न झालेला आहे.

बरें, सृष्टींतील मोठाल्या वस्तू व शक्ती ह्यांना जें देवपण प्राप्त होतें त्याचें तेंच कारण असतें. जेथून जात आली तेथें पर्वत असल्यास तो त्या जातीचा उगम किंवा मूळपुरुष म्हणून वर्णिला जातो, व समुद्राचेंहि बहुधा तसेंच होतें; शिवाय त्या दोघांवरून कुटुंबाचीं नांवें पडत असतातच. अशा रीतीनें त्यांची पूजा दोन मार्गांनीं उत्पन्न होते. उषा किंवा प्रातःकाळ हें पाळण्यांतलें नांव ठेविलें गेल्यामुळें त्या काळालाहि पौरुषस्वरूप येतें असें दिसतें. तसेंच आपणास असें आढळून येतें कीं तारे व तारागण ह्यांना जें पौरुषस्वरूप येतें त्यास कारण ते पूर्वी पृथ्वीवर रहात होते हा समज होय. चंद्राचीहि गोष्ट तशीच आहे. हलक्या जातींमध्यें अशा दंतकथा आढळतात कीं चंद्र हा प्रारंभीं पुरुष किंवा स्त्री होता, आणि अडाणी लोकांत चंद्र हें अद्यापि पाळण्यांतलें नांव ठेविलें जातें. तात्पर्य, चंद्राची पूजा करण्याचा अर्थ असा असतो कीं चंद्राची पूजा करणें म्हणजे कोणत्या तरी

मृत माणसाची पूजा करणें होय. शेवटची गोष्ट सांगावयाची ही कीं, सूर्यपूजा पितृपूजेपासून तीन तऱ्हांनीं उत्पन्न होते. कांहीं ठिकाणीं विजेते सूर्योदयाच्या ठिकाणाहून आले असल्यामुळें त्यांस सूर्यपुत्र म्हणतात, व म्हणून ते सूर्यास आपला पूर्वज समजूं लागतात; अन्य कांहीं ठिकाणीं सूर्य असें पाळण्यांतील नांव पडलेलें असतें, आणि अन्य कांहीं ठिकाणीं आकृति, पराक्रम अथवा पदवी, ह्यांवरून तें नांव लाक्षणिक रीत्या दिलेलें असतें. ह्यामुळें दंतकथेंत सूर्याशीं विशिष्ट व्यक्तीचें तादात्म्य होऊन सूर्यपूजेची उत्पत्ति होते.

मूर्ती, प्राणी, वनस्पती, सृष्टिशक्ति व पूर्वज हीं एकच ह्या समजुतीवर जे हे भलत्याच रीतीनें पूजाप्रकार उत्पन्न होतात त्यांशिवाय तिच्यापासून सरळरीतीनेंहि कांहीं प्रकार उत्पन्न होतातच. भूतसंघापैकीं कांहींची देवतांमध्यें उत्क्रान्ति होते, व त्यांचे मानवी गुणधर्म कायम रहातात. मूल माणसाच्या मनांत दैविक व श्रेष्ठ हीं दोन्ही एकच असल्यामुळें, जिवंत माणूस आणि पुनः दृश्य होणारें भूत ह्यांच्यासंबंधानेंहि त्याच्या मनांत घोंटाळा उत्पन्न होत असल्यामुळें, आणि देव व भूत हे शब्द प्रथम समानार्थक असल्यामुळें, प्रबळमाणसापासून आणि प्रबळ माणसाच्या भुतापासून हळूहळू देवतोत्पत्ति कशी होते हें स्पष्ट दिसतें. जातीमधला सरदार, जादूगार किंवा अन्य कुशल माणूस हा जिवंतपणीं अज्ञात शक्तींचा धारणकर्ता म्हणून भीतिपुरःसर मानिला जात असून, मेला म्हणजे भुतांच्या सामान्यशक्ती आणखी त्याच्यांत आल्या असें समजून जास्तच भीतिपुरःसर मा-

नला जाऊं लागतो. बांहेरून नव्या कला वगैरे आणणारा नवखा गृहस्थ आणि विजेता हे तर जिवंतपणीं जास्तच दैविकसामर्थ्ययुक्त म्हणून समजले जातात, आणि त्यांच्या मरणोत्तर ही समजूत जास्तच प्रबल होते. कोणत्याहि गोष्टीचा जो अत्यंत अद्भुत प्रकार असेल तोच लोकांत सर्वांत जास्त पसरतो, आणि पिढ्यान्पिढ्या असल्या माणसाच्या पराक्रमांची हवी तशी अतिशयोक्ति होत जाते, ह्या गोष्टी ध्यानांत आणतां, त्यांना कालांतरानें अत्यंत शक्तिमान् व अत्युत्तम अशा माणसाचें म्हणजे देव जशा प्रकारचा समजतात तशाचें स्वरूप कसें येत असेल हें ध्यानांत येतें.

एवंच, स्वप्नांवरून सुचणारा जो भटक्या द्युग्यम तेथून सुरुवात करून, मरणाचे वेळीं जो निघून जातो त्याच्याकडे नंतर जाऊन, नंतर प्रथम थोडेच दिवस ज्याचें मरणोत्तर आयुष्य आहे अशा समजल्या जाणाऱ्या ह्या भुतापासून निघून नित्य राहणाऱ्या व अतएव संख्येनें वाढत जाणाऱ्या अशा भुतांकडे जाऊन, शेवटीं मूळ माणूस सभोंवतालची सर्व पोकळी लहान मोठ्या भुतांनीं भरलेली आहे, आणि तीं सर्व विशेष चमत्कार करीत असतात, असें समजूं लागतो. अशा रीतीनें सुरू झालेली जी विश्वविषयक समजूत तिचा त्याच मार्गानें होईल तेवढा विस्तार करून वर आलीं वर्णिलेल्या ज्या एकंदर भोळ्या समजुती त्यांजवर त्याचा विश्वास बसून जातो.

२०७. ह्या समजुतींची उत्पत्ति किती व्यवस्थेशीर आहे हें सृष्टींतील इतर सर्व व्यापारसरणींप्रमाणें ह्या सरणीच्याहि ठिकाणीं उत्क्रान्तीचा नियम अगदीं स्पष्ट-

पणें उदाहृत होतो हें ध्यानांत आणंतां, बरोबर कळणार आहे. निरनिराळ्या भोळ्या समजुती सारखी वाढ होऊन उत्पन्न होत जातात इतकाच उत्क्रान्तीचा नियम ह्या ठिकाणीं लागू पडलेला दिसतो असें नाहीं, तर त्या समजुतींमध्यें जीं रूपांतरें होत जातात तींहि उत्क्रान्तीच्या सामान्य नियमासच अनुसरून होतात.

उत्क्रान्तीमध्यें होणारें गोळ्यांचें जें घनीभवन तें ह्या ठिकाणीं भुतांच्या संख्येची वृद्धि होऊन प्रथम दृष्टीस पडतें. ज्या अत्यन्त कनिष्ठ जातींत भुतांच्या दुय्यमांसंबंधानें अगदीं अस्पष्ट व डळमळीत समजुती असतात त्यांच्या ठिकाणीं ह्या कल्पित निसर्गोत्तर सत्त्वांचे कायमचे संघ बनलेले नसतात. त्यांच्यापेक्षां अम्मळ वरच्या दर्जाच्या जातींत मृतांचे दुय्यम थोडकेच जगत असतात अशी समजूत असल्यामुळें भुतांचा संघ जसा एकीकडे जमत जाईल तसा दुसरीकडे कमी होत जातो, म्हणजे त्यांत कायमची भर पडत नाहीं. पण नंतर जेव्हां भुतें निरंतर रहातात हा समज उत्पन्न होतो तेव्हां हा समूह अर्थात् मोठमोठा होत जातो, आणि समाज जसजसा मोठा होत जाईल व त्यांतील दंतकथा जसजशा जास्त जास्त काळपर्यंत टिकूं लागतील, तसतसा हा समूह जास्त जास्त प्रमाणावर वृद्धिंगत होऊं लागतो. म्हणून ह्या सत्त्वांची कोटें कोटें इतकी वृद्धि होते कीं त्यांच्यापैकीं वरिष्ठांची देखील गणती करतां येत नाहींसें होऊं लागतें. गोमारा आपल्यास सांगतो कीं मेक्सिकोंतील देव दोन हजार आहेत म्हणून म्हणतात; आणि ह्यामध्यें प्रत्येक गांवच्या ह्यापेक्षांहि जास्त पुष्कळ भुतांची आणि अप्रसिद्ध मोठ्या माणसांची भर पडते. ह्याप्रमाणें ह्या भुतांची संख्या अनंत होते. ह्या भुतांचा संघ जसा वाढत जातो तसा त्यांच्यांत भेदहि उत्पन्न होत जातात. ह्या भेदांचें मूळ कारण म्हणजे भुतांचे दुय्यम होत. ह्या दुय्यमांचे संघ बनतात. ह्या संघांचे पोटसंघ बनतात. ह्या संघांचे पोटसंघ बनतात. ह्या संघांचे पोटसं

सांच्या आत्म्यांची भर घातली, म्हणजे केवढी मोठी संख्या होईल हें ध्यानांत येतें. हिंदुस्थानांतील व जपानांतील दंतकथातून दे ंची वगैरे संख्या ह्यापेक्षांहि जास्त मोठी सांगितलेली आढळते. अशा रीतीनें गोळ्याची वृद्धि झाली म्हणजे त्याबरोबर त्याच्या व्यवस्थितपणाचीहि वृद्धि होत जाते. प्राथमिक माणसाच्या भोळ्या समजुती सुट्या सुट्या व असंबद्ध असतात; एकाच टोळींतील निरनिराळीं माणसें त्यांत्वद्दल निरनिराळीं विधानें करीत असतात; आणि एकच माणूस प्रसंगानुसार तीच हकीकत सांगण्यांत फरक करीत असतो. पण कालानुगतीनें ह्या समजुतींस नीट व्यवस्थित स्वरूप येतें. शिवाय पिशाचकल्पनेवरून सृष्टींतील विलक्षण कृती तेवढ्या प्रथम भुताच्या म्हणून जें समजत असतात, त्यांत पुढें फरक होऊन सृष्टींतील सर्व गोष्टी आणि माणसांचेहि सर्व विचार व कृति भुतेंच उत्पन्न करितात, अशी त्या कल्पनेची सुव्यवस्थित वृद्धि होते.

एवंच एकीकडे एकंदर गोळा आणि त्याचा व्यवस्थितपणा ह्यामध्यें नेहमीं ह्या निसर्गोत्तर सत्त्वांची वृद्धि होत असतां दुसरीकडे त्यांचें विविधजातीयत्वहि वाढत जातें. प्रथम सर्व भुतें जीं सारखीं समजलीं जात असतात, तीं टोळी जशी मोठी होत जाईल, संकीर्ण होत जाईल, व तिला इतिहास येत जाईल, तशीं विसदृश होत जातात; म्हणजे पिशाचरूपी जो जीववर्ग, तो प्रथम बहुतेक समस्वरूप असून पुढें विविधस्वरूप होऊं लागतो. प्रथम भुतांमध्यें चांगलीं व वाईट एवढाच भेद असून तो निवंत माणसांमध्येंच दिसणारा असतो; पण लवकरच आप्तां-

च्या भुतांचा चांगलेपणा व इतरांच्या भुतांचा चांगलेपणा ह्यांत कल्पित फरक उत्पन्न होतात; आणि आपल्याच जातींतील सुष्ट भुतें व इतर जातींतील मत्सरी भुतें ह्यांच्यांत तर जास्तच भेद उत्पन्न होतो. समाजांत निरनिराळ्या उच्चनीच वर्गांची स्थापना झाली म्हणजे तदनुसार सामर्थ्य व दर्जा ह्यांच्या संबंधानें ह्या निसर्गोत्तर सत्त्वांतहि भेद उत्पन्न होतात आणि हे भेद दंतकथांचा जसा विस्तार होत जाईल तसे जास्त जास्त ठळक होत जातात. शेवटीं त्यांच्यामध्यें अर्धवट देव बनलेले पूर्वज, अर्धवट देव, मोठे देव, आणि एक सर्वांत मोठा देव अशी देवपरंपरा उत्पन्न होते; त्याचप्रमाणें दुसरीकडे डांव, मुंजे, खवीस इत्यादि भूतपरंपरा सुरू होते. नंतर ह्या निरनिराळ्या देवदानवांचीं कामें किंवा कृत्यें निरनिराळीं बनून आणि त्यांचीं वसतिस्थानेंहि निरनिराळीं होऊन आणखी विजातीयत्व उत्पन्न होतें. एवंच प्रथम लहान व बहुतेक समस्वरूप असणाऱ्या निसर्गोत्तर सत्त्वसंघापासून जितका विस्तृत तितकाच विविधस्वरूप असा संघ उत्पन्न होतो.

वरें, अनिश्चितपणा जाऊन निश्चितपणा उत्पन्न होणें हें जें उत्क्रांतीचें आणखी एक लक्षण तेंहि ह्या ठिकाणीं तितकेंच स्पष्टपणें आढळून येतें. प्रारंभीं जेव्हां माणसें मृतांस भीत असतात, पण स्वतःस मरणोत्तर अस्तित्व येईल असें मानीत नाहींत, ती पिशाचकल्पनेची अगदीं अनिश्चितपणाची अवस्था होय. पुढें पिशाचकल्पनेची स्थापन झाल्यावर ह्या निसर्गोत्तर सत्त्वांसंबंधाच्या ज्या समजुती उत्पन्न होतात त्या जरी वळंकट असल्या तरी

अस्पष्ट असतात. आंगोलामधील लोक मृतांच्या आत्म्यांस नेहमीं भीत असतात असें जरी लिव्हिंगस्टन म्हणतो तरी त्यांच्यामध्यें त्यांस स्पष्टपणें माहीत नाहीं अशा कशाच्या तरी अर्धवट कल्पना आणि दंतकथा दृष्टीस पडतात. आणि अशाच प्रकारचीं इतर रानटी जातींचीं वर्णनें इतर प्रवाशांनीं दिलेलीं आहेत. परंतु जशी प्रगति होत जाईल तशा ह्या कल्पना स्पष्टतर होत जातात. निरनिराळ्या जातींचीं निसर्गोत्तर सत्वें आकार, स्वभाव, सामर्थ्य व संबंधीं ह्यासंबंधानें जास्त जास्त स्पष्टलक्षण होत जातात; सरतेशेवटीं वृद्धिंगत झालेल्या पुराणांतून त्यांचीं जातिपरत्वें किंवा व्यक्तिशःहि विशिष्ट गुणधर्मविषयक वर्णनें सांपडावयास लागतात.

सारांश, असें ठरतें कीं, इतर सर्व वस्तू ज्या रीतीनें उत्क्रांत होतात, त्याच रीतीनें धर्मभोळ्या समजुतींचीहि जंत्री उत्पन्न होते. तिचें सारखें घनीभवन व विभिन्नीकरण होत जाऊन असा एक समवाय बनतो कीं, तो वाढत जात असतां अनिश्चित व असुसंबद्ध असें समस्वरूप टाकून देऊन निश्चित व सुसंबद्ध असें विविधस्वरूप धारण करितो. अशा प्रकारचा मेळ बसणें हें खरोखर अनिवार्यच आहे. ज्या नियमान्वयें मानवी प्राण्याची उत्क्रांति होते आणि त्यामुळें त्याच्या बुद्धीचीहि होते, त्याच नियमाच्या अन्वयें त्या बुद्धीपासून उत्पन्न झालेल्या ज्या सर्व गोष्टी त्यांचेंहि उत्क्रमण झालेंच पाहिजे. हा नियम जर इंद्रियरचनांमध्यें आणि म्हणून गर्भितरीत्या इंद्रियव्यापारामध्यें दृग्गोचर होतो, तर त्या व्यापाराचीं जीं प्रत्यक्ष फलें त्यांमध्येंहि तो दृग्गोचर

झालाच पाहिजे. भाषा ही मानवी बुद्धीपासून उत्पन्न झाली असल्यामुळें तिच्या ठिकाणीं जर ह्या नियमाचा ठसा दृष्टीस पडतो, तर एकंदर वस्तुविषयक जी कल्पना माणसाच्या मनांत विकसित होत जाते, तिच्या ठिकाणींहि तो दिसलाच पाहिजे.

एवंच उत्क्रान्तिविषयक जी कृति ती तत्पूर्वीच्या विरुद्ध कृप्त्यांस गिळून टाकिते, आणि त्यांचे अवयव आपल्यांत ओढून घेऊन आपल्यास मजबूत करिते.

प्रकरण सत्तावीस

समाजशास्त्राचा आवांका

२०८. कोणत्याहि विषयाचा विवेचनक्रम अगदीं तर्कशास्त्रानुसार असावा असें ज्यांस वाटतें अशा आमच्या कांहीं वाचकांच्या मनांतून असा विचार उत्पन्न झाला असलाच पाहिजे कीं आतांपर्यंतच्या प्रकरणांतून समाजशास्त्राच्या मूलसिद्धांतांबरोबर पुष्कळ असें विवेचन आलें आहे कीं त्यास प्रत्यक्ष समाजशास्त्राचा भाग म्हणतां येईल. हा आक्षेप प्रथमदर्शनीं जरी बरोबर दिसतो, तरी त्यास असें उत्तर आहे कीं कोणत्याहि शास्त्राचें कांहीं तरी ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय त्याच्या मूलसिद्धान्तांचें कथन करतांच येणार नाहीं; आणि हे सिद्धान्त दृष्टीस पडण्यासाठीं जी फोड करावी लागते ती ज्या चमत्कारांची फोड करावयाची त्यांस मुळींच उल्लेख न करतां व्हावयाचीच नाहीं. उदाहरणार्थ, जीवशास्त्रांत एकाद्या जीवाच्या इंद्रियजालांच्या व्यापारांचें

स्पष्टीकरण होण्यास त्या इंद्रियजालांत चालणाऱ्या अनेक भौतिक व रासायनिक क्रियांचें ज्ञान अवश्यच असतें. असें आहे तरी इंद्रियरचनांचे संबंध आणि इंद्रियव्यापारांचें परस्परावलंबित्व हीं जशीं कळत जातील तशाच ह्या क्रिया ध्यानांत येऊं लागतात, इतकेंच नाहीं तर त्यांच्यावरून ज्या जीवविषयक क्रियांची उत्पत्ति होते त्यांना उल्लेख केल्याशिवाय त्यांचें वर्णनच करतां येत नाहीं.

आतां निरूपिलेल्या मूलसिद्धान्तांपासून उत्पन्न होणाऱ्या गोष्टी एकत्र करून त्यांस व्यवस्थित स्वरूप दिलें व त्यांच्यापासून निघणारीं सूत्रें बनविलीं म्हणजे त्या सिद्धान्तांचें, व विशेषतः आलीकडील प्रकरणांतून निरूपिलेल्या सिद्धान्तांचें प्रारंभीं कथन करण्याची काय जरूरी होती तें लक्षांत येणार आहे.

२०९. समाजोत्क्रमणाचे चमत्कार, ज्या बाह्य क्रियांचा समाजावर व्यापार होत असतो त्याजवर कांहीं अंशीं अवलंबून असतात, आणि कांहीं अंशीं समाजांतील व्यक्तींच्यां स्वभावावर अवलंबून असतात हें सत्य प्रथम ध्यानांत आणून, आणि समाजाचें उत्क्रमण जसें होत जाईल तशीं हीं दोन्ही प्रकारचीं समवायि कारणें स्वतः बदलत जात असतात हें सांगून, हीं दोन प्रकारचीं कारणें त्यांच्या मूलस्वरूपीं कशीं असतात ह्याचा आपण विचार केला. तो करतांना पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांवर सेंद्रिय व निरिंद्रिय परिस्थिति कशी असते ह्याचें प्रथम संक्षेपानें वर्णन केलें, आणि त्यामध्यें थंडी व उष्णता, आर्द्रता व शुष्कता, पृष्ठभाग, देशाचा आकार, जमीन, खनिज द्रव्यें आणि ठिकठिकाणचे वन-

स्पति व प्राणिवर्ग ह्यांचे निरानिराळे परिणाम काय होतात तें दाखविलें. समाजोत्क्रमण प्रारंभीं प्रारंभीं परिस्थिति अनुकूल असण्यावर कसें अवलंबून असतें, आणि समाजवृद्धि ससजशी होत जाईल तसतसें हें अवलंबन जरी कमी झालें, तरी परिस्थितीचें महत्त्व कसें कायम रहातें, ह्या गोष्टी प्रथम दाखवून नंतर असें दाखविलें कीं सर्व प्रकारच्या समाजांना सामान्यतः लागू असणारीं जीं व्यापकतत्त्वें त्यांचा विचार करतांना ज्या विशिष्ट बाह्य कारणांवरून त्या समाजांचे कांहीं विशिष्ट गुणधर्म उत्पन्न होत असतील त्यांचा अव्हेर केला तरी चालेल.

नंतर रानटी समाजांतून जीं अंतःकारणें दृष्टीस पडतात त्यांचा आपण विचार केला. प्रथम मूळ माणसाचा शारीरिकदृष्ट्या विचार केला व त्यांत असें दाखविलें कीं आकार, रचना, शक्ति, निरुत्साह आणि संवेदनापारुप्य ह्या गोष्टींनीं प्रगतिमार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्यास मूळ माणूस अगदीं असमर्थ असतो. नंतर त्याच माणसाचा मनोवृत्तिदृष्ट्या विचार करतां असें आढळून आलें कीं त्याच्यामध्यें अदूरदर्शीपणा आणि लहरीपणा ह्यांचें प्राचुर्य असल्यामुळें आणि परोपकारेच्छा किंवा इतरांशीं मिळून वागण्याची प्रवृत्ति ह्यांचा अभाव असल्यामुळें सहकारित्वाला तो अक्षम असतो. आणि शेवटीं त्याचा बुद्धिदृष्ट्या विचार करतां असें दिसलें कीं त्याचीं ज्ञानेंद्रियें तीक्ष्ण व चपळ असल्यामुळें रानटी स्थितींत राहण्यास जरी तो योग्य असतो, तरी त्याची ज्ञानवृद्धि होण्यास जे गुण पाहिजेत त्यांचा त्याच्या ठिकाणीं कमीपणा असतो.

समाजाच्या मूळ घटकाचे जे हे सामान्य गुणधर्म त्यांचा विचार केल्यावर आपल्यास असें आढळून आलें कीं त्याच्या कल्पना आणि सहचारी मनोभाव ह्यांमध्यें अंतर्गत जे त्याचे विशिष्ट गुणधर्म त्यांचा विचार करण्याचा राहिला. म्हणून त्याची स्वताची घटना व सभोंवतालच्या सृष्टीची घटना ह्यांविषयीं जे त्याचे समज त्यांचें नंतर विवेचन केलें, व त्या सगळ्या प्रकरणार्ची गोळाबेरीज गतप्रकरणांत घेतली. आणि ह्या सगळ्यावरून आतां सामान्य सिद्धान्त काय निघतो पहा. तो असा निघतो कीं प्राथमिक माणसाची वागणूक जशी कांहीं अंशीं सभोंवतालच्या माणसांविषयीं ज्या त्याच्या मनोवृत्ति त्यांना अनुसरून होते, तशी ती कांहीं अंशीं मृतमाणसांविषयीं जे त्याचे मनोभाव त्यांनाहि अनुसरून होते. ह्या दोन प्रकारच्या मनोवृत्तींवरून दोन प्रकारचीं अत्यन्त महत्त्वाचीं अशीं समाजविषयक समवायि कारणें उत्पन्न होत असतात. एकीकडे "जिवंताचें भय" राजकीय नियंत्रणाचें मूळ बीज होऊन दुसरीकडे "मृतांचें भय" हें धार्मिक नियंत्रणाचें मूलबीज बनतें. ह्या दुसऱ्या भीतीवरून उत्पन्न होणारी जी पूर्वजपूजा तिचा नाईल नदीच्या दरींत बरीच सुधारणा पावलेल्या लोकांच्या वर्तनावर केवढा पगडा होता हें ध्यानांत आणतां, तसेंच प्राचीन पेरूव्हियन लोकांत ही पूजा अत्यन्त वृद्धिंगत होऊन तिनें त्यांची सामाजिक स्थिति इतकी बद्ध झाली होती कीं जिवंत लोक मृतांचे जणू काय गुलामच बनले होते ह्या गोष्टीचें स्मरण करतां, तद्वतच ग्रीक व रोमन लोकांत कुटुंब व जात ह्यातील

मृतांचें समाराधन रूढ होतें ह्याची आठवण करतां, आणि चीन देशांत तर हल्लींहि अशाच पूजेपासून अशौच नियंत्रणें उत्पन्न झालेलीं आढळतात हेंहि लक्षांत आणतां, असें व्यक्त होईल कीं, प्रारंभीं मृताची भीति हें सामाजिक कारण जित्याची भीति ह्या कारणापेक्षां जरी जास्त महत्त्वाचें च खरोखर नसेल, तरी कमी महत्त्वाचें तरी खचीत नमतें.

आणि अशा रीतीनें समाजघटकांच्या समुदित व्यापारांना अवश्य असा जो हा त्यांच्या अंगचा विशिष्ट गुणधर्म त्याची उत्पत्ति व वाढ ह्यांबद्दल गत प्रकरणांतून जो विचार केला त्याची आवश्यकता स्पष्ट होते.

२१०. अशा प्रकारची परिस्थिति असलेले, शारीरिक, मनोवृत्तिविषयक आणि बुद्धिविषयक दृष्ट्या असे बनलेले, आणि प्रारंभींच ज्यांच्या अशा कांहीं कल्पना व तदनुरूप मनोवृत्ति बनलेल्या आहेत असे, समाजघटक घेऊन त्यांच्या समुदित क्रियांपासून ज्या एकंदर गोष्टी बनून येतात त्यांचा इतिहास देणें हें समाजशास्त्राचें कर्तव्य आहे.

ज्या क्रियांनीं एकामागून एक अशा समाजघटकांच्या पिढ्या जन्मास येतात, लहानाच्या मोठ्या होतात आणि सहकारित्वास योग्य बनतात, त्या क्रिया ह्या समुदित क्रियांपकीं अगदीं साध्या होत. एवंच कुटुंब बनणें ही गोष्ट क्रमानें प्रथम येते. स्त्रीपुरुषांचा अनिर्बंध व्यवहार, एका कालीं एका स्त्रीनें अनेक नवरे करणें, एका पुरुषानें अनेक बायका करणें, आणि एका पुरुषानें एकच बायको किंवा एका स्त्रीनें एकच नवरा करणें ह्यांचे प-

रिणाम अपत्यसंगोपनावर काय होतात, तद्वतच दुसऱ्या टोळींतून नवरी आणणें आणि जातीबाहेरच्यांशीं लग्न न करणें ह्यांचेहि त्याच्यावर काय परिणाम होतात हेंहि पाहिलें पाहिजे. ह्या गोष्टींचा जातींतील संख्या व गुप्त हीं कायम राखण्यावर काय परिणाम होतो हें जसें पाहिलें पाहिजे तसेंच वयांत आलेल्यांच्या स्थितीवर काय होतो तेंहि पाहिलें पाहिजे. शिवाय स्त्रीपुरुषांचें परस्परव्यवहार-विषयक हे जे निरनिराळ्या प्रकारचे संबंध त्यांचा कौटुंबिक जीवितावर काय परिणाम होतो हें जसें पाहिलें पाहिजे तसेंच सार्वजनिक जीवितावर काय होतो हेंहि पाहिलें पाहिजे; कारण ह्या जीवितावर जसा त्याचा परिणाम होत असतो तसाच त्यांच्यावर ह्या जीविताचा उलट परिणाम होत असतो. आणि अशा रीतीनें स्त्रीपुरुषविषयक संबंधाचा विचार केल्यावर, त्याचप्रमाणें, ईबापांचे मुलांशीं संबंध आणि मुलांचे अ ईबापांशीं चारि संबंध ह्यांचाहि विचार केला पाहिजे.

नंतर ज्या राजकीय व्यवस्था समाजव्यवहारांचें अनेकरीतींनीं नियमन करीत असतात, म्हणजे ज्यांच्या योगानें जात किंवा राष्ट्र ह्याच्यासंबंधाचा हल्ला किंवा संरक्षण करण्यासाठीं व्यक्तींच्या क्रिया एकत्र होत असतात, आणि ज्या त्या व्यक्तीच्या परस्परांशीं हाणाऱ्या कित्येक व्यवहारांचें आणि त्याच्या आत्मविषयकच कित्येक व्यवहारांचें नियमन करीत असतात, त्या संस्थांची उत्पत्ति आणि वाढ ह्यांचा विचार केला पाहिजे तद्वतच जातीनें किंवा राष्ट्रानें व्यापिलेला प्रदेश, त्यांतील किंवा तींतील लोकवस्तीची संख्या व त्या प्रदेशावर वांटणी,

आणि त्यांतील दळणवळणाचीं साधनें ह्यांच्याशीं ह्या व्यवस्थापक व नियामक राजकीय संस्थांचा काय संबंध असतो हें पाहिलें पाहिजे. तसेंच निरनिराळ्या प्रकारच्या समाजांमध्यें, म्हणजे, भटकणाऱ्या, एके ठिकाणीं स्थिर राहणाऱ्या, युद्धशील, उद्यमशील, अशा विविधरूप समाजामध्यें राजकीय व्यवस्थांना निरनिराळीं रूपें कशीं प्राप्त होतात हेंहि दाखविलें पाहिजे. तद्वतच अनुत्पादक अशा ज्या ह्या नियामक संस्था आणि उत्पादक अशा ज्या अन्य संस्था त्यांचे परस्परांशीं बदलत जाणारे संबंध ह्यांचें निरूपण करणें हेंहि समाजशास्त्राचें कर्तव्य आहे. तसेंच, राजकीय व्यवस्था करणाऱ्या सरकारसंस्था व त्याबरोबरच वाढत असलेल्या इतर म्हणजे धर्मविषयक आणि विधिविषयक सरकारसंस्था ह्यांचे परस्परसंबंध आणि परस्परांवर घडणारे परिणाम ह्यांचेंहि निरूपण केलें पाहिजे. आणि शेवटीं राजकीय बंधक सारखा अंमल राहिल्यानें समाजघटकांच्या स्वभावामध्यें जे फरक होत जातात आणि ह्या बदललेल्या स्वभावांच्या त्या राजकीय संस्थांवर ज्या प्रतिक्रिया होतात त्यांचाहि विचार केला पाहिजे.

ह्याचप्रमाणें धर्मविषयक संस्था व त्यांचे व्यापार ह्यांच्या उत्क्रमणाचें निरूपण करणें हें समाजशास्त्राचें काम आहे. त्या जेव्हां राजकीय संस्था व त्यांचे व्यापार ह्यांपासून निराळ्या करण्याची प्रारंभीं पंचाईत पडत असते तेथून सुरवात करून नंतर त्यांना येणारीं भिन्न भिन्न स्वरूपें ह्यांचें वर्णन केलें पाहिजे. धर्माधिकाऱ्यांचा राजकीय व्यवहारांत हात कसा कमी होत जातो; तद्वतच उलटपक्षीं,

जकीय अंमलदार धर्माच्या कामांत कमी कमी हात कसा घालूं लागतात, ह्या गोष्टींचें विवेचन केलें पाहिजे. तद्वतच, समाज वाढत जाईल तसतशीं भिन्नभिन्नस्वरूप व अधिकाधिक संकीर्ण होत जाणारी जी धर्माधिकारीविषयक अंतर्व्यवस्था तिचा राजकीय व इतर व्यवस्थांशीं स्वरूपदृष्ट्या संबंध कसा बनत जातो आणि त्यांच्यांत जसे रचनेसंबंधानें फरक होत जातील तसे हिच्यांतहि कसे होत जातात, ह्याहि गोष्टी दाखविल्या पाहिजेत. शिवाय, राजकीय कायदे आणि धर्मविषयक कायदे ह्यांच्यांत जास्त जास्त भिन्नपणा कसा उत्पन्न होत जातो, आणि धर्मविषयक कायद्यांत केवळ विधिविषयक नियम आणि नीतिविषयक उपदेश असे दोन भेद कसे होत जातात, हेंहि दाखविलें पाहिजे. तद्वतच धर्माधिकारीवर्गाची रचना, त्यांचे नियम, त्यांच्या क्रिया, आणि त्यांच्या धर्मसमजुती ह्यांचा लोकांच्या स्वभाचारांशीं संबंध कसा असतो, आणि ह्या दोहोंच्या एकमेकांवर क्रियाप्रतिक्रिया होऊन दोन्ही कशीं बदलत असतात ह्यांचेंहि निरूपण ह्या शास्त्रानें केलें पाहिजे.

नागरिकांचीं लहान सहान कृत्यें ज्यांच्या योगानें नियमित होतात त्या नियंत्रणांचेंहि विवेचन केलें पाहिजे. राजकीय आणि धार्मिक नियंत्रणांच्या अगोदर चालीरीतीचें नियंत्रण अमलांत येत असतें; आणि त्याला श्रेष्ठ समाराधनापासून सुरवात होऊन माणसामाणसांमध्यें व्यवहार कसा व्हावा ह्याचे नियम त्यावरून ठरून जातात. जे अंगच्छेद विजयाच्या खुणा होऊन गुलामगिरीचीं चिन्हें बनतात, जीं वंदनें जित लोकांमध्यें नम्र-

तेचीं दर्शक म्हणून प्रथम सुरू होतात. ज्या पदव्या आपण आमचे धनी आहां असें प्रत्यक्ष किंवा आलंकारिकरीत्या सांगण्यासाठीं प्रथम लावूं लागतात, आणि जे नमस्कार, रामराम किंवा सलाम कनिष्ठपणाचेच दर्शक म्हणूनच प्रथम करूं लागतात, त्या सर्वांची उत्पत्ति व वाढ ह्यांची सरणी लावून दिली पाहिजे. चालीरीती राखून ठेवणारी जी घटना तिची वाढ, विधी वाढत जाणें, संकीर्ण होणें आणि जास्त जास्त रूक्ष होत जाणें आणि या सगळ्यांवरून वर्तनाचे गौण नियम बनणें, ह्या सर्वांचेंहि वर्णन केलें पाहिजे. शिवाय ह्या नियामक व्यवस्थांचें त्यांबरोबरच असणाऱ्या इतर नियामक व्यवस्थांशीं संबंध काय असतात ते पाहिले पाहिजेत; कारण त्या सर्वांचें नियंत्रणाच्या संबंधानें सारूप्य असावें लागतें. आणि शेवटीं या नियंत्रणाचे व माणसाच्या स्वभावांचे परस्परांवर होणारे परिणाम यांचा विचार केला पाहिजे.

व्यवस्था लावणाऱ्या संस्थांचा व त्यांच्या व्यापारांचा विचार केल्यानंतर व्यवस्थित संस्थांचा व त्यांच्या व्यापारांचा विचार केला पाहिजे. नियामक आणि क्रियावान् असे प्रत्येक समाजाचे दोन अगदीं ठळक भेद समाजांत करीत असतात; आणि ह्या दोन भागांचे जे परस्परसंबंध तत्संबंधी विवेचन हें अत्यंत महत्त्वाचें होय. नियामक भागाशीं क्रियावान् भागाचा जो प्रथम संयोग असतो तो कोणत्याकोणत्या पायऱ्यांनीं निघून जाऊन शेवटीं ते अगदीं पृथक् होतात हें पाहिलें पाहिजे. तद्वतच ह्या क्रियावान् किंवा उद्योगधंदे करणाऱ्या भागामध्यें नियामक घटना कशा उत्पन्न होत जातात हाहि विषय

विचार करण्यासारखाच आहे. उद्योगधंदेवाल्यांचे जे जिन्नस उत्पन्न करण्याचे उद्योग त्यांना दिशा लावून द्यावी लागत असते; म्हणून ही दिशा लावून देणारी जी व्यवस्था तिच्या निरनिराळ्या स्वरूपांचें निरीक्षण केलें पाहिजे; म्हणजे निरनिराळ्या धंद्यांचे कामकरी ज्यांच्या धोरणानें काम करितात त्या संस्थांचीं निरनिराळीं रूपें, ज्या संस्थांखालीं एकाच धंद्याचे लोक एकत्र होतात त्यांचीं निरनिराळीं रूपें, आणि ज्या संस्था निरनिराळ्या उद्योगधंद्यांमध्यें समतोल ठेवितात त्यांचें स्वरूप, ह्या सगळ्यांचें विवेचन केलें पाहिजे. तद्वतच उद्योगधंद्यावरचें हें सरकार आणि राजकीय व धार्मिक सरकारें ह्यांचे प्रत्येक पायरीला काय संबंध असतात, आणि तसेच त्यांचे व समाजघटकांच्या स्वभावाचे काय असतात, आणि त्यांचे परस्परांवर परिणाम काय घडतात, ह्यांचाहि विचार केला पाहिजे. उद्यमसंस्थांतील नियामक भागानंतर क्रियावान् भाग येतो, आणि त्याच्याहि उत्क्रमणाच्या निरनिराळ्या पायऱ्या असतात. माल उत्पन्न करणाऱ्या संस्था आणि त्याची वांटणी करणाऱ्या संस्था ह्या पृथक् कशा होत जातात हें प्रथम सांगितल्यानंतर दोहोंमध्येंहि आणखी श्रमविभाग कसा होत जातो, म्हणजे माल उत्पन्न करणारांमध्यें व तो निरनिराळ्या ठिकाणीं नेणारांमध्यें निरनिराळे वर्ग व जाती कशा उत्पन्न होतात हें सांगितलें पाहिजे. आणि शेवटीं, उद्योगधंदे वाढत जाऊन निरनिराळे कसे होत जातात, व ते एकमेकांवर काय परिणाम करितात, म्हणजे परस्परांच्या

साह्यानें स्वतः उद्यमविषयक कलांची वृद्धि कशी होते हें सांगितलें पाहिजे.

प्रत्येक समाजाचें घटनाजाल आणि जीवित बनवणाऱ्या ज्या ज्या ह्या संस्था व त्याच व्यापार त्याच्या वाढीचा विचार केल्यानंतर त्यांच्याशींच सहचारी अशा दुसऱ्या कांहीं गोष्टींच्या वाढीचा विचार केला पाहिजे, म्हणजे भाषा, ज्ञान, नीति आणि सौंदर्याभिरुचि ह्यांच्या वाढींचा विचार केला पाहिजे; कारण त्यांस जशी समाजोत्क्रमणाची मदत होत असते तशा त्याहि त्या उत्क्रमणास मदत करीत असतात. भाषांसंबंधी अभिवृद्धीचा जो विचार करावयाचा तो प्रथम भाषेच्या अभिवृद्धीचा केला पाहिजे; म्हणजे, भाषा जी प्रथम अगदीं असुसंबद्ध, अनिश्चित व समस्वरूप असते, ती क्रमाक्रमानें ज्यास्त ज्यास्त सुसंबद्ध, निश्चित व विविधस्वरूप कशी होत जाते, हें पाहिलें पाहिजे. समाजामध्यें जशी संकीर्णता उत्पन्न होत जाईल तशी भाषेमध्येंहि कशी होत जाते, आणि समाज जसा स्थिर होईल तसी भाषाहि स्थिर कशी होते, हें पाहिलें पाहिजे. शब्द व वाक्यें ह्यांची वाढ आणि त्याबरोबरच होणारी विचारांची वाढ— ज्या एकमेकींस मदत करीत असतात, त्यांच्यांतील परस्परसंबंध ध्यानांत आणिला पाहिजे; आणि हा संबंध, ह्या दोन गोष्टी एकमेकींच्या मदतीनें प्रचुर, नानाविध आणि यथार्थ कशा होत जातात, ह्या दृष्टीनें पाहिला पाहिजे. भाषेच्या अभिवृद्धीबरोबर होणारी जी ही बुद्धिविषयक अभिवृद्धि ती समाजसुधारणेसींहि संगत असते, व त्या एकमेकींस मदत करीत असतात हें मागून

पाहिलें पाहिजे. ज्यास्त ज्यास्त होणाऱ्या अनुभवांपासून तुलना उत्पन्न होतात, आणि त्यांच्यावरून साध्या अशा सामान्य सिद्धान्तांची उत्पत्ति होत असते. नंतर हळूहळू सर्वत्र समस्वरूपता, क्रम, कारण इत्यादि कल्पनांची उत्पत्ति होऊन जसजसें एकेक सत्य स्थापन होत जाईल तसतशा त्या स्पष्ट होत जातात. आणि समाजवाढीची प्रत्येक पायरी व शास्त्रीय ज्ञानाची प्रत्येक पायरी ह्यांचा संबंध जसा लक्षांत आणिला पाहिजे, तशीच स्वतः शास्त्रीय ज्ञानाची वृद्धि कशी होत जाते, म्हणजे प्रथम जीं साधीं व असुसंबद्ध अशीं थोडींशीं सत्यें असतात त्यांचीं नानाविध, सुसंबद्ध व तंतोतंत अशीं अनेक सत्यें बनून त्यांपासून विशिष्ट शास्त्रें कशीं उत्पन्न होतात हें पाहिलें पाहिजे. सामाजिक फेरवदलांबरोबर होणारे जे मनोवृत्तिविषयक फेरबदल, जे एकमेकांचीं कार्यकारणें बनत असतात, त्यांचा विचार मागून केला पाहिजे; आणि ह्या विचाराबरोबरच नीतिविषयक मनोवृत्तींपासून नीतिविषयक बाडें कशीं बनत जातात हें सांगितलें पाहिजे. नंतर सौंदर्याभिरुचिविषयक कलांचा विचार केला पाहिजे. ह्या सर्व कला एका सामान्य मुळापासून भिन्न होत जाऊन शिल्प, कोरींव काम, रंगाचें काम, आणि तद्धतच नाचणें, वाद्यें वाजवणें, व गाणें, अशा निरनिराळ्या स्वरूपांनीं कशा वाढत जातात, आणि राजकीय व धार्मिक सुधारणांच्या ज्या निरनिराळ्या पायऱ्या, आणि तशीच नीतिविषयक व बुद्धिविषयक सुधारणेची जी बदलत जाणारी स्थिति, त्यांच्याशीं ह्या कलांचा कसा संबंध असतो हें दाखविलें पाहिजे.

२५२

शेवटीं एकंदर निरनिराळ्या घटना, त्यांचे निरनिराळे व्यापार, आणि त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या गोष्टी, ह्यांचा एकंदरीनें विचार केला पाहिजे. हे जे अनेक चमत्कारसमुदाय यांच्यामध्यें एकप्रकारचें परस्परानुरूप्य असतें; म्हणून समाजशास्त्राचें अत्यन्त मोठें कर्तव्य म्हटलें म्हणजे हें विस्तृत असें जें विविधजातीय चमत्कारजाल तें अशा रीतीनें आकलावयाचें कीं, प्रत्येक मजलीस प्रत्येक चमत्कारसमुदायाचें जें विशेष स्वरूप बनत असतें तें कांहीं अंशीं जसें त्याच्या पूर्वस्थितीवर अवलंबून असतें, तसें कांहीं अंशीं त्याच्यावर होणाऱ्या इतर समुदायाच्या गत व प्रस्तुत व्यापारांवरहि अवलंबून असतें, अशा स्वरूपानें तें लक्षांत यावें.

२११. परंतु हे जे अत्यन्त संमिश्र चमत्कार त्यांचें उपपादन करावयास लागण्याच्या पूर्वी त्यांचें साहचर्य व क्रम हे जे संबंध त्यांचें निरूपण प्रथम केलें पाहिजे. निरनिराळ्या प्रकारचे आणि निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेले असे जे अनेक समाज त्यांची तुलना करून आकार, रचना, व्यापार, इत्यादिकांचीं कोणकोणतीं स्वरूपें संगत असतात हें निश्चित केलें पाहिजे. म्हणजे काय, तर, सामान्य सत्यांची तार्किकरीत्या उपपत्ति करण्यापूर्वी त्यांची अनुभवरीत्या स्थापना केली पाहिजे.

म्हणून, तर मग, हें पूर्वविवेचन आतां पुरें करून समाजशास्त्रान्तर्गत प्रत्यक्ष गोष्टींचें परीक्षण करण्यास सुरवात केली पाहिजे, अशासाठीं कीं त्यावरून अनुभवदृष्ट्या काय सामान्यासिद्धान्त निघतात हें लक्षांत यावें.



REFBK-0000252